म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. ३२८२

REFBK-0025712

सुगम निबंध
३२८२
२५७९२
१०।८।८८

14 AUG 1991 6 NOV 1991

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

:–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे
वर्गणी भरावी लागेल.

SEP 1988
5 OCT 1988
OCT 1988
OCT 1988
NOV 1988
8 DEC 1988
DEC 1988

5 FEB 1989
22 FEB 1989
26 FEB 1989
10 MAY 1989
17 MAY 1989
23 JUL 1989
6 AUG 1989
27 SEP 1989
(कृ. मा. पहा)
५०००–११–८६
8 OCT 1989
23 JUN 1990
24 APR 1991

साहित्यातून
सत्याकडे





विजय तेंडुलकर यांच्या
निवडक साहित्याचा संग्रह

# साहित्यातून सत्याकडे

संपादन

शिरीष पै । प्रिया तेंडुलकर

डिंपल
पब्लिकेशन

REFBK-0025712

पहिली आवृत्ती : २ ऑगस्ट १९८८ किंमत : १७५ रुपये
© १९८८, विजय तेंडुलकर

रेखाचित्रे : वसंत सरवटे
मुखपृष्ठ : साईनाथ रावराणे
मुखपृष्ठावरील अक्षरांकन : कमल शेडगे
छायाचित्रे : मुकुंद सावंत
मांडणी : अरुण घाटे
संपादन व निर्मिती साहाय्य : सुनील कर्णिक

प्रकाशक

सौ. नम्रता मुळे
डिंपल पब्लिकेशन
३, कादंबरी सहवास
नौपाडा, वसई रोड स्टेशन (प. रेल्वे)
जि. ठाणे ४०१ २०२

अक्षरजुळणी : टाइपफोटो
वडाळा, मुंबई ४०० ०३१

मुद्रक

प्र. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

# संपादकांचे मनोगत

विजय तेंडुलकर ह्यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या निमित्ताने 'विजय तेंडुलकर : साहित्यातून सत्याकडे' ह्या ग्रंथाच्या संपादनाची जबाबदारी ह्या ग्रंथाचे प्रकाशक श्री. अशोक मुळे ह्यांनी आमच्यावर सोपवली. ही जबाबदारी स्वीकारताना एक फार मोलाची कामगिरी आपल्याला पार पाडावयाची आहे ह्या जाणिवेने प्रथम आम्हांला अतिशय आनंद झाला आणि त्याच वेळी मनाला खूप धास्तीही वाटली. कारण विजय तेंडुलकरांच्या साहित्यातून उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड करावयाची हे काम वाटते तितके सोपे नव्हते. गेल्या चाळीस वर्षांची त्यांची साहित्यसेवा लक्षात घेता त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व तसे अफाटच म्हणावयास हवे. कथा, एकांकिका, नाटक, पटकथा-संवाद, विविध प्रकारचे वृत्तपत्रीय आणि नियतकालिकांमधून केलेले लिखाण, वाङ्मयीन टीकालेख, कलासमीक्षा, आत्मचरित्रात्मक लेखन अशा अनेक प्रकारे त्यांच्या प्रतिभेने गेली चाळीस वर्षे साहित्यक्षेत्रात अनिरुद्ध संचार केला आहे. गेली काही वर्षे ते देशातील राजकीय आणि सामाजिक आंदोलनांशी समरस झाले असून विविध सभांमध्ये केलेल्या भाषणांतून त्यांनी पारंपरिक विचारांना धक्के देणारी आपली मते निर्भयपणे प्रगट केली आहेत. विशेषतः त्यांच्या काही नाटकांवर झालेल्या टीकेच्या संदर्भात त्यांना विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना त्यांची वैचारिक बंडखोरी प्रकर्षाने प्रगट झालेली आहे. ह्या एका मर्यादित ग्रंथात तेंडुलकरांच्या वाङ्मयीन प्रतिभेचे आणि व्यक्तित्वाचे ठळक दर्शन घडवावयाचे ही जबाबदारी खूप अवघड होती. ह्या ग्रंथाचे संपादन करताना ती सतत अवघडच वाटत राहिली. कारण त्यांची प्रत्येक कथा, प्रत्येक एकांकिका, प्रत्येक नाटक, प्रत्येक ललित आणि वैचारिक लेख त्यांनी मनस्वीपणे आणि उत्कटतेने लिहिला आहे. त्यांनी आपल्या कथानाटकांतून उभ्या केलेल्या असंख्य व्यक्तिरेखा इतक्या जिवंत आणि लोकविलक्षण, त्यांनी साहित्यातून चित्रित केलेले मानवी जीवन इतके तळस्पर्शी आणि प्रक्षोभकारक, त्यांच्या लिखाणातून प्रत्ययाला

येणारी जीवनसत्ये इतकी मर्मभेदक—एखादा बिकट पहाड चढून त्याची दुर्गम शिखरे गाठण्याइतकीच त्यांच्या उत्तम साहित्याची निवड करण्याची कामगिरी अवघड होती. ती आम्ही यशस्वीपणे पार पाडली आहे किंवा नाही हे अखेर ह्या ग्रंथाचे वाचकच ठरवणार आहेत. त्यांच्या निवडक साहित्यासोबत ह्या ग्रंथासाठी निवडलेल्या त्यांच्या लेखनाच्या संदर्भात त्यांची एक सविस्तर मुलाखतही आम्ही ग्रंथात अंतर्भूत केली आहे. गेल्या चाळीस वर्षांच्या त्यांच्या प्रदीर्घ साहित्यसेवेवर ह्या मुलाखतीतून प्रकाश पडेल असा आम्हांला विश्वास वाटतो. मराठी साहित्यात त्यांनी कोणती विशेष भर घातली, कोणता नवा विचार त्यांनी मराठी साहित्याला दिला ह्याचे नकळत आणि अजाणता आपोआप स्पष्टीकरण ह्या मुलाखतीतून त्यांनी दिलेल्या अर्थपूर्ण उत्तरांमधून झाले आहे. वाङ्मयीन चर्चेच्या मिषाने झालेल्या ह्या मुलाखतीतून तेंडुलकरांच्या अंतरंगात वाचकांचा सहज प्रवेश होऊ शकेल इतकी ती स्वच्छ बोलकी झाली आहे. तेंडुलकरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचे, वाङ्मयातले त्यांचे आजचे स्थान त्यांना ज्या एकाकीपणे दिलेल्या संघर्षातून मिळाले त्या संघर्षाचे पूर्ण दर्शन ह्या ग्रंथातून घडावे असे ह्या ग्रंथाचे स्वरूप नाही याची खंत आम्हांला आहे. आपला व्यक्तिगत गौरव ह्या ग्रंथातून व्हावा हे खुद्द तेंडुलकरांनाच मान्य नाही. तरीपण 'साहित्यातून सत्याकडे' प्रवास करताना तेंडुलकरांनी ज्या अनंत यातना भोगल्या त्या यातनांच्या 'अनंतयात्रे'ची हकिगत केव्हातरी त्यांच्याच प्रभावी लेखणीतून मराठी वाचकांसमोर येईल अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांच्या निवडक साहित्यकृतींचा हा संग्रह आम्ही मराठी वाचकांना सादर करीत आहोत.

**शिरीष पै, प्रिया तेंडुलकर**

३२८२
नोंद २५७७२
२०।५।८८

# प्रकाशकाचे निवेदन

*विजय तेंडुलकरांच्या निवडक साहित्याचा संग्रह प्रकाशित करणे हा आजच्या कोणत्याही प्रकाशकासाठी महत्त्वाकांक्षेचा कार्यक्रम ठरला असता. आमच्या डिंपल प्रकाशनासाठी तर तो होताच. कारण वर्षाकाठी दीडदोनशे पानांची चारपाच पुस्तके प्रकाशित करणे एवढाच आमचा आजवरचा कार्यक्रम राहिला आहे.*

*नाही म्हणायला 'वासूनाका सांगोपांग' आणि 'सर्व सुर्वे' हे आधुनिक मराठी साहित्यातील दोन महत्त्वाचे ग्रंथ आम्ही अलिकडेच प्रसिद्ध केले आहेत. त्यामुळे तेंडुलकरांच्या निवडक साहित्याच्या संग्रहाची योजनाही निश्चितपणे पूर्ण करता येईल असा विश्वास वाटत होता.*

*कामास सुरुवात केल्यानंतर अनेक जाणकारांचे मनःपूर्वक सहकार्य मिळू लागले, एवढेच नव्हे तर काही जणांनी स्वतःहून मदतीचा हात पुढे केला आणि निरपेक्षपणे ते आमच्या पाठीशी उभे राहिले.*

*खुद्द तेंडुलकरांनी आपल्या दैनंदिन कार्यक्रमांच्या घाईगर्दीतून वेळ काढून आमच्याबरोबर अनेकदा चर्चा केली, काही दुर्मिळ साहित्य मिळवून दिले, एवढेच नव्हे तर संग्रहाच्या काही भागांची मुद्रितेही तपासली.*

*प्रिया तेंडुलकरांनी आपल्या वडिलांचे बव्हंश लेखन स्वतःकडे जपून ठेवले आहे. साहित्याची निवड करताना त्यांच्या या व्यक्तिगत संग्रहाचा फार उपयोग झाला. शिवाय त्यात उपलब्ध न झालेले काही लेखन त्यांनी व शिरीष पै यांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातून मोठ्या मेहनतीने मिळवले.*

*ज्येष्ठ संपादिका शिरीष पै यांचा तर या संग्रहाच्या उभारणीत फार मोठा वाटा आहे.*

संग्रहाची कल्पना त्यांनी उचलून धरली, एवढेच नव्हे तर त्यानंतर तेंडुलकरांशी चर्चा करणे, त्यांच्या सर्व साहित्याचे वाचन करून त्यातून निवड करणे, संग्रहासाठी तेंडुलकरांची मुलाखत घेणे, मुद्रिते तपासणे, या सर्व कामांत त्यांनी मनापासून पुढाकार घेतला. त्यांचे सहकार्य मिळाल्यामुळेच या संग्रहाचे प्रकाशन अतिशय सुकर झाले.

याखेरीज वसंत सरवटे यांची विपुल व कल्पक रेखाचित्रे, अरुण घाटे यांची टाइपाची निवड व संग्रहाची मांडणी, साईनाथ रावराणे यांचे देखणे मुखपृष्ठ, सुनील कर्णिक यांचे विविधांगी सहकार्य, सूचिकर्त्या विद्या जोशी यांचे संदर्भ-संकलन, या सर्वांची गुणवत्ता व उपयुक्तता वाचकांना जाणवेलच. इतरही अनेकांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत झाली आहे. त्यापैकी काहींचा निर्देश संग्रहाच्या सुरुवातीच्या श्रेयनामावलीत केलेलाच आहे. त्याखेरीज प्रा. श्री. पु. भागवत व प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी आपल्याकडील पत्रसंग्रह उपलब्ध करून देताना दिलेल्या मनःपूर्वक सहकार्याचाही उल्लेख करायला हवा. या सर्व सुहृदांचे तसेच डिंपल प्रकाशनाला नेहमीच साहाय्यभूत ठरणाऱ्या भाऊ पाध्ये, दिलीप काळे, बियन चव्हाण, रेखा बेहेरे, डॉ. किशोर नायमपल्ली, 'मौजे'चे श्रीकांत व संजय भागवत या सर्व स्नेह्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते.

या संग्रहाच्या निर्मितीसाठी अनेक लहानमोठ्या मंडळींनी आपला वेळ आणि कसब खर्च केले आहे ते केवळ वाचकांना उत्तम ग्रंथ देता यावा याच हेतूने. आता वाचकांकडून प्रतिसाद मिळाल्यास आम्हा सर्वांनाच आनंद होईल.

**सौ. नम्रता मुळे**



# अनुक्रम


कथा ११

एकांकिका ९७

नाटक १६७

बालनाट्य २४१

पटकथा २५९

वृत्तपत्रीय तथा ललित लेखन ३२७

पत्रलेखन ४६१

छायाचित्रण ४८५

मुलाखत व आत्मनिवेदन ५०५

परिशिष्टे ५२९



# कथा



**सौभाग्य**

'काचपात्रे', १९५८

**शोध**

'काचपात्रे', १९५८

**अखेरचे दिवस**

'द्वंद्व', १९६१

**बेडूक**

'गाणे', १९६६

**मित्रा**

'द्वंद्व', १९६१

**दर्द**

'फुलपाखरू', १९७०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ...........
शंकर शाखा

# सौभाग्य

विचारवंतांच्या मते झाड की बी, कोंबडी की अंडं, या प्रश्नाइतका नीतिअनीतीचा प्रश्न खरोखर अवघड नाही. माणूस निर्माण झाल्यानंतर प्रथम अनीती निर्माण झाली असली पाहिजे, आणि मग पर्यायानंच तिची उलट बाजू—नीती. अनीतीनं कुठल्या तरी आरशात पाहिलं आणि त्या क्षणी नीतीचा जन्म झाला असं म्हणता येईल. म्हणजेच अनीती खरी आणि नीती हे केवळ प्रतिबिंब. भास. काही तरी खोटं.

हे सारं इतकं सोपं असूनही सहसा कुणाला पटत नाही. ही गोष्ट वाचल्यावरही ते पटणार नाही. मात्र यातलं तथ्य (काही असलंच तर) वाचकांच्या ध्यानी यावं एवढ्यासाठी ही गोष्ट सांगणार आहे. तसं म्हटलं तर ही गोष्टही नाही. प्रत्यक्ष माहितीवर आधारलेली ही—कुणाचा विश्वास बसणार असेल तर—खरी हकीकत आहे. कदाचित अपवादभूत असेल; पण खरी मात्र आहे.

मुंबईची कल्पना आता सर्वांना आहे. मुंबईत कुणाला कुणाचा शेजार मिळेल आणि कुणाचा सहवास घडेल त्याचा नेम नाही. विशेषतः युद्धकालीन पळापळीनंतर निर्भय होऊन जेव्हा पळालेले मुंबईकर परतले तेव्हा त्यांना हे विशेष जाणवलं. राहायच्या जागेची टंचाई निर्माण झाली होती. जागांबद्दलचे नवनवे कायदे होत होते. पागड्यांच्या लठ्ठ रकमा घेऊन पाणीपुरी खात निर्वासित चौफेर फिरत होते. ही चांगली जागा आणि ही वाईट, हा चांगला शेजार आणि तो वाईट, असल्या भेदाभेदांना वाव उरला नव्हता. राहायला जागा एवढंच फक्त महत्त्वाचं होतं आणि ते भारी महत्त्वाचं होतं. मुंबईत परतल्यावर राजापूरकर कुटुंबाची अशीच काहीशी अवघडल्यासारखी परिस्थिती झाली. त्यांच्या सबंध 'त्रिलोक चाळ नंबर १०' मध्ये पूर्वीच्या

काळात तिसऱ्या मजल्यावर केवळ एकच संशयास्पद वर्तणुकीची स्त्री होती. तिच्या दारावर 'मिडवाइफ' म्हणून पाटी होती, तरी तिनं कधी ते काम केलं नव्हतं. आणि तिच्याकडे अगणित पुरुष येत, तरीही तिच्याबद्दल फक्त संशयच होता आणि कुठल्याही प्रतिष्ठित बाईसारखी ती तोऱ्यात असे. ब्राह्मणी हेल काढून बोले. शेजारपाजारची मुलंबाळं तिच्या घरात दिवसा बागडत आणि याचं कुठलीही आई कधी काही मानत नसे. राजापूरकर पतिपत्नी परत येतात तो त्यांच्या—म्हणजे चाळीच्या दुसऱ्या—मजल्यावरच्या एकूण पाच बिऱ्हाडांतल्या चारांत धंदेवाईक वेश्या सुखाने रहात होत्या आणि पाचवं त्यांचं स्वतःचंच.

नवरा राजापूरकर पळापळीपूर्वी मिलमध्ये कारकून होता. नोकरी सोडून तो जागेला कुलूप ठोकून आईला आणि बायकोला घेऊन गावी पळाला होता. आई गावीच वारली होती. पुन्हा काम मिळण्यासारखं असल्याचं पत्र त्याला मित्राकडून गावी मिळालं होतं आणि म्हणून तो बायकोला घेऊन मुंबईकडे परतला होता. आता आल्याआल्याच ही परिस्थिती पाहून तो धसकला. बायकोही मूढ झाली. चिडली, संतापली. परंतु त्या वेळी, त्या स्थितीत, निमूट जागा उघडून, आत सामान ठेवून रात्र कंठण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. राजापूरकर पतिपत्नींनी तेच केलं. जीव मुठीत धरून पुढला विचार करीत त्यांनी त्या जागेत रात्र काढली. असल्या घाण शेजारात कसं रहायचं ? रांकेनं चार बिऱ्हाडं उघडउघड वेश्यांची आणि नंतरचं एक आपलं, ही परिस्थिती निःसंशय लज्जास्पद आणि संतापजनक होती. सकाळी उठून राजापूरकर मालकाकडे गेला आणि आपला निषेध त्यानं व्यक्त केला. ''तुम्हीही जागा सोडाल तर फार बरं होईल; आणखी एक वेश्या ठेवता येईल. त्या निदान भाडं तरी थकवीत नाहीत.'' असं मालकानं म्हटलं. यापुढं युक्तिवाद करण्यात अर्थ नव्हता. राजापूरकर मालकाकडून परत आला. पतिपत्नीला समजलं की ही परिस्थिती कायम रहाणार. हे मान्य करून इथं रहाणं भाग आहे.

मिस्टर राजापूरकरला या परिस्थितीचा विशेष जाच होण्यासारखा नव्हता; कारण प्रथम काम मिळवण्यासाठी आणि मग कामाच्या निमित्तानं तो दिवसाचे दहाबारा तास घराबाहेर असणार होता. कधी दिवसा—कधी रात्री. कारण गिरण्यांना रात्रपाळ्याही असतात. शिवाय तो पुरुष होता. वेश्यांच्या शेजाराचा त्रास पुरुषाला कमीच. त्या मानाने सौ. राजापूरकरचा दिवसाचा क्षण न् क्षण कठीण जाऊ लागला. दार लावून ती दिवसभर घरात असे. नवरा आला की तिचं दार उघडे; पुन्हा बंद होई ते सकाळपर्यंत. रात्री दारूचा दर्प खिडकीच्या झडपांवाटे खोलीत दरवळे. दारावर धडक्या बसत. अश्लील शिवीगाळी ऐकू येई आणि दिवसा त्या चार भयंकर बायांच्या अर्वाच्य गप्पा. तसं त्या बोलत त्यात फारसं काही आक्षेपार्ह किंवा बीभत्स नसलं तरी त्यांच्या बोलण्यातला कुलीनपणाचा भास सौ. राजापूरकरला असह्य होई. घरंदाज भगिनींसारख्या त्या चौघी दुपारी स्वैंपाकाच्या गोष्टी आपापसात ऐसपैसपणे करू लागल्या की सौ. राजापूरकरला मळमळे.

असं चोवीस तास कोंडून घेण्याचाही कंटाळा आला. दिवसभर तोंड मिटून तरी किती आणि कसं रहायचं ? काम आवरता आवरता सौ.राजापूरकर शनिवारी शनिमाहात्म्य म्हणे, गुरुवारी

गुरुचरित्राचं पठण करी, इतर दिवशी अभंग, भजनं आणि गौळणी पुरत. परंतु एक दिवशी पलिकडच्या वेश्येनंही मारुतिस्तोत्राचं मोठमोठ्यांदा वाचन चालवल्याचं ऐकून सौ. राजापूरकर दिवसा दुपारची दाराला कुलूप लावून वरच्या मजल्यावरच्या कुलीन बिऱ्हाडांत बसायला जाऊ लागली. नजर नाकासमोर ठेवून ती चारी वेश्यांची दारं पार करी. जाताना सगळ्या आपल्याला कुत्सितपणे हसताहेत असं तिला वाटे; आणि ती मनोमन खजील होई. पण काहीच करणं शक्य नव्हतं.

अशा तऱ्हेनं दर दिवशी उठून वर जाण्याचाही सौ. राजापूरकरला पुढं कंटाळा आला. वरचं कुणाही खाली तिच्याकडे यायला तयार नसे. शिवाय त्या साऱ्या मनोमन आपल्याला कमी लेखताहेत असा संशय सौ. राजापूरकरला आला होता. वेश्यांचा शेजार असला म्हणून काय तिथं रहाणंही वाईट ? तोच शेजार आला त्याला कोण काय करणार ? जागा तरी दुसऱ्या कुठं मिळताहेत ? पण हे त्या बायांना समजत नसावं. सौ. राजापूरकरची पाठ वळली की त्या तिच्याकडे तुच्छतेने पहात, तिची कीव करीत, उसासे टाकीत. "बाई चांगली हो, पण एवढ्यानं गेली'' असं म्हणत. निदान सौ. राजापूरकरला हे सगळं घडतं असं वाटे.

म्हणून वर जाणंही मग बंद झालं. पुन्हा दार बंद आणि आत सौ. राजापूरकर जिवाला रमवीत किंवा लोळत, झोपत राहू लागली.

पलिकडे चार वेश्या असताना नवरा हीही एक कसोशीने जपण्याची वस्तू असते. सौ. राजापूरकर हे किंचित अधिकच कसोशीने करी. श्री. राजापूरकर यांतल्या एकाही बाईच्या दृष्टीत येऊ नये असं तिला वाटे. त्या चार बिऱ्हाडांवरून तो घरी आल्यानंतर त्याला सचैल आंघोळ घालावीशी तिला वाटे. त्याच्या वागण्यातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म बदलावरही तिच्या परीनं तिचं लक्ष होतं आणि त्यानं समाधानी रहावं म्हणून ती जास्त जास्त कष्ट घेऊ लागली.

साधारणपणे माणसाला सगळ्याच गोष्टींचा काही काळानंतर कंटाळा येतो. तसा सौ. राजापूरकरला नवऱ्याला जिवापाड जपण्याचा आला. तिला वाटू लागलं की हे सगळं व्यर्थ आहे. एक तर इतकं सगळं करूनही नवरा आणि त्या चार बाया समोरासमोर केव्हा तरी येतातच. आणि दुसरं म्हणजे असं घडूनही विशेष काही होत नाही. नवरा बिघडत नाही. इतक्या जवळच्या बिऱ्हाडांत तो बिघडण्याची शक्यताही नाही. शेण खायचं असेल तर पुरुष नेहमी ते राहत्या घरापासून दूर खातात, हे तत्त्व सौ. राजापूरकरला माहीत होतं.

एकदा दुपारी दारावर टकटक झाली आणि दार उघडून ती पाहते तो त्या चारी जणींपैकी एक, हातात रिकामी वाटी घेऊन दारात उभी. तिला विरजणाला थोडं दही उसनं हवं होतं. त्या तसल्या बाईला काही देण्याची इच्छा तर नव्हती. पण दिल्याशिवाय ती लवकर दारातून हलणारही नव्हती. तेव्हा ''आमच्याकडे नेहमी दहीच नसतं, आज आहे एवढं घेऊन चला.'' असं सांगून सौ. राजापूरकरनं घाईनं दही दिलं आणि त्या भयंकर बाईला दारातून पाकटवलं.

नवऱ्याला संध्याकाळी तिनं ही घटना सांगितली नाही. कुणालाच न सांगावी इतकी ती तिला विचित्र आणि लाजिरवाणी वाटत होती. रात्री आठ-साडेआठला पुन्हा दार वाजलं. श्री. राजापूरकरनं या वेळी दार उघडलं आणि दारात ती दुपारचीच बाई (आता तिनं रंगरंगोटी केली

होती) उभी होती. ''हे दही. उसनं नेलं होतं ते वापस !'' ती बाई म्हणाली. त्याच्या हातात तिनं दह्याची वाटी ठेवली आणि ती वळून निघून गेली. ती निघून गेल्यानंतर बराच वेळ कसल्या तरी उग्र अत्तराचा दर्प दरवळत राहिला. सौ. राजापूरकरला मग नवऱ्याला सगळं सांगणं भागच पडलं. तिनं सांगितलं त्यावर तो काही म्हणाला नाही. त्या बाईनं आणून दिलेलं दही मोरीत ओतून सौ. राजापूरकरनं रात्री अकराला मोरी स्वच्छ धुतली आणि वाटी अच्वळ एका अडगळीच्या जागी ठेवली.

दुसऱ्या दिवशी वाटी परत न्यायला ती बाई आली नाही तेव्हा तिसऱ्या दिवशी ती घरात ठेवण्यापेक्षा आपण होऊन परत केलेली बरी, असं सौ. राजापूरकरला वाटलं. हे काम नवऱ्याला सांगावं असं एकदा मनात आलं. पण मग ते तिनंच केलं. दार उघडंच होतं. वाटी परत घेताना त्या बाईनं, कुठलीही घरंदाज बाई करील तसलं मर्यादशील स्मित केलं. ''ओळखदेख ठेवा—'' असं वर म्हटलं. ''तुमच्या एजमानांना पहाते मी—'' असंही ती आणखी म्हणाली. सौ. राजापूरकरला मेल्याहून मेलं झालं. हे सगळं साऱ्या जगानं ऐकलं असं तिला वाटलं. आपल्याला या अमंगळ दारात सगळ्यांनी पाहिलं असं तिला वाटलं. घरी येऊन तिनं घासून घासून अंग धुतलं. देवापुढं डोकं टेकून त्याची करुणा भाकली. घरमालकाला 'मेला' म्हणून त्याच्याविरुद्ध काहीतरी कारवाई करण्याची आग्रहाची विनंती देवाला केली. आपण पवित्र असल्याचं तिनं देवाला आणि स्वतःला बजावलं. तरीही काही तरी बिघडल्याची जाणीव सलत राहिली. सौ. राजापूरकर नंतर तीनचार दिवस बेचैन, अस्वस्थ होती. हाही प्रसंग अर्थात तिनं आपण होऊन नवऱ्याला सांगितला नाही. त्यानंही काही विचारलं नाही.

यानंतर श्री. राजापूरकरचं पित्त एक दिवशी रात्री चढलं आणि तो ओकू लागला. आवाज करकरून ओकू लागला. बराच वेळ तो तसा ओकल्यावर सौ. राजापूरकरची पाचावर धारण बसली. घरात तर पित्ताची मात्रा नाही. डॉक्टरला तरी या अपरात्री (अशा वस्तीत) आपण एकट्या जाऊन कशा बोलावणार ? ओकाऱ्या थांबेचनात, तेव्हा मनाचा हिय्या करून ती दार उघडून शेजारी गेली. रात्रीच्या काळोखात आपल्याला कोणी पहाणार नाही याबद्दल तिला खात्री होती. शेजारचं दार तिनं हळूच ठोठावलं. दार उघडेना म्हणून मग ती परतणार तो दार उघडलं आणि धंदा संपवून नुक्तीच त्या बिऱ्हाडाची मालकीण बाहेर डोकावली. सौ. राजापूरकरनं तिच्याकडे पित्ताची मात्रा आहे का विचारलं. आणि तिनं तत्परतेनं शोधून आणून दिली. ''काही लागलं तर मागत चला !'' असं ती म्हणाली. ''नाहीतर शेजारी कशाला हवा ?'' असं तिनं विचारलं. सौ. राजापूरकर नाकात भिनलेला आयडिनसारखा उग्र भपकारा सहन करीत मात्रा घेऊन घरी परतली. बाईच्या घरातल्या खाटल्यावर पसरलेला अस्ताव्यस्त पुरुषदेहही तिला दिसला होता. आपलं पित्त चढतं की काय अशी भीती सौ. राजापूरकरला वाटत होती. तिनं नवऱ्याला मात्रा दिली, आपणही दोन वळसे घेतले. नवऱ्याला बरं वाटून तो झोपला. सौ. राजापूरकरही जे दिसलं ते विसरण्याचा प्रयत्न करीत मग झोपी गेली.

अशा प्रसंगाप्रसंगानं जडलेले हे चमत्कारिक संबंध तुटावेत असं सौ. राजापूरकरला वाटूनही ते जडतच गेले. शेजारच्या बिऱ्हाडकरूशी मनुष्य स्नेहानं वागण्याऐवजी फार तर भांडेल,

तंडेल, त्याच्याविरुद्ध अफवा पिकवील, त्याचा तिरस्कार करील; परंतु त्याची उपेक्षा करू शकणार नाही. तो नाहीच असं समजून जगू शकणार नाही. आणि इथं तर शेजारच्या रांकेनं चार बिऱ्हाडकरूंचा प्रश्न. अलिकडे महिन्याअखेरीस सौ. राजापूरकरला पैशांची चणचण भासे. दोनचार दिवस ती तसेच ओढी; पण मग हे जास्त जमत नसे. प्रथम प्रथम ती वरच्या मजल्यावरच्या कुणाकडून तरी हातउसने पैसे मिळवी. परंतु महिनाअखेर साधारणपणे नोकरीवाल्या सर्वांना सारखीच. तेव्हा पुढं पैशांऐवजी नकार मिळू लागले आणि मग यातून काही तरी मार्ग काढण्यासाठी सौ. राजापूरकरनं भीत भीत शेजारच्या बाईकडे एकदा थोडेसे पैसे हळूच हातउसने मागितले. तिनं ते दिले. न कुरकुरता दिले. सौ. राजापूरकरची पुरी गरज भागेल इतके दिले. त्यानंतर मग एका महिन्याला ही, मग पलिकडची, मग त्यापलिकडची असं करून राजापूरकर कुटुंबाची महिनाअखेर बिनबोभाट आणि सुरळीत पार पडू लागली. सौ. राजापूरकर एका ठराविक वेळेस जाऊन चौघींपैकी एकीकडून गुपचूप पैसे आणी. ते घरात साबणानं घासूनघासून स्वच्छ धुऊन देवापुढे ठेवी. मग ते स्वतःजवळ ठेवी, खर्च करी. त्यानंतर श्री. राजापूरकरच्या पगाराचे पैसे आले की लागलीच हे हातउसने पैसे परत बिनबोभाट जिकडचे तिकडे जात. सौ. राजापूरकरचं मन स्वच्छ होतं. आपण काही वाईट करतो आहोत असं तिला मुळीच वाटत नव्हतं. ती कल्पनाही तिच्या मनाला शिवत नव्हती. मधूनमधून आता शेजारच्या बाईशी ती घरातूनच खालच्या आवाजात औपचारिक गोष्टी करू लागली होती. बोलण्याचे विषय शक्यतो भक्तिमार्गातले, धार्मिक असत. देवाधर्माच्या बाबतीत त्या चौघींशी—निदान त्यांतल्या शेजारणीशी—आपलं चांगलं जमतं असं सौ. राजापूरकरला साश्चर्य आढळून आलं होतं. शेजारणीला तर साईमहाराजांचं सारं ओवीमय चरित्र पाठ होतं.

आणि एक विलक्षण घटना घडली. अलिकडे राजापूरकर उशिरा घरी येत असे. त्याची रात्रपाळी वाटेल तेव्हा येई. तो घरी पैसेही कमी देऊ लागला होता. 'हरवले', 'उसने चुकवले', 'चोरीला गेले' अशी काही तरी त्याची सबब असे. सौ. राजापूरकरला संशय आला. तिनं लक्ष ठेवलं. आणि घरून रात्रपाळीला निघालेला राजापूरकर सरळ पाचव्या बिऱ्हाडात शिरलेला तिला दिसला. चौथ्या वेश्येच्या घरात ! तिचा नवरा ! ज्याच्यावर तिनं आंधळा विश्वास टाकला होता तो ! सौ. राजापूरकर तरातरा बंद दारापुढे जाऊन उभी राहिली. राजापूरकर बाहेर येताच तिनं त्याचं मनगट धरलं. त्याला घरात आणलं.

"शेण खाल्लंत ?" तिनं दार लावून घेत संतापातिरेकानं थरथरत विचारलं.

"हो." तो शांतपणे म्हणाला.

"मी काय मेले होते ?" सौ. राजापूरकरनं प्रश्न केला.

"चांगली जिवंत आहेस की !" त्यानं खात्री दिली.

"का गेलात तिच्याकडे ?" सौ. राजापूरकरचा प्रश्न.

"ते काय समजावून सांगायला हवं तुला ?" राजापूरकरचा प्रतिप्रश्न.

"मला मुळीच आवडणार नाही ते !" सौ. राजापूरकरनं बजावलं.

''तुला आवडावं म्हणून करीतही नाही मी ते !'' राजापूरकरनंही बजावलं. ''माझ्या आवडीचा सवाल आहे तो.''

''जीव देईन मी.'' सौ. राजापूरकर ओरडली.

''लवकर.'' राजापूरकर म्हणाला.

आणि आपला नवरा हा एवढा कसा बदलला याबद्दल सौ. राजापूरकरच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. त्या बाईनं काही तरी केलं हे उघड होतं. कवटाळीण ! इतरांच्या संसारावर निखारे ठेवते ! कधी बरं होणार नाही तिचं ! वाट्टोळं होईल ! त्या वेळेपुरती सौ. राजापूरकर गप्प राहिली. परंतु तिनं असहकार पुकारला. नवऱ्याला ती जवळ येऊ देईनाशी झाली. त्यानं झाल्या गोष्टीबद्दल त्रिवार क्षमा मागितली पाहिजे, अशी तिची इच्छा होती. त्यानं पुन्हा असं घाणेरडं काही करू नये अशी तिची यानंतरची दुसरी इच्छा होती. त्यानं दोन्ही गोष्टी केल्या. क्षमा मागितली; पुन्हा असं काही करणार नाही असं वचन दिलं. काही दिवस हवं ते मिळवलं. आणि तो टोकाच्या पाचव्या बिऱ्हाडातल्या बाईकडे जातच असतो हे पुन्हा सिद्ध झालं.

''बस्स !'' सौ. राजापूरकर ओरडली. ''यापुढे एक तुम्ही तरी घरातून काळं करा, नाही तर मी तरी करते. मला नाही रहायचं असल्या घाणेरड्या माणसाबरोबर.''

नवरा आपल्याला बाहेर व्हायला सांगेल, अशी सौ. राजापूरकरची काहीशी रास्त अपेक्षा होती. झालं निराळं. त्या दिवशी सौ. राजापूरकरचा नवरा कामावर गेला तो घरी आलाच नाही. दुसऱ्या दिवशी नाही—तिसऱ्या दिवशी नाही—गिरणीत गेल्यावर कळलं की कामही त्यानं सोडलं. त्याच्या स्नेही मंडळींनी 'आपल्याला त्याचा थांगपत्ता नाही' असं स्पष्टच सांगितलं. पंधरवडाभर वाट पाहून आणि शोध घेऊनही त्याचा पत्ता लागला नाही. तो आला नाही, सौ. राजापूरकरला दिसला नाही. एक दिवशी तिचं तिलाच पुरतं कळून चुकलं की त्यानं आपल्याला सोडलं आहे. एकटं पडल्यावर आपली जिरेल अशी त्याची अपेक्षा आहे. आपल्याला नमवून, मग आपल्याबरोबर नांदून राजरोस त्या घाणेरड्या बाईशी संबंध ठेवण्याचा त्याचा डाव असावा. हे आपण होऊ देणार नाही. एक आपण नाही तर ती घाणेरडी बाई !

नवऱ्यानं सोडल्याचं कळून चुकल्यावर सौ. राजापूरकर रडली नाही की भेकली नाही. तिला माहीत होतं की आपण कुणाचं वाईट केलेलं नाही. दारी आलेल्याला रिकाम्या हाती कधी घालवलेलं नाही. देवधर्म संभाळून वागलो आहोत. आपल्या पुण्यसंचयाच्या बळावर एक दिवशी तो मुकाट घरी येईल. पाया पडेल. निमूट नांदेल. त्या चौथ्या हडळीकडे पहाणार देखील नाही. भावबळावर सौ. राजापूरकरचा दांडगा विश्वास होता.

सौ. राजापूरकरनं आठवड्यातले तीन उपवास चारावर नेले. स्तोत्रपठन वाढवलं. शेजारणींशी संबंध कमी केला. त्या पाचव्या बिऱ्हाडातल्या चौथ्या बाईविषयी तिच्या मनात तिरस्कार बळावला. तो तिनं शेजारणीपाशी व्यक्त केला. त्या बाईला तो शेजारणीकरवी कळावा अशी तिची इच्छा होती. तो कळलाही. शेजारणीनं तिला उलट निरोप आणून दिला, ''ती म्हणते, हिला नवरा राखता आला नाही आणि गावाच्या नावानं कशाला बोटं मोडते ?'' सौ.

राजापूरकरनं विचार केला, "मग काय मी त्यांना पेटीत बंद करून ठेवायचं होतं, की स्वतः तोंडाला रंग फासून पान चघळीत खिडकीत बसायचं होतं ?" आपलं काही चुकलं नाही याबद्दल सौ. राजापूरकरची बालंबाल खात्री होती.

परंतु आठवड्यातली एकूण चार जेवणं उपवास म्हणून सोडली तरी इतर दहा जेवणांचं काय ? त्यांची सोय काय ? घरखर्च कसा चालावा ? भाडं कुठलं भरावं ? सौ. राजापूरकरला माहेरची जवळची माणसं नव्हती. जी होती त्यांच्यापुढे हात पसरण्याची तिची इच्छा नव्हती. सासरची माणसं गावी होती. त्यांना तिनं एकदोन कार्डं पाठविली; परंतु जबाब आले नाहीत. नवरा परत येण्याचीही शक्यता अद्याप दिसत नव्हती. (परंतु तो येणार होता.)



सौ. राजापूरकरनं अखेर वरच्या मजल्यावरच्या तिच्या दर्जाच्या बिऱ्हाडकरूंकडून अन्न, धान्य, चिल्लर पैसे, जुने कपडे, अशा स्वरूपात मदत आणायला आरंभ केला. शक्यतो याचा ब्रभा होऊ नये म्हणून ती दर वेळी काळजी घेई. शिवाय यात लाज वाटण्याजोगंही काही नव्हतं. नवरा आल्यावर ती सगळं या ना त्या रीतीनं ज्याचं त्याला परत करणार होती. मदतीच्या बदल्यात ती कुणाच्या पोळ्या भाजून देई, कुठं पापड घालायला जाई, कुणाचं दळणकांडण करी, कुणाचं मूल खेळवी, कुणाच्या घरच्या बाळंतिणीच्या अंगाला तेल लावायचं काम करी—म्हणजे तसं मोफत असं काही ती घेत नव्हतीच. हो, श्रम करून जगण्यात कसला कमीपणा ?

एका माणसाचा काटकसरीनं झाला तरी मुंबईतला जागेसहित खर्च तसा कमी नसतो. त्या काळात तरी तो कमी नव्हता. एवढं सगळं करूनही सौ. राजापूरकरचं भागत नव्हतं. त्यात वरच्या मजल्यावरच्या लोकांनी हात आखडता घ्यायला सुरुवात केली. या बाईचा नवरा परत

आल्यावर सगळी परतफेड होणार आहे या सत्यावर त्यांचा मुळात विश्वास नव्हता; मग नंतर तो उरण्याचा किंवा न उरण्याचा प्रश्न कुठं येत होता ? आणि आपण करीत असलेल्या मदतीच्या हिशेबानं ही बाई आपल्यासाठी काही श्रम करते हे त्यांच्या मनातही येत नव्हतं.

या आटत्या, ओसरत्या मदतीतही सौ. राजापूरकरनं पश्चात्तापदग्ध नवऱ्याची वाट पहात अभिमानानं जगण्याचा अत्यंत प्रशंसनीय प्रयत्न केला. धार्मिक उपवासांपलिकडे तिला कित्येक कडक उपवास घडत. देणेकरी तगादे करीत. अंगावर धडकं वस्त्र नव्हतं. घरातली एकेक वस्तू मोडीत निघून आता फारसं काही उरलं नव्हतं. आता ती घराबाहेरही पडेनाशी झाली होती.

परंतु तिचा नवरा त्या पाचव्या बिऱ्हाडातल्या चौथ्या वेश्येकडे येत होता. प्रथम तो रात्रीच यायचा. आता दिवसाही येत असे.

सौ. राजापूरकरच्या शेजारच्या बाईनं एकदा तिला हे आपण होऊन सांगितलं. आणि म्हटलं, "गाठ त्याला तिथं आणि विचार जाब. नाही तर घरात आणून डांबून टाक. गडबड करायला लागला तर मार की फडाफड वहाणेनं." सौ. राजापूरकरनं हे करायचं साफ नाकारलं. तिचं म्हणणं, "मी एवढ्यासाठी त्या ××च्या घरापुढे भिकाऱ्यासारखी ताटकळू ? तिच्या दारी माझ्या अब्रूची लक्तरं वाळवू ? नाही होणार हे. मी नाही करणार. मला जायची गरज नाही. आपल्या पायांनी येईल तो घरबुडव्या माझ्याकडे. माझी पुण्याई बळकट आहे. देव झोपलेला नाही."

तरीही देव काही करीलसं दिसत नव्हतं. राजापूरकर पाचव्या बिऱ्हाडापलिकडे एक पाऊलही टाकायला तयार नव्हता. परिस्थिती कायम होती. सौ. राजापूरकरला आणखी विपन्नावस्था आली.

शेजारच्या तीन बायांना ते पाहवेना. प्रथम सौ. राजापूरकरच्या शेजारच्या पहिलीनं मदत देऊ केली. ती म्हणाली, "हे पहा, नाही तरी असतात माझ्याकडे तसे पैसे. येतात दर दिवसाला. तुम्हांला दिले म्हणून तूट पडणार आहे असं नाही. तुम्हांला किती हवेत तेवढे मागत चला. उपकार मानू नका. उसने नाही का नेत होतात ?"

सौ. राजापूरकरनं नकार दिला.

दुसरीनं हेच सांगितलं. "तुमचा नवरा परत येणार म्हणता—आला की परत करा." असं ती आणखी म्हणाली.

सौ. राजापूरकरनं नकार दिला. दुसरीनं पुढं केलेले पंचवीस रुपये तिनं मुळीच विचार न करता अव्हेरले. "मला नकोत. भिकारीण नव्हे मी. त्यातून हा पापाचा पैसा. अनीतीचा पैसा. मला हा नको. मेले उपाशी तरी चालेल. उसनवारीची गोष्ट वेगळी होती."

तिसरीची मदत तिनं अशीच झिडकारली. तिन्ही बाया मग स्वस्थ राहिल्या. सौ. राजापूरकरची दखल घेण्याचं त्यांनी सोडून दिलं. त्यांचे व्याप त्यांना पुरेसे होते.

अखेर एक दिवस असा आला की, घरात धान्याचा एक दाणा नव्हता. चुलीत सरपण नव्हतं. अंगावरच्या एकुलत्या एका वस्त्रालाही चिरफळ्या गेल्या होत्या. मोडीत काढायलाही जवळ

काही बाकी उरलं नव्हतं. अशी तऱ्हेनं जीवन आता अधिक पुढं चालणं शक्य नाही हे स्पष्ट झालं. सौ. राजापूरकरला हे समजलं. तेलाशिवाय जटा झालेल्या केसांत बोटं घालून तिनं डोकं खरवडून बघितलं. पण स्वाभिमान आणि सत्त्व संभाळून मार्ग निघत नव्हता. पुण्याईही फळाला येत नव्हती. नवरा त्या चौथ्या बाजारबसवीकडे येत होता; परंतु स्वतःच्या बिऱ्हाडाकडे सरकण्याची इच्छा त्याला होत नव्हती.

त्याच्याकडे जाऊन काही मागायचीही सौ. राजापूरकरची आता मुळीच तयारी नव्हती. भीक मागेन पण त्याच्यापुढे तोंड वेंगाडणार नाही असं एकदा वाटे; पुन्हा भीक मागणंही मरण वाटू लागे. शेजारणीकडे ती जाणार नव्हती. कारण त्यांनी शील, अब्रू, शरीर विकून मिळवलेला त्यांचा पैसा होता. तिच्यासारख्या साध्याभोळ्या बायकांच्या चालत्या संसाराची रोज रात्री धूळधाण उडवून तो पैसा त्या हीन बायांनी मिळवला होता, त्यांच्या घरातील वस्तू न् वस्तू पापानं बरबटलेली, अमंगळ होती. त्यांच्या दारापर्यंत जावं एवढासुद्धा किमान मोह सौ. राजापूरकरला होत नव्हता. स्वाभिमान, भावबळ, पुण्यसंचय सोडून ती करारी बाई परिस्थितीशी जुळतं घ्यायला मुळीच तयार नव्हती. त्यापेक्षा तिला मरण चाललं असतं.

माणूस हा मोठा कल्पक प्राणी म्हणतात ते खरंच. स्वाभिमान, भावबळ, पुण्यसंचय, सारं सांभाळून सौ. राजापूरकरनं अखेर परिस्थितीतून मार्ग काढला. काळोख पडल्यावर तिनं आपल्या बिऱ्हाडाचं दार उघडलं, ती बाहेर आली. तरतरत दुसरं, तिसरं, चौथं बिऱ्हाड ओलांडून पलिकडे गेली. पाचव्या बिऱ्हाडाचं दार तिनं ठोठावलं. ते उघडलं. पाचव्या बिऱ्हाडातली बाई, धंद्यासाठी रंगलेली, दारात उभी होती. तेलपाण्यावाचूनचा सौ. राजापूरकरचा अवतार पाहून ती धसकलीच. तिच्या विपन्नावस्थेची वर्णनं तिनं ऐकली असली तरी हे प्रत्यक्ष दर्शन विदारक होतं.

''काय हवं ?'' तिनं किंचित घाबरून विचारलं.

''आत येऊ दे मला.'' सौ. राजापूरकर डोळे गरगरवीत म्हणाली.

''तुमचे एजमान नाहीत आत.'' त्या बाईनं भित्र्या सुरात समजावलं.

परंतु सौ. राजापूरकर आत आली. तिनं दार लोटून घेतलं.

''तो तुझ्याकडे येतो ?'' दाराला पाठ लावून रुक्ष सुरात म्हणाली.

''हो.'' त्या बाईनं म्हटलं.

''रोज येतो ?''

तेही त्या बाईनं कबूल केलं.

''किती भाव घेतेस त्याच्याकडून ?''

बाई चांगलीच घाबरली होती. ''पण तुम्हांला काय करायचंय त्याच्याशी ?'' तिनं स्वतःला सावरीत म्हटलं, ''मी काय वाटेल ते घेईन त्याच्याकडून. गिऱ्हाईक आहे ते माझं.''

''हो.'' सौ. राजापूरकर म्हणाली. ''मला नको ते गिऱ्हाईक. पण मी उपाशी मरते आहे. सौभाग्य जिवंत असता अन्नाविना तडफडते आहे. मरायला लागले तर तोंडात पाणी

घालायलाही कुणी नाही. डोकं मांडीवर घ्यायलाही हयात असून यायचं नाही कुणी. आणि मला तसं मरायचंही नाही. मला जगायचं आहे. पुण्याई दांडगी आहे माझी. सत्त्व मोठं आहे माझं. आज तो कुत्रा तुझ्याकडे एकसारखा शेपटी हलवीत येत असला, तरी पुढे माझ्यापुढे नाक घाशीत, लूत भरलेल्या स्थितीत, पण एक दिवस येणार आहे तो. मग मरेन मी.''

''मग माझ्याकडे काय काम आहे तुमचं ?'' त्या बाईनं आता जरा जोरानं विचारलं.

''मला खायला अन्न नाही. ल्यायला कपडा नाही. भीक मागवत नाही आणि हक्काचं सगळं मोडून संपलं.''

''मग हे घ्या—'' त्या बाईनं कनवटीचे दहा रुपये तिच्या अंगावर फेकले.

''पापाचे आहेत ते !'' सौ. राजापूरकर ते झाडून टाकीत, दूर होत किंचाळली, ''मला नकोत ते ! मला नको ते पाप. पवित्र आहे मी. पवित्रच राहीन.''

''तर मग बया, कशाला आलीस तू माझ्याकडे ?'' ती बाईही आता मूढ झाली होती. चिडली होती.

''माझा नवरा तुला देतो ते मला हवं आहे.'' सौ. राजापूरकर कोरड्या, कठीण सुरात म्हणाली. ''ऐकलंस ? तो देईल ती नाणी, त्याच नोटा तू मला द्यायच्यास. त्याच्याकडनं घ्यायच्यास आणि मला द्यायच्यास. भीक नाही घालणार आहेस ही; हक्काचं आहे ते माझं. माझ्या नवऱ्याचं आहे. माझंच !''

''आणि नाही दिलं तर ?'' बाईनं विचारलं.

''तळतळाट भोवेल माझा तुला. शापीन मी तुला. तुला शापीत मरेन. मेल्यावर भूत होऊन उरावर बसेन तुझ्या—समजलीस ? पुण्याई मोठी आहे माझी.''

तळतळाटाच्या भीतीनं किंवा आणखी काही कारणानं, या व्यवहाराला चौथी वेश्या कबूल झाली.

आणि आजतागायत राजापूरकर त्या वेश्येकडे येतो, वाजवी भाव देऊन चालता होतो; ते पैसे ती तसेच बाजूला ठेवते आणि सौ. राजापूरकरच्या चरितार्थाला मग ते उपयोगी येतात. आपण पवित्र आहोत हा सौ. राजापूरकरचा ज्वलंत अभिमान पूर्वीइतकाच ज्वलंत आहे.

# शोध

आज वेड्यासारखा मी दिनकरपंतांच्या घरी गेलो आणि विचारलं की "शोध नावाची एक गोष्ट दिनकरपंतांनी काही दिवसांपूर्वी लिहून ठेवली होती; ती कुठं असली तरी सापडू शकेल का? मला ती हवी आहे."

माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालं नाही. पण माझ्या सभोवतालच्या शोकाच्या आणि दुःखाच्या छाया अधिक दाटल्या. दोनचार हुंदके अस्पष्ट उमटले आणि दडपले गेले. आणि स्तब्धता अधिक भयाण झाली. घर खायला आलं.

माझी चूक मला समजली. पण आता त्याला इलाज नव्हता. म्हणून मग सांत्वनपर चार शब्द उच्चारले, दिनकरपंतांबद्दल थोडंसं बरं बोललो आणि निघून आलो.

दिनकरपंत चारच दिवसांपूर्वी वारले. मृत्यूसमयी त्यांची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. मरताना त्यांचे हाल देखील फार झाले. हे मला कालच समजलं होतं. तोंडातोंडी ती बातमी कुणाकडून तरी ऐकली. क्षणभर वाईट वाटलं आणि मग मी दिनकरपंतांबद्दल सहज विचार करू लागलो. दिनकरपंतांच्या आणि माझ्या भेटी आठवू लागलो. त्यांचं मला माहीत असलेलं चरित्र आठवू लागलो. आणि त्या अनुरोधानं पुढच्या–मागच्या आठवणी करता करता त्यांनी लिहिलेल्या 'शोध' नावाच्या गोष्टीचं स्मरण मला झालं. ती गोष्ट मी दिनकरपंतांच्या तोंडून एका भेटीत अर्धवटच ऐकली होती. तितकी ती त्यांनी वाचून दाखवली आणि कसला तरी व्यत्यय आला. मीही तेव्हा शेवट विचारला नाही.

तुम्हांला वाटेल की दिनकरपंत हे कुणी मोठे लेखक होते आणि मी एखादा धंदेवाईक प्रकाशक किंवा संपादक असून मला ती गोष्ट प्रकाशनासाठी हवी आहे. परंतु तसं नाही. दिनकरपंत हे असलेच तर अगदी सामान्य लेखक होते आणि माझा व्यवसाय प्रकाशकाचा किंवा संपादकाचा नाही. मला त्यांची ती गोष्ट हवी आहे; पण फक्त वाचण्यासाठी. मला तिचा शेवट पहायचा आहे. दिनकरपंतांच्या 'शोध' या गोष्टीचा शेवट जाणून घेण्यासाठी मी आज विलक्षण उत्सुक आहे. केवळ एवढ्यासाठी मी वेड्यासारखा दिनकरपंतांच्या घरी गेलो आणि त्यांच्या मुलाबाळांच्या आणि धर्मपत्नीच्या दुःखावरची खपली काढली. मला माहीत होतं की दिनकरपंतांना जाऊन पुरते चार दिवससुद्धा झालेले नाहीत. पण तरीही मी गेलो. गोष्टीचा विषय काढला. आता याचं वाईट वाटतं.

दिनकरपंतांची आणि माझी पहिली भेट—आमची ओळख—मला या वेळी सहाजिकच आठवते आहे. माझ्यासारख्या पुस्तकांतल्या किड्याला, एकदा भेटल्यावर पुन्हा भेटावंसं वाटेल, असे ते नव्हते. त्यांच्यात माझ्या दृष्टीनं विशेष असं काहीच नव्हतं. कामाचा चोखपणा एवढं एकच व्यावसायिक वैशिष्ट्य मला आज त्यांचं म्हणून चट्दिशी सांगता येईल. दिनकरपंत हा अतिशय कष्टाळू मुद्रित-तपासनीस होता.

त्या दिवशी एका पुस्तकप्रकाशकाच्या पुस्तकाच्या दुकानात आम्ही साहित्याशी आणि – समाजकारणाशी संबंधित अशी तीनचार मंडळी सहजी जमलो होतो. आणि आमच्यात थोडीशी तात्त्विक चर्चा चालली होती. उच्च नैतिक मूल्यं ज्यांना आपण म्हणतो त्यांच्याबद्दलची निष्ठा दिवसेदिवस कमी कमी होत आहे. अनीती हाच व्यवहार असा एक नवा सिद्धांत निर्माण होत आहे, रूढ अर्थानं ज्यांना पापं किंवा दुष्कृत्य म्हटलं जातं त्यांना ऊत आला आहे आणि एकंदरीत माणसांतील माणुसकी नष्ट होऊन त्यांच्यातला पशू जगाचं राज्य करू पाहतो आहे, तेव्हा civilization चं भवितव्य काय ? असा चर्चेचा थोडासा गहन विषय होता. चर्चासुद्धा अगदी वरच्या पातळीवरून चालली होती.

तितक्यात एका कोपऱ्यात अंग चोरून बसलेला एक वृद्धसा कृश कुडीचा इसम एकदा घसा खाकरल्यासारखं करून मध्येच म्हणाला, "मंडळी, मर्यादा सोडून थोडंसं बोलतो याबद्दल राग धरू नका. माणुसकीबद्दल तुमचं काहीतरी बोलणं चाललं आहे. तिचं काय होणार हे मला माहीत नसलं तरी तिच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. ती नष्ट व्हायची नाही असं आपलं मला मनोमन वाटतं. कदाचित ते चूक असेल; पण माझ्याच आयुष्यातले काही प्रसंग तुम्हांला हवे तर सांगतो—"

आणि असं म्हणून त्या इसमानं दोनचार प्रसंग कुशल नटाच्या तन्मयतेनं वर्णन केले. माझ्या दृष्टीनं हे सगळं चर्चेला अगदी सोडून होतं एक, आणि दुसरं म्हणजे त्यानं सांगितलेल्या त्या सामान्य दर्जाच्या प्रसंगांपेक्षा त्याच्या सांगण्यातच अधिक माणुसकी होती, भावनेचा ओलावा होता, हळवेपणा होता, असा माझा ऐकताना ग्रह झाला. सगळं बोलून झाल्यावर तो दिलगिरी दाखवीत म्हणाला, "उगीचच तुमच्या बोलण्यात व्यत्यय आणला याबद्दल क्षमा करा. तुम्ही विद्वान मंडळी, माझ्या अडाणीपणाला हसू नका. वाटलं की बोलावं म्हणून धीर करून बोललो

झालं.''

आणि आमच्या सर्वांच्या निर्विकार, उपेक्षापूर्ण चेहऱ्याकडे पाहून त्याला काही तिथं फार वेळ बसवलं नसावं. आपण मध्ये बोललो ही चूक केली असा अपराधी भाव त्याच्या फिक्कट, रक्तहीन मुद्रेवर दिसत होता. तो हलकेच उठला आणि दुकानाच्या मालकांबरोबर बाहेर गेला. सहसा कुणाच्याही लक्षात भरणार नाही अशा पद्धतीनं येणं, जाणं, बसणं किंवा वावरणं हे त्याच्या व्यक्तित्वातलं एक वैशिष्ट्य मला तेव्हा जाणवलं आणि पुढं नेहमी जाणवत राहिलं.

दोनचार मिनिटांनी दुकानाचे मालक आत आले.

मी उपचार म्हणूनच फक्त, अगदी विनाउत्सुकता विचारलं, ''कोण ?''

दुकानदारांनी नाव सांगितलं, ''बाबा गोखले ते. आमची प्रुफं नेहमी त्यांच्याकडे असतात. थोड्या कामासाठी आले होते.''

आणि मी 'हूं' केलं. काही माणसांचा परिचय पहिल्या भेटीतच संपला तरी विशेष फिकीर वाटत नाही. माझ्या दृष्टीने तेव्हा बाबा ऊर्फ दिनकरपंत गोखले हे अशांतले होते. ओळख वाढावी, संबंध घनिष्ठ व्हावेत असं ज्यांच्याबद्दल वाटतं अशा असामान्य व्यक्तित्वाच्या माणसांत दिनकरपंत (मी त्यांना कधीही 'बाबा' म्हटलं नाही.) मोडतात असं मला तेव्हा मुळीच वाटलं नाही. आजही, ती त्यांची 'शोध' गोष्ट मी मध्यंतरी त्यांच्या तोंडून अर्धी ऐकली नसती तर दिनकरपंतांना विसरायला मी सहजी तयार झालो असतो. दिनकरपंत हे असंख्यांपैकी एक होते.

परंतु दिनकरपंतांच्या व्यवसायामुळे आमचे संबंध वाढण्याचा योग पुढे आला. माझं मार्क्सवादावरचं एक टीकात्मक पुस्तक प्रकाशित व्हायचं होतं. आणि पुस्तकाचं महत्त्व लक्षात घेऊन त्याचं मुद्रण सुबक व्हावं अशी माझी इच्छा होती. प्रकाशकांनी मुद्रितांसाठी दिनकरपंतांचं नाव सुचवलं. आणि दिनकरपंतांनी तपासलेली काही मुद्रितं नजरेखाली घालून मी ते मान्य केलं. त्या पुस्तकाच्या निमित्तानं त्यांच्याकडचं माझं जाणंयेणं सुरू झालं. ते मात्र कधीही माझ्याकडे आले नाहीत. काम ऊद्भवलंच तर त्यांचा चणचुणीत मुलगा माझ्याकडे त्यांची चिठ्ठी घेऊन येत असे. त्यांच्या अशा चारपाच चिठ्ठ्या आजच मला ड्रॉअर लावताना सापडल्या.

या चिठ्ठ्या आणि दिनकरपंतांचं वागणं, यांत काही साम्यं, विरोध सांगता येतील. त्यांच्या चिठ्ठ्यांत अतीव नम्रता आणि अदब असे. ती त्यांच्या वागण्यातही व्यक्त होत असे. चिठ्ठ्यांतल्या अक्षरांच्या ठेवणीत, वाक्यांच्या घडणीत, मजकुराच्या आशयात एक वेगळाच स्वच्छपणा नि व्यवस्थितपणा दिसे. त्यापैकी व्यवस्थितपणा दिनकरपंतांच्या वागण्यात मला कमी आढळला. त्यांची स्वतःची कागदपत्रं, त्यांच्याकडे तपासायला आलेली मुद्रितं, त्यांचे कपडेलत्ते हे सगळं नेहमीच अस्ताव्यस्त पसरलेलं मला दिसे. बेबंदशाहीनं बजबजलेल्या राज्याच्या छत्रपतीसारखे ते या अव्यवस्थितपणाच्या मध्यभागी आरामखुर्चीत बसलेले असत. कदाचित वार्धक्यामुळे ते अव्यवस्थित झाले असतील, कदाचित आणखी काही कारण असू शकेल. मात्र हा अव्यवस्थितपणा मूळचा नव्हता हे यांच्या चिठ्ठ्यांवरून सांगता येईल.

माझ्या बाबतीतलं त्याचं वागणं आणि लिहिणंदेखील—सुरुवातीपासूनच वरिष्ठ माणसाशी कनिष्ठाचं असावं तसं असे. भेटीत कित्येकदा मोठ्या माणसांना लहान मुलं विचारतात तशा निष्पाप औत्सुक्यानं, परंतु भीत भीत ते मला अनेक प्रकारची माहिती विचारीत, भक्तिभावाने ती ऐकत आणि तिच्यावर चिंतन करीत. माझ्या विद्वत्तेविषयी त्यांच्या मनात प्रगाढ आदर असावा असं वाटे. कदाचित याला माझं लेखन कारणीभूत असेल, किंवा कदाचित माझं वागणं देखील कारणीभूत असणं शक्य आहे. कुठून आणि कशी सुरुवात झाली ते माहीत नाही, परंतु शेवटपर्यंत आमच्या परिचयात माझी भूमिका 'सुपीरियर'ची राहिली. मीही ती एक प्रकारच्या अट्टाहासाने बजावली. एका पातळीवर आम्ही कधीच आलो नाही.

पहिल्या पहिल्या आमच्या भेटींच स्वरूप अगदी व्यावसायिक असल्याने त्यांचं इथं वर्णन करण्याची जरूर नाही. मी गेलो की दिनकरपंत मुद्रितांतून नजर काढून, नाकावरच्या चष्म्यातून वर पहात (या चष्म्याला एकच काडी होती. दुसरी मोडली असावी.) त्यांच्या ओढलेल्या आवाजात म्हणत, ''या. बसा—''.

आणि मग जरूर तेवढंच बोलणं आमच्यात होत असे. घरातून त्यांची प्रौढ अविवाहित मुलगी (ही कुठल्या तरी शाळेत शिक्षिका होती.) चहा घेऊन येत असे. तो आम्ही घ्यायचा आणि दिनकरपंतांचा निरोप मी घ्यायचा असं या पहिल्या भेटींचं स्वरूप होतं.

या पहिल्या पहिल्या भेटीत दिनकरपंतांच्या घरातलं मध्यमवर्गीय दारिद्र्य माझ्या नजरेत भरलं. दिनकरपंतांच्या आणि त्यांच्या अविवाहित मुलीच्या कमाईवर त्यांचा संसार कसाबसा चालत असावा असं दिसलं. पण असे अनेक संसार असू शकत होते. देशातल्या विशिष्ट परिस्थितीचा तो एक अपरिहार्य भाग होता.

एकदा आमचं व्यावसायिक बोलणं संपल्यावर चहा घेताना ते चहाच्या कपाकडे पहात म्हणाले, ''आपण गैरसमज करून घेणार नसाल तर एक विचारणार आहे.''

काहीसं आश्चर्यानं त्यांच्याकडे पहात मी म्हटलं, ''काय ?''

आणि मग माझ्या पुस्तकाची मुद्रितं पुढ्यातल्या स्टुलावर ठेवीत त्यांनी किंचित घुटमळत विचारलं, ''केवळ या इतक्या प्रखर बुद्धिवादानं जगाचं कल्याण होईल का ?''

दिनकरपंतांकडून अशा तऱ्हेच्या प्रश्नांची अपेक्षा मी केली नव्हती.

क्षणाचाही विचार न करता मी ठासून उत्तर दिलं, ''जगाची आजवरची प्रगती बुद्धिवादानंच केली आहे की.''

यावर ते काही बोलले नाहीत. आणि मी नेहमीसारखा निरोप घेऊन निघून आलो.

पुढच्या भेटीत मला निरोप देण्यासाठी ते त्यांच्या त्या जुनाट आरामखुर्चीतून उठले आणि दारापर्यंत माझ्याबरोबर चालत आले.

''मागल्या वेळच्या आपल्या बोलण्याला धरून मी विचारतो,'' ते दाराशी थबकत हळुवार अदबीनं म्हणाले, ''की बुद्धिवादानं जगाचं कुठलं कल्याण केलं आहे ?''

मी तुच्छतेनं म्हटलं, ''तुम्ही तपासता ती मुद्रितं, अधू दृष्टीनंदेखील तुम्ही ती ज्यामुळं तपासू

शकता तो चष्मा, तुम्ही घेता तो चहा आणि बसता ती आरामखुर्ची हे बुद्धिवादानं नव्हे तर कुणी दिलं ? हे घर, या घरातली विजेची व्यवस्था, आणि या घराचा जगाशी प्रतिदिनी संबंध ठेवणारी वृत्तपत्रं, हे कशाचं फळ आहे ? मोटारी कुठून आल्या ? रेडियो कसे तयार झाले ? विमानं कशी उडू लागली ? टेलिव्हिजनबद्दल तुम्ही ऐकता—कशामुळे झालं हे सगळं ?''

याही वेळी माझ्या या बोलण्यावर ते काही म्हणाले नाहीत. खालच्या मानेने दारात उभे होते. उभ्या उभ्या काहीसे विचारमग्न झाल्यासारखे दिसले. त्यांचं समाधान झालं नसावं असं दिसलं. पण मला एक काम होतं; आणि म्हणून मी मग निघून आलो.

त्यांचे हे प्रश्न मला इतके प्राथमिक आणि पोरकट वाटत की त्यांना अधिक व्यवस्थित आणि विस्तारानं उत्तरं देणं मला सुचतच नव्हतं. तशी गरज मला वाटत नव्हती. आणि तसं काही मी केलं असतं तर ते कदाचित त्यांच्या बुद्धीपलिकडे गेलं असतं असं अद्याप मला वाटतं. त्यांच्या प्रश्नातल्या प्राथमिकतेमुळेच असेल, उत्तरं देताना माझ्या सुरात प्रश्नाबद्दल थोडीशी तुच्छता नकळत व्यक्त व्हायची हे खरं आहे.

एकदा मी गेलो तेव्हा दिनकरपंत मुद्रितांच्या भेंडोळ्यात कसली तरी रंगीत मासिकं पहाण्यात तल्लीन झालेले दिसले. मी आल्याचंही त्यांच्या ध्यानी आलं नाही. एकेक चित्र ते पहात होते. खालचा मजकूर वाचत होते. पुन्हा चित्राकडे टक लावीत होते. आणि मग नाइलाजाने पान उलटीत होते.

त्यांच्या डोळ्यांना तो एक काडीचा चष्मा होता.

मी किंचित खोकलो. आणि दचकून ते माझ्याकडे बघू लागले. शरमून, किंचित हसून मला म्हणाले, ''या—या ना. बसा. केव्हा आलात ? माझ्या लक्षातच आलं नाही.''

ते इतके चांगले हसतात हे मला या वेळी प्रथमच जाणवलं. मी पाहिलेलं ते त्यांचं पहिलं हास्य. सौम्य आणि शांत असं ते होतं. आणि कारुण्याची बारीक परंतु स्पष्ट छटा त्याला होती. एखाद्या खेळकर स्वभावाच्या पोरक्या अर्भकासारखे दिनकरपंत हसत. आणि क्वचित हसत.

मी खुर्चीवर बसलो. ते काय वाचत आहेत, कशातली चित्रं पहात आहेत, ते विचारावंसं मला वाटलं नाही. इकडेतिकडे गंभीर मुद्रेनं पहात मी फक्त निमूट बसून राहिलो.

''हे 'सोव्हिएट युनिजन न्यूज'चे अंक पहात होतो.'' दिनकरपंत मग माझ्या निर्विकार मुद्रेकडे पहात आपण होऊनच म्हणाले. ''आमच्या मोठ्या मुलीनं आणलेत. असलं बरंच काहीतरी ती हल्ली आणते. मला पण पहायला मिळतं. कालपासून हे अंक पहात बसलोय मी. या रशियन लोकांनी बाकी कमाल केलीय बरं का. केवढी प्रचंड प्रगती केलीय ! काहीतरी नवं चाललंय. न्यायाचं राज्य निर्माण होतंय. तुमचे-आमचे दिवस येतायत. चित्रं पहाताना थक्क व्हायला होतं बघा. वाचताना डोळे दिपतात. हेवा वाटतो हो या भाग्यवान् लोकांचा ! रक्त वहावलं खरं, पण सार्थक केलं. पुष्कळाचं इतकं चांगलं होणार असेल तर, मूठभर लोकांचं, किंबहुना आमचंसुद्धा रक्त वाह्यलं तरी हरकत काय आहे असं मी म्हणतो. खरोखर असं वाटतं की मरावं आणि त्या तिथं जन्माला यावं, तिथं चार दिवस जगावं. ते सगळं पहावं. या जन्मी तरी नाही मिळत आम्हांला ते पहायला. किती म्हटलं तरी असेच जायचे आम्ही—आजचं हे

रटाळ आयुष्य जगत...फार वाईट वाटतं जिवाला.'' त्यांनी सुस्कारा टाकला. त्यांच्या आवाजात घोगरटपणा आला. ''पण आमचं एक असो;'' ते पुटपुटले. ''पुढच्या पिढ्यांना तरी मिळेल का हो असं सुंदर जीवन जगायला ? आमच्या मुलाबाळांना तरी ? नातवंडापंतवंडांना तरी ? निदान पहायला तरी मिळेल की नाही ?''

मी त्यांच्या या भोळ्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं टाळण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी मला ती सूट दिली नाही.

''काय वाटतं तुम्हांला ?'' ते विचारू लागले.

आणि मग मात्र मी इरेला पेटलो.

''त्यात काय सुंदर आहे ते मला माहीत नाही.'' मी रुक्ष आवाजात म्हटलं. ''बऱ्याच अभ्यासानंतर आणि विचार नंतर मला इतकंच माहीत झालं आहे की सोव्हिएट युनियन हा कम्युनिस्ट नरक आहे. तिथं जन्म घेण्यापेक्षा मी अमॅझॉनच्या जंगलात जन्म घ्यायला आनंदानं तयार होईन. तुम्ही वाचता आहा तो केवळ फसवा प्रचार आहे. लाल प्रचार ! थापा ! माणसं भुलवून फशी पाडण्याचा तो एक मायावी कम्युनिस्ट सापळा आहे ! आणि तुमच्यासारखी भोळी माणसं त्यात सहजी सापडतात. स्तालिन हा हिटलरसारखाच माजोरी नि कुटिल झोटिंगशहा आहे. कम्युनिस्ट आणि नात्सी यांत काही फरक नाही. माणसाच्या स्वातंत्र्याची भयंकर गळचेपी चालली आहे रशियात ! करोडो माणसं गुलामासारखी पोटावारी राबवली जात आहेत तिथं—''

आणि अंगावर शहारे आणणारे वेगवेगळे चित्तथरारक पुरावे फेकीत, 'मॅक्स ईस्टमन्', 'लूई फिशर,' 'आर्थर कोएस्लर' अशी मोठमोटी नावं गंभीर आवेशानं उच्चारीत, मी जवळच्या सर्व बुद्धीनिशी त्यांच्या त्या कोवळ्या सोव्हिएट-भक्तीवर चौफेर हल्ला चढवला. ते ऐकत होते आणि मी बोलत होतो. ते त्यांच्या त्या आरामखुर्चीत घायाळ पडले होते आणि मी त्यांना टोचून खात होतो. मी विचारीत होतो, ''काय सुंदर आहे सोव्हिएट युनियनमध्ये ? कसलं नंदनवन आहे तिथं ? कसला नवा प्रयोग ? सगळा प्रचार ! प्रचार !!—''

माझं समाधान झालं तेव्हा मी थांबलो. त्यांच्याकडे एकदा विजयोन्मादानं बघितलं. मला बरं वाटलं. दिनकरपंत खुर्चीत अगदी निश्चल पडून होते. त्यांनी डोळे मिटून घेतले होते. किंचित्काल ते तसेच मिटल्या डोळ्यांनी पडून राहिले. मग हळूहळू त्यांनी डोळे उघडले. ते डोळे निस्तेज दिसत होते. दिनकरपंतांनी सुस्कारा टाकला. नीट बसत पुढ्यातली सगळी रंगीत मासिकं त्यांनी एका हातानं दूर केली. पुन्हा ते तसेच किंचित्काल बसून राहिले. अंगातली सगळी ताकद गळावी, शक्तिपात व्हावा तसे ते दिसत होते.

मग भानावर आल्यासारखे म्हणाले, ''असं आहे एकंदरीत.'' त्यांचा आवाज अधिकच ओढला होता. त्यात यातना होत्या. कंप होता.

जवळची मुद्रितांची एकदोन भेंडोळी त्यांनी उचलली; पसरली. चष्मा चढवला. त्यांचा हात किंचित कापत होता. माझ्या पुस्तकाविषयीची थोडी 'लेआउट'संबंधीची चर्चा आम्ही नंतर

केली. या चर्चेत दिनकरपंतांचं नीटसं लक्ष नव्हतं.

मी चहा घेऊन त्यांचा निरोप घेतला. त्यांच्या हातातला चहा त्यांना नीट घेववत नसावा. ते सावकाश एक एक घोट घेत होते. आणि शून्य नजरेनं कुठं तरी पहात होते. त्या दिवशी त्यांच्याकडून येताना मला कसला तरी वेगळाच—त्याला माझ्यापाशी शब्द नाही—आनंद वाटत होता. विचित्र असं गूढ समाधान वाटत होतं. कसलं तरी क्रूर सार्थक वाटत होतं. तो माझा दिवस, कारण नसताना फार चांगला गेला असं आज मला म्हणता येईल.

परत काही दिवस दिनकरपंतांनी मला असल्या अवांतर बाबतीत काही विचारलं नाही. व्यवसायापुरते आमचे संबंध उरले. त्यांचं हास्य लोपलं. ते पूर्ववत गंभीर झाले. यातच मध्यंतरी ते एन्फ्लुएंझानं चारपाच दिवस आजारी होते. पैकी पहिले दोन दिवस त्यांनी काम केलं; पुढले तीन दिवस मात्र ते वाढत्या अशक्तपणामुळे पडून होते. काम होत नाही ही जाणीव त्यांना बोचत होती. ते विमनस्क होते. अस्वस्थ होते. समोरच्या स्टुलावरच्या मुद्रितांच्या भेंडोळ्याकडे त्यांची नजर सारखी लागलेली असायची. कसली तरी चिंता त्यांना सारखी जाळीत असायची.

मला म्हणायचे, "उगीचच विलंब लागतो आहे कामाला. एव्हाना आणखी दोन फॉर्म्स तुमचे छापून व्हायला हवे होते."

मी म्हणत असे, "आधी बरे तर व्हा. मग पाहू."

पण मनातून मात्र मी सुद्धा कामाबद्दल उतावीळ झालो होतो. पुस्तकप्रकाशनाचा माझ्या मनातला दिवस जवळ जवळ येत होता. आणि त्या मानानं काम झालेलं नव्हतं.

ताप उतरताच दिनकरपंत आपल्या आरामखुर्चीत बसले आणि चहाचे डोस मारीत यंत्रासारखे काम करू लागले. पण यंत्र नीट दुरुस्त झालं नव्हतं. ते थकत. काम नीट होत नसे. मुद्रितांत चुका रहात. आणि मी त्या त्यांच्या नियमितपणे नजरेला आणीत असे. त्या चुका पाहून त्यांना कमालीचं दुःख होत असे. एकदा, छापून झालेल्या फॉर्ममध्येच मला एक ठळक चूक आढळली आणि त्यांच्याकडे जाऊन मी त्यांना रागारागाने म्हणालो, "दिनकरपंत, तुमच्यासारख्यांकडून असा निष्काळजीपणा अपेक्षित नव्हता !"

दिनकरपंतांच्या डोळ्यांत पाणी तरारलं. मोठ्या प्रयासानं ते म्हणाले, "असं करा, त्या फॉर्मचे पैसे, मला द्याल त्या पैशांतून वजा करा."

जवळ जवळ याच सुमारास सार्वत्रिक निवडणुका आल्या. पक्षोपपक्षांचा वादळी प्रचार देशभर सुरू झाला. आणि समाजवादी विचारसरणीनं दिनकरपंतांना या खेपेला घेरलं असावं.

एके दिवशी मला त्यांनी बिचकतच विचारलं, "निवडणुका आल्या. मत कुणाला ?"

"सगळेच पक्ष चोर आहेत. त्यातल्या त्यात कमी चोर पक्षाला देऊ." मी उदासीन गांभीर्य चेहऱ्यावर आणून म्हटलं.

'पण तो तरी कुठला ?" त्यांनी खोदून विचारलं.

"अर्थात काँग्रेस." मी शांतपणे उत्तरलो.

दिनकरपंत मनातून हादरल्यासारखे दिसले. ''पण मग लोकशाही समाजवादांची सोशिलिस्ट पक्षाची विचारसरणी तुम्हांला कशी वाटते ?'' त्यांनी अर्धवट आशाळभूतपणे प्रश्न केला. ''माणसाला जिथं संपूर्ण स्वातंत्र्य आणि हक्काची भाकरी मिळेल अशी वर्गरहित लोकशाही समाजरचना विधायक मार्गांनी साकार करण्याचा त्याचा हेतू—''

''मूर्ख चोरांच्या वल्गना आहेत या.'' मी क्षणही न दवडता उत्तरलो. आणि समाजवादी पक्षातली मतमतांतरांची अंदाधुंदी, त्याच्या टोलेगंज परंतु फुसक्या घोषणा, त्याचं अकरणात्मक पुढारीपण, त्याचा वैचारिक गोंधळ आणि विफल आत्मविश्वास यांची कठोर चिकित्सा मी चालविली. लोकशाही समाजवादाची खाटकाच्या हातानं मी फाडाफाड केली. माझ्या प्रत्येक विधानागणिक दिनकरपंत खचत होते, जमीनदोस्त होत होते. आणि मी तर्ककर्कश विधानांचे घाव त्यांच्यावर सारखे हाणीत होतो. जगातल्या अनेक समाजवादी चळवळींच्या अपयशाचे वृत्तांत मी त्यांना भडक शब्दांत ऐकवले. इंग्लंडमधल्या लेबर पार्टीतल्या लोकशाही समाजवादाचं तकलादी स्वरूप उघडं केलं. समाजवाद्यांच्या कामगारविषयक कचखाऊ आणि आततायी धोरणाचे वाभाडे काढले. समाजवादी पक्षातल्या संधिसाधू पुढाऱ्यांचा पूर्वेतिहास निवेदिला.

''हा तुमचा लोकशाही समाजवाद, दिनकरपंत !'' मी शेवटी तुच्छतापूर्ण सुरात म्हणालो. ''या लोकशाही समाजवादाला मत देण्यापेक्षा मी ते चुलीत घालीन !''

दिनकरपंतांनी काही बोलण्याचा दुबळा प्रयत्न केला. ''काही सांगू नका मला.'' मी निग्रहानं म्हटलं, ''सगळं जाणतो मी.''

दिनकरपंत मग गप्प राहिले.

''विश्वास बसत नसेल तुमचा !'' मी मुद्दामच किंचित्काळानं विचारलं.

''कुणास ठाऊक.'' ते सुकल्या ओठांवरून जीभ फिरवीत पुटपुटले. ''असेलसुद्धा तसं. सरळ माणसांचे दिवस नाही उरले.''

त्यांची नजर जमिनीवर खिळली होती. कपाळावरची हिरवी शीर फुगून उडत होती. ओठ किंचित थरथरत होते. चेहरा टाकून ते स्तब्ध उभे होते. खोल खोल कुठं तरी पडत असल्याप्रमाणे त्यांनी अंग चोरून घेतलं होतं.

''हे पहा,'' मी त्यांना ऐकवलं, ''मला यात काही साधायचं नाही. तुम्ही विचारता तेव्हा सांगावं लागतं. खऱ्या गोष्टी नेहमीच कटू असतात. कुणाला त्या आवडत नाहीत. तुम्ही विषयच काढलात म्हणून निघालं सगळं. पटत नसेल तर सोडून द्या.''

आणि त्यांची लोकशाही समाजवादावरची नवी श्रद्धाही धुळीला मिळाल्याची खात्री करून घेऊन मी निघून आलो. यातच समाधान मानलं. सुखावलो. आनंदालो. माझ्यातला अहंकार तृप्त झाला. हे असं माझं काय होत होतं ते मला आज काही केल्या समजत नाही. पण तेव्हा होत होतं हे संपूर्ण सत्य आहे.

माझ्या पुस्तकाचं काम हळूहळू पूर्ण होत आलं होतं. त्या काळात दिनकरपंतांनी स्वतःच्या जुन्या

आयुष्यातल्या अनेक गोष्टी काही ना काही निमित्ताने मला ऐकवल्या. काही गोष्टी ते पुन्हा पुन्हा ऐकवीत. आणि मला प्रथमच ऐकत असल्याची बतावणी करावी लागे. माझ्याकडून मी विरोधही करीत नव्हतो आणि उत्सुकताही दाखवीत नव्हतो. त्यांच्या बोलण्यात विचारापेक्षा भावना अधिक आहे आणि म्हणूनच बराचसा गोंधळ आहे, हे मला पहिल्यापासूनच माहीत होतं; त्यामुळं माझं विशेषसं लक्ष त्यांच्या बोलण्याकडे असत नसे. ते मात्र जिव्हाळ्यानं सगळं सांगत. त्यांच्या गरिबीतल्या बालपणाचे उल्लेख त्यांच्या बोलण्यात येत. कोकणातल्या देवदेवस्कीचे चमत्कार ते सांगत. आईवडिलांच्या मायेचे प्रसंग सांगताना सद्गदित होत. विशेषतः आईविषयी त्यांच्या मनात अधिक आदर आणि ओलावा होता. आईच्या अखेरच्या आजारपणात ते तिला सोडून मुंबईला यायला निघाले, तेव्हा तिनं त्यांना दिलेला निरोप सांगताना त्यांचा गळा दाटून येई. ती म्हणाली होती, ''जा बाबी, जगात यापुढे एकटा आहेस. पण वाटेचा वाटसरू तुझ्या उपयोगी पडेल. माझा तुला आशीर्वाद आहे.'' आईचा हा आशीर्वाद अक्षरशः खरा ठरला असं ते म्हणत. लोकांच्या मदतीवर त्यांनी शिक्षण घेतलं होतं. मनाविरुद्ध लग्न केलं होतं. एका युरोपियन पुस्तक-प्रकाशन संस्थेतल्या पस्तीस वर्षांच्या नोकरीत कधीही स्वाभिमान सोडला नव्हता. या नोकरीतले आपले राजीनामा देण्याचे प्रसंग ते खुलवून सांगत. मुलांबद्दल आणि पत्नीबद्दलही मोघम परंतु प्रेमाने बोलत. मात्र त्या युरोपियन प्रकाशन-संस्थेतली नोकरी सोडल्यानंतरचा अलिकडल्या दहा एक वर्षांतला काळ त्यांच्या बोलण्यात केव्हाही आला नाही. ते इथेच थांबत. माझ्या अनुमानाप्रमाणे, त्यांचा यापुढचा काळ पडता आला. काही मुद्रणालयांतून त्यांनी नोकऱ्या केल्याचं मी ऐकलं आहे. मुद्रणालयातलं आठ आठ तासांचं काम झेपेना तेव्हा ते घरीच बसून मुद्रितं तपासू लागले असावेत. खरं काय ते मला माहीत नाही; परंतु असंच काहीतरी असावं. माझ्या-त्यांच्या परिचयाच्या काळात त्यांची प्रचंड ओढघस्त चालू होती. मुलीच्या मदतीनं, शुष्क कुडीचा तो थकलेला गृहस्थ सहा माणसांच्या संसाराचा गाडा नेटाने रेटीत होता. पुस्तकाचं काम संपत आलं त्या सुमाराला ते मला संध्याकाळच्या वेळेला रस्त्यात भेटले. सोबत त्यांचा छोटा बारा एक वर्षांचा मुलगा होता.

''कुठं, फिरायला ?'' मी शिष्टाचार म्हणून विचारलं.

''हो.'' रुपेरी केसांतून बोटं फिरवीत ते म्हणाले. ''फिरवत नाही; पण थोडासा व्यायाम तर हवाच शरीराला.''

त्यांच्या आवाजात मला क्षीणपणा जाणवत होता. त्यांची मुद्रा अधिक फिक्कट दिसत होती. का कुणास ठाऊक, माझ्या बरोबर ते पाठी फिरले. ते माझ्याबरोबर का येताहेत याचा विचार मला फार करावा लागला नाही. त्यांनी बोलता बोलता प्रश्न काढला.

''भूदान-यज्ञाबद्दलच्या बातम्या वाचता की नाही ?'' त्यांनी विचारलं.

''वाचतो की.'' मी कडवट सुरात उत्तर केलं.

मग काही वेळ ते पुढं काहीच बोलले नाहीत, मीही गप्प होतो. आम्ही मुकाट्यानं चालत होतो.

''गांधीजीच्या मागं गांधीवाद नष्ट होईल असं वाटत होतं; पण तसं दिसत नाही.'' ते विचारपूर्वक बोलू लागले. ''भूदान-यज्ञाची ही चळवळ खरोखर आशादायक वाटते. ही

चळवळ वाढावी असं आपलं माझ्यासारख्याला वाटतं. म्हणजे केवळ एवढ्यानेच भागेल असं नाही म्हणत मी. पण सुरुवात चांगली वाटते. उदात्त आणि भव्य वाटते. काहीतरी ओरिजिनल आहे तिच्यात. नाही वाटत तुम्हांला ? माझ्या नजरेपुढे तर विनोबाजींच्या पदयात्रेचं दृश्यच सारखं तरळतं आहे. धुळीनं भरलेल्या सडकेनं ती कृश नि पवित्र मूर्ती लांब लांब टांगा टाकत, हातातली काठी टेकत टेकत, आपल्या सहकाऱ्यांबरोबर एका नव्या युगाला आवाहन करीत, एका क्रांतिकारक मोहिमेवर झपाट्यानं निघाली आहे...पंचापलिकडे अंगावर काही नाही. जटांसारखे केस वाऱ्यावर भुरभुरत आहेत. शुभ्र दाढी छातीवर रुळते आहे. डोळ्यांत आशा विलसते आहे—मुद्रेवर प्रेम नाचतं आहे—प्रत्येक पावलात आत्मविश्वास. सडक मागे-मागे पडते आहे—शेतकरी आणि जमीनदार जमिनींवर जमिनी त्या मूर्तीच्या धुळीनं भरलेल्या पायांवर वहात आहेत—पावन होत आहेत—सद्‌गदित होऊन परतत आहेत...आणि ती मूर्ती सारखी वाढते आहे—मोठी मोठी होते आहे—पुढे पुढेच सरकते आहे—''

दिनकरपंत थांबले. त्यांचं बोलणं थांबलं. आवेग आवरून ते पुढे चालू लागले. आता ते बोलत नव्हते. खाली पहात चालत होते.

''गांधीवादच जगाला तारील.'' ते चालता चालता पुटपुटले. आणि नेमक्या या त्यांच्या एका वाक्यानं माझा तोल घालवला. पुन्हा मी हट्टाला पेटलो. माझं डोकं चढलं—ओठ स्फुरू लागले. आणि निर्दयपणानं मी दिनकरपंतांच्या अंतःकरणातल्या या नव्या, उमलल्या श्रद्धेच्याही ठिकऱ्या उडवून दिल्या. मुद्दाम त्यांच्या घरापुढे थांबून गांधीवादाची लक्तरं न् लक्तरं सुटी केली. गांधीवाद्यांची टर उडवली. भूदान-यज्ञातला भंपकपणा उघड केला. आणि याहीपुढे जाऊन खुद्द दिनकरपंतांच्या अंधश्रद्धेला आणि भावनात्मकतेला प्रत्यक्ष असे जोरदार धक्के दिले.

हे सारं दिनकरपंतांनी सहन केलं. न कुरकुरता सहन केलं. न बोलता सहन केलं. पण त्यांना ते पचवता येत नव्हतं, त्यांना प्रयास पडत होते. हातातली काठी टेकीत टेकीत ते निमूटपणे मुलाबरोबर घरी निघून गेले.

आणि मला पुन्हा तो जुना आनंद झाला. जुनं समाधान मिळालं. विचित्र समाधान. आसुरी आनंद. या वृद्ध गृहस्थाची प्रत्येक कोवळी श्रद्धा मी अकारणच कुस्करीत होतो, हट्टानं ढासळून पाडीत होतो, धुळीला मिळवीत होतो आणि समाधान पावत होतो. त्यांच्या खचल्या मनाला या जगात आधारच मिळू द्यायचा नाही असा जणू मी पण केला होता. तो शुष्क, धडपडता जीव पुनःपन्हा उभारी धरायला पहात होता आणि मी त्याला खाली ढकलून देत होतो. मला झालं होतं तरी काय !

यानंतर माझं पुस्तक छापून संपलं, फक्त प्रस्तावना बाकी होती. ती माझ्या परिचयाच्या एका सुप्रसिद्ध मार्क्सवाद्याकडून मी घेणार होतो. तो माझ्या पुस्तकावर टीका करील हे मला माहीत होतं. तशी टीका करतानाच तो आपोआप उघडा पडेल असा माझा आडाखा होता. आणि मला तेच हवं होतं. ती प्रस्तावना आली आणि छापून झाली की पुस्तक तयार होणार होतं. अखेर माझा एक महत्त्वाचा ग्रंथ विचारवंतांपुढे येणार होता, खळबळ उडवणार होता.

मार्क्सवादाच्या विचारवंत टीकाकारांत मला माझं असं एक स्थान मिळवून देणार होता. ज्या ज्या माझ्या मित्रांना मी त्याचे सुटे फॉर्म्स वाचायला दिले होते, त्या सर्वांनी त्या ग्रंथाबद्दल उत्कृष्ट मत दिलं होतं. सहाजिकच या काळात माझी मनःस्थिती थोडीशी धुंद अशीच होती. माझा मोठेपणा मलाच जाणवत होता.

याच धुंदीत मी दिनकरपंतांकडे पुस्तकाच्या मुद्रणाच्याच काही कामाकरता एकदोन फेऱ्या टाकल्या. ते एकाएकी विलक्षण थकलेले दिसत होते. सुरकुतलेले दिसत होते. त्यांच्या निस्तेज डोळ्यांना दिसेनासं होतं आहे, अशी तक्रारही त्यांनी केली. चिंतेत आणि मनस्तापात त्यांचं मन बुडून गेल्यासारखं वाटलं. ते फार निराश दिसत होते. माझा त्यांचा 'मूड' जमण्यासारखा नसल्याने त्यांच्याशी विशेष बोलण्याची इच्छा मला झाली नाही. शक्य तितक्या लवकर मी तिथून पाय काढता घेतला.

वास्तविक आता यानंतर दिनकरपंतांकडे माझं काहीही काम उरलं नव्हतं. माझ्या पुस्तकाचं काम जवळ जवळ संपलं होतं. प्रस्तावनेच्या चार पानांच्या छपाईसाठी मला त्यांच्याकडे फेऱ्या मारण्याची मुळीच आवश्यकता नव्हती. माझ्या दृष्टीनं दिनकरपंतांचा आणि माझा संबंध हा इथंच संपला होता.

पण दिनकरपंतांच्या दृष्टीनं तो संपला नव्हता. एक दिवस त्यांच्या घरावरनं संध्याकाळी मी जात असताना त्यांनी टाळी वाजवून मला हाक मारली, ''वर या ना'' म्हणून आवर्जून बोलावलं. मी ''कामात आहे'' म्हणून सांगितलं. त्यावर ते ''पाचच मिनिटं या'' असं म्हणाले. आणि मग मला वर जावं लागलं. कसे कोण जाणे, पण या वेळी ते मला विलक्षण शांत वाटले—निरभ्र आभाळासारखे. सरोवरातल्या निश्चल जलाशयासारखे. प्रदीर्घ वादळानंतरच्या सागरासारखे. कुठलीच चिंता या घटकेला त्यांना डाचत नसावी. कुठलाही विचार खुपत नसावा. मला किंचित खटकल्यासारखं वाटलं. वेगळं वाटलं. काहीतरी चुकतं आहे असं वाटलं.

याच आमच्या भेटीत त्यांनी मला ती अर्धी गोष्ट ऐकवली—'शोध'. सुरवातीला मी तिचा उल्लेख केला आहे.

ते म्हणाले, ''मुद्दाम मी तुम्हांला आज हाक मारून वर बोलावलं. मी लेखक आहे हे तुम्हांला नसेल माहीत. तुमच्यासारखा बडा लेखक नाही, पण आहे आपला एक छोटा लेखक. लेखक काय, कोणीही होऊ शकतो.''

निरनिराळ्या टोपणनावांनी मराठीतल्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दर्जाच्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या आपल्या लिखाणाची कात्रणं चिकटवलेली एक वही त्यांनी माझ्या हाती आदरानं ठेवली. मीही ती शिष्टाचाराप्रमाणे चाळली. अधूनमधून वाचल्यासारखं केलं.

''आहे ना लेखक ?'' त्यांनी किंचित हसून विचारलं. ''कबूल करा.''

''आहात की.'' मी त्यांच्या समाधानासाठी म्हटलं आणि वही त्यांच्या हाती दिली. ती मोठ्या प्रेमानं आणि काळजीपूर्वक आपल्या पत्र्याच्या ट्रंकेत ठेवीत ते म्हणाले, ''तुमच्या थोड्याशा सहवासानं मला एक नवी दृष्टी दिली. मला विचार करायला लावलं. माझ्यातल्या श्रद्धेला धक्के

देऊन मार्गदर्शन केलं. याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणंसुद्धा कठीण वाटतं, इतकं तुम्ही माझ्यासाठी केलं आहात.''

आणि खरोखरच, माझ्याकडे पहाणाऱ्या त्यांच्या दृष्टीत कृतज्ञता ओतप्रोत व्यक्त होत होती.

''छे छे, मी काहीच केलं नाही.'' मी खोटा विनय दाखवीत म्हटलं.

''केलंत ते तुम्ही नाही म्हटलंत तरी मी कसं नाकारू ?'' ते त्यांच्या त्या जुन्या आरामखुर्चीत बसत संथपणे उद्गारले. ''धक्के सहन करणं जड गेलं. नव्या विचारांचं असं असतं, ते असतात चांगले. पण पचायला जड जातात. त्यातून मी आयुष्याची उतरंड उतरणारा माणूस. मनाची काय, शरीराची काय, पचनशक्ती मंदावलेली. मला फार जड गेलं ते सगळं. अतिशय जड गेलं. पण झालं ते फार बरं झालं बरं का, फार बरं झालं.''

मी काही म्हणालो नाही.

''पण हे सांगण्यासाठी नाही मी तुम्हांला बोलावलं.'' ते एकदम स्मरण होऊन म्हणाले. ''तुम्हांला वर बोलावण्याचं कारण वेगळं होतं. मी एक नवीन गोष्ट लिहिली आहे. मध्यंतरीच्या या वैचारिक मंथनातून तिचं बीज मिळालं मला. त्यावर गोष्ट रचली. तुम्हांला मी ती वाचून दाखवणार आहे—''

मी विरोध केला नाही. दिनकरपंतांकडे पाहिल्यावर आज मला असं वाटत नव्हतं की यांना कुठल्याही बाबतीत विरोध करावा, किंवा 'नाही' म्हणावं.

त्यांनी ट्रंकेतून कागद काढले. तपासलेल्या जुन्या मुद्रितांचे ते चुरगळलेले पाठकोरे कागद होते आणि त्यावर दिनकरपंतांनी आपली नवी गोष्ट मुद्रितं तपासण्याच्याच लाल शाईनं लिहिली होती.

त्यांनी चष्मा चढवला. त्याला असलेली एकच काडी कानाला अडकवली. प्रथम अडखळत आणि नंतर न अडखळता ते ती गोष्ट वाचू लागले. मी तिकडं माझं अवधान असल्याचा बहाणा मनापासून करू लागलो.

सुरवातीला त्यांनी गोष्टीचं नाव वाचलं, ''शोध''.

ती गोष्ट अशी होती :

एक माणूस होता. तो प्रपंचाच्या गाड्यात गुंतून पडला होता. आपलं कुटुंब सुखी कसं होईल या एकाच विचारानं त्याचं मन व्यापलेलं असे. याच एका हेतूनं त्याचे कष्ट चाललेले असत. वर्षानुवर्ष तो असा जिवापाड खपला. त्यानं रक्ताचं पाणी केलं. हाडाची काडं केली. परंतु आश्चर्य असं की इतकं करूनही त्याच्या कुटुंबातलं एकही माणूस सुखी होऊ शकलं नाही. प्रत्येक जण दुःखी राहिलं, कष्टी राहिलं. प्रत्येकाच्या आयुष्याची एक वेगळीच तऱ्हा दिसू लागली. आणि तो माणूस—तो अती कष्टी झाला. आपल्या श्रमांनी काय साधलं ? असा एकच विचार त्याला पडला. हा विचार त्याला जाळू लागला. असह्य झाला.

आणि मग एके दिवशी त्या माणसानं असं ठरवलं की इतर कुटुंबांची तरी काय स्थिती आहे ती पाहू या. घटकाभर तो स्वतःचं कुटुंब विसरला आणि भोवतालचं घर न् घर न्याहाळू

लागला. परंतु त्याला असंच दिसलं की छे, कुठलंच कुटुंब सुखी नाही. कुणाच्याच श्रमाचं चीज नाही. फक्त रक्ताचं पाणी होतं आहे. हाडाची काडं होताहेत. यापुढं काही नाही. नव्या रक्ताचं पाणी, नव्या हाडांची काडं. इतकंच. सर्वत्र दुःख भरलं आहे. कुचंबणा भरली आहे. जागोजागी पाणी तुंबलं आहे. प्रवाहाला ओघ नाही. कुठंही सुख नाही:
विफलता—विफलता !

माणूस पुन्हा विचारमग्न झाला. त्याने खोलवर विचार केला आणि ठरवलं की ही कोंडी फोडली पाहिजे. कुठंतरी ही फोडण्याचे प्रयत्न चालू असलेच पाहिजेत. ही फोडण्याचा अचूक मार्ग कुठं तरी उपलब्ध असलाच पाहिजे. शोध केला पाहिजे.

प्रपंच टाकून तो निघाला. मोकळ्या मनानं तो निघाला. त्याला कळलं की सोव्हिएत रशियात एक नवा प्रयत्न चालला आहे. तो बराचसा यशस्वी होतो आहे. माणसाचं सुख तिथं हाताच्या अंतरावर आलं. काही अवकाशाचाच फक्त प्रश्न आहे. म्हणून प्रथम तो तिथं गेला. तिथं फिरला. तिथलं घरन् घर त्यानं पाहिलं. मनन् मन न्याहाळलं. (सोव्हिएत रशियात भक्कम 'Iron Curtain' आहे हे दिनकरपंतांना माहीत तरी नसावं किंवा ते मानीत तरी नसावेत.) आणि त्याला हवं ते तिथं त्याला मिळालं नाही. तिथं एक कोंडी फोडतानाच दुसरी तयार झाली होती. ही जास्त भक्कम होती. तिथंही दुःख होतंच, अपार दुःख होतं.



इंग्लंड, अमेरिका, चीन, जपान, युगोस्लाव्हिया अशा पृथ्वीवरच्या प्रत्येक देशात तो गेला. प्रत्येक घरात पोचला. प्रत्येक मनात डोकावला. परंतु कुठंही त्याला कोंडी फुटलेली आढळली नाही. तो फोडण्याचा उपाय त्याला सापडला नाही.

त्यानं मग फिरणं थांबवलं. कोंडी फुटलेली नाही तर मग ती फुटण्याचा संभव तरी कुठं दिसतो का ? म्हणून तो पाहू लागला. त्यानं समाजवाद्यांबरोबर विधायक काम केलं. तो कम्युनिस्टांच्या

बरोबर वर्गयुद्धात सामील झाला. गांधीवाद्यांबरोबर त्यानं दरिद्रीनारायणाची सेवा केली, प्रेमाचा, शांतीचा प्रचार केला. परंतु त्याला हवं होतं ते मिळालं नाहीच. सर्व व्यर्थ.

त्यानं जगातले यच्चयावत ग्रंथ वाचून काढले, योगसाधना करून पाहिली. 'ब्रह्मा'च्या गूढ कल्पनेमागे त्यानं जिद्दीनं झेप घेतली. त्याला हवं होतं ते यातही कुठं नव्हतं.

...इथंच दिनकरपंतांच्या वाचनात व्यत्यय आला. त्यांची मुलगी चहाचे पेले घेऊन आली. आणि पाठोपाठ कुठल्या तरी मुद्रणालयाचे व्यवस्थापक येऊन बसले.

चहा घेता घेता दिनकरपंत मला एवढंच म्हणाले, "पुढं त्याला मार्ग सापडला बरं का ! कोंडी फोडण्याचा अचूक मार्ग सापडला ! शोध लागला ! ओळखा कुठला तो." आणि स्वतःशीच हसले. ते हास्य विलक्षण होतं. अद्याप ते माझ्या नजरेपुढं ताजं आहे.

आणि मग मुद्रणालयाच्या व्यवस्थापकांबरोबर त्यांचं कसलं तरी महत्त्वाचं बोलणं सुरू झालं. किंचित्काल बसून मी त्यांचा निरोप घेतला.

मी निघालो तेव्हा ते म्हणाले, "नाही ना ओळखता येत ?"

मी उगाच किंचित हसल्यासारखं करीत मान हलवली. बाहेर पडलो. काही वेळानं त्या गोष्टीसंबंधी सर्व काही विसरलो. आणि माझ्या उद्योगात व्यग्र झालो.

यानंतर दिनकरपंत मला क्वचित भेटत. परंतु आमच्यात बोलणंचालणं होत नसे. काही कारणच नव्हतं.

आणि मग काही दिवस ते मला भेटले नाहीत. असं कळलं की ते घर सोडून बाहेर पडत नाहीत. त्यांना पोटातलं कसलं तरी दुखणं जडलं आहे. जेवण तुटलं आहे. पडून असतात. काम होत नाही. आणि स्थिती अतिशय हलाखीची आली आहे.

त्यानंतर कालची बातमी : ते गेल्याची.

आणि आजचं माझं त्यांच्या घरी जाणं. घरातलं भेसूर, शोकव्यग्र वातावरण. हुंदके. मी म्हटलंच, केवळ त्यांच्या त्या गोष्टीचा शेवट जाणून घेण्याच्या प्रबळ इच्छेनं मी तिथं गेलो.

मी खूप विचार करून पहातो आहे. माझा तो खेळच होऊन बसला आहे. परंतु दिनकरपंतांच्या गोष्टीचा तो अज्ञात शेवट माझ्या कक्षेत काही केल्या येत नाही. तो काय असेल ते कळत नाही. जिज्ञासा उगीचच सारखी वाढते आहे. अस्वस्थ करते आहे. टोचणी लावते आहे.

दिनकरपंतांचे शब्द या वेळी मला आठवताहेत, "पुढं त्याला मार्ग सापडला बरं का ! कोंडी फोडण्याचा अचूक मार्ग सापडला ! शोध लागला ! ओळखा कुठला तो."

विलक्षण हसून ते विचारताहेत, "नाही ना ओळखता येत ?"

# अखेरचे दिवस

ज्या वयात एखाद्या मुलीने आयुष्यावर दूरगामी परिणाम करून जावे, त्या वयात अनंतकुमार दंडवते माझ्या आयुष्यात आला आणि फार अल्प काळात एक मोठा परिणाम माझ्या मनावर करून गेला. मी असे म्हणेन की, जगाकडे, माणसांकडे, विशेषतः पुरुषांकडे पाहण्याची एक दृष्टी त्याने मला जाताना देऊन ठेवली आणि ही दृष्टी दूर ठेवून कुणाला—मलादेखील—जाणून घेणे मला त्यानंतर केव्हाही पुरतेपणी जमलेले नाही. प्रत्येक चांगला पुरुष मला थोडाफार अनंतकुमार दंडवते वाटत आला आहे. मी स्वतः अनंतकुमार दंडवते होण्याचा हास्यास्पद, केविलवाणा पण प्रामाणिक प्रयत्न एकेकाळी शक्यतेनुरूप केला आहे आणि मला अनंतकुमार दंडवते होता येत नाही, थोडेदेखील होता येत नाही, याचे असह्य दुःख अनुभवले आहे.

माझ्या जाणिवेत अनंतकुमार केवढा तरी दांडगा आणि उंच माणूस म्हणून राहून गेला आहे. तो नजरेत पुरता मावत नाही, त्याचे गडगडाटासारखे पण ऱ्हस्व आणि रुबाबदार, नाटकी हास्य कानात एका वेळी सामावत नाही. माझ्या आठवणीत तो म्हणजे रक्तामांसात घडवलेले एक दगडी शिल्प आहे. बारीक कुसर नसलेले, दगडाच्या मोठमोठ्या गठ्ठ्यागठ्ठ्यांत साकार आणि सजीव झालेले शिल्प. विरळ केसांचे त्याचे ग्रीक मस्तक उन्नत आणि प्रमाणबद्ध आहे. छातीवर, हातांवर काळ्या, रुपेरी केसांचे दाट पुंजके वाढले आहेत. त्याच्या दगडाच्या शरीराच्या साऱ्या हालचाली रबरी आहेत. त्याच्या पहाडी आवाजाला विशोभितपणे शोभणारी साखरेची वाणी त्याला लाभली आहे. आणि त्याच्या कोंज्या, किलकिल्या पिवळट डोळ्यांत

युगानुयुगे रडवेले राहून गेलेले एक छोटे अर्भक कसली तरी वाट पाहत कायमचे बसले आहे. तो आपले रुंद, शुभ्र, चिरेबंदी दात दाखवून हसला—आणि असा तो फार हसतो—की, ते अर्भक पहाडातल्या निबिड जंगलातल्या उजेडाच्या ठिपक्यासारखे अदृश्य होते. पण पुन्हा येते. ते तिथे आहेच. गंमत अशी की, या एवढ्या प्रचंड दगडी मूर्तीचे हात मात्र कमालीचे नाजूक, कोमल आणि गुलाबी आहेत. टरटरल्या शिरांच्या आणि स्नायूंच्या केसाळ भुजांना ते चुकून चिकटल्यासारखे वाटतात. हे हात त्या नजरेच्या कोनाड्यातल्या चिमुकल्या बाळाचे आहेत.

मी पुण्यातल्या घराच्या पिंजऱ्यातून उडून नुकता कुठे मुंबईच्या रानात आलो होतो. अक्कल आहेही आणि नाहीही अशी माझी अधलीमधली अवस्था होती. हक्काचे सव्वाशे रुपये मिळवू लागलो होतो त्याचा आत्मविश्वास अंगात भरलेला होता. आणि अनुभव काही नव्हता. राहायला एका खोलीचा एकतृतीयांश भाग होता, पण त्यात माझे 'घर' नव्हते, निवाऱ्याची भावना नव्हती. होती केवळ डोके आणि ट्रंक-वळकटी टेकायला जागा. आणि मला अनंतकुमार भेटला. मला हवे असलेले 'घर' अनंतकुमारकडे होते. ते त्याला कोणाला तरी द्यायचे होते. मला तो तसे म्हणाला आणि अशा शब्दांत, अशा सुरात म्हणाला की, माझा सारा प्रश्नच सुटला, अडचण दूर झाली, फिकिरीचे काही कारणच उरले नाही असे मला वाटले. होकार तोंडून निघून गेला त्याचा आनंदही वाटला. साध्या गोष्टींनी माणसाला उच्च प्रकारचा आनंद देण्याची विलक्षण हातोटी अनंतकुमारमध्ये होती. स्वार्थ साधतानाही तो दुसऱ्याला जणू एका गुंगीत, मोहनिद्रेत नेई; आणि तो त्या सुखद जाणिवेत धुंद असताना, त्याला काडीचीही यातना न देता तो आपला मतलब साधत असे. नंतर लक्षात राही ती धुंदी, अनंतकुमारचा भलेपणा. त्याचा स्वार्थ नव्हे. निदान माझे तरी असेच झाले आहे.

अनंतकुमारचे थकलेले भाडे चुकते व्हावे म्हणून मी त्याला शंभर रुपये दिले. त्यानंतर मला त्याने आपल्या मालाडच्या जागेत राहायला बोलावले. घरमालकाच्या संमतीने जागा माझ्या ताब्यात देऊन तो निघून जाणार होता. याला अर्थात काही अवकाश लागणार असल्याने तेवढे दिवस तो आणि मी एकत्र रहाणार होतो. प्रथम तो मला आपला आप्त म्हणून तिथे 'एस्टॅब्लिश' करणार होता. मग गोडीगोडीने घरमालकाशी माझी ओळख करून देणार होता. त्यांतर मी परिचय वाढवायचा होता. मग हळूच एकदोनदा जागेचा विषय तो मालकाकडे काढणार होता. आणि पुरेसे धोरण वापरले तर काम होणे बिलकुल अवघड नाही असे त्याला आत्मविश्वासपूर्वक वाटत होते. घरमालकाच्या अशा रीतसर संमतीविना परस्पर जागा माझ्या ताब्यात लागलीच देण्यालाही त्याची ना नव्हती, पण मला ते परवडणार नाही हे जाणून त्याने पहिला दिवसगतीचा मार्ग पक्का केला होता असे तो म्हणाला. मला हे पटले. नाही तरी कायद्याची भीती, कोणत्याही कटकटीविषयी अनिच्छा माझ्या मूळच्या सुखवस्तू वृत्तीत होतीच.

अनंतकुमार अनेक वर्षे फिल्म लाइनीत आहे एवढे मला आधीच कळले होते. त्याच्या बोलण्यात त्याबाबतचे उल्लेख सारखे येत. जाता जाता तो अशोककुमार-दिलीपकुमारच्या निकटच्या ओळखीबाबत कटाक्षाने आणि रुचीने बोले. कोणतेही दृश्य कॅमेऱ्यातून पहावे तसे वर्णन करी. सुतारकाम, इलेक्ट्रिसिटीचे काम, असल्या कामांत तो तरबेज होता. आणि तो

कमालीचा व्यवहारचतुर वाटे. थोडक्या पैशात आणि श्रमात जास्तीत जास्त काहीतरी साध्य करण्याचा त्याचा सतत प्रयत्न आहेसे वाटे. अशा पुष्कळ क्लृप्त्या त्याच्यापाशी तयार असत. त्याचे कॉलरीला गेलेले शर्ट, जुनाट तुमानी, तसलेच बूट, कागदपत्रांची विटकी कातडी थैली, आतून उसवलेली वरून रुबाबदार फेल्ट आणि थकल्या भाड्यापैकी माझ्याकडून त्याने मागून घेतलेले शंभर रुपये, यावरून त्याच्या परिस्थितीची पुरेशी कल्पना मला आलीच होती. पण खरी कल्पना अनंतकुमारच्या जागेत मी गेलो तेव्हा आली.

त्या रात्री, आगाऊ ठरल्याप्रमाणे गिरगाव पोर्तुगीज चर्चच्या नाक्यावर आम्ही नऊच्या सुमाराला भेटलो. मी जेवलो होतो आणि अनंतकुमार उपाशी होता. पण हे मला नंतर सवयीने समजू लागले. मी गेलो तेव्हा तो शेंगा खात उभा होता. त्याच्या काखोटीला कागदपत्रांची विटकी थैली आणि टाइम्सचा अंक होता.

''हॅलो.'' तो हसत म्हणाला. ''सो वुई मीट ॲज डिसायडेड अं ! व्हेरी गुड. जेवूनबिवून आलात ना ?''

मी होकार दिला. त्याने मला जवळच्या थोड्या शेंगा दिल्या. त्या देतानाही नकळत हातातल्या चार परत रुमालात टाकल्या.

''आमच्या डायरेक्टरमहाशयांबरोबर विल्सनमध्ये आत्ताच झकास मटनबिर्यानी मारली.'' बोलताना त्याने एक मोठा ढेकर दिला. ''नाऊ आय ॲम मोअर दॅन फुल ! आज एक 'बकरा' कापायचा होता. मला त्यांनी मुद्दाम हजर ठेवलं. जमलं तर निदान पन्नास हजारापर्यंत काम सहज होईल.'' बुभुक्षितासारखा तो शेंगा तोंडात भरत होता. मग त्याने शेंगा खायचे जरा थांबवून विचारले, ''अच्छा. शाल वुई स्टार्ट नाऊ ?''
मी मान हलवली.

आम्ही दोघे चर्नीरोड स्टेशनाकडे गेलो. वाटेत 'बकरा' म्हणजे फिल्मी जगात कोण असतो आणि तो कापण्याला कठीण, पण युक्तीने घेतल्यास तो कसा सहज कापता येतो हे तो समजावून सांगत होता. त्याच्या तोंडात हजारांच्या गोष्टी होत्या, लाखांचे ठोकताळे होते. या रकमा जिभेवर पेलण्याइतका आत्मविश्वास होता. स्टेशनात त्याने त्याच्याकडे पास असल्याचे (खोटेच) सांगितले आणि मी माझे एकट्याचे तिकीट काढले.

मालाडकडे जाणाऱ्या गाडीत त्यातल्या त्यात प्रशस्तपणे बसून मग त्याने माझी प्रथमच नीट चौकशी चालवली. तू मूळ कुठला ? (मला तो आता एकवचनाने संबोधू लागला होता.) तुमच्या वर्तमानपत्राच्या व्यवसायात स्थैर्य कितपत असते ? वर्तमानपत्राचे काम कसे चालते ? कोणत्या वर्तमानपत्राचा खप किती आहे ? घरी कोण कोण आहे ? अलीकडे चित्रपट कोणते पाहिले ? चित्रपटांची परीक्षणे तुमच्याकडे कशी लिहितात ? एकानंतर दुसरा असे एकसारखे प्रश्न तो विचारीत होता. माझी उत्तरे एकाग्रतेने ऐकत होता. मधूनच ''हा शॉट कॅमेरा पॅन करून मी घेतला असता,'' ''अशा वेळी आम्ही स्पेशल लेन्स वापरतो,'' ''जस्ट लाइक इन अ पिक्चर'' असे तो म्हणत होता, मला उत्तेजन देत होता. स्टेशन आले की त्याचे डोळे बाहेर फलाटावर खिळत. तोंड एकीकडे चालू राही. तो चेकरवर अशी माझ्या नकळत नजर ठेवी.

पण चेकर आला नाही आणि आमचा प्रवास सुरळीत पार पडला. स्टेशनात तिकीट कलेक्टरसमोरून बाहेर पडताना तो मला पस्तीस हजारात संपूर्ण मराठी चित्रपट कसा सहज निघू शकतो आणि त्यावर लाखाचा फायदा कसा हमखास सुटतो ते सांगण्यात गढला होता किंवा तसे दाखवीत होता. त्या वेळी माझ्याकडे पस्तीस हजार असते तर मी ते त्यालाच दिले असते.

अनंतकुमारची जागा गावठाणात एका जुन्यापान्या घराच्या तळमजल्यावर होती. दार उघडले, दिवा लावला, तेव्हा आत प्रथम दिसला तो सगळा ओकेबोकेपणा, रितेपणा, भकासपणा. काही तुरळक सामान असूनही दर्शनी खोली रिकामी भासत होती. तिच्या एका कोपऱ्यात 'आग्र्याहून सुटके'च्या काळातून आल्यासारखी वाटणारी एक लाकडी पेटारेवजा पेटी होती. पलिकडे दोन जुनाट, मोडकळलेल्या ट्रंका होत्या. खुंटीला दोन चुरगळलेले कपडे लटकले होते. दुसऱ्या कोपऱ्यात पोटात खूप फुगलेली एक मोठी वळकटी होती. तिच्याजवळ टाइम्सच्या अंकांची एक अस्ताव्यस्त चळत होती. ती आणि त्यालगत एक पातेली, एक कपबशी, ओव्हल्टीनचा मोठा डबा, एक पाणी पिण्याचे फुलपात्र इतके सारे एकत्र होते. भिंतीवर जांभई देणाऱ्या पोराचा फोटो असलेले एकुलते कॅलेंडर दिसत होते. त्या साऱ्या घरात याहून फारसे काही नसावे. विजेच्या झगझगीत प्रकाशात सर्वत्र जळमटे, धूळ आणि कचरा भासत होता. एक प्रकारचा कुबट वास मारत होता. आधीच बंदिस्त असलेली ती जुनाट जागा अशा स्थितीत जास्तच गूढ आणि भयाण वाटत होती, पूर्ण अनाकर्षक होती.

एखाद्या फिल्मी राजवाड्यात फिरवावे तसे तिच्यातून मला थाटाने फिरवून मग अनंतकुमारने म्हटले, "से धीस इस युवर प्लेस. कशी वाटते ही ? अपेक्षेइतकी आहे ? निराशा नाही ना झाली ? संकोच नको ठेवू."

त्याच्या अपक्षेहून वेगळे उत्तर त्याच्या प्रश्नावर देणे मला शक्य नव्हते, इच्छाही नव्हती. मी म्हणालो, "नाही."

त्याला बरे वाटले असे दिसले.

तो म्हणाला, "तसे म्हटले तर शक्य असते तर मीसुद्धा ही जागा सोडली नसती. एवढ्या भाड्यात एवढी मोठी, सोयीची जागा या दिवसांत दुर्मिळच. शिवाय कुणीही हिच्यावर पागडी घेईल. भाडे निदान सत्तर रुपये पडेल. अशी जागा तुला जवळ जवळ मोफत, नाममात्र भाड्यात मिळते आहे. आय् कॉल यू लकी ! निदान मला तरी यात फार सुख वाटते आहे. मलाही तुला ही देता येते हे एकपरी चांगले झाले."

मी मान डोलविली.

"वर्षामागे म्हणतास तर मी याला तयार झालो नसतो." तो बोलत होता. "ही जागा हिच्यात राहणाऱ्यांना लाभणारीही आहे. माझ्या आधीची अशी दोन उदाहरणे आहेत. माझे तिसरे. इथेच मी साध्या कार्पेटरचा फ्लोअर-इन-चार्जच्या हुद्द्यापर्यंत पोचलो. शेवटी मी महिना पाचशे रुपये मिळवीत होतो. आता तात्पुरती मलाही हिची गरज नाही. माझे वेगळे प्लान्स आहेत. माझी परिस्थितीही असावी तशी नाही, आणि तूही गरजू आहेस; म्हणून तुला मी ही देतो आहे.

तूही इथे मोठा होशील.''

मी होकार पुटपुटलो.

''तू बडा संपादक होशील.'' तो म्हणाला. ''नशिबाची गोष्ट अशी आहे की, एकदा ते फिरले की मग माणूस लहानाचा मोठा आणि मोठ्याचा लहान व्हायला वेळ लागत नाही. सगळे घडतच जाते. आपण पुढे पुढे ढकलले जातो. बस्स ! हे बरेही असते आणि वाईटही. दारिद्र्य फार वाईट.''

मग एकाएकी भान आल्यासारखे करून त्याने मला त्याच्या वळकटीवर, ती ठाकून-ठोकून, एक तात्पुरती बैठक तयार करून दिली आणि तो शर्ट तुमानीबाहेर काढून कामाला लागला. त्याने एक वर्तमानपत्र घेतले आणि त्याने झडाझडा खोलीतला केर चारी भिंतींशी झटकला. ते करताना तो म्हणाला,

''वास्तविक इथे कामाला एक म्हातारी बाई आहे, पण ती फार जुनी आहे. इथे आल्यापासून ती आमच्याकडे आहे. आता ती कधी येते, कधी येत नाही. तब्बेतीची तक्रार असते तिची. पगार मात्र घेते, मीही देतो. म्हातारे माणूस आहे.''

मग वर्तमानपत्र झटकून आणि परत मूळ ठिकाणी ठेवून त्याने भराभरा सारे विस्कळित सामान एकीकडे सरकवले. त्यानंतर मला लाकडी पेटाऱ्यावर जागा करून देऊन त्याने पोटात बेसुमार फुगलेली वळकटी खोलली. तिच्यातली मळकट मच्छरदाणी झटाझट चार खिळ्यांना अडकवून, मेणचटलेल्या गादीवर जवळ जवळ परीटघडीचा अभ्रा एकही सुरकुती दिसू नये इतका नितळ अंथरला. त्यावर चित्रातल्या गादीवर असावी तशी 'स्वीट ड्रीम'वाली उशी अल्लद टाकली. आणि बिछाना कलात्मक नजरेने पहात समाधानाने त्याने हात झटकले. एवढे झाल्यावर तो माझ्याकडे पाहून म्हणाला,

''कंटाळा आला ? थकला आहेस का तू ? मग झोप. जागू नको. बोलायला आपल्याला यानंतर पुष्कळ सवड मिळेल. मला बोलायला आवडते.''

''मलाही.'' मी उत्साह दर्शवीत म्हणालो.

''उत्तम.'' तो म्हणाला. ''आपले जमले म्हणायचे.''

एव्हाना त्याने शर्ट अंगातून काढला होता. त्याचे केसाळ, मांसल, दगडी शरीर विरल्या आणि फाटल्या गंजिफ्रॉकातून जास्तच उठून दिसत होते. त्याचा एक वास मारत होता. मग त्याने कमरेला एक फाटका टर्किश टॉवेल गुंडाळला. पँट सोडून ती खुंटीला लटकविली.

''रात्री निजण्याआधी एकदा स्वच्छ आंघोळ करण्याची माझी पद्धत आहे.'' त्याने काहीतरी फार खाजगी, महत्त्वाचे सांगावे तसे सांगितले. ''दिवसाची सगळी पापे अशा तऱ्हेने धुऊन जातात. काय ?'' आणि तो मोठ्ठा हसला.

माझ्या हातात 'टाइम्स'चा अंक ठेवून तो आतल्या खोलीत गेला. नळ सुटला. खसखसा अंग घासण्याचा एक मजेशीर आवाज जोरजोराने येत होता. ऐकावासा वाटत होता. मग त्याची आंघोळ आटोपली. कोरडा होऊन तो बाहेर आला. पाण्याने छातीवरचे केस तरारले होते. तो

उत्तम आट्याच्या ताज्या पात्रासारखा तजेलदार दिसत होता. त्याने पुन्हा पँट चढवली. फाटका टॉवेल खुंटीवर टाकला.

"झोपेची आपली तक्रार नसते." तो म्हणाला, "केव्हाही झोप म्हणा, झोपतो. छान, गाढ झोपतो. परिस्थिती कुठली का असेना, झोपेत मी कधी कमतरता करीत नाही. अखेर तिच्यावर तर सगळे अवलंबून असते. काय ?"

पँट चढवून तो वर्तमानपत्राच्या बैठकीवर मांडी घालून बसला. विजेच्या झगझगीत शिळ्या प्रकाशात त्याची आताची स्नानानंतरची टवटवी अगदी विशोभित, विचित्र, विलक्षण वाटत होती. तो म्हणाला,

"लेचापेचा माणूस या आमच्या लाईनमध्ये शिल्लकच राहणार नाही. माणसाने इथे पुष्कळ खाल्ले पाहिजे आणि चणे-कुरमुऱ्यावरही जगायला शिकले पाहिजे. भरपूर आराम केला पाहिजे आणि सारखे दिवसरात्र श्रमण्याचीही तयारी ठेवली पाहिजे. इथे आत्मविश्वास हवा, पण आपल्या जोड्याशी बसण्याची लायकी नाही अशालाही डोक्यावर घ्यायला, नाचवायला जमले पाहिजे. अशी ही आमची मोठी विचित्र लाईन आहे. तू यात आलास तर पळून तरी जाशील नाही तर सपाटून आजारी पडशील." इथे तो गंमतीशीरपणे हसला.

"मला थोडी सवय आहे." मी म्हणालो.

"तुझ्या चेहऱ्यावरून तसे वाटत नाही." तो म्हणाला. "चेहऱ्यावरून मी माणसाची लाईन सांगतो. तू संपादक किंवा कुणी मोठा लेखक होशील. किंवा सरकारी ऑफिसर."

मी संकोचलो. मी म्हणजे कुणी फार दुबळा, क्षुद्र आहे असे मला त्याच्या शब्दांनी वाटले.

"तेही वाईट नाही म्हणा." तो मग बोलला. "वेळेवर पगार येतो; नेमके काम पडते—सरकारी नोकरीत. कसली काळजी नाही. दर वर्षाला प्रमोशन ठरलेले."

माझे भवितव्य अगदीच काळे नाही असे मला वाटू लागले.

"पण त्यात ती गंमत नाही." तो पुढे बोलला. "माणसाला धकाधकी हवी. अस्थिरपणात लाइफ असते. दुःखाने जशी सुखाची गोडी कळते तसा कष्टांनी, काळजीने आराम जास्त आरामशीर वाटतो."

थोडा वेळ तो थांबला.

"आता मला कुणी हजार-पाचशे रुपये दिले तर मला ते जेवढ्या सुखाने उपभोगता येतील तेवढे तुला येणार नाहीत. पैशाची रुची मला कळू लागली आहे. नोट—एक रुपयाची नोट—चॉकलेटपेक्षा गोड असते हे आहे तुला माहीत ? शंभर रुपयांची नोट श्रीखंडपुरीच्या फीस्टपेक्षा रुचकर लागते हे कधी कळले आहे तुला ? पैशाची रुची तुला माहीत नाही." त्याच्या मुद्रेवर माझ्याविषयीची हळहळ होती.

"काय मिळते तुला ?" त्याने विचारले.

मी लाजत म्हणालो, "एकशेपंचवीस."

"बास ?" तो मोठ्यांदा उद्‌गारला. हसला.

मी थिजलो. मला जमीन पोटात घेईल तर बरे असे वाटले.

मग माझी मुद्रा पाहून सौम्य सुरात त्याने लागलीच म्हटले, "कामाच्या मानाने वाईट नाही म्हणा. शिवाय स्थैर्य थोडे तरी आहे. आणि सध्या तू एकटाच आहेस. एकट्या माणसाला सव्वाशे पुष्कळ झाले. काटकसरीने राहिले तर एवढे पुरतात."

थोडा वेळ पुन्हा तो गप्प होता. त्याने सारखे बोलत राहावे असे मला वाटत होते. तो गप्प राहिला तर पुन्हा लाजेच्या खाईत मी अडकून पडेन असे वाटत होते.

"मी बाँबे टॉकीजमध्ये होतो तेव्हा शेवटी महिना पाचशे मिळत. पण मी सुरुवात केली रोजी रुपयावर. मग हळूहळू चढत गेलो. मला तुझ्यासारखे पुरे शिक्षण नव्हते. पाचवीत असतानाच शाळा सुटली. इकडेतिकडे उमेदवारी केली. कापडाच्या दुकानात म्हण, कुणाच्या कचेरीत म्हण. पण आवड होती सिनेमाची. म्हणून इथे मालाडला आलो आणि स्टुडिओत लागलो. म्हटले, प्रथम सुतार तर सुतार. जन्मभर आपण सुतारच रहात नाही एवढी खात्री होती. तसेच झालेही. राज कपूर मला असिस्टंट होता. दिलीपचे केस असे ठेवावेत हे 'नौका डुबी'च्या वेळी मीच सुचवले. अशोकला बाँबे टॉकीजमधून बाहेर पडण्याचा सल्ला मीच दिला." तो बोलत होता. त्याच्या मुद्रेवर अभिमान नुसता ओसंडत होता. "देविकाराणीशी माझे फार चांगले संबंध होते." तो सांगत होता. तो माझ्यासमोर होता तरी मनाने बाहेर—लांब कुठे तरी पोचला होता आणि तिथून परत येऊ इच्छीत नव्हता.

डास पायाला चटाचटा डसत होते, कानांशी गुणगुणत होते, तरी मंत्रमुग्ध होऊन मी त्याचे ऐकत होतो.

अखेर मला माझ्या नकळत एक जांभई आली. त्याचा रसभंग झाला. तंद्री भंगली. बैठक बिघडली. मुद्रेवर किमान पण स्पष्ट नाराजी ठेवून तो म्हणाला, "तुला झोप आली. आपण झोपू या. या गोष्टींत अर्थ नाही."

मला असे वाटत नाही आणि मला सर्व ऐकायचे आहे असे मला त्याला सांगायचे होते; पण तो उठलाच. वर्तमानपत्रांची चळत त्याने हातांत उचलली. सरसर एकेक वर्तमानपत्र तो जमिनीवर पसरू लागला.

माझ्याकडे अंथरूण नव्हते. होते ते जुजबी अंथरूण माझ्या एकतृतीयांश खोलीवर होते. मला मोठे अवघडल्यासारखे वाटत होते.

"सो जाव अब." तो मच्छरदाणीतून एक पांघरूण बाहेर घेऊन म्हणाला. "बदलायला कपडे नसतील तुझ्याकडे. माझे लाँड्रीत गेले आहेत. (हे खोटे होते.) आमची म्हातारी आणून टाकते पण तीच आलेली नाही. तू असे कर. शर्ट ठेव काढून. पँटही सोडून ठेवलीस तरी हरकत नाही. आत चड्डी आहे ना ? मग चालेल. मलादेखील आता तेच करणे प्राप्त आहे. आपापसांत आपण नसता संकोच ठेवण्यात अर्थ नाही. काय ?"

तरीही मी तसाच, अनिश्चित मुद्रेने बसलेला पाहून त्याने म्हटले, "अच्छा. असे करू. मी दिवा काढतो. म्हणजे तुला संकोच वाटणार नाही. आणि तू असाच या मच्छरदाणीत शिरून आत पँट काढून उशीखाली ठेव हवी तर. काय ? फुकट इस्त्रीही होईल, तुला प्रायव्हसीही मिळेल."

''पण मी वर्तमानपत्रांवर झोपतो.'' मी म्हणालो.

''शहाणा आहेस !'' तो म्हणाला. ''मेहमानको मेहमान सरीखाही रहना पडता है. आज तरी तू पाहुणा आहेस. उद्या इथला होशील. पुढे मीच इथे पाहुणा होईन. कधी तरी एखादा दिवस येऊन, चहा पिऊन जाईन. तू माझे आगतस्वागत करशील. 'कसे काय' विचारशील. मजा येईल. एखाद्या पिक्चरमध्ये हे टाकले तर पॉवरफुल करता येईल. पण पिक्चरमध्ये आपल्यापैकी एकाच्या जागी हिरॉईन येईल. त्याशिवाय ते 'क्लिक' होणार नाही. लोकांना सेक्स हवा. नाचगाणी हवीत. त्यात 'मसाला' हवा.''

त्याने दिवा घालवला. मी निमूट मच्छरदाणीत शिरलो. संकोच झटकून पँट उतरवली. घडी करून ती उशीखाली घेतली. आडवा झालो.

तोही वर्तमानपत्रांवर पसरला होता. डास चावू नयेत म्हणून त्याने अंगावर पांघरूण घेतले होते. मला झोप लागेपर्यंत त्याचा लयबद्ध, भरीव, खोल श्वासोच्छ्‌वास मी एखाद्या सुरेल अंगाईसारखा ऐकत होतो. मध्येच तो कूस बदली. वर्तमानपत्रे चुरचुर आवाज करीत. पुन्हा त्याच्या श्वासोच्छ्‌वासाचे एकसुरी चरण पुढे चालू होत. तो किती वेळ जागा होता ते मला समजले नाही.

पहाटेला त्याने मला जागे केले तेव्हा त्याचे पांघरूण माझ्या अंगावर होते. मच्छरदाणीत गारठा शिरला होता. खोलीत रात्रीसारखा दिवा जळत होता. तो तुमान चढवून त्याच्या वर्तमानपत्रांच्या बिछायतीवर बसला होता आणि वर्तमानपत्रांचेच लहान लहान कागद जाळून त्यांच्या शेकोटीवर कथलाच्या पातेलीत पाणी उकळवीत होता.

''उठो साब.'' तो म्हणत होता. ''चाय हो रही है.''

''किती वाजले ?'' मी उठण्याला नाराज होऊन, डोळे मिटत आणि पुन्हा उघडीत विचारले.

''बहुतेक सहा-पंधरा.'' तो म्हणाला.

माझ्याप्रमाणे त्याच्याकडेही घड्याळ नाही हे माझ्या लक्षात आले.

''दिवस उजाडतो त्यावरून मला अचूक वेळ सांगता येते.'' तो म्हणत होता. ''शिवाय आत्ताच दूध घेतले दूधवाल्याकडून. हा दूधवाला आज पुष्कळ वर्षे सहालाच येतो. झालेच तर समोरच्या घरातील दमेकरी म्हातारा खोकू लागतो तेव्हा पहाटेचे साडेतीन-चार वाजलेले असतात. त्या अंदाजानेही सव्वासहाच.''

मी उठलो. तुमान चढवली. कुडकुडत मच्छरदाणीबाहेर आलो.

''थंडी आहे ना ?'' त्याने विचारले.

''छे.'' मी खोटेच, हो म्हणणे कमीपणाचे वाटून, म्हणालो.

''इथे या दिवसांत पहाटेला एवढी थंडी असते. तुला ती सहन होणार नाही. म्हणून मी माझे पांघरूण घातले. अजून तू बच्चा आहेस. घरी असतास तर आईने तुझी काळजी घेतली असती. म्हटले, माझ्याकडून काही कमी पडायला नको.''

मी बच्चा नाही असे बजावून सांगावेसे वाटले. पण त्यात अर्थ नव्हता. मी बच्चा होतोच.

अनंतकुमारपुढे तर फारच होतो. मी आत गेलो. नळाच्या थंडगार पाण्याने हुडहुडत तोंड धुतले. पलीकडे बाटली दिसत होती. तिच्यातली राखुंडी घेऊन दात घासले. मी पुन्हा बाहेर आलो तेव्हा अनंतकुमारने कपबशीत वाफ ओकणारा चहा बनवला होता.

''लेओ.'' तो म्हणाला.

''आणि तुम्ही ?'' मी विचारले.

''बच्चा, असे तू मला विचारू नकोस.'' त्याचा सूर किंचित नाखुषीचा, रागाचा होता. ''तुला मोठा भाऊ असता तर त्याने काय केले असते ? आपल्याकडे कपबशी एकच आहे. प्रथम तू घे. नंतर मी घेईन. कप उष्टा मात्र करू नकोस. कुणाचे उष्टे पिणे मला आवडत नाही.''

तो गरम गरम चहा मी रुचीने घेतला. तितका रुचकर चहा कधी प्यायलो नाही असे वाटत होते.

''चांगला झाला आहे. तुला जास्त साखर हवी ? दूध ?'' तो विचारीत होता. ''मला आवडतो तसा मी केला आहे. तुझी टेस्ट कळली तर तसा करीत जाईन.''

''छान झाला आहे.'' मी म्हणालो.

''गुड !'' त्याला बरे वाटले. ''आज रात्री येताना मी ब्रेड आणीन. म्हणजे उद्या आपला ब्रेकफास्टच होईल. उद्यापासून रोज सकाळी ब्रेड अँड टी. काय ? ठरले !''

मी आल्याचे, राहिल्याचे त्याला आवडलेले दिसत होते. याचे मला बरे वाटले. त्याने माझी लायकी नसाताही मला पत्करले याची कृतज्ञता वाटली. अभिमान वाटला.

चहा सावकाश, एक एक घोटाने घेत तो म्हणत होता, ''मला स्वयंपाकसुद्धा फर्स्ट क्लास करता येतो. पोळ्या खाव्या माझ्या हातच्या, असे खाल्लेले लोक सांगतील. तसेच बटाट्याची भाजी. हम तुमको भी एक दफे जरूर खिलवाएंगे. यू विल ऑलवेज रिमेंबर मी देन. पोळ्या आणि बटाट्याची भाजी म्हणजे अनंतकुमार दंडवते.'' तो मोठ्यांदा ऱ्हस्व हसला. ''कोणती का गोष्ट असेना, टेस्टने करावी एवढे मी शिकलो आहे. बॉंबे टॉकीजमध्ये याबद्दल माझे नेहमी नाव घेतले जाई. ग्यानबाबूंची माझ्यावर बहाल मर्जी होती. बॉंबे टॉकीज बंद पडले हे मोठे वाईट घडले.''

मग त्याने जाळलेल्या कागदांची विसविशीत राख काळजीपूर्वक एकत्र करून ती कौशल्याने भरली. ती नेऊन बाहेर टाकली. पुढ्यात घेतलेले सारे साहित्य भिंतीशी सारले. वर्तमानपत्रांची बिछायत गुंडाळली. त्याचा बिछाना मी काढू लागलो तेव्हा तो म्हणाला, ''असू दे. म्हातारी काढील मग. आज तरी ती नक्कीच येईल. तुला लौकर बाहेर पडायचे नाही ना ? तू आराम कर. मला जरा एक महत्त्वाची ॲपॉइंटमेंट आहे. शशिकला पिक्चर काढते आहे. तिने मला बोलावले आहे. पाहू या काय होते ते.''

तो मग उठला. त्याने थंड पाण्याने भराभरा दाढी केली. आंघोळ करण्याऐवजी त्याने नुसतेच तोंड, हातपाय धुतले. एका तडा गेलेल्या आरशात पाहून दाते मोडलेल्या फणीने आपले विरळ केस बारकाईने विंचरले. कपडे चढवून, विटकी बॅग घेऊन, आतून उसवलेली फेल्ट डोक्यावर ठेवून तो गेलादेखील. जाताना तो म्हणाला, ''बाहेर पडशील तेव्हा चावी आठवणीने शेजारी

ठेव. आता आपल्याला दोन चाव्यांचे नवे कुलूप आणायला हवे. बरे तर. आपली भेट पुन्हा रात्री. बाय बाय.''

रात्रीपासून त्याला एक विचारायचे माझ्या मनात होते. पण ते मला जमले नव्हते. तो एकटाच होता काय ? त्याचे लग्न झाले नव्हते काय ? असल्यास बायकोमुले कुठे होती ? तो असा एकटा काय म्हणून आणि किती दिवस रहात होता ?

तो गेल्यावर माझी उत्सुकता स्वस्थ बसली नाही. या नव्या प्रश्नांचा शोध घेत मी घरभर नव्याने फिरलो. एखादे गुप्तधन एकट्याच्या हाती पडावे तसे 'थ्रिल्ल' एकीकडे मनात होते. प्रत्येक लहानसहान तपशील महत्त्वाचा, रहस्यपूर्ण वाटत होता. बारक्या बारक्या गोष्टींतून काही नवा शोध लागतो आहे, नवे ज्ञान प्राप्त होते आहे असे मी भासवून घेत होतो. आतल्या खोलीत एकीकडे मला एक मोडकी, निकामी शेगडी आढळली. भिंतीवर लहान मुलाच्या हातच्या अस्पष्ट रेघोट्या, अक्षरे, चित्रे सापडली. एका रिकाम्या फडताळात, कोपऱ्यात गंधाची जुनाट, रिकामी बाटली आडवी पडली होती. या घरात बाईमाणूस केव्हा तरी नांदले आहे, पोरेबाळे वावरली आहेत असे मला वाटू लागले. जास्त जाणून घेण्याची उबळ अनावर आणि त्रासदायक होऊन राहिली. पुन्हा तेच ते सर्व न्याहाळताना माझ्या अस्वस्थ, अस्थिर नजरेला बाहेरच्या खोलीतली लाकडी पेटी दिसली. तिला कुलूप नव्हते. तरी मोडक्या, जुन्या ट्रंकांच्या मानाने तिच्यात जास्त काही असेल असे मला उगीच वाटले. वाटत राहिले. वास्तविक तसले काही मी पूर्वी केले नव्हते, कुणाच्या खासगी जीवनात त्याच्या पश्चात डोकावलो नव्हतो. असे करणे असभ्यपणाचे असते असे सांगणाऱ्याच वळणात लहानाचा मोठा झालो होतो. पण त्या दिवशी मी अनंतकुमार दंडवतेची, माझ्या 'हीरो'ची ती ठेवणीच्या वस्तूंची पेटी त्याच्या अपरोक्ष खोलली. आतल्या एकेक वस्तू धडधडत्या छातीने, रोमांचित वृत्तीने बाहेर काढल्या, हाताळल्या, परत ठेवल्या आणि परत उचलून जास्त न्याहाळल्या. त्यांत काही जुने फोटो मिळाले, काही पत्रे मिळाली. 'ईव्हिनिंग इन पॅरिस'ची एक निम्मी भरलेली जुनाट बाटली त्यातून निघाली. फिल्म इंडियाचा एक खूप जुना अंक हाती लागला. त्याशिवाय काही उंची कापडाचे विटके, विरलेले, चुरगळलेले कपडे निराळे. हे अनंतकुमारचे होते.

फोटोंपैकी एक, कोठल्या तरी पायऱ्यांवर एकमेकांना बिलगून बसलेल्या फार लहान मुलांचा होता. त्यांतला एक चेहरा अनंतकुमारचे पुसट स्मरण करून देणारा होता. मुले एकाखाली एक वयाची वाटत होती. दुसऱ्या फोटोत सिनेमा फॅशनची एक साधारण उत्तान पोज घेऊन कुणी उत्तर भारतीय वळणाची नटीवजा स्त्री उभी होती; आणि मागे समुद्र होता. तिसरा प्रसन्न हसणाऱ्या एका कृश, महाराष्ट्रीय स्त्रीचा होता. हिच्या गळ्यात मंगळसूत्र मात्र दिसत नव्हते. चौथ्या एकात बरीच फिल्मी माणसे उघड्यावर उभी होती. त्यांत अशोककुमारमागे अनंतकुमार दंडवते सस्मित उभा होता आणि त्याच्या गळ्यात कॅमेरा रुबाबशीरपणे लटकत होता. पत्रांचा जुडगा तसाच ठेवावा, वाचू नये असे मी स्वतःला पुष्कळ बजावले, पण तो वरवर पहाताना त्यात माझे लक्ष गुंतले आणि त्यांपैकी बरीच मी भराभरा वाचून काढली. दुसरे काहीही मी एवढ्या ध्यासाने, ओढीने कधी वाचले नसेल. त्यांतली बरीच पत्रे अनंतकुमारच्या

बायकोचीच—बहुधा त्या, फोटोतल्या प्रसन्न हसणाऱ्या कृश स्त्रीची—होती. उरलेली अनेकांची होती. त्यांतले कोण अनंतकुमारचे कोण ते मला त्यावरून, त्या घाईत, कळणे अशक्य होते. ते शोधण्याचे प्रयासही मला करवले नाहीत. न कळणारा संदर्भ, न लागणारा भाग तसाच ओलांडून मी भराभर वाचत सुटलो होतो.

पेटी बंद केली तेव्हा चोरट्यासारखे वाटत होते, मी गुन्हा केला हे मनाला डाचत होते; पण एकीकडे हलके आणि बरे वाटत होते. पुष्कळ शंका दूर झाल्या, पुष्कळ कळले, याचे सुख वाटत होते. अनंतकुमार आता मला फारसा अनाकलनीय राहिला नव्हता. याही मार्गाने मी त्याच्या अधिक जवळ पोचलो होतो. त्याची सुखदुःखे मला चांगली समजू लागली होती; परिस्थिती समजत होती. आणि ती अत्यंत निराशाजनक, शोचनीय आणि न सुधारणारी आहे हे पुरतेपणी समजण्याएवढी अक्कल जवळ नव्हती; अनुभव तर नव्हताच नव्हता. मी अनंतकुमारच्या अधिक जवळ पोहोचलो हाच आनंद दीर्घकाल मन भरून राहिला होता. अनंतकुमार खरे म्हणजे बेकार होता. असा तो बरेच दिवस राहिलेला दिसत होता. बाँबे टॉकीज बंद पडले आणि तो मोकळा झाला; त्यानंतर निव्वळ धडपड, प्रयत्न, स्वप्ने, कल्पना आणि बेत यापलीकडे त्याला कसले निश्चित आणि प्राप्तिदायक काम मिळाले नव्हते. या परिस्थितीत त्याची बायकोमुले मनाविरुद्ध, त्याच्या आग्रहाने त्याला सोडून, मालाडचे घर सोडून पुणे, चाळीसगाव, बत्तीसशिराळे इथे राहिली होती. बत्तीसशिराळ्याला त्याच्या बायकोचे माहेर होते आणि तिथेच ती अखेर स्थिर झाली होती. जवळ जवळ सर्व ठिकाणी तिला राहणे अपमानास्पद आणि कमीपणाचे वाटले होते. माहेरी तर फारच वाटत होते. मला लौकर न्या असे तिच्या जवळ जवळ प्रत्येक पत्रात म्हटलेले होते. मधून मधून आर्थिक अडचणींची सौम्य उजळणी आणि पैसे पाठवा अशी कमीअधिक प्रत्यक्ष सूचना होती. क्वचित ती लिहिताना चिडली होती, रडली होती; तक्रारखोर बनली होती. मुले माझे ऐकत नाहीत, त्यांना तुमची शिस्त नाही असे तिने एकदोनदा लिहिले होते. शाळेतून मुलांना फी थकली म्हणून घरी पाठवले असेही तिने एके ठिकाणी लिहिले होते. धाकटा मुलगा शिकत नाही अशी तक्रार एका पत्रात होती. राहत्या ठिकाणच्या लागट बोलण्याचे उल्लेख कुठे कुठे ओघात येऊन गेले होते. तरी पण पत्रांचा आरंभ, शेवट बहुशः प्रेमळ होता; आर्जवी होता. धीर देणारा होता. मी माझी जबाबदारी कसूर न करता पार पाडते आहे असा दिलासा देणारा होता. लग्नानंतरच्या पहिल्या काही काळच्या शृंगारिक स्मृतीही एकदोन पत्रांत घोळघोळून हळवेपणाने लिहिलेल्या होत्या. संसारात पुन्हा येऊन बसण्याची उत्कट इच्छा प्रत्येक पत्रात प्रकर्षाने होती. वरवरच्या काही पत्रांत, पत्राला उत्तर नाही म्हणून काळजी, कुरकूर होती. बायकोव्यतिरिक्त इतरांच्या पत्रांत उसनवार पैशांचे वायदे, देण्याबद्दल तगादे, ही लाईन सोड, यात अर्थ नाही, असे उपदेश आणि 'ईश्वरावर भरवसा ठेवावा' असे सल्ले होते. एका कागदावर घरातल्या बऱ्याच वस्तूंची यादी होती. प्रत्येक वस्तूपुढे कुणाकुणाचे नाव होते. या, घरातल्या एकेक वस्तू अनंतकुमारने बहुधा त्या त्या लोकांना विकल्या वा तात्पुरत्या वापराकरिता दिल्या असाव्या. त्यांत कॅमेरा, रेडिओ अशाही वस्तू होत्या. एक फाटकी राशि-लग्न-पत्रिका आणि कागदाच्या ढिल्या

पुरचुंडीत बांधलेला गंडा त्यांतच सापडला.

अनंतकुमार वाईट, पडत्या, कठीण परिस्थितीत आहे एवढे मला यावरून पुरते कळून चुकले. त्याची पेटी त्याच्या अपरोक्ष उघडण्यात, उपसण्यात मी काही गैर केले ही डाचणारी भावना या जाणिवेपुढे क्रमशः बोथट बनली, निरुपद्रवी झाली. माझ्या पद्धतीने मी एकंदर गोष्टींवर जोराचा विचार करीत राहिलो. या परिस्थितीतून या भल्या माणसाला बाहेर कसे काढता येईल, मदत कशी करता येईल, आधार कसा देता येईल ते माझ्या अननुभवी आणि म्हणून फार तल्लख मनाने माझ्या फार मर्यादित कुवतीनिशीच शोधत राहिलो. मनात मधून मधून ती फोटोतली कृश पण प्रसन्न स्त्री येत होती, ती मुले डोकावत होती, ती उत्तर भारतीय नटीवजा स्त्री रहस्य निर्माण करीत होती, 'ईव्हिनिंग इन पॅरिस'ची जुनी बाटली आपला दरवळणारा सुगंध पसरून जात होती. अनंतकुमारचे आयुष्य मला मोठे रोमँटिक, हृदयस्पर्शी, बेकदर आणि तरीही दृढ कौटुंबिक पाशांनी वेढलेले वाटत होते. तो एकाच वेळी मला मोठा शूर आणि प्रेमळ, कर्तबगार आणि दुबळा वाटत होता. दाट धुक्यात वेढलेल्या उत्तुंग डोंगराला मध्येच कोवळ्या उन्हाची एक किनार यावी तसा तो मला मोठा आकर्षक, विलोभनीय वाटत होता.

त्याच्या परिस्थितीने मी स्वतःला करता येईल तेवढे अस्वस्थ करून घेतले. परंतु खुद्द त्याला मात्र त्या वा त्यानंतरच्या रात्री मी आपण होऊन काही म्हणालो नाही, विचारले नाही, कसला थांगपत्ता लागू दिला नाही; एखादा 'बकरा' कापण्याच्या, नटीशी काँट्रॅक्ट करण्याच्या, यशस्वी चित्रपट कसा काढावा याविषयीच्या त्याच्या हजाराच्या आणि लाखाच्या त्याच त्याच गोष्टी मी अनुकंपेने, भक्तीने ऐकून घेत होतो आणि याचे पुढे काय याचा विचार, रहस्यकथा वाचताना नायकाविषयी करावा तसा, एकीकडे करीत होतो. तो मटन-बिर्यानीसारखी मेजवानी झोडल्याचे म्हणत असे तेव्हा तो जेवलेला बिलकूल नाही हे मी ओळखी. निव्वळ जेवल्याचेच तो सांगे तेव्हा त्याने मिसळ-पावावर भागवले आहे असा आडाखा मी बांधला होता. आणि आज थोडेसे खाऊन आलो असे तो म्हणे तेव्हा मात्र ते थोड्याफार फरकाने खरे असे. तो म्हणे ती म्हातारी मोलकरीण चुकूनही आमच्या घरी फिरकली नाही. सारी कामे आमची आम्हीच करीत असू. तो दिवसभर करतो काय, जातो कुठे याविषयी मला फार कुतूहल होते, परंतु ते पूर्णांशाने पुरे होण्याची शक्यता नव्हती. एकेक दिवशी तो जगाविषयी फार कटुतेने बोले. एखाद्या माणसाचे कडवट उल्लेख करी. आजची त्याची धडपड फुकट गेल्याचे त्याला समजले आहे आणि कुणीतरी त्याला त्याच्या अपेक्षेप्रमाणे वागवलेले नाही याचे हे माझ्या मते द्योतक असे. एखाद्या बाबतीत मी खर्च करावा अशी त्याची अपेक्षा असे तेव्हा तो सुटे नाहीत असे म्हणे. क्वचित 'बँकेत जायला झाले नाही' असे सांगे. आपल्याकडे पैसे नाहीत असे तो एकदाही म्हणाल्याचे मला आठवत नाही. एकेकदा तो मी येण्याआधीच घरी येऊन, दिवा घालवून त्याच्या मच्छरदाणीत जाऊन चूपचाप पडलेला असे. तर केव्हा रात्री दोनतीन वाजेपर्यंत त्याचा पत्ता नसे. अशा वेळी तो येई तो थकून, ओढून टाकल्यासारखा, त्रस्त असा. क्वचित त्याच्या तोंडालाही कसला तरी दर्प असे.

माझे अंथरूण-पांघरूण आता मला होते. सिंगल मच्छरदाणी होती. इतर सामान होते. त्याने

यातले काहीही लागेल तेव्हा वापरावे अशी माझी फार इच्छा असे. यासाठी त्याच्या गरजा आधीच हेरून मी माझी वस्तू त्याच्या हाती सहज लागेल अशी नेमकी त्या वेळी ठेवून देई. वेळाउशिराने तो तिचा उपयोग करू लागला होता. काही हवे असले की प्रथम तो ते दिसूनही तिकडे डोळेझाक करून बसे. मग ती वस्तू हातात उचलून ती वाटेल तिकडे टाकण्याबद्दल तो मला सौम्य दम भरी. त्यानंतर सहज आठवण व्हावी तसे तो म्हणे, ''आज माझे अमूक तमूक संपले आहे. आणीन आणीन म्हणतो पण वेळ होत नाही. काय करावे यावर ? आमचे हे असेच. तहान लागल्यावर विहीर खोदू लागायचे.'' मी हळूच म्हणालो, ''सध्या माझे वापरा,'' की मग कुरकुरत, वारंवार अनिच्छा दर्शवीत, माझ्यावर उपकार करावे तसा तो ती वस्तू वापरी. तीही परतफेड करण्याच्या बोलीवर. अशाच पद्धतीने मी त्याचे थकल्या शंभर रुपयांव्यतिरिक्त आणखीही दोन महिन्यांचे भाडे देऊन टाकले. घरात एक स्टोव्ह, एक बादली, एक केरसुणी, टाइमपीस, एक जुनी खुर्ची आणून टाकली. साबण, ब्लेड्स, चहाची पावडर, ब्रेड हे बहुधा माझेच असे. माझे दोन कपडे मी नेहमी खुंटीवर ठेवून देई. हेतू हा की, वाटल्यास माझ्या मागे पण त्याने यांचा वापर करावा. कस्टममधल्या मित्राने मोफत दिले असे सांगून मी त्याला पँटचे एक बऱ्यापैकी कापड आणून दिले. माझ्याकडे स्पेअर आहेत असे सांगून हातरुमाल घ्यायला लावले. घेताना त्याला ऋण वाटणार नाही अशी फार काळजी मी घेत होतो; आणि अर्थात म्हणूनच त्याच्यासाठी सातत्याने काही करता येत नव्हते. मला दुःख होई ते याचेच.

एकेकदा तो पुष्कळ बोलत असे, तसा एकेकदा निमूट अंथरूण आणि मच्छरदाणी धरून राही. बोलण्याच्या भरात त्याने मला नटींच्या खाजगी आयुष्याबद्दल रंगेलपणे ऐकवले होते, आपल्या आयुष्यातली माफक अनैतिकता खुलवून-फुलवून सांगितली होती. त्यातच त्या उत्तर भारतीय नटीवजा बाईच्या फोटोचाही खुलासा झाला होता. तो पुष्कळ बोलू लागला की आता माझीही भीड थोडीशी चेपे. मी त्याला बेतानेच काही विचारी. उत्तर द्यायचे नसले की तो बोलायचे बंद करीत असे किंवा विषयांतर करी. त्याच्या परिस्थितीबद्दल रोखठोक काही बोलण्याला तो नाखूष असे. त्याच्या घरगुती बाबतीत, तो बोले त्याव्यतिरिक्त काही मी विचारलेले त्याला आवडत नसे. तो बेकार आहे अथवा त्याचा भविष्यकाळ फारसा आशादायक नाही हे सत्य मान्य करण्याची त्याची तयारी नसे. परंतु नशिबाचे उलटसुलट फेरे असतात आणि एकदा उलट फेरा सुरू झाला की माणूस घायकुतीला येतो, हे त्याला मान्य असे. तत्त्वतः त्याला सारे मान्य असे, ते मान्य करण्याला तो उत्सुक असे. परंतु तपशिलात तो यांतल्या प्रत्येक गोष्टीविरुद्ध पवित्रा घेत असे. ती नाकबूल करीत असे. मनाशी ती नाकबूल करता येईनाशी झाली की, तो अबोल बने. मच्छरदाणीत पडून राही. त्याला मग दिवा आवडत नसे, मीही एका मर्यादेपर्यंत आवडत नसे. त्याला काहीच आवडत नसे. त्याला सारे जगणेच आवडेनासे होई. पण पुन्हा तो त्यातून बाहेर पडे हे चांगले होते. रात्री तो असा बेचैन असला तर पहाटे चांगला होई. पहाटे अबोल असला तर रात्री बोलका होई.

एखादा चित्रपट पहाण्याची शिफारस तो मला करी तेव्हा ते दोन गोष्टींचे सूचक असे. एक : तो खुषीत आहे. आणि दोन : त्याला तो चित्रपट पहायचा आहे. चित्रपट पाहून आल्यावर तो विशेष अस्वस्थ आणि तरीही खुषीत असे. त्याबद्दल तो तासन्‌तास बोलत राही. तसे हिंदीत

व्हायला पाहिजे म्हणे. त्याचे तांत्रिक सौंदर्य समजावून सांगे. त्यावरून त्याला भरास कल्पना सुचू लागत. तोच लेखक, दिग्दर्शक, छायाचित्रकार, संगीतदिग्दर्शक, नट, नटी, सारे काही होई. अनेकदा पहाट फटफटली तरी त्याचे बोलणे आणि माझे ऐकणे संपत नसे. दोनचार चित्रपट तयार होऊन राष्ट्रपतिपदकाला पात्र ठरत वा 'क्लिक' होत.

मग मात्र तो दोन दोन दिवस अबोलपणा धरू लागला. माझ्यावर ऊठबस चिडू, कातावू लागला. आणि एके दिवशी रात्रभर तसेच दुसऱ्या दिवशी सकाळीही माझ्या निघण्याच्या वेळेपर्यंत तो घरी आलाच नाही. मी रात्रभर जागाच होतो. पडल्या पडल्या त्याची वाट पहात होतो. पण तसा फिकिरीत नव्हतो. फार तर तो उशिरा येईल, थोडा जास्त उशिरा येईल, पहिल्या गाडीने येईल, कुठे असेल तिथे डोळा लागला असेल, त्यामुळे थोडा आणखी उशीर झाला असेल, असे म्हणत सकाळपर्यंत मी वेळ काढला. पण सकाळचे नऊ-साडेनऊ वाजले तरीही तो येईना तेव्हा माझे धाबे दणाणले. कामावर तर मला निघायलाच हवे होते. त्याला शोधू म्हटले तर त्याची नक्की अशी जागा नव्हती, त्याची बातमी कळेल असे ठिकाण, माणूस मला माहीत नव्हते. मला त्याने स्वतःविषयी किती घोर अज्ञानात ठेवले आहे त्याची कल्पना मला त्या वेळी आली. त्याच्यावर मी चिडलो, रुसलो, कातावलो, रडकुंडीला आलो आणि वाट पाहून अखेर कामावर गेलो.

रात्री धावतच मी घरी आलो तेव्हा फार तर साडेआठ वाजले असतील. प्रथम बंद दार पाहून वाटले, तो आलाच नाही. पाय गळाले. मन थिजले. पण मग कुलूप दिसले नाही तेव्हा जिवात जीव आला. मी दार वाजवले. दोनदा, तीनदा वाजवले. दिवा न लावताच त्याने येऊन ते उघडले. मी आत येण्याची वाट पहात तो अंधारात उभा राहिला. त्याने टॉवेल गुंडाळला होता. मी आत आलो, दिवा लावला. मग दार आतून लावून घेतले. तोवर तो गुपचूप मच्छरदाणीत जाऊन पडला होता.

मी दिवा लावला हे त्याला आवडले नसावे. पण तो गप्प होता.

जरा जास्तच सावकाशपणे मी कपडे बदलले. दिवा तसाच ठेवून आत जाऊन तोंड, हातपाय धुऊन आलो.

मच्छरदाणीत सारे चिडीचिप होते. पण तो झोपला नसावा एवढे मला सवयीने कळत होते. हात-पाय पुसले. तसाच जरा वेळ रेंगाळलो.

मच्छरदाणीत कूस बदलल्याचा आवाज झाला. अस्पष्ट उसासा उमटला. तो जागा होताच तर. मी मुद्दामच, हाताशी लागला तो टाइम्सचा अंक घेऊन तो वाचण्याचा बहाणा चालवला. मच्छरदाणीत फक्त श्वासोच्छ्वास ऐकू येत होता. तो झोपणार नाही याबद्दल माझी खात्री होती. मी दिवा काढावा ही त्याची उत्कट इच्छा मला कळत होती. मला त्याची मनःस्थिती कळत होती. नेहमीहून विशेष काही घडले असावे हे मला कळत होते. तरी पण त्याने मला दिला एवढा त्रास सकाळी द्यायला नको होता अशी माझी तक्रार होतीच. आठवणीने माझे पित्त चाळवले. मी मख्खपणे दिवा ठेवून बसलो.

त्याने काही प्रतिक्रिया दाखविण्याचीच मी वाट पहात होतो.

''तेवढा दिवा घालव.'' अखेर तो आतून म्हणाला.

तरीही मी बसून राहिलो. हूं की चूं केले नाही, वाचन चालवले.

त्याने कूस पालटली. चाळवाचाळव केली.

''मी काय म्हणतो ?'' त्याचा स्वर जरा गरम होता.

मच्छरदाणीत तो होता तिकडे मी एकदा पाहिले. पुन्हा वाचण्याचा बहाणा करीत राहिलो.

''रात्र फार झाली.'' जरा सौम्य सुरात मग तो म्हणाला.

''साडेआठ.'' टाइमपीस पाहात मी पुटपुटलो. दिवसाच केव्हा तरी तो येऊन असा पडला असावा हे मला समजले.

माझ्या पुटपुटण्यावर तो काही म्हणाला नाही.

''जेवून आलास ?'' बऱ्याच वेळाने त्याने विचारले. त्याच्या स्वरात स्पष्ट बदल होता, थकवा होता, वरमलेपणा होता.

''हो.'' मी म्हणालो.

''रात्री मीही चेंबूरला एका पार्टीला गेलो होतो.'' त्याने सूतोवाच केले. ''तिथे फार उशीर झाला. मग तिथेच झोपलो. सकाळी पुन्हा एक अॅपॉइंटमेंट होती मुंबईत; म्हणून परस्पर तिकडे गेलो.''

मी यावर काही म्हणेन, म्हणावे, म्हणून तो थांबला.

मी गप्प राहिलो.

''तू वाट पाहिली असशील.'' त्यानेच म्हटले. ''वेल, आय कुडण्ट हेल्प.''

तरीही मी गप्प राहिलो.

मी बोलतच नाही असे जरा वेळ पाहून अखेर तो आत उठून बसला. मच्छरदाणीची फट त्याने रुंद केली. माझ्याकडे पाहिले.

''माझ्या मनात तरी काही दुसरे नव्हते.'' तो म्हणाला, ''तुला त्रास द्यायची माझी बिलकूल इच्छा नव्हती.''

माझ्या अबोल्याने त्याला आता चांगलेच अस्वस्थ केले होते.

''दोनचार महत्त्वाची माणसे या पार्टीला येणार होती. त्यांच्याशी बोलणी व्हायची होती.'' तो म्हणाला. ''सी. पी. सी. आय. च्या डिस्ट्रिब्युशनसंबंधात ते इंटरेस्टेड होते. त्यांच्या होकारावर फार अवलंबून होते. प्रोड्यूसर म्हणाला, तू हवास. त्यामुळे टाळणेही अशक्य झाले. शेवटी या लोकांवर फार काही अवलंबून असते ना !''

आणि तरीही मी बोललो नाही तेव्हा त्याची सहनशक्ती संपली. तो उठला. पाणी पिण्याच्या, चुळा भरण्याच्या मिषाने आत जाऊन आला.

''काय वाचतो आहेस ?'' त्याने नेटाने विचारले.

''मी वाचत नाही.'' मी म्हणालो.

"मग काय करतो आहेस ?" त्याने पुन्हा विचारले. "वाचतोच आहेस."

"मी वाचत नाही." मी वर्तमानपत्र पुढे धरूनच पुन्हा म्हणालो.

"तू अलीकडे बराच गमत्या झाला आहेस." तो खोटे हसून म्हणाला. "इथे आल्यापासून तू बदललास."

"मी होतो तसाच आहे." मी फणकाऱ्याने बोललो.

"आज तू भांडायच्या मूडमध्ये दिसतोस." त्याच्या सुरात नरमाई होती.

"मी कोण भांडणार ? आणि कुणाशी भांडणार ?" मी म्हणालो.

"ते का ? माझ्याशी." तो म्हणाला. "मी चुकलो आहे ना. घडला खरा माझ्याकडून गुन्हा. आता शिक्षा भोगली पाहिजे."

"त्याबद्दल तुम्हांला वाईट वाटलेले नाही." मी म्हणालो.

"कशावरून म्हणतोस ?" त्याने विचारले.

"वाटले असते तर आता तरी तुम्ही खरे बोलला असतात."

आणि माझ्या शब्दांनी त्याची खोटी उभारी तत्काळ खचली असे दिसले. त्याचा चेहरा पडला. डोळे अधिकच किलकिले झाले. तरीही अवसान आणून तो म्हणाला,

"खरेच तर बोलतो आहे."

"साफ खोटे." मी उद्‌गारलो. "तुम्ही समजता तेवढा मी बच्चा नाही. तुम्ही रात्री पार्टीला गेला नव्हता हे मला माहीत आहे."

"माहीत आहे ?" त्याच्या नकळत त्याच्या तोंडून उद्‌गार निघून गेला. "कुठे गेलो होतो ?" त्याने अस्पष्ट विचारले मला हवे होते ते साधले होते. त्याच्या प्रश्नात उत्तराची अपेक्षा नव्हती आणि मलाही ते माहीत नव्हते.

आता तो चांगलाच बेचैन झाला होता. तो जागचा उठला. खोलीत इकडे-तिकडे फिरला. लाकडाच्या पेटीवर बसला. पुन्हा उठला. मुद्रेवर खळबळ दिसत होती. गोंडस, नाजूक बोटे फार अस्वस्थ होती.

"तुला कसे समजले ?" माझ्या पुढ्यात येऊन त्याने विचारले.

"न कळण्यासारखे काय उरले आहे ?" मी उलट विचारले.

"असे ? तेही खरेच..." तो वळत, फिरत पुटपुटला. तो आता एकसारखा फिरू लागला. खळबळ वाढत होती. काहीतरी आत कुठे तरी उसळत, उफाळत होते, फुटू पाहत होते. आणि तो एखाद्या अपुऱ्या धरणासारखा ते शर्थीने अडवू पहात होता. कपाळावर घाम डवरला होता. डोळे आणखीच खोल गेले होते. ओठावर ओठ रुतला होता. जिवणी स्फुरत होती. श्वास छातीत खोलपर्यंत पोचला होता.

"कशात काही अर्थ नाही." अखेर अनावरपणे तो म्हणाला, "सगळे झूट आहे. वाईट आहे—सगळे घाणेरडे आहे. अर्थ नाही."

एक फेरी मारून त्याने खुंटीवरच्या तुमानीच्या खिशातले एक पाकीट काढले. माझ्याकडे टाकले.

''वाच ते.'' तो म्हणाला.

''काय आहे हे ?'' मी विचारले.

''वाच. सगळेच कळले आहे तुला तर आता हेही कळू दे.'' तो उद्गारला.

पत्रावरचे मला दिसत होते ते हस्ताक्षर त्याच्या बायकोचेच होते.

''दुसऱ्याची पत्रे मी वाचत नसतो. तुम्हीच सांगा काय ते.'' मी म्हणालो.

''पंधरा दिवसांत मला तुमच्याकडे न्या नाही तर मी जीव देते असे म्हणते ती.'' तो म्हणाला.

''ती ? ती म्हणजे कोण ?'' मी अज्ञान पांघरून विचारले.

''आशा.'' त्याचा गळा भरला. ''माझी बायको. मी मुद्दामच तिला आणत नाही इकडे असे म्हणणे आहे तिचे. मी मजा करतो इथे असे तिला वाटते.''

''मग आणा त्यांना इथे.'' मी चटकन बोललो.

''ती तिकडें दुःख भोगते, खस्ता काढते, अपमान सहन करते नि मी इथे मजा करतो असे म्हटले आहे तिने.'' मी बोललो ते त्याने जणू ऐकलेच नव्हते. तो पुढे बोलतच होता. त्याच्या सुरात यातना होती. ''मला तिचा कंटाळा आला असे तिला वाटते. मला मुलांचाही कंटाळा आला असे म्हणते ती. मी पैसे पाठवत नाही—'' त्याने घसा साफ केला. ''तिला वाटते, मी मुद्दामच पैसे पाठवत नाही ! मला फिकीर नाही. मी वचने, आश्वासने विसरलो आहे. काय कृतघ्न बाई आहे !''

''तुम्ही त्यांना पैसे का पाठवीत नाही ?'' मी बुध्याच, नको ते विचारले.

''तसे नाही. मिळाले की पाठवतो.'' तो म्हणाला. ''माझे हाल करूनही पाठवतो. पण तिला ते कमी पडतात, पुरत नाहीत. तिला वाटते, मी इकडे चैन करतो. मी मजेत आहे—'' त्याला बोलताना चांगलेच प्रयास पडत होते. ''मी पत्र पाठवत नाही याचा अर्थ ती करते, मी तिला विसरलो. माझे प्रेम आटले. दुसरीकडे वळले. 'अशू फार आजारी आहे, आठवण करतो. या,' असे तिने कळवूनही मी जात नाही त्याचा अर्थ ती करते, मला मुलांबद्दलसुद्धा वाटत नाही. मला—मला काहीच वाटत नाही असे तिला वाटते.''

''पण ते साफ खोटे आहे.'' मी म्हणालो. ''मी साक्षी आहे ना. तुम्ही माझ्याकडे बोलता.''

''पण तिला असेच वाटते.'' तो तगमगत म्हणाला. ''आणि असे वाटले तर चुकीचे तरी काय आहे ? माझे खरे काय आहे ते तिला तिथे कसे कळणार ? तिला ते कोण समजावणार ?'' त्याच्या सुरात वेदना होती. ''तिचेही ठीकच आहे. ती तिकडे फार सोसते, कष्ट करते, एकटी सगळा भार वाहते. तिलाही फार त्रास होत असेल.''

''उद्या तुम्ही त्यांना पत्र लिहा,'' मी म्हटले, ''त्यात सर्व नीट लिहा.''

''काय लिहू ?'' त्याने जरा चिडून विचारले. ''सगळे सगळे पुन्हा पुन्हा लिहिले आहे. अगदी

कंटाळा येईतोवर लिहिले आहे. चीड येईतोवर लिहिले आहे. तिला खरे वाटत नाही इतक्यांदा लिहिले आहे. पुन्हा झाले तरी तेच लिहायचे ! पुन्हा झाले तरी थापाच मारायच्या, खोट्या गोष्टी लिहायच्या ! खोटे प्रेम करायचे ! मला त्याचा वीट आला आहे.''

''थापा का लिहायला हव्यात ?'' मी विचारले. ''खरे ते लिहावे. तुम्ही तर सांगता, तुमचे पिक्चर आता दोनचार दिवसांत सेटवर जाईल म्हणून. मग तसे लिहावे.''

''हे दोनचार दिवसच संपत नाहीत.'' तो उद्वेगभराने उद्गारला. ''पहिले दोनचार दिवस संपले की दुसरे येतात. चालूच राहतात. चालू तर आहेत. तुला काय सांगायला हवे ? त्यात अर्थ नाही. आज वर्ष झाले.'' त्याचा सूर घायाळ होता. विफल होता. मलाही तो स्पर्श करून गेला.

''प्रयत्न करूनही काम नाही. काम करावे तर पैसे नाहीत. पैसे हवेत म्हटले तर, मिळते ते कामही मिळत नाही. फुकटचे शब्द, फुकटचा देखावा. खोटी नाटके, थापा, फसवणूक. स्वतःचीसुद्धा. इथूनतिथून नुसते खेटे घालत राहायचे. वणवण भटकायचे. न जेवता भरल्या पोटाचे नाटक करायचे. सगळ्यांना—स्वतःलासुद्धा फसवत राहायचे किती दिवस ? जुने चेहरे ओळखी विसरतात. नवे कुणी जवळ उभे करीत नाहीत. सगळे दिवसेंदिवस हातचे निसटते आहे. गंज चढतो आहे. निकामी व्हायला होते आहे. आणि इलाज चालत नाही. चीड येते एकेकदा आपलीच, उबग येतो. पटते, पण नष्ट होता येत नाही. तेवढे बेफाम होता येत नाही, बेहोष होता येत नाही. फाटलेले वस्त्र शेवाशी अडकून टराटर फाटतच राहते—फाटतच राहते. काही केल्या सुटत नाही. असे वाटते की, एक हिसका आणि दोन तुकडे करावेत !'' त्याच्या मुद्रेवर क्रौर्य होते.

''आणि त्यात ही कृतघ्न बाई म्हणते तुम्हांला आमची फिकीर नाही ! तुम्हांला मुलांची फिकीर नाही ! तिला तिथे बसून बोलायला काय होते ? मला इथे काय सोसावे लागते ते तिला कसे कळणार ? आठवणींने मला किती मरायला होते, हे तिला काय कळणार ? तिला कसली कल्पना येणार ? देते आहे जीव तर देऊ दे ! बरे होईल. मुलांनाही बरोबर घे म्हणावे. सगळे जा. संपू दे एकदाचे सगळेच. खलास होऊ दे.''

''तुम्ही दुसरे काम का पहात नाही ?'' मी सांत्वनपर सुरात विचारले. ''इथे नाही तर दुसरीकडे काही करावे. किती तरी लाइनी पडल्या आहेत.''

''शहाणा आहेस !'' तो चित्कारला. ''फार कळते तुला ! दुसरे काही जमत नाही म्हणूनच या लायनीत राहिलो आहे ना मी ! काय आवडीने, हौसेने राहिलो आहे मी ! दुसरे काही मला कसे जमावे ? पंधरा वर्षे दुसरे काय केले मी ? काय शिकलो ? कसला विचार केला ? आर्टिस्टला दहा गोष्टी कशा जमतील ? सोनाराने दगड कसे फोडावेत ? पाथरवटाने पावा कसा वाजवावा ? जवाहिऱ्याने कोळशाचा धंदा कसा करावा ? हयातीचे श्रम काय फुकट ? हा ईश्वरी इच्छेचा शुद्ध अपमान आहे !''

मी म्हणालो, ''काही करून मुलांकडे तुम्हांला पाहिलेच पाहिजे. वर्षानंतर तरी आता लौकर तुमचे घर तुम्हांला मांडलेच पाहिजे. बायकोच्या भावना लक्षात घ्या. वर्ष म्हणजे त्या बिचारीला युग वाटले असेल —''

"आणि मला नाही वाटले ?" त्याने गुरगुरून विचारले. मग एकदम घायाळपणे तो म्हणाला, "पण मी असहाय होतो, मी दुबळा होतो. फरफटत होतो. ठरवूनही वळण बदलता येत नव्हते. मन वळत नव्हते. आशा सुटत नव्हती. वेडेपणा संपत नव्हता. तुला नाही समजायचे कसे ते. ते तसेच असते. आर्टिस्ट असेच असतात. त्यांना शाप असतो." एकाच वेळी त्याच्या मुद्रेवर कारुण्य होते, अभिमान होता. "ते तसेच असायचे." तो पुटपुटत होता.

"मग तुम्ही आता काय करणार ?" थोड्या वेळाने मी प्रश्न विचारला.

"काय करणार !" तो स्वतःशीच उद्‌गारला. "जोराचा प्रयत्न करणार. अजून माझा जोर कमी पडतो आहे, कुठे तरी चुकते आहे. कदाचित नशीब धड नसेल. कदाचित माझेच चुकत असेल. किंवा अजून प्रयत्न हवे असतील. मी ते करून पहाणार. आय मस्ट ट्राय हार्ड. नंतर काही बाकी राहता नये. मग रुखरूख नको की काही राहिले. एकदा शेवट तरी नीट दिसू दे."

"पण त्यांची तर जीव देण्याची धमकी—"

"धमक्या द्यायला काय जाते ?" त्याने मला अर्ध्यावरच कापले. "बायकांना वाटते, आपल्या नवऱ्याने पैसे मिळवावेत, आपल्याला पोसावे. बस्स ! बाकी काही करू नये. त्याने पैसे मिळवण्याचे यंत्र बनावे. कुत्रे कसे पुन्हा पुन्हा ससा पकडून मालकाच्या पायावर नेऊन टाकते ! नवरा म्हणजे त्यांना कुत्रा वाटतो."

"रात्री तुम्ही कुठे होतात ?" मी प्रश्न केला.

"चौपाटीवर." त्याचा सूर एकाएकी पडला. तो गोंधळलाच. गोंधळ सावरून म्हणाला, "या पत्राचा मला फार त्रास झाला. अतोनात त्रास झाला. कुणालाही होईल. चौपाटीवर पडून काढली रात्र. कुठे जावेसे वाटत नव्हते. काही करावेसे वाटत नव्हते. अगदी श्वास घेण्याची सुद्धा लाज वाटत होती. तुला माहीत नाही, पण माझ्या मुलांवर माझे फार फार प्रेम आहे. त्यांच्यासाठी मी जीव टाकीन. तीही फार गुणी आहेत. गुंड आहेत. पण मनाने सरळ आहेत. माझ्यावर जीव आहे त्यांचाही. इतके दिवस झाले, ती मला विसरली कशी नाहीत याचेच मला नवल वाटते. ती तिकडे शिकत कशी असतील, वाढत कशी असतील, कसले संस्कार घडत असतील त्यांच्यावर त्या खेड्यात..." तो गप्प झाला.

मीही गप्प बसून त्याला तसा पहात होतो.

मग एका आवेगाशी झुंजत तो म्हणाला, "असे वाटते की, घेऊन यावे त्यांना. करावे त्यासाठी काय हवे ते. दुसरे काही काम पहावे, अगदी चोऱ्या-दरोडे सुद्धा घालावेत ! पण तेही सोपे नाही. तेही वाटते तेवढे सोपे नाही, अवघड आहे. विचार करावा तेवढे ते दुष्कर वाटते, अशक्य वाटते. पुन्हा नव्या भिंतीवर पहिल्यापासून नवी धडक ! त्यापेक्षा आहे ही मुसंडी चालू ठेवणे काय वाईट ? आहे हा मूर्खपणा काय वाईट आहे ?"

असे तो एकसारखा परस्परविरुद्ध बोलत होता आणि पिटातल्या हपापलेल्या प्रेक्षकासारखा मी ते सारे नजरेने, कानांनी टिपून घेत होतो, आणखी मागत होतो. अखेर केव्हा तरी मध्येच थांबून, गप्प राहून तो मच्छरदाणीत शिरला. पडून उसासत, कूस बदलत राहिला.

मीही मग गादी पसरली. आडवा झालो. मला झोप केव्हा लागली ते कळले नाही. पण मध्ये जाग आली तेव्हा दिवा तसाच जळत होता आणि मच्छरदाणीत सारे शांत होते. दिवा घालवून मी पुन्हा झोपलो.

सकाळी मी जागा होण्याच्या आत तो त्याचे आवरून बाहेर निघून गेला होता. त्याने काही चिठ्ठी ठेवली आहे काय, म्हणून मी उगाचच इकडेतिकडे शोधले. त्याची थोडीफार चिंता, गंमत म्हणून, जिवाला लावून घेतली. दिवसभराच्या कामात ती विसरून गेलो. रात्री मी घरी गेलो तेव्हा दाराला कडी न लावता दिवा मालवून तो झोपून गेला होता. हेतू हा की मी त्याला उठवू नये. मीही त्याला उठवले नाही. त्यानंतर सकाळी रिवाजासारखे त्याने मला जागे करून आपल्या बनावटीचा चहा दिला. काहीच घडले नसल्यासारखा तो बोलला, वागला. त्याची मनःस्थिती सुधारलेली दिसत होती. बऱ्याच दिवसांनी, गावात लागलेल्या एका नव्या इंग्रजी चित्रपटाची शिफारस त्याने मला केली. त्या दिवशी संध्याकाळी आम्ही तो चित्रपट पाहिला. एकत्र जेवण केले. जोडीने घरी आलो. तो चांगलाच रंगात आला होता. हास्यविनोद करीत होता. निरर्थक बडबड करीत होता. मोठ्यांदा हसत होता. त्याही रात्री आम्ही जागलो. पण या बाष्कळ, किंचित तोल सुटलेल्या वागण्यात, मध्येच एकदा मी त्याला विचारले, "मग तुम्ही काय ठरवलेत ?" तेव्हा येणारे गांभीर्य घाईने झटकीत तो म्हणाला, "विचार चालू आहे."

रांगेने आठवडाभर त्यानंतर तो जवळपास असाच होता. बायकोच्या पत्राला उत्तर टाकले



होते की नाही, ते काय टाकले होते, ते कळण्याला मार्ग नव्हता. त्याला एवढे हलके कशाने वाटू लागले तेही कळत नव्हते. मी विचारावे आणि त्याने 'विचार चालू आहे' म्हणावे असे चाले. माझ्याशी तो एवढा बरोबरीने वागतो हे मलाही मोठे बरे वाटत होते; अभिमानाचे वाटत होते. एका रात्री आम्ही असेच बरेच जागलो. पहाटेला माझा डोळा लागला. सकाळी माझ्या डोळ्यांवर दाट झोप असतानाच त्याने मला हलवून जागे केले. त्याने कपडे केले होते. ''जातो'' असे काहीतरी तो म्हणाला. मी काही म्हणेन म्हणून किंचित वाट पाहून त्याने पाठ वळवली. मी परत झोपून गेलो.

उठल्यावर त्याची चिठ्ठी मिळाली.

प्रिय काशीनाथ,

मी बत्तिसशिराळ्यास मुलांकडे जात आहे. निर्णय घेतला आहेच. अखेरीची धडपड केली. डेड-लाइन संपली तेव्हा प्रतिकार थांबवला. ज्याला त्याला शेवटी त्याच्या ठरल्या मार्गाने गेलेच पाहिजे. त्यात सवलत नाही. मलाही नाही. प्रवासाच्या पैशांची सोय झालेली नाही. तुझ्याकडे मागणार होतो, पण ठरवले की नाही मागायचे. मागायचे तरी किती ? परत केव्हा येणार सांगत नाही, कदाचित येणारही नाही. आणि त्यात बिघडले काय ? अखेर अनंतकुमार म्हणजे अशोककुमार नव्हे, दिलीपकुमार नव्हे. अनंतकुमार म्हणजे अंत्या दंडवते. पाचवीत शाळा सोडलेला. खिशात चार आणे ठेवून मुंबईत पळून आलेला. सुतार म्हणून आयुष्याला आरंभ केलेला. एका शर्ट-पँटवरच भागवणारा. जमिनीवर झोपणारा, मिसळपावावर राहणारा. मध्यंतरी पंधरा वर्षे जो जगला तो अंत्या नव्हे, त्याचा दुष्मन. तो आता मेला आहे. फार त्रास देऊन मेला. स्वतःला, लोकांना. पण तडफडून मेला. आता तो पुन्हा कधी जिवंत होणे शक्य नाही.

माझे सामान असू दे. जागा तुझीच आहे. मालकांना तुझे १०० रु. दिले नाहीत. ते मीच खर्च केले. कुठे गेले तेही कळले नाहीत. तू १०० रु. दे. मी परत येणार म्हणून सांग. म्हणजे त्रास होणार नाही. शक्य झाले तर केव्हा तरी तुझे पैसे नक्की परत करीन.

माझी काळजी (आता तरी) करू नकोस.

शुभेच्छा.

अनंत दंडवते

या गोष्टीला आता पाच वर्षे उलटली. मी बराच प्रौढ झालो, जाणता झालो. घडले ते एका निश्चित दृष्टिकोनातून पाहू लागलो. अनंतकुमार ऊर्फ अनंत दंडवतेकडे माझे एकंदर येणे किती निघते त्याची नोंद माझ्याकडे आहे. अनंत दंडवते मात्र पुन्हा मला भेटलेला नाही, त्याचे पत्र मला आलेले नाही. त्याचे काय झाले हे मला कळण्याला दुसरा मार्ग नाही. त्याची ती जागा मला सोडावी लागली. ती कायद्याने मला मिळू शकत नव्हती. त्याचे सामान मी जागेत तसेच टाकले. मालकाने ते मला हलवू दिले नसते.

अशा तऱ्हेने ते प्रकरण तिथेच संपले तरी अनंतकुमार दंडवते माझ्या जाणिवेत कायमचा रुजून गेला आहे. केवढा तरी दांडगा आणि उंच. नजरेत पुरता मावत नाही, कानात सामावत नाही. रक्तामांसाने घडविलेले एक दगडी शिल्प. बारीक कुसर नसलेले, दगडाच्या मोठमोठ्या गठ्ठ्यांत साकार आणि सजीव झालेले. त्याच्या कोंज्या, किलकिल्या, पिवळट डोळ्यांत युगानुयुगे रडवेले राहून गेलेले एक छोटे अर्भक बसले आहे. कसली तरी वाट पहात. गंमत अशी की, या एवढ्या प्रचंड दगडी मूर्तीचे हात मात्र कमालीचे नाजूक, कोमल आणि गुलाबी आहेत. हे हात त्या, नजरेच्या कोनाड्यातल्या चिमुकल्या बाळाचे...

# बेडूक

आणि काही दिवसांपूर्वी जगन्नाथ दंडवते अगदी अवचित पुन्हा भेटला. कमालीचे अधू डोळे, जाड भिंगांचा चष्मा, तोळामासा प्रकृती आणि अबोल घुम्या स्वभाव या वैशिष्ट्यांमुळे शाळेत आम्ही जग्या दंडवत्याला विनोदाने 'खांडेकर' म्हणत असू. तो पुढे मोठा कादंबरीकार होणार याबद्दल आमची (त्याच्या रूपावरून आणि तब्बेतीवरून) खात्रीच होती. ज्याला मारामाऱ्या करता येत नाहीत, क्रिकेटमध्ये सेंचुऱ्या काढता येत नाहीत, सिनेमांत हिरो होता येत नाही किंवा मोठा पुढारीदेखील होणे जमत नाही तोच कादंबरीकार होत असतो, अशी आमची त्या वयात प्रामाणिक समजूत होती, आम्ही 'खांडेकर' म्हटलेले जग्याला सहन होत नसे; परंतु आपली नापसंती परिणामकारकपणे व्यक्त करण्याचे एकमेव साधन—ताकद—जवळ नसल्याने तो फक्त तांबडाबुंद होई; ओठ हिरवानिळा होईपर्यंत करकचून चावी; भिवयांच्या मधोमध आठी पाडून कावळ्यासारखा वाकड्या मानेने पाहू लागे. अशा वेळी जाड भिंगांआडचे त्याचे बटबटीत डोळे बेडकासारखे दिसत. तेदेखील पाहायला मला स्वतःला फार आवडत. त्याला मागून टप्पल मारून त्याची कान दुमडेपर्यंत दाबून घातलेली तपकिरी टोपी उडवणे हा माझा तेव्हाच्या आयुष्यातला अत्यंत आवडता छंद होता. अशी उडून ती त्याच्या डोळ्यापर्यंत आली किंवा डोक्याच्या पुढल्या भागावर बसली की जग्या भयंकर विनोदी दिसे.

बरोबरीच्या आडदांड मुलांच्या खोड्या काढणे आणि जग्याची खोडी काढणे, यात माझ्या दृष्टीने एक महत्त्वाचा फरक होता. इतर मुलांच्या खोडी काढणे ही माझी खुमखुमी होती, तर जग्याची खोडी काढणे ही चैन होती. उलट प्रतिकाराची तिळमात्र अपेक्षा जग्याकडून नसे. पण त्याचा पडलेला चेहरा आणि वटारलेले रडवे, बेडकासारखे डोळे पहाणे हा मी तेव्हा माझा जन्मसिद्ध

हक्क समजत असे. पुढेपुढे जग्याविषयी मला पुसट अनुकंपा वाटू लागली होती. फळ्यावरचे सारे डोळे ताणून, मान लांबवून पाहाण्याचे प्रयत्न करणारा जग्या, वहीला जवळजवळ नाक भिडवून आणि जिभेचा शेंडा बाहेर काढून डिक्टेशन लिहून घेणारा जग्या, अभ्यास न झाल्याबद्दल छडी खाताना कळवळून दोन्ही ओठ एकमेकांवर घट्ट दाबून, चिंब झालेल्या कावळ्यासारखा अंग आखडून थरथरत उभा राहाणारा जग्या, चष्म्याआत सदऱ्याचा सोगा खुपसून पुनःपुन्हा भरणारे अधू डोळे कोरडे करणारा—जग्याची हीच विविध रूपे मला पुढेपुढे जाणवू लागली होती. जग्या अतिशय मेहनती मुलगा होता. वर्गात जे जे शिकवले जाते, भोवती जे जे चालते, ते सारे समजावून घेण्यातली त्याची मनःपूर्वकता असामान्य होती. परंतु इतके असूनही जग्या सामान्य विद्यार्थी होता. त्याचा क्रमांक वर्गात दर परीक्षेत पहिल्या दहात असे; परंतु तो आठ, नऊ किंवा दहा एवढ्याच मर्यादेत. एकादाच तो सातवा आला तेव्हाचा जगूचा आंनद मला अंधूक आठवतो. कधी नव्हे ती त्याची कळाहीन मुद्रा तेव्हा उजळली होती आणि जिवणीवर चक्क स्मित विलसत होते. त्या वेळी तो वेगळा दिसला. परंतु पुन्हा एक नवा मुलगा आमच्या वर्गात आला. तो दिसायला तर स्मार्ट होताच. शिवाय कपड्यांपासून पुस्तकांपर्यंत त्याच्या सगळ्यात शिस्त होती. पायजम्याची इस्त्री मोडलेली किंवा शर्टाला जरा घडी पडलेली त्याला सहन होत नसे. केसांचा कोंबडा तो कटाक्षाने शाबूत राखी. जरा बिघडला क़ी खिशातून कंगवा काढून तो नीटनेटका करी. तो आला आणि पुन्हा जग्याचा नंबर आठवा गेला. पुन्हा केव्हाही तो मग आठाच्यावर सरकला नाही आणि मी शाळा सोडीपर्यंत जग्याच्या कळाहीन मुद्रेवर मी कधी पुन्हा स्मित बघितले नाही. वयाबरोबर वाढत होते ते त्याचे पोक. हनुवटीवर एकदोन केसही वाढले होते. घामाने ओठावरचा भाग चिंब झाला की तिथे मिसरूडदेखील स्पष्ट दिसे. आणि मग जाड भिंगाचा 'बेडूक' जग्या फारच जून, फारच केविलवाणा दिसे. कीव न वाटण्याइतका केविलवाणा. क्षुद्र आणि भकास. शेवटीशेवटी मी त्याची टिंगल करणे टाकले होते. अर्थात मीही तेव्हा जरा वाढलो होतोच.

पुढे पुण्याची ती शाळा सोडून कारणपरत्वे मी धुळ्याला आजोळी शिकायला गेलो, तेथल्याच हायस्कुलात मॅट्रिक होऊन युद्धकालात मुंबईत रेशनिंगमध्ये नोकरीला लागलो. युद्धानंतर ती नोकरी सुटली आणि मुंबईत मी टायपिंगचा छोटा क्लास चालू केला. मागे गंमत म्हणून मिळविलेली ही विद्या योगायोगाने अशी कामाला आली. क्लासचा व्याप हां हां म्हणता वाढत गेला आणि माझा क्लास बरा चालू लागला एवढेच विनयाने सांगतो.

आणि काही दिवसांपूर्वी जग्या दंडवते अगदी अवचित पुन्हा भेटला. कसा भेटला ? एरवी मी त्याला कदाचित ओळखला नसता, असा भेटला. मला 'आय-कर-भवना'त कामासाठी जायचे होते म्हणून मी टॅक्सी शोधीत होतो. एक एंगेज्ड टॅक्सी येऊन रस्त्याची कड पकडून उभी राहिली. रिकामी होत असेल तर देव पावला असे म्हणत मी ती घाईने गाठली. आणि खरेच, ती रिकामी होत होती. दरवाजा उघडून, आत बसल्याबसल्या गिऱ्हाईक पैसे चुकते करीत होते. पैसे चुकते करण्याला एवढा वेळ का, म्हणून मी जरा नाराजीनेच आत डोकावून पाहिले. गिऱ्हाईक जाड भिंगांच्या चष्म्याशी हात धरून हातातले पैसे न्याहाळीत होते. त्याची दृष्टी

कमालीची अधू होती.

आणि पट्दिशी स्मृतीची तार छेडली गेली तीच जगू दंडवतेची आठवण देत.

परंतु गिऱ्हाईक तर उंची सुटात होते. सेंटचा पुसट गंध नाकपुड्यांना त्याची सुस्थिती सांगत होता. त्याला बऱ्यापैकी टक्कल होते. अंगानेही तो माणूस जगूच्या मानाने उंच आणि पोटापुरता स्थूलही वाटला. पैशांचा हिशेब मिटताच तो टॅक्सीबाहेर येऊन सोनेरी फ्रेमच्या चष्म्याआडचे अधू डोळे मिचमिचवीत खांदे पाडून उभा राहिला. आणि तसा समोरासमोर तो वाकड्या मानेने उभा राहाताच मी कसे कोण जाणे, पण ओळखले की हा जगू दंडवतेच ! आणि मी विचारले, ''एक्सक्यूज मी, पण आपण मिस्टर दंडवते तर नाहीत ?''

त्याच्या निर्विकार मुद्रेवर क्षणभर थोडी चलबिचल झाली. मान जरा जास्त वाकडी झाली. जाड भिंगांआडचे वटारलेले डोळे आणखीच बटबटीत होऊन मला टवकारून पाहू लागले. आता ते किंचित व्यंगयुक्तदेखील वाटले. आम्हीच लहानपणी गंमत म्हणून दोन्ही बुबुळे नाकाशी आणून टरके पाहात असू त्याची काहीशी आठवण झाली. जगू एवढा हास्यास्पद नव्हता असे स्मरले.

''कोण आपण ?'' घोगरट दाटल्या स्वरात त्या जगूसदृश माणसाने मला चष्म्याच्या भिंगांत भरून घेत विचारले.

''ते सांगतो नंतर,'' मी अंगचोरपणे म्हणालो, ''पण आपण दंडवते की—''

जरा वेळ घेऊन तो उत्तरला, ''डॉ. जे.के. दंडवते. आपली ओळख आता कळू द्या.''

डॉक्टर दंडवते ! डॉक्टर ? जग्याने एवढी प्रगती केली ? बेडूक जग्याने ? माझी दांडीच उडाली. मला मनस्वी नवल वाटले. आनंदही वाटला.. आणि आत कुठेतरी थोडे टोचलेदेखील. अर्थात या टोचण्याचे स्वरूप पुसट—केवळ 'स् हाय्' करण्याइतकेच होते. मी एका टायपिंग क्लासचा प्रोप्रायटर असलो तरी साधा मॅट्रिक्युलेट होतो आणि जग्या बेडूक डॉक्टर झाला होता. डॉक्टर ! फारशी असूया वगैरे मला वाटली नाही; कारण डॉक्टर जग्यापेक्षा आजही निर्दोष, ठणठणीत दृष्टीच्या आणि प्रकृतीच्या मॅट्रिक्युलेट स्वतःला मी शतपटींनी भाग्यवान समजू शकत होतो.

मी माझी ओळख देताच जग्याच्या त्या निर्विकार, निर्जीव मुद्रेवर किंचित हालचाल झाली. भिवया आकुंचित करून पुन्हा एकवार मला नीट पाहण्याचा जारीचा प्रयत्न त्याने केला. त्याच्या जिवणीवर हळुहळू एक वाकडे स्मित झळकले.

''वृंदावन !'' तो पुटपुटला. ''ग्लॅड टु सी यू.''

मी टॅक्सी दिली सोडून आणि आम्ही दोघे मग नजीकच्या माझ्या घरीच गेलो. म्हणजे मीच त्याला जोराचा आग्रह करून नेले. काही कामाची सबब जग्याने पुटपुटून सांगितली; परंतु मी ती ऐकणार नव्हतो. घरी नेऊन आधी पत्नीशी आणि माझ्या एकुलत्या एका मुलीशी, सुनंदाशी, जगूची ओळख करून दिली. चहा घेता घेता आम्ही जुन्या आठवणी जाग्या केल्या. आणि बराच वेळ बोलत बसलो. जगू डॉक्टर झाला याचे आश्चर्य काही केल्या मला आवरत नव्हते.

पण मग प्रत्यक्ष बोलताना ते किंचित ओसरले. जगू म्हणाला, ''तुला सांगायला हरकत नाही. एकदा मी एम.बी.बी.एस्.ला नापास झालो. पुन्हा बसलो आणि नापास झालो. मला ते कधीच जमणे शक्य नाही हे लक्षात आले. पण इच्छा तर डॉक्टर होण्याचीच होती. फार होती. तेव्हा अखेर नसलेली पदवी लावून हैद्राबादकडे आडगावी दवाखाना उघडला. संधी मिळताच मुंबईच्या जवळ सरकलो. उपनगरात प्रॅक्टीस करू लागलो. एका विशिष्ट आजाराच्या बाबतीत लोक माझ्याकडे येऊ लागले. जम बसू लागला. सध्या मी वांद्ऱ्याला एका नर्सिंग होमच्या स्टाफवर काम करतो. बड्या लोकांचा डॉक्टर आहे मी.'' असे म्हणून सुनंदाकडे पाहून त्याने त्याचे ते पेटंट वाकडे स्मित केले. पण आता त्यात अंगच्या रडकेपणाबरोबर एक आत्मविश्वासही व्यक्त झालासे वाटले. माझा शाळुमित्र म्हणून सुनंदा त्याला एकसारखी चौकसपणे न्याहाळीत होती.

''पण तुझी अधू दृष्टी कशी काय चालली रे या लाइनला ?'' मी न राहावून विचारले.

''इच्छा असली की मार्ग सापडतो.'' तो पायातल्या बुटांकडे पाहात संथपणे उद्गारला. ''त्रास झाला; पण आता सवयीने कांही अडत नाही. म्हणजे माझे नेहमीचे काम आता मी अगदी डोळे झाकून करू शकतो. फार सोपे वाटते ते.''

''म्हणजे कसले काम ?'' मी चिकाटीने विचारले.

''ऑपरेशन्स.'' जगू म्हणाला.

''ऑपरेशन्स ?'' मला खरेच नवल वाटत होते.

''हो. मला करावी लागणारी ऑपरेशन्स तशी ठराविक प्रकारचीच असतात. बड्या लोकांच्या भानगडीही बड्या असतात.'' आणि पुन्हा तो वाकडे हसला.

इथे सुनंदाला मी घाईने आत पिटाळले. असले विषय तिने ऐकू नयेत म्हणून मी नेहमीच खबरदारी घेत आलो होतो. एका विशिष्ट प्रकारच्या संस्कारात तिला मी वाढविले होते.

''वेळेला फार घेत असशील, नाही तू ?'' सुनंदा गेल्यावर मी जरा हेव्यानेच हलक्या सुरात चौकशी केली.

''शक्यतेनुसार.'' जगू चष्मा काढून पुसत, सुनंदा गेली तिकडे भुंडे, अधू डोळे फाटेस्तोवर वटारीत पहात म्हणाला. ''कधी हजार. कधी दोनसुद्धा.''

''काय दोन हजार ?'' मी अक्षरशः थक्क होऊन विचारले.

जगू त्याचे वाकडे हसत म्हणाला, ''याहून मोठी भानगड अजून तरी माझ्यापर्यंत आलेली नाही.''

''तरीसुद्धा चांगले पैसे काढतोस की.'' मी न राहवून बोललोच.

''देवाच्या कृपेने.'' तो कुठेतरी पाहात म्हणाला. ''आणि तुझ्यासारख्यांच्या आशीर्वादाने.'' ही माझी चेष्टा की देवाची ते जगूच्या निर्विकार मुद्रेवर कळले नाही. इतके खरे की त्या भेटीत अखेरपर्यंत माझ्या मनातले आश्चर्य सारखे वाढतच होते. गर्भपाताची बेकायदा ऑपरेशने करणे जगूच्या अधू डोळ्यांनीदेखील त्याच्या हातचा मळ दिसत होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे,

दिवशी एक, कधी दोन तो सहज करी. क्वचित केस बिघडून दगावे; ती सर्वस्वी नर्सिंग होमची जिम्मेदारी होती. त्यासाठी स्वतंत्र कायदेशीर तरतूद केलेली होती. जगूचं काम ऑपरेशन करणे. त्याची महिन्याची सरासरी प्राप्ती दहा ते पंधरा हजाराच्या घरात होती.

आता त्याला जगू म्हणणे अर्थातच प्रशस्त नव्हते. प्रथम जगन्नाथ आणि बोलण्याच्या ओघात डॉक्टर म्हणू लागलो. त्याने माझ्याकडची सारी चौकशी केली. विशेषतः सुनंदावर त्याचा विशेष लोभ जडल्याचे दिसत होते. ती पोर होतीही चुणचुणीत, लोभस. या तुझ्या मुलीला खूप शिकव, मदत लागली तर मी करीन, असे तो म्हणाला. जाताना पुन्हा एकदा सुनंदाला समोर बोलावून घेऊन तो हेच म्हणाला.

जगन्नाथचे लग्नकार्य वगैरे झाले होते की नाही, तो राहात कुठे होता, त्याला मुलेबाळे होती की नव्हती, हे सारे या भेटीत मला कळू शकले नाही. यातले काहीच कळू शकले नाही. थोडेसे मी विचारले—कधी अडवून तर कधी आडून—पण त्याने पत्ता लागू दिला नाही. खोदून विचारणेही त्या पहिल्याच भेटीत बरे दिसले नसते. "पुन्हा येईन." असे तो जाताना म्हणाला.

जगन्नाथचा उद्योग सुनंदाकडून कळल्यावर घरात त्याच्याविषयी फारशी आपुलकी राहाणे शक्य नव्हते. "यापेक्षा जळ्ळे पोटात काटे भरलेले काय वाईट." असे ती फणकाऱ्याने वारंवार म्हणत होती. "पाहताक्षणीच मी ताडले की हा माणूस बरा नाही." असेदेखील तिने सांगून टाकले. सुनंदा जगन्नाथविषयी सारखी चौकशी करीत होती. आमच्या शालेय आयुष्याबद्दल मी तिला सांगितले—म्हणजे अर्थात जगन्नाथाचा आब त्यातल्या त्यात राखूनच. जगन्नाथाविषयी तिला बरेच वाटल्याचे दिसले. त्याला उद्देशून चांगली दोनतीनदा ती 'बिच्चारे' म्हणाली. त्याला 'काका' म्हणू लागली. मलाही, एका दैवायत्त दोषाविरुद्ध जगन्नाथने दिलेला जबरदस्त झगडा जणू प्रथमच अगदी नव्याने जाणवला होता. वर्गात चष्म्यावाटे डोळे फाडून प्रत्येक गोष्ट न्याहाळणारा, जाणून घेऊ पाहाणारा आणि असे करताना अत्यंत केविलवाणा दिसणारा अधू नजरेचा जगू आठवला. अशा जबर चिकाटीने, कष्टांनी, रात्रंदिवस धडपडून अगदी जिवाच्या कराराने त्याने मॅट्रिकची हद्द ओलांडली होती. कॉलेजची वर्षे घालवली होती, मेडिकलचा कोर्सदेखील पुरा केला होता. तो एम. बी. बी. एस. होऊ शकला नव्हता ही गोष्ट खरी; पण एक वाकडे वळण घेऊन त्याने लक्ष्मीदेखील पायाशी आणली होती. आणि ती तरी किती ! महिना पंधरा हजार ! अतिशयोक्ती म्हटली तरी दहा हजार तर खरे ! पदवी घेतलेल्यादेखील फार थोड्या डॉक्टरांना हे साधत असेल.

'पुन्हा येईन' असे तो म्हणाला होता खरे; परंतु त्या शब्दांना त्याच्यासारखा फार कामाचा माणूस जागेल, जागू शकेल, अशी माझी अपेक्षा नव्हती. परंतु तो आता आपण होऊन आला. मधूनमधून मग तो आमच्याकडे येऊ लागला. सौभाग्यवतीला त्याचे येणे पसंत नव्हते, तरी सवयीने तिचा विरोध आपोआप हळूहळू बोथटला. मधून कधीतरी तो उसळी घेई, तेवढाच. काही वेळा मी नसतानाही जगन्नाथ माझ्याकडे येऊन, बसून आणि सुनंदाबरोबर चार गप्पा करून जाई. "धंदा वाढवायचा असला तर बोल, मी इन्व्हेस्ट करतो." असे तो एकदा मला म्हणाला. आणखी एकदा "पैसे इन्व्हेस्ट करायला चांगलासा धंदा सांग." अशा स्वरूपात हीच

सूचना त्याने वेगळ्या शब्दांत माझ्यापुढे टाकली. परंतु का कोण जाणे, याचा फायदा घेण्याचे मनात येऊनही माझ्या तोंडून या प्रकारचे काही निघाले मात्र नाही. जगन्नाथच्या सूचनेवर आमच्यात काही क्षण एक विलक्षण चमत्कारिक स्तब्धता निर्माण होई आणि मग विषयांतर. त्यानंतर किंचित रुखरूख—माझ्या मनात. कारण धंदा वाढवावा असे मला वाटे. त्यात तो दुसऱ्याच्या भांडवलाने आयता वाढवता येण्यासारखा असल्यास काय वाईट होते ! आणि इतके असूनही जगन्नाथला मी हे सांगू शकत नव्हतो. कदाचित त्याच्या-माझ्या जुन्या संबंधांमुळे मला त्याच्या मदतीची अपेक्षा करणे कमीपणाचे वाटत असेल ! कोण जाणे.

डॉक्टर येई तेव्हा न चुकता बरोबर काहीतरी घेऊन येई. खाण्यासारखे असेल तर हाक मारून ते सुनंदाच्या स्वाधीन करून, सर्वांच्या वाट्याला येई त्यातले थोडेसे तो स्वतः उगीच तोंडात टाकल्यासारखे करी आणि भोवतालच्या कौतुकानेच पोट भरावे तसा बसे. खाण्यात त्याला रुचीच नसावी असे माझे मत बनले. कधी शोभेच्या किंवा उपयोगाच्या देखण्या वस्तू तो घेऊन येई. त्यातली प्रत्येक वस्तू चोखंदळ सौंदर्यदृष्टीने हजारातून वेचावी तशी असे; निदान तशी ती आमच्याकडे सर्वांना वाटे. प्रशंसोद्‌गार निघाले (यात मी आणि सुनंदाच काय, पण सुनंदाची आईदेखील सोत्साह काही वेळा सामील असे.) की तो मंद आणि वाकडे हसत म्हणे, "बरी वाटली म्हणून उचलली. असू दे इथेच. मी घेईन दुसरी." यावरचे 'नको'–'नको'चे आमचे आढेवेढे किती खोटे असत हे जणू कळत असल्यासारखा तो मंद हसण्यावारी घालवी. एकेक वस्तू ठेवून जाई. याने मी आणि सुनंदाबरोबर हळूहळू सौभाग्यवतीच्याही मनात स्वतःसाठी त्याने एक स्थान—तिच्या नकळत—पण निर्माण करून ठेवले. जागोजागी विराजमान झालेल्या या वस्तूंच्या रूपाने तो आमच्या घराचा एक कायम भाग बनत चालला. त्याच्या अपरोक्षही या वस्तू त्याचे कौतुक सांगत.

पण एकदा सुनंदा हातात तोंड लपवून तऱ्हेवाईक हसत हसत मला म्हणाली, "डॉक्टरकाका मोठे गमतीशीरच आहेत, नाही !" तिचे हसू एरवी असायचे तेवढे सरळ आणि मोकळे नव्हते.

"का ? काय झाले ?" मी विचारले.

"विशेष काही नाही." ती म्हणाली आणि गप्प राहिली.

"तरीपण—" मी आग्रह धरला. "काय केलेन त्याने असे आज ?"

"तुम्ही घरात नव्हतात." सुनंदा म्हणाली, "मी दुपारचा क्लास सोडला आणि तिथेच वाचीत बसून होते आणि काका आले. मी त्यांना इकडे आणू लागले तर म्हणाले, आता बसतो झाले, इथेच." ती पुन्हा ते चमत्कारिक हसू हसू लागली.

"मग काय झाले ?" मी म्हणालो, "तो आहेच जरा विक्षिप्त."

"हो तर काय," ती म्हणाली, "काका एकदम वेश्यांबद्दलच बोलू लागले."

"काय ?" मी दचकून उद्‌गारलो. खुंटीला लावायला घेतलेला कोट हातात तसाच राहिला.

"म्हणजे मी ऐकणार नव्हते." सुनंदा चटकन दिलगिरीवजा बोलली. "पण अय्या, ते मुळी मला उठूच देईनात आणि विषयही सोडीनात. मग ते त्या कसल्या रोगांवर आले."

मी हबकलोच. सुनंदाला तिथेच गप्प केली. याबद्दल विचार करू नकोस, असे तिला बजावले. "तू तरी बरी वेंधळ्यासारखी ऐकत राहिलीस" असे दूषण तिला सौम्य सुरात दिले; आणि तो विषय थांबला. पण तो विषय मानतून तसा जाणे शक्यच नव्हते. जगन्नाथला या प्रकरणी ऐकवलेच पाहिजे असे मनाने घेतले. एरवी मी घेतली ती खबरदारी, रचले होते ते बेत, करीत आलो होतो ते संस्कार, सारेच व्यर्थ ठरले असते. तेही केवळ भिडस्तपणापायी. तो भेटला तेव्हा मी म्हणालो, "सुनंदा ती केवढी आणि कसले भलते विषय काढलेस तू त्या दिवशी तिच्याकडे !"

"का ? त्यात काय झाले ?" त्याने भिंगांवाटे आपल्या बटबटीत डोळ्यांनी मला टवकारून पाहात विचारले, "तिच्या वयाला या गोष्टी वास्तविक मुलींना आधीच माहिती असल्या पाहिजेत. ही शास्त्रीय माहिती आहे. जीवनातील ही रोकडी सत्ये आहेत. मी म्हणतो, त्यांची आगाऊ माहिती आपण मुलींना देत नाही म्हणूनच त्या अनेकदा भलत्या अडचणीत येतात. परदेशांत असे नसते."

"परदेशांचे ठीक आहे." मी नाखुषीनेच म्हटले, "आपण हिंदुस्थानात राहतो. आणि तुझा हेतू मी अमान्य करीत नाही, पण काय आहे की अजून ती मुलगी—"

"अजून !" जगन्नाथ म्हणाला, "अजून म्हणजे आणखी किती वर्षे ? पंधरा ? वीस ? तीस ? पार म्हातारी झाली म्हणजे सांग तिला सारे. आणि मग सांगण्याची तरी गरज कशाला राहाणार आहे म्हणा ! तिचे तिलाच माहीत झालेले असेल—ते आणि आणखी पुष्कळ ! किंवा काहीच नसेल."

"काहीतरी बोलू नकोस." मी काहीसा वरमून पुटपुटलो, " ती लग्नाची होईल तेव्हा आपोआप कळेलच तिला जरूर तेवढे. आणि वेश्या, रोग, असले तिला न कळल्यामुळे तिचे थोडेफार नुकसान झाले तरी काही हरकत नाही. फार भावनाप्रधान आणि स्वप्नाळू मुलगी आहे ती. असल्या गोष्टी खऱ्या असतील, पण त्यांचा काय परिणाम होईल तिच्या संवेदनाक्षम, निष्पाप, कोवळ्या मनावर याचाही विचार तू करायला हवास."

"माणसाच्या निष्पापपणावर माझा विश्वास नाही." जगन्नाथ रुक्षपणे बोलला. "अज्ञान म्हणजे निष्पापपणा नव्हे.पण तुझे काय म्हणणे आहे ? मी असले काही पुन्हा तुझ्या मुलीकडे बोलायचे नाही ? मान्य. अखेर मुलगी तुझीच तर आहे." आणि वाकडे हसून त्याने तो विषयच संपवला.

त्याचे येणेजाणे मात्र चालूच राहिले.

एकदा तो माझ्याकडे आला तेव्हा क्लास चालू होता. चोरपावलांनी येऊन त्याने मला दारातून खुणावले. "बैस." म्हणून मी पुढ्यातली रिकामी खुर्ची दाखवली तेव्हा तो मनस्वी अवघडला. तो एकटाच मग दिवाणखान्यात जाऊन बसून राहिला. सुनंदा घरात नव्हती. क्लास संपवून मी गेलो तेव्हा जगन्नाथ खुर्चीत बसल्याजागीच शरीर आक्रसून अगदी गाढ झोपला होता. त्याचे तोंड उघडे पडले होते. लाळेची एक तार ओठांवाटे सुटली होती. कवड्यांसारखे डोळे अर्धवट उघडे होते. चष्मा नाकावरून एका बाजूला खाली सरकला होता. घशावाटे एक चमत्कारिक

आवाज येत होता. जगन्नाथ मेल्यासारखा दिसत आहे असे काहीतरी मला पाहाता पाहाता निसटते वाटून गेले आणि काळजात कुठे तरी धस्स झाले. त्याची श्वासोच्छ्वास करणारी चिंचोळी छातीदेखील मी लक्षपूर्वक न्याहाळून खात्री करून घेतली. थोड्या वेळाने त्याचा तो दचकून जागा झाला. कसाबसा भानावर येत सावरला. काहीतरी विचारले पाहिजे या कर्तव्यबुद्धीने ''कधी आलास ?'' म्हणून त्याने ओठातल्या ओठात मला विचारले.

''रात्री एखादी केस वगैरे आली होती वाटते ?'' मी अंदाजाने चौकशी केली.

''केस ? हां हां ! येस. रात्रभर जागरण घडले. त्यामुळे आत्ताच केव्हातरी झोप लागली.'' सुगंधी रुमालाने त्याने लाळेची तार निपटून रुमाल पुन्हा खिशात ठेवला. एक दबला उसासा सोडला. उजव्या तर्जनीने तो डोळ्यांखालची काळी सुरकुतली कातडी अर्थहीनपणे चोळीत राहिला.

''झोप चल वाटले तर थोडा, रीतसर पलंगावर.'' मी सुचवले.

खिशातून चुरगळलेली एक सिगरेट काढीत तो म्हणाला, ''थँक्स. असे काहीतरी म्हणशील असे वाटलेच होते मला. पण आता मला निघाले पाहिजे.''

''का रे ? आलास काय, झोपलास काय, निघतोस काय—''

त्याने त्याच्या जाड भिंगांआडून माझ्याकडे एकदा टवकारून पाहिले. त्याच्या बटबटीत डोळ्यांवर अजूनही कसलीतरी मनस्वी झापड दिसत होती. वर्षानुवर्षांचे जागरण असावे तसे ते डोळे दिसत होते. सिगारेटचे दोन दीर्घ झुरके मारून तो उठत एवढेच म्हणाला, ''निघतो मी.'' कदाचित सुनंदा घरी असती तर तिचा आग्रह त्याने मानला असता असे मला वाटले; पण ती नव्हती. शिथिल पडू पाहणारे सारे शरीर शर्थीने एकटवून तो उठला आणि गेला. त्याच्या मनात काहीतरी व्यथा खोलखोल रुतून राहिली असली पाहिजे हा माझा ग्रह बळावला. या व्यथेने तो आतल्या आत कळवळतो आहे, घुसमटतो आहे, या व्यथेमागे रात्रंदिवस फरफटतो आहे असे वाटले. ही व्यथा कोणती होती ? ते त्याचे त्यालाच ठाऊक. जगन्नाथविषयीची मनातली जुनी कणव पुन्हा एकवार काही काळ जागी झाली. एकंदरीने तो दुर्दैवीच; पदवी आणि संपत्तीसारखे लौकिक यश मिळूनही दुर्दैवी. अप्रत्यक्षपणे माझे सुदैव मला तेवढेच जास्त जाणवले आणि बरे वाटले.

बरेच दिवस मग त्याचा काही पत्ता नव्हता.

एके दिवशी तो आला आणि म्हणाला, ''आजचा दिवस फार घाणेरडा आहे. (बाहेर दिवस तर चांगला स्वच्छ आणि हवेशीर होता.) वुइल यू लाइक टु कम आउट वुइथ मी ? जरा भटकून येऊ.'' मग जरा थांबून तो म्हणाला, ''सुनंदाही येईल बरोबर.''

ही दुसरी सूचना मी कौशल्याने पण नेटाने डावलली. पहिली मात्र मान्य केली. मलाही असे काही त्या वेळी हवेच होते. ''जेवायला रात्री नाही'' असेच घरात सांगून मी जगन्नाथबरोबर बाहेर पडलो. टॅक्सी करून त्याने प्रथम नरीमन पॉइंटची वाट धरली. मग टॅक्सी फिरवून म्युझियमकडे काढली. त्यानंतर टॅक्सी सोडून आम्ही पायीच कुलाब्याच्या दिशेने निघालो.



त्याच्या मनात काय होते ते तो बोलत नव्हता. मीच बोलावे अशी त्याची अपेक्षा होती. मी बोलायचा थांबलो म्हणजेच एखादा प्रश्न विचारण्यापुरता तो संभाषणात भाग घेत होता. बाकी तो चालत होता. येणाऱ्याजाणाऱ्या प्रत्येक बाईकडे, तिच्या शरीराकडे त्याची ती चिकट, धुरकट टक लावून पाहात होता. आणि वेड्यासारखा पाय ओढीत आणखी वेगाने चालत होता. जणू स्वतःचीच फरफट काढण्याचे त्याने ठरवले होते. मला तो वेग झेपत नव्हता. चालण्याची, तेवढ्या वेगाने चालण्याची सवय तुटली होती. पण त्याला हटकावे, पुरे म्हणावे, परत फिरण्याचे बोलावे, हेही जमत नव्हते. वेड्यासारखा मी त्याच्याबरोबर, क्वचित त्याच्या मागोमाग चालत होतो. काहीतरी बोलत होतो. आणि त्याला गाठण्यासाठी माझा वेग वाढवीत होतो.

सूर्य मावळला. कुलाब्याची उंची वसती उजळून उठली. सगळे वेगळेच दिसू लागले. जगन्नाथ थांबला. त्याच्या जाड भिंगांआडच्या डोळ्यांत जणू आता कसलीतरी अमर्याद भूक वखवखून पेटली होती. चेहरा आक्रसला होता.

''वुइल यू ड्रिंक ?'' त्याने तुटकपणे कुठेतरी पाहात विचारले.

नाही म्हणायचे ओठावर आले होते; पण का कोण जाणे, तेही जमले नाही. मी काहीच म्हणालो नाही. पिणे तसे मला प्रसंगोपात्त नवे नव्हते. पुष्कळ दिवसांत तसा योग आला नव्हता. आणि हा कुठे नेणार, प्यायला म्हणून काय पुढे येणार आणि ते कितपत पेलेल या शंकांनी एकीकडे मनात खड्डा पडत होता.

माझ्या उत्तराची वाट न पाहाता मग पाय ओढीत जगन्नाथ एका गल्लीत शिरला. एका अंधाऱ्या, खिळखिळ्या कठड्याच्या जिन्याने आम्ही वर गेलो. जगन्नाथची पावले वेगाने पडत होती. एका मजल्यावरच्या कोपऱ्यातल्या खिस्ताव कुटुंबात आम्ही पोचलो. अंधाऱ्या जागेत एका पोक्त पोटुशी बाईने दिलेले घेतले. जगन्नाथने आणखी मागून घेतले. त्याचे प्रमाण पाहूनच

माझी शुद्ध हरपू पाहात होती आणि मुष्किलीने मी ती सावरत होतो. आता माझेही बोलणे संपुष्टात आले होते. तिथे कोणीच बोलत नव्हते.

''चालू शकशील ?'' जोरदार उचकी देत मध्येच जगन्नाथने विचारले.

मी अनिश्चितपणे 'हूं' केले; उभा राहू शकेन का या संभ्रमात.

हातातले संपवून तो उठू लागला; पण त्याचा तोल अचूक नव्हता. शरीर चांगलेच लटपटत होते.

त्याचा रंग पाहून मी म्हटले, ''तू जरा विश्रांती घे. मग जाऊ.'' मलाही ती थोडी हवीच होती.

''चल.'' तो सुटलेल्या पोटासकट शरीराचे सारे अष्टावक्र, हाडकुळे बोचके शर्थीने बांधून जागचा उठला. किंचित्काळ बराच डळमळला. खचतोसे वाटले पण तो डळमळत राहिला; अधांतरी तरंगावे तसा. ''चल.'' तो पुन्हा म्हणाला, ''जेवण घेऊ. आय ॲम हंग्री.''

अत्यंत प्रयासांनी मग तो चालू लागला. मी शहाणपणा म्हणून जरा मागून निघालो. त्या इमारतीबाहेर आम्ही आलो आणि तो एवढा सावरला की नंतर मलाच फार चढल्यासारखे वाटू लागले. कानशिले तापली होती. डोळे जडावले होते, जळत होते. डोके हलके झाले होते. बोलण्यासाठी ओठ शिवशिवत होते; पण शब्द फार झिंगले होते.

एका चिनी हॉटेलात आम्ही शिरलो. एका कोपऱ्यात जाऊन बसलो. आलेल्या वेटरकडे जगन्नाथने काहीतरी मागवले.

आता डोक्यावरच्या गरगरत्या पंख्याने शरीर तापल्या लोखंडावर कोणी पाणी घालावे तसे सुखावू लागले; विझू लागले. गरम कानशिले उतरू लागली. समोर आलेल्या चमचमीत पदार्थांनी जिभेला लाळ सुटली आणि भुकेले पोट सैल पडले. उगीच शुद्ध आणि तरतरी आल्यासारखी वाटू लागली. खाण्याची आणि बोलण्याची इच्छा होऊ लागली.

थोडेसे अन्न पोटात गेल्यावर वाचा ढिली सुटली.

''सेक्स—सेक्सबद्दल काय म्हणणे आहे तुझे ?'' पलीकडच्या कोपऱ्यात एक गोरी बाई नाकाला रुमाल लावून आवाज न करता स्फुंदत होती आणि एक गोरा पुरुष मख्खपणे खात होता ते पाहात मी जगन्नाथला विचारले.

''एक धंदा आहे.'' तो तोंडात घास ठेवून म्हणाला. ''करावा तसा. सम टाइम्स यु विन अँड सम टाइम्स...'' पुढले त्याने आविर्भावानेच दाखवले. मग पुन्हा काही सुचून काटा माझ्यावर रोखण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला, ''तुम्ही लग्न झालेले लोक तो वाण्यासारखा करता. आय मीन, दमडीदमडीनं तुम्ही नफा कराल. हरण्यातला जोष तुम्हांला कळणार नाही. जिंकण्यापेक्षा हा धंदा हरण्यात फार पुरुषार्थ आहे. आय मीन, त्याला हार्ट तेवढे बळकट हवे. हरणे सोपे नव्हे—सगळा डाव. जस्ट प्लेइंग टु लूज !''

तो जोरजोराने खात होता आणि बोलत होता. मग तो खाण्याचा थांबू लागला. नुसताच चघळू लागला. दातांत अडकलेले कण जिभेने ओढू, काढू लागला. त्याच्या चेहऱ्याची हालचाल वाढू लागली. डोळ्यांतला गढूळ बेडूकपणा पुन्हा उमळून येऊ लागला. मांसाचे तुकडे

काट्यात उचलणे त्याला जास्त जास्त अवघड जाऊ लागले. आसपासच्या उत्तेजक, झगझगीत वातावरणापासून तो भराभरा तुटू लागला.

''तुझे म्हणणे पटत नाही.'' एवढेच तोंडाशी आले ते मी बोलून टाकले. कोपऱ्यातली गोरी बाई आता नुसतीच हातातल्या नाजूक रुमालाकडे पाहात बसून होती आणि गोरा पुरुष मधूनमधून काहीतरी म्हणत होता आणि त्या म्हणण्याशी त्याचा काही संबंध नसल्यासारखा तिच्यापेक्षा इकडेतिकडेच पाहात होता.

''कळत नाही म्हण.'' जगन्नाथने कष्टपूर्वक मला दुरुस्त केले. ''कळत नाही. तुम्ही मॅरीड मराठी माणसे म्हणजे सेक्स जगून व्हर्जिन्स असता. यू डोंट नो सेक्स. माहीत नसताना एखाद्या वस्तूशी चाळा करावा तसे. तुम्हांला फक्त मुले होतात.''

''ही कुचेष्टा झाली.'' मी जमेल तितक्या जोराने म्हणालो. ''कशावरून माहीत नसते आम्हांला ? सगळे माहीत असते. निदान पुरेसे.''

''पुरेसे ?'' बेडूक जगन्नाथच्या गढूळ बटबटीत डोळ्यांत आता एक चमक दिसू लागली. त्याची मान आणखीच पुढे आली. जिवणी वाकडी होऊ लागली. मग हातातला काटा आवाज करून बशीत टाकून तो जरा ताठ बसण्याचा प्रयत्न करू लागला. ते त्याला जमत नव्हते. तो जास्तच खचला. नाकपुड्या फुगवीत तो बोलू लागला, ''पुरेसे ! पुरेसे म्हणजे किती ? गर्भाशयातली पोरे पावसातल्या गांडुळासारखी ओढून फेकून दिली आहेस कधी ? असे गांडुळासारखे फेकून देण्यासारखे एखादे पोर एखाद्या गर्भाशयात पाडले आहेस ? अशी नियमितपणे पोरे पाडतात लोक आणि फेकून देण्यासाठी आमच्याकडे येतात; कानातला मळ काढायला जावे तसे. असेच आपले एखादे पोर असावे, वाढावे, मोठे व्हावे, असे प्रत्येकालाच वाटत असेल; पण असे वाढणारे, बाहेर येऊन जगू शकेल, काही करू शकेल असे आपलेच पोर आपल्या या हातांनी कापले आहेस तू कधी ? निचरून टाकले आहेस ? कोणालाच माहीत नसताना—माहीत होणारही नाही. ते बिचारे स्वतःचे नशीब स्वतःच्या हाती घेण्याआधीच संपून गेले. आकार घेता घेता एखादा दुबळा बुडबुडा फुटावा तसे. बुडबुडे उठणारच असतात. फुटणारही असतात. तो एक व्यवहार असतो. पण आपला बुडबुडा फुटणे म्हणजे वेगळे असते. वेगळे आणि त्रास देणारे. कापता येते स्कालपेलनेही. पण वेदनेने कापून निघणे वेगळे असते. मग वाटते, आपले काहीच नसावे. उगीच जिवंतपणी मरण ! उगीच मेलेपणी जिवंतपणा...''

तो घशातल्या घशात रडके हसत होता. पण त्याचे डोळे जळत होते. कोपऱ्यातल्या गोऱ्या बाईचा हात आता गोऱ्या पुरुषाने काहीसा संकोचाने आपण न धरल्यासारखा हाती धरला होता आणि तो नुसताच तो दुसऱ्या हाताने हळूहळू थोपटीत होता. कुरवाळीत होता. ती पुतळीसारखी निश्चल, अधोमुख बसून होती. तिची निमुळती, भरीव मान तृप्तीने थरारत होती. दाबल्या आवेगाने आवंढे घशाखाली कष्टाने उतरत होते. जगन्नाथ बोलत होता—पाश्चात्य संगीताच्या धुंद लयीत त्याचे खाणे आता संपल्यासारखे होते.

''पुरेसे माहीत असते तुम्हांला ! पुरेसे म्हणजे अगदीच थोडे. पण तेवढेच सगळे समजता

तुम्ही. त्या जोरावर इतरांना शिकवायला बघता. अज्ञान म्हणजेच निष्पापपणा समजता. स्वतःची, इतरांची फसवणूक करता आणि एके दिवशी ती संपली म्हणजे अवघड जागी चरचरून चटका बसावा तसे कळवळता. तोंड दाबून वेदना गिळता. फक्त आणखी एक हाडामांसाचा दुबळा बुडबुडा कमी.''

कोपऱ्यातली गोरी बाई लगबगीने जागी होऊन उठण्याची तयारी करीत होती. गोरा पुरुष तिला मदत करीत होता. बाई मोठी बांधेसूद होती. तो पुरुषही तरुण आणि तगडा होता. जगन्नाथचे बोलणे आणि पाश्चात्य संगीताची लय चालूच होती. दोघे दारापर्यंत गेली. भरीव टीप मिळालेल्या चिनी वेटरने त्यांना प्रसन्न सलाम केला. दाराबाहेर पडून दोघांनी दोन दिशा पकडल्या...आणि...

''यू नो समथिंग ?'' जगन्नाथ लुकलुकत्या, फाटू पाहाणाऱ्या डोळ्यांनी मला चष्म्यावाटे गिळीत विचारीत होता. ''नो समथिंग, यू मिडल एजेड व्हर्जिन ?'' त्याच्या बेडूक मुद्रेवर रक्त साकळून आले होते. जबड्याची हाडे हलत होती. मला नीट गिळता यावे म्हणून तो पुढे कलला होता. ''तुझ्या निष्पाप पोरीला दिवस राहिले आहेत. शी इज कॅरिइंग, तुझी निष्पाप पोरगी ! हीः हीः हीः...शी ईज कॅरिइंग. काय म्हणतोस तू ?''

''अशक्य आहे !'' मी किंचाळलो. पण आवाज जेमतेम ऐकू यावा इतकाच उमटला.

''अशक्य माय फूट !'' जगन्नाथचे डोळे आता खोबणीतून बाहेर येण्यासाठी, माझा वेध घेण्यासाठी शिकस्तीने धडपडत होते. नव्हे, तेवढे डोळे म्हणजेच जगन्नाथ उरला होता. सारे काही म्हणजे ते डोळेच होते. जाड भिंगांनी वेढलेले, लालबुंद, फाटू पाहाणारे...''जा विचार सुनंदाला. विचार जा. पण मारू नकोस. चूक तिची नाही, चूक तुझी आहे. तू तिला अज्ञानात ठेवलेस. निष्पाप समजलास. तारुण्य कधीही निष्पाप नसतं. तूच तुझ्या पोरीचं नुकसान केलंस...''

पुढे यावर मी काय बोललो ते आठवत नाही. जगन्नाथचे ''वेळीच माझ्याकडे सगळे सोपव, आय विल सी टु इट—विदाउट एनी चार्ज ऑफ कोर्स'' हे निरोपाचे वाकडे हसत उच्चारलेले शब्द सांडसाच्या डागांसारखे पाठीवर घेऊन मी तिथून तिरमिरत निघून आलो.

त्यानंतर पुन्हा जगन्नाथला मी भेटलेलो नाही. एकदोनदा तो घरी आला; पण मी बोललो नाही. सुनंदाला त्याच्याकडे धाडले तेही तिच्या आईबरोबर; मी गेलो नाही.

या नव्या जगन्नाथशी माझा काहीएक संबंध नव्हता. मला माहीत होता तो बेडूक जग्या...पण कदाचित तोही नीटसा माहीत नव्हता...

# मित्रा

तेव्हाही ती वेगळीच होती.

आम्ही लहानपणी शिवाशिवी खेळलो होतो; एकमेकांच्या पाठीत रट्टे घातले होते. एकमेकांशी मारामारी केली होती. मी तिचा शेपटा करकचून ओढला होता आणि ती मला कडकडून चावली होती. पण ती केव्हाही रडल्याचं मला आठवत नाही. आम्हा मुलांच्यात क्रिकेट, हुतुतू खेळायला ती येई आणि आम्ही तिला मुलगी म्हणून घेत नसू. अशा वेळी ती पुष्कळ चिडे, शरीरात मावत नसे एवढा राग तिला येई, दातओठ खाऊन ती मला दोन्ही हातांनी मारीदेखील; पण उलट मार खाताना रडत नसे.

त्याला आता फार दिवस, फार वर्षं झाली. त्या वेळी निरागस अजाणतेपणी केलेलं, घडलेलं ते सारं आता एका वेगळ्याच प्रकाशात पाहून होतं.

ती वेगळी होती.

तिच्या मनगटांत पुरुषी जोर होता. तिचे राग, लोभ, सारे पुरुषी होते. तिचे डोळे तेव्हाही निर्भय, धीट, बेडर वाटत. जिवणीचं आणि हनुवटीचं वळण पुरुषी होतं, त्यात नाजुकपणाच नव्हता. हळवेपणा नव्हता.

बालपणी तुटलेली आमची ओळख कॉलेजात पुन्हा जोडून घेतली गेली. आता ती थोराड वाढली होती आणि माझ्या डोक्यावरचे केस अकाली विरळ झाले होते. ती बी. एस्सी. करीत होती आणि मी कोल्हापूरहून येऊन सीनिअर बी. ए. ला दाखल झालो होतो. कॉलेजच्या अनेक ॲक्टिव्हिटीजमध्ये तिचा पुढाकार असे—मुलांच्याही पुढे ती असे—आणि बाजूने अंग

चोरून फिरणाऱ्या मला तिनं या रिंगणात सक्तीनं ओढलं, पाडलं आणि पुढे आम्ही बरोबरच अनेक कामांत वावरलो. कॉलेजमध्ये दाखल झाल्यानंतर काही दिवसांतच माझ्या लक्षात आलं होतं ते असं की तिला मैत्रिणी होत्या, पण एकही मित्र नव्हता. तिच्या मैत्रिणी निवडक होत्या. एखाद्या रसिक पुरुषानं निवड करावी तशा त्या एकजात सुंदर होत्या, नाजूक होत्या. बाहुलीवजा होत्या. मुलं त्यांच्यामागे नेहमी असत. त्यांतली एक—उर्मिला शहा—तर विशेषच सुंदर होती—ती तिच्या विशेष मर्जीतही असे. मुलींवर जीव टाकणारी ती पुरुषांना मात्र वाऱ्याला उभं राहू देत नव्हती. पुरुषाशी—आरंभाला काही दिवस माझ्याशीदेखील—बोलताना तिचे शब्द अधिकाधिक बोथट येत. सूर कोरडा होत जाई. नजर इतरत्र फिरत राही. ही रागानं बोलते की काय असंच वाटे. तुटकपणेच ती बोलणं संपवून चालू लागत असे. आणि हे सारं काही एकेकदा तिचा इलाज नसताना घडे. कारण निदान माझा स्नेह तरी तिला हवा होता. तसं तिनं अनेक प्रकारांनी दर्शवलं होतं. मला एक विशेष महत्त्व, किंमत देण्याची तिची इच्छा पहिल्यापासून दिसली होती. परंतु कशापुढे तरी ती अगतिक होई. ते काही तरी जणू तिचा ताबा घेत असे; तिला झपाटत असे. अशा वेळी तिच्या डोळ्यांत एक वेगळाच कठोरपणा, क्रौर्य, थिजलेपणा भासे. मला त्याचा अर्थ कळत नव्हता. तिच्याविषयी वाटत मात्र होतं—निर्भेळ विशुद्ध पण कुतूहलयुक्त असा स्नेह.

कॉलेजात तिच्यावर लांबून प्रेम करणारी दोन बड्या घरची मुलं मला आठवतात. ती तिची अक्षरशः मानसपूजा करीत, तिच्यासाठी झुरत. तिच्या दर्शनार्थ ताटकळण्यातही त्यांना धन्यता वाटे. तिचा एखादाच रुक्ष, पुरुषी शब्द त्यांना आनंद देई. त्यांतला एक तर चांगला क्रिकेटर होता. पण त्यांना विचारात घ्यावं असं तिला कधी वाटलं नाही. तिच्या दैनंदिन वा सर्वसाधारण आयुष्यक्रमात त्यांच्या येण्यानं वा जाण्यानं काडीमात्र फरक पडला नाही. त्यांच्याविषयी अनुकंपा, चीड, तिरस्कार किंवा काहीच तिच्या मनात फारशा प्रकर्षानं कधी आढळलं नाही. त्यांतला एक पुढे चांगला बॅरिस्टर झाला आणि दुसरा पुण्यातून निघून गेला. माहीतगार लोक याच्या संबंधात तिचा उल्लेख करून बोलत. परंतु तिच्या बाजूने मुळातच काही नव्हतं.

तसं म्हटलं तर आम्हा दोघांच्या बाबतीतही पुढं पुढं बरंच बोललं-कुजबुजलं जाऊ लागलं होतं. उठणाऱ्या साऱ्या अफवा मला माहीत होत्या, तिला कळत होत्या. आणि आमच्यापैकी कुणालाच त्याविषयी फारसं काही वाटलं नव्हतं. आमचा स्नेह दाट होता, नेहमीहून जरा वेगळा होता, इतरांच्या दृष्टीनं विचित्रही ठरण्याजोगा होता. तो नक्की कसा होता हे मला नीटसं समजत नव्हतं; पण ते समजून घेण्याची मला घाईही नव्हती. अद्याप एखाद्या वेळी ती माझ्या पाठीत निःसंकोच धपका घाली. माझा हात ल्हानपणीसारखाच मोकळेपणानं हातात पकडून ठेवी. गर्दीत मला लगटून चालताना, बसताना तिला काहीच वाटत नसे. स्त्रीसुलभ हळुवारपणा, हेल, बायकी लाडिकपणा, त्या प्रकारचे शब्द-शब्दप्रयोग यांचा तर तिच्याकडे अभाव होताच, पण एका धिप्पाड पुरुषी व्यक्तिमत्त्वाचा भास तिच्या बोलण्यात प्रकर्षानं होई. आमचा स्नेह जमला त्या वर्षी मुलींच्या आग्रहावरून मुलींच्या 'सोन्याचा कळस' नाटकात तिने 'बाबा शिगवण'चं काम केलं. (त्याच नाटकात त्या वर्षी ऊर्मिला शहा बिजली होती.) आणि त्या

पुरुषी, रांगड्या पोषाखात ती तंतोतंत बाबा शिगवण दिसली, वाटली. नेहमी वागे, बोले त्याहून अकृत्रिम सहजपणे, आत्मविश्वासाने ती त्या भूमिकेत वागत, बोलत होती. तिचा त्या भूमिकेतला कळवळा पुरुषी, रुंद छातीचा होता, आणि ओघ अस्सल आणि मर्दानी होता. ''कोण ? मालक !!'' हा बाबा शिगवणच्या तोंडचा तिच्या कंठातून बाहेर पडलेला गडगडाटासारखा उद्‌गार अद्याप माझ्या कानात घुमतो आहे. त्या कामाबद्दल तिची पुष्कळ प्रशंसा झाली, आणि तीही त्यानंतर काही दिवस खुषीत होती. पण नाटकाच्या रात्रीचा एक प्रसंग माझ्या स्मरणात अद्याप ताजा राहिला आहे.

पहिला अंक संपला होता. मध्यंतरात मी तिला भेटायला, तिचं अभिनंदन करायला रंगपटात गेलो होतो. प्रथम ती कुठेच दिसली नाही. जास्त शोधता ती सेटमागल्या एका अडचणीच्या जागी, अंधारात, छातीवर हात बांधून एखाद्या पुतळ्यासारखी निश्चल उभी दिसली. मी जवळ गेलो तरीही ती हलली नाही, चळली नाही.

''काँग्रेच्युलेशन्स, मित्रा.'' मी अंदाजानं तिचा हात पकडीत म्हणालो, ''तुझं काम फार छान होतंय.''

''असं ?'' ती फारसा उत्साह न दर्शविता, विशेष न हलता, माझ्या हातातला हात सोडवून घेत म्हणाली, ''तुझ्या जवळची सिगरेट कर इकडं.''

मी गोंधळलो. अंधारात तिच्याकडे, तिच्या वृद्ध, मर्दानी रूपाकडे डोळे ताणून पाहू लागलो. मला याचा अर्थ कळला नाही.

''काय म्हणालीस ?'' मी विचारलं.

''सिगरेट—सिगरेट कर इकडं.'' ती म्हणाली, ''तू ओढतोस तो ब्रँड चालेल मला. पहातोस काय ?''

''मित्रा...'' मी वेड्यासारखा पुटपुटलो.

''गाढवा, स्टेजफ्राइटचा स्ट्रेन आलाय मला. त्यात ही थंडी. मला जरा गरम होऊ दे.'' ती मोठ्यानंच म्हणाली. इतकी की पलीकडून घाईनं जाणारा एक जण थबकून पाहू लागला.

मुकाट्यानं मी सिगरेट काढून दिली. मीच ती तिच्या इच्छेवरून शिलगावली. अद्याप मला आश्चर्य आवरत नव्हतं. ती संथपणे, छाती भरून त्या सिगरेटचे झुरके घेत उभी होती, अगदी नाकावाटे धूरदेखील सोडत होती. तिच्या पुरुषी गलमिश्यावाल्या रूपाला ते शोभत होतं. पण या रूपामागे मित्रा आहे हेच मला काही केल्या खरं वाटत नव्हतं.

''काय म्हणतोस ?'' तिनं बरेच झुरके घेतल्यावर विचारलं.

''तू सिगरेट ओढतेस ?'' मी विचारलं.

''असा, मी चोरी करीत असल्यासारखा पाहू नकोस !'' तिनं दटावलं. ''सिगरेट ओढण्यात काय वाईट आहे ? तू नाही ओढत ?''

''पण तू स्त्री आहेस !'' मी म्हणालो.

''नाही.'' ती गुरगुरली.

"असं कसं ?" मी तरीही, बथ्थडपणे विचारलं. "आता या पोषाखात, मेकपमध्ये आहेस ते सोड, एरवी—"

"एरवीसुद्धा नाही."

ती म्हणाली. मी चरकून गप्प राहिलो. समोर, वर्षानुवर्षं धूम्रपान करणाऱ्याच्या सफाईनं, सहजतेने ती सिगरेचा आस्वाद घेत होती.

"दुसरं काही बोल." ती मग म्हणाली.

मी काहीतरी बोललो. काय बोललो ते तेव्हा कळत नव्हतं, आताही आठवत नाही. दुसऱ्या अंकाची पहिली घंटा वाजली आणि 'मिस् देवस्थळी', 'मिस् देवस्थळी' अशी दबल्या आवाजातली हाकाटी चौफेर झाली. सिगरेट बाजूच्या फळकुटावर दाबून विझवीत आणि फेकीत मित्रा 'भेट पुन्हा' म्हणून निघून गेली.

ती जागा, तो प्रसंग, तेव्हाचं माझं बावळट ठरावं इतकं अनावर आश्चर्य, माझा वेंधळा गोंधळ अद्याप आठवतो. अद्याप किंचित आश्चर्य वाटतं. अनपेक्षितपणा संपला, केवळ आठवण उरली, तरी त्या भरदार, शुभ्र गलमिश्या, ते मोठे कल्ले, त्या उपऱ्या केसाळ भुवया, चेहऱ्यावरच्या त्या सुरकुत्यांच्या कृत्रिम रेघा, तो टिळा आणि या साऱ्यातून एकजीवपणे डोकावणारे, रोखून पहाणारे लालसर, निडर डोळे...तोंडातली तिरकी सिगरेट...

त्या प्रसंगानं तिच्याविषयीची माझी सारी जाणच हरपली, आणि काही दिवसांच्या गोंधळानंतर, अभ्यासानंतर एक नवी जाण तिथं हळूहळू उमटली. ही मात्र कायम टिकली.

सिगरेटच्या त्या प्रसंगानंतर आम्ही भेटतच राहिलो. असं म्हणता येईल (आणि म्हणतही) की, तिची आवडती मैत्रीण ऊर्मिला शहा तिच्याबरोबर नसे तेव्हा मीच तिच्याबरोबर असे. पुष्कळ बोलण्याची माझी सवय. ती मधून मधून भरीव, पुरुषी हुंकार देत ऐकत असे. क्वचित एखादा तुटक उद्गार, शब्द काढी. आणि क्वचित माझ्या एखाद्या बाष्कळ विनोदावर खूष होऊन मोठ्यांदा, कंठ भरून, गडगडून हसे. पण अशी ती क्वचित हसे. शक्य तो हसू दाबण्याचा प्रयत्न करी. अगदीच असह्य झालं तर म्हणे, "विन्या, बस्स ! फार करतोस तू तरी !"—आणि बळेच मग ती गंभीर होत असे. एकदाच माझ्या काही वात्रटपणावर ती मनमोकळी हसली होती. थांबावं कुठं हे न कळल्यासारखं तिला झालं होतं. ती वायू झाल्यासारखी हसतच राहिली होती. डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहिल्या होत्या, मुद्रा काळीनिळी पडली होती. तिला सक्तीनं आवरावं लागलं होतं. रंगाचा बेरंग झाला होता.

"मित्रा, तुझ्या हसण्याची मला भीती वाटू लागली आहे." मी तेव्हा म्हणालो होतो.

"मला पण." डोळ्यांतलं पाणी निपटीत ती म्हणाली होती.

एकाएकी आलेलं कमालीचं गांभीर्य घालवण्यासाठी प्रयत्नपूर्वक किंचित हसत, चेष्टेच्या सुरात मग मी म्हणालो होतो, "म्हणजे कशाची तरी भीती तुला वाटते तर !"

"पुष्कळ गोष्टींची." गंभीरपणे म्हणाली होती.

"माझी वाटते ?" मी चेष्टेचा सूर कायम ठेवीत विचारलं होतं.

"माझीच वाटते." ती म्हणाली होती. "मला माझी मनस्वी भीती वाटते. काय होणार माझं ?"

"मी सांगू ?" वाढणारं गांभीर्य कमी करण्याच्या अट्टाहासानं मी लटक्या गंभीरपणानं विचारलं होतं आणि पुढे म्हणालो होतो, "लग्न होणार."

"नाही होणार !" ती जवळ जवळ ओरडली होती. चवताळल्यासारखा तिचा सूर होता, मुद्रा होती. मी दचकलो इतके तिचे शब्द कडाडून आले. तिचा तिलाही त्यातला आकस्मिकपणा जाणवला असावा. जागची उठत ती म्हणाली होती, "चल, जाऊ या आपण. जाते मी आता."

पुढे पुढे, बोलताना विषयांचं किंवा स्त्री-पुरुष संभाषणातलं किमान अंतरही आमच्यात उरलं नव्हतं. वाटेल ते विषय मी मित्राकडे काढी. मुलींविषयी हवे ते प्रश्न तिला विचारी. वाह्यात कोट्या आणि विनोद करी. एकंदरीनं तिला हे आवडे. खूष होऊन ती ऐकत असे. कधी आपली काही भर घालीत असे. ऊर्मिला शहा आणि इतर सुंदर मैत्रिणींना आपण मनाला येईल तेव्हा आलिंगन देतो, त्यांचे गाल कुस्करतो, मुके घेतो हे तिनं अशाच एका खुषीत मला हिणवण्याकरता वर्णन करून सांगितलेलं. यावरचा माझा संकोचयुक्त चेहरा हेव्याचा आहे असा समज तिनं करून घेतला होता आणि ती जास्तच खूष झाली होती. याउलट पुरुषांबद्दल मी बोलू लागलो की ती उत्सुकतेनं ऐकत राही; पण त्याच वेळी अस्वस्थ होई, अंतर्मुख आणि अबोल होत असे. ते संभाषण संपलं तरी नंतर किती तरी काळ घुमी आणि बेचैन राही. अशा वेळी मोठ्या आजारीपणातून नुक्तं उठलेलं माणूस करपल्या ओठांवरून फिरवतं तशी ती ओठांवरून वारंवार जीभ फिरवी. तोंडाला कोरड, शोष पडावा तसे आंवढे गिळी. तिच्या मुद्रेवरचा रक्तिमा झरून ती फिक्कट होऊन जाई. एखाद्या विसळून घेतलेल्या कपासारखी ती रंगहीन, कळाहीन दिसू लागे. असं का हा प्रश्न मला पडे, पण आमच्यातल्या साऱ्या निःसंकोचपणानिशीही तो तिला विचारण्याचं धाडस मी बरेच दिवस केलं नव्हतं.

एके दिवशी संध्याकाळी, दिवेलागणीला, 'लकी'तल्या माझ्या ठराविक अड्ड्यावर, मित्रांच्या कड्यात तिनं मला येऊन गाठलं. मला खुणेनं बाजूला बोलावलं. ती मला म्हणाली, "फिरायला चल."

ती आज नेहमीची नव्हे हे मी तत्काळ, तिच्या सुरावरून, मुद्रेवरून जाणलं. चेहरा ओढला होता. केसांच्या बटा गालांवर ओघळल्या होत्या. ओठांशी वेदना होती. उलट काही न विचारता मित्राचा निरोप घेऊन मी निघालो. आम्ही सायकलींवरून मग लकडी पुलाच्या दिशेला लागलो.

"कुठं जाऊ या ?" मी विचारलं.

ती काही म्हणाली नाही. समोरून आलेल्या भरधाव लॉरीला तिनं इतकी निसटती बगल दिली की माझी छाती धडाडली. नेहमीहून बेकदरपणे ती आज सायकल चालवीत होती.

मीच मग डेक्कन जिमखान्याचं मैदान बसण्याकरिता योजलं आणि काही न विचारता, म्हणता, ती तिथवर माझ्याबरोबर आली. आम्ही मैदानात आलो. सायकली बाजूला टाकून एका बऱ्याशा जागी बसलो. भोवती काळोख पडला होता. जिमखान्याचे दिवे लागले होते.

हिरवळीवर सांडलेल्या त्यांच्या उजेडात माणसांच्या लांब, वेड्यावाकड्या सावल्या पुढेमागे हिंडत होत्या.

अद्याप ती काही बोलायला तयार नव्हती. दिव्याकडे दुर्लक्ष करून काळोख पहात होती.

"आज तुला काहीतरी झालंय." मी म्हणालो.

तिनं हुंकार दिला. तिची नजर अद्यापही माझी, उजेडाची दखल घ्यायला तयार नव्हती.

"काय झालंय ?" मी विचारलं.

"मी वेगळी आहे, विन्या." ती तुबंलेला आवेग एकदम बाहेर फुटावा तशी म्हणाली, "मी कुणाकुणासारखी नाही. माझं सगळंच फार विचित्र आहे, वाईट आहे, गलिच्छ आहे."

"पण झालंय काय ते तरी सांगशील ?' मी पुन्हा विचारलं.

"ऊर्मी अहमदाबादला जाणार." ती विलक्षण घायाळ सुरात उद्गारली.

"मग त्यात एवढं काय झालं, इतका त्रास करून घेण्यासारखं ?" मी विचारलं.

"तुला माहीत नाही." तिचा सूर रोषाचा होता. "ती नाही तर जगण्यात अर्थ नाही."

तिच्या मनःस्थितीची नीट कल्पना मला अद्यापही आली नव्हती.

"जगण्याचा अर्थ हल्ली फार स्वस्त झालेला दिसतो !" मी किंचित चेष्टेच्या सुरात म्हणालो.

"मला फार महाग पडतो आहे." ती यावर म्हणाली.

"परत येणार ना ती ?" मी आता मनापासून जरा गंभीर होत विचारलं.

"नाही. ती परत येणार नाही. तिचं लग्न होणार." ती म्हणाली.

"हॅत्तेरे ! मग वाईट काय आहे यात !" तिच्या दुःखाचं, विषादाचं आश्चर्य वाटून मी विचारलं.

"मला नाही पसंत ते !" ती उसळली. तिच्या सुरात कमालीचा त्वेष जाणवला, चीड जाणवली. हिला पसंत नाही ! ही कोण ? ऊर्मिलावर हिचा एवढा कसला अधिकार ? तिच्या शब्दांतला स्वामित्वाचा भास मला आवडला नाही, पटला नाही. किंचित्काल गप्प राहून मी विचारलं, "पण ऊर्मिलाला हे पसंत आहे की नाही ?"

तिच्या तोंडून तीव्र उद्वेगाचा एक उद्गार निघाला. ती म्हणाली, "मी ते तिला विचारलं नाही, पण तिला एवढा कणा असता तर काय हवं होतं ? बुळी आणि हळुबाई आहे ती. कुणीतरी ठरवलं आणि ती 'हो' म्हणाली. सांगतानासुद्धा लाजून लाल होते."

"म्हणजे तिला आवडलंय ते." मी उघड दिसणारा निष्कर्ष काढला.

"हो." तिचा सूर आक्रमक होता. "आवडलंय—"

"झालं तर मग !" मी विजयाच्या खुषीत उद्गारलो. "तुझ्या-माझ्या पसंतीचा आता यात काय सवाल ?"

"तुझ्या नाही, पण माझ्या आहे." ती ठासून म्हणाली. "वर्षभर आम्ही दोघी एकत्र राह्यलोय."

"मित्रा," मी लहान मुलाला समजवावं तशा सुरात तिला म्हणालो, "दुसऱ्या माणसाच्या आयुष्यावर हक्क सांगण्याला एवढं कारण पुरेसं होऊ शकत नाही."

"का नाही ?" तिनं उलट विचारलं.

मला तिचा प्रश्न आडमुठा आणि बालिश वाटला.

मी म्हणालो, "हे बघ, आता तुझी न् माझी मैत्री आहे. चांगली दाट आहे. लोक आपल्याबद्दल पुष्कळ बोलतात—"

"खोटं आहे ते." ती ताडदिशी म्हणाली.

"हो." मी, जरा चमकत म्हणालो, "पण समज, उद्या तुझं लग्न ठरलं—"

"नाही म्हणते ना !" ती ओरडली. सूर फाटला इतकी ओरडली. तिच्या डोळ्यांत एक विचित्र भाव चमकून गेला. मुद्रा वेडीवाकडी झाली. पुरुषी ओठ हिंस्रपणे विलग पडले, थरथरत राहिले.

मी अबोलच झालो. काय झालं हे मलाही समजलं नाही. जरा सावरत, वरवर शांत होत ती म्हणाली, "ते सोडून बोलत जा तू. मला ते बोललेलं आवडत नाही."

दुसरं काही त्या क्षणी तरी मला सुचत नव्हतं. मी गप्प राहिलो. आणि मध्येच, जायचं ठरवून तिनं सायकल उचलून उभी केली. ती जायलाच निघाली.

"मित्रा !" मी तिला रोखलं. "मित्रा, काही चूक झाली असेल माझ्याकडून तर त्याबद्दल माझ्यावर रागव, शिक्षा सांग. पण अशी कसलाच खुलासा न करता निघून जाऊ नकोस."

"चूक माझीच झाली." ती विषादाच्या स्वरात पुटपुटली. "पुन्हा भेटेन मी तुला—"

"पण आता काय ते मनमोकळेपणानं तू सांगितल्याशिवाय मी तुला सोडणार नाही." मी सत्याग्रह आरंभला. "अशीच गेलीस तर आपली मैत्री इथेच संपली."

ती अक्षरशः कुचंबली. घालू नये ते संकट, तो पेच मी तिला घातला होता आणि तो सोडवणं तिला फार अवघड झालं होतं. किंचित्काल तिच्या मनात एक तुमुल संघर्ष झाला. मग सायकल जमिनीवर दाणदिशी ढकलून देऊन ती पुन्हा माझ्या समोर येऊन बसली. "हं—ऐक एकदाचा." फणफणतच ती म्हणाली.

त्या दिवशी तिनं प्रथमच मला स्वतःबद्दल संगतवार, खरं आणि पुष्कळ ऐकवलं. कधी शब्द तिला प्राणांतिक यातना देत होता, तर केव्हा शब्दांचा अनावर ओघ तिच्या ओठावाटे तिच्या इच्छेविरुद्ध प्रकट होत होता. केव्हा पाठ केल्याप्रमाणे ती विमनस्कपणे बोलत होती, तर कधी तोंडून उमटत होतं त्यानं तीही थक्क होत, हादरत, कळवळत होती. समोर दूरवर बंगल्यांचे दिवे बंदराच्या दिव्यांसारखे लुकलुकत होते. लांबवरून माणसांच्या आणि वाहनांच्या आवाजांचा घुमारा तरळत आमच्यापर्यंत पोचत होता. भोवती काळोखाचा समुद्र अथांग वाटावा असा पसरला होता. आभाळात खूप चांदण्या क्षीणपणे चमचमत होत्या. पुढे बसलेली मित्रा मला बाह्याकृतीहून फारशी जास्त दिसत नव्हती. तिचे बांगड्या नसलेले भुंडे हात वारंवार पवित्रे बदलत होते. कुंकू नसलेला गोरटेला उभट पुरुषी चेहरा सारखा दिशा पालटत होता. तिची बैठक पुन्हा पुन्हा चाळवत होती. आणि शब्दांचा एक अनियमित स्रोत तिच्या तोंडून अखंडपणे बाहेर पडत होता.

वयाच्या चौदा-पंधराव्या वर्षापासून आपल्यातला वेगळेपणा तिला प्रथम जाणवू लागला होता. इतर मुलींशी तो मनोमन पडताळून पहाण्यात तिला सुरुवातीला कुतूहल वाटे, मौज वाटे—थोट्या अर्भकाला आपल्या हाताच्या थोटकाशी खेळताना वाटते तसली. पुढे यापोटीच हळूहळू एक काचणारी, महत्त्वाच्या क्षणी मागे रेटणारी, दडपणारी, गूढपणे कासावीस करणारी आणि प्रत्यही अधिकाधिक त्रासदायक होणारी मर्यादा तिला जाणवू लागली होती. दिवसगतीने या मर्यादेची दर क्षणी नवी रूपं घेऊन भेवडावणारी एक राक्षसी भिंत तयार झाली होती. आणि ही भलीमोठी, भयावहपणे वाढणारी भिंत, केव्हा तरी कोसळून चिरडून टाकण्याच्या अखंड धास्तीखाली तिला दाबून, तिच्या नैसर्गिक सुखांपासून, त्या सुखांच्या केवळ कल्पनांपासून, विचारांपासूनही पाशवीपणे तिला दूर ठेवीत आली होती, तडफडायला, चिडचिडायला लावीत आली होती. कासावीस करीत होती. एकीकडे अगतिक बनवून एका वेगळ्या, विचित्र आणि भयावहपणे सुखद अशा वाटेनं तिला पुढं रेटीत राहिली होती. रक्ताच्या माणसांनी भरलेल्या घरात मित्राची दारुण कुचंबणा झाली होती. एक पुरुषी, आडदांड, वेगळी मुलगी म्हणूनच घर तिला ओळखत होतं आणि त्याच्यापलीकडे तिच्या अवस्थेची किंचित अधिक जाणीव तिच्या आईला होती, परंतु त्याबाबत काही करण्याचं, बोलण्याचं तिच्या मनात येत नव्हतं. अशाच ओढघस्तीत मित्रा मॅट्रिक झाली आणि कॉलेजमध्ये नाव दाखल करताच तत्काळ, पहिल्या संधीला तिनं होस्टेलमधलं वास्तव्य पत्करलं. घरातला कोंडमारा इथं संपेल अशी तिची अपेक्षा होती आणि तसा तो संपलाही. लाजऱ्याबुजऱ्या, सुंदर, नखरेल, नाजूक मुलींच्या तिथल्या सहवासात तिला एकाएकी एक स्वस्थता वाटू लागली. ओढघस्त कमी झाली, ताण ढिला पडला, करकचून बसलेला काही पीळ सुटला. माद्यांच्या कळपात नर मिरवावा तशी मित्रा लेडीज हॉस्टेलमध्ये राहून वावरू लागली. एखाद्या पुरुषी चाळ्याचं, चुंबनाचं, आलिंगनाचं वा उद्‌गाराचं तिथं कुणालाच काही वाटत नव्हतं; किंबहुना स्वागत होत होतं. अशा वागण्यानं तिथं मंजुळ हास्याच्या लकेरी उठत, गुदगुल्या झाल्यागत उद्‌गार उमटत, आणि लटक्या लाडिक विरोधाची नाजूक फैर झडे. मित्राला हेही आवडलं होतं. पुरुषाचा वाराही तिथं नव्हता आणि एक प्रकारचं मुक्त स्वातंत्र्य तिथं होतं. काच होता तो बिनमहत्त्वाच्या काही गोष्टींतल्या शिस्तीचा, नियमितपणाचा. हा पुष्कळ सुसह्य होता. यातच ऊर्मिला शहा मित्राला रूम पार्टनर म्हणून आली. अत्यंत नाजूक, गोंडस, कश्मिरी कातडीच्या या रूपवान मुलीच्या स्नेहाळ सहवासात मित्रा विलक्षण सुखी झाली. नवख्या ऊर्मिलाचा तिनं येता क्षणी ताबाच घेतला, ध्यास घेतला. तिच्यावर भेटींचा आणि रुचिर शब्दांचा वर्षाव केला. जवळ जवळ अष्टौप्रहर तिला ती आपल्या सहवासात बाळगू लागली; तसा तिचा कटाक्ष राहू लागला. इतर कुणाला ती ऊर्मिलाच्या आसपास येऊ देत नव्हती. ऊर्मिलालाही तिच्या स्वतंत्र कारणांनी हे आवडलं. तिच्या नाजुकपणाला हे मानवलं. तीही कुणाच्या तरी आधारासाठी आसुसलेली मुलगी होती. दोघी जोडीने सर्वत्र वावरत. एकत्र जेवत. एका कपातला चहा, एका ग्लासातलं पाणी पीत. रात्री शेजारी एकमेकांच्या कुशीत झोपत. अशा वेळी मित्रा करी ते प्रेम ऊर्मिलाला आवडे. किंचित विचित्र

वाटूनही ती ते करून घेई, त्याला प्रतिसादही देई. प्रथम नावीन्य म्हणून आणि नंतर सवय म्हणून तिनं हे चालू ठेवलं.

आणि अशा वर्षभरानंतर आता ती लग्न करण्यासाठी कायमची अहमदाबादला जाणार होती. कधीच परत येणार नव्हती, मित्राला मिळणार नव्हती, मित्राच्या कुशीत झोपणार नव्हती. मित्राला हे मंजूर नव्हतं. असं होणं अपरिहार्य आहे हेच तिला मंजूर नव्हतं.

"अजब आहे." सारं ऐकून सुन्न होत, माझ्या नकळत मी म्हणालो.

"असेल." ती उलट, उद्दामपणे म्हणाली. "पण असं असू नये असं थोडंच आहे ?"

"हेच कायम टिकावं हा हट्ट तरी निदान असू नये." मी म्हटलं.

"तो काय म्हणून ?" तिनं प्रश्न टाकला.

"हे अनैसर्गिक, विचित्र, वाईट आहे म्हणून." मी म्हणालो.

"पण तेच कायम असेल तर ?" तिनं विचारलं.

"तरीही तेच." मी उत्तरलो. "तुझ्या बाबतीत हे एक वेळ कायम धरलं तरी ऊर्मिलासारख्या निष्पाप, सरळ वृत्तीच्या आणि चारचौघींसारख्या मुलीचं काय ?"

"मी तो विचार काय म्हणून करायचा ?"

मित्राचा सवाल उद्धट होता.

"आपल्या सुखाच्या विकृत कल्पनेनं आणि हव्यासानं तुझी सदसद्विवेकबुद्धी तू अद्याप मारली नसशील तर करायला हवास." माझं डोकं आता चढलं होतं.

"बाजूला राहून तुला ही सदसद्विवेकबुद्धी सुचणं साहजिक आहे." मित्रा कमालीच्या कुत्सितपणे म्हणाली. "परिस्थितीची कल्पना तुम्ही लोक नेहमीच चार हात दूर राहून करता. वर उपदेश करता, सल्ला देता, टर्रेबाजीसुद्धा करता."

"टर्रेबाजी करीत नाही." काहीसा वरमून मी पुटपुटलो. "मी फक्त, मला काय वाटतं ते बोलतो आहे. नको असेल तर नाही बोलत." हात बांधून मी गप्प बसलो.

तिचाही पारा जरा उतरला.

"तुला—तुला कल्पना नाही विन्या," ती बऱ्याच सौम्य, जवळ जवळ मृदू सुरात म्हणाली, "मी तिची खूप काळजी घेते. एखाद्या नाजूक फुलासारखी तिला जपते, खुलवते. तिच्याबद्दल मला फार वाटतं आणि ती माझं सारं आवडीनं करते. एखादी बायकोही नवऱ्याचं इतकं करणार नाही."

मला आता उबग आली होती. कसाबसा मी म्हणालो, "तू म्हणतेस त्यावर माझा विश्वास आहे मित्रा. पण ते मला पटत नाही, पटणं शक्य नाही. मला त्याची कल्पनाच करता येत नाही. वाटलं तर मला गाढव म्हण. बुद्दू म्हण. मी आहे हा असा आहे. तू सांगितलंस त्यानं मला फार मोठा धक्का बसला आहे. मला विचारही करवत नाही. या वेळी मला क्षमा कर. मला जाऊ दे."

''मला वाटलंच होतं.'' ती माझ्याकडे पहात, धुमसत उदगारली. ''म्हणून तर टाळत होते सांगणं. पण तूच सारं मागितलंस. आणि आता अंगचोरपणा करतो आहेस. तू भ्याड आहेस.''

मी यावर चकार शब्दही बोललो नाही.

''मला तुझ्या आधाराची जरूर नाही.'' तीच पुढे कटू शब्दांत म्हणाली. ''मला कुणाच्याच आधाराची जरूर नाही, मदतीची नाही. सल्ल्याची आणि उपदेशाची तर नाहीच नाही. मी समर्थ आहे सगळ्याला. तू खुशाल रहा एका बाजूला कोरड्या अंगानं. मग तर झालं ?'' आणि मग एकाएकी रुष्ट, नाखूष सुरात तिनं विचारलं, ''पण मला तू कायमची तर तोडून टाकणार नाहीस ? आपली मैत्री रहायला तुझी हरकत आहे का ? तसं असलं तर तसं सांग. म्हणजे पुन्हा मी तुला भेटणार नाही. त्रास देणार नाही. तुझी चौकशीही करणार नाही. उगीच तुझी माझ्यासारख्या वाईट मुलीमुळे बदनामी व्हायला नको.''

मी विरघळायला तिचे एवढे रुष्ट, बोचक शब्द पुरेसे होते. मी म्हणालो, ''मित्रा, आपल्या मैत्रीचा यात बिलकूल संबंध नाही. ती आहे तशीच आहे. तुझ्याबद्दल मला सहानुभूतीही आहे. पण जे समजत नाही ते पटलं असं कसं म्हणू ? मात्र एकच विचारतो. तू कायमची अशीच रहाणार ?''

''उर्मीबरोबर.'' ती खंबीर शब्दांत उत्तरली. जागची उठून उभी राहिली. मला 'चल' म्हणाली.

त्या दिवशी—किंवा खरं तर रात्री—अधिक न बोलता आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.

त्यानंतर, प्रबळ अनिच्छा मोडून मी मित्राला पुन्हा भेटलो, हट्टानं वारंवार भेटत राहिलो. माझा विरोध, नापसंती मी सोडून दिली नाही तरी मनाच्या एका कपाटात कुलूपबंद करून ठेवली. आग्रहानं आमचे पूर्वीचे संबंध मी तसेच कायम राखले. मला मित्रा हवी होती, तिलाही मी हवा होतो. बाकी सर्व माझ्या दृष्टीनं दुय्यम महत्त्वाचं होतं. माझ्या बाजूनं बोलण्यात, वागण्यात येणारा दरेक अडसर, जाणवणारं काडीमात्र अंतर मी जिद्दीनं कापून, मोडून काढत होतो. आणि आनंदाची गोष्ट म्हणजे मित्राच्या बाजूनं मला सहकार्य मिळत होतं. त्या रात्री माझ्याकडे तिनं दाखवलेला मनमोकळेपणा तिनं आखडता घेण्याऐवजी तसाच चालू ठेवला. त्यात माझ्या मतपरिवर्तनाचा अट्टाहास नव्हता; साहाय्याची अपेक्षा नव्हती; औपचारिक दुजोऱ्याचीदेखील अपेक्षा नव्हती. मी विश्वासू आहे एवढं तिला माहीत होतं. आणि मन हलकं करण्यातलं सुख तिला कळलं होतं. ऊर्मिलेच्या नियोजित लग्नात आपण कसकसे अडथळे आणतो आहोत, ते घडू नये म्हणून हुशारीने कोणकोणते प्रयत्न करतो आहोत, ते तिनं माझ्याकडे सांगितलं. ऊर्मिलेची तिनं तिच्या या होऊ घातलेल्या लग्नाबद्दल ऊठ-बैस कठोर निर्भत्सना करणं आरंभलं होतं. लग्नाबद्दल तिच्या मनात भय वाढेल असं काही काही तरी तिला रोज रंगवून, सजवून सांगू लागली. ती तिच्यावर किरकोळ निमित्ताने चिडू, संतापू लागली. तिच्यापासून दूर झोपू लागली, तिच्याशिवाय फिरू-जेवू लागली. आणि हे सर्व का, हे तिला कळावं अशी सावध खबरदारी तिनं आपल्या प्रत्येक कृतीमागे घेतली होती. ऊर्मिलेनं अविवाहित राहायचं ठरवल्यास तिच्यासाठी आपण एखाद्या चांगल्या पगाराच्या ऐषआरामी नोकरीची, वाटल्यास आपल्या सोबत परदेशगमनाचीदेखील सोय करू शकू असं तिनं ऊर्मिलाच्या कानी नाना परींनी

घातलं. तिला मोह पडेल अशी स्वातंत्र्याची, श्रीमंतीची, परदेशांतल्या वास्तव्याची अत्यंत आकर्षक आणि अतिरिक्त चित्रं ती आपली सर्व कल्पनाशक्ती एकवटून तिच्यापुढे रंगवीत राहिली. तिला हेवा, मत्सर वाटावा म्हणून कदम आडनावाच्या एका कुरूप, वाह्यात मुलाशी तिनं मैत्री वाढवली. आणि एवढ्यानंही आपल्या मनासारखं होणार नाही असं पाहून मित्रा ऊर्मिलाच्या डायरीतला तिच्या भावी नवऱ्याचा पत्ता चोरून, त्याला पुरुषी शैलीत निनावी आणि बीभत्स पत्रं नियमितपणे पाठवू लागली. त्यांतली वर्णनंही तिनं मला ऐकवली. याचा काही ना काही परिणाम होईल अशी मला मनोमन भीती होती; परंतु मित्राला त्याची तिळमात्र खात्री वाटत नव्हती. दिवसगतीने ती जास्तच निकराला येत होती, अधिक काय करावं ते तिला समजत नव्हतं. आरंभाला असलेला प्रयत्नापोटचा उत्साहही पुढे उरला नाही आणि मित्रा पुन्हा बैचेन, भयाण, ओढलेली दिसू लगली. तिचे पुरुषी रुंद खांदे पडलेले दिसू लागले आणि डोळ्यांभोवती काळी वर्तुळं उमटली.

एक दिवशी बोलण्याच्या ओघात मध्येच तिनं मला विचारलं, ''विन्या, तू दारू कधी प्यायला आहेस ?''

मी तिचा रोख न कळून साभिमान उत्तरलो, ''हो. पुष्कळ वेळा. संधी मिळाली की सोडत नाही. बरं असतं..मन कसं हलकंफूल होतं.''

किंचित्काळ ती मुग्ध राहिली. मग म्हणाली, ''कुठं मिळते तुला ती ?''

''कशाला ?'' मी—जरा चमकूनच—विचारलं.

''आणखी कशाला ? मला हवी आहे ती.'' ती सरळच म्हणाली. तिच्या सुरात निश्चय आणि निर्विकारपणा होता. ''मला आणून दे.'' स्वस्थपणे पर्स खोलत ती म्हणाली. पर्समधून दहाच्या तीन नोटा काढून तिनं माझ्यापुढं धरल्या.

''तुझा विचार काय आहे, मित्रा ?'' पुष्कळ दिवसांनी माझा जुना हटकण्याचा सूर उमटला. माझाही त्याला इलाज नव्हता. ''तू दारू पिणार ?''

''मग काय अशीच रात्रंदिवस एकसारखी तडफडून कधीतरी कुत्र्याच्या मोतीनं मरून जाऊ ?'' तिनं तापल्या सुरात उलट विचारलं. ''तुझी तरी काय अपेक्षा आहे ?''

''दारूच्या नशेत आयुष्यातले महत्त्वाचे प्रश्न विसरू पहाणं हा शुद्ध पळपुटेपणा आहे.'' मी जोरानं म्हणालो.

''आणि आपण सगळे काय शूरवीर आहोत ?'' तिनं विचारलं. ''लढाया लढून धारातिर्थी देह ठेवण्याचा काय आपण मक्ता घेतला आहे ? तू घेतला आहेस हा मक्ता ? की मी घेतला आहे अशी तुझी आचरट समजूत आहे ?''

''माझी काही समजूत नाही—'' मी कोंडीतून आडमुठी पळवाट शोधू लागलो.

''गाढव आहेस !'' ती धुमसत्या शांतपणे म्हणाली. ''तू पुढारी व्हायला हवा होतास. छापील संदेश देऊन दुसऱ्याच्या सुखावर आणि आयुष्यावर फुकटची तिलांजली द्यायला तुला काही वाटत नाही. मी काय सोसते आहे त्याची तुला काय काळजी ? जगणं असह्य झालं आहे मला आणि मरणं आवडत नाही. एका भयंकर कात्रीत मी दिवसरात्र चिरडून, पिरगळून निघते आहे.

एकाच वेळी मी सीमेची दुष्ट होते आणि फार फार दीनही असते. मी बेदरकार होते आणि त्याच वेळी चिंतेनं उरी पिचत असते. आरडून ओरडून कशाचा तरी पुरा विध्वंस करावा ही तिडीक मस्तकात असतानाच कंठातलं कोंडलं रडू वाट मागत कोरडा आक्रोश करीत रहातं. धाय मोकलून रडावंसं वाटतं आणि त्याच वेळी ऊर्मीचा कुस्करून कुस्करून चोळामोळा करावा असा आंधळा त्वेष चढतो. आणि मी काहीच करू शकत नाही. नुसतं सोसणं, स्वतःला ओरबाडून ओरबाडून रक्तबंबाळ करणं, घुसमटणं, तगमगणं. मरणप्राय ! त्यापेक्षा भयंकर ! आणि तू मला पळपुटेपणा कशाला म्हणतात ते सांगतोस !''

यावर मी काय बोलणार ?

''रोज उठते आणि हे सारं मी नव्यानं सोसते. हे संपतच नाही. हे का, याला उत्तर नाही. मी अशीच, एवढंच उत्तर. ऊर्मीचा नवरा इथं का यावा याला काय आहे तुझ्याकडे उत्तर ?''

मी चमकलो. ऊर्मीचा भावी नवरा इथं आला होता हे मला नव्यानं कळत होतं.

''तो आला आहे इथं.'' ती सांगत होती. ''त्याच्यावर कसला परिणाम झालेला दिसत नाही. तो तिला रोज भेटतो. तिला बाहेर नेतो. दोन दोन, तीन तीन तास परत आणत नाही. काल रात्री दहा वाजले. तिचं लग्न व्हायचं आहे म्हणून रेक्टरही काही करीत नाही. मी ऊर्मीला विचारलं तर ती कसला खुलासा करीत नाही. उडवाउडवी करते. गप्प पडून राहते. काल मी तिच्या तोंडात मारली. तशी किंचाळून तिनं मला विचारलं, 'तू कोण मला मारणार ? माझा तुझा संबंध नाही' म्हणाली. मी तिला उगीच छळते, त्रास देते, मी दुष्ट आहे असं ती रात्रभर पुन्हा पुन्हा म्हणत होती आणि रडत होती. सकाळीच तिनं, आपल्याला खोली बदलून मिळावी असं रेक्टरला जाऊन सांगितलं आहे.''

''कारणासकट ?'' मी जरा भयानंच विचारलं.

''तसं वाटत नाही.'' ती कसला तरी हिशेब करीत म्हणाली. ''रेक्टरच्या वागण्यात मला तसं दिसलं नाही. मीही मुद्दाम गेले होते नंतर काहीतरी कारण काढून. पण तिला खोली बदलून मिळणार.'' आता तिचा सूर कमालीचा कावेबाज, अगदी पाताळयंत्री वाटत होता. ''माझ्या खोलीत बहुतेक मीरचंदानी येईल. ती निर्लज्ज, मिशीवाली, बेढब मुलगी. अंगाला दुर्गंधी मारणारी. पण मी तिला घालवून लावीन. ते सोपं आहे.''

थोडा वेळ, कसला तरी कट रचावा तशी ती मुग्ध, एकाग्र, अंतर्मुख बसून होती.

''मग काय ?'' तिनं एकदम मला हटकलं. ''तू दारू नाही आणून देत ?'' तिच्या सुरात रोखठोकपणा होता. अपेक्षा नव्हती.

''अग माझा काही तो रोजचा उद्योग नव्हे.'' मी जरा हलक्या सुरात, समजावणीच्या आविर्भावात म्हणालो. ''कुठं कधी सहजी मिळाली तर घेतो, इतकंच.''

''ठीक आहे.'' तिनं नोटा पर्समध्ये कोंबल्या. मी कुणी परका असावा तसा आपादमस्तक ती मला पुन्हा पुन्हा न्याहाळीत राहिली. तिचे काळ्या वर्तुळांतले थिजले डोळे लुकलुकत होते. अंदाज घेत होते.

"माझं दुसरं एक काम कर." ती म्हणाली.

"कुठलं ?" मी विचारलं,

"करशील का ? की मला उपदेशाच्या चार गोष्टी सुनावशील ?" तिचा सूर अधिकाराचा, वर्चस्वाचा होता.

मी काहीच म्हणालो नाही.

"ऊर्मी आणि तिचा तो कुठं जातात, काय करतात ते तू शोधून काढ." ती मला सांगू लागली. "आणि मला तिथं ने."

"कशाकरता ?" मी विचारलं.

"ने आणि पहा." ती चमकत्या डोळ्यांनी, फुलल्या नाकपुड्यांनी म्हणाली. तिचा श्वास जोरजोरानं चालला होता.

"नाही !" स्वतःवरचा ताबा सुटून मी बोललो.

"काय म्हटलंस ?" तिचे डोळे किलकिले झाले. "पुन्हा म्हण—"

"मला असलं काही सांगू नकोस. मी हे करणार नाही. मला याच्याशी कर्तव्य नाही. हे वाईट आहे." मी भराभर सुचेल ते वेड्यासारखा भकत गेलो. "तूही हे करू नकोस, मित्रा. आपण कोण आणि हे काय बोलतो ! हे काय करतो ! मला लाज वाटते. मित्रा, तुझी लाज वाटते. आपण पागल आहोत—ठार पागल !"

"तू पागल आहेस..." ती ओठातल्या ओठात पुटपुटली, "तू भेकड आहेस. षंढ आहेस..."
माझा निरोप न घेता ती निघून गेली. आणि कसाबसा खोलीवर पोचून मी खूप रडलो. घसा, तोंड, डोळे दुखेस्तोवर रडलो. वेड्यासारखा रडलो. मित्राला पुन्हा भेटायचं नाही. कधीही भेटायचं नाही असं मी त्या रात्री ठरवून टाकलं. ईश्वराला साक्ष ठेवून हा निर्धार पक्का केला.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्या खोलीवर लेडीज होस्टेलचा प्यून हजर झाला. "रेक्टरबाईंनी बोलावलंय तुम्हांला. आताच्या आता चला." तो म्हणाला. "आहात तसेच चला. देवस्थळीबाईंनी रात्री झोपेच्या पुष्कळ गोळ्या घेतल्या. इस्पितळात हलवलंय त्यांना. तुम्हांला बोलावलंय काही विचारण्याकरता."

माझे पाय गळले, डोकं भरभरलं, मला ब्रह्मांड आठवलं. पण यालाही अर्थ नव्हता. कशालाच अर्थ नव्हता. मी तसाच त्याच्या मागून रेक्टरकडे गेलो. तिथं आणखीही एकदोन परिचित चेहरे होते. एक अपरिचित होता. त्या सर्वांनी मला संशयानं वारंवार न्याहाळलं. रेक्टरनी अनेक उलटसुलट, वेडेवाकडे प्रश्न विचारले. खोदून खोदून चौकशी केली. माझ्यामुळं हे झालं असावं असा अरोपही सावधपणे ध्वनित केला. मी कोणताच खुलासा केला नाही. अनेक प्रश्नांना उत्तर देण्याचं नाकारलं. काहींना आडमुठी उत्तरं दिली. काहींना खोटी उत्तरं दिली. त्यांच्या आरोपाचा अव्हेर वा स्वीकार, काहीच केलं नाही. ऊर्मिलाकडून त्यांना बरंच समजू शकलं असतं. पण, तिच्या काही कारणांनी असेल, तिनं काही सांगितलेलं दिसत नव्हतं. अखेर मला जायला सांगण्यात आलं.

मित्रा होती त्या इस्पितळात मी गेलो नाही. जाऊन मी काय करणार होतो ? न राहवून मी फोन केला. तिची चौकशी केली. ती अद्याप शुद्धीत आली नव्हती आणि तिची प्रकृती चिंताजनक होती असं मला सांगण्यात आलं. उपाय चालू होते असंही कळलं.

वारंवार मी फोन केले. सुमारे सहा तासांनंतर मित्रा शुद्धीवर आल्याचं समजलं. मित्रा जगली. आता तिला भीती नाही असं फोनवरची नर्स म्हणाली. मनाला हलकं वाटलं. पण बरं वाटलं नाही. मी बेचैनच होतो.

इस्पितळात मित्राला भेटायला जाण्याचा विचार मी चुकूनसुद्धा मनात आणला नाही. आणि



बरी झाल्यावर ती तिच्या घरी जाणार असा माझा कयास होता तो बरोबर ठरला. ती घरी फार दिवस रहाणार नाही असा माझा पुढला कयास होता. ती मला भेटेल असा आणखी एक कयास होता. ती भेटली तर काय करायचं, ओळख द्यायची की नाही, बोलायचं की तोंड बांधून रहायचं, हसायचं की तोंड फिरवून निघून जायचं, ते ठरत नव्हतं. परीक्षा जवळ आली होती आणि अभ्यासात माझं बिलकूल लक्ष नव्हतं. कशातच नव्हतं. ऊर्मिला शहा तिच्या लग्नासाठी अहमदाबादला निघून गेली होती.

आणि मित्रा भेटली. कॉलेजच्या आवारात एक दिवशी समोरच आली. तिलाही ते अवघड झाल्याचं मला दिसलं. ती मला कमालीची कृश वाटली, जास्त जून वाटली, फिक्कट वाटली, कुरूप वाटली. तिच्या पाठीत चक्क पोक आलं होतं. दुर्दैव असं की त्या वेळी कॉलेजच्या आवारात फारसं कुणीच नव्हतं. एकमेकांकडे आम्ही दुर्लक्ष करू शकत नव्हतो.

''काय विन्या.'' ती नाइलाजानं थांबून नजर टाळीत म्हणाली.

''काय.'' मी माझ्या परीनं तेच करीत कसाबसा उद्गारलो. एकीकडे डोळे भरायला पहात होते. घसा गच्च होत होता. गलबलत होतं.

किंचित्काल आमच्यापैकी कुणीच पुढे बोललं नाही. लांबून कुणी पहातं तर त्याला खात्रीनं हसू लोटलं असतं.

''लॉनवर येतोस ?'' अखेर तिनं विचारलं.

''हो. चल.'' हा प्रश्न येता तर माझं उत्तर ठरलेलं होतं. माझ्याकडे यावर दुसरे शब्दच नव्हते.

आम्ही कॉलेजमागच्या लॉनवर जाऊन बसलो. सकाळ होती का दुपार होती कोण जाणे. उन्ह एकदा कोवळं आणि एकदा अंग भाजून काढणारं वाटत होतं. कॉलेजची चिरेबंदी इमारत कुणा राक्षसाच्या थडग्यासारखी समोर लांबरुंद पसरली होती. तिकडून कसली तरी घरघर—मुलामुलींच्या आवाजाची असेल—ऐकू येत होती. तीच आवडीने ऐकत रहावी आणि हृदयात भरभरून घ्यावी असं त्वेषानं आणि अगतिकपणे वाटत होतं.

''विन्या,'' अखेर मित्रानं पुढाकार घेऊन तिला तडा पाडला. ''तुझं कसं चाललंय ? परीक्षेला बसणार की ड्रॉप घेणार ?''

''बसेन.'' मीही तिचं अनुकरण केलं. ''किंवा ड्रॉप घेईन. नक्की काहीच नाही.''

कुठं तरी एक कावळा घसा फोडून ओरडत होता, ''खोटं—खोटं—खोटं—''

''बैस तू परीक्षेला.'' ती, मी सोडलं तिथून पुढे चालवीत म्हणाली. ''वर्ष फुकट जाता कामा नये तुझं.''

''हो.'' मीही तिला थोडी मदत केली. कावळ्याचा टाहो पुसून टाकावा म्हणून लागलीच पुढे म्हणालो. ''मित्रा, तू बरी झालीस याचा फार आनंद झालाय मला.'' आणखीही काही म्हणायला हवं होतं असं वाटलं.

''थँक्स.'' ती माझा अपुरेपणा जाणून म्हणाली. ''मला पण तुझी आठवण येत होती.''

कावळा आता का ओरडत नाही—मी मनात ओरडलो.

"तुझं पुढं काय ?" अगतिक होऊन मी काहीतरी शब्द तोंडाबाहेर लकटून दिले—हेतू हा की तिचे थांबावेत.

ती किंचित हसली की रडली कोण जाणे. काहीतरी तिनं केलं. तिच्या काळ्याशार केशसंभारातले दोनचार रुपेरी केस तेवढ्यात उन्हात तळपले. कुठ तरी मला त्यांनी चरचरून एक जखम केली. वेदना उठली.

"मी अहमदाबादला जाणार—" मित्रा म्हणाली. "तिथं शिकेन. नाहीतर सर्व्हिस करीन. काहीतरी, काहीतरी करीन..."

ओरडणारा कावळा खोटाच होता तर !

"लाइफ मस्ट बी लिव्ह्ड !" कर्कश आवाजात मित्रानं कित्ता म्हटला. "तेच तेच करण्याचा कंटाळा आला, विन्या. तेच कॉलेज, तेच गाव, तीच माणसं, त्याच गोष्टी—रुचिपालट हवा. आय ॲम फेडप्—रिअली फेडप् ! दोनतीन दिवसांत निघते आहे मी, अहमदाबादला."

"मित्रा...घरची माणसं—" काहीतरी सुचलं म्हणून मी बोलून पाहिलं.

"त्यांना पढवलंय मी." मित्रा त्यापेक्षा चांगलं आणि तत्काळ बोलली. "अडचण कोणतीच नाही. पक्कं ठरवलंय सगळं—हे बदलणार नाही. रिअली—अहमदाबाद ईज सच अ नाईस सिटी, तुला सांगते, विन्या !"

उभं रहावं असं वाटलं म्हणून मी उठून, राष्ट्रगीताला रहातात तसा ताठ उभा राहिलो.

मित्राही उभी राहिली.

"बरं." मी पुटपुटलो.

"पत्रबित्र..." तिनं तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुट केली.

आम्ही पुन्हा आवारापर्यंत चालत आलो. आणि दुभंगलो.

एवढंच आठवतं.

# दर्द

जवळची छोटी बॅग सावरीत मी त्या पाटीशी आलो. आत पाहिलं. माडांच्या झावळ्यांखाली दहापाच बैठी घरे पत्त्यांचे बंगले रचावेत तशी उभी होती. सगळी दारे-खिडक्या-त्या तशा, दिवसाच्या चढत्या वाढत्या प्रहरात—बंद होत्या. मधल्या आवारात दोनतीन खासगी मोटारी ओक्याबोक्या उभ्या होत्या. माणसाचा मागमूसही कुठे नव्हता. वर माडांच्या झावळ्यांची सळसळ आणि घरांपलीकडून कोठून तरी समुद्राचा मंद खर्ज.

उगीचच मनावर ओझे आले. पाऊल जडावले. त्या निर्मनुष्य वाटणाऱ्या जागेत शिरायला मन घेईना. तसाच स्वतःला लोटीत ढकलीत आत गेलो. दुसरे गत्यंतर नव्हते. घेतलेले काम व्हायलाच हवे होते. त्यासाठी तर शहरातला गजबजाट टाकून या एकांताकडे धावत आलो होतो.

कोठूनसा एक माणूस उगवला. शुभ्र पोषाखातला काळाकभिन्न माणूस. काहीच न विचारता काहीशा अनिश्चितपणे तो माझ्याकडे नुसता पाहत राहिला. जणू काही विचारण्याऐवजी माझ्याकडून तो माझ्या तिथे येण्याचा खुलासा अपेक्षित होता.

''इधर कमरा मिलता है ?'' मी सहजपणे हिंदीत विचारले.

त्याने माझ्या भोवतालच्या आसमंतावरून एकदा त्याची अनिश्चित शोधक नजर फिरविली.

''हां...'' तो पुटपुटल्यासारखा म्हणाला, ''कितने बजे तक रहनेका है ?''

''पुरा दिन रहनेवाला हूँ, रातको वापस जाऊँगा.'' मी चाचरत बोलत होतो. माझ्या हिंदीविषयी उगीचच एक अविश्वास मला वाटत होता.

"मिलेगा." त्याने थोडा वेळ थांबून निर्णय दिल्यासारखे म्हटले.

त्याच्या नजरेतला अनिश्चितपणा अद्याप तसाच कायम होता.

"एक है या दो ?" त्याने विचारले.

आता एकदम सगळा खुलासा झाला. म्हणजे अशा ठिकाणी एकट्याने येणे—लेखनासाठी लेखकानेदेखील—हे नवल होते म्हणायचे !

मी म्हणालो, "एक."

त्याच्या केसाळ भिवया किंचित्काळ उंचावल्या. पुन्हा पूर्ववत झाल्या.

"आठ रुपिया पडेगा." तो म्हणाला, "फॅनका और खानेका अलग."

मी दहा रुपयांची नोट काढून त्याच्यापुढे धरली.

त्या नोटेच्या दर्शनानेही त्याची मुद्रा बदलली नाही.

"बादमे देव. चलो मेरे साथ."

आम्ही दोघांनी एका बैठ्या घराला वळसा घातला—त्या घराची सगळी खिडक्यादारे आतून बंदच होती—आणि समुद्राकडच्या तशाच एका घराशी पोचलो. त्या घराला दोनच दालने असावीत. त्यांतल्या एकाचे दार बाहेरून बंद होते. गंज चढलेली कडी जोरजोराने हलवून काढून त्याने दार उघडले. थोडी धूळ उडाली.

"आव." तो आत शिरत म्हणाला. पाठमोऱ्या त्याच्या सराईत मुद्रेवरचे अजून न ओसरलेले दबले नवल मला तसेही जाणवत होते. कदाचित हा माझाच समज असेल.

मी त्याच्या मागून आत गेलो. खोली जुनी होती. जुनाट अवस्थेतली होती. आत भर दिवसा अंधार दाटला होता. एक टेबल-खुर्ची, एक हॅटस्टँड, एक पलंग आणि एक सोफा एवढे फर्निचर आत सगळे चुकीच्या पद्धतीने ठेवले होते. एक प्रकारचा कुबट दर्प नाकपुड्यांत शिरत होता. कोपऱ्यात पाण्याचे 'जग्' होते. पलंगापलीकडे कसले तरी नियम आकडेवार छापलेला एक कागद फुटक्या काचेत फ्रेम करून टांगला होता. कौलारू छपरातून खाली जळमटे लोंबत होती. तिथेच एका कोपऱ्यात चिमण्यांनी घरटे केले होते.

"ये है." तो स्थितप्रज्ञपणे म्हणाला.

मी खिडक्या उघडल्या. (पुन्हा थोडी धूळ...) कुबट दर्प थोडा कमी झाला. कुठून तरी मंद सुगंध तरळत आला. खिडक्यांची छिद्रे नि त्यांत खुपसलेल्या कागदाच्या सुरनळ्या नजरेतून सुटल्या नव्हत्या. तो तेवढ्यात जाऊन ताजे पाणी आणि इस्तरीचा पलंगपोस घेऊन आला.

"फॅन मंगता है ?" त्याने पलंगपोस बदलीत विचारले.

मला उत्तर देण्याचीही निकड नव्हती. मी जरा खुशालून विचारले, "तुम्हारा नाम क्या है ?"

मला उत्तर देण्याला तो नाराज दिसला. मग जरा घोटाळून म्हणाला, "जॉन बोलो."

मी विचारले, "तुम्हारा मुलूख कौनसा है, जॉन ?"

त्याची नाराजी त्याच्या भिवयांवर स्पष्ट दिसत होती. तो म्हणाला, "है—उधर—बहुत दूर है."

 आणि ताजे पाणी जग्मध्ये भरून त्याने पुन्हा विचारले, ''खाना कितने बजे मंगता है ?''

मी घड्याळ पाहत म्हणालो, ''दो बजे लाना.''

''अच्छा.'' तो जाऊ लागला.

''जॉन.'' मी त्याला हटकले.

तो थबकला.

''चाय मंगता है ?'' त्याने विचारले.

मी म्हणालो, ''नही. लेकिन तुम कितने बरससे इधर है ?''

तो परत अस्वस्थ झाल्यासारखा वाटला. ''हुए एक-दो बरस.'' तो पुटपुटला.

''तो बहुत कुछ देखा होगा तुमने.'' मी त्याच्या नाराज भिवयांकडे पाहतच म्हणालो.

''वैसाही.'' त्याने थोडक्यात उत्तर दिले नि तो तडक चालता झाला.

माझी अडचण त्याला कळली नव्हती. आणि त्याची मला समजत होती. पण ती उमजू नये इतका मी हातघाईवर आलेलो होतो. मनात होते ते निरर्थक होते नि नवे चांगले काही, काही केल्या मनात येत नव्हते. असे होऊन चालले नसते असे नव्हे. तेच ते जुने, शिळेपाके, वातड थोड्याशा सफाईने खपत होतेच की. प्रश्न माझ्याच मनाचा होता नि नेहमी बोथट होऊन बसणारे मन या वेळी तसे रहायला तयार नव्हते. काही तरी नवे हवे होते, वेगळे हवे होते—इतके वेगळे की लिहिण्याला उत्साह वाटायला हवा होता—हा हट्टच शहर सोडून या आडजागी मला ओढून घेऊन आला होता—या खुशालचेंडू शौकिनांच्या भानगड-गल्लीत, रंगेल रंगरावांच्या विलासपुरीत !

थोडा वेळ असाच टिवल्याबावल्या करीत घालवला. मग कामाचा पसारा मांडून सुस्त बसून राहिलो. समोरच्या ओळी आचरट आणि चरबट वाटत होत्या. अपुरे वाक्यही पुरे करण्याची इच्छा होत नव्हती. ऑल ट्रॅश ! तेच ते खरे सपक नाहीतर खोटे भडक विषय...तेच मोक्याचे शब्द...त्याच युक्त्या...पॅरेसुद्धा तितक्याच ओळींचे—अरे हट् ! नथिंग डुइंग, थँक यू ! कम व्हॉट मे...

जॉन आला; रजिस्टर घेऊन.

''नेम लिखो.'' त्याने फर्मावले—स्थितप्रज्ञ सुरातच.

मी सहज रजिस्टरच्या त्या पानावर नजर टाकली...

मिस्टर अँड मिसेस...रेस्ट...पिकनीक...आउटिंग...खोटे वाटणारे खरे पत्ते, खरी-खोटी नावे...

मी नाव लिहिले—उगीच खोटे. (तेवढीच चैन !) कारणाच्या स्तंभात लिहून टाकले : वर्क. (जॉन स्थितप्रज्ञ मुद्रेने पाहत होता.) मी रजिस्टर त्याच्या स्वाधीन केले, तेव्हा माझ्या पुढ्यातल्या कागदांकडे त्याचे लक्ष होते.

आता त्याची उत्सुकता चाळवली होती.

रजिस्टर उचलल्यासारखे करीत त्याने विचारले, ''साब, कौनसा वर्क करते हैं आप ?''

''लिखता हूँ.'' मी म्हणालो.

''क्या ?'' त्याने खोदून विचारले.

मी म्हटले, ''कहानियाँ, नाटक.''

याने त्याच्या मुद्रेवर काहीच फरक पडला नाही. त्या अर्थी तो साहित्यप्रेमी वगैरे नसावा, असा खवचट निष्कर्ष मी काढतो तो जॉन म्हणाला, ''तो आप तर्जे निकालते हैं.''

''हां.'' मी होकार भरला.

जॉन रजिस्टरसकट संथपणे निघून गेला. मी शब्दांशी नि कल्पनांशी थोडा वेळ खेळत बसलो. कल्पनांना तोटा नव्हता. शेजारच्या बंद खोलीत काय चालले असेल ? या खोलीत याआधी कोण कोण येऊन गेले असतील ? प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या आपल्या समाजात असे एकूण काय काय चालत असेल ?

जॉन खाना घेऊन आला तेव्हा मी आडवळून चक्क झोपलो होतो.

खाना टेबलावर ठेवीत त्याने विचारले, ''क्या लिख रहे थे आप ?''

मी प्रांजळपणे म्हणालो, ''नही, जॉन. सो रहा था.''

''अच्छा...'' तो पुटपुटला. जेवण व्यवस्थित मांडून आणि काही हवे का ते विचारून तो जायला निघाला.

परंतु त्याला जायचे नसावे. तो घोटाळला. मी जेवणात व्यग्र होतो.

थोडा वेळ दम काढून तो म्हणाला, ''ये कमरेमेही एक अजीब साब एक दिन आये थे.''

''अच्छा ?'' माझ्यातल्या लेखकाने एक बारीकशी उडी मारली.

''अकेलेही आये थे वे.'' तो पुढे म्हणाला, ''ऐसेही दिनभर तक रहे थे. फिर वापिस चले गये.''

''कौन थे वे ?'' मी जेवण थांबवून विचारले.

माझ्याचसारखा तो कोणी लेखक असावा, या कल्पनेने मीच जरा नाउमेद झालो.

परंतु जॉनने सांगितले ते वेगळे होते. त्याच्या ख्रिश्चन हिंदीचे मराठीकरण करून सांगायचे तर, तो म्हणाला, ''नावगाव काही माहीत नाही साहेब. इथे ते खरे सांगतो कोण नि विचारतो तरी कोण ? पण ते साहेब ख्रिश्चन होते. असतील पन्नाशीचे नि रुबाबदार पण होते. असेच तुमच्यासारखे आले. म्हणाले खोली हवी. म्हटला तो दर मान्य केल्यांनी, म्हटली ती खोली घेतल्यांनी. एकटेच आले. रजिस्टरमध्ये मात्र मिस्टर अँड मिसेस लिहिल्यांनी. इथे नियम कशाचाच नाही, पण मी सुचवले, ''चुकून मिसेस लिहिलं तुम्ही सर. तुम्ही तर एकटेच आहात.'' तशी ते रागाने म्हणाले, ''मी दुकटा आहे, ती यायच्यय.''

त्यांना वेस्टर्न स्टाईल खाना सर्व्ह करायचा होता म्हणून मग मी भटारखान्याकडे गेलो.

मी परत आलो तेव्हा हे दार आतून बंद होते.

अशा वेळी कुणालाही एकदम 'डिस्टर्ब' करण्याची आमची पद्धत नसते. त्याप्रमाणे मी कान दिला.

आतून संभाषण ऐकू येत होते. संभाषण इंग्रजीत चालले होते.

साहेब म्हणत होते, "तू मला खूप सुख देतेस."

बाई म्हणत होती, "मी तुला आवडते का ?"

साहेब : "तू मला इतकी आवडतेस की इतकं जगात कधी कोणी मला आवडलंच नाही. माझ्या प्राणापेक्षा तू मला प्यार आहेस."

साहेबांच्या नि बाईच्या आवाजात दोघांच्या वयातला फरक जाणवत होता. बाई पोरसवदा वाटत होती—निदान आवाजावरून. साहेबांच्या आवाजात जग पाहिलेल्या नि बरेच सोसलेल्या माणसाचा धीरगंभीरपणा होता.

बाईने विचारले, "तू असं बोलतोस त्यानं मला किती सुख होतं म्हणून सांगू ? मला मी खूप खूप भाग्यवान वाटते."

"मीच अभागी. एरवी तुला लांब ठेवावं नि असं चोरून भेटावं लागलं नसतं. तुझी फार तहान लागली की असा जखमी जनावरासारखा एकांत शोधीत येतो बघ; नि तुझा सहवास घेऊन नाइलाजानं खूप कठोर होऊन तुला निरोप देतो. माझ्यासारख्या दुष्ट माणसासाठी अगत्यानं तू येतेस हे तुझं केवढं चांगूलपण !" साहेब.

"असं का बोलतोस ? तू खूप खूप चांगला आहेस बघ. मला त्रास होतो तू असं बोललास तर. मलाही तू कल्पनेपलीकडे हवासा असतोस. तुझ्याशिवाय मला कोणी कोणी नाही." बाई.

साहेबांचा निःश्वास. "तेच वाईट आहे." त्यांचे शब्द. एक मोठा दबला उसासा.

मग थोडा वेळ स्तब्धता. या स्तब्धतेवर दार टकटकवायचे की परत जायचे त्याचे आमचे तंत्र अवलंबून असते.

मी अंदाज घेऊन दार टकटकवले.

आत खुसफूस झाली.

"येस ? कमिंग." साहेबांचा नाराज शब्द आला.

थोड्या वेळाने दार उघडले.

"सॉरी साब." मी म्हणालो. "डिस्टर्ब करना मंगता नही था. लेकिन..." हातातला तयार गरमागरम खाना मी दर्शविला.

"ऑलराइट. डजण्ट मॅटर. कम इन." ते बाजूला सरकत गुरगुरले.

मी आत शिरलो. खाना टेबलावर ठेवीत खोलीत नजर टाकली. पण खोलीत दुसरे कोणीच नव्हते. मला तर बाई पाहण्याची उत्सुकता होती. पलंगावरचा विस्कटलेला पलंगपोस पाहत मनाशी म्हणालो, टॉयलेटकडे गेली असेल—दार उघडण्याची गडबड झाल्यामुळे.

मी दोघांचा खाना मांडला. जरा तिथेच घुटमळलो. परंतु बाई बाहेर येत नव्हती. साहेबांनी सोडा मागितला. तो आणून दिला तरी बाई बाहेर आली नव्हती.

"तुम जाव." साहेबांनी फर्माविले. "आधा घंटेके बाद आव."

''अच्छा साब.'' मी आज्ञाधारक सुरात म्हणालो नि बाहेर सटकलो. बाहेर येताना ते दार आमच्या रीतीसारखे लोटून घेतले.

नंतर अर्धा घंटा मी काहीबाही काम करीत होतो, पण मन त्यात नव्हते. मनात काही तरी खुपत होते. बाई एक वेळ आत गेली असेल, पण तिची काहीच खूण बाहेर का न राहावी ? सँडल्स, त्या नसल्या तर पर्स. निदान रुमाल. नि तोही समजा नसला तर सेंट-पॉवडरचा एक बारीकसा वास नक्कीच, ज्यावरून आमच्या या ठिकाणी बाईचे अस्तित्व निखालस जाणवते—निदान आम्हांला.

अर्ध्या घंट्याने गेलो तेव्हा दार लोटलेले होते. आतून दारूचा मंद दर्प येत होता.

मी जरा कान देऊन उभा राहिलो.

साहेब म्हणत होते, ''तू त्या दिवशी खूप रडून रडून निघून गेलीस, तेव्हापासून सारखा परेशान आहे, माझ्या पाखरा. काळजाला जखम झाल्यय. चैन म्हणून नाही. तडफड तडफड चालल्यय.''

''पण मी आता येते ना.'' बाई.

''पण तशी नाहीस येत. तशी पुन्हा कधीच येणार नाहीस, मला आहे ठाऊक.'' साहेब. ''मला आहे ठाऊक—मी फार वाईट आहे, मी राक्षस आहे, अधमाधम आहे. तुझ्याशी मी माणसासारखा वागलो नाही. मी तुला भयंकर दगा दिला. मी तुला संकटात लोटून गंमत बघत राह्यलो. मी दुसऱ्या पोरी शोधल्या—''

''मुळीच नाही. तुला तसं करावं लागलं, त्याला तू तरी काय करणार, माझ्या प्राणा ? तुला तुझ्या जबाबदाऱ्या होत्या, प्रतिष्ठा होती. मला कळतंय बघ सगळं.''

''प्रतिष्ठा खड्ड्यात जावो. मी भ्याडासारखा वागलो. मी नादान कातडीबचाऊ ठरलो—''

''का असं एकसारखा बोलतोस तू ? मला तरी तू भयंकर आवडतोस, माझ्या लाडक्या—''

''मी हलकटाहून हलकट आहे ! डरपोक आहे ! स्वार्थी आहे ! प्रेमाला नालायक आहे, मला माझा तिरस्कार वाटतो—माझी किळस वाटते !''

''लाडक्या—लाडक्या—असं नको रे बोलूस—'' बाईचा स्वर विलक्षण आर्जवी नि कातर झाला होता. ''मला फार त्रास होतो बघ—फार त्रास होतो.''

''तुझ्या—कुणाच्याही प्रेमाला मी नालायक आहे ! मी कुत्रा आहे, फक्त शरीर घेणारा ! तुझं मन, तुझं उदात्त प्रेम मी लाथाडलं ! मी तुझ्या प्रेमाचा घोर उपमर्द केला ! तू मला त्या जोड्यानं मारीत का नाहीस ? माझ्यावर पचापचा थुंकत कशी नाहीस ? का मला क्षमा करतेस ? का ?''

यानंतर बाईचे फक्त 'नको रे—' 'नको म्हणते तर !' 'पुरे—नको !—' एवढेच वाढत्या व्याकुळपणे—अगदी रडवेल्या सुरात वारंवार ऐकू येत होते नि साहेब अनावरपणे बडबडत होते. स्वतःची निर्भत्सना करीत होते. त्यांच्या शब्दाशब्दात अपार तडफड होती. दर्द होता. भळभळा वाहणारी वेदना होती. दारूने त्यांच्या शब्दाला तारवटलेपणा आला होता.

आणि उरकलेल्या खान्याची भांडी घेऊन परतण्यासाठी आलेला मी पुतळ्यासारखा खिळून दाराबाहेर उभा होतो. दाराला फट होती. परंतु नेमका तिच्या कक्षेबाहेर भिंतीलगतच तो पलंग होता.

साहेबांच्या शब्दांतून एवढेच कळले की ते लग्न झालेले प्रतिष्ठित जंटलमन असावेत नि ही बाई सिंगल अनमॅरीड यंग गर्ल होती. तिचे त्यांच्यावर भयंकर प्रेम होते. त्यांचे देखील तिच्यावर होतेच, परंतु त्यांच्या-तिच्या प्रकरणात मध्यंतरी काही तरी प्रकार घडला होता. म्हणजे अंदाजावरून म्हणायचे तर तिला दिवस गेले होते. साहेबांनी अशा परिस्थितीत कोणताही मॅरीड जंटलमन करील ते केले. ती पोर रड रड रडून निघून गेली. साहेबांनी दुसऱ्या पोरी



शोधल्या. पण काही केल्या आधीच्या या पोरीची आठवण त्यांच्या मनातून मरत नव्हती. ती त्यांना भलताच त्रास देत होती, छळीत होती. मग केव्हा तरी ही पोरगी त्यांना पुन्हा भेटू लागली—त्यांची भयंकर अवस्था नि आपल्यावरची प्रीत पाहून असेल ! बाईच्या जातीचे प्रकरणच बघा काही न्यारे ! देतील त्याला, बदमाष का असेना, नको नको तितके देतील आणि नाही त्याने प्राणाची पायघडी अंथरली तरी त्यांना त्याची मुळीच फिकीर नसेल ! अशा एका बाजूने जातील !

तर मग मी त्यांना काही डिस्टर्ब केले नाही. म्हणालो, भांडी मग एकदमच नेता येतील. त्यांचा एकांत त्यांना मिळू दे.

पण या कॉटेजभोवतीच या ना त्या मिषाने मी त्यानंतर घोटाळत राहिलो. कोणतेही काम करीत असताना माझा एक डोळा या खोलीवर नि हिच्या बंद दारावर लागलेला होता.

संध्याकाळ उतरली. साहेबांनी रजिस्टरमध्ये लिहिल्याप्रमाणे त्यांची वेळ झाली. निघताना कुणाला टॅक्सी लागते (साहेबांची गाडी नव्हती.) म्हणून मी पुन्हा एकदा दाराशी गेलो. आत शांतता होती.

बाहेरूनच मी म्हणालो, ''साब, टॅक्सी ले आऊं ?''

आतून थोडा वेळ काहीच उत्तर आले नाही. मग एक थकला, ओढला स्वर उमटला, ''हां.''

मी विचारले, ''एक या दो ?''

उत्तर आले, ''टॅक्सी नही मंगताय.'' मी गोंधळात पडलो.

''टाइम हुआ साब.'' मी कुणाकुणाला अप्रिय असलेली सूचना नाइलाजाने दिली.

आतून एक नाराज गुरगुर उमटली. कॉटवरून कुणी तरी धडपडत उठले. मग हलका शब्द आला, ''थँक यू डार्लिंग. अँड गुड बाय...''

चुंबनाचा अस्पष्ट आवाज मी ऐकला.

खुसफूस झाली. पावले वाजली.

किंचित्‌काळातच दार उघडले. साहेब बाहेर आले.

त्यांचे डोळे चिकार रडून आणि पिऊन तांबारतात तसे तांबारले होते. काळी, रुबाबशीर मुद्रा कमालीची ओढली होती. पुढचे पिकलेले केस विस्कटले होते. त्यांनी बुटांच्या नाड्या नीट बांधल्या नव्हत्या, टायचा नॉट सैल लोंबत होता, कोट एका खांद्यावर टाकलेला होता.

ते कसेबसे बाहेर आले. किंचित थबकून.किलकिल्या डोळ्यांनी त्यांनी माझ्याकडे आणि बाहेरच्या उजेडाकडे पाहिल्यांनी, मी सांगितलेले बिल ''थँक यू गूड मॅन'' पुटपुटत अधिक पैशांसह माझ्या हाती कसेबसे ठेवल्यांनी आणि ते निघाले. बाहेर पडले. निघून पुढे गेले.

मी या खोलीच्या त्या दाराकडे पाहत तसा बाहेर खिळून उभा होतो. काळीज धडाडत होते. आता ती बाई एकदाची दिसणार—दिसणार—उत्सुकता तुटेपर्यंत ताणली गेली होती. पण साहेब थेट फाटकापर्यंत पोचले तरी खोलीवाटे कुणीच येईना.

मला याचा अर्थ कळेना. तरीही तसाच खिळून राहिलो. पण कुणीही येत नव्हते नि खोलीत कसलीच हालचाल नव्हती.

एकदम डोक्यात एक भयंकर कल्पना आली. बाईचे काही बरेवाईट...काळजाचा ठोका चुकला. पोटात खाई पडली. अरे बाप-रे ! भलते कॉम्प्लिकेशन ! मी उभ्या जागी गारठूनच गेलो. डोक्यात काहीच शिरेना. काही समजेना.

तोवर ते साहेब पार दिसेनासेदेखील झाले होते.

मग मात्र सगळा धीर एकटवून मी खोलीत घुसलो—या खोलीत.''

''आणि काय दिसले ?'' मी जॉनला इथे न राहवून हटकले. अंगावर भयाचा, उताविळीचा चमत्कारिक शहारा सरसरून उमटला होता.

जॉन म्हणाला, ''सगळी खोली—तो टॉयलेटचा भाग देखील—बघितला, पण खोलीत कोणीसद्धा नव्हते.''

''खोटे !'' मी ओरडलो. ''असे कसे असेल !''

''नही साब. सच !'' जॉनने उलट त्याचा शब्द दिला. ''शंभर टक्के खरे ! एक अक्षर झूट नाही ! खोलीत कोणीही नव्हते. दारूच्या नि सोड्याच्या रिकाम्या बाटल्या, सिगारेट्सची पुष्कळ थोटके नि खरकटी भांडी—बस्स !''

''आश्चर्य !'' मी ओरडलो. ''मग ती बाई गेली कुठे ?''

जॉनने त्याच्या मळक्या, पांढऱ्या कोटाच्या आतल्या खिशात एक हात घातला. आणि तो काळजीपूर्वक बाहेर काढीत तो म्हणाला, ''देखो साब, ये इतना फोटो हमकू मिला वो बेडपे. बस्स !''

तो फोटो होता एका निरागस, स्वप्नाळू, उत्कट, अल्लड चेहऱ्याचा. त्यातल्या डोळ्यांत एक विलक्षण गूढ भाव ओतप्रोत भरून राहिला होता. फोटोतूनही अस्वस्थ करीत होता.

''जॉन !'' मी तो फोटो पाहत जागचा उसळून म्हणालो, ''मग त्या माणसाने संभाषण कुणाशी केले ?''

फोटो पुन्हा काळजीपूर्वक खिशात ठेवीत जॉन त्याच्या त्या स्थितप्रज्ञ चेहऱ्याने म्हणाला, ''ये तो मिस्ट्री थी साब.'' त्याने भांडी आवरण्याला सुरुवात केली. ''और अब तक वो मिस्ट्री वैसीही है और शायद वैसीही रहेगी.''

''काय म्हणून ?'' मी दुखावून विचारले. ''जॉन, काय म्हणून ?''

जॉन म्हणाला, ''क्यों के वो साब फेरसे कभी इदर आये नही. जीजस नोज व्हेअर ही वेण्ट ! शायद जिंदा है या मरा, ये भी कहा नही जा सकता. लेकिन इतना सच, के उनका दर्द बहोत जहरीला था साब ! ऐसा दर्द किसीसे सह नही जा सकता...किसीसे नही...''

भांड्यांसकट तो पाठ वळवून त्याच्या संथ गतीने चालता झाला. दिसेनासा झाला.

तेव्हापासून हे सारे मी लिहीत सुटलो आहे आणि या खोलीने मला आता पुरते झपाटले आहे !



# एकांकिका

**खलित्यांची लढाई**

'अजगर आणि गंधर्व', १९६६

**चार दिवस**

'रात्र आणि इतर एकांकिका', १९५७

**भेकड**

'भेकड आणि इतर एकांकिका', १९६९

**अजगर आणि गंधर्व**

'अजगर आणि गंधर्व', १९६६

# खलित्यांची लढाई (दुसरी)

[रंगमंचावर मधोमध किंवा जरा अलीकडे-पलीकडे दाराची एक चौकट फळ्या आणि कडीसकट जरा तिरपी उभी आहे. या चौकटीबरहुकूम रंगमंचावरून जाणाऱ्या एका अदृश्य रेषेने रंगमंचाचे दोन भाग झाले आहेत. यांतल्या प्रत्येक भागात एकेक लाकडी खुर्ची. दोन्ही खुर्च्यांची तोंडे साधारणतः परस्परविरुद्ध दिशेला.

एका भागात, पुढेच, 'मी' नामक हसतमुख पांढरपेशा इसम उभा.

दुसऱ्या भागात आणखी एक इसम—पांढरपेशाच—प्रेक्षकांकडे पाठ करून बसलेला वेटोळे घातल्यासारखा.]

**मी** नमस्कार. खलित्यांची दुसरी लढाई आम्ही आज इथं दाखवणार आहोत. खलित्यांची पहिली लढाई सन १९६३ मध्ये भारताच्या उत्तर सीमेवर झाली आणि ती १९६४ अखेरपर्यंत आणि त्यानंतरसुद्धा चालली होती, हे सर्वांना ठाऊक असेल. खलित्यांची दुसरी लढाई आमच्याच उत्तर सीमेवर झाली. ही अधिक घनघोर होती की पहिली, आणि यांतल्या कोणत्या लढाईत अधिक भयंकर खलिते एकमेकांवर टाकण्यात आले, हा आम्ही, आमचं कुटुंब वगैरे मोठमोठ्या विद्वानांत अनेकदा वादाचा विषय ठरतो. ऐतिहासिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आदी दृष्टिकोनांतून पहिली कितीहीं महत्त्वाची असली तरी आमच्या दृष्टिकोनातून मात्र दुसरीच संस्मरणीय आहे. कारण तिच्यात, सरळच सांगायचं म्हणजे, आम्ही होतो.

आता, ही आमची उत्तर सीमा. (मधल्या दारावरून जाऊन रंगमंच छेदणारी काल्पनिक रेषा

अंदाजानेच दर्शवतो.) आणि ही मधली पास. पास म्हणजे खिंड, म्हणजे दार. या लढाईत याला फार महत्त्व प्राप्त झालं—या मधल्या दाराला.

आणि हे अर्थात आम्ही. गुणाकार सच्चिदानंद घाटपांडे, एस्क्वायर.

आणि सीमेपलीकडे तो खुर्चीत बसलाय ना, तो आमचा शत्रुपक्ष.

म्हणजे आजचा नव्हे, तेव्हाचा—लढाईतला. लढाईत एकमेकांचे गळे कापणारे शत्रुपक्ष हे आधी गळ्यात गळा घालणारे मित्रपक्ष असतात तसा हा लेकाचा आमचा मित्रपक्ष होता. शिवशंकर जटायू कानविंदे. तसा दिसायला आता तो बराच गरीब वाटतोय; पण तो तळहातावर शिर घेऊन लढला, तुम्हांला सांगतो ! कारण त्याचं शिर त्या काळात असायचं त्या जागेवर नक्कीच नव्हतं आणि आमचा तळहात शिरावर होता !(निःश्वास टाकतो.) जाऊ द्या. कुणी कुणी या खलित्यांच्या लढाईला तत्त्वाची लढाई असंसुद्धा म्हणतात. किंवा उगीच नसता घोळ कशाला, आम्हीच म्हणतो. म्हणजे त्याचं काय आहे की, शंकर कानविंद्याला मुळापासूनच तत्त्वाचा नाद. म्हणजे कुणाला बाटलीचा असतो, कुणाला बाईचा असतो, तितका नाही, पण तसाच कानविंद्याला तत्त्वाचा नाद. उठताबसता तोंडी लावायला त्याला तत्त्व लागायचं, तत्त्व ! म्हणजे नेमकं काय ते एवढे दिवस या शब्दाबद्दल वाचून आणि ऐकून अद्याप आपल्याला काही नीटसं समजलेलं नाहीं. आपल्या ताकदीपलीकडच्या म्हणून आपण ज्या गोष्टी सोडून दिल्यात ना—उदाहरणार्थ, त्याग, सेवा, ध्येयवाद, अस्मिता, प्रज्ञा वगैरे—वर्तमानपत्रातच त्या बऱ्या वाटतात हे आपलं मत—त्यांत हे तत्त्वही दिलंय सोडून. पण कानविंद्याला तत्त्व हे अक्षरशः मुखशुद्धीसारखं असायचं. किंवा खरं म्हणजे उचकीसारखं. कधी उपटेल, नियम नाही. पाहता पाहता या तत्त्वाची उबळ त्याला यायची. नव्हे, घाईच लागायची ! आणि चालत्या संभाषणात मध्येच तो नाक फुलवून म्हणायचा—

**कानविंदे** (बसल्या जागीच) हां, प्रश्न तत्त्वाचा आहे ! उगाच नाही कुणाचं ऐकून घेणार आपण !

**मी** हे असं. आणि बैठकीचा सगळा रंग तो बिनसवणार हे मग नक्की असायचं. आम्हीच त्याला मग कसाबसा सांभाळून घ्यायचो. कारण माणूस नको तेव्हा भांडखोर पण मुळात तसा बराच, ही आमची खात्री. तर असेच आम्ही दोघं एक दिवशी बादशाही टी हाउसमध्ये चहा घेत बसलो होतो—

[दोघे आपापल्या खुर्च्या ओढत आणून समोरासमोर बसतात. कानविंदेबरोबर छत्री.]

**मी** (माशा हाकवीत काल्पनिक चहा घेत) बरी आठवण झाली ! शंकरू, लेका, तुला जागा हवी असं काहीतरी मध्यंतरी त्या माम्या कुळकर्ण्याकडून ऐकलं होतं, ते खरं काय रे ?

**कानविंदे** (रुमालाने जोरजोराने वारा घेत) च्यायला भारीच उकडतंय बुवा. (वेटरला) अहो—शुक्—वेटर, पंखा लाव पंखा—

**मी.** हे तू गेल्या पंधरा मिनिटात चारदा त्याला सांगितलंस! मला वाटतं, पंखा मोडला असावा.

**कानविंदे** कशावरून ? तुला सांगतो हे हॉटेलवाले एकजात साले हलकट असतात. ओ

३२८ नेपध्य २५ २०१

वेटर—अहो, कान आहेत का नाहीत तुम्हांला ? का भिंती आहेत भिंती ?

**मी** जाऊ दे रे. उगाच भांडणाचा प्रसंग यायचा. आपण कुठं थांबणार आहोत इथं ? चहा घेऊ नि बाहेर पडू चल. तू त्या वेटरच्या नावानं हाका मारीत राहिलास तेवढ्यात माझा चहा घेऊनसुद्धा झाला, बघ ! हां, घे. घे लौकर !

**कानविंदे** (बशी तोंडाला लावून फुर्रर करीत पुन्हा) तसं नव्हे. साले वेटर होतात पण त्याध्या मॅनर्स नाहीत म्हणजे काय ? (एक घोट घेतो.)

**मी** तर मी काय म्हणत होतो, जागा—

**कानविंदे** थांब !

[बशी ठेवून उठतो, वरच्या काल्पनिक पंख्याकडे पहात. मग बाजूची छत्री उचलून तिने पंखा चालू करण्याचे प्रयत्न.]

काय पंखे का पवनचक्क्या या ?

**मी** अरे पण शंक—

**कानविंदे** हां, फिरला बघ ! छ्याः ! पडला—पडला बंद ! साला स्विच तर ऑन आहे !

**मी** अरे पण त्यापेक्षा मी म्हणतो चहा घे नि—

**कानविंदे** गप तू. (आता खुर्चीवरच चढून छत्रीने पंख्याशी खटपट.)

**मी** (प्रेक्षकांना) हे पाहून दोघेतिघे वेटर्स तिथं धावले. गल्ल्यावरच्या मॅनेजरचं लक्ष इकडे गेलं आणि तोही पळत आला. खातपीत बसलेल्या गिऱ्हाइकांनीही मग घडलं त्या वाग्युद्धात भाग घेतला—

[छत्री धरलेला कानविंदे खुर्चीवर उभा राहून दहापाच काल्पनिक माणसांशी तावातावाने भांडतो आहे.]

**मी** अरे पण शंकर—

**कानविंदे** सोड—सोड तू मला—

**मी** अरे जाऊ देना—

**कानविंदे** काय म्हणून जाऊ दे ? आं ? काय म्हणून ? (खुर्चीवरून उतरून) प्रश्न पंख्याचा नाही तुला सांगतो, प्रश्न तत्त्वाचा आहे ! पंखा चालवून मागणं हा आपला इथला राइट आहे ! हां ?

**मी** बरं पण तो चहा घे नि चल—

**कानविंदे** (खुर्चीत बसत, पुन्हा कप तोंडाला लावीत) ते जागेचं काय म्हणत होतास रे तू गुण्या ?

**मी** काय ? आं—हो ! जागेचं. या मधल्या प्रकारात डोक्यातूनच गेलं बघ सगळं.

**कानविंदे** (एकदा मागे कुठेतरी पाहात) माजोरी साले !

**मी** तर शंकर—ए—तू राहायला जागा शोधतोयस असं मामू कुळकर्णी म्हणत होता.

**कानविंदे** मग ?

**मी** नाही, घरून तुला वेगळं व्हायचंय असं—

**कानविंदे** कोण म्हणतो ? मला नाही वेगळं व्हायचं. पण काय आहे की प्रश्न तत्त्वाचा आहे ! (पुन्हा रागारागने मागे पाहू लागतो.) साले डांबीस !

**मी** तेच. तिकडे नको बघूस. ए शंकर, चहा घे तू. संपव ना चहा.

**कानविंदे** नाही, पण हसतायत बघ कसे साले फिदीफिदी !

**मी** हसू देत रे. तर ऐक तू. मी राहातो माझ्या सासऱ्यांच्या बंगल्यात—

**कानविंदे** तत्त्वतः हे आपल्याला नापसत आहे ! तुला सांगतो, माणसानं आपलं आपण मुखत्यार असावं.

**मी** पण भाडं देतोय की मी—आणि मी काय म्हणतो, आमच्या शेजारचीच खोली रिकामी होतेय. आजच ठरलं. या तीस तारखेला जातायत ते—तर—

**कानविंदे** (मागे रागारागाने बघत) दात पाडून टाकले पाहिजेत साल्यांचे ! (समोर पाहात) हां, बोल—बोल तू.

**मी** तर तूच का नाही राहायला येत ?

**कानविंदे** मी ? कुठे ?

**मी** सासऱ्याच्या बंगल्यात, माझ्या शेजारीच.

**कानविंदे** राहायला ?

**मी** हो. आणखी कशाला ?

**कानविंदे** नाही, राहायलाच की. पण घर सोडण्याची कल्पना तुला सांगतो, मनाला पटत नाही. म्हणजे किती झालं तरी ना, एकत्र कुटुंबपद्धतीसारखी पद्धती नाही !

**मी** तसं असेल तर आग्रह नाही माझा—

**कानविंदे** पण काय आहे की प्रश्न—

**मी** तत्त्वाचा आहे. तेच. म्हणूनच म्हणतो. हवं असलं तर ये राहायला. मला ओळखीचा शेजारी मिळेल; सासऱ्यांना खात्रीचा भाडेकरू. अनायासे जागा खाली झालीय आणि आपल्या हातात पण आहे कुणाला द्यायची ते—तुला गरज दिसली म्हणून बोललो—

**कानविंदे** आपल्याला कुणाची गरज नाही ! आयुष्यात आपण साला भीक मागू, पण कोणाच्या दारात म्हणून जाणार नाही !

**मी** मग भीक कशी मागशील ? पण ते जाऊ दे. मी काय म्हणतो, भाडंसुद्धा तसं माफकच आहे. तुला परवडेल—आता खोली एकच आहे नि जरा लहानसुद्धा आहे—

**कानविंदे** भाडं आपण द्यायचं म्हटलं ना, तर साला वाटेल तेवढं देऊ ! एकदा कबूल केलं का मग त्यात खळखळ म्हणून नाही. (मागे बघत) पण सांगतो, हे हॉटेलवाले म्हणजे—

**मी** जागा—जागेचं बोलू आपण. भाडं पस्तीस. आणि जागा तशी बरी आहे तुला सांगतो—

**कानविंदे** समजलं रे. आपण एकदा ठरवलं का ठरवलं ! काय ? मग वेळ पडली तर गोठ्यातसुद्धा राहायला कमी करणार नाही !

**मी** गोठ्यात ? नाही, पण ही खोली खरंच बरी आहे—एकदा पहाच तू.

**कानविंदे** काय गरज नाही. घेतली आपण.

**मी** नाही, पण वहिनींना घेऊन येच—त्यांना एकदा दाखवलेली बरी, काय ? तर कधी येतोस ? सांग !

**कानविंदे** काय गरज नाही. दोस्ती म्हणजे दोस्ती. जागा घेऊन टाकली.

**मी** न बघताच ? म्हणजे गैरसोय तशी नाही म्हटलं तर आहे—म्हणजे खोली लहान आहे.

**कानविंदे** समजलं रे. घेतली म्हणालो ना एकदा ?

**मी** नाही, पण मोरी—बाहेर आहे—आणि इलेक्ट्रिक मीटर ना, कॉमन आहे—कॉमन म्हणजे काय, तुझ्यामाझ्यात कॉमन—हो—

**कानविंदे** घेतली समज. साला आहे काय त्यात एवढं !

**मी** (प्रेक्षकांना) शंकरू कानविंदे तेव्हा खरोखरच नवी जागा मिळवण्याच्या अगदी हातघाईला आलेला होता आणि घरातून वेगळी सोय बघण्याची अर्जंट नोटीस त्याला नुकतीच मिळालेली होती हे मला नंतर कळलं. (कानविंदेला) पण जागा एकदा बघ तू—मी सांगतो तुला, ऐक—वहिनींना दाखव आणि मग सांग—काय ? म्हणजे मोरीचं ते—

**कानविंदे** समजलं रे.

**मी** इलेक्ट्रिक मीटर—

**कानविंदे** एक तारखेला सामानच आणून टाकतो. काय ?

**मी** तीन—तीन महिन्यांचं भाडं ॲडव्हान्स—

**कानविंदे** कबूल रे बाबा. एकदा मनात आणलं तर दहा महिन्यांचं पण देऊ ! आहे काय त्यात ? जागा घेतली. साला भावांचा नक्षा उतरवतो. त्यांना वाटलं काय साला ? जागा जागा म्हणजे आहे काय ? मनात आणीन तर पन्नास जागा मिळवीन—

[दोघे उठतात. कानविंदे खुर्ची सरकवीत छत्रीसकट त्याच्या भागात निघून जातो.]

**मी** (प्रेक्षकांना) अशी झाली सुरुवात. आणि मग एक तारखेला प्रातःकाली शिवशंकर जटायू कानविंदेनं सामानासह येऊन आमच्या शेजारी आमच्या निमंत्रणावरून प्रस्थान ठेवलं. ही अशी आमची जागा. पलीकडे त्याची खोली. मध्ये दार.-हे दिवसा उघडं ठेवायचं असा माझा बेत. म्हणजे मित्रच आम्ही—मजेत घालवू म्हटलं दिवस. खेळीमेळीनं—गप्पाटप्पा, पत्ते, एकत्र जेवणं, चहा, सहली, सिनेमानाटकं— आयुष्य म्हणजे अखेर असं केवढं आहे ?

[कानविंदे त्याच्या भागात खुर्चीत बसलेला, दात कोरीत, कान साफ करीत, वगैरे.]

बैलगाडीतून त्याचं सामान आलं तेव्हा ऑफिसला जायच्या गडबडीत सामान उतरवून घ्यायला

मदत केली मी. म्हणजे भांड्यांचा गोण— (तो कपड्यांची इस्तरी जपत कसाबसा उचलून नेल्याचे दाखवतो.) घडवंची— (तसे दाखवतो.) पत्र्याचे डबे— (एक डबा मध्येच आपसूक उघडून अंगावर पीठ वगैरे सांडल्याचा आविर्भाव.) वळकटी—म्हणजे इतकी मदत केली मी की हमाल करण्याचं शंकरला सुचलंच नाही ! किंवा सुचून रद्द केला असावा त्यानं तो बेत. त्यानं नि मीच बहुतेक सामान उतरून घेतलं. मदतीला वहिनी होत्या. (लहानलहान वस्तू मोठ्या असल्याचे दाखवीत नेणारी शंकरची बायको आविर्भावाने दाखवतो.) 'ही' स्वैपाकाच्या घाईत होती. तिनं नुसतंच सामान काय काय आहे तेवढं तेवढ्यातल्या तेवढ्यात खिडकीवाटे बारकाईनं बघून घेतलं. दुसऱ्याच्या घरातल्या सामानावर बायकांची एवढी नजर का, राम जाणे ! मग मी गडबडीनं ऑफिसला पळालो, पण खोली लावायला 'ही' गेली होती—जातीनं. म्हणजे त्या निमित्तानं, नजरेतून काही सुटलं असेल तर कळायला बरं ! काय ! ('ही' होत) अय्या, टेबल जुनंच आहे नाही तुमचं ? आणि हे काय ! आरामखुर्चीचं कापड फाटलेलं शिवलंय वाटतं ! आमच्याकडे ना, स्टीलची आहे, लिबर्टीची ! रेडियो नाही वाटतं तुमच्याकडे ? आमच्याकडे जी. ई. सी.चा आहे !...

सासऱ्यांनी माझाच मित्र म्हणून शंकऱ्याकडून ॲडव्हान्स एक महिन्याचाच घेतला होता. मीसुद्धा उत्साहात होतो. आवळ्याजावळ्या मित्रांसारखं लाइफ काढायची स्वप्नं ऑफिसात बसून रंगवीत होतो. संध्याकाळी ऑफिसमधून घरी आल्यावर फाटकापासूनच मी शंकरला हाका घातल्या. (हाका घालतो.) वहिनी म्हणाल्या,

('वहिनी' होत) घरात नाहीत.

म्हटलं, नसेल. गेला असेल विरजणाला दही, नाहीतर खिळे, चुका, इलेक्ट्रिकचे बल्ब—असं काहीतरी आणायला. बाकी तेसुद्धा इतक्या तातडीने आणण्याची गरज नव्हती. मी होतो ना शेजारी ! पण 'तत्त्वाचा प्रश्न' म्हणून गेला असेल स्वतःच सगळं खरेदी करायला. किती झालं तरी शंकरू तो शंकरूच ! घरात शिरलो तर मधलं दार बंद होतं. मी जाऊन आधी दार उघडलं. (दार उघडतो.) हिनं जाऊन बंद केलं. ('ही' जाऊन बंद करील तसे करतो.) मी म्हणालो,

**(मी)** हे काय ? दार का बंद केलंस ? यानंतर दिवसा ते उघडंच असत जाऊ दे. (उघडायला जातो.)

**(ही)** (त्याला अडवीत) अहो, उघडू नका. आणि मला नका सांगू काही. शंकरभावजींना सांगा.

**(मी)** ते काय म्हणून ?

**(ही)** दुपारीच दार बंद करून घेतलं त्यांनी; आणि विचारीत होते, त्यांच्या बाजूला कडी का म्हणून नाही ? सुतार आणायलाच गेलेत ते.

**(मी)** सुतार ?

**(ही)** हो, तर मग काय लोहार ?

**(मी)** अग पण—

**(ही)** काही सांगू नका. तऱ्हेवाईकच आहे तुमचा मित्र.

**(मी)** का ? आणखी काय झालं ?

**(ही)** झालं डोंबल ! बाहेरच्या अंगणात खडूची रेघ ओढल्यानी एक. आणि मला म्हणाले, तेवढं ते अंगण तुमचं; इकडलं आमचं आहे.

**(मी)** आणि मग ?

**(ही)** मग काय ? 'त्यांच्या' अंगणात मोलकरणीचा राखेचा डबा ठेवलेला होता तो ती घेऊन येऊ लागली तर म्हणाले, 'आजच्या पुरतं खपवून घेतोय. उद्या आलीस तर फिर्याद करीन !'

**(मी)** फिर्याद ?

**(ही)** बाहेरच्या त्या आपल्या संडासाच्या दारावर बघा काय लिहून ठेवल्यानी आहे !

**(मी)** काय ?

**(ही)** सकाळी सात ते आठ कानविंदे कुटुंबासाठी राखीव ! आणि बाथरूमला तर कुलूपच घातल्यानी आहे. मोलकरणीची भांडी घासायची पंचाईत झाली !

**(मी)** पण—म्हणजे—छेः ! मूळचाच चक्कर शंकरू म्हणजे ! हे बघ, तसं काही विशेष नाही. होईल सारं व्यवस्थित. त्याला जरा माणसाळवला पाहिजे. काय ?

**(ही)** मग सध्या ते कोण आहेत ?

**(मी)** म्हणजे माणूसच आहे—पण चांगल्या माणसात स्वतंत्रपणे प्रथमच राहातोय ना तो या निमित्तानं ? जरा चुचकारून घेतलं पाहिजे. तू काही काळजी करू नकोस. हां ? मी बघतो सगळं.

(प्रेक्षकांना) जेवायला रात्री दोघांनी आमच्याकडे राहायचं असं सकाळीच मी बजावून ठेवलं होतं. शंकर बाहेर गेला होता तो आला, पण त्याला सुतार मिळाला नसावा. तो एकटाच आला. दरम्यान मधलं दार उघडून त्याच्या बिऱ्हाडात जाऊन मी त्याचं बिऱ्हाड, वहिनींकडे सगळं नीट जमलं ना वगैरे आस्थेनं विचारीत, पाहून घेतलं होतं. अंगणातही हिंडलो होतो. 'सकाळी सात ते आठ कानविंदे कुटुंबासाठी राखीव' ही नोटीस नजरेखाली घातली होती. बाथरूमचं कुलूप बघून घेतलं होतं. शंकर आला तेव्हा मी त्याच्याच अंगणात उभा होतो.

[कानविंदे येतो.]

**(मी)** ये, ये शंकरू. बिऱ्हाडात नजर टाकत होतो तुझ्या. वहिनींनी लावलंय मोठं टापटिपीत बरं का. आता जेवायला आमच्यांकडेच—काय ?

[कानविंदे हुप्प उभा.]

अनमान नाही करायचं—आलंच पाहिजे दोघांनी—मग हवे तर आम्ही पण येऊ ! हो ! त्यात काय एवढं ?

[कानविंदे हुप्प उभा.]

शेजारी शेजारी आलो आहोत तर मजा करून घेऊ.

[कानविंदे हुप्प.]

(प्रेक्षकांना) शंकर बोलायलाच तयार नव्हता. तो नुसताच माझ्या पायांकडे आणि खडूच्या रेषेकडे पाहात होता. अखेर माझ्या लक्षात आलं की त्याच्या अंगणात रेषेच्या पलीकडे चांगला सहाएक इंच मी उभा आहे ! म्हणून गडबडीनं आमच्या अंगणात सरकून उभा राहिलो आणि शंकरू लगेच जरा उजळला. दोघं मग जेवायला होती.

[कानविंदे आणि 'मी' जेवायला बसल्यासारखे बसतात.]

पण शंकऱ्याची आळीमिळी गोपचिळी !

[जेवत्या कानविंदेला दोनचारदा न्याहाळून मग]

काय रे, जेवण आवडलं नाही वाटतं ?

**कानविंदे** उंहूं.

**मी** (प्रेक्षकांना) जेवण फक्कडच झालं होतं;—म्हणजे निव्वळ आपलं माणूस म्हणून म्हणत नाही ! (जेवत) मग ? तब्बेत बरी नाही वाटतं ? का शीण आलाय घर लावण्याचा ? घे, मटारभात घे ना आणखी. घे रे—काही नाही जास्त होत—वाढ ग याला—

**कानविंदे** नको !

**मी** अग वाढ तू—नको काय नको—

**कानविंदे** मी टाकीन ! मला नकोय !

[दोघे पुन्हा न बोलता जेवत रहातात. कानविंदे हुप्पच.]

**मी** त्याच वेळी मी ओळखायला हवं होतं की जेवणात नाही तरी तत्त्वात काहीतरी बिनसलं ! पण आम्हांला नाहीच जर बापजन्मी ठाऊक ते तत्त्व वगैरे कशाशी खातात ते, तर ओळखणार काय कपाळ ? मी हात मारून मटारभात खाल्ला. जेवण उरकलं. (झक्कपैकी ढेकर देतो.)

[दोघे उठतात. कानविंदे हात पुसत सरळ दारावाटे त्याच्या भागात निघून जातो. पुन्हा खुर्चीत बसून राहतो वेटोळे घातल्यासारखा.]

त्याची नि माझी बायको जेवून बसल्या होत्या त्या तशा अंगणात काहीतरी गप्पागोष्टी करीत—

**कानविंदे** शांता—शांता—

**मी** (ओरडून) असू देत रे—मारू देत ना जरा गप्पा मारतायत तर दोघी—आणि तू तिकडे काय करतोयस एकटाच ? इकडे ये इकडे—

**कानविंदे** (पुन्हा तसाच) शांता—मी हाका मारतोय. शांता—ए शांता—शांता—

**मी** (प्रेक्षकांना) अखेर वहिनी बिचाऱ्या रंगलेल्या गोष्टी टाकून उठल्या आणि मुकाट्यानं गेल्या. तेव्हा हिनंही ओळखलं की काहीतरी फारच बिनसलंय.

[कानविंदे येऊन मधले दार खाडकन लावतो.]

तरी मी स्वतःची समजूत घालीतच होतो की पहिलाच दिवस आहे त्यामुळं थोडंसं असं चालायचंच. पुन्हा शंकरूची स्वातंत्र्याची पहिली रात्र म्हणूनही झाली असेल घाई त्याला लौकर सगळं आवरण्याची...असं मानून मी झोपलो. पण नंतर बराच वेळ पलीकडे शंकरू एकटाच तसा बसलेला होता—

[खुर्चीत वेगळ्या पद्धतीने वेटोळे घालून बसलेला कानविंदे.]

—असं 'ही' दुसऱ्या दिवशी सांगत होती ! म्हणजे काय आहे की मधल्या दाराला फट आहे !

दुसऱ्या दिवशी सकाळच्या चहाला त्यांच्याकडे जायचं असं वहिनींचं नि 'हि'चं आदल्या दिवशी दोनप्रहरीच म्हणे ठरलं होतं असं ही म्हणाली म्हणून आम्ही लौकर सगळं उरकून—

[आंघोळ करीत, बेसूर गाणे म्हटल्याचा अभिनय. तांबे ओतणे, 'ललललला' वगैरे.]

कानविंद्याचं दार ठोठावलं—

(मधले दार ठोकून) वहिनी, उठलात काय ? आम्ही तयार आहोत. (प्रेक्षकांना) म्हणजे काय आहे की आदल्या दिवशीचं दुसऱ्या दिवशी आधीच माझ्या फारसं लक्षात राहात नाही. त्यात शंकरूला माणसात रुळवण्याचा उत्साह होता—(दार ठोकून) वहिनी, कधी यायचं चहाला ? रायगडाला जाग आली काय तुमच्या ?

नो रिप्लाय.

(पुन्हा दार ठोकतो.) ए शंकऱ्या, अरे रात्र संपली—दिवस उजाडला ! का दिवसाची रात्र करणारायस ? (प्रेक्षकांना) हे दोस्तीखातर ! एरवी सहसा आपण सदभिरुचीला सोडून बोलणारे नव्हेत !

नो रिप्लाय !

काय करावं आम्हांला दोघांनाही काही कळेना. 'ही' म्हणाली,

**(ही)** राहू द्या ना. नाही तर नाही ओ देत ! नसेल द्यायची तर नका देऊ म्हणावं ! हा—हा तुमचा मित्र ! माणूसघाण्या !

**(मी)** गप ग. मी करतो बघ बोलका त्याला. (दार ठोकून) ए शंकऱ्या, लेका चहाला यायचं का नाही आम्ही ? शंकरू !

नो रिप्लाय !

[पलीकडे कानविंदे खुर्चीत कान खाजवीत बसलेला.]

अखेर चहा आम्ही आमच्याच घरी घेतला. त्या निमित्तानं हेही लक्षात आलं की रात्रीत काहीतरी खटपट करून त्यानं त्याच्या बाजूनं काहीतरी अडसरबिसर लावून मधलं दार बंद राहाण्याची खात्रीलायक व्यवस्था करून टाकली होती ! आपला तर दिल बडा परेशान होऊन गेला ! कसातरी जेवलो. कपडेबिपडे करून ऑफिसला निघालो. (हे सर्व कसे ते दाखवतो.)

[कानविंदे उठून निघालेला.]

बाहेर पडतो तर अंगणात गाठच पडली—

[दोघे समोरासमोर येतात.]

**मी** (लटके हसत) काय रे शंकरू—

**कानविंदे** ऊं.

**मी** कुठे ऑफिसलाच निघालास ना ? चल—बरोबर जाऊ—

**कानविंदे** ऊं—नको. मला जरा उशीर आहे—

**मी** हात्तीच्या ! मग मी थांबतो की हवा तर दोनचार मिनिटं. अं ? जरा अर्लीच निघालोय आज ! (घड्याळ पाहत) सव्वाचार मिनिटं—

**कानविंदे** मला पाच मिनिटं लागतील.

**मी** एवढंच ना ? मी थांबतो. मिनिटभरानं काय फरक होणाराय ?

**कानविंदे** नको जा तू. मला जास्त टाइमसुद्धा लागेल. (तोंड विरुद्ध दिशेला करून उभा.)

**मी** (प्रेक्षकांना) आता काय करणार ? मी गेलो. मागोमागच तो आला—शंकऱ्या—पण स्वतंत्रपणे ! ऑफिसमध्ये दिवसभर जिवाला मग एकच बोच की हे असं काय झालं ? म्हणजे चांगुलपणानं वागायला जावं त्याची ही अशी खडूसपणानं परतफेड ? अरे मी याचं असं काय घोडं मारलं ? तेसुद्धा एकाच दिवसात ! संध्याकाळी घरी आलो. 'ही' वाट पाहत होती. म्हणाली,

[कानविंदे त्याच्या खुर्चीत.]

**(ही)** आज दिवसभर भावजी घरी नव्हते तरी मधलं दार बंदच होतं.

**(मी)** ते का ?

**(ही)** दार उघडशील तर हात मोडीन, अशी धमकी होती घरात भावजींची !

**(मी)** काय ? हात मोडीन ?

**(ही)** हो. मी खोदूखोदून विचारलं तेव्हा बोलल्या शांताबाई. म्हणाल्या, त्यांच्याकडे बोलू नका. मेलं कसलं एकटंएकटं वाटत होतं दिवसभर ! त्या तिकडे नि मी इकडे. ते काही नाही, आधीचंच बिऱ्हाड चांगलं होतं—मित्र म्हणून ही नसती पिडा मात्र शेजारी आणून ठेवलीत !

**(मी)** आत्ता कुठाय तो ?

**(ही)** लौकर आले आज हापिसातनं—येताना सुताराला घेऊन आले आणि पलीकडली कडी पक्की करून घेतल्यांनी. मेला केवढ्यांदा ठोकाठोक करीत होता ! मग मजुरीच्या दोन आण्यासाठी अर्धा तास हुज्जत घालींत होते त्याच्याशी. म्हणत, प्रश्न आण्यांचा नाही, तत्त्वाचा आहे ! कसल्याकसल्या शिव्या देऊन गेला तो—तुम्ही यायच्या जरा आधीच गेला—

**मी** (उसासून) अस्सं. (प्रेक्षकांना) प्रश्न सत्त्वाचा होता—आमच्या ! माझं डोकंच गेलं.

मी सरळ गेलो तो शंकरूच्या दारावर, मधल्या. मुद्दामच ! आणि (जाऊन दार ठोठावत राहतो जोरजोराने.)

**कानविंदे** (बसल्या जागेवरून) कानेल बंद करा.

**मी** कानेल म्हणजे काय दार आहे काय, सुतार आणून बंद करायला ?

(दार ठोकत राहतो.)

**कानविंदे** याचा परिणाम बरा होणार नाही !

**मी** यानं घाबरायला मी म्हणजे काही वहिनी नाही. हिंमत असेल तर ये इकडे दार खोलून ! (दार ठोकतो.)

**कानविंदे** हे सहन केलं जाणार नाही !

**मी** मग बसा आखत अंगणात खडूच्या रेघा ! वाटल्यास संडासाच्या दारावर लिहीत बसा ! (दार ठोकतो.)

**कानविंदे** (उठत) आय विल नॉट टॉलरेट धिस !

**मी** बसा बोंबलत ! (दार ठोकतो.)

[शेवटी खाडदिशी दार उघडून कानविंदे समोर उभा.]

**मी** (प्रेक्षकांना) शंकरूला ते तसं पाहिल्यावर मला गंभीर राहाणं अशक्यच होतं. आपण चक्क हसलो !

**कानविंदे** (तावातावाने) व्हाय डु यू लाफ ?

**मी** हास्यास्पद गोष्टी दिसल्यावर दुसरं काय करायचं ?

**कानविंदे** (घुसमटल्यासारखा होऊन) गुण्या, आय—आय विल नॉट—टॉलरेट—आय टेल यू—

**मी** अरे पण मग हे सगळं काय आहे काय, आं ? का हे असं ? कळू दे की आम्हांला. काय असेल ते मोकळेपणानं बोलायचं टाकून हे रे काय चालवलंयस गाढवासारखं ?

**कानविंदे** (थरथर कापत) यू शटप !

[खाडदिशी दार लावून घेतो. खुर्चीत जाऊन बसतो आणि लिहू लागतो जोरजोराने काहीतरी. आठवून आठवून लिहितो. पेन झाडझाडून लिहितो.]

**मी** (आपल्या खुर्चीत येऊन बसून प्रेक्षकांना) म्हणजे असं काही व्हावं असा माझा दार ठोठावण्यामागं खरं म्हणजे हेतू नव्हता. सगळं मिटवून टाकावं हीच इच्छा. पण प्रकरण जास्तच चिघळलं. कुठून झक मारली नि या फंदात पडलो असं मला नि 'हि'ला होऊन गेलं. म्हणजे लांब होतो तेच ठीक होतो ! पण खरं तर सगळं अजून पुढेच होतं. घोडामैदान !

सकाळी जागा होतो (तसा खुर्चीतून उठून आळस देत उभा राहातो.) तो ही आलीच. हिच्या चेहऱ्यावर भयंकर एक्साइटमेंट होती.

**(ही)** अहो—हे बघा काय आलंय !

**(मी)** (आळसातच) काय आलंय ? बघू—

(प्रेक्षकांना) ते होतं बंद पाकीट. चांगलं जाडजूड. वर नाव माझं आणि थत्त्यांचा बंगला, दोनशे ब्याण्णव अपॉन तेत्तीस, सदाशिव, पुणे दोन वगैरे सगळं कंप्लीट !

**(मी)** कुणी दिलं हे ?

**(ही)** दिलं कुठे ! आलं.

**(मी)** अग पण आलं कसं ?

**(ही)** कसं म्हणजे दाराखालून—मधल्या. सकाळी केर काढीत होते तर खालून हळूच येऊन पडलं !

[कानविंदे त्याच्या खुर्चीत सिगरेट फुंकीत बसलेला.]

**(मी)** येऊन पडलं ?

**(ही)** शप्पत !

(प्रेक्षकांना) दाराखालून—त्या—मधल्या. नक्की शंकऱ्याचाच हा नवा खडूसपणा हे कळायला मग मुळीच वेळ लागला नाही. शेजारी राहून पत्र ! बंद पाकिटातून ! दोनशे ब्याण्णव अपॉन तेत्तीस वगैरेसकट ! नशीब, पोस्टाची तिकिटं नव्हती लावलेली ! मी ते फोडलं. वाचू लागलो. (वाचतो.)

[कानविंदे प्रेक्षकांकडे पुढा करून बसतो.]

रा. रा. जी. एस. घाटपांडे यांस—(प्रेक्षकांना) जी. एस. ? अरे इतके दिवस साल्या गुण्या हा रिवाज आणि जी. एस. ? आणि वर रा. रा. ? आपलं तर डोकंच तडकलं. पण वाचत राहिलो; पुढं आणखी काय काय दिवे पाजळले आहेत शंखानं ते बघण्यासाठी. (वाचत) कृ. सा. न. वि. वि. पत्र लिहिण्यास कारण की—(प्रेक्षकांना) पत्र ! शेजारच्या खोलीतून ! दाराखालून ! (हाताने दाखवतो. मग पुन्हा वाचत) आपले श्वशुर रा. रा. डी. जी. तथा नानासाहेब थत्ते—(प्रेक्षकांना) 'तथा' बरं का ! (वाचत) यांचे बंगल्यात आम्ही—(प्रेक्षकांना) घ्या ! शंकऱ्याचा 'आम्ही' झाला ! आपल्या तळपायाची आग मस्तकाला पोचली. अरे स्वतःला कोण 'टाइम्स ऑफ इंडिया'चा का 'केसरी'चा संपादक समजतो हा तिरशिंगराव ? 'आम्ही' म्हणे ! (वाचत) काल दिनांक ऊं...ऊं...पासून कायदेशीर भाडेकरू म्हणून राहात आहो. (प्रेक्षकांना) होय का ? म्हणजे मीच आणून ठेवला आणि वर मलाच ऐकवतो हा ! 'राहात आहोत !' (वाचत) योगायोगानेच आपण आमचे शेजारी आहा. (प्रेक्षकांना) काय ? योगायोगानं ? मी योगायोगानं याचा शेजारी ? (वाचत) गेले दोन दिवसांत आपणाकडून आमच्या खालील चौतीस आगळिका घडल्या त्या येणेप्रमाणे. (प्रेक्षकांना) किती ? चौतीस ? दोन दिवसांत चौतीस ! म्हणजे एवढ्या याच्या आगळिका करायला हा कोण पडदानशीन स्वरूपसुंदरी लागून गेला आणि मी तरी कोण असा मवाली पडलो होतो ? (वाचत) आगळीक क्रमांक एक : आपण आपली आणि आमची खोली खोली यामधील दार वेळीअवेळी ठोकता. (प्रेक्षकांना) अरे पण गाढवा, चहाला बोलवून

आयत्या वेळी तुम्ही दाद देत नाही त्याचं काय ? (वाचत) याने आमच्या मनःस्वास्थ्याचा भंग होतो ! (प्रक्षकांना) आणि तुमच्या वागण्यामुळं आमच्या डोक्यात इथे किडे पडतात त्याची काही कदर ? (वाचत) दोन : आमचेविषयी सार्वजनिक रित्या अनुदार आणि असभ्य उद्‌गार काढून आमची बदनामी करता ! (प्रेक्षकांना) याची आणि माझी बायको म्हणजे काय सार्वजनिक ? आणि अनुदार उद्‌गार म्हणजे काय काढले ? रोजच्या बैठकीत तर आम्ही एकमेकांना गाढव आणि हलकट म्हणत आलो ! (वाचत) आगळीक क्रमांक तीन : आम्हांस मनस्ताप व्हावा अशा पद्धतीने आपण आणि आपले कुटुंबीय (प्रेक्षकांना) घ्या ! 'ही' म्हणजे आमची 'कुटुंबीय' ! (वाचत) निरनिराळे आवाज करून आमच्या शांततेस बाध आणतात. आवाज ? असले आवाज ? (एकदा डोळे झाकून पुन्हा वाचत) चार : कामाचे वेळी गाठून निष्कारण वेळ घेता. पाच : उसनवार दिलेल्या वस्तू आम्ही जसे काही परत करणारच नाही असे समजून अशिष्टपणे परत मागता. (प्रेक्षकांना) मग घरात आम्हाला चहा गाळायला गाळणं लागल्यावर आम्ही आमचंच गाळणं तुझ्याकडे कसं परत मागायचं, ''मेहेरबानास जाहीर व्हावे की'' असं म्हणून लोटांगण घालीत ? अशा एक नाही, दोन नाही, चौतीस आगळिका ! पत्र वाचून हैराण झालो. 'तरी याचा ताबडतोब बंदोबस्त व्हावा ही निर्धारपूर्वक प्रार्थना. आपला सभ्य' हा शेवट—पत्राचा ! आणि आरंभी, पत्राच्या टाळक्यावरच 'जावक क्रमांक एक' ! जावक क्रमांक ? म्हणजे शंकऱ्या कानविंदेनं माझ्याशी पत्रव्यवहाराचं खातंच उघडलं होतं का काय या जाणिवेनं मी पुरताच भुईसपाट झालो—हसून हसून ! अहो, शेजारी राहून जावक क्रमांक एक ? आणि चौतीस कलमं ? काय हा कागदांचा नि शाईचा अपव्यय ! हिनंही पत्र वाचलं. म्हणाली,

**(ही)** हसावं की रडावं तेच मेलं कळत नाही ! मी म्हणते, आता सरळ सरळच एकदा बोलून तरी टाकावं काय ते. हा काय तो पोरखेळ ?

**(मी)** अग पण मी म्हणतो, त्या गद्धयाला नव्हतं भेटता येत मला, हे कागद असे उगाच नासण्याऐवजी ? मधल्या दाराखालून पत्र ! दोनशे ब्याण्णव अपॉन तेत्तीस सदाशिवसकट ! आणि योगायोगानं म्हणे तुम्ही आमचे शेजारी आहा ! तुला सांगतो, योगायोगानंच हा शंकरू माणसाच्या जन्माला आला ! (हसत राहतो पोट धरून.)

**(ही)** हसता काय ? प्रकरण फार गंभीर आहे हे. तुम्ही भेटा बरं त्यांना. जळात राहून उगीच माशाशी जळ्ळं वैर !

[कानविंदे त्याच्या खुर्चीत जोरजोराने लिहीत बसलेला.]

**मी** (प्रेक्षकांना) हो-ना करता संध्याकाळी रा. रा. शंकरू 'तथा' एस. जे. कानविंदे यांच्याकडे गेलो. (मधले दार दाखवीत) तसा नव्हे—(बाहेरचा मार्ग दाखवतो.) तसा—रीतसर—(तसा वळसा घेऊन उभा राहतो.) दार वगैरे वाजवलं—जपून. हो, उगीच चौतिसात आणखी पस्तिसावं नको ! वहिनींनी दार उघडलं. त्या जरा हसल्या—अशा—न हसण्याची ऑर्डर वगैरे असल्याप्रमाणं. मी सरळ आत घुसलो—उगाच आम्हांला 'या' म्हणण्याचा गुन्हा त्या साध्वीला कशाला करायला लावा ? आत घुसलो तर शंकर काहीतरी

लिहिण्यात बुडाला होता.

[जिभेला पेन लावून कानविंदे लिहितो आहे.]

प्रथम त्यानं माझी दखलच घेतली नाही. म्हणजे तसं दाखवलं. मग मीच म्हणालो, "काय रे शंकरू—" तशी फंड मागायला गोरक्षण संस्थेची गाय मध्यरात्री बेडरूममध्ये येऊन समोर उभी राहावी तसं शंकऱ्यानं माझ्याकडे पाहिलं. त्याचे गाल आणखीनच हुप्प झाले.

[कानविंदे तसा बसतो.]

**मी** काय शंकर, काय चाललंय ?

**कानविंदे** ऊं.

**मी** नाही, जोरदार लेखन करतोयस—

**कानविंदे** हूं.

**मी** (प्रेक्षकांना) दीर्घ आणि तंग स्तब्धता. आता मी: (कानविंदेला) नाही, हे पत्र आलं तुझं— (प्रेक्षकांना) नाइलाजानं आणि आणायचं नाही असं ठरवूनदेखील चेहऱ्यावर हसू आलंच !

**कानविंदे** (फुगल्या गालांनीच) मग ?

**मी** मग काय ? मी काय म्हणतो, अरे तसं काही असलं तर सरळ भेटून बोलावं की—अं ? उगाच शाईचा नास कशाला ? आणि पाकिटाचा तरी ? कसं स्वच्छ पाकीट होतं ! हॅः ! एक आणा तरी पडला असेल याला. पुन्हा वेळ वाया गेला तो गेलाच.

**कानविंदे** तुमचा नाही ना गेला ? मग झालं तर !

**मी** (प्रेक्षकांना) तुमचा ? बहुवचन ? अनादरार्थी ? (कानविंदेला) तसं नव्हे रे, उगाच मित्रामित्रात आणि तेदेखील असं शेजारीशेजारी राहून हे— (पत्र दाखवीत) हे असलं कशाला ? (प्रेक्षकांना) पुन्हा माझ्या चेहऱ्यावर हसू फुटलंच. (कानविंदेला) आणि चौतीस कलमं ? शंकऱ्या, लेका, चौतीस ? दोन दिवसांत ? आणि मधल्या दाराखालून पत्र ? दाराखालून ? दोनशे ब्याण्णव अपॉन तेत्तीस सदाशिव पत्त्यासकट ? (पोटभर हसून घेतो. डोळ्यांत पाणी जमेस्तोवर हसतो.)

**कानविंदे** (आणखीनच घुसमटत) हा—हा अपमान होतोय माझ्या—भावनांचा.

**मी** नाही रे. अरे अपमान कसला घेऊन बसलास वेड्या ? कुणी नाही तुझा अपमान करीत !

**कानविंदे** (स्फोट व्हावा तसा) काय असेल ते लेखी पाठवा ! (ताडताड निघून जातो.)

**मी** (प्रेक्षकांना) पांडवांच्या दरबारात अपमान झाल्यासारखा शंकरू कानविंदे पाय आपटीत बाहेर निघून गेला. आत जायला त्याला जागाच नव्हती. एकच खोली ! मग तिथं तसं राहण्यात अर्थ नव्हता. म्हणून मी वहिनींना म्हणालो, "बरं वहिनी, येतो." त्याही चिमणीएवढं तोंड करून म्हणाल्या, "बरं." आणि निघून आलो. येताना ते पत्र तिथंच ठेवलं.

त्याचं दुसरं काय करणार ? एकूण प्रकरण मिटण्याऐवजी जास्तजास्त चिघळतच चाललं होतं. संध्याकाळी ऑफिसातून घरी येतो तो जावक क्रमांक दोन ! आणि कलमं अ ते क्ष पर्यंत ! शिवाय दोन पोटकलमं. हिनं विचारलं,

**(ही)** काय लिहिलंय यात ?

**(मी)** कप्पाळ !

**(ही)** अहो, म्हणजे काय लिहिलंय ?

**(मी)** वचनभंगापासून ट्रेसपासपर्यंत सर्व !

**(ही)** अय्या वचनभंग ?

**(मी)** हो, मोरी आणि मीटर सोडून बाकी सर्व स्वतंत्र असं आपण—म्हणजे मी—म्हटलंत आणि मग मधलं दार सामायिक काय म्हणून ?

**(ही)** पण त्याला आता आपण काय करणार ?

**(मी)** काही नाही. हा वचनभंग ! त्यानंतर मालकांचे जामात आणि नियुक्त प्रतिनिधी म्हणून काही तातडीच्या मागण्या : साध्या माणुसकीसाठी तरी खोलीत बाथरूम, निदान एक मोरी घालून हवी; स्वतंत्र मीटर पाहिजे; रंग लावून हवा; खिडकीबाहेरची फुलझाडे वारा अडवतात ती छाटा; वायव्येकडील खिडकीचे बिजागर ढिले झाले आहे ते बसवा; ईशान्येकडील भिंतीचे पोपडे निघतात; नैर्ऋत्येकडील अमक्याचे तमके होते—आणि शेवटी ट्रेसपास ! आज उदईक आगाऊ परवानगी घेण्याचा सामान्य सभ्यपणादेखील न दाखवता आपण आमचे जागेत जे बेकायदा अतिक्रमण करून शांतताभंग केलात त्याबद्दल आपल्यावर कायदेशीर इलाज का करू नये ?

**(ही)** अय्या ! कायदेशीर ? आणि मग आता ?

**(मी)** आता काय ? एवढ्यानं कुठं संपलंय ? पुढे आमच्या सरहद्दींचा भंग आपण व आपल्या माणसांकडून खालील एकवीस वेळा झाला, हे पोटकलम.

**(ही)** सरहद्दी ?

**(मी)** हो—अंगणातल्या ! खडूनं आखलेल्या. (डोके धरून बसतो. मग एकदम) थांब ! आता मीसुद्धा या खलित्याला एक उत्तर लिहितो ! खलित्यास प्रतिखलिता—राजनैतिक युद्ध ! आण, पेन आण आधी माझं; नि कागद घे दोनचार तिकडचे. दाखवतोच त्या शंकऱ्याला गाढवाला—

(प्रेक्षकांना) हिनं भराभर पेन आणून दिलं, कागद दिले. मी कॉटवर असं वीरासन वगैरे घालून बैठक मारली आणि 'ही' अशी माझ्या मागं मला उत्तेजन देण्यासाठी उकिडवी बसली. ''हं, लिहा. चांगलं जोरदार होऊ दे ! खोड मोडा त्याची !'' कारण आता खलित्याचा हल्ला एकट्या माझ्यावर नसून बंगल्याच्या मालकांवर, म्हणजे तिच्या खुद्द वडलांवरसुद्धा होता ! ''चांगलं टिच्चून झालं पाहिजे उत्तर ! हं, लिहा.'' टांगेवाल्यानं घोड्याला ट्रूक, च्यक्, हाइट् वगैरे करावं तसं तिचं चाललं होतं. उत्तर तयार झालं. खरं म्हणजे ते मूळ पत्राइतकं जोरदार

नव्हतं. कारण लिहितानाच मुळी आम्हांला हसू लोटत होतं. माणुसकीसाठी खोलीत मोरी मागणाऱ्याला जोरदार उत्तर काय पाठवणार कप्पाळ ? आम्ही उत्तर लिहून एका पाकिटात बंद केलं. खरं म्हणजे हे पाकीट मूळ खलित्याचंच होतं— आणि वर रा. रा. शिवशंकर जटायू कानविंदे, इंडिया, कंसात भारत, खाली दोन लाल रेघा—असं लिहून दिलं मधल्या दाराखालून पलीकडे सरकवून. हे असं. (मधल्या दाराशी जाऊन पत्र सरकवतो खालून पलीकडे.) पण झालं काय, ते पुरतं पलीकडे जाईना. मध्येच अडकू लागलं. हातानं जाईना तेव्हा काठीनं ढकलून बघितलं. त्यानं भागेना म्हणून एक सळई आणून तिनं त्याला धक्के आणि ढुशा दिल्या. तरी तेच. मग 'हि'नं एक हिराची काडी आणली; आणि तिचे प्रयोग केले. (कसे ते दाखवतो.) एव्हाना पलीकडे शंकरू आणि त्याची बायको काय चाललंय ते न कळून दाराशी येऊन उभीच होती. अखेर बऱ्याच खटपटीनंतर पत्र पलीकडे गेलं एकदाचं. (हात झाडतो.)

[कानविंदे पत्र उचलून घेतो.]

'ही' दाराच्या फटीलाच नाक चिकटवून होती. त्यामुळं मला बघण्याचा चान्सच मिळाला नाही. पण तिनं सांगितलं ते सगळं एकत्र करून, पाखडून, गाळून आणि जोडून पाहता,

**कानविंदे** (पत्र वाचून चोळामोळा करीत) हुंः ! (चोळामोळा जमिनीवर आपटून त्याच्यावर पाय आपटीत राहतो.) नॉनसेन्स !

**मी** वहिनींनी त्याला विचारलं,

('वहिनी' होत) काय आहे त्यात एवढं ? काय झालं ?

**कानविंदे** झालं डोंबल ! नालायक साला ! तत्त्वच्युत साला !

**मी** (प्रेक्षकांना) एवढ्या दोनच शिव्या शंकरू त्यानंतर बराच वेळ देत होता; आणि पाय जायबंदी झालेल्या कोंबड्यासारखा खोलीभर यातनाग्रस्त मुद्रा करून फिरत होता.

[कानविंदे भराभरा फिरतो आहे.]

आता तुम्ही विचारल, एवढं लिहिलं तरी काय होतं आम्ही आमच्या खलित्यात ! हां, तर, वर जावक क्रमांक होता : एक ते एक हजार. म्हणजे तुमचे खलिते कितीही येवोत, त्यातल्या पहिल्या हजारांना आमचं हेच उत्तर ! पुढं कलमवार उत्तरं दिली होती. म्हणजे मधलं दार सामायिक असल्याचा आपला दावा धादांत खोटा व संपूर्ण दिशाभूल करणारा असून दाराच्या फळ्या आमच्या खोलीत उघडतात त्या अर्थी त्यावर सर्वस्वी आमचाच हक्क आहे आणि त्याला आपल्या अधिकारात कडी बसवून आणि लावून आपणच आमच्या हक्काची अत्यंत रानटी आणि अमानुष पायमल्ली केली आहे, तरी कडी ताबडतोब काढून न घेतल्यास दार का फोडू नये ? हे कलम 'अ'. नंतर कलम 'ब' : साध्या माणुसकीसाठी आपल्या खोलीत बाथरूम अथवा मोरीच काय पण हमामखानादेखील बांधून देण्यास आम्ही तयार आहोत. मात्र आपल्यापाशी सदरहू साधी माणुसकी असल्याची ग्वाही आपल्या अपरोक्ष आपल्या धर्मपत्नीने आणि मित्रांनी प्रथम दिली पाहिजे. कलम 'क' : बागेतील झाडांमुळे आपला वारा अडतो हा

निव्वळ कांगावा असून आपल्या खोलीवाटे येणाऱ्या 'तात्त्विक' झळेने झाडेच खुरटत असल्याचे आमच्या अलीकडे ध्यानी आले आहे. तरी आपली खिडकीच आपण कायम बंद ठेवावी. आणि सगळ्यात शेवटी बेकायदेशीर अतिक्रमणाच्या आरोपाला उत्तर होतं : यानंतर रोजच उदईक आम्ही आपल्या 'सरहद्दी'चा भंग करणार असून आपल्या 'खोलीत' अतिक्रमण करणार आहोत; इतकेच नव्हे तर सौ. वहिनींकडे चहादेखील मागणार आहोत; तरी जे करावयाचे असेल ते खुशाल करून घेण्यास आपण मुखत्यार आहा.

[संतप्त कानविंदे.]

दुपारी शंकरूच्या अपरोक्ष आमचा खलिता वाचून सौ. वहिनी स्वतःशीच खुदूखुदू हसत होत्या असा 'हि'चा संध्याकाळचा 'रपोट'. हे 'हिनं' फटीवाटे बघितलं ! मग काही नाही. दुसऱ्या दिवशी सकाळीच उठून

[आंघोळीचे ॲक्टिंग. मोठमोठ्यांदा गातो बेसूर, मध्येच ओरडतो, ''शांततेचा बऱ्यापैकी भंग होतोय की नाही रे शंकर ?'' पुन्हा गातो मोठमोठ्यांदा.]

सगळं उरकलं आणि आम्ही गेलो नि काय शंकरूच्या दारावर चालून ! दार उघडायला लावलं. ते उघडलं शंकरूनं. त्याचा चेहरा तेव्हा साधारण कसा दिसत होता ते पाहण्यासाठी थोडा वेळ हे इथलं मधलं दार शंकरूचं समोरचं समजा.

[दाराशी जाऊन उभा. दार ठोकतो. वारंवार, वेगवेगळ्या पद्धतींनी. दार उघडत नाही. अखेर इकडेतिकडे पाहून एक मोठा बांबू घेऊन येतो आणि त्याने दारावर धडक्या मारतो. दार उघडते. दारात कानविंदे महाभयंकर, यातनाग्रस्त चेहरा करून उभा.]

**कानविंदे** (बांबू बघून बाजूला होत, फुरंगटल्या मुद्रेनेच) कोण पाहिजे ?

**मी** (प्रथम बांबूसकट, पण मग बांबू बाजूला ठेवून दारावाटे आत शिरत प्रेक्षकांना) मागोमाग 'ही' होतीच.

[डोळे फाडून पाहणाऱ्या कानविंदेकडे कोऱ्या मुद्रेने पाहात आत सरकता सरकता एकदम जोराने शिंकतो. कानविंदे हेलपाटतो.]

(ओरडत) वहिनी, चहा टाका हो दोन कप !

[आत जाऊन कानविंदेच्याच खुर्चीत ऐसपैस.]

**कानविंदे** (नुसताच घुसमटलेला. मग कसाबसा) हे—हे ठीक नव्हे हां !

**मी** वहिनी, चहाबरोबर खायला करा हो !

**कानविंदे** (पुन्हा धुमसत प्रयत्नपूर्वक) याचा परिणाम वाईट होईल !

**मी** वहिनी, सावकाश बरं का. घाई मुळीच नाही. आम्ही बसतो !

**कानविंदे** यू—यू हॅव नो राईट टु सिट हिअर !

**मी** मग लिहा खलिता ! त्याचं उत्तर देण्यात येईल ! (शेजारच्या 'हि'ला) काय ग ?

**(ही)** होच्च मुळी.

**कानविंदे** यू—यू आर ॲडिंग ऑईल टु—स्मोक टु—

**मी** आम्हीदेखील दखल घेत नाही. लेखी कळवा ! (शेजारच्या 'हि'ला) काय ग ?

**(ही)** होच्च मुळी.

**मी** खलिता पाठवा खलिता ! मधल्या दाराखालून ! थ्रू प्रॉपर चानल ! वहिनी, चहा ! (प्रेक्षकांना) वहिनींनाही यानं जरा उमेद आली. त्यांनी मुकाट्यानं चहा करून दिला. शंकरसाठीही एक कप चहा त्यांनी आणला, पोहे आणून ठेवले.

(लांब जाऊन फुगून उभा राहिलेला कानविंदे.)

शंकरूनं काहीच घेतलं नाही. थोडा वेळ पुन्हा कोळशाच्या इंजिनसारखा फुसफुसून तो म्हणाला,

**कानविंदे** यू गेट आउट ! घर माझं आहे. आत यायचं काम नाही !

**मी** (प्रेक्षकांना) मी म्हणालो, जात नाही. जा कोर्टात. कायदेशीर इलाज कर कायदेशीर इलाज ! वहिनी, पोहे फक्कड झालेत, आणखी पोहे हवेत.

(उठून पुढे येत) बऱ्याच दिवसात खाल्ले नसतील असे मनसोक्त पोहे खाल्ले आपण त्या दिवशी. शंकऱ्याच्या वाटणीचेसुद्धा खाल्ले ! मग ? दोस्त होता आपला ! हां ! चक्कर होता ते सोडा. आणि अशी छाती नि पोट काढून त्याच्यासमोरून निघून आलो 'हि'च्या पुढे. शंकरू नुसतेच दातओठ खात होता. तसे !



(कानविंदे दातओठ खात मुठी वळून उभा.)

मग काही नाही, रोज शंकऱ्याच्या खोलीवर आमचं अतिक्रमण का काय ते न चुकता होऊ लागलं. कधी दिवसातून दोनदा. कधी चहा, कधी चिवडा, कधी पोहे. आणि रोज मधल्या दाराखालून खलित्याप्रतिखलित्यांची देवघेव ! पुढं त्याचाच खलिता आमचा प्रतिखलिता म्हणून आम्ही पलीकडे ढकलू लागलो. हो, म्हणजे अहो रोज उठून माणसानं नवंनवं लिहायचं तरी काय ? बरं, त्यात त्याचाही त्रास वाचला. कारण पुढं तोसुद्धा एकच खलिता पुन्हापुन्हा आमच्या बाजूला सारतो असं माझ्या लक्षात आलं ! पण काय हरकत ? प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य असतं असं आधीच कुणीसं म्हणून ठेवलंय ! तर त्यानं खलिता सारला की आम्ही लगेच तो परत सारून देत असू. आमच्याकडून आला की तसाच तो आमच्या बाजूला पुन्हा ढकलून देत असे. ज्याला जसा वेळ मिळेल त्याप्रमाणं त्यानं हे युद्ध खेळायचं ! पुढे पुढे तर हे खलित्यांचं युद्ध घरात मोलकरणीच्या नि दारात येणाऱ्या डबेवाल्याच्यासुद्धा परिचयाचं झालं. म्हणजे धुणी वाळत घालताना हळूच ती धुण्याची काठी अशी जरा लांबवून तो खलिता तसा पलीकडे ढकलून द्यायची. गेला ! डबेवाला यायचा वादळासारखा नि थांबायला सेकंदभरदेखील वेळ त्याला नसायचा. भारी कामसू माणूस ! पण तेवढ्यातल्या तेवढ्यात, असा डबा उचलून पळताना पायानं—हूं ! (तंगडी लांबवून खलिता दारापार लकटल्याचे ॲक्टींग.) गॉन ! त्यामुळं झालं काय की आम्हांला मुळी अनेकदा तिकडे लक्षच द्यावं लागत नसे. परस्पर चाललंय युद्ध—घनघोर—खलित्यांचं युद्ध ! आता हे खरं की एकदाच



समोरच्या बंगल्यातल्या पप्पूनं इथं खेळायला आल्या वेळी खलित्यावर 'शू' करून या युद्धात न भूतो न भविष्यति असा समरप्रसंग निर्माण केला होता—पण आम्ही हटलो नाही ! किराणामालवाल्याचं एक लांबलचक ताजं बिल एका पाकिटात भरून हे खलित्यांचं युद्ध आम्ही लढवीत ठेवलं ! शंकरूला याची कल्पना होती की नाही, कुणास ठाऊक ! पण आत काय आहे त्याच्याशी त्याला तरी कर्तव्य काय ? खलित्यासारखा खलिता असला म्हणजे झालं ! युद्ध, बास !

[हे चालू असता कानविंदे दारापलीकडे आणि 'मी' दाराअलीकडे असे एका खलित्याची देवघेव दाराखालून, न थांबता, एकसारखी करीत असतात.]

(उचलून दाखवीत) हा तो खलिता. त्यानंतर आतलं किराणामालावाल्याचं बिल चुकतं करण्यासाठी काढून घेऊन मी आत लाँड्रीच्या रसिटा ठेवल्या, त्या वेळोवेळी काढून आठवणीसाठी कुणाकुणाच्या लग्नपत्रिका ठेवत राहिलो; डॉक्टरची बिलं, विम्याच्या हप्त्यांच्या नोटिसा, बसची तिकिटं—आता या खलित्याची बाह्य अवस्था तात्या टोपेनं बहादुरशहाला अठराशे छपन्नात लिहिलेल्या खलित्याशी स्पर्धा करील अशी ऐतिहासिक झाली आहे ! (उघडून उलटा करून दाखवतो.) आणि गेले काही दिवस यात काहीसुद्धा नाही ! पण कशाला असायला हवं ? कुठल्या युद्धात काय असतं ? तरी पण युद्ध चालूच आहे, खलित्यांचं युद्ध !

[खलिता हाताने दारापलीकडे सरकवतो. कानविंदे तो पायाने अलीकडे ढकलतो. 'मी' बांबूने तो पलीकडे सारतो. कानविंदे छत्रीने अलीकडे सारतो.]

वेळ तर बरा जातो ! (हसतमुख उभा.)

[संथपणे पडदा पडतो.]

# भेकड

(अगदी भल्या पहाटे सकाळची वेळ. हिवाळ्याचा आरंभ. बाहेर नुक्ते उजाडते आहे. पाखरांची किलबिल. अजून दिवाणखान्यात दिवा आहे. रेडिओवर साडेसहाचे टोले पडण्याआधीचे एकसुरी 'बाँग'वजा संगीत चालू आहे.

निर्मला आपल्या तान्ह्या मुलाला घेऊन यांत्रिकपणे फिरते आहे. आपल्याच विचारात ती पूर्णपणे गर्क.)

दाराची बेल वाजते.

निर्मला त्या आवाजाने दचकते. थबकते. पुन्हा बेल वाजते. दीर्घ.

आतून बेअरा येतो. दार उघडायला जातो.

निर्मला एका यांत्रिकपणे हे पाहत उभी.

बेल आता थांबथांबून दोनतीनदा ऱ्हस्व वाजते; उतावळेपणाने.

बेअरा वैतागूनच दार उघडतो.

दारात कुणीतरी आहे.

''काय रे, बाईसाहेब आहेत ना ?''

(कुणीतरीचा प्रश्न.)

**निर्मला** (आवाज ओळखीचा वाटून) कोण आहे ? (जरा पुढे होऊन पहाते. मुद्रेवरचे भाव भराभर बदलतात. नफरत रहाते.) तू !

(आता बेअरा बाजूला झाला आहे. खाकी पोषाखातला एक बोडका तरुण आत डोकावून इकडे तिकडे पाहतो. हा राम. ओढलेला, मळलेला; तरी मुद्रेवर काहीसे विदूषकी हास्य.)

**राम** (तसेच हसत) नवरा जवळपास नाही ना तुझा ? नसला म्हणजे बरं !.

**निर्मला** तू इथे कसा ? आणि—या वेळी...(तो आत सरकतो. हातात सूटकेस. सूटकेसकडे पाहत) काय आहे तरी काय ? (तो विदूषकी हसतच उभा.) काय रे, बोल की.

**राम** हिंदी पिक्चरमधल्या हीरोसारखा आलो की नाही ? सांग आलो की नाही ! (तसा) कौन ? तुम ! हां, तेरी मौत. क्यूँ, मुँह क्यूँ फेर लेती हो ? देखो. मेरी आँखोमें देखो तो सही. देखो—देखो—

**निर्मला** (रुक्षपणे) पांचटपणा बंद कर. तू गावात आल्याचं कळलं होतं मला, पण—तू येशील असं...इथं...असा...कधीच नव्हता आलास तू...रस्त्यात—आलास समोर तरी...दूर जायचास...

**राम** मी बसू का ?

**निर्मला** हूं. पण स्वप्नातसुद्धा इथं—अशी अपेक्षा केली नसती तुझी...

**राम** नसतीस ना ? (हसतो. विदूषकासारखा मोठ्यांदा.) पण नवरा झोपलाय ना तुझा ? (अगदी गुप्त काहीतरी असावे तसे हळू पण लटकेच) मग मोठ्यांदा हसून चालणार नाही. तो उठेल. (नाकावर बोट ठेवून) श्शू !

**निर्मला** मला—कोडं वाटतोयस तू...

**राम** म्हणजे काहीतरी वाटू लागलो म्हणतेस मी तुला ? दे टाळी ! (हात पुढे करून मग मागे घेतो.) नाही तर नको देऊस.

**निर्मला** काही...काम होतं का तुझं ?

**राम** काम ? कुणाचं ? व्हॉट नॉनसेन्स. कामाला एवढ्या पहाटे बाहेर पडतात का काय कुणी ?

**निर्मला** मग...तू इथं कसा ? असा—ही बॅग...ही वेळ...

**राम** सांगू ? की नको सांगू ? सांगून न सांगू की न सांगता सांगू ? की न सांगता सांगून न सांगू ?

**निर्मला** (संतापून) आधी सहनशक्तीचा अंत बघणारा हा तुझा पोरकटपणा बंद कर ! हाडी मुरलाय जसा जन्मापासून. का आलास तू आत्ता इथे ? इथे का आलास ?

**राम** हात्तीच्या. अग उगीच. (ती सुन्न.) चिमणीशप्पत !

**निर्मला** बॅग घेऊन ?

**राम** (मांडीवर घेतलेली बॅग एकदम जाणवून) बॅग—बरी आठवण केलीस. ही कुठं ठेवू ? (ती जास्तच सुन्न. मग तो) अंहं—म्हणजे घाबरू नकोस. मी राहायला नाही काही आलो—मी जाणारच आहे. नक्की—

**निर्मला** (एकदम दडपण दूर झाल्यासारखी) घाबरू कशाला ? (सावरत) ठेव तुला हवी तिथे.

(तो योग्य जागा शोधण्याचा आविर्भाव आणतो. मग विचार केल्याचा आविर्भाव. अखेर बॅग पुन्हा मांडीवर घेऊन बसतो.)

**राम** अशीच ठीक आहे. म्हणजे मला आपली सवय आहे. एक तर बॅग खाली आणि मी वर; किंवा मी खाली आणि बॅग वर. म्हणजे आमचं थोडंसं असंच आहे. (नख कुरतडल्याचा आविर्भाव करून) आमचं प्रेम आहे एकमेकांवर.

**निर्मला** (धुमसून) प्रेम ! (मग तुटकपणे) थोड्या वेळानं हे जागे होतील.

**राम** हे ? हं, हं. म्हणजे 'हे'— (एकदम मुलाकडे लक्ष जाऊन) काय ग, हा बापाआधी जागा होतो, वाटतं ? अनमॅनर्ली ! बापाला सुपरसीड करतो ? (मोठ्यांदा हसतो.)

**निर्मला** (दटावणीच्या सुरात) हळू रे बाबा तुझं खिंकाळणं. मिलिटरीत गेल्यापासून जास्तच झालंय तुझं.

**राम** (मुद्दाम लटका हलका स्वर काढून) मिलिटरीत सगळंच असं. चक्क बाँब टाकतात. तोफा उडवतात. (दोन्ही कानांत बोटे घालून मोठमोठ्या स्फोटांचा आविर्भाव आणतो; हादरण्यासकट—खंदकात असल्यासारखा.) जरा निवांतपणे मेले डोळा लागू देतील तर शप्पत !

**निर्मला** तुझ्या गोंगाटाने मात्र बाळ घाबरून जागा होईल. आत्ताच कुठे जरा डोळा लागलाय त्याचा.

**राम** लागू दे. (मग एकदम शेजारी कोचावर बॅग ठेवत) ए, घेऊ का ग मी जरा त्याला ? अं ? लहान मुलं ना, माला आवलतात ! बॅगखालोखाल ! मोडतोड न करता परत करीन. प्रॉमिस ! देतेस ? दे की—

**निर्मला** (अनिश्चितपणेच) झोपलाय तो. (मग अनिच्छेनेच देत) जप पण.

**राम** (घेत) ज़पण्यासारखं काय आहे ? (झोपलेल्या त्या पोराला जवळ धरून) कल ले. काय कलायच्यं अछेल ते कल हो खुश्शाल. शू कल शू. कालन छद्ध्याच फक्त जमेल तुला ते, जन्म घेन्याचा चान्स मिलाला आहे तल ! मग ? तुज्यावल शू कलतील छगले— (खिदळून हसत सुटतो.)

**निर्मला** काही आहे की नाही तुला ? उठेल म्हणते तर ! आणि इथं वाह्यातपणा मुळीच चालणार नाही तुझा. जंगली !

**राम** अग पण या तान्ह्या पोराला काय कळणार आहे मी काय बोलतोय ते ? शिवाय झोपलेलं तर आहे हे. किती छान आहे ग हे ! आणि खरं आहे ! असं वाटतं की उठवावं—खूप गालगुच्चे घ्यावेत याचे—खूप हाल करावेत— (ती कासावीस. तिच्याकडे पाहून पुन्हा लटक्या हलक्या सुरात) पण करणार नाही. आणीबाणी आहे ना ! इमर्जन्सी ! हूं !

**निर्मला** तसाच वेडपट आहेस अजून.

**राम** जास्तच ! म्हणजे गतवर्षी तो फ्लू आला ना—तो ग मेमध्ये—त्याने भलताच वुइकनेस आला. एकपट, दुप्पट, वेडपट ! (तोंडावर हात धरतो.) मी मगच हसेन. 'हे' उठतील ! (पोराला दर्शवून) हे नव्हेत, 'ते'—आणि मग मला शूट करतील ! (नाकावर बोट धरून) श्शू ! शूट केलं ना, म्हंजे मरायला होतं. तुला पण शूट करतील. मग आपण दोघं (एकदम गळ्यावर) शिकू किंवा मरू—शिकू किंवा मरू—माणुसकीच्या सायन्ससंगे —युद्ध आमुचे शुरू—आमुचे शुरू—लेफ्ट राइट लेफ्ट, लेफ्ट लेफ्ट...

**निर्मला** इकडे दे पाहू त्याला. जागं करशील त्याला तेव्हाच बरं वाटेल तुला ! (घेते.)

**राम** कसं बोललीस. तुला एक गंमत सांगू ? पण सांगायची नाही हं कुणाला—वचन दे—नाहीतर नकोच देऊस—(जरा जवळ जाऊन खासगी सुरात) कुणी झोपलेलं बघितलं ना, म्हणजे मला वाटतं ते मेलंय !

**निर्मला** काय ! यू डर्टी पिग ! (सावरत) जिभेला हाडच नाही तुझ्या. (मुलाला घट्ट धरते.) पुन्हा असलं काही बोललास तर इथून जावं लागेल तुला.

**राम** नाहीतर राहा म्हणशील ?

**निर्मला** (उसळून) तू आधी आलास का ते सांग. कुणी बोलवलं होतं तुला ? मंदाला भेटलास ?

**राम** मला वाटलं की—तू मला बोलवलं असशील.

**निर्मला** कशाला ? तुझी बाष्कळ बडबड ऐकायला ? की वेडेचार पहायला ? (जरा सावरत) कधी आलास ?

**राम** कुठे ? आत्ताच. तुझ्यासमक्ष ?

**निर्मला** ते नव्हे. फ्रंटवरून कधी आलास ?

**राम** असं असं.एक आणि दोन—दोन वर्षं झाली—चूक—दोन दिवस झाले. आजचा दुसरा की तिसरा ?

**निर्मला** आणि आत्ता कुठे निघालायस ? परत फ्रंटवर ? की परगावी चाललास कुठे ?

**राम** नाही.

**निर्मला** मग बॅग कशाला ?

**राम** बॅग...(डोळे मिचकावतो.) ती ना ? जम्मत ! जमाडी जम्मत ! आमच्यं ना, प्लेम आहे ! (खिदळू लागतो नि एकदम उठून उभा राहून) अग खरंच ! अगदीच चुकलो की मी ! (घाईने बाहेर निघून जातो; बॅग मागे रहाते. तो गेला तिकडे निर्मला पहाते आहे. तो परत येतो, गेला त्याच लगबगीने. हातात लष्करी टोपी.) ही बाहेर ठेवली नि बूट घालून घरात आलो ! अप्पांनी बडवून काढलं असतं ना बघितलं असतं तर ! बूट घालून घरात यायचं नाही म्हणून गाढवा हजारदा सांगितलं तरी—सप् ! सप् ! सपासप् ! (हे छड्या ओढल्याचे आविर्भाव. निर्मला हेही पाहते आहे.)

**निर्मला** कुणाला वाटेल तुझं डोकं फिरलंय.

**राम** पण डोकं तस्संच आहे. मीदेखील तस्साच आहे. सगळं सगळं तस्संच आहे.

**निर्मला** (उसासून) कधी माणसांत येणार तू ?

**राम** कुणासाठी ? तू ना, चहाच दे ना एक कप मला. अं ? कनी, चहा तोंडात असला ना, म्हंजे मला बोलताच येत नाही हो ! म्हंजे चहा बाहेर येतो आणि बोलणं अन्ननलिकेत जातं ! (हसतो.) म्हणजे नसलीस देणार तर नको देऊस हां. आग्रह नाही.

**निर्मला** रामसिंग—(बेअरा येतो.) चाय बनाना—

**सिंग** (घोटाळून) कितना, मेमसाब ? एक या—

**निर्मला** एक. मैं बादमें लूँगी साबके साथ. जल्दी बनाना—

**सिंग** अच्छा मेमसाब. (जातो.)

**राम** अच्छा मेमसाब. मी तुझ्याकडे बेअरा म्हणून राहू ? अं ? आपल्याला जमेल हे. म्हणजे कामाची सवय झालीच आहे तिकडे फ्रंटवर. हवे तेवढे जड बोजे उचलतो. वाटेल तितका चालतो. अवघड जागी चढतो, लागतील तेवढे खोल खड्डे खणतो. थंडीपावसात जिवंत राहतो. पुन्हा काय म्हणशील ते पेटवीन मी. पार राखरांगोळी करून करून टाकीन. माणसांचीसुद्धा ! खरंच ! ऑर्डर करून बघ ! हं, ऑर्डर ! (लढाऊ पवित्रा घेतो.)

**निर्मला** गप्प बैस बघू जरा.

**राम** तेवढं मात्र नाही जमणार. (उठून बेअराप्रमाणे) मेमसाब ! मी-मी आया म्हणूनच राहू तुझ्याकडे ? ते सोप्पं. याला सांभाळायचा. बेटा उठू शकत नाही, कुठं जाऊ शकत नाही, रागावला तर च्याऊशुद्दा श्यकत नाई अजून. होय ना ले लाज्या ? (आयासारखा वागून दाखवतो.) बाबा उद्दर मट जाना. बाबा टुम इद्दर कायकू सोटा है ? बाबा टुम शू मट करो ! शू मट करो बोलटा है ना हम ? शू—बाबा—मट—बाबा—('बाबा' ने ती केलीच असे दर्शवितो 'आया'च्या आविर्भावाने आणि गदगदून हसतो.) नवऱ्याची झोप भलतीच 'ही' दिसते ग तुझ्या ! तिकडे आमची सगळी कंपनी खडबडून उठून उभी रहाते आणि फायरसुद्धा ओपन करते ! मी न हसताच !

**निर्मला** काही—काहीसुद्धा बदल नाही तुझ्यात.

**राम** एवढ्या सकाळचा तुझ्याकडे आलो एवढा सोडून. बाकी छान असते की नाही ही वेळ ? अं ? विशेषतः तुमचा हा रेल्वे लाइनचा भाग तर या वेळेला भलताच छान वाटतो बुवा—चेरीच्या झाडांसकट. मला तर वाटतं, इथंच राहावं, झालं ! ए, थोडे दिवस तुझ्या बेअराला पाठव ना फ्रंटवर बदली म्हणून ! तिथल्या सगळ्या ऑफिसर्सना मेमसाब म्हणेल तो. मोठ्ठी मज्जा येईल ! (खिदळतो.) आणि मी रोज तुझ्या झोपलेल्या नवऱ्याला लास्ट पोस्ट—आय मीन—गार्ड ऑफ ऑनर देईन. जनगणमनअधि...सकट.

**निर्मला** शहाण्या माणसानं तुला थाराच देऊ नये.

**राम** कोण देतंय ? हां. मात्र या तुझ्या बंगल्यासमोरच्या त्या घराच्या कट्ट्यावरनं मला नाही

कुणी हाकललं.

**निर्मला** (काहीशा आश्चर्याने) तिथं होतास ?

**राम** हो.

**निर्मला** तिथं काय करीत होतास ?

**राम** कुठं काय ? काय करणार ? काही नाही. दुसऱ्याच्या घराच्या कट्ट्यावर काय करतात ?

**निर्मला** कधी येऊन बसलास तिथं ?

**राम** फार फार वर्षांमागे दंडकारण्य नावाच्या अरण्यात—थांब ! कधी आलो तेवढंच नेहमी विसरतो बघ मी. पण मी आलो ना, तेव्हा तुझ्या या बंगल्यात अगदी दंडकारण्य नावाच्या अरण्याइतका मिट्ट काळोख होता. आणि बाहेरसुद्धा तो पलिकडला म्युनिसिपालिटीचा दिवा तेवढा उजेड ओकत होता. आणि त्याच्या शेडवर आमच्या अप्पांइतका नाहीतर त्या मेजर खुशवंतसिंगाइतका लठ्ठ सरडा एकसारखा पाखरं खात होता. अशी. (दाखवतो.) एकसारखा. आणि चेरीची झाडं किंचित सळसळत होती. (जिभेने आवाज काढून दाखवतो.) अशी. म्हणजे अगदी अशीच नव्हेत काही; मी थोडंच झाड आहे चेरीचं ? आणि मग, त्या तिकडल्या तावदानांतून लाइट लागल्याचं दिसलं. मग तो गेला. त्यानंतर थोडा वेळ काहीच नव्हतं. आणि मग तुझ्या या पोराचं 'ट्यँऽ' ऐकू लागलं. आणि थोड्या वेळानं ना, तू चक्क याला घेऊन उगी करीत त्या सज्जात आलीस. तू—तू फार फ्रेश दिसत होतीस. पहाटेसारखीच ! मी तर चक्क शीळच घालणार होतो— (कशी ते दाखवण्यासाठी तोंडात बोटे घालतो. ती तंग. तो बेत सोडून) पण तू मुळी आतच गेलीस. गेलीस म्हणजे आलीस. मग पुन्हा मी बसून राह्यलो. पण खरं म्हणजे अग तिथं होत्या काळ्या मुंग्या. त्या तुमानीत शिरल्या. आणि त्यात तू दिसलेली ! मग मुळी इथं येण्याशिवाय गत्यंतर नव्हतं ! मुंग्या मारण्याचं औषध असलं तर दे की थोडं. तुमानीत टाकेन म्हणतो. अं ?

**निर्मला** घरून कधी निघालास ?

**राम** कुणाच्या घरून ? हां हां. अप्पांच्या घरून ? कुणास ठाऊक कधी. पण सांगू का ? थांब हां. तेव्हासुद्धा काळोखच होता. आणखी घोरणाऱ्या अप्पांच्या घरासमोरच्या दिव्याच्या शेडवरचा सरडासुद्धा बेटा तेव्हा पाखरं खाण्यात गर्क होता. थोडक्यात म्हणजे सगळ्या घोरणाऱ्या अप्पांच्या किंवा नवऱ्यांच्या घरांसमोरचे सगळे सरडे पाखरं खाण्यात गर्क होते ना, तेव्हा मी इथं आलो—म्हणजे घरून निघालो. हो !

**निर्मला** बॅग घेऊन !

**राम** हो. ती कशाला ठेवायची ? आय मीन—

**निर्मला** रजा संपली तुझी ?

**राम** संपेल कशी ? अग दोनच तर दिवस झाले ना ? (बेअरा चहा आणतो ट्रेवरून.) (बेअराला) थँक यू मेमसाब ! (हसतो. बेअरा नापसंतीदर्शक मुद्रा करून जातो.) तुझ्या

आधी घेतला तर चालेल ना ग ? नाही, शिष्टाचार म्हणून विचारतो. (ट्रे जवळ घेतो. चहा तयार करू लागतो.) देव तुमचं भलं करील मायबाप. बालबच्चे सुखी ठेवील. नवऱ्याला मिशा दील. (ठसका लागेपर्यंत खिदळतो.) मला नेहमी वाटायचं की तुझ्या नवऱ्याला मोठ्या मिश्या असाव्यात—म्हणजे तुझं लग्न झालं ना, त्यानंतर. आधी नाई काई ! आहेत का ग ? आणि त्या तुझ्या नाकात जातात ? अं ? सांग ना ? सांग की !

**निर्मला** चहा घे आधी तो. (वाढती अस्वस्थ होते आहे.) इतक्या पहाटेस भुतासारखा समोर येऊन बसलास. आणि बसलास तो बसलास, इथं शिरलास ! वाटलं होतं की फ्रंटवर जाऊन तरी जरा सभ्य माणसांत आला असशील—

**राम** कुणासाठी ? चहा बाकी मस्त येतो हां मला करता ! ओ, व्हॉट टेस्ट !

**निर्मला** तिला आशा होती—की तुला विचार करायला सवड मिळाल्यानं तू बदलशील. घरी कशी आहेत तुझ्या ?

**राम** घरी कोण ? माझ्या ? हां, अप्पांच्या ना ? झोपलीत सगळी. आणि अप्पा घोरतायत—पाखरं खाणाऱ्या सरड्यासारखे ! कदाचित एव्हाना अप्पा उठले असतील आणि खोकत-लोळत आईवर ओरडत असतील, चहा हवा म्हणून. आणि ती झोपाळल्या सुरात म्हणत असेल, मेलं येवढं औक्ष घालवलं गुरासारख्या खस्ता काढण्यात; आता तरी जरा घीन विश्रांती म्हणावं तर नाहीच पहावायचं. बाकी तो पाखरं खाणारा सरडा काय करीत असेल कोण जाणे आत्ता ! कदाचित पोटातली पाखरं मोजत असेल. जितलेल्या गोट्या मोजतात तशी !

**निर्मला** सांगून निघालास ? की तसाच ?

**राम** कुणाला ? अप्पांना ? छट. अग माझं मलाच नव्हतं ठाऊक कुठे जाणार ते. मग त्यांना काय सांगू ? अप्पा, मी निघालोय म्हणून ? ते डरकाळले असते, गाढवाच्या लेका, कुठे ? मग मी काय उत्तर देणार ? माहीत नाही म्हणून ? एकेक कानशिलाखाली वाजवली असती त्यांनी उजव्या नि डाव्या. नाहीतर कान पिरगळला असता इलॅस्टिक ! कनी सिक्स्टि थ्रीचं नवं मॉडेल आहे हो ! इयर हो आमचा !

**निर्मला** रजा किती दिवसांची घेतल्ययस ?

**राम** कुणी ? मी ना ? मी—रजा आहे म्हणालो, मागितली. दिल्यानी, घेतली. रजा घेऊन तिथं राहूच देईनात. म्हणून निघालो आणि दुसरीकडे कुठं जाणार म्हणून डोळे मिटून आपला इकडे आलो. पण इकडे कुणालाच रजा नाही. सरड्यांना नाही, पाखरांना नाही, अप्पांनासुद्धा नाही. स्वातंत्र्य हवं म्हणून पोष्टातली नोकरी सोडल्यांनी तरी नाही. त्यांच्या डोक्यात आणखी एक नवी योजना घोळतेय. नव्या स्वस्त पुस्तक प्रकाशनाची योजना. महाराष्ट्र शारदेचं भांडार संपन्न करणार म्हणतात. (तोंडाने ब्युगुल वाजवतो.) महाराष्ट्रात दर घरटी वर्षाला तीन तरी पुस्तकं विकत घेऊन वाचली जाण्याची सवय लागेल अशी व्यवस्था ते करणार आहेत. भांडवलासाठी आईकडे उरलेले दागिने मागयतायत. बेबी—तिचा दिवस शाळेत पोरं वळण्यात जातो. घरी

आल्यावर ती खोलीचं दार लावून एकटी अ
जेवल्यावर लगेच झोपते. निदान पांघरुणात ल
ती माझ्याशी बोलू शकली. वामननं रिझर्व
असून तीही नोकरी सुटली तर नवी मिळावी म
रात्रंदिवस गर्क असतो. धाकटा पप्या आणि
हुकुमावरून ते अप्पांची पार्सलं बांधतात, 
वेळात माझ्याकडे असे मोठ्ठे डोळे करून नुस
तोतया भाऊ वाटत असावा ! म्हणजे आय
घेऊ एकट्यानं रजा ? म्हणून परत करेन म्हण
करतो. सॅल्यूट करण्याचे प्रयत्न—ओझ्यास
करतो कडक.) सर, द रिमेनिंग फर्लो बीइंग
नो यूज टु एनीबडी, इट ईज बीइंग रिटर्ण्ड
खिदळतो.) दॅट्स दॅट. काय ग, खासगी
शिंकलेलं चालेल ना इथं ? म्हणजे जरा जो

**निर्मला** माझं ऐकशील का ?

**राम** रुमालाशिवाय शिंक देणं अशिष्ट

**निर्मला** तू परत घरी जा आत्ता.

**राम** नॉनसेन्स ! म्हणजे—आय मीन-
घराच्या कट्ट्यावर बसलो होतोच; आता
कुणाच्या तरी घरी जायचं म्हणजे आउट
झालनात ? आमच्या अप्पांच्या तोंडात
वाटतं बघ ! किंवा सरड्याच्या पोटात !

**निर्मला** झालं बोलून तुझं ?

**राम** बोलून—हो. का ? तुला मष्णात
आईच्या ? ते म्हणजे अगदी मटनात वि
फ्रंटवर गेल्यासारखं ! लढाईच्या मशिना
फो ? फ्रेंड ? (मशिनगनचे 'टा टा टा'
(पुन्हा तसेच आवाज.) लाँग लिव्ह फ्रेंड
दाखवू ? नेहरू सिनेमात आणि आदि
करतात ते ? (करू लागतो.)

**निर्मला** बस्स कर ! मुळीच थाऱ्याव
भेटलास ?

**राम** एवढं नृत्य होऊ दे. (करीत रहा

ात बसते ती जेवायलाच बाहेर येते. आणि मग
ऽपते. गेल्या दोन दिवसांत 'काय रे राम' एवढंच
ॅंकेशी तूर्त तत्त्वाच्या प्रश्नावर एक भांडण काढलं
हणून तो नवे वशिले शोधण्यात आणि लावण्यात
चंदी शाळेलाच जातात. उरलेल्या वेळात
भाईची कामं आज्ञाधारकपणे करतात आणि बाकी
ातेच पहात कुजबुजतात. मी बहुतेक त्यांना त्यांचा
मीन कुणालाच जर रजा नाही तर मी तरी कशी
ातो. (मोठ्ठे काल्पनिक ओझे घेऊन चालण्यासारखे
ाकट—करतो. मग ओझे समोर आदळतो, सॅल्यूट
ऑफ़ अॅब्सोल्यूटली रेचेड क्वालिटी अँड ऑफ
हिअरविथ. थँक यू. (पुन्हा सॅल्यूट करतो.
म्हणून विचारतो हं—म्हणजे तुझ्यामाझ्यात—मी
रानं ? (शिंकतो.) सॉरी. अडवता आलीच नाही.

आहे—हेच ना ?

—पुन्हा पुन्हा कितीदा घरी जायचं. समोरच्या
हा तुझ्या घरी आलोय, आणि पुन्हा तिसऱ्यांदा
जस ! मी किनई, त्यापेक्षा झालनात जाऊ ?
असतं ते ? जालना किंवा जालंधरला गेल्यासारखं
(पोकळ हसतो.)

ा जायची घाई आहे का काय ? आमच्या
ळ्वा मशिनात गेल्यासारखं वाटत असेल ! किंवा
त आणि माणसांच्या मटनात. हू कम्स डर ? फ्रेंड ऑर
भसे आवाज काढतो, जीभ टाळ्याला लावून.) फो ?
ऽ ! लाँग लिव्ह फो ! मी तुला आदिवासी नृत्य करून
ासी शत्रूची मुंडकी कापल्यावर उरलेल्या वेळात

र नाहीस तू. तुला झालंय काय ? तू...तू तिला

तो.)

आल्यावर ती खोलीचं दार लावून एकटी आत बसते ती जेवायलाच बाहेर येते. आणि मग जेवल्यावर लगेच झोपते. निदान पांघरुणात लपते. गेल्या दोन दिवसांत 'काय रे राम' एवढंच ती माझ्याशी बोलू शकली. वामननं रिझर्व बँकेशी तूर्त तत्त्वाच्या प्रश्नावर एक भांडण काढलं असून तीही नोकरी सुटली तर नवी मिळावी म्हणून तो नवे वशिले शोधण्यात आणि लावण्यात रात्रंदिवस गर्क असतो. धाकटा पप्या आणि चंदी शाळेलाच जातात. उरलेल्या वेळात हुकुमावरून ते अप्पांची पार्सलं बांधतात, आईची कामं आज्ञाधारकपणे करतात आणि बाकी वेळात माझ्याकडे असे मोठ्ठे डोळे करून नुसतेच पहात कुजबुजतात. मी बहुतेक त्यांना त्यांचा तोतया भाऊ वाटत असावा ! म्हणजे आय मीन कुणालाच जर रजा नाही तर मी तरी कशी घेऊ एकट्यानं रजा ? म्हणून परत करेन म्हणतो. (मोठ्ठे काल्पनिक ओझे घेऊन चालण्यासारखे करतो. सॅल्यूट करण्याचे प्रयत्न—ओझ्यासकट—करतो. मग ओझे समोर आदळतो, सॅल्यूट करतो कडक.) सर, द रिमेनिंग फर्लो बीइंग ऑफ़ ॲब्सोल्यूटली रेचेड क्वालिटी ॲंड ऑफ नो यूज टु एनीबडी, इट ईज बीइंग रिटर्न्ड हिअरविथ. थॅंक यू. (पुन्हा सॅल्यूट करतो. खिदळतो.) दॅट्स दॅट. काय ग, खासगी म्हणून विचारतो हं—म्हणजे तुझ्यामाझ्यात—मी शिंकलेलं चालेल ना इथं ? म्हणजे जरा जोरानं ? (शिंकतो.) सॉरी. अडवता आलीच नाही.

**निर्मला** माझं ऐकशील का ?

**राम** रुमालाशिवाय शिंक देणं अशिष्ट आहे—हेच ना ?

**निर्मला** तू परत घरी जा आत्ता.

**राम** नॉनसेन्स ! म्हणजे—आय मीन—पुन्हा पुन्हा कितीदा घरी जायचं. समोरच्या घराच्या कट्ट्यावर बसलो होतोच; आता हा तुझ्या घरी आलोय, आणि पुन्हा तिसऱ्यांदा कुणाच्या तरी घरी जायचं म्हणजे आउटरेजस ! मी किनई, त्यापेक्षा झालनात जाऊ ? झालनात ? आमच्या अप्पांच्या तोंडात असतं ते ? जालना किंवा जालंधरला गेल्यासारखं वाटतं बघ ! किंवा सरड्याच्या पोटात ! (पोकळ हसतो.)

**निर्मला** झालं बोलून तुझं ?

**राम** बोलून—हो. का ? तुला मष्णात जायची घाई आहे का काय ? आमच्या आईच्या ? ते म्हणजे अगदी मटनात किंवा मशिनात गेल्यासारखं वाटत असेल ! किंवा फ्रंटवर गेल्यासारखं ! लढाईच्या मशिनात आणि माणसांच्या मटनात. हू कम्स डर ? फ्रेंड ऑर फो ? फ्रेंड ? (मशिनगनचे 'टा टा टा' असे आवाज काढतो, जीभ टाळ्याला लावून.) फो ? (पुन्हा तसेच आवाज.) लॉंग लिव्ह फ्रेंड ! लॉंग लिव्ह फो ! मी तुला आदिवासी नृत्य करून दाखवू ? नेहरू सिनेमात आणि आदिवासी शत्रूची मुंडकी कापल्यावर उरलेल्या वेळात करतात ते ? (करू लागतो.)

**निर्मला** बस्स कर ! मुळीच थाऱ्यावर नाहीस तू. तुला झालंय काय ? तू...तू तिला भेटलास ?

**राम** एवढं नृत्य होऊ दे. (करीत रहातो.)

**निर्मला** पुरे ! थांबव आधी जंगलीपणा ! थांबव ! घर आहे हे. वेळ कुठली नि तुला सुचतंय काय ! एरवी कधी पाऊल टाकलं नाहीस माझ्या लग्नानंतर—दिसलास तरी टाळून, तोंड फिरवून जायचास—आणि आज—अशा अवेळी...! मंदाला भेटलास की नाही तू ? मी काय विचारते आहे ? थांबव आधी तो जंगली आचरटपणा ! थांबव म्हणते ना ! उत्तर दे सरळ, माणसासारखा. (तो नाचायचा थांबून स्तब्ध.) मंदाला भेटलास ?

**राम** कोण मंदा ? आय मीन—वेळ नाही झाला. दोन दिवसांत काय काय म्हणून करणार ? सगळी धांदल झाली—

**निर्मला** एवढं काय केलंस दोन दिवसांत ?

**राम** काय म्हणजे—खूप केलं. साला रात्री झोपायलासुद्धा टाइम नव्हता—मला—मला जायला हवं—कामं आहेत ना अजून—(सूटकेसला हात घालतो.)

**निर्मला** बॅग खाली ठेव. बोलावणं धाडलं नव्हतं मी तुला. सांग काय केलंस ते—दोन दिवसांत—

**राम** (दात नसल्याप्रमाणे तोंड हलवून) सरडा ग !

**निर्मला** मी काय विचारते आहे ?

**राम** काय ? काय म्हणजे—केलं—केलं, दिवसा झोपा ताणल्या, झालंच तर संध्याकाळी भटकलो, रात्री जुन्या सवयीच्या बकाल हॉटेलात, ती बंद होईस्तोवर बसून सिग्रेटी फुंकल्या, कुठले तरी सिनेमे पाहिले—आणि हो ! हजामत करून घेतली—ते महत्त्वाचं ! काल रात्री चौपाटीवर चंपी करून घेत पडलो होतो—(तसा ओरडत) चंपेऽ मालेश...चंपीए...

**निर्मला** आणि आता बॅग घेऊन पहाटेला घरातून बाहेर पडलास, कुणाला न सांगता.

**राम** ते सांगायचं राहूनच जात होतं.

**निर्मला** ही तुझी कामं ! या कामापायी तिला भेटायला सवड झाली नाही तुला ! आणि ती तिकडे गाढवासारखी वाट पहात बसल्यय तुझी; डोळ्यांत प्राण साठवून !

**राम** डोळ्यांत वाच माझ्या, हे गीत घावनांचे, हे गीत घावनांचे—

**निर्मला** शटप् ! तिच्या भावनांची थट्टा करू नकोस बरं ! का भेटला नाहीस तिला ? का फशी पाडलीस नको तशी आणि आता तोंड चुकवीत फिरतो आहेस ?

**राम** का ? का देशमुखांच्या बागेतले पेरू त्यांना विचारल्याशिवाय पाडलेस तू ? का ? पाडशील पुन्हा ? पाडशील ? सप ! सपासप ! (छड्या मारल्याचे आविर्भाव.)

**निर्मला** यू डर्टी स्वाइन ! तिकडे जाऊन आणखीनच बेशरम झालास तू !

**राम** आणि ती इथे राहून गाढव. तूच म्हणालीस तिला—गाढव.

**निर्मला** नाही तर काय ? तुझ्यासारख्या गोऱ्यागोमट्या माकडावर जाणूनबुजून प्रेम करणारी आणखी कोण ठरणार ?

**राम** तरी ना, जरासा काळवंडलो मी ! फ्रंटवर जाऊन ! नाहीतर कित्ती गोरा होतो; नाई ?

**निर्मला** किती पत्रं पाठवली तुला तिनं ? एकालाही उत्तर नाही तुझं—स्वतः होऊन तर नाहीच लिहिलंस, पण उत्तरसुद्धा लिहिण्याइतकी माणुसकी नव्हती तुझ्याजवळ—

**राम** तुला पाठवली—तीन पत्रं.

**निर्मला** मला ! तिच्याबद्दल विचारतेय मी—मंदाबद्दल—

**राम** मला वाटलं पत्राबद्दल.

**निर्मला** काय भयाण अवस्था केल्ययस तिची ती माहीत नव्हती तुला ? घर खायला उठलं होतं तिचं—नाही नाही ते बोलत होती—नको नको ते उपाय सुचवीत होती—भावान तर मारलं तिला—धाकट्या भावानं—सहस्रनामांचा घोष ऐकावा लागत होता तिला तुझ्या नावानं चाललेला—काळीज फोडून हाक मारीत होती ती तुला—नुसता धीराचा शब्द मागत होती—तेवढ्यावर पुष्कळ सहन केलं असतं तिनं—केवळ एक शब्द—पण तोही नाही दिलास तिला दगडा !

**राम** फार वाट पाहिली मी तुझ्या उत्तराची. उगीच ! मग चौथं पत्र लिहिलं, पाचवं लिहिलं, पण म्हणालो आता उत्तर आल्याशिवाय टाकायचीच नाहीत ! हॅः ! सारखी आपणच पत्रं टाकायची म्हणजे काय ?

**निर्मला** काळजीनं जळत होती ती गरीब पोर—तुझ्या नि भवितव्याच्या—रडायची इथं येऊन—म्हणायची निदान खुशाली कळली तरी पुष्कळ होईल—

**राम** डाक यायची त्या दिवशी ओली-सुकी करायचा मी. ओली आली तर आज पत्र येणार. सुकी आली तर पुढल्या डाकेला. म्हणजे ती असायची पंधरा दिवसांनी. कधी आणखी उशिरा. अशा कित्येक ओल्यासुक्या झाल्या—

**निर्मला** साध्या खुशालीच्या चार ओळी लिहायला काय हात मोडले होते तुझे, नालायका ?

**राम** शेवटी रूल बदलला. सुकी आली की पुढल्या; आणि ओली आली तर त्यापुढल्या नक्की.

**निर्मला** काळीज नसलेला भेकड आहेस तू ! अखेर जे नको ते लागलं करायला तिला. तुझ्यामुळे—तुझ्यामुळे जिवंत मरणाच्या यातना सोसाव्या लागल्या तिला. स्वतःच्या प्रेतासारखी उरल्यय ती आता. नव्हतं तिच्याशी लग्न करायचं तर का पाडलंस तिला फशी ? का ?

**राम** मग मी एकदा तुझं चित्र काढलं होतं—आठवणीवरनं आणि त्यात तुला आकड्याच्या मिश्या काढल्या होत्या—सूड म्हणून ! मला वाटतं दाढीसुद्धा काढली थोडीशी. आणि एक भिवई वर करून म्हणालो होतो की एवढी शिक्षा तुला तूर्त पुरे !

**निर्मला** मंदाशी तुला लग्न केलंच पाहिजे. ऐकलंस ? तिच्याशी लग्न करायलाच हवं तुला. ती तुझी जबाबदारी आहे आता.

**राम** करणार असतील त्यांनी कृपा करून हात वर करावेत आणि करणार नसतील त्यांनी माना खाली !

**निर्मला** शटप् ! निर्लज्ज ! (तेवढ्यात बेअरा दिसतो; त्याला) रामसिंग, साब सोया है ना, देखो—

**रामसिंग** (पाहून येऊन) जी हां. (जातो आत.)

**राम** (हे चालले असतानाच स्वतःशी) एकसाथ गलती—करो ! वन्, टू, थ्री, फोर, फाइव, सिक्स—(पहाणाऱ्या निर्मलाला) नाही, तू बोल !

**निर्मला** (उद्वेगाने) दगडाशी काय बोलायचं !

**राम** का ? आपण बोलतो—सेव्हन, एट, नाइन, टेन—दहिने—रुख ! बायें रुख !....

**निर्मला** तुझ्यासारखा कुणी पाहिला नाही बघ. शिक्षणाचा विचका करून घेतलास, एक धड ना भाराभर नोकऱ्या केल्यास, आईवडिलांच्या अपेक्षा फसवल्यास, त्या भाबड्या पोरीवर प्रेम नसताना तिचा गळा कापलास आणि आता तिला चुकवतोयस ! भेकड आहेस बघ तू ! बेजबाबदार नालायक आहेस ! स्वतःचा अपराध फेस करण्याची धमक नाही तुझ्यात. गाढवपणाची जंबाबदारी पत्करण्याइतका सभ्यपणा नाही.

**राम** (दातओठ खात स्वतःलाच) तुझ्यात नैतिक धैर्य नाही—तुझ्यात 'डी' व्हिटॅमिन नाही—तुझ्यात कॅल्शम कमी आहे—तुझ्यात काळ्या पेशी जास्त आहेत—तुझ्यात पांढऱ्या पेशी कमी आहेत—का कमी आहेत ? आं ? पुन्हा ठेवशील अशा कमी ? ठेवशील जास्त ? राहशील 'डी' व्हिटॅमिनशिवाय ? राहशील ? (स्वतःलाच मारल्याचा अभिनय; मार खाल्ल्याचा अभिनय. मुळूमुळू रडण्याचा अभिनय.) नॉई. (निर्मलाला) मला पश्चात्ताप झालाय.

**निर्मला** तुला ! रामसिंग—रामसिंग—

**राम** काय करतेस ? घालवतेस मला ? चहा नकोय मला पुन्हा—

**रामसिंग** (येऊन) जी मेमसाब.

**निर्मला** (लेटरपॅड हस्तगत करून काहीतरी खरडते त्यात. कागद फाडून एका पाकिटात भरते. वर पत्ता खरडते.) मंदाबेनके पास फौरन किसीको भेजो—नीचे गुरखा हो तो उसीकोही भेजना—उसको मालूम है पता—नजदीक है—टॅक्सी करके जाव बोलना—अर्जंट मेसेज है—(रामसिंगहाती पाकीट देते. पर्स घेऊन तिच्यातून पैसे देते.)

**रामसिंग** जी. (जाऊ लागतो.)

**राम** (निर्मलप्रमाणे) रामसिंग—(रामसिंग वळतो) गुरखाको हमारा सलाम कहना !

(रामसिंग नापसंतीच्या मुद्रेने बाहेर जातो.)

रामसिंग ये करना—रामसिंग वो करना—रामसिंग इधर आना—रामसिंग उधर जाना—रामसिंग रामसिंग रामसिंग ! हां मेमसाब, जी मेमसाब, करता हूं मेमसाब, मरता हूं

मेमसाब, उडता हूं मेमसाब, सोता हूं मेमसाब, धोता हूं मेमसाब—डॅम मेमसाब ! (थांबतो. सूटकेसकडे पहातो. मग संथपणे जाऊन ती उचलून) चलता हूं मेमसाब.

**निर्मला** इथून जाता येणार नाही तुला ! मंदाला भेटून नंतरच कुठं तो जाणार आहेस तू.

**राम** पण उठतील 'ते'—तुझे—

**निर्मला** काय वाटेल ते झालं तरी मंदाची नि तुझी भेट झालीच पाहिजे आता.

**राम** ती आली नाही तर ?

**निर्मला** का येणार नाही ? (संशयाने) का ? म्हणजे—म्हणजे तू भेटलास तिला ? तू....?

**राम** समोरच आली. चुकवणं शक्य नव्हतं.

(किंचित्काळ सुन्न स्तब्धता.)

**निर्मला** कधी ?

**राम** काल. संध्याकाळी.

**निर्मला** मग काय झालं ? काय म्हणालास तू ?

**राम** प्रथम कुणीच काही म्हणालं नाही. मग ती म्हणाली.

**निर्मला** काय ?

**राम** कसा आहेस—म्हणून.

**निर्मला** मग ?

**राम** मी म्हणालो उत्तम. मग मी विचारलं तिला—तेच. ती तेच म्हणाली. की उत्तम.

**निर्मला** उत्तम.

**राम** मग आम्ही म्हटलं की—की आणखी काहीच म्हणण्यासारखं नाही—म्हणजे मनात. म्हणजे मी म्हटलं—मी. आणि मी म्हणालो, "बरं, जातो—"

**निर्मला** आणि गेलास !

**राम** नाही. म्हणजे हो. तेवढ्यात एक लॉरी आली—मोठी—मालानं लादलेली—तसं तिथं गल्लीत उभं राहाणंच आय मीन अशक्य होतं. मी म्हटलं, मग चालणं उत्तम—काहीच जर करता येत नाही तर—ते उत्तम....चालणं...

**निर्मला** दगाबाज ! घातकी ! (त्वेषाने) हट्टी !! (तोंड लपवीत) असं व्हायला नको होतं (आवेगाने तडफडते आहे.)

**राम** (मान स्वतःत खुपसून पाठमोरा उभा.) मेजर खुशवंतसिंगची बायको एवढी कुत्री असायला नको होती. कॅप्टन लालला देखण्या पोराचा नाद असायला नको होता. ॲडव्हान्स पेट्रोलचा स्वप्नाळू गिरिधारी पाच गोळ्या घुसून घुशीसारखा मरायला नको होता. शिवाजीला गुडघी रोग व्हायला नको होता, बेबीचं लग्न व्हायला हवं होतं. आई एवढी भाबडी नि बेअक्कल असायला नको होती नि अप्पा एवढे—अप्पा. (एक मोठा आळस देतो करकचून, कसा तरी जाऊन सूटकेस उचलतो आणि पाय ओढीत निघून जातो बाहेर.)

(संथपणे पडदा.)

# चार दिवस

[एक ऑफिस. काही कारकून काम करताहेत. सगळे तरुण आणि पोरगेले आहेत. त्यांच्यापासून काही (म्हणजे पुरेशा) अंतरावर हेडक्लार्क पिंगळे कसल्या तरी जाडजूड रजिस्टरात डोकं (आणि चष्मा) खुपसून कसलं तरी निरीक्षण आणि संशोधन करीत आहेत. कुठल्या तरी भिंतीला एक मोठं घड्याळ. त्यात बारा वाजून गेलेले दिसतात. एक प्यून पिंगळ्यांच्या टेबलावर काही कागद आणून ठेवतो आणि जांभई दाबीत निघून जातो.]

**एक लठ्ठ कारकून** मराठ्या, तेवढं लेजर जरा इकडे दे.

**दुसरा कारकून ऊर्फ मराठे** उठून घे की.

**लठ्ठ कारकून** पण दिलंस तर—

**मराठे** आणि घेतलंस तर ?

**तिसरा कारकून** या देशपांड्याला उठण्याचा भारी कंटाळा.

**देशपांडे ऊर्फ लठ्ठ कारकून** बरं बरं ! असू दे !

**तिसरा कारकून** दुसरं काही नाही,—हालचाल नाही त्यामुळं चरबी वाढते, आणि—

**देशपांडे** वाढू दे !

**चौथा एक कारकून** जाऊ दे रे भोळ्या, लीव्ह हिम अलोन. चिडखोर माणसाच्या वाटेला—

**भोळे ऊर्फ तिसरा कारकून** पण कुठलासा डॉक्टर असं म्हणतो की लठ्ठ माणसं

खिलाडू वृत्तीची असतात; आणि चिडखोर माणसं हाडकुळी असतात. हा लठ्ठही असणार आणि चिडखोरपणाही करणार !—हे कसं जमायचं ?

**चौथा कारकून** पण तुला का काळजी ?

**भोळे** मला का म्हणजे ? सगळं शास्त्र खोटं पडतंय इथं—

**देशपांडे** पडू दे !

**हेडक्लार्क पिंगळे** (रजिस्टरातून चष्मा आणि डोकं बाहेर काढीत) देअर—देअर—चर्चा पुरे ! वर्क करा. वर्क करा.

[बोलणं थांबतं. लेजरची पानं उलटण्याचे आवाजसुद्धा ऐकू येताहेत, इतकी स्तब्धता. देशपांडे (लठ्ठ कारकून) जागचा उठून त्याला हवं असलेलं लेजर घेऊन पुन्हा जाग्यावर येऊन बसतो. कुजबूज.]

**मराठे** (बसल्या बसल्या हळूच शेजाऱ्याला) हा 'ढेम्या' लेकाचा खरं म्हणजे पोलिस-हवालदार व्हायला हवा होता.

**त्याच्या शेजारचा कारकून** (निर्विकार मुद्रेनं) अं—काय म्हणालास ?

**मराठे** ढेम्या—

**शेजारचा कारकून** हं—

**मराठे** हेडक्लार्क चुकून झाला.

**शेजारचा कारकून** (निर्विकारपणा न सोडता) बरं, मग ?

**मराठे** (आतल्या आत चिडून) चक्कर आहेस !

**शेजारचा कारकून** (निरपराध सुरात) मला नीट ऐकू नाही आलं—

**मराठे** (त्रासून) बरं झालं ! काम कर ! वर्क करा, वर्क—

**भोळे** (बसल्या जागेवरून एकीकडे हेडक्लार्ककडे पाहत मराठ्याला दटावतो) शू—ऐकेल की तो.

**मराठे** ऐकलंन तर ऐकलंन. असले हे बहिरे आमच्या शेजारी आलेले—

**शेजारचा कारकून** (पुन्हा तीच ब्लँक नजर) अं ?

**मराठे** (खेकसतो) काही नाही. कांम कर. (उसासा.)

[पुन्हा स्तब्धता. काही अंतरावर टेलिफोनची घंटा. कुणाची तरी प्रश्नोत्तरं. एक इसम एका बाजूनं निघून जातो कुठं तरी.]

**भोळे** (हळूच) का रे मराठ्या—

**मराठे** (कामातून वर पाहत ) ऊं !

**भोळे** त्या समोरच्या टेबलाकडे बघितलंस ?

**मराठे** (तिकडे पाहत) हो, का ?

**भोळे** काही नाही. (किंचित थांबून) शकू तिथं बसत होती.

**मराठे** हूं.

[दोघेही पाहत राहतात.]

**भोळे** बघितलं की आठवण येते. तुला येते का रे ?

**मराठे** मला ?

**भोळे** हो.

**मराठे** हो.

**भोळे** असं वाटतं, की अद्याप ती तिथंच बसलेली आहे. मान मोडून काम करते आहे— मधूनच एका हातानं कपाळावरच्या केसांच्या बटा मागं सारते आहे. घाम टिपते आहे, कोरड्या ओठांवरून पुन्हा पुन्हा जीभ फिरवते आहे, आणि—

**देशपांडे** (मध्येच) काय चाललंय रे तुमचं ?

**भोळे** (तुटकपणे) बोलणं.

**देशपांडे** पण कसलं ?

**भोळे** ऋसलं नाही; समोरचं टेबल—

**देशपांडे** तिथलं काय ?

**मराठे** (इशारा देत) हळू—ढम्या ऐकेल.

**भोळे** (आपल्याच तंद्रीत) त्यालासुद्धा अखेर अखेर आपलासा केला होतान्, नाही तिनं ? बापाची माया करायचा तिच्यावर.

**मराठे** हूं.

**देशपांडे** (पुन्हा एकदा) शकूची गोष्ट ?

**भोळे** हो.

**देशपांडे** उगीच नोटीस मिळाली तिला.

**मराठे** जाऊ दे. आपल्या हातचं काय आहे ?

**भोळे** ते तर झालंच. पण ती गेली आणि सगळा जिवंतपणा गेला बघ.

**देशपांडे** हसणं गेलं.

**भोळे** लाइफ उरलं नाही.

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** ओकं ओकं वाटतं सगळं. ते हसणं होतं, किलबिलणं होतं,—तेव्हा जरा बरं होतं. तिच्या नुसत्या असण्यानंसुद्धा किती बरं वाटायचं.

**मराठे** (त्याच्याकडे वळून मागचा राग काढीत) ऐकू गेलं का तुला ?

[शेजारचा कारकून अंग चोरतो.]

**देशपांडे** तो तिचा प्रश्न—'काय मिस्टर फुटबॉल ?—'

**भोळे** (तक्रार करीत) तेव्हा तिच्या चेष्टेनं मात्र हा देशपांड्या चिडत नसे.

**देशपांडे** (लागलीच) कसा चिडू ? ती होतीच तशी. तिच्या आसपासचं लेजर मागितलं तर कधी नाही म्हटलंन् नाही तिनं. देत असे.

**आणखी एक कारकून** तशी ती सगळ्यांनाच केव्हाही ओब्लाइज करायची.

**भोळे** (त्याच्याकडे वळत) मघापासून कुठं गेला होतास रे तू, जोश्या ?

**तो कारकून ऊर्फ जोशी** वर त्या एन्. सी. च्या भानगडीसाठी जरा बोलावलं होतं.

**भोळे** मिटली ?

**जोशी** मिटली तात्पुरती. इथल्या भानगडी कायमच्या मिटत नसतात. तसं असतं तर आपल्याला काम काय उरलं असतं ?

**मराठे** (जुन्या आठवणी पाहत)...मला किती तरी वेळा मदत झाली आहे शकूची—कॅल्क्युलेशन्सच्या वेळी. तिला ती भराभर जमायची.

**देशपांडे** हुशार होती.

**भोळे** पण गर्व नव्हता. आणि फणकारा पण.

**जोशी** इतर पोरींसारखी नव्हती.

**मराठे** हूं.

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** (मध्येच) किती वाजले रे भोळ्या ?

**भोळे** अं ? (हातावरच्या घड्याळात पाहत) बारा पस्तीस.

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** टिफिनला अजून बराच वेळ आहे—

**भोळे** आल्यापासून तुला टिफिनची काळजी ! सकाळचं जेवण जातं तरी कुठं ?

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** टिफिन म्हणजे खाणं नव्हे रे. तेवढाच मोकळेपणा; इथलं हे सध्याचं ॲट्मॉस्फिअर जरा विसरायला—

**हेडक्लार्क पिंगळे** (पुन्हा एकवार चष्मा आणि डोक्यासकट रजिस्टरबाहेर येऊन) सायलेन्स ! त्या तिकडे त्या टोकाला बोलणं ऐकू येतंय ! वर्क करा. टॉक् नंतर. रिट्रेंचमेण्टचे दिवस, आणि टंगळमंगळ करतात. मग नोटीस मिळाली की—

[पुन्हा स्तब्धता. जो तो आपापलं काम करतो आहे.]

**मराठे** (नजर कामात ठेवून) तिच्या घरी कुणी तरी जायला हवं होतं.

**जोशी** (कामातून जपून वर पाहत) कुणाच्या ?

**मराठे** शकूच्या.

**भोळे** (मध्येच) ए, हळू बाबांनो. तो पुन्हा—

**देशपांडे** काय झालं असेल रे—तिच्या घरी ?

**जोशी** कुणास ठाऊक...

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** संकटं आली म्हणजे सगळी एका वेळी येतात. अनुभव आहे मला.

**मराठे** तिच्या वडिलांचं जरा जास्तच होतं.

**देशपांडे** कधी ?

**मराठे** ती जायच्या दिवशीचं बोलतोय मी. चार दिवसांमागचं. काळजीत होती ती. पाचएक दिवस डोळ्याला डोळा नसावा तशी दिसत होती. कोळपून गेली होती. आवाजसुद्धा उमटत नव्हता तिचा—पाह्यलं नाहीत ?

**देशपांडे** हूं, आता पुढं काय ?

**भोळे** पुढं काय ?

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** पण आपण तरी काय करणार ?

**देशपांडे** काही असलं तरी घरी जाऊन यायला हवं होतं कुणी तरी.

**मराठे** हा भोळ्या तिच्या घराजवळ राहतो.

**देशपांडे** (भोळ्याकडे रोख वळवीत) मग का रे गेला नाहीस तू ?

**जोशी** मैत्री राखणं यांना जमायचंच नाही !

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** साधी कर्तव्यं कळत नाहीत !

**मघाचा चौथा कारकून** गेली आणि विसरलास— !

**भोळे** (स्वतःचा बचाव करीत) मी विसरलो नाही.

**चौथा कारकून** मग ?

**भोळे** मला—मला जाववलं नाही.

**चौथा कारकून** ते का ?

**भोळे** नाही.

**चौथा कारकून** नाही म्हणजे काय ?

**भोळे** म्हणजे—मी—मी एकदा घरी येतो म्हणालो होतो. तेव्हा तिला ते आवडलं नाही.

**देशपांडे** का बुवा ?

**भोळे** (चिडून) ते मला काय माहीत ? पण तिनं म्हटलं होतं, 'बाहेरच भेटत जाऊ आपण. ऑफिस आहेच की. पण घरी नको.'

**मराठे** हूं—!

[स्तब्धता.]

**चौथा कारकून** (पाठपुरावा करीत) कशाला जाणार होतास तिच्या घरी रे ?

**भोळे** मी ? सहज.

**चौथा कारकून** सहज म्हणजे ? सहज कशाला कोण कुणाच्या घरी जातं ?

**देशपांडे** काही तरी असेल.

**जोशी** मतलब असणार.

**जोशी** सांग—सांग—

**चौथा कारकून** कारण सांग—

**भोळे** (वैतागून) सहज म्हणालो ना ?

**चौथा कारकून** खोटं बोलतोस.

**देशपांडे** खरं सांगत नाही तो.

**मराठे** सांग, लाजू नकोस.

**हेडक्लार्क पिंगळे** (सवयीप्रमाणे मध्येच डोकं, चष्मा रजिस्टरच्या बाडाबाहेर काढून) काय गडबड आहे तिकडे ? देशपांडे, झालंय काय तुम्हा लोकांना ? सायलेन्स ठेवा, नाही तर आय विल् हॅव टु रिपोर्ट ! वर्क करा—वर्क.लेजर कोण करतोय ?

**देशपांडे** मी, सर.

**पिंगळे** मग गप्पा काय मारता ?

**देशपांडे** नाही, लेजर करतोय.

**पिंगळे** करा. टॉक नंतर—हं. दिवस बरे नाहीत.

[पुन्हा काही वेळ स्तब्धता.]

**मराठे** (आकडेमोड करता करताच) मिळून मिळून काय, नोटिसच मिळायची की नाही !

**देशपांडे** मिळतातच आहेत त्या.

**मराठे** सेक्शनमधले सात जण गेले.

**देशपांडे** आणखी जातील.

**मराठे** असेल दैवात तर कोण चुकवणार आहे ?

**जोशी** आणि लॉयली काम करून तरी ते कुठं चुकणार आहे, मी म्हणतो.

**देशपांडे** (उद्विग्न आवाजात) शकू गेली—

**मराठे** उद्या आपण जाऊ. (सुस्कारा.)

**जोशी** (अतिशय कटू सुरात) शकू गेली आणि डिसोझा उरली.

**देशपांडे** (लागलीच) का उरली ?

**जोशी** फाकडू आहे ना—वर रुबाब मारलान् !

**मराठे** ते शकूला जमलं नसतं.

**देशपांडे** पण ढेम्या तर तिच्यावर खूष होता !

**मराठे** त्याच्या हातांत काय आहे, बाबा ?

**जोशी** (कीव करीत) हेडक्लार्क बिचारा.

**मराठे** कैद्यांच्यावर कैद्यांतलाच मुकादम, तसा तो.

**जोशी** तो काय करणार ?

**मराठे** उद्या तोसुद्धा जाईल.

**देशपांडे** नाही जायचा ! मी म्हणतो, नाही जायचा ! मुकादमगिरीचं बक्षीस हवंच की त्याला. तो राहणार.

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** (आशावादी मुद्रेनं) आपणसुद्धा राहू.

**चौथा कारकून** (रोखठोक सूर) काय खात्री ?

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** पण जाऊ याची तरी काय खात्री ?

**चौथा कारकून** काही नाही. खात्री कसलीच नाही.

**मराठे** कुणी शकूच्या वाटेनं जातील—

**देशपांडे** आणि कुणी डिसोझाच्या.

**जोशी** (स्वतःला बजावीत) पण आपण कुणाला मस्का नाही लावणार ! हां !

[किंचित स्तब्धता.]

**चौथा कारकून** (आठवण होऊन) भोव्या कुठं गेला रे ?

**देशपांडे** तो तिकडे वास्वानीबरोबर एन. सी. चे जी. ओ. चेक करतोय.

**चौथा कारकून** (अर्थपूर्ण सुरात) पळाला.

**मराठे** हो.

**देशपांडे** बहुतेक त्याचं—

**मराठे** (रहस्यमय आवाज) शकूवर प्रेम असावं.

[उसासे.]

**देशपांडे** पॉसिबल्.

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** शक्य आहे.

**मराठे** आणि त्यात गैर तरी काय आहे ?

**चौथा कारकून** तसं विशेष काहीच नाही.

**जोशी** शकू सुंदर नसली तरी पण कुणालाही ओढ लावणारी मुलगी होती.

**चौथा कारकून** (पट्दिशी) तुला लावलीन् वाटतं ओढ ?

**जोशी** अं ? मला ?—मला—छे !

**देशपांडे** बावचळू नकोस.

**मराठे** मला वाटतं, आपल्यापैकी प्रत्येकालाच तिची थोडीफार ओढ होती.

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** (स्पष्टीकरण करीत) म्हणजे प्रेम नव्हे—

**देशपांडे** आणि समज—असलं, तरी काय झालं ? प्रेम करण्यात काही वावगं का आहे ?

**जोशी** आपण तसं काही केलं नाही.

**मराठे** माझं तर लग्नच झालेलं आहे—

**जोशी** माझं नसलं तरी ठरलं आहे.

**देशपांडे** आणि माझ्यापुरतं सांगायचं, तर शकूवर प्रेम करण्याचा विचार माझ्या डोक्यात कधी आलाच नाही. खरं सांगायचं म्हणजे,—माझं आधीच एका मुलीवर—प्रेम आहे—

[कसल्या तरी विशेष अपेक्षेनं सर्वांकडे पाहत. सर्व स्तब्ध.]

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** (स्वतःशीच नवल करीत) बरं बुवा तुम्हांला प्रेम करणं जमतं !

**चौथा कारकून** का ? तुला नाही जमत ?

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** परवडत नाही. घरची जबाबदारी आहे ना डोक्यावर. ही नोकरी, शिवाय सकाळी दूध घालणं. कमिशनवर स्टेशनरी खपवणं—आणि वेळ उरेल त्यात घड्याळं दुरुस्त करतो. (किंचित थांबून) पण शकूशी बोलायला मला आवडत असे. आमच्यात काही तरी 'कॉमन' असल्यासारखं वाटे. बरं वाटे;—पण ते तितकंच.

**मराठे** (कल्पना करीत) शकूच्या घरी काय झालं असेल रे ?

**जोशी** एकुलती एक मिळवती मेंबर—तीही बेकार झाली.

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** वडील आजारी—

**मराठे** कसला तरी किचकट आजार आहे तो.

**मराठे** शिवाय चार धाकटी भावंडं, आई. इतक्या प्रपंचाचं आता काय होणार ?

**मराठ्याच्या शेजारचा कारकून** काय होणार ?

**जोशी** आणखी काय होणार—?

**हेडक्लार्क पिंगळे** (या वेळी कसल्या तरी कागदपत्रांत निम्मं लक्ष ठेवून) देशपांडे, जरा इकडे या एक मिनीट. वाय. सी. च्या रिसीट्सचं ते बंडल पण आणा. सीरिअल नंबर वन थाउजंड सेव्हन हंड्रेड टवेंटी थ्री टु वन थाउजंड नाइन हंड्रेड फिफ्टि वन—हं लौकर आणा. काही तरी घोटाळा आहे.

**देशपांडे** (उठत) आणतो, सर.

**पिंगळे** तुम्ही घोटाळे करा आणि आम्हांला त्रास !

**देशपांडे** सॉरी सर. (हळूच) नोटिशीच्या तरवारी आमच्या मानेवर लटकत ठेवा आणि मग म्हणा घोटाळे होतात म्हणून ! लक्ष कसं लागावं कामाकडे ?

**चौथा कारकून** जा, जा—तो तापेल.

[पुन्हा काही वेळ स्तब्धता.]

**मराठे** (अत्यंत अस्वस्थ सुरात) मोन्या, आज मी—मी एखादा लाखोपती असायला हवा होतो, बघ.

**चौथा कारकून ऊर्फ मोने** दिसतोस की. आणि असतास म्हणजे काय झालं असतं ?

**मराठे** काही तरी करता आलं असतं.

**मोने** कशाबद्दल ?

**मराठे** (अस्वस्थ सुरात) शकूसाठी—शकूसाठी रे. तिच्या उपयोगी पडण्यात मला खूप अभिमान वाटला असता. दुसरं काही नाही, पण जिच्या उपयोगी पडावं असं वाटतं ना, अशी मुलगी होती ती.

**जोशी** मी या ऑफिसचा इन्-चार्ज असतो तर शकूला कधीच नोटीस मिळाली नसती. असला अंधेरनगरीचा न्याय काय कामाचा ! डिसोझा टिकते—

**मराठे** आणि शकू जाते.

**जोशी** हंः !

**मराठे** कारण डिसोझाला नखरा आहे—

**जोशी** आणि बिचारी शकू साधी होती.

**मराठे** (विटका सूर) असं वाटतं की—कम्युनिस्ट व्हावं !

**जोशी** पण तरीसुद्धा डिसोझाचा नखरा राहणारच की !

**मोने** (थंडपणं) आणि त्याला भाव पण राहणार !

[किंचित स्तब्धता.]

**जोशी** (मराठ्याच्या शेजारच्या कारकुनावर नजर ठेवून एकीकडे) ए मोन्या, त्या शिंत्र्याकडे बघितलंस ?

**मोने** का?

**जोशी** (खालच्या आवाजात) बघ—बघ जरा—घड्याळावर कसा नजर लावून बसला आहे!

**मोने** त्याला टिफिन हवी आहे.

**मराठे** आणि बतावण्या करतो ॲट्मॉस्फिअर विसरण्याच्या ! कसलं विसरता येतं ते !

**जोशी** माझ्या तर हल्ली झोपेतसुद्धा हेच—फाइली, रिसीटा, व्हाउचर्स, जी. एम्. टी. एम्. वाय. सी. आणि नोटीस मिळण्याची अखंड भीती !

**मराठे** (एक मोठी जांभई देऊन) कंटाळा आला बुवा.

**भोळे** (तितक्यात लगबगीनं कुठून तरी येत) श्शू—श्शू—

**सगळे** काय रे ?

**भोळे** ती—ती—

**देशपांडे** काय ?

**मराठे** कोण ?

**भोळे** (ब्रेथलेसली) ती—ती आली !

**मोने** अं ?

**देशपांडे** काय ?

**मराठ्याच्या शेजारचा कारकून ऊर्फ शिंत्रे** कोण? कोण आलं ?

**भोळे** शकू—

**सगळे** (चमकून) शकू—?

[कमोशन ]

शकू…

**कुणी तरी** श्शशू—!

['कमोशन' कमी, शकूचं आगमन. काळीसावळी अशी ती एक बांधेसुद मुलगी आहे. अत्यंत नीटनेटकी. तिच्यातली सौंदर्याची उणीव हा नेटकेपणा काही अंशी भरून काढीत आहे,—इतकी नीटनेटकी. एक स्वस्तातली साधी पाच वारी सुती साडी ती नेसली आहे. हातात स्वस्तातलीच एक पर्स. मुद्रेवर उजळ स्मित.]

**शकू** (स्वच्छ आणि गोड आवाजात) नमस्ते, मंडळी.

**सगळे जण** (परतफेड म्हणून, स्वप्नातल्याप्रमाणं) नमस्ते—

[सगळे तिच्याकडे एकटक पाहताहेत.]

**शकू** (हेडक्लार्क पिंगळ्यांकडे जाऊन) नमस्ते,—सर.

**पिंगळे** (वर पाहत डोळ्यांची पुन:पुन्हा उघडझाप करीत) अं? कोण? हो——येस नमस्ते ! बसा बसा. हॅव ए सीट. (काहीशा अविश्वासानं तिच्याकडे पहात) वाय्. सी. च' जरा घोटाळा झाला आहे तेवढा——

**शकू** चालू दे तुमचं. (पिंगळ्यांच्या टेबलापाशी देशपांडे उभा आहे——तिच्याकडे डोळे ताणून पाहत, त्याला) काय मिस्टर फुटबॉल !

**देशपांडे** (दचकून) अं! आं! हो—ठीक, गुड—ठीक आहे.

**शकू** तुमची मला आठवण येते.

**देशपांडे** अं? हो—हो; (स्वत:चा मनस्वी गोंधळ आवरीत) मलासुद्धा येते.

**पिंगळे** (कामात लक्ष घालून ) हं देशपांडे, अठराशे एकोण्णवद एक्स नंबरची रिसीट काढा त्यातली—(शकूला) हॅव ए सीट,—मिस दळवी,—बसा.

[शकू बसते.]

**देशपांडे** (नाइलाजानं शकूवरची नजर काढून पुढ्यातल्या रिसिट्समध्ये गुंतवीत) अठराशे एकोण्णवद—अठराशे एकोण्णवद—

[कुजबूज.]

**जोशी** भोळ्या, अरे ती—ती तर नीट दिसते !

**भोळे** नीट म्हणजे?

**जोशी** म्हणजे काय रडत फिरावं अशी तुझी—

**भोळे** तसं नव्हे रे; पण जरा दुःखबिःख—

**मराठे** उलट आज भलतीच टवटवीत दिसते आहे ती !

**भोळे** टवटवीत नव्हे काही,पण तशीच काही तरी;—वेगळी.

**जोशी** नेहमीसारखी नाही दिसत एवढं खरं.

**मराठे** किंचित वाळल्येय.

**जोशी** कुणास ठाऊक !

**शिंत्रे** आणि मनामध्ये आत आत खोलवर कुठं तरी जणू खूप काही तरी चाललंय असं—

**मराठे** हे उगाचंच तुझं. तुला कसं कळलं रे?

**शिंत्रे** (गोंधळत) मला—कळलं नाही, पण—

**जोशी** अगदी बेफिकीरपणं बसल्येय बघ ती. चेहऱ्यावर कसला विचार नाही, काळजी नाही, फिकीर नाही, काही नाही—

**भोळे** हूं. असं वाटतं खरं.

[किंचित स्तब्धता.]

**शिंत्रे** पण—पण मी म्हणतो, ही आज इथं आली कशी ?

**भोळे** (त्याला) का ?

**मराठे** आणि कशासाठी ?

**जोशी** ते मात्र समजत नाही खरं.

**मोने** कशासाठी—

**हेडक्लार्क पिंगळे** (कागदपत्रांची उलथापालथ करीत) वेल, देशपांडे—

[शकू तोंडातल्या तोंडात हसते. थोडा आवाज होतो.]

**पिंगळे** (शकूकडे आश्चर्यानं आणि किंचित गोंधळून पाहत) काय झालं? व्हॉट हॅपण्ड ?

**शकू** अं? (हसू आवरीत) काही नाही. (लांब मुद्रा करून बसते.)

**पिंगळे** (अजूनही तिच्यावर आश्चर्याची नजर कायम. हळूहळू ती काढीत) हं, तर देशपांडे, (देशपांडेकडे पाहत) तेवढी चूक लेजरमध्ये नोट घालून वर पाठवून द्या. एक्सप्लनेशन रिक्वायर्ड. अंडरस्टॅंड?

**देशपांडे** येस सर.

**पिंगळे** जा.

**देशपांडे** हो... (शकूकडे ओझरतं पाहत) जातो...

[जातो. जाताना एकदा पूर्ण मागं वळून शकूकडे बघतो.]

**पिंगळे** (चष्मा नाकावरून काढून टेबलावर ठेवीत) वेल्. मिस दळवी, (वर शकूकडे पाहण्याचा प्रयत्न करीत) अर्—हाऊ आर यू? (मुद्रा अत्यंत अस्वस्थ.)

**शकू** (शांतपणे) क्वाइट् वेल्, सर. मजेत आहे.

**पिंगळे** अं?

**शकू** (त्याच शांतपणं) काम नाही, धंदा नाही, काही नाही. त्रास कसला? अगदी मजेत • आहे मी. खाना, पीना, मजा करना !—

**पिंगळे** (किंचित घाई करून)चहा, कॉफी—काय घेणार तुम्ही? व्हॉट् वुइल यू लाईक टु हॅव?

**शकू** काही चालेल मला. पण मला वाटतं, मी एकटीनंच घेणं—

**पिंगळे** अं ? हो हो; आय अंडरस्टँड. तेही खरंच. पण सगळ्यांना मागवणं— (मुद्रेवर संकोच.)

**शकू** (तत्परतेनं) त्यापेक्षा, मला वाटतं, मागवूच नये आपण. त्याची गरजच आहे असं नाही. माझ्यासाठी तुम्ही खूप केलं आहात, सर.

**पिंगळे** (चमकून) अं ?

**शकू** (निरागस सूर कायम) मला आभार मानले पाहिजेत तुमचे.

**पिंगळे** (गडबडल्यासारखं) छे, छे, नो—म्हणजे—

**शकू** मला माहीत आहे की तुम्ही केलंत ते सगळं निरपेक्ष बुद्धीनं केलंत; पण तरीसुद्धा माझ्या बाजूनं मला जे करता येण्यासारखं आहे ते मला करायला हवं, म्हणून आभार मानले. यापेक्षा जास्त मी आता काय करणार? (मुद्रेवर निरागसपणा कायम.)

**पिंगळे** (पडका सूर) वेल्, मिस दळवी,—वेल् आय्— आय वॉज क्वाइट हेल्पलेस्. म्हणजे माझं काहीच चालू शकलं नाही. आय् ॲम् रिअली सॉरी, पण मला—

**शकू** (काही तरी लक्षात आल्याप्रमाणं) नोटीसबद्दल? छे छे ! सर, माझ्या बोलण्याचा तसा उद्देश नव्हता. नोटिसचं काही नाही. ती मिळाल्यामुळं माझा किती फायदा झाला आहे म्हणून सांगू ? दोन महिन्यांचा पगार एकदम मिळाल्यामुळं या महिन्याची आर्थिक विवंचना मिटली. शिवाय धावपळ संपली. घाईघाईनं घरकाम उरकून चार घास कसेबसे पोटात भरून आता गाडीसाठी धावायला नको; बेरीज-वजाबाक्यांनी डोकं पोखरून घ्यायला नको; एक तारखेची वाट पंधरा तारखेपासून पहायला नको; हातांत आलेले एकशेवीस रुपये पाहता पाहता कुठं गेले म्हणून आश्चर्य करायला नको, आणि मुख्य म्हणजे—सर, आपल्याला नोटिस

मिळते की काय, ही भीती आता उरली नाही. नोटिस मिळून चुकली. खलास ! भीती संपली ! नाही तर या भीतीनं माझी झोपसुद्धा उडाली होती बघा;—डोळाच लागत नसे. आता मी डाराडूर झोपते, सर. गाढ ! आरामात ! निश्चिंतपणं ! लहान मुलासारखी.

**पिंगळे** (अत्यंत अस्वस्थ) मिस् दळवी !

**शकू** तुम्हांला डिस्टर्बन्स होत असेल माझा, नाही सर? सॉरी. खरं म्हणजे मी सगळ्यांना एकदा भेटायला आले. म्हटलं एकदा निरोप घ्यावा सगळ्यांचा. जुळलेले धागे कधी सहजासहजी तुटत असतात, सर?

**पिंगळे** (पुन्हा त्याच अस्वस्थपणं) वेल्—

**शकू** सकाळचे दहा वाजले की सगळ्या आठवणी यायला लागतात. मन रस्ता चालू लागतं. स्टेशनवर येतं. प्लॅटफॉर्मवर उभं राहतं. गाडीत गडबडीनं चढतं आणि इथं येतं—(सभोवती पाहत) इथं येतं. मला वाटतं सर, हे सगळं माझ्या आयुष्याचा एक मोठा भाग बनलं होतं. माझ्या आयुष्यातली ही सात प्रदीर्घ वर्षं—रस्ता, प्लॅटफॉर्म, गाडी आणि हे ऑफिस—ऑफिस—यातच मी जगले. यातच मी वावरले. (कसली तरी आठवण होत असल्याप्रमाणं) टायफॉइडनं आजारी होते तेव्हाचे दोन मधले महिने फक्त सोडायची——बस्स ! बाकी गेली सात वर्षं आठवायला लागलं की हेच सगळं आलटून-पालटून आठवतं. हे ऑफिस, ती गाडी, तो प्लॅटफॉर्म, आणि तोच तो नेहमीचा ठरलेला रस्ता ! त्या रस्त्याची वळणंसुद्धा पाठ होती मला. डोळे मिटूनसुद्धा चुकले नसते मी.(उसासा.) आता सगळं बदललं. आता नवी वळणं—नवे रस्ते.

**पिंगळे** (कसल्या तरी अंधुक आशेनं) म्हणजे, मिस् दळवी, तुम्हांला—

**शकू** काय सर ?

**पिंगळे** नवीन जॉब वगैरे?

**शकू** जॉब ? (अविचलपणं) होय, सर. मला नवीन जॉब मिळाला आहे.

**पिंगळे** (डोक्यावरचं अवजड ओझं एकदम उतरल्याप्रमाणं) काँग्रेच्युलेशन्स. मिस दळवी !

**शकू** (किंचित लवून) थँकू यू, सर. थँक यू.—जॉब ही माझ्या आयुष्यातली इतकी इसेन्शल गोष्ट होऊन बसली होती की, जॉबशिवाय मी मुळी जगूच शकले नसते. सुदैवानं मला नवीन जॉब मिळाला आहे. (सुटकेचा दीर्घ श्वास.) आज रजा घेऊन आले.

**पिंगळे** अच्छा ! (अर्धवट स्वतःशी) दॅट्स गुड न्युज—दॅट्स गुड न्युज ! (पाहत राहतात.)

**शकू** (एकदम आणि सहजपणं) तुमचं इन्डायजेशन काय म्हणतं, सर?

**पिंगळे** (चमकून) अं ? माझं—

**शकू** हल्ली त्रास किती होतो ?

**पिंगळे** छे छे, म्हणजे—वेल—

**शकू** मी म्हटलं नव्हतं, की मी असेपर्यंत तुमचं इन्डायजेशन चालू राहणार ? पाहा आता—मी गेले आणि तुम्हांला बरं वाटलं !

**पिंगळे** (गोंधळून) वेल्, मिस् दळवी—

**शकू** (उठत) बरं, सर. तुम्हांला जास्त त्रास देत नाही. तुमच्या सौजन्याचा गैरफायदा आधीच मी फार घेतला आहे. अच्छा, सर—मी आता जरा स्टाफला भेटते. सगळ्यांना एकदा भेटून जाईन. भेटू ना ? (घुटमळते.)

**पिंगळे** पण—(तिला काही तरी सांगू इच्छितात, पण ते जमत नाही. अखेर त्याचा नाद सोडून) ओ. के.—ओ. के. ! भेटा. मला वाटतं, (हातावरच्या आणि भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहत) टिफिन टाइम होत आलीच आहे—मीही निघतोच आता लंचला—

**शकू** (पूर्वीच्याच कृतज्ञ सुरात) थँक यू, सर. तुम्ही माझ्या बाबतीत खरोखर चांगुलपणा दाखवत आला आहात.

**पिंगळे** (जागचे उठलेले. तिचं हे कृतज्ञ बोलणं एकसारखं जिव्हारी लागत असल्याप्रमाणं) नो नो, मिस् दळवी—(उतरत्या सुरात) मिस् दळवी, म्हणजे हे पाहा, मला वाटतं—तुम्ही असं म्हणता कामा नये. यू शुड् नॉट स्पीक लाइक दॅट—

**शकू** (नवलानं) का?

**पिंगळे** (यातनामय, जड, अडखळत्या सुरात) वेल्—मिस् दळवी, माझ्याकडून तुमच्यासाठी काहीच होऊ शकलेलं नाही. आय कुडण्ट डू व्हॉट आय् शुड हॅव् डन् फॉर यू, मिस दळवी. आय् ॲम् सॉरी टु लूज् यू—

**शकू** (त्यांना सहानुभूती दाखवीत, किंचित जड सुरात) मलासुद्धा वाईट वाटतं, सर. नव्या परिस्थितीशी जमवून घेणं मला फार कठीण जातंय. पण एनी वे, जमवून घ्यायलाच हवं. परिस्थितीशी भांडून चालत नाही.

[दोघेही स्तब्ध.]

**पिंगळे** (अस्वस्थता बरीच कमी झालेली) अच्छा, मिस् दळवी—या पुन्हा—

**शकू** येईन ना. वेळ आणि मोकळीक मिळाली तर नक्की येईन मी. अच्छा, सर.

**पिंगळे** (तिच्याकडे अनिश्चित नजरेनं पाहत) अच्छा—

[पिंगळे, वाटेत प्यूनला काही तरी खालच्या सुरात सांगून निघून जातात्.]

**शकू** (प्रथम ते गेले तिकडे पाहत राहते. नंतर स्टाफकडे वळते. मुद्रा एकदम उजळते. अनपेक्षित नाटकी पद्धतीनं) वेल्, हाउ इज एव्हरी बॉडी ?

**सर्व कारकून** (उभे राहत) आं ?

मी—मी—

ठीक आहे—

बरं आहे—

ठीक आहे की—

ए देशपांड्या—

हो—हो—

ओ. के.—

मीं—

**शकू** (हसतमुखानं) बसा, बसा सर्वजण. उभं राहण्याचं कारण नाही. मी काही बॉस नाही तुमची. बॉस ते (बोट दाखवीत) तिकडे गेले. मला नोटिस मिळाली आहे—बढती नव्हे ! आणि नोटिस मिळाली असली, तरी पण मी तुमच्यातलीच् आहे. आपल्यातल्या माणसाला कुणी उत्थापनं का देत असतात ?

**देशपांडे** (हळूच एकीकडून) फार तर चहा द्यायचा !

**शकू** (उत्साहानं) येस् !

**कुणीतरी** बरोबर !

कुणी तरी चहा मागवा !

पण टिफिन टाइमला तरं—

छोडो टिफिन टाइम—

मागवा—मागवा—

पण ढेम्या—

गेला तो—

चहा—

चहा—

**शकू** (पिंगळ्यांच्या पद्धतीनं) श्शू !—सायलेन्स ! वर्क करा. वर्क करा. टॉक नंतर !

[दबलेला हशा. कुणतरी प्यूनला चहा आणायला सांगतो. तो जातो.]

**शकू** (हशा ओसरल्यावर, एक खुर्ची ओढून घेऊन बसते. सर्वांकडे पाहत) हं, आता बोला मंडळी. काय म्हणतं ऑफिस ? मजेत आहात की नाही तुम्ही सगळे ? डिसूझा काय म्हणते ? आणि कसं काय, मराठे—

**मराठे** (दचकून) अं ?—

**शकू** (मराठ्यांकडे पाहत सस्मित) तुम्हांला कुठं काय ? यांना—मराठ्यांना विचारलं मी. (देशपांड्यांकडे पाहत मिस्किलपणं) ठीक आहे ना ? संसार काय म्हणतो, मराठे ? हल्ली घरी जाताना भाजीबिजी घेऊन जाता की नाही ? आणि केरसुणी ? (हसत) खरंच, ते दृश्य अद्याप माझ्या लक्षात आहे, मराठे. एका काखोटीला पुस्तकं, हातात भाजीची पिशवी,

दुसऱ्या हातात छत्री, आणि दुसऱ्या काखोटीला एक नवी, लांब केरसुणी—(मनापासून हसत) संसार फार कठीण असला पाहिजे, नाही मराठे ? (देशपांडे अस्वस्थ. सगळेच अस्वस्थ.) मला वाटतं, संसार म्हणजे दळणाचे डबे, रेशनच्या पिशव्या, भाजीच्या जुड्या, वालांची टरफलं, आणि एकदोन केरसुण्या,—असं म्हटलं तर फारसं चुकणार नाही. तुमचा अनुभव काय आहे हो भोळे ? (शिंत्रेंकडे पाहते.)

**भोळे** (बोलण्याचा प्रयत्न करीत) अं—मी—

**शकू** (भोळ्यांकडे शांतपणं पहात) तुम्हांला नव्हे, या भोळ्यांना विचारलं मी. (बोट शिंत्रेंकडे. शिंत्रे अस्वस्थ.)

**शिंत्रें** (काय चाललंय हे न कळून) म—माझा—मी—म्हणजे अजून माझं लग्न झालेलं नाही.

**शकू** (आश्चर्यानं) नाही ? (आठवल्याप्रमाणं) खरंच. मला वाटतं मी विसरले—लग्न,—मला वाटतं या देशपांड्यांचं झालं——(नजर अस्वस्थ मराठ्यांवर.) येस् ? बरोबर ! होय की नाही ?

**मोने** (एकीकडे मराठेला दटावीत) ए, मराठ्या, उत्तर दे की.

**मराठे** पण मी—

**शकू** (बोलणं चालू ठेवीत) लग्नानंतर बाकी देशपांडे फार वाळले, नाही भोळे ?

**भोळे** (पुन्हा एकदा स्वतःच्या नकळत) अं ?

**शकू** (शिंत्रेंवरची नजर भोळेवर आणते. त्याची कीव करीत असल्याप्रमाणं मुद्रा करते.) तुम्हा भोळे ? पुन्हा तेच ! अहो, मी भोळ्यांना विचारलं— (बोट शिंत्र्यांकडे.)

**शिंत्रें** (प्रयासानं बोलत) मी—

**मोने** (हा आत्तापर्यंत हे सगळं एकाग्रपणं पाहतो आहे. आता मध्येच, थंडपणं) हो—फारहो, फार वाळला तो. (देशपांडेकडे पाहतो. नंतर नजरेनं शिंत्र्याला दटावतो.)

**शकू** (भोळेकडे खट्याळपणं पाहत) आणि या शिंत्र्यांची स्मरणशक्ती पण फार अशक्त झालेली दिसते.

**भोळे** (दुबळ्या मुद्रेनं) अं ? म—मी—

**शकू** (कीव करीत) स्वतःचं नावसुद्धा विसरता तुम्ही, शिंत्रे ?

**भोळे** (आता काही तरी खुलासा केलाच पाहिजे असं वाटून) मी—

**मोने** (मध्येच त्याच्या नेहमीच्या वजनदार, थंड सुरात) हो; होतं त्याचं असं केव्हा केव्हा. (दटावणीची नजर भोळ्यांवर.)

**शकू** मी भोळ्यांना विचारलं की उत्तर हे देताहेत ! घड्याळं दुरुस्त करता करता यांच्या मेंदूचा एखादा स्क्रू बहुतेक नादुरुस्त झालेला दिसतो !

**शिंत्रें** (आपल्या परीनं स्पष्टीकरण करण्याच्या हेतूनं) घड्याळं—मी-दुरुस्त—(पुढं

नुसती पुटपुट.)

**मोने** (एकीकडे त्याला दटावीत) गप्प बैस ना तू जरा.

[शिंत्रे गप्प बसतो.]

**शकू** काय म्हणाले ते ?...

**मोने** काही नाही. कसल्या तरी तंद्रीत होता.

**शकू** वाटलंच मला. (सर्वांकडे संथपणं पाहत) तुम्हा सर्वांच्यात फार बदल झालाय !

[किंचित स्तब्धता. सगळे तिच्याकडे आणि हळूच एकमेकांकडे पाहत आहेत.]

**मोने** (पुढं येत मृदू सुरात) तुमच्या वडलांचं आता कसं आहे, मिस् दळवी ?

**शकू** अं ? माझ्या वडलांचं ? माझ्या वडलांचं ना ? छान आहे. बरे झाले ते.

**मोने** (मुद्रेवर काहीही न दर्शविता) असं ? कधी ?

**शकू** झाले चारपाच दिवस.

**मराठे** (न राहवून) पण—

**मोने** (हुकूमवजा सूर) गप्प बैस. (शकूला) तुम्ही आल्यामुळं आम्हांला फार बरं वाटलं आहे, मिस दळवी. एरवी तुम्ही गेल्यापासून गेले चार दिवस ऑफिस कसं सुनं सुनं वाटत होतं. कशातच कुणाचं लक्ष लागत नव्हतं. सगळं निर्जीव, लाइफलेस् वाटत होतं—

**शकू** (सहजपणं) काही तरीच. मी कोण अशी लागून गेले आहे ? तांब्यांची ती कविता तुम्ही वाचली आहे, मोने ? (खोडकर सुरात) मोनेच ना ?

**मोने** हो.

**शकू** एकूण तुमच्या तरी लक्षात तुमचं नाव आहे ! तांब्यांनी त्या कवितेत म्हटलं आहे, मोने, "जन पळभर म्हणतील हाय ! हाय !!"—(गुणगुणत राहते. किंचित हावभाव.)

[सगळे मूकपणं पाहत आहेत.]

**मोने** (तिचं गुणगुणणं संपल्यावर, तिच्यावरची टक कायम ठेवीत, संथपणं) मिस् दळवी, मला वाटतं, तुमच्यातच फार बदल झाला आहे.

**शकू** (नवलानं) माझ्यात ?

**मोने** (संथपणंच) हो.

**शकू** (नवलानंच) छे. का व्हावा ?

**मोने** (सावधपणं) कदाचित चार दिवस न भेटल्यामुळंही तसं वाटत असेल आम्हांला.

**शकू** नक्कीच. आणि गंमत पाहा, मला 'तुम्ही' सगळे बदललेले दिसता आहात ! (सर्वांकडे पाहत किंचित हसते. पुन्हा गंभीर होते.) परिचयाची माणसं किंचित दूर झाली ना, की असं होत असावं. काय वाटतं तुम्हांला माईणकर ? (नजर जोशीवर.)

**जोशी** (दचकून—माईणकराला शोधण्यासाठी मागं वळून पाहत) अं ?

[शकू मोठ्यांदा हसते.]

**जोशी** (वरमून शकूकडे एकदा आणि मोनेकडे एकदा पाहत) हो हो—मला असंच वाटतं. असंच वाटतं.

**शकू** (कमालीच्या आश्चर्यानं) तुम्हांला झालंय तरी काय सर्वांना ?

**मोने** (थंडपणंच) नाही, तुम्ही अचानक आलात ना, त्यामुळं—म्हणजे जरा बावचळल्यासारखं झालंय सगळ्यांना. बाकी काही नाही. ठीक आहे.

**शकू** (थट्टेखोर आवाजात) स्वप्न वाटतंय ?

**मोने** हो.

**शकू** टायफॉइडनं आजारी होते—

**देशपांडे** (नकळत) कधी ?

**शकू** (देशपांड्यांकडे पाहून डोळे मिटते, श्वास टाकते. नंतर मोनेकडे पाहत) पाहिलंत मोने, तुम्हा सर्वांच्यात विसरभोळेपणा भयंकर वाढला आहे मी गेल्यापासून. इतके विसरलात मला ?

**मोने** छे छे, मिस् दळवी—

**शकू** मग मी एवढे दोन महिने मागं रजेवर होते ते मराठे कसं विसरले ? टायफॉइडनं आजारी नव्हते का मी ? पहिला बरा झाला आणि मग पुन्हा उलटला.

**देशपांडे** (मोनेकडे पाहत यांत्रिकपणं) हो. आता आठवलं.

**शकू** तेवढे ते दोन महिने सोडले तर आयुष्यातल्या सात महत्त्वाच्या वर्षांतला प्रत्येक दिवस आणि दिवसाचे सहा सहा तास मी इथं घालवले. इथं काम केलं, गोष्टी केल्या, विवंचना केल्या, थट्टा केली, हसले, आणि सर्वांना हसवलं—

**मोने** मजेत गेले ते दिवस, मिस् दळवी.

**शकू** माझेसुद्धा. कसे गेले तेसुद्धा आता नीटसं आठवत नाही मला—इतके भरभर गेले. (ते भरभर गेलेलें दिवस जणू ती आठवते आहे.)

**मोने** (संथपणे) हो.

**शकू** आणि आता केवळ नोटिस मिळाली, म्हणून हे सगळं मला सहजासहजी सोडवेल ? जुळलेले धागे—(बोलता बोलता थांबते.)

**मोने** त्यांचं काय, मिस् दळवी ?

**शकू** (चुकचुकल्यासारखं करीत) मला वाटतं, मी हे आत्ताच म्हणाले—

**मोने** काय ?

**शकू** (आठवण्याचा प्रयत्न करीत) जुळलेले धागे—सहजासहजी तुटत नसतात. (मोनेकडे पाहत) म्हणाले का ?

**मोने** (मान हलवीत) नाही.

**शकू** नाही ? मग—हं,—मला आपलं वाटलं. मनाशी म्हणाले असेन. (हसण्याचा किंचित प्रयत्न करीत स्वतःशीच) असं होतं माझं. सगळे विचार !—त्यात गोंधळायला होतं—

**मोने** (सहानुभूतीनं) साहजिक आहे.

**शकू** (त्याच तंद्रीत समोर कुठं तरी पाहत) तुम्हांला होतं असं, मराठे ?

[देशपांडे आणि मराठे जागच्या जागी दचकतात.]

**मोने** (वेळ न गमावता) अधूनमधून.

**शकू** (तशीच समोर पाहत किंचित हसून) उत्तर तुम्ही दिलंत, मोने ?

**मोने** (विशेष न गडबडता) हो. मला तसंच होतं म्हणून म्हटलं. माझा असाच गोंधळ उडतो.

**शकू** (गंभीरपणं समोरच पाहत) सगळे विचार अनावर होतात. सैरावैरा उधळतात. आणि मग—काही तरीच होतं. काही सुचेनासं होतं. काही तरी—होऊन जातं. काही तरी—(अडखळते. समोरच्या रिकाम्या टेबल-खुर्चीवर तिची नजर येऊन स्थिरावली आहे. पाहत रहाते. कपाळाला उभी आठी पडते. त्या रिकाम्या टेबल-खुर्चीकडे पाहत, काही तरी आठवण्याचा प्रयत्न करीत) तिथं कोण बसतं बरं, मोने ?

[सगळे तिकडे पाहतात.]

**मोने** कुठं ? तिथं ?

**शकू** त्या टेबलापाशी. त्या खुर्चीत—(पाहतेच आहे.)

**मोने** आठवून पाहा—

**शकू** (प्रयत्न करून) छे, आठवत नाही. (किंचित संशयानं) तुम्ही ?

**मोने** (थंडपणं) उं-हूं.

**शकू** (देशपांडेकडे वळत) मग तुम्ही ?

**मोने** तोही नाही.

**शकू** (आठी कायम) मग—(आठवण्याचा कसोशीचा प्रयत्न.)

**मोने** (किंचित्काळ जाऊ देऊन) नाही आठवत ?

**शकू** (मान संथपणं हलवीत) नाही.

**मोने** (खोचून) मुळीच नाही ?

**शकू** (हताशपणं) छे.

**मोने** पुन्हा प्रयत्न करा—

**शकू** (पुन्हा दुबळा प्रयत्न करून) अंहं.

[किंचित स्तब्धता.]

**मोने** एक मुलगी बसत होती.

**शकू** (तत्काळ) डिसूझा ?

**मोने** नाही.

**शकू** (पुन्हा कुंठित होत) मग कोण बरं ? छे ! काय डोकं झालंय माझं ! कामाशिवाय काही दिवस राहिल्यामुळं कसं गंजून गेलं आहे ! त्याला काम पाहिजे. बेरीज, वजाबाक्या, गाड्यांची टाइमटेबलं, घड्याळाचे अंदाज, देणेकऱ्यांचे वायदे—काम पाहिजे त्याला. काम पाहिजे. (मुद्रेवरचा गहन भाव कमीजास्त होतो. हळूच एक ओझरतं स्मित येतं.) आता लागली आहे मला नोकरी.

**मोने** (भोवतालच्या एकटक नजरांकडे दुर्लक्ष करून) असं ?

**शकू** (अत्यंत समाधानी सुरात) हो. कालपासून. आज रजा घेऊन आले. म्हटलं, एकदा भेटून जावं तुम्हा सर्वांना.

**मोने** हं.

**शकू** (बोलण्यात किंचित 'अधिक' उत्साह) इथल्यापेक्षा खूप छान आहे ती नोकरी—तशी नशीबवान आहे मी ! काम क्लेरिकलच आहे, पण कसला व्याप नाही. म्हणजे काम केलं तरी वाहव्वा, न केलं तरी कोणी विचारीत नाही. बॉसिंग नाही. एकशेवीस—तीस—दोनेशचं स्केल आहे. रजा भरपूर. म्हणजे मला वाटतं, कामाच्या दिवसांपेक्षा रजेचेच दिवस जास्त भरतील तिथं ! खरंच ! शिवाय हवं तेव्हा जावं, हवं तेव्हा यावं—म्हणजे तशी रेग्युलॅरिटी हवीच--पण स्ट्रिक्ट असं काही नाही. (आठवून) म्हणूनच तर आज रजा मिळाली मला. हो, नाही तर 'जॉइन' झाल्यावर पहिल्याच दिवशी—

**मोने** (आठवण देत) दुसऱ्या दिवशी, मिस् दळवी. काल 'जॉइन' झालात तुम्ही.

**शकू** (आश्चर्यानं) काल ?

**मोने** हो. असं तुम्हीच म्हणालात आताच.

**शकू** (किंचित्कालानं आठवल्याप्रमाणं) खरंच ! कालच. म्हणजे आजचा दुसरा दिवस. एक आणि एक दोन हे साधं गणितसुद्धा मला जमेनासं झालं आहे बघा, भोळे. मेंदू अगदी गंजून गेला आहे—त्याला काम हवं. (किंचित विचारानं) आता होईल तो नीट.

[चहाचे कप घेऊन प्यून आलेला.]

**जोशी** (मोनेला हळूच) चहा आला रे—

**मोने** अं ? हो. चहा—घ्या, मिस् दळवी.

**शकू** (त्याच्या हातून कपबशी घेत) थँक्स.

**मोने** कशाबद्दल थँक्स ?

**शकू** अं ? कॅज्युअली. अमूकच म्हणून नव्हे काही. पण चहा मला आवडतो.

**मोने** मग घ्या ना.

**शकू** हो. (चहा घेऊ लागते.)

**मोने** (पुन्हा एकदा, खोदून) त्या रिकाम्या खुर्चीत कोण बसत होतं, हे अजून तुम्हांला आठवत नाही, मिस् दळवी ?

**शकू** (चहा घेण्याची थांबते. पुन्हा त्या टेबल-खुर्चीकडे टक लावते. व्यग्र मुद्रेनं) नाही. (काही तरी संशयानं) शिंत्रे ?

**मोने** एक मुलगी बसत होती.

**शकू** खरंच. कोण बरं ? कशी होती ती, मोने ? वर्णन करा. मग ओळखते.

**मोने** चांगली होती. वर्णानं सावळी आणि स्वभावानं गोड होती ती मुलगी.

**शकू** (आठवण्याचा प्रयत्न करीत) असं ?

**मोने** हो.

**शकू** (किंचित्काळ आठवण्यात गर्क. अस्वस्थता वाढते. नंतर मान हालवीत) कमाल आहे. माझ्या डोक्याला काही तरी झालं आहे, मोने. (स्वतःशीच किंचित हसत) चालत नाही. (तशीच बसून राहते. नंतर हळूहळू उठते. नजर त्या रिकाम्या टेबल-खुर्चीवर) थांबा हं. (मोनेच्या हातात यांत्रिकपणं चहाचा कप आणि बशी देऊन पुढं होत) मी जवळ जाऊन आठवते—

[टेबल-खुर्चीजवळ संथपणं जाते. भोवताली फिरते. खुर्चीच्या पाठीवरून हात फिरवते. तिच्यावर टेकते. टेबलावरच्या एकेक वस्तूकडे पाहत खुर्चीत बसते. टेबलाचे एकदोन ड्रॉवर उघडते. बंद करते. नंतर टेबलावर कोपर ठेवून, हातावर गाल विसावून थकल्यासारखी बसते. नजर शून्य.]

**मोने** (किंचित्काळ जाऊ देऊन) आठवलं, मिस् दळवी ?

**शकू** (किंचित उजळून) हो. (पुन्हा मुद्रा झाकोळते.) पण नाव नाही आठवत.

**मोने** आश्चर्य आहे.

**शकू** (अत्यंत हताशपणं हसत) खरंच आश्चर्य आहे. असं मला कधी झालं नव्हतं. (उसासा.) काय होणार माझं ?

[पुन्हा बसल्या बसल्या इकडेतिकडे करते. आठवून पाहते. टेबलावरच्या दौतीशी खेळते. टाक हाताळते. काही तरी लिहिते. पुन्हा एक ड्रॉवर उघडते. तशीच बसून राहते. नजर शून्य.]

**मोने** (जवळ जात) मिस् दळवी, चहा राहिला.

**शकू** (जागृती आल्याप्रमाणं) अं ? हो—द्या ना. चहा मला आवडतो. (मोनेच्या हातातली कपबशी उचलते. चहा घेऊ लागते. परंतु डोक्यात अद्याप रिकाम्या टेबल-खुर्चीचाच विषय आहे. चहा बशीत ओतताना थांबून) आता ती मुलगी कुठं गेली आहे बरं मोने ?—या खुर्चीतली ?

**मोने** ती ? ती इथं नाही.

**शकू** (मुद्रेवर हुरहुर ) मग परत कधी येईल ? निदान पाहून तरी ओळखीन मी. इतकी काही भयंकर विसरभोळी बनलेली नाही मी, मोने. चेहरा नक्कीच आठवेल.

**मोने** आज ती रजेवर आहे, मिस् दळवी.

**शकू** उद्या येईल ?

**मोने** कुणास ठाऊक !

**शकू** परवा—

**मोने** तेही सांगता येणार नाही.

**शकू** मग तेरवा तरी नक्कीच. तेरवा तरी भेटेल की नाही ?

**मोने** (नकारार्थी मान हालवतो.)

**शकू** (विकल मुद्रेनं) नाही ? मग भेटेल तरी कधी ती ?

**मोने** ते काही सांगता यायचं नाही, मिस् दळवी. निदान तुम्हांला ती कधीच भेटणार नाही असं वाटतं.

**शकू** (दुःखित सूर) असं ? (मान खाली घालते.) आय् ॲम सो सॉरी, मोने. मी तिला साफ विसरले आहे. आणि आता पुन्हा भेटही नाही म्हणजे—छे ! सगळंच विचित्र !

**मोने** आणखी चहा हवा, मिस दळवी ?

**शकू** (चमकून वर पहात) अं ? चहा ! छे छे छे. नको. चहा घेत नाही मी. (मोनेसकट सर्व जण स्तब्ध. सर्वांकडे पाहत) मी चहा घेत नाही हे तुम्ही सगळेच कसे विसरलात ? (मोनेकडे पहात) तुम्हीसुद्धा, मोने ?

**मोने** झालं खरं असं.

**शकू** (किंचित हसत) शिंत्र्यांचे भाऊ आहात ! (पुन्हा 'कर्ट'ली) मी कधीच चहा घेत नसते. मी कोको घेते. लग्न झाल्यापासून मी चहा सोडला आहे.

**सर्वजण** (आश्चर्यानं) लग्न ?

**शकू** (तितक्याच आश्चर्यानं सर्वांकडे पाहत उठत) म्हणजे काय ? अगदी अज्ञानात असल्यासारखेच दाखवता आहात तुम्ही सगळे ? (पाहत राहते.)

**जोशी** (मोनेच्या जरबदार नजरेनं नमून अस्पष्ट) हो हो—लग्न !

**शकू** (जोरानं) आला नाहीत ते नाहीत तुम्ही कुणी, आणि वर आश्चर्य दाखवता ? पत्रिका मिळाल्या की नाही ?

**देशपांडे** (मोनेकडे एका डोळ्यानं पाहत) हो—मिळाल्या.

**शकू** (खडसावीत) मग का आला नाहीत ?

**मराठे** (मोनेकडे आणि खाली पाहत) म्हणजे—त्याचं—त्याचं—

**शकू** (कडवटपणं) अहेराची धास्ती घेतलीत ! हाउ सिली ! अहेराच्या अपेक्षेनं नव्हतं बोलावलं मी. तुम्ही मित्र आहात माझे. तुम्ही हजर राहावं असं मला वाटलं. एकट्यानं कसलं

सेलेब्रेट करायचं ?

**मोने** (संथपणं) वुइ आर सॉरी, मिस् दळवी.

**शकू** (जोरात) सॉरी काय, सॉरी ? यू मिस्ड ए ग्रेट इव्हेण्ट ! मोठी संधी गमावलीत तुम्ही.

**मोने** (वर, तिच्याकडे पाहत) असं ? कुठली ?

**शकू** (स्वप्नाळू नजर) व्हॉट ए फंक्शन ! केवढा अवाढव्य समारंभ झाला ! बँड—आणि वरात—आणि पार्टी—'ताज'मध्ये स्पेशल डिनर दिलं आम्ही सर्वांना ! (सर्वांकडे पाहत) 'यां'ची ओळख करून देणार होते मी तुमच्याशी. 'हे' एकसारखे विचारत होते, 'काय ग मिनी—'

**भोळे** (स्वतःला नकळत) मिनी ?

**शकू** (किंचित लाजून) हो. 'यां'नी ठेवलेलं माझं नाव. तुमची एकसारखी चौकशी करीत होते 'हे'. म्हणत होते, तुझ्या ऑफिसपैकी कुणीच कसं नाही आलं ? गेले कुठं सगळे लोक ? झालं काय सर्वांना ?

**मोने** (अत्यंत कृत्रिम उसाश्यासह) आम्हांला येता आलं नाही याबद्दल फार वाईट वाटतं, मिस् दळवी. येणं जमलं नाही. पण (शोधक मुद्रेनं) तुमचे 'हे' काय करतात ?



**शकू** हे ? हं--(किंचित अडखळल्या न अडखळल्यासारखं करून) गॅझेटेड ऑफिसर आहेत ते. त्यांचं घराणंच श्रीमंत आहे. पण श्रीमंतीमुळं येणारा बुद्धूपणा मुळीच नाही. एम्. ए. आहेत. पीएच्. डी. साठी थिसिस लिहिताहेत ते सध्या. स्वभावानं किती छान आहेत ते !

**मोने** (शोधक मुद्रेनंच) इतका सर्वांगपरिपूर्ण जोडीदार मिळवल्याबद्दल कॉंग्रॅच्युलेशन्स, मिस् दळवी.

**शकू** (किंचित वाकून स्वीकार करीत) थँक यू. या कधी तरी आमच्या बंगल्यावर. ओळख करून देईन मी त्यांची.

**मोने** (थंडपणं) येऊ.

**शकू** (भोळ्याला) तुम्हीसुद्धा शिंत्रे—

**भोळे** हो हो. येईन ना. (थांबून) भोळेसुद्धा येईल !

**शकू** सर्वांनी या. अं ?

**सगळे** येऊ.

**शकू** कधी याल ?

**देशपांडे** तुम्ही—म्हणाल तेव्हा.

**शकू** (काही तरी आठवत असल्यासारखं किंचित्काळ करून) असं करा,—या वर्षी नका येऊ. पुढल्याच वर्षी या.

**मराठे** (आश्चर्यभरानं) अं ?

**मोने** बरं, मिस् दळवी. (पुन्हा संथपणं) पण पुढल्या वर्षीच का ?

**शकू** पुढल्या वर्षी—त्याचं असं आहे, किनई-हे यंदा गेले आहेत फॉरिनला. अमेरिकेला. सरकारनं पाठवलं आहे त्यांना.

**मोने** (मुद्रेवर बदल न दाखवता) असं ? गुड् न्यूज, मिस् दळवी. (किंचित थांबून) पण मग तुम्ही नाही त्यांच्याबरोबर गेलात ?

**शकू** मी ? मी—मी नंतर जाणार आहे ना. नवख्या ठिकाणी सुरुवातीलाच लोढणं कशाला त्यांच्या गळ्यात माझं ? नाही का ? म्हणून नाही गेले.

**मोने** म्हणजे तुम्हीसुद्धा फॉरिनला जाणार आहात, मिस् दळवी ?

**शकू** (भरल्या उरानं) हो तर ! सगळं कसं आता भराभर माझ्या मनासारखं होऊ लागलं आहे बघा, मोने. जादू झाल्यासारखं ! (हाताशी आलेल्या सुखाच्या राशी पाहत) सगळं सुख अगदी हाताशी आलं आहे. हात लावावं ते सोनं होतं ना त्या कुठल्या तरी गोष्टीत, तसं मनात आणावं ते सारं प्रत्यक्षात घडू लागलं आहे ! क्षणाचासुद्धा विलंब लागत नाही ! निमिषार्धाचासुद्धा नाही ! मी आता खूप खूप सुखी होणार आहे—खूप सुखी होणार आहे— (स्तब्धता. तंद्रीतून जागी होते. सर्वांकडे पाहते. सर्वजण तिच्याकडे पाहताहेत.) बोला ना कुणी काही तरी. स्वस्थ काय बसलात ?

**मराठे +देशपांडे** (दचकत) हो हो, बोलतो ना—

**शकू** (मुद्रेवर कमालीचे नवल दाखवीत) तुम्ही आपले माझ्याकडे नुसते पाहत बसला आहात सगळे ! बस्स ! मला काय पूर्वी कधी पाहिलं नव्हतंत तुम्ही !

**मोने** (पुन्हा पुढाकार घेत) तसं नव्हे, पण आता तुमचं लग्न झालं आहे.

**शकू** (पटल्याप्रमाणं) हं हं. म्हणजे बदल भासतो आहे तुम्हांला माझ्यात ! (पदर सावरीत) भासणारच. लग्न झालंय माझं, संसार करतेय मी सध्या माझा स्वतःचा ! स्वयंपाक, केरवारा, धुणीभांडी, शिवाय 'यां'ची सरबराई,—झालंच तर पुन्हा बेबीकडे लक्ष द्यावं लागतं—

**शंत्र** (पट्दिशी) बेबीकडे ?

**शकू** (थांबून) हो. का ? माझी बेबी !

**देशपांडे** (बसल्या जागी) अं ?

**मोने** मिस् दळवी—

**शकू** (आश्चर्यानं आणि कावरीबारी होऊन) आश्चर्य कसलं वाटलं तुम्हांला ? मी आई झाले आहे. मी काय जन्मभर असंच राहावं अशी तुमची अपेक्षा होती ? किती वाईट आहात तुम्ही लोक ! मी—आई झाले आहे. एक छोटी बेबी आहे मला. छोटी बेबी. गोजिरवाणी, गोंडस आणि सुरेख आहे माझी बेबी. फार गुंडगिरी करते. दिसते हुबेहूब माझ्यासारखी. गुलाम रडते किती—बाप रे ! सारखं आपलं 'याऽईऽऽ'—आणि 'याऽईऽऽ'—! (आठवण होत असल्याप्रमाणं) झोप होत आली असेल तिची एव्हाना. चाळवत असेल. चाळवत असेल... (सर्वांकडे टक लावून पाहत राहते. चेहरा किंचित उतरतो.) मी इतकी मजेत आहे, पण तुमच्यापैकी कुणाच्याच मुद्रेवर आनंद कसा दिसत नाही, मोने ? काय हो शिंत्रे ?

**भोळे** (गोंधळून) अं ? म्हणजे—

**शकू** (सर्वांना न्याहाळत कडवटपणं) कुणी तरी मेल्यासारखे चेहरे करून बसला आहात सगळे ! माझं सुख पाहवत नाही तुम्हांला ? की त्यावर विश्वास बसत नाही तुमचा ? काय झालंय ? काही तरी झालंय ?

**मोने** काही नाही. (कृत्रिम हर्ष दाखवीत) खूप आनंद झालाय आम्हांला, मिस् दळवी—

**शकू** (मोनेकडे टक लावते. नंतर पुन्हा सर्वांना न्याहाळून पाहते. उसासून) कुणास ठाऊक ! एकाचं सुख दुसऱ्याला पाहवत नाही हेच अखेर खरं असावं ! (किंचित्काळ तशीच उभी राहते; नंतर काही तरी ठरवून तुटकपणं) बरं मी निघते. बाहेर गाडी केव्हाची उभी आहे—

**मोने** बरं, मिस् दळवी—

**शकू** (दोन पावलं टाकते. अडखळून त्या रिकाम्या टेबल-खुर्चीकडे क्षण दोन क्षण पाहत उभी राहते.) ती—ती आली की तिला कुणी तरी एक निरोप सांगाल का माझा ?

**देशपांडे** (न कळून) कोण ?

**शकू** (त्या टेबल-खुर्चीकडे पाहत) ती—त्या खुर्चीतली—

**मोने** काय सांगू ?

**शकू** (स्वतःशीच ठरवीत) तिला सांगा—तिला सांगा,—की मी भेटायला बोलावलंय तिला बंगल्यावर. मला पाहायचं आहे तिला—अं ?

**मोने** सांगू.

**शकू** (बजावीत) न विसरता सांगा. नाही तर विसराल !

**मोने** नाही, मिस् दळवी.

**शकू** अच्छा. (वळते.)

**मोने** तुमचा पत्ता, मिस् दळवी ?

**शकू** (थबकून) अं ? पत्ता ?—

**मोने** हो, म्हणजे तिला तुमच्याकडे पाठवायचं तर—तिला—

**शकू** खरंच. (सचिंत मुद्रेनं) पत्ता—जरा एक कागद द्या कुणी तरी मला. (एका खुर्चीला टेकते.)

**देशपांडे** (खिशातून कसला तरी कागद काढून देत) हा घ्या.

**शकू** थँक्स. पेन—(पोलक्याचा गळा चाचपू लागते. मोने आपलं पेन मुकाट्यानं पुढं करतो.) थँक यू, मोने. (कागदावर भराभर लिहिते.) हं, हा पत्ता. (उठते.) जाते मी. (ऐकत असल्याप्रमाणं) बाहेर हॉर्न वाजतो आहे;—केव्हाची गाडी उभी आहे. (संथपणं जाऊ लागते.)

**मोने** (मृदू, हलक्या सुरात) अच्छा, मिस् दळवी——

[शकू दारातून बाहेर नाहीशी होते. ती गेली तिकडे सगळे पाहताहेत.]

**मोने** (पत्ता वाचतो) मिस् दळवी, रूम नंबर सत्तावन्न, तिसरा माळा, नळाजवळ, शान्तारामाची चाळ, फणसवाडी, मुंबई नंबर चार.

[सर्व एकमेकांकडे पाहताहेत.]

# अजगर आणि गंधर्व

[रात्र. मंद, रोगट प्रकाश.

नायकिणीचा दिवाणखाना. पानाचा चांदीचा डबा, तस्त, पिंजऱ्यातला पोपट, रविवर्म्याची चित्रे, आणि एक मोठा पलंग—उपयोगात नसलेला—ही मुख्य वैशिष्ट्ये. शिवाय एक मोठ्यापैकी पोर्ट्रेट फोटो. हा तिच्या चालू शेठचा. मंद प्रकाशात साऱ्याला अवकळा दिवाणखान्यात पोपट आणि फोटोशिवाय कोणी नाही.आणि डोअरबेल क्षीणपणे वाजत राहते. गंधर्व पद्धतीचा आजकाल हास्यास्पद होणारा शृंगार हास्यास्पदपणे केलेली आटीव, जून, रोगट नायिका किंवा नायकीण आतल्या खोलीतून आपल्याच पिशाच्चासारखी लगबगीने येते आणि "कोणाय ?" म्हणून कावल्या सुरात विचारून दार उघडते.

दारात तिचा शेठ उभा. हा पंचावन्न किंवा त्यापुढल्या वयाचा. ठेंगणाठुसका. लालतांबूस. टकल्या. त्यावर तपकिरी काश्मिरी टोपी. थोडे सुटलेले दोंद. अकौंटंट असावा असे पाहाताक्षणी वाटते. पायात पंपशू.

यानंतर नायिका गंधर्व फॅशनचाच अभिनय करणार आणि नायक अकौंटंटसारखा दिसणार.]

: (लगबगीने एक भगभगीत दिवा लावून) यायचं. यायचं ना आत.

[तो आत येतो.]

: फार दिवसांनी येणं झालं. फार वाट पाह्यली बरं आम्ही. डोळ्यांत जीव आणून. असं काय ते ? जोडे काढायचे.



[तो ते काढतो.]

: बसायचं.

[तो बसतो कोचात.]

: तिथं का ? तिकडे पलंगावर बसायचं की चांगलं.

: अं ? नको. ठीक आहे.

: बरं नाही का वाटत जिवाला ?

: नव्हे. बरं आहे.

: झुरून झुरून जीव तोळामासा झाला अगदी माझा. काळजी लागून राहिली मोठी. काही बरंवाईट तर झालं नाही ना, असं वाटत राहिलं. आपली कशीबशी समजूत करून घेत होते. खूप आनंद वाटला आलात म्हणून. इडपिडा टळो. विडा करून देऊ का फक्कडसा ? की स्वारीचे पाय चेपू ? की डोक्याला बाम लावू ? घरात मेला काही दिवस नोकर पण नाही. पगार नाही वेळेवर देता आला म्हणून गेला. पैशे झाडाला का लागतात ? स्वारी किती किती म्ह्यानतीची करते तेव्हा कुठं पैसे दिसतात. पण ही नोकरमाणसंच माजोरी ! पैशाची किंमत यान्ला आहेच कुठं ? एका महिन्याला जरा गडबड झाली, तर लागलीच—

[तो बसून राहिलेला. त्याचे इकडे लक्ष नाही असे वाटते.]

: थांबा अं. मी का नई, चहाच आणते स्ट्राँगसा करून—

: नको. चहा नको.

: दुसरं काही हवं का ? आणवू का ?

: मला काहीच नको.

: मग असं काय बसायचं ते ? जिवाला काहीतरी काळजी दिसते. मला नाही का सांगायची बरं ?(त्याला लगटते काहीशी. तो अंग चोरू पाहातो.) मग आम्ही आता काय



करावं तरी काय ? (रुसल्यासारखी उभी. तरीही तो तसाच. मग एकदम पदर ढळवते.) अग बया, मेला पदरच ढळ्ळा की !

[तरीही तो तसाच. ती आता जरा हिरमुसली होऊन, रागवूनच जाऊन दुसऱ्या खुर्चीत बसते. पिंजऱ्यातला पोपट तेवढ्यात ओरडतो, ''हिरामण ! हिरामण ! हिरामण !'' ''या ! बसा ! नमस्कार !'' पोपट पुढे पोपटपंची करतो. पुन्हा ''हिरामण ! हिरामण !'']

: (किंचित्काळाने जाग आल्याप्रमाणे) जरा पाणी आण थोडंसं.

[ती लगबगीने उठून जाते पाणी आणायला. पोपट म्हणतो, ''हिरामण !'' आणि पुढे न कळणारी कर्कश पोपटपंची करतो. ती येते पाण्याचा तांब्या-पेला घेऊन. त्याच्या हाती आणून देते. तो बरेच पाणी घटाघटा पितो. मग तांब्या-पेला तिच्या हाती देतो. तो ती जवळपास ठेवते. तो जागचा उठून 'अॅक्वेरियम'पाशी जातो.]

: त्यातले माशे कालच मरून गेले. काढायला पण झाले नाहीत अद्याप. मेला मूड आहे कुणाचा.

[तो तिथेच पाठमोरा उभा, अॅक्वेरियममध्ये पाहात. मग परत येतो वळून.]

: पावडर संपली त्याला खायला घालायची. म्हणून पाणी बदललंच नाही. पैशे नव्हते ना माझ्यापाशी. मेले तर मेले. माणसापुढं का माशे भारी आहेत ? माणूस खुशाल तर सारं खुशाल. कसं ?

: गडी कधीपासून गेला ?

: कालच न्हवे ?

: आणि मासे कालच मेले.

: हो—योगायोगच की.

[येऊन पलंगावर बसतो. तिथून गडबडीने उठून कोचात बसतो. ती मुकाट्याने येऊन खाली बसून त्याचे पाय चेपू लागते.]

: (पाय दूर घेऊन) नको.

: का ते ? (मुद्रेवर कळवळा.)

: (मुद्रा लपवतो हातात किंचित्काळ. मग पुन्हा सरळ बसतो. पुन्हा ती कोडग्यासारखी पाय चेपू लागते.) नको म्हणतो ना. नको.(पाय बाजूला घेतो.)

: (मुद्रेवर आत्यंतिक यातना.) काही चुकलं का दाशीचं ? काही आगळीक का घडली या हातून ?

: काही नाही. पण पायांना नको हात लावूस. (खिशातून पैसे काढून देत) हे पाचशे.

: मी कुठं मागितले तरी का ? माणसापेक्षा पैशे का भारी आहेत ? अजून गैरसोय झाली तरी मी स्वारीची गैरसोय करून पैसे मागणार नाही.

: (किंचित गुरकावूनच) ठेव म्हणतो तर.

[ती घेते कष्ट होत असल्याप्रमाणे.]

दिले ते कुणाला सांगू नकोस. आलो होतो ते पण बोलू नकोस. ही शेवटची भेट.

: अर्थ काय याचा ?

: अर्थ तोच.

: कळला नाही दाशीला अर्थ.

: अर्थ तोच. पुन्हा येणार नाही. मला येता येणार नाही. सगळं संपलंय.

: कोड्यात तरी किती बोलावं बरं ?

: प्रकरण आंगाश्री आलंय माझ्या. ट्रॅप झालोय. कंपनीनं फिर्याद गुदरली आहे. मिळवलं ते सगळं जाणार—वर अब्रूदिखील. आणि जेल.

: जेल ? अयाई. एवढं कशानं झालं ते ?

: कळलं नाही अशी बतावणी करू नकोस उगीच.

: मंगेश सकाळी येऊन गेला, तो म्हणत होता खरा काहीतरी. पण गळ्याशप्पथ सांगते,

मी कनी तितकंसं लक्षच दिलं नाही.

: बरं केलंस. आजवर कधी फासा चुकला नाही. आणि परवा हातोहात लग्गा हुकला. साली घरभेदी माणसं असली म्हणजे असंच व्हायचं. चुगल्या करणारी ! आता काही उरणार नाही. सुपडा साफ होणार सगळा.

: पैशाचं का काही होतं ?

: तर कशाचं ? वाईट मुहूर्त लागला. फार वाईट. करता येईल तेवढी निरवानिरव केल्यय. आता कुटुंबाचा तरी घोर नाही. उरला तुझा प्रश्न. तुझी सोय जमली तेवढी केली. पुढची सोय तूच पाहा. माझी आडकाठी नाही. काय समजलीस ?

: शी शी. शब्द तरी कसे काढवतात असले तोंडातनं ? स्वारीशी संबंध जोडला तो काय असा तोडण्यासाठी ? बारा वर्षाचा स्हवास—

: जामिनावर मोकळा आहे मी सध्या. इथं आलो हे कुणाला कळता कामा नये. उगीच तू गोत्यात येशील.

: जिथं स्वारी तिथं मी—

: आणि आता असल्या गोष्टी करू नकोस. माझ्या जवळ पैसे नाहीत. केसमधून सुटलो तरी तुला पोसण्याची ताकद माझ्यात नाही. ग्रहदशेत सापडलोय मी पक्का. आता साला वाहत जाईन तिकडे जाईन. तुझ्यावर कसलं बंधन नाही. तुला लागेल ते तू कर. काय ? तुझी तू मुखत्यार आहेस.

: खरं म्हणता ?

: आमचा उत्कर्षकाळ संपला. यानंतर शंभूमहादेव काय करील ते खरं.

: अयाई ! किती दुःख होतंय हो म्हणून सांगू जिवाला, हे ऐकताना ? माझ्याजवळ हजारभर रुपये असते तर या वेळी नसते का दिले स्वारीला ? डागिने देईन तर तेही आहेत ब्यांकेत.

: असू देत. तुझ्या पैशावर निभायचं नाही मला. निभेन तर माझ्याच कर्तबगारीवर. तू तुझा धंदा बघ. दुसरा शेठ गाठ.

: काय बोलता बरं असं !

: मनातून तू मला नाहीतरी अलिकडे विटलीच होतीस.

: विटले होते ? ती कशाकरता ?

: नाहीतर काय ? दहा वर्षं म्हणजे फार झाली. त्यात मी काही तसा तरणाताठा, फॅशनेबल, रंगेल गडी नव्हे. मी आपला असा वयावरचा, व्यवहारी, कुटुंबवाला, नोकरदार माणूस. काटकसरी, रुक्ष. तुझ्या काही हौसा मी मोडून काढल्या. तुझ्यावर बारीक नजर ठेवली. संशय बाळगला.

: ज्याला कर नाही त्याला डर ती कसली ?

: तुला वेळीअवेळी त्रास दिला—लहरीप्रमाणं वागवलं. पुष्कळ गोष्टी केल्या.

: पतिवर्ताधर्मानंच वागले मी. हाच खरा स्त्रीचा धर्म.

: तुझ्यासारख्या स्त्रीचा नव्हे. तुमचा धर्म गरजेला मिळेल त्या पुरुषाचं रंजन करणं आणि पैसा करणं.

: हे बघा, दहा वर्षांत स्वारीला माझी हीच परीक्षा व्हावी ना ? म्हळसाकांता, तुलाच रे बाबा डोळे ! काय हा गजब !

: गजब नाही नि काही नाही. खरं सांगायचं तर मीसुद्धा तुला कंटाळलो होतो. पण कुटुंबाला कंटाळलो, अगदी विटलो तरी जसा रोज घरी जातच होतो, तसा रोज इथंही येतच होतो. मी काही झालं तरी रीतीनं चालणारा माणूस. इभ्रतीला किंमत देणारा. वळण जपणारा. एकाची दोन घरं झाली, इतकंच. बाकी सालं सगळं तेच नि तसंच चाललं होतं. लग्नबिग्न नसताना दहा वर्षं दोन माणसांनी एकमेकांना उगीच जखडून राहायचं म्हणजे खुळचटपणा नाही तर काय ? मी आजच हिशोब केला. कुटुंबासाठी निदान तीन लाख आतापर्यंत घालवले आणि तुझ्यासाठी लाखाच्या घरात. अर्थात जसे मिळवले तसे घालवले. ज्याचा शेर असतो तो खाऊन जातो. तो चुकत नाही. पण तात्पर्य काय ? मी दुशीकडे कंटाळलेलाच राहिलो. तिकडे बायकोचा रुक्षपणा, इकडे तुझा नाटकीपणा. पुढं पुढं तूदेखील बायकोच्याच आकारात जाऊ लागलीस. तशीच गबाळी दिसू लागलीस. विचारलं तर म्हणायचीस, आपल्या माणसाला आवडलं म्हणजे झालं. करायचं काय जगाला चांगलं दिसून ? पण तू मलादेखील चांगली दिसत नव्हतीस. वळण होतं इथलं म्हणून पाय इथं आणत होते, उभं करीत होते, इतकंच. टांग्याचा साला घोडा नाही का कधी सोडला तरी स्टेशनाच्याच वाटेनं पळायचा. तसे आम्ही.

: मग इतकंच होतं तर जायचं होतं दुसरीकडं. मी कुठं आडिवलं होतं ?

: म्हटलं ना, तेच जमलं नाही. पण आता सगळं संपल्यासारखं आहे. काय समजलीस ? आपला संबंध संपला समज. माझी अपेक्षा करू नकोस. केसमधून बचावलो तरी यानंतर देवधर्मातच उरलेलं आयुष्य घालवण्याचा मानस आहे माझा. कदाचित गावी, कदाचित इथं मुंबैत. काय होतं ते शंभूमहादेवाच्या इच्छेवर अवलंबून. त्याची इच्छा असेल तर हातून सालं पुण्य घडेल. नाही तर आहेच चक्की पिसणं. पाच वर्षं तरी मिळणारसं दिसतं. (तोंड लपवून घेतो.)

: मग माझी काय वेवस्था, म्हणते मी.

: (तोंड वर करीत) माझ्या हयातीचा प्रश्न आलाय नि तुझी व्यवस्था विचारतेस. यातच तुझा नायकिणीचा पतिव्रताधर्म काय तो आला.

: मग काय हवा खाऊन जगू मी.

: दुसरा शेठ गाठ.

: मिळायला हवा ना.

: दुनियेत खूप उल्लू आहेत.

: त्यान्ला गरजेपुरतं खूप मिळतं. माझ्याकडे कशाला यील बरं कोण ?

: शोध घे. मासा गळाला लाव.

: सांगायला काही वाटतं का जिवाला ? पाऊण हयात गेली तुमच्या राबत्यात. आता कोण विचारणार बरं मला ? मी का तरणी राहिले आता ?

: रंग लाव जास्त. ते हल्लीचे तंग कपडे घाल. सेंट शिंपड, उंच टाचांचे बूट वापर—

: हे बघा, मला ते नसतंबिसतं सांगू नका. मला ते जमणार नाही. आम्ही नायकिणी असलो तरी रस्त्यातून फिरणाऱ्या नाही. आणि तसला भलता नखरा पण करणार नाही. आणि माझ्यात आता शक्ती कुठं उरली ? तुमच्या राबत्यात शरीर झिजवलं, सर्वस्व घालवलं. एक मोठा रोग जल्माला लावून घेतला तो वेगळा. (पोपट ओरडतो, "हिरामण ! हिरामण !") वय झालं आता चाळिशीचं. आता कोण विचारणार मला ? उसाचा चोयटा करून टाकला तुम्ही माझा, आणि आता वाऱ्यावर कसे सोडून चालला बरं ?

: परिस्थिती पाहातेस ना.

: बायकोची वेवस्था केलीत ती ?

: ती करायलाच हवी होती. जन्माचा संबंध आहे ना. देवाब्राह्मणांसमक्ष गाठ बसल्यय. पुन्हा साली प्रतिष्ठा आहे, कर्तव्य आहे.

: आणि मी काय कुणीच नाही ?

: होतीस तोवर केलं तुझं. काय वाईट केलं ? हे—हे सगळं कुणाच्या कमाईचं आहे ? हा ब्लॉक, हे सामान, दागिने—

: बदल्यात दिलं ते का नाही बरं सांगत ?

: ते एवढ्या किंमतीचं नव्हतं.

: (त्वेषाने उसळत) काय ? काय म्हणता ? म्हणजे रोज उठून रोग उरावर घेतला, जीव पाखडला, सेवा केली—त्याची ही किंमत ? दहा वर्षांच्या म्ह्यानतीची आखिर हीच किंमत ? घामाची हीच किंमत ? मी केलं ते बायकोनं केलं का बरं तुमच्या ? किती वर्षांत बायकोनं अंगाला हात नाही लावू दिला रोग झालाय म्हणून ? कधी तिनं पाय चेपलं का रातभर नागव्यानं जागून वारा घातला तुमची लहेर म्हणून ? उचकटा की तोंड ! सांगा ! तुमचा एक तरी घाणेरडा कोड पुरवला का कधी तिनं ? आणि मी काय बाकी ठेवलं ? कशाला नाही म्हणाले सांगा बरं मी ?

: हे केलं नसतंस तर जगली कशी असतीस ?

: मेले असते. पण तेच बरं होतं नव्हे एका परीनं.

: मरायचं होतंस.

: मग मारा आता न् जा कुठं ते.

: झाला एवढा गुन्हा पुष्कळ झाला. त्यात आणखी खुनाचा आरोप नको. आणि मला काय थर्ड क्लास क्रिमिनल समजतेस का काय तू ? घरंदाज माणूस आहे मी !

: धोतर फेडून जगाला दाखवा तरी बरं तुमचा घरंदाजपणा !

: ते काय माझ्यापुरतंच नसतं. अनेकांना असतात असल्या गोष्टी. माणूस मारतो झक्.

: मी मारली न् तुमची रांड म्हणून राहिले.

: तसं समज.

: समज कशाला, आहेच की तसं ! आहेच की. देवा रे देवा ! काय लायकीच्या माणसापाशी राह्यले रे मी ! हा माणूस का घाणीचा उकिरडा ! अरे यापेक्षा शेतखाना बरा—

: पानाचा डबा कर तो इकडे जरा—

: (आणून देऊन) मी साफ सांगते, माझी काहीतरी सोय करा.

: (पान तयार करीत) पाचशे दिले मी तुला.

: एवढ्यानं काय भागतंय ? देणीच आहेत साडेचारशांची.

: गेल्या महिन्याचे हे चुकते झाले. आता माझं देणं काही राहिलं नाही. आपला संबंध सुटला.

: गळ्यात दगड बांधून जीव तरी देते मी !

: हे बघ, उगीच का डोकं पिकवून घेतेस ? व्यवहार आहे, व्यवहाराच्या पद्धतीनं सोडवला पाहिजे. साला जीव देतो म्हणून कुठं देऊन होतो ? सात वर्षांमागं माझ्या कुटुंबानं या ब्लॉकातून तुला मारून-पिटून बाहेर काढली, झिंजाडली, नको नको त्या शिव्या घातल्या, तेव्हा का नाही दिलास जीव ? आं ? तेव्हा कशी पुन्हा बिनबोभाट येऊन राह्यलीस ? (पान तोंडात भरतो) मरायची असतीस तर तेव्हाच मेली असतीस. काय समजलीस ?

: चुकलं तेव्हा.

: मग आता पुन्हा चूक. तस्त कर ते इकडे.

: कशाला करू ? आता कोण आहे मी तुमची ?

: (स्वतः घेऊन येत, थुंकत) अशी व्यवहारावर ये. (पुन्हा थुंकून) माथं फिरवून काय होतं ? मी सापडलो परवा हातोहात, तेव्हा मी माथं फिरवलं असतं तर काय झालं असतं ? कोणत्याही पेचात व्यवहार हाच उत्तम. अनुभवानं सांगतो तुला.

: उपदेश नकोय मला.

: नको तर नको.

: एखादं पोर असतं तर त्याच्या जिवावर तरी आशा लावून जगले असते. पण तू तेवढंसुद्धा मला ठेवलं नाहीस, बघ ! तेवढंसुद्धा नाही ठेवलंस.

: (जरा नवलाने) दहा वर्षांत पलंगावरदेखील कधी असं हाकारलं नव्हतंस तू मला. एकवचनानं !

: दुष्ट, चांडाळ मेला. किडे—किडे पडतील बघ तुझ्या अंगामधी !

: पुन्हा व्यवहार सोडलास. इच्छा करून काही होत नसतं. काय होऊ शकेल ते पाहावं माणसानं.

: जीव घ्यावा वाटतो बघ तुझा नरडी दाबून !

: प्रयत्न करून पाहा. मी पण सुटेन सध्याच्या विटंबनेतून. इथं कुणा लेकाला ती पाहायची, सोसायची इच्छा आहे ? खोटं नाही सांगत.

: म्हाळसाकांत तुझं कधी भलं करणार नाही—माझा शब्द लक्षात ठेव.

: मग आता तरी कुठं करतोय ? इतके दिवस नाही ते कुठं काय झालं ? तुला सांगतो, देवबीव कुछ नाही. वेळेचा गुण असतो हा. एखाद्या वेळेला साला हत्ती मारलात तरी कोणी विचारणार नाही. आणि एकेकदा मुंगीसुद्धा बोंबलून उठेल, तुला सांगतो !

: काही सांगू नकोस. पार वाटोळं केलंस तू माझं. घात केलास बरं, घात.

: (किंचित हसून) चहा दे की कपभर गरमसा.

: विष देते थांब ! आणि मी पण घेते म्हणजे सुटले.

: पण गरम दे. घसा सुकलाय.

: जानवर मेला. लाज पण नाही. आणि घरंदाज म्हणवितो !

: काय ग, तुझ्या इथं लाजेचा संबंध काय ? तुला कशाला लाजू ? जशी तू तसा मी. सुटलो, निभावलो, तर पासंगाला तरी पुरशील का तू माझ्या ? सांग की.

: बरा सुटशील !

: त्याचा काय नेम ? तशी वेळ आली तर सुटेन. अग, खुनाच्या गुन्ह्यातूनदिखील सहीसलामत बचाववतात लोक. वकील फर्डा हवा. आणि वेळ आली पाहिजे. बस्स ! माझा वकील साला एकदम मुंबईचा नामदार वकील आहे. शिवाय गावी महादेवाला शंभर महारुद्र करण्याची व्यवस्था करून ठेवल्यय. आणि घरी अनुष्ठानं चालूच आहेत.

: तुझ्या नावानं गावभर ओरडा करीन मी—यानं पैसे खाल्ले म्हणून. हा एक नंबरचा हलकट आहे, बदमाष आहे म्हणून. पोलिसला जाऊन सांगीन. सांगीन की याला सोडू नका !

: पोलिस तुला अडकवतील. माझी साथीदार ठरवतील. पाहा हवं असलं तर करून. तुलाच दुर्बुद्धी आठवली असली, तर मी तरी काय करणार ?

: मग करू काय मी, ते तरी सांग एकदा, मांगा !

: चहा—चहा कर. आणि स्वस्थ बैस. माझ्या भानगडीत पडू नकोस. दिले एवढे पाचशे पुष्कळ समज. दिलेच नसते हेही, तर काय वाकडं करणार होतीस तू माझं ?

: तुझ्या बायकोला गाठीन मी.

: पुन्हा नाचक्की करून घ्यायची असली तर तेही कर. साला मागचा प्रसंग विसरली नसशील तू, अशी माझी कल्पना होती. (उठत) चलू तर मी ? तू चहादिखील करीत नाहीस.

साधी कृतज्ञता नसते तुम्हा धंदेवाल्या बायांत. त्यापेक्षा सतरा धंदे करून आम्ही बरे. पण एक लक्षात ठेव. तुझ्या मरणानं तू मेलीस तर मला उगीच दोष लावू नकोस. त्यापेक्षा शहाणपणानं वाग. गप्प राहा. अजूनही तसं अगदीच वय गेलेलं नाही तुझं, काय समजलीस ? प्रयत्न करशील तर निघेलदिखील पुन्हा नशीब. वेळ यायला हवी की झालं. मी तरी काय, प्रयत्नच करणार आहे. एका परीनं एकाच होडक्यात आहोत आपण. तेव्हा उगाच एकमेकांवर कातावण्यात काय अर्थ आहे ? केसमधून वटावलो तर तुला दुसरा एखादा शेठ गाठूनदिखील द्यायची मी थोडी खटपट करीन; नाही असं नाही. ओळखी आहेत माझ्या. पण तेदिखील वेळेवर अवलंबून आहे. आणि काही न जमलं तर सरळ धंदा कर तू, मी तुला सांगतो. काय समजलीस ? वेळ प्रतिकूल असली की जगणं प्रथम. मग बाकी. काय समजलीस ? जेलात गेलो तर मलाही चक्की पिसावी लागेल. मांजरपाटाच्या कपड्यात राहावं लागेल. भाकरी खावी लागेल. पण त्राग्यात अर्थ नाही. व्यवहार पाहावा माणसानं. जाऊ तर आता मी ? अजगरासारखं असावं माणसानं. मिळेल तेवढं खावं. पण ताठपणा नको. जमेल तेव्हा जोर करावा नि बाकी भुईसपाट असावं. माझा सल्ला लक्षात ठेव.

[जोडे चढवून दाराबाहेर काळोखात निघून जातो 'कर्र कर्र' आवाज करीत.

तो गेला तिकडे पाहात ती पच्चदिशी थुंकते—गंधर्व पद्धतीनेच.

पुन्हा मंद दिवा लावते.

आणि एका कोपऱ्यात जाऊन जमिनीवरच अंगाचा गोळा करून बसून राहते हुडहुडल्यासारखी. स्वतःच्या पिशाच्चाला घाबरल्यासारखी.

दार उघडेच.

अजगर व्हायची तिची तयारी दिसत नाही.

ती आता फक्त थेरडी दिसते आहे. पिंजऱ्यातला पोपट ओरडतो आहे, "हिरामण ! हिरामण ! या बसा. नमस्कार ! हिरामण !"]


नाटक

सखाराम बाइंडर

१९७२

# सखाराम बाइंडर

## अंक पहिला

### दृश्य पहिले

[वेळ संध्याकाळची, तालुक्याच्या ठिकाणी असतात तशापैकी एखाद्या आळीतले जुनाट कौलारू घर. बाहेरली खोली, आत स्वयंपाकघर. दोन्ही दिसतात.

बाहेर पोरांचा गलका.]

**सखाराम** (बाहेरल्या पोराटोरांना उद्देशून डरकाळी) काय रे ए, काय आहे रे ? पहाताय काय, काय कोण नागवं नाचतंय काय इथे ? आं ? चला, जा आधी तिकडे. नाही तर चड्ड्या पिवळ्या करीन, सांगतोय, एकेकाच्या. चले जाव !

(बाईला घेऊन आत येतो दार उघडून. तो मध्यम वयाचा. निबर पण तेज व्यक्तिमत्त्वाचा. मिश्या. दाढीचे पांढरे-काळे खुंट वाढलेले. अंगात जाकीट, कळकट झब्बा आणि काच्याचे धोतर. डोक्यावर नीट न बसवलेली टोपी आणि पायांत वहाणा.

ती मनस्वी भ्यायलेली. बोचके छातीशी धरलेले गच्च. कृश अंग थरथरते आहे. भिंतीशी उभी अंग चोरून.)



**सखाराम** या. बघून घ्या नीट घर. या घरात रहायचं आता तुम्हांला. घर माझ्यासारखंच आहे. मग तक्रार चालणार नाही !

(ती घराकडे कशीबशी नजर फिरवू लागते.)

नीट बघून घ्या, पटत असेल तर टाका बोचकं खाली नाही तर अशाच बाहेर चला. हा राजाचा महाल नाही. हे सखाराम बाइंडरचं घर आहे. सखाराम बाइंडर तुमच्या आधीच्या मालकासारखा नाही. तो काय आहे ते वेगळं समजून घ्यावं लागेल तुम्हांला. सब घोडे बारा टक्के मामला इथे खपणार नाही. डोकं गरम आहे आपलं. काय ? भडकलो तर मारतो बेदम. तोंड शिवराळ आहे. तोंडात विडी नि शिवी कायम. सगळं गाव म्हणतं असं. परिस्थिती जेमतेम; पण दोन वेळा खायला नक्की मिळेल. दोन पातळं सुरवातीला. मग वर्षाला एक; ते पण भारी नव्हे. मग तक्रार चालणार नाही. घरात सगळं शिस्तशीर आणि बिनचूक करावं लागेल, गलथानपणा घडायला लागला तर बाहेरची वाट. गय होणार नाही. नंतर दोष येता कामा नये. आपल्या घरात आपण राजे असतो. गावात जोड्याशी उभे न का करीनात. घर कसं घरासारखं हवं आपल्याला. काय ?

(ती कशीबशी मान हलवते.)

घरामागं विहीर आहे. पायखाना लांब आहे. उन्हाळ्यात विहीर आटते. पाणी नदीवरनं आणावं लागतं. नदी सव्वा मैलावर आहे. पावसाळ्यात या भागात विंचू निघतात. घराबाहेर कामाशिवाय गेलेलं खपत नाही आपल्याला. घरी कुणी आलं, वर मान करून बोलायचं नाही. अनोळखी असला तर पदर तोंडावर घेऊन मोजकी बात करायची. मी नसलो तर कोणाला घरात घ्यायचं नाही. मी भंगड, गांजेकस, रंडीबाज, दरिद्री कसाही असेन. नव्हे आहेच. दारू पितो. पण आपली कदर राहिली पाहिजे आपल्या घरात. या घराचा मालक मी आहे. आदब राखून काम चाललं पाहिजे. काय ? सगळं कबूल आहे, की काय म्हणणं आहे ? म्हणणं असेल तर बाहेर व्हायचं एकदम. या घरात म्हणणं आपलं एकट्याचं चालतं. दुसऱ्यानं त्याप्रमाणं वागायचं. 'का' विचारायचं काम नाही. एक शेवटचं राहिलं...लग्नाच्या बायकोप्रमाणं रहावं लागेल. समजून घेणाराला यात काय ते आलं.

(ती घर न्याहाळते आहे.)

करार मान्य आहे ? असला तर आत जाऊन चहाला लागा. चुलीशी दूधबीध आहे. जा.

(ती गडबडीने आत सरकते. बोचकं एकीकडे ठेवून चुलीपाशी येते.)

इथं राहिल्यावर कुणाची भीती बाळगायचं काम नाही. हा सखाराम बाइंडर काळ लागून राहिलाय सगळ्यांचा. परमेश्वराच्या बापाला नाही भीत !

(आत ती एकदम धसकून स्तब्ध.)

आपण सगळं केलं; पण एक : खोटेपणा नाही केला. म्हणालो, रंडीबाजी करतोय मी. दारूबाजी करतोय. केलं ते एकूण एक कोणाला हवं त्याला सांगण्याची तयारी आहे आपली, चोख. छाताडावर हात मारून ! कोणती माडी किती वेळा चढलो, दाखवतो हवं तर. अलीकडे नाही

चढत. गावात साले एकजात सगळे छपवाछपवीनं झक मारतात. करून-सवरून साळसूद रहातात. तेरी चूप मेरी बी चूप. अरे हिंमत असेल तर करा काय ते खुल्लम् खुल्ला. काय आहे त्यात ? सालं हे शरीर आहे. हे वासनेचं आगर. हे कुणी निर्माण केलं ? त्यानंच. मग त्याला काय ठाऊक नाही ? बाप राहिलाय लागून बाप तुमचा आमचा.

(विडी शिलगावून स्टुलावर बसलेला.)

आपण थोडेच संत आहोत ? आपण माणसं आहोत. आपली खाज भजनपूजन करून शमत नाही, आपण कबूल करतो. एखाद गोष्ट हवी म्हणजे हवी ! मग लपवायचं काय त्यात ? कुणापासून ? आमच्या सर्वांच्या बापापासून ?

(ती चहा करण्यासाठी चुलीशी बसलेली. पण काहीतरी मिळत नाही. अवघडलेली. अखेर उठून स्वयंपाकघराच्या दाराशी येते.)

**ती** (किंचित घसा खाकरते.)

**सखाराम** (ज़रा सुखावून) हां, बोला. फार फाटक्या तोंडाचा आहे मी. ऐकताना तकलीफ होत असेल तुम्हांला. जन्मापास्नं मी असाच. जन्माला आलो नागवा. आई म्हणायची, मेल्याला जन्मापास्नं लाज कशी ती नाही. ब्राह्मणाच्या घरात म्हारडं जन्माला आलं म्हणायची नेहमी. आता आलो असलो म्हारडा तर म्हणावं तुम्हीच पहा. ती काय आमची कर्तुक ?

(ती विलक्षण संकोचून उभी.)

तुम्ही ब्राह्मणाघरच्या दिसताय, तुम्हांला त्रास होतो त्या अर्थी.

(तिची नकारार्थी मान. काहीतरी सांगू बघते आहे.)

घ्या, म्हणजे ब्राह्मणाघरच्या नसून तुम्ही ब्राह्मण, आणि ब्राह्मणाघरी जन्माला येऊन आम्ही म्हारडे. साली मजा आहे. अकराव्या वर्षी पळालो घरातून. बापाहातचा मार खाऊन कंटाळलो. काही केलं तरी त्याला बरं लागायचं नाही. जसा शत्रूच जन्माला आलो होतो त्याचा. फार मारायचा. काय हवंय वाटतं ? काय ?

**ती** (खालमानेने) काड्यापेटी नाही आत.

**सखाराम** (जवळची फेकून) मग घ्या की. आणि लाजायचं काम नाही. काय लागेल ते मागायचं या घरात. नाही मिळालं, तक्रार नाही पाहिजे. हा राजाचा नव्हे, सखाराम बाइंडरचा महाल आहे.

(ती आत जाऊ लागते. थांबलेली.)

आता काय आणखी ? चहाची भुकटी असेल तिथंच टिनाच्या डब्यात. का संपली ? आधीचीनं बरीचशी संपवली. भारी चहा प्यायची. परवाच्या शुक्रवारीच गेली.

**ती** (नकारार्थी मान हालवून) देव कुठं आहेत ?

**सखाराम** असं असं. देव ? असतील तिकडे आत कुठं तरी अडगळीत तिच्या आधीचीला होता तो नाद—दोनचार तसबिरी होत्या वाटतं. नेल्यान का आहेत, ठाऊक नाही.

नंतर ही आली—नंतरची. तिचं तसं काय नव्हतं. ती नवऱ्याच्यां सदऱ्याचीच पूजा करायची. जीव घ्यायला निघाला होता तिचा, पण तो देव. जीव घेतो तो यांचा देव. जीव वाचवतो तो माणूस. त्याच्या सदऱ्याची पूजा करत होती दोन वर्षं इथं. क्षय झाला म्हणून शुक्रवारला मिरजेच्या इस्पितळात पोचवली. तिथंच मेली, सदरा उशाला घेऊन. हे बघा, चहात साखर फार लागते आपल्याला, आणि लालभडक हवा. जा, करा लौकर.

(ती आत जाते. चुलीशी बसताना दांडीवरचे जुनेरासारखे पातळ दिसते त्याकडे पाहत राहते थोडी. मग चूल पेटवून चहा ठेवते. जरा विचारमग्न होते.

बाहेर सखाराम जाकीट काढून खुंटीला लावतो. खिडकीवाटे काहीतरी दिसते.)

अरे ए तुझ्या मायला तुझ्या, गुरू येऊन कुंपण तोडतंय, डोळे फुटले काय ? जरा ध्यान दे. पैशे पडलेत कुंपण घालायला.

(आत ती हे असह्य होऊन डोळे घट्ट मिटून घेते. सखाराम मृदंग खुंटीचा काढून बैठक घेतो. गवसण्या काढतो. मृदंग हाताळतो. थोडा वाजवतो.)

बहोत अच्छे.

(ती चहा घेऊन येते. थांबून लक्ष वेधून घेण्यासाठी घसा खाकरते.)

हां, द्या इकडे.

(ती देते.)

(चहा बशीत ओतून घुटका घेऊन गर्जना) आ—हा—हा—हा—हा.

(ती भयभीत.)

फर्मास.

(तिचा जीव भांड्यात. चहा घेऊन कपबशी ठेवतो बाजूला. ती ती उचलून आत जाऊ लागते.)

तुम्ही पण चहा घ्या. काय लागेल ते घ्यायचं. कोण घे म्हणेल म्हणून वाट नाही बघायची. तसले लाड इथं होत नाहीत.

(ती आत जाते. चुलीशी बसून एका फुलपात्रात चहा ओतून तो फुंकून घेणार तेवढ्यात बाहेरून आरोळी—'सखाराम, हैस का ?')

**सखाराम** (ओरडून) कोण—दाऊद मिया ? ये, आत ये.

(दाऊद येतो.)

**दाऊद** वालेकुम सलाम सखाराम.

**सखाराम** (ओरडून) आणखी चहा पाह्यजे बाहेर. (दाऊदला) आलेकुम सलाम दाऊद. ये—बैस.

**दाऊद** सुना नया पंछी लाया है ?

**सखाराम** हा. आत्ताच. झाला असेल अर्धाएक घंटा. कसं काय चाललंय तुझं ?

**दाऊद** हमारा क्या, चला है कैसा तरी. (नजर आत) कहांसे लाया ?

**सखाराम** सोनावण्याहून. बातमी समजली म्हणून सकाळलाच गेलो होतो. धर्मशाळेत होती.

**दाऊद** दिखाव तो जरा. (नजर आतल्याच दिशेला.)

**सखाराम** बघण्यासारखं या खेपेस तसं काही नाही. कधीतरी चेहरा बरा असेल. पण रया गेल्यय सगळी, नवरोजीच्या छळानं.

(चहा कपबशीत घेऊन ती दाराशी येऊन उभी.)

तुला सांगतो मिया, आपण पाह्यलं, हे नवरे लेकाचे पावणेआठ म्हणून पोरं होत नाहीत आणि त्याचा राग काढतात बाईवर. साले उठबैस तिला धोपटतात, तुडवतात. नामर्द साले. अरे ती तर बोलून चालून माती—बास्—

(दाऊद ती दाराशी आल्याचे कळून सखारामला खुणांनी गप्प करतो.)

**सखाराम** (दाराशी जाऊन चहा तिच्या हातचा घेऊन पुन्हा येत ) नवऱ्याइतकी नामर्द जमात आपण पाहिली नाही बघ. अरे त्यापेक्षा आपण बरे.

(दाऊद चहाचा कप घेऊन दिलगीर चेहरा करतो.)

नाही, आपण पण वेळप्रसंगी हाणतो दोन, आपण कबूल करतो. पण धमक नाही म्हणून नाही. हा मृदंग जसा तापवला का चांगला वाजतो ना, तसं असतं आपलं. हां.

(ती स्वैपाकघरात काही तरी शोधू लागली आहे.)

बरं झालं यार, आपण कुणाचा नवरा नाही. आहे हे मस्त आहे. सर्व काही मिळतं, पुन्हा बांधलेले नाही. कंटाळा आला, तिला आला, आपल्याला आला, खुली वाट. खतम खेळ. साली मगजमारी नाही. तिला आसऱ्यापरी आसरा, पुन्हा आपल्याला घरचं अन्न. स्वस्तात सगळ्या भुका भागतात. उठून कुणाच्या दारी नाही जावं लागत. बरं ती गरिबीनं राहते, हुशारीनं कामं करते, चोख वागते. कारण गलती झाली की बाहेर जावं लागणार—तिला असतं ना माहीत. तशी हुशार बाईची जात. लगीन झालं की मात्र गाफील होते. तिला वाटतं, आता कुठं जातो नवरा. पण नवरा महाहलकट. तिला गुंतवतो पण स्वतः गुंतत नाही. हा पुन्हा उनाड पंछी उडतोच गावभर. नाही, आपण साफ काय असेल तेच बोलतो मिया. उगाच आतबाहेर आपलं काही नाही. आतबाहेर ठेवून मिळवायचंय काय आपल्याला ? साले आपण कुठं कुणाचे लागते आहोत ?

(मृदंगापाशी बसतो सरसावून. मृदंग मांडीवर घेतो.)

हा आहे ना, मृदंग ? आज मांडीवर आहे. वेळ आली तर असा उकिरड्यावर फेकून देऊ. काही वाटणार नाही. पुन्हा पहाणारसुद्धा नाही.

(मृदंगावर थाप मारतो.)

सगळ्या गोष्टी नाशिवंत आहेत, मग जीव गुंतवून उपयोग काय ? कशाला गुंतवायचा जीव ? आपण कुणाचं वाकडं न करता सुखात गेलं आयुष्य का झालं. बस्स ! पण हां, खोटेपणा नाही पाहिजे. पाप केलं, थोबाड फोडून घेऊन म्हटलं पाहिजे का मी पाप केलं. तयार असलं पाहिजे

शिक्षेला. तिकडे वर कुठली लपवाछपवी ? जन्माला आलो तसं होऊनच समोर जावं लागणार का नाही ? असं करावं की बाकी काही वाटलं तरी लाज वाटता कामा नये त्याची. लाज वाईट !

**दाऊद** हो, सखाराम. हां. (अवघडलेला) लेकिन वो निकालो ना...

**सखाराम** काय ? चिलीम ? (दाऊद गप्प करतो त्याला.) अरे लेका मग नाव घ्यायला कशाला लाजतोस ?

(जाऊन कोनाड्यातून काढतो साहित्य.)

गांजा म्हणजे काय घरंदाजाची ठेवलेली रखेली आहे ? सारा मामला गुपचूप ? ही तर रंडी. चोराचोरीचा मामला नाही. कुणीही तब्बेतीनं घ्यावी, दोन दम हाणावेत. तुला सांगतो, रंडी जेवढी लौकर देवापाशी पोचेल ना, तेवढं कोण नाही पोचणार. कोण नाही पोचू शकणार. कारण तिला मुळीच लाज नसते. खुल्ला मामला. देवापुढंसुद्धा ती ताठ मानेनं अशी जाईल. म्हणेल, पोटासाठी जगले. पण कुणाला फसवलं नाही. तकलीफ नाही दिली. गुंतवून नंतर छळलं नाही. दिलं असलं तर सुख दिलं. माणसाच्या जातीची खाज भागवली, खाज. लहान, मोठा, श्रीमंत, गरीब, रोगी, निरोगी पाहिला नाही. सगळे समान मानले. हे देवा, पापं केली असली तर दुसऱ्यानं केली, मी पापी नाही !

(दरम्यान आत तिने अडगळीतून दोनतीन तसबिरी शोधून काढून धूळ झटकून पुसून एका ठिकाणी मांडल्या आहेत.)

थांब—विस्तव आलो घेऊन.

(आत येतो. देवाच्या तसबिरी मांडून बसलेली ती पाहतो.)

विस्तव हवां.

(ती दचकते. उठून चुलीकडे येते.)

जेवण सातला तयार लागतं मला. जोंधळ्याच्या चार भाकऱ्या लागतात. बरोबर हिरव्या मिरच्या लागतात. लसणाची चटणी त्या तिकडे कुठल्या तरी डब्यात असेल. मिरच्या परडीत आहेत. जोंधळ्याच्या पिठासाठी तो मोठा डबा.

(ती निखारा देते थाळीत एका.)

असा नसतो द्यायचा चिलमीला विस्तव.

(कोपऱ्यातून धुपाचे जुनाट पात्र काढतो.)

यात देत चला.

(ती देते.)

तुम्हांला भात लागत असेल तर तांदूळ असतील घरात. आधीचीला लागत असत. शोधून बघा. डाळ पण असेल. आपण भात खात नाही.

(ती ऐकून घेते. तो तिच्याकडे किंचित नुसताच पाहून विस्तव घेऊन बाहेर येतो. ती तो गेल्यावर जेवणाच्या तयारीला लागते. निरांजन सापडते ते तसबिरीपुढे आणून ठेवते. बाहेर लांब घंटा

वाजू लागतात. ती त्या दिशेने एक नमस्कार करते. बाहेरल्या खोलीत सखाराम आणि दाऊद गांजाच्या कामात व्यग्र. दम मारू लागतात.)

ओ—हो हो. बं भोले...दाऊदमिया, मजा आ रहा है...

(हे दृश्य काळोखात जाते. मृदंग घुमू लागतो.)

## दृश्य दुसरे

[मृदंग घुमत राहतो तेव्हा ती स्वयंपाकघरात चिरगूट अंथरते आहे. सखाराम बाहेरल्या खोलीत मृदंग घुमवतो आहे.

ती देवाला नमस्कार करून चिरगुटावर, अंग आक्रसून, हात उशाशी घेऊन निजते. सखाराम मृदंग बाजूला सारतो.]

**सखाराम** बं भोले...(करकचून कोरडी जांभई देतो. उठून दार उघडून बाहेर जातो.)

(मृदंग थांबला, पावले बाहेर गेली या चाहुलीने ती उठून बसते. दूर कुठे तरी भजन चालले आहे. ती उठून हळूच बाहेर येते. नजर टाकते. चिलमीचे साहित्य उचलून बाजूला ठेवते. केर काढू लागते तेथला आणि सखाराम येतो. ती दचकून अंग चोरून उभी.)

काढा, केर काढा.

(तो खुंटीकडे येऊन खमीस काढतो. उघडा होतो. स्वयंपाकघरात जाऊन तोंडावर पाणी मारतो. हे करताना तिथे अंथरलेले तिचे चिरगूट पाहतो. बाहेरल्या खोलीत येतो. ती त्याची वळकटी अंथरते आहे.)

**सखाराम** तिथं नव्हे, तिकडे.

(ती गडबडीने जागा बदलून वळकटी अंथरू लागते. सखाराम गांजाच्या धुंद नजरेने पाहतो आहे तिला. ती सखारामचे अंथरूण व्यवस्थित करण्यासाठी त्यावर बसून चादर सारखी करते. उठते.)

उठू नका, बसा.

(ती बाजूला होऊन खालमानेने अर्धवट उठू लागते.)

काय म्हणतो, उठू नका.

(ती स्तब्ध.)

आज इथंच निजा.

(ती थिजलेली. मग ती कशीबशी उठून आत जाऊ लागते.)

**सखाराम** ऐकताय ना. झोपण्याआधी पाय दाबून घेण्याची रीत आहे इथली. माणसं आली आणि गेली, पण रीत नाही चुकलेली. आज पण ती चुकणार नाही.

(अंथरुणावर बसलेला.)

बं भोले.

(ती एकीकडे उभी.)

इथं उर्दूत बोलतंय का कोण ? पाय !

(ती गडबडीनं कशीबशी येऊन बसते त्याच्या पायाशी.)

(तुलनेने सौम्य स्वरात) पाय चेपा बरं.

(ती त्याचे पाय उपरेपणाने चेपू लागते.)

वरपर्यंत चेपा.

(ती बिचकत पाय वरपर्यंत चेपू लागते.)

नीट. पाय तुम्हांला खात नाहीत. थकलो आज. सकाळीच सोनावण्याला निघालो. येताना परत तेवढाच टिंगेरा पडला. फार चाल झाली.

(ती पाय चेपते आहे मुकाट्याने.)

आता नाव सांगा एकदा तुमचं.

**ती** लक्ष्मी.

**सखाराम** लक्ष्मी ? (तिला न्याहाळीत) चांगलं आहे नाव. मालकाचं नाव काय ?

**लक्ष्मी** (गप्प. पाय चेपते आहे.)

**सखाराम** मालकाचं नाव तुमच्या ?

(ती न बोलता पाय चेपत राहते.)

अच्छा, अच्छा. नाव घ्यायचं नसतं नाही का. आपल्याला त्याची सवय नाही—

(ती हुंदका देऊन डोळे टिपते पदराने.)

काय झालं ? नाही विचारीत. बास ? तुम्हा टाकलेल्या बायकांत बाकी काय असलं नसलं तरी एवढ्यापुरती सगळी एक तऱ्हा. नवऱ्याचं नाव निघालं का डोळ्याला पाणी. तोच लुटून आणि वर लाथा हाणून घराबाहेर काढतो, जीव घ्यायला निघतो, पण तरी तो देव. असल्या देवाला खेटराची पूजा हवी. चौकात जोड्यांनी हाणले पाहिजे  हे देव. काय ?

(ती पाय चेपते आहे.)

तुम्ही पण सगळ्या एकजात मेल्या आईचं दूध प्यायलेल्या. मुर्दाड. लाथा बसल्या तरी पुन्हा पुन्हा पाय धराल.

(ती मुकाट्याने पाय चेपते आहे.)

जेवला ?

(ती पाय चेपते आहे.)

मी काय विचारतोय ? प्रश्नावर उत्तर दिलं नाही तर खपत नाही आपल्याला. जेवलात का ?

(ती नकारार्थी मान हालवते.)

का नाही जेवला ?

(ती पाय चेपते आहे.)

मी काय विचारतोय ? (पांघरूण दूर उडवतो.)

**लक्ष्मी** (जरा भ्यायलेली.) आज चतुर्थी. त्यात भूक नव्हती.

**सखाराम** (हे उत्तर अनपेक्षित.) म्हणून उपास ?

(लक्ष्मी होकारार्थी मान हालवते.)

सकाळी तर जेवण नसणारच. काल ?

(लक्ष्मी नकारार्थी मान हालवते.)

मग काय उपाशी मरायचंय काय ?

**लक्ष्मी** सवय आहे मला.

**सखाराम** सवय आहे ! या घरात हे चालणार नाही. इथं दोन वेळा रगडून जेवायचं. अंग मोडून सेवा व्हायला हवी. सगळे उपासतापास बंद, सांगून ठेवतोय.

(लक्ष्मी काही बोलत नाही.)

जा. झोपा जा आता.

**लक्ष्मी** (घुटमळत) एक विचारू ?

**सखाराम** विचारा की.

**लक्ष्मी** (घोटाळून) कापूस कुठं असतो ? निरांजन लावलं असतं देवाशी.

**सखाराम** आधीची कुठं ठेवीत होती ठाऊक नाही. त्यात आपण कधीच लक्ष घातलं नाही. चिलीम कुठं असते, मृदंग कुठं असतो विचारा, ते आपलं राज्य. नसला तर आणून टाकतो उद्या कापूस. आता आणखी काय ?

**लक्ष्मी** (अनावरपणे) आधीची कशी होती ?

**सखाराम** आधीची. हा प्रश्न येतोच. नंतरचीला आधीचीबद्दल विचारायचं असतंच. सहा झाल्या, पण हे चुकलं नाही. आधीची कशी होती. अंथरुणात फार नव्हती; हडकतच गेली. झुरत होती. मास नाहीच, सगळी हाडंच. पण इमानी होती फार. वर मान करून कधी पाहिलंन नाही, मग उलटून बोलणं राहिलंच. मिरजेच्या इस्पितळात गेली. आठवडा होईल.

**लक्ष्मी** मुलं होती ?

**सखाराम** दोन होती. ती नवऱ्यानं ठेवली. म्हणून तर जास्त झुरणी तिला. शेवटचा श्वास लागला तरी तोंडानं नवऱ्याचं आणि मुलांची नावं घेत होती. तोंडात शेवटचं पाणी मी घातलं, पण तिच्या तोंडात नाव मात्र नवऱ्याचं.

(लक्ष्मी उसासा सोडते.)

काय झालं ? सगळं रीतसर केलं. अग्नी मी दिला. कावळा काय पिंडाला शिवेना. तेव्हा शिव्या

घातल्या भरपूर. म्हणालो, तो हरामखोर तुला टाकतो त्याची तकलीफ मला देतेस ? मी तुझा काय लागता आहे ? तुला आसरा दिला घरात ही काय माझी चूक झाली ? मला मुकाट्यानं आधी मोकळं कर. दरडावलं तशी कावळा शिवला भस्सकन. आंघोळ करून मोकळा झालो. या घराचा उंबरठा ओलांडून एकदा आत आलं की ते माणूस इथलं. पुन्हा बाहेर गेलं की संबंध संपला. तकलीफ नाही पाह्यजे. पण बाहेर पाठवतानासुद्धा रीतसर साडीचोळी आणि पन्नास रुपये देऊन मग पाठवतो आपण. वर तिकीट, जायचं असेल तिकडलं. हे सांगायचं राहिलं होतं, बरं झालं आठवण झाली. शिवाय इथं मिळतं ते बरोबर नेण्याची मोकळीक. म्हणजे कपडे, वहाणा, बांगड्याबिंगड्या. रीतीत कमी नाही होणार. माणुसकी सोडायला हा सखाराम बाइंडर काय कुणाचा नवरा नव्हे. जा, झोपा, पेंगू नका. उपासांनी त्राण नाही उरलंय. पण यानंतर असं मरतमढ्यासारखं या घरात्त फार काळ नाही निभणार, सांगून ठेवतोय. आपली भूक साधी नाही. मग तक्रार चालणार नाही. सकाळी सातला मला प्रेसमध्ये पोचावं लागतं. दुपारला बाराला घरी येतो. पुन्हा दोनला निघतो का सहाला परत. ओव्हरटाइम, काम अर्जंट असलं म्हणजे. सकाळी ठीक साडेसहाला दोन भाकऱ्यांची न्याहारी तयार हवी. आजचा रोज सोनावण्याला जाण्यात बुडाला. उद्या ओव्हरटाइम करावा लागणार.

(आडवळतो. कुशी वळतो. ती आत जाते निघून. लांबवर भजन चालू आहे. प्रकाश जातो.)

## दृश्य तिसरे

[प्रकाश येतो तेव्हा रात्र बरीच चढलेली. सखाराम घोरतो आहे गाढ झोपेत. बाहेर अगदी शांत. लक्ष्मी त्याच्या पायांशी पलीकडे गुडघ्यांवर मान टेकवून एकीकडे बसून आहे. मध्येच डोळे मिटते. पुन्हा उघडते. हळूहळू प्रकाश जातो.]

## दृश्य चौथे

[पुन्हा प्रकाश येतो तेव्हा स्वयंपाकघरात लक्ष्मी बसलेली दिसते आहे. आता जरा कमी ओढलेली आणि थोडी टवटवीत दिसते. बाहेरल्या खोलीत कोणी नाही.]

**लक्ष्मी** (वाकून मोठमोठ्यांदा हसत बोलते आहे.) लबाडा, मला फसवतोस होय ? बाहेर घालवला तरी पुन्हा परत येतोस ? तुला रोज खायला हवं होय रे ? सोकावलास की ! आता काही नाही मिळणार ! नाही मिळणार म्हणते तर ? अगदी नाही. तोंड वर करून बघू नकोस. हो तिकडे आधी, तिकडे हो—अरे तिकडे जा म्हणते तर ? अंगचटीला येतो मेला ! मी तुला सांगते, माझ्या अंगाशी येऊ नकोस ! नको म्हणते ना ?

(गुदगुल्या झाल्याप्रमाणे हसत)

अरे नको ! आता बघ हं, मांडीवर चढलास तर हाणीन एक. हो दूर. दूर हो आधी, चिकटोबा कुठला. आज तुला काही एक नाही मिळणार. रोज रोज ताप काय रे तुझा ? आधी अंगावरून उतर ! (खिदळते आहे.)

उतर ना रे अंगावरून आधी. आई ग—का त्रास देतोस मला ?

(सखाराम कामावरून येऊन दाराशी हे ऐकत उभा.)

उतर ना रे अंगावरून...

(सखारामचा पारा चढू लागलेला. ताड्ताड् स्वयंपाकघरात जातो. तिथे लक्ष्मी एकटीच खिदळते आहे. सखारामला पाहून गप्प होते. येऊ पाहणारे हसू दाबीत अंग सावरून उभी राहते.)

**सखाराम** (इतस्ततः संशयाने पाहत) काय चाललं होतं ?

**लक्ष्मी** (मानेनेच) काही नाही.

**सखाराम** मग एवढं हसायला काय झालं होतं ? (संशय फिटलेला नाही.) कुणाबरोबर बोलणं चाललं होतं ?

**लक्ष्मी** (हसू दाबते आहे.)

**सखाराम** (जरा गुरगुरूनच) काय खूळ लागलंय का काय एकट्यानं बोलायला ? (इतस्ततः पाहून घेतोच आहे.)

**लक्ष्मी** (हसू दाबून गप्प उभी.)

**सखाराम** कुणाशी बोलत होता ?

**लक्ष्मी** (नुसतीच नकारार्थी मान हालवते.)

**सखाराम** (जाकीट काढीत बाहेर येतो.) एकट्यानंच बोलतात !

(येता येतां पुन्हा अविश्वासाने पाहून घेतो. लक्ष्मी, सखाराम बाहेर जाताच, बसली होती तिथे काही तरी घाईघाईने शोधते.)

(बाहेरल्या खोलीतून) पुन्हा असलं चालणार नाही, सांगून ठेवतोय ! एकट्यानंच हसतात ! हंः !

(लक्ष्मी चुलीवरचा चहा उतरते. मग बादलीतून पाणी आणि तांब्या घेऊन ओटीकडे येते. सखाराम तिथे येऊन उभा. ती पाणी घालते. तो हात, तोंड, पाय स्वच्छ धुतो. तिने दिलेल्या पचाने पुसतो. दोघे आत येतात. सखाराम पुढे. लक्ष्मी मागे.
सखाराम येऊन बैठकीवर लेटतो. लक्ष्मी बसून त्याचे पाय चेपू लागते मुकाट्याने. तो तिच्याकडे आणि आत काहीशा नवलानेच पाहतो आहे. दोघांची नजरानजर. लक्ष्मी खाली पाहते.)

**सखाराम** (तिचा हात धरून) हसायला काय झालं होतं ?

**लक्ष्मी** (हात सोडून) कुणी पाहील.

**सखाराम** मग लाज आहे का काय कुणाची ?

**लक्ष्मी** चहा घेऊन येते—

**सखाराम** (तसाच जरा हात धरून किंचित विचार करून सोडतो.) लौकर या.

(लक्ष्मी आत जाऊन चहा घेऊन येते. त्याला देते.)

**सखाराम** (चहा हाती घेऊन शेजारची जागा दर्शवीत) बसा.

(ती उभी.)

मी म्हणतोय बसा इथं.

(ती कशीबशी बसते जरा अंतर ठेवून.)

अशा लग्नाच्या बायकोसारख्या नको, जवळ बसा.

(तिला शेजारी ओढतो. आपल्यातला चहा देतो.)

घ्या—

**लक्ष्मी** माझा आहे आत—

**सखाराम** तोंड फोडून टाकीन पुन्हा ऐकलं तर. माझ्यातला देतोय तर म्हणे आहे आत. हूं !

(ती घोटभर चहा घेते. 'पुरे' म्हणते. तो जबरदस्तीने आणखी घ्यायला लावतो. मग तो घेतो. ती चहाची कपबशी घेऊन जाऊ लागते. तिला अडवून)

कुणाबरोबर चाललं होतं बोलणं हसणं मघा ?

**लक्ष्मी** कुणाबरोबर नाही.

**सखाराम** मग मी ऐकलं ते काय मनचं ?

**लक्ष्मी** नव्हे. तसं नव्हे—

**सखाराम** मग ?

**लक्ष्मी** असंच.

**सखाराम** असंच म्हणजे ?

**लक्ष्मी** (घुटमळून) मुंगळ्याबरोबर.

**सखाराम** काय ?

**लक्ष्मी** (होकारार्थी मान हालवते 'तसंच' अशा अर्थी.)

**सखाराम** मुंगळ्याबरोबर बोलत होतात ?

**लक्ष्मी** हूं. खरंच.

**सखाराम** मुंगळा नव्हता का बोलत तुमच्याशी ?

**लक्ष्मी** हो. (मग) नाही.

(सखाराम थक्क होऊन पहतो आहे.)

म्हणजे त्याचं बोलणं मीच बोलत होते.

**सखाराम** मुंगळ्याशी बोलत होतात ! आणखी नाही का काही ?

**लक्ष्मी** (गप्प उभी.)

**सखाराम** डोकं तपासून घेतलं पाहिजे म्हणा की. मुंगळ्याशी बोलत होता. ओळखीचाच असेल मुंगळा ?

**लक्ष्मी** हो. ओळख बोलू लागलं की होते. मी त्याला साखर घालते. तो येतो.

**सखाराम** काय एकच असेल मुंगळा ? घरात ढीगभर असतील. कोणता पण येत असेल !

**लक्ष्मी** मला ओळखू येतो 'तो' मुंगळा.

**सखाराम** तो कसा काय ?

**लक्ष्मी** तसाच. तो आला की कळतं.

**सखाराम** कळतं ? ते कशावरनं ?

**लक्ष्मी** त्याच्या चालीवरनं.

**सखाराम** मुंगळ्याची चाल ?

**लक्ष्मी** खरंच. हा मुंगळा भरभर धावत नाही काही येत. सावकाश येतो आणि साखरेच्या दाण्याला तोंड लावण्याआधी दाण्याच्या भोवती एकदा फिरतो.

**सखाराम** कोण ? मुंगळा ? आणखी नाही का काय करत ?

**लक्ष्मी** हो. एकदा तोंड साखरेला लावून झालं की एका पायानं आधी तोंड साफ करतो.

**सखाराम** तोंड साफ करतो ! वाः ! आणखी काय काय करतो हा तुमचा मुंगळा ?

**लक्ष्मी** दाणा घेऊन भिंतीशी जातो.

**सखाराम** आणि ?

**लक्ष्मी** अलीकडे दोन दिवस धीट झालाय तो. साखरेचा दाणा सोडून माझ्या मागूनच येत रहातो सारखा.

**सखाराम** असं का. छान. आणखी ?

**लक्ष्मी** अंगावर चढतो.

**सखाराम** वा. अंगावर चढतो, अं ? मग आणखी ?

**लक्ष्मी** काही केल्या उतरत नाही. (उठत) दाखवू का आणून ?

**सखाराम** कोण ? मुंगळा ? अद्याप आमचं डोकं ठिकाणावर आहे. म्हणे मुंगळा बोलतो. चालणार नाहीत हे असले वेडेचार इथं. इथं शहाण्यासारखं रहायला हवं, काय ? नीट ध्यानात ठेवा. जा आत.

(ती चहाची कपबशी घेऊन आत जाते. सखाराम ती आत जाताना बघतो आहे. लावणीचा पहिला चरण पुरुषी बेसूर आवाजात गुणगुणतो.)

**सखाराम** हे आणखी वेगळंच प्रकर्ण. ती आधीची नवऱ्याचा सदरा कवटाळायची तर ही

मुंगळ्याशी बोलते ! काय साले हे नवरे करून टाकतात बायकांचं.

(ती आत जाऊन चुलीशी कपबशी विसळून ठेवते. तशीच वाकून इकडेतिकडे पाहत राहते शोधक नजरेने. मग तिथेच बसते. सखाराम 'आज अजून दाऊद आला नाही...' पुटपुटत चिलमीचे साहित्य काढू लागतो कोनाड्यातले.)

**लक्ष्मी** (हळू पण ऐकू येणाऱ्या आवाजात) तुझ्यामुळं...तुझ्यामुळं बोलणं खावं लागलं मला. तर काय. तू साखर खा आणि मला मात्र बोलणं. कुणाला खरं नाही वाटत. मुंगळे, मुंग्या, चिमण्या, कावळे, सगळे माझ्याशी बोलतात. कशाला बोलता तुम्ही माझ्याशी ? अं ? कछाला बोलता ले ? छांग ना ! छांग लबाला...छांग...

(मधल्या दाराशी विस्तवासाठी आलेला सखाराम हे पाहत उभा. त्याचे डोके जाते.)

**सखाराम** (ओरडून) अरे काय आहे काय ? घर आहे हे का वेड्यांचं इस्पितळ ?

(ती धसकून उभी.)

काय म्हणालो मी ? खबरदार हा प्रकार चालेल तर यानंतर ! सगळा पागलपणा एकदम बंद !

(ती थरथरते आहे भयाने.)

घरातनं बाहेर काढीन असले वेडेचार पुन्हा चालतील तर. विस्तव पाह्यजे मला.

(ती मुकाट्याने धूपपात्र उचलून त्यात निखारे टाकून त्याच्या हाती देण्यासाठी येते.)

रडणं बंद ! काय मेलं का काय कोण ? मेलं तरी रडायचं नाही या घरात.

(ती घाईने डोळे पुसण्याच्या प्रयत्नात धूपपात्र कलंडते. निखारे पडतात तिच्या पायावर. ती चरचरून चटका बसल्याने कण्हून खाली बसते. पाय धरते. सखाराम घाईने पायाने निखारे दूर उडवतो.)

**सखाराम** भाजू द्या, भाजू द्या पाय खरपूस ! काय वाटणार नाही मला.

(ती वेदनेने कळवळलेली. तशीच उठते. धूपपात्र उचलते. निखारे त्यात गोळा करू लागते.)

गलथानपणाची अद्दल घडलीच पाह्यजे. म्हणजे पुन्हा तो होणार नाही. भांडं नीट धरता येत नाही ? नालायक जात ! उठता लाथ, बसता बुक्की देऊन याद द्यावी लागते. द्या तो विस्तव इकडे आणि जा आत. लावा काय तरी पायाला, नाही तर मरा.

(तिने धूपपात्रात धरलेला विस्तव घेऊन चिलमीकडे येतो. ती आत जाते. आत चुलीशी पाय कुरवाळत राहते, चरचरत्या वेदना कमी करण्याचा प्रयत्नात.)

(चिलीम तयार करीत) हा दाऊद पण आला नाही आज. कुठं उलथला कुणास ठाऊक.

(ती चुलीशी बसून पायावर फुंकर घालते आहे पुन्हा पुन्हा. बाहेर सखाराम विस्तव फुलवतो आहे.

(चिलमीचा दम मारून) बं—भोले...

**लक्ष्मी** (पाय कुरवाळीत जमिनीकडे पाहत उदास स्वरात) कशाला विचारतोस तोंड वर उचलून ? काय किंमत आहे इथं ? बोलून चालून टाकलेली. भाजून कोळसा झाला पायाचा

**सखाराम** मुंगळ्याशी बोलत होतात ! आणखी नाही का काही ?

**लक्ष्मी** (गप्प उभी.)

**सखाराम** डोकं तपासून घेतलं पाहिजे म्हणा की. मुंगळ्याशी बोलत होता. ओळखीचाच असेल मुंगळा ?

**लक्ष्मी** हो. ओळख बोलू लागलं की होते. मी त्याला साखर घालते. तो येतो.

**सखाराम** काय एकच असेल मुंगळा ? घरात ढीगभर असतील. कोणता पण येत असेल !

**लक्ष्मी** मला ओळखू येतो 'तो' मुंगळा.

**सखाराम** तो कसा काय ?

**लक्ष्मी** तसाच. तो आला की कळतं.

**सखाराम** कळतं ? ते कशावरनं ?

**लक्ष्मी** त्याच्या चालीवरनं.

**सखाराम** मुंगळ्याची चाल ?

**लक्ष्मी** खरंच. हा मुंगळा भरभर धावत नाही काही येत. सावकाश येतो आणि साखरेच्या दाण्याला तोंड लावण्याआधी दाण्याच्या भोवती एकदा फिरतो.

**सखाराम** कोण ? मुंगळा ? आणखी नाही का काय करत ?

**लक्ष्मी** हो. एकदा तोंड साखरेला लावून झालं की एका पायानं आधी तोंड साफ करतो.

**सखाराम** तोंड साफ करतो ! वाः ! आणखी काय काय करतो हा तुमचा मुंगळा ?

**लक्ष्मी** दाणा घेऊन भिंतीशी जातो.

**सखाराम** आणि ?

**लक्ष्मी** अलीकडे दोन दिवस धीट झालाय तो. साखरेचा दाणा सोडून माझ्या मागूनच येत रहातो सारखा.

**सखाराम** असं का. छान. आणखी ?

**लक्ष्मी** अंगावर चढतो.

**सखाराम** वा. अंगावर चढतो, अं ? मग आणखी ?

**लक्ष्मी** काही केल्या उतरत नाही. (उठत) दाखवू का आणून ?

**सखाराम** कोण ? मुंगळा ? अद्याप आमचं डोकं ठिकाणावर आहे. म्हणे मुंगळा बोलतो. चालणार नाहीत हे असले वेडेचार इथं. इथं शहाण्यासारखं रहायला हवं, काय ? नीट ध्यानात ठेवा. जा आत.

(ती चहाची कपबशी घेऊन आत जाते. सखाराम ती आत जाताना बघतो आहे. लावणीचा पहिला चरण पुरुषी बेसूर आवाजात गुणगुणतो.)

**सखाराम** हे आणखी वेगळंच प्रकर्ण. ती आधीची नवऱ्याचा सदरा कवटाळायची तर ही

मुंगळ्याशी बोलते ! काय साले हे नवरे करून टाकतात बायकांचं.

(ती आत जाऊन चुलीशी कपबशी विसळून ठेवते. तशीच वाकून इकडेतिकडे पाहत राहते शोधक नजरेने. मग तिथेच बसते. सखाराम 'आज अजून दाऊद आला नाही...' पुटपुटत चिलमीचे साहित्य काढू लागतो कोनाड्यातले.)

**लक्ष्मी** (हळू पण ऐकू येणाऱ्या आवाजात) तुझ्यामुळं...तुझ्यामुळं बोलणं खावं लागलं मला. तर काय. तू साखर खा आणि मला मात्र बोलणं. कुणाला खरं नाही वाटत. मुंगळे, मुंग्या, चिमण्या, कावळे, सगळे माझ्याशी बोलतात. कशाला बोलता तुम्ही माझ्याशी ? अं ? कछाला बोलता ले ? छांग ना ! छांग लबाला...छांग...

(मधल्या दाराशी विस्तवासाठी आलेला सखाराम हे पाहत उभा. त्याचे डोके जाते.)

**सखाराम** (ओरडून) अरे काय आहे काय ? घर आहे हे का वेड्यांचं इस्पितळ ?

(ती धसकून उभी.)

काय म्हणालो मी ? खबरदार हा प्रकार चालेल तर यानंतर ! सगळा पागलपणा एकदम बंद !

(ती थरथरते आहे भयाने.)

घरातनं बाहेर काढीन असले वेडेचार पुन्हा चालतील तर. विस्तव पाह्यजे मला.

(ती मुकाट्याने धूपपात्र उचलून त्यात निखारे टाकून त्याच्या हाती देण्यासाठी येते.)

रडणं बंद ! काय मेलं का काय कोण ? मेलं तरी रडायचं नाही या घरात.

(ती घाईने डोळे पुसण्याच्या प्रयत्नात धूपपात्र कलंडते. निखारे पडतात तिच्या पायावर. ती चरचरून चटका बसल्याने कण्हून खाली बसते. पाय धरते. सखाराम घाईने पायाने निखारे दूर उडवतो.)

**सखाराम** भाजू द्या, भाजू द्या पाय खरपूस ! काय वाटणार नाही मला.

(ती वेदनेने कळवळलेली. तशीच उठते. धूपपात्र उचलते. निखारे त्यात गोळा करू लागते.)

गलथानपणाची अद्दल घडलीच पाह्यजे. म्हणजे पुन्हा तो होणार नाही. भांडं नीट धरता येत नाही ? नालायक जात ! उठता लाथ, बसता बुक्की देऊन याद द्यावी लागते. द्या तो विस्तव इकडे आणि जा आत. लावा काय तरी पायाला, नाही तर मरा.

(तिने धूपपात्रात धरलेला विस्तव घेऊन चिलमीकडे येतो. ती आत जाते. आत चुलीशी पाय कुरवाळत राहते, चरचरत्या वेदना कमी करण्याचा प्रयत्नात.)

(चिलीम तयार करीत) हा दाऊद पण आला नाही आज. कुठं उलथला कुणास ठाऊक.

(ती चुलीशी बसून पायावर फुंकर घालते आहे पुन्हा पुन्हा. बाहेर सखाराम विस्तव फुलवतो आहे.

(चिलमीचा दम मारून) बं—भोले...

**लक्ष्मी** (पाय कुरवाळीत जमिनीकडे पाहत उदास स्वरात) कशाला विचारतोस तोंड वर उचलून ? काय किंमत आहे इथं ? बोलून चालून टाकलेली. भाजून कोळसा झाला पायाचा

तरी कोण विचारणार ? पाहतोस काय ? लाज नाही तुला ? जा तिकडे. काळं तोंड दाखवू नको तुझं, चालता हो आधी तिकडे. स्स् हाय...जा बघू तू...जा नाही तर मारीन बघ...

(ह्या दृश्यावर काळोख होतो.)

## दृश्य पाचवे

[स्वयंपाकघरात छोट्या चिमणीचा पडेल तेवढाच अगदी मंद प्रकाश. बाहेरली खोली पूर्ण अंधारात. फक्त आवाज ऐकू येतात.]

**सखाराम** ए, ऊठ. ऊठ ना. आता उठतेस का...जागी हो नाही तर हाणीन एक. ऊठ म्हणतो ना—

**लक्ष्मी** (झोपाळल्या स्वरात) काय आहे. मग उठते.

**सखाराम** मग नाही—आधी ऊठ.

**लक्ष्मी** अयाई. काय म्हणता ? अजून रात्र तर आहे.

**सखाराम** म्हणूनच उठवतोय.

**लक्ष्मी** काय.

**सखाराम** तशी हस.

**लक्ष्मी** कशी ? काय रात्रीचं पण...

**सखाराम** आधी तशी हस.

**लक्ष्मी** तशी म्हणजे कशी...मला फार झोप येते ना पण—दोन रात्री झोप नाही...

**सखाराम** झोप मग जराशानं, आधी तशी हस. मुंगळा अंगावर चढतो म्हणून संध्याकाळला हसत होतीस तशी. (थांबून) हस ना—

**लक्ष्मी** हसते हो मग. अयाई, पाय दुखला ना माझा—आऽ...

**सखाराम** मग हसत का नाहीस ? हस आधी. हस.

**लक्ष्मी** मला नाही येत...

**सखाराम** मुंगळ्यामुळं हसतेस. मी सांगतो तर जमत नाही ? भाजलेला पाय मुरगाळीन बघ. आधी हस तशी. ऊठ. झोपायचं नाही, ऊठ !

**लक्ष्मी** खरंच. नाही येत. सोडा मला. झोपू दे.

**सखाराम** नाही. झोप मग. ऊठ आंधी. हस—हस नाही तर गळा दाबीन. हस. हस. हस आधी—हस—

(लक्ष्मीचे प्रथम प्रयत्नपूर्वक हसणे. मग खरे हसणे, संध्याकाळसारखेच. मग सखारामचे हसणे ऐकू येऊ लागते. दोघांचे हसणे चालू राहते. मग हसणे थांबते. स्तब्धता.)

**लक्ष्मी** अयाई. थकले मी. आता नाही हो हसवत....झोपू दे ना आता मला. पाय पण भारी

ठुसठुसतोय.

**सखाराम** कुठे. बघू. पुन्हा वेंधळेपणा झाला तर मात्र पाय मोडीन, सांगतोय. नालायक जात....

(पूर्ण काळोख होतो.)

## दृश्य सहावे

[प्रकाश येतो.

स्वयंपाकघरात लक्ष्मी लगबगीने कसली तरी तयारी करते आहे. बाहेर ललकारी— 'मंगलमूर्ती, मोरया...ओरडा रे पोरांनो, मंगलमूर्ती...' हा सखारामचा आवाज. पोरांचा गलका, 'मोऽऽऽरया' सखाराम गणपतीची मूर्ती पाटावरून घेऊन आणि मागोमाग दाऊद झांजा घेऊन, असे दोघे येतात उत्साहाने.]

**सखाराम** (दाराशी येऊन) मंगलमूर्ती...

**दाऊद** मोरया.

(लक्ष्मी पूजेच्या तयारीने लगबगीने बाहेर येते. मूर्तीची पूजा होते. सखाराम मूर्ती थोडी आरास केली आहे तिथे ठेवतो.)

**सखाराम** बसा, मंगलमूर्ती. बापजाद्यांचं काय माहीत नाही पण आमच्या घरात पहिल्यांदाच आलात. आराम करा. खा, प्या, चैन करा. जोडीला हे उंदिरराव आहेतच, टपून बसलेले. काय उंदिरराव, बरं आहे ना ? आहेच म्हणा. हे गणपतराव पाठीवर बसत नाहीत तोपर्यंत बरं आहे. गणपतरावांनी बाकी वहान पण वहान शोधलं—

**लक्ष्मी** काय हे. असं बोलू नये.

**सखाराम** काय झालं ? दाऊद, यात मी काय वाईट बोललो ? तूच सांग. काय मी याचं पोट काढलं का दातांची थट्टा केली ? का सोंडेचा विषय काढला मी ? सांग—

**लक्ष्मी** पुरे बरं—

**सखाराम** नाही, मी काय वावगं बोललो ते सांग तू मला, दाऊद—

**दाऊद** रहने दो ना...नही बोलना तो नही—अरे मंगलमूर्ती तो सब जान पाएगा. देव है ना.

**सखाराम** नाही पण आल्या आल्या हा असा पाणउतारा ? एवढा कधी नव्हे तो स्वतः जाऊन गणपती घरी आणला—

**दाऊद** रहने दो यार. अब परसादकी कुछ बात करो, हमे जाना है धंदेको—

**लक्ष्मी** आरती केल्याशिवाय जायचं नाही कुणी. ही मी आलेच तबक तयार करून—

(आत जाते.)

**दाऊद** यह ठैरा. पाप नको म्हणून सगळ्या धर्मांच्या देवांना जपतो आपण, यार. कोणता देव

खफा होईल आणि आपलं वाईट करेल, काय नियम ?

**सखाराम** आपण साफ तर दाऊद, जगातल्या कोणत्याच देवाच्या बापाची आपलं वाकडं करण्याची टाप नाही ! हा !

**दाऊद** पण सखाराम, आपण साफ नाही. जगताना देवाच्या कोर्टाची साली यादच राहत नाही आपल्याला. हर वख्त नवा गुन्हा.

**सखाराम** तो खालच्या कोर्टातला. दाऊद, देवाच्या कोर्टात गुन्हा एक : खोटेपणा. बस्स ! खोटेपणाला जन्मठेप काळं पाणी. तो सगळ्यात वाईट गुन्हा. अरे जे सालं शरीर देवानंच हाडं, मांस आणि जान भरून शिवून पाठवलं त्याला काय त्या शरीराची खाज माहीत नाही होय ? अवतारात शरीर धारण केलं देवानं तेव्हा तेव्हा काय झालं ? कृष्णाचं आठव दाऊद—

(लक्ष्मी आरतीचे तबक घेऊन येते.)

**लक्ष्मी** (सखारामला) हं. घ्या.

(सखाराम तबक हाती घेतो. ती निरांजन पेटवते. दाऊदमिया मदत करतो.)

तुम्ही बाजूला व्हा भावजी—

(दाऊद बाजूला होतो.)

(सखारामला) हं, करा सुरू आरती—

**सखाराम** दाऊद, म्हण—सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची—

(दाऊद झांजा घेऊन साथ करू लागतो. दोघे म्हणू लागतात ढाल्या आवाजात. लक्ष्मी हे न आवडल्यासारखी बाजूला होते.)

**लक्ष्मी** (खुणेने दाऊदला) तुम्ही नको.

(तो गप्प होतो.)

**सखाराम** (म्हणता म्हणता म्हणायचा थांबून) काय झालं ? दाऊद, अरे बोल— वार्ता विघ्नाची, नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची—

(दाऊद गप्प.)

अरे यार टाळा उघड, गप्प काय झालास ? सर्वांगी सुंदर—

(दाऊदचं लक्ष लक्ष्मीवर.)

काय झालं ? का नाही आरती म्हणत तू ?

(दाऊद गप्प.)

का नाही म्हणत सांग.

(दाऊद हळूच लक्ष्मीकडे बघतो आहे.)

म्हणू नको सांगितलं तुला ?

(दाऊद गप्प.)

कुणी सांगितलं ?

(लक्ष्मीकडे वळतो.)

अच्छा. दाऊदनं काय म्हणून नाही म्हणायची आरती ?

**लक्ष्मी** कारण—ते मुसलमान आहेत ना.

(सखाराम एकदम आरती उधळतो खाली. दाऊद, लक्ष्मी भयभीत.)

**सखाराम** दाऊदला आरती म्हणायला कोण बंदी करतं ?

**दाऊद** जाने दो सखाराम—

**सखाराम** तू गप्प बैस ! (लक्ष्मीला) काय म्हणून त्यानं आरती नाही म्हणायची ?

**लक्ष्मी** ते मुसलमान—आणि आपण—हिंदू—

(सखाराम तिच्या कानपटात जीव खाऊन भडकावतो. ती कानपट धरून कळवळून हेलपाटलेली.)

**सखाराम** पुन्हा बोल !

**लक्ष्मी** काय चुकलं माझं ? गणपतीच्या पूजेत मुसलमानाची आरती—कशी चालेल ?

**सखाराम** का नाही चालणार ? माझी चालते तर त्याची का नाही चालणार ?

**लक्ष्मी** मुसलमानाच्या हातानं—

(सखाराम पुन्हा एक भडकावतो तिच्या. आणखी एक भडकावतो.)

**दाऊद** सखाराम, छोड यार—

(सखाराम खुंटीचा पट्टा सोडवून घेतो.)

**सखाराम** (लक्ष्मीला) पुन्हा बोल तू ! पुन्हा बोल !

**लक्ष्मी** खरं ते बोलते. माझ्या घरच्या गणपतीला मुसलमानाची आरती—

(सखाराम पट्ट्याने एक सज्जड फटका ओढतो.)

**दाऊद** सखाराम—

**लक्ष्मी** (वेदनेने कळवळलेली ताठ होऊन) मारायचं तर आत मारा. देवापुढं नको. आजच आलाय देव घरात.

**दाऊद** सखाराम, यार सुन—

**सखाराम** (लक्ष्मीचा थरथरता ताठ पवित्रा आव्हान वाटून) चल आत. पहातोच तुला.

(ती वळून आत जाते. मागोमाग सखाराम पट्ट्यासकट आत जातो. दाऊद आहे तिथेच. आत एकामागून एक फटके बसू लागतात. लक्ष्मीचे वेदनेचे अस्पष्ट हुंकार. पण बोंब नाही. दाऊदला सहन न होऊन घाईने बाहेर जातो. आत मार चालू. काळोख.)

तुला ?

**लक्ष्मी** जीव वर नाही आला माझा. माझ्या आईनं जल्म दिला नऊ महिने पोटात वागवून तो काय खेळण्यावारी जाण्याकरिता नव्हे. टाकलेली असेन पण घरंदाज आहे. बाप मुन्सफ होता माझा.

**सखाराम** मुन्सफ गेला चुना लावीत. नवऱ्यानं टाकलेल्या बाईला घरंदाज म्हणत नसतात कुणी. मी म्हणून घरात थारा दिला तुला.

**लक्ष्मी** मी म्हणून नांदले. दुसरीतिसरी निघून गेली असती !

**सखाराम** सहा नांदल्या सहा. तू सातवी.

**लक्ष्मी** त्यातली एक नीट नांदती तर मला कशाला आणली असती.

**सखाराम** म्हणजे मला गरज म्हणून आणली ?

**लक्ष्मी** मग काय उपकार केले माझ्यावर ?

**सखाराम** राहू दे चहा. तू चालती हो आत्ताच्या आत्ता.

(लक्ष्मी चहा कपात ओतते.)

चालती हो आधी, चल.

**लक्ष्मी** होईन. घ्या एकदाचा. (चहा पुढे करते.)

**सखाराम** वर्षभर राहून माज आला होय तुला.

(मांडी घालून चहा घेऊ लागतो.)

जा, नीघ इथनं. तोंड दाखवू नको पुन्हा.

**लक्ष्मी** नाहीच दाखवणार. पुतण्या आहे माझा अमळनेरला. त्याच्याकडे जाते.

**सखाराम** काळं कर इथून.

**लक्ष्मी** (दुसरे काम करीत) जायचं तेव्हा जाईन मी.

**सखाराम** च्यायला, ही मस्ती ?

**लक्ष्मी** मेली कोंबडी आगीला भीत नाही. काय होणार माझं आणखी ? या घरात काय व्हायचं राह्यलंय ? जग जाणतं काय चालतं ते. पोरंसोरंसुद्धा बोलतात.

**सखाराम** (चहा संपवून) काय बोलतात ?

**लक्ष्मी** ऐकावं हवं तर स्वता.

**सखाराम** पोरासोरांचं ऐकत नसतो मी. बोलतात काय पण ?

**लक्ष्मी** मी कशाला विटाळू तोंड, मार बसायला.

**सखाराम** उगीच मारत नाही कोण. चुका ओळखाव्या—

**लक्ष्मी** ओळखली. इथं आले हीच चूक झाली.

**सखाराम** ए, तोंड सांभाळून बोल तू !

**लक्ष्मी** आणखी मारच खायचा की नाही. अंगाचं धिरडं झाळंय मारानं. दुसरं खाते काय.

**सखाराम** लक्ष्मे, तुला सांगतोय तू मला चिडवू नकोस.

**लक्ष्मी** सरळ प्रेमाचा एक शब्द नाही. सारखं हिडीसफिडीस. शिव्या. बाहेर काढण्याचे दरसे. लाथा-बुक्क्या. (डोळे पुसत राहते पदराने.) पट्ट्याच्या मारानं अंग सोलून निघालं तरी म्हणे हस. हस. अजून हस. मरणाच्या कळा लागलेल्या असतात आणि वर हस ! नरक बरा नरक त्यापेक्षा. (मुसमुसत राहते.) मरन म्हणजे सुटेन एकदा यातनं... तर काय—

**सखाराम** आधीच बोललो होतो तुला की मी असा आहे म्हणून. आपल्याकडे लपवाछपवी नाही. खुल्लमखुल्ला सांगितलं होतं तुला. बजावलं होतं. पटत असलं तरच रहा नाही तर बाहेर हो म्हणून म्हणालो नव्हतो मी ? तेव्हा काय कान फुटले होते तुझे ? का पाय मोडले होते ? गेल्या वर्षात मी दारू घ्यायचा कमी नाही झालो ? सांग. तशी पितो अधनंमधनं पण कमी नाही पीत ? संकष्टीला पितो ? चातुर्मासात प्यायलो ? सांग ! गांजा गेल्या महिन्याभरात फक्त दोनदा चढवला. पूजा करायला लागलो का नाही ? सांग ! रोज आंघोळ करून पूजा करतो का नाही ? दे जबाब नाही तर तोंड फोडून टाकतो तुझं. दे जबाब ! कपडे स्वच्छ असतात का नाही हल्ली माझे ? सांग ! आता का मुस्कट बंद पडलं तुझं ? रडतेस कशाला आता ?

**लक्ष्मी** उपकार झाले माझ्यावर !

**सखाराम** आधीच्या सहा झाल्या, कुणाचा जुलूम म्हणून खपवून नाही घेतला आपण. बापाला बाप न म्हणणारा माणूस आहे मी. तुझं ऐकलं का नाही ? सांग !

**लक्ष्मी** बदल्यात मार. आणि शिव्या. आणि छळ.

**सखाराम** मग तुझं काय म्हणणं तुझी सेवा करायची नि लाळ घोटायची होय ?

**लक्ष्मी** .मी गेल्यावर कळेल काय ते.

**सखाराम** जाच तू ! कुत्र्याच्या मोतीनं जगावं लागेल तेव्हा समजेल.

**लक्ष्मी** आता काय आणखी वेगळं आहे ?

**सखाराम** वेगळं नाही ? या घरात तुला वेगळं वाटत नाही ? मग हो बाहेर. आधी हो बाहेर—चल—

(तिला चुलीपासची धरून फराफरा ओढत बाहेर नेऊन टाकून हात झाडीत आत येतो.) पुन्हा घरात पाऊल टाक, जीवच घेतो तुझा. फाशी जाईन फाशी हवा तर. हां. कृतघ्नाला मारल्याबद्दल फाशी जाईन. निमकहराम साली !

(दार लावून घेतो पुढचे.)

जा, बला गेली कायमची.

(बसतो एकीकडे जाऊन धुमसत. बाहेर हालचाल नाही.)

येऊ नको पुन्हा. चालती हो जा वाटेनं. कोण पोशील तुला, संभाळील तालेवार राणीसारखी, रहा जा त्याच्याशी घरोबा करून. आपण मेलो तुला. नतद्रष्ट साली. हलकट. कृतघ्न. मस्ती आली. वर मीच वाईट ! थारा दिला त्याचं बक्षीस ! म्हणजे मजाच आहे !

(फिरत राहतो घरात. दार वाजू लागते.)

जा, मेलीस तू मला. घेणार नाही घरात. चले जाव—

**दाऊद** (बाहेरून) सखाराम...अबे ए सखाराम—

**सखाराम** कोण ? दाऊद !

(दाराकडे जातो. उघडू जातो. थांबतो.)

दाऊद, बाहेर एकटाच आहेस ना तू ?

**दाऊद** (बाहेरून) या तो ? एकदम अकेलाही हूं यार—

**सखाराम** ती कृतघ्न रांड गेली ना निघून ?

**दाऊद** दरवाजा तो खोलो यार.

(सखाराम दार उघडतो. दाऊद येतो आत.)

क्या यार तमाशा मांडा है...

(मागून लक्ष्मी येऊन स्वयंपाकघराकडे जाऊ लागते.)

**सखाराम** (ओरडून) पुन्हा आलीस आत !

**दाऊद** जाने दो ना सखाराम...

**सखाराम** आता का आलीस ? कुणाला गरज आहे ?

(लक्ष्मी चुलीकडे जाऊन कामाला लागते.)

आपल्याला गरज नाही कुणाची. एकटे राहू. हिंमत मर्दा तर बायका वाटेल तेवढ्या आणू ! काय हिच्याच सोनं चिकटलंय आणि दुसऱ्यांच्या पितळ असतंय ? पाडून टाकीन दात एकूण एक.

**दाऊद** यार रोज खालीपिली कितनी गर्मागर्मी करता है तू. छोड दे ना. औरत मर्दका वैसाही चलता है—

**सखाराम** अरे कुणाचं हूं का चूं ऐकून नाही घेतलं आपण आणि ही दीड दमडीची टाकलेली बाई रुबाब दाखवते ? हॅड्. राडा करून टाकू. बस तू विस्तव घेऊन आलो.

(धूपपात्र घेऊन आत जातो. लक्ष्मी स्वयंपाकात.)

विस्तव पाहिजे.

**लक्ष्मी** घ्यावा हवा तर.

**सखाराम** मी म्हणतो विस्तव हवाय.

**लक्ष्मी** अडत नाही कुणाशिवाय तर हवं कशाला कोण ? घ्यावा हातानं—

**सखाराम** (दातओठ खाऊन) विस्तव...

**लक्ष्मी** रांड ना मी. कुत्री. दीड दमडीची. मारा मला. मारा ना. वाट कशाला पाहताय ? मारा मारायचंय तर. डागा हवं तर. नाही तर जाळा. कुणी नाही मला; म्हणून तर वर आलाय जीव माझा—

(सखाराम शिकस्तीने स्वतःला आवरतो. कसाबसा विस्तव स्वतःच घेऊन बाहेर येतो. न बोलता चिलीम तयार करू लागतो. लक्ष्मी वारंवार डोळे पुसत स्वयंपाक करते आहे.

काळोख.

मृदंग वाजू लागतो.)

## दृश्य दहावे

[मृदंग जोरजोराने वाजवला जाऊ लागतो. अंधुक प्रकाश स्वयंपाकघरात आणि बाहेरल्या खोलीत येतो.

आत लक्ष्मी चिरगुटावर पडलेली. बाहेर सखाराम मृदंग दात-ओठ खाऊन साऱ्या शक्तीनिशी वाजवीत भुतासारखा बसला आहे.]

**बाहेरून एक त्रस्त आवाज** ए. अरे बंद करा ए—रातच्या पाराला काय गोंगाट—

**दुसरा आवाज** ए—

(सखाराम बधिरपणे मृदंग बडवतोच आहे. मग अचानक थांबतो. उठतो. आतल्या दिशेने जातो. चिरगुटावर पडलेल्या लक्ष्मीशी येऊन थांबतो.)

**सखाराम** जागी आहेस का ?

(उत्तर नाही.)

काय म्हणतोय. जागी आहेस का झोपलीस ?

(उत्तर नाही.)

मायला उत्तर नाही ! ऊठ आधी. मी काय म्हणतो ऐक. (चिरगूट दूर करून तिला उठवून बसवतो.) ऐक. आपलं चुकलं, आपण टाळक्याचे भडकू. पण तू भडकवतेस वावगं बोलून वागून. खोटं आहे ? सांग की. वर्षात दारू कमी केली. पूजा करतो. इतकं केलं हे काय काहीच नाही ?

(ती बसलेली तोंडाला पदर लावून.)

सहा आल्या नि गेल्या, कुणाकडून हूं म्हणून घेतलं नव्हतं. ठेवल्या तशा राबल्या. जा म्हटलं, गेल्या. तू निराळी निघालीस. गोगलगाय अन् पोटात पाय. पोटात पाय नाही, नखं आहेत नखं तुझ्या. खोटं आहे हे ? तू काय खोटं म्हणशील ? झोपेचं सोंग करतेय ! बास झाली झोप. आत ऐक नीट. ऐकतेस की नाही ? हो म्हण. म्हण आधी हो. म्हण.

**लक्ष्मी** (झोपाळल्या स्वरात) हो.

**सखाराम** वर्षभर तू मला त्रास दिलास, मी पण तुला छळलं. मी आता कंटाळलो. तू पण विटलीस. हो ना ? हो म्हण आधी.

**लक्ष्मी** (तशीच) हो.

**सखाराम** तुला आता माझा त्रास निभत नाही. मला पण तुझा स्वभाव निभत नाही. डोक्यात किडे होतात, मगज फुटायला येतो.

**लक्ष्मी** (झोपाळलीच) हो—

**सखाराम** काय हो ? सालं वेड लागेल वाटतं एकेकदा.

**लक्ष्मी** हो...

**सखाराम** बंद कर 'हो'. तर आता हे बास्स झालं. तुझं माझं काय लग्न लागलेलं नाही, कसलं नातं नाही. एकमेकांना बांधून रहायचं आपल्याला काम नाही. तुला तुझी वाट मोकळी आहे. मला माझी. तू माझं काही देणं लागत नाहीस, मी तुझं लागत नाही. आपण आता मोकळ होऊ या. तुझा कोण पुतण्या आहे म्हणाली होतीस अमळनेरला, उद्या तू त्याच्याकडे जा. तिकीटबिकीट काढून देतो. शिवाय साडीचोळी रीतसर मिळेल. आणलंस ते सर्व घेऊन नीघ. अंगावरचे कपडे तुझेच. दहापाच खर्चाला देऊन ठेवीन. म्हणजे नंतर, काय केलं नाही म्हणून बोंब नको. सुखासमाधानानं जा. मी तुला दोष लावणार नाही. पण आपला संबंध इथं संपला. कळलं ? काय ?

**लक्ष्मी** (अस्पष्ट) हो...

(काळोख.)

## दृश्य अकरावे

[प्रकाश.

दाराशी बोचके बांधून ठेवलेले. जवळ ट्रंक. थकली, डोळे सुजलेली लक्ष्मी स्वयंपाकघरात निरवानिरव करते आहे. सखाराम दाराशी उभा.]

**सखाराम** झालं काय ? गाडीची टाइम झाली.

**लक्ष्मी** देवाला नमस्कार करून आले.

(देवापुढे निरांजन लावते. डोके टेकते. निघते. कसलीशी आठवण होऊन पुन्हा तेवढी निरवानिरव करते.)

**सखाराम** चला लौकर.

**लक्ष्मी** (बाहेर येते. सखाराम ट्रंक, बोचके उचलतो.) समोर सांगून येते. वाईट दिसेल.

(बाहेर जाते. सखाराम उभा—ट्रंक, बोचके ठेवून.

लक्ष्मी येते.)

**सखाराम** झालं सगळं ?

**लक्ष्मी** कुणी गावी गेल्यावर लगेच केर काढला तर ते वाईट असतं. दळिद्र येतं. मी केर काढून निघते.

**सखाराम** पण गाडी जाईल तिकडे—

(लक्ष्मी तशीच भरभर केर काढते.)

आता निघा लौकर—

**लक्ष्मी** चला. (एकदम) एक राहिलंच. (आत जाते.)

(सखाराम अगतिक. लक्ष्मी बाहेर येते.)

**सखाराम** काय राहिलं होतं ?

**लक्ष्मी** मुंगळ्यांना साखर टाकायची राहिली होती ना. बरं झालं आठवलं. (खिडकीशी जाते. बाहेर कावळ्यांची कावकाव.) येते रे काऊ. रोज यायचा. मी घालीन तेव्हाच खायचा. त्याला आता कोण खाऊ घालील ?

**सखाराम** घालीन मी, पण निघा एकदा—

**लक्ष्मी** पाय निघत नाही.

**सखाराम** ते दिसतंच आहे.

**लक्ष्मी** (घराकडे पाहत) वर्षभर राहिले. सगळं घर कसं सवयीचं झालं होतं. आता पुन्हा—(तोंडाला पदर लावते.) माया वाईट.

(सखाराम ती निघते कधी याच घाईत.)

**सखाराम** चला आता...

(लक्ष्मी त्याच्या पाया पडते. तो झटक्याने पाय दूर घेतो.)

हे काय. हे कशाला...

**लक्ष्मी** पुन्हा भेटणार नाही. देवाब्राह्मणांनी दिलं ते लाभलं नाही. त्याला मी नकोशी होते. इथं आले. हे माझं मानलं. तसं मानून सगळं दिलं. काही राखलं नाही. स्वतःला जपा. फार पिऊ नये. वेळेवर जेवावं. पूजा न चुकता करीत जा, त्यानं पुण्य लागतं. देवीचा अंगारा आत शिंक्यातल्या पुडीत आहे, तो प्रेसवर जाताना लावत जा...

**सखाराम** सगळं करतो पण आधी चला.

(मुसमुसणाऱ्या तिला पुढे घालून बाहेर येतो. दार लावतो. कुलूप लावतो. दोघे जातात. किंचित्काळ तसेच दृश्य.

काळोख.)

## दृश्य बारावे

[सावकाश प्रकाश.

दाऊद आणि सखाराम गांजा चढवलेले.]

**सखाराम** दाऊद, इतक्या झाल्या पण हिनं जाताना जरासा चटका लावला.

**दाऊद** (पुटपुटतो आहे फक्त) हां. होता है...

**सखाराम** पुढं चालू ठेवण्यात मतलब नव्हता. उगाच तिला मला मगजमारी रोज उठून. तिलाच फार त्रास. थकलेली आधीच्या नवऱ्याच्या त्रासानं, वयानं पण. आणि आपण हे असे. किती म्हटलं तरी शरीर; वासनेचं आगर. आवरू म्हटलं आवरत नाही ! म्हणालो तिला आता ज्यादा त्रास नको. राहील पुतण्याकडे उरलेली वर्षं देव देव करीत...

**दाऊद** (तारेत) अच्छा किया.

**सखाराम** तुलासुद्धा पटतं ना हे ?

**दाऊद** एकदम एक्सप्रेस बात. मैं वही सोचता था आजकल...

**सखाराम** काय ?

**दाऊद** तुम्हारा ये लफडा खतम होनेका टैम अब आया है ऐसा...

**सखाराम** लफडा नको म्हणू.

**दाऊद** नही तो नही.

(दोघे चिलमीचे दम मारतात. तारेत बसतात.)

(थोड्या वेळाने) सखाराम, अब अगलेका क्या सोचा है ?

**सखाराम** अगलेका ? म्हणजे काय म्हणतोस ?

**दाऊद** याने नया...

**सखाराम** नया ?

**दाऊद** याने...अब नया पंछी कब लानेवाला है ?

**सखाराम** (विचार करीत) आं ? असं असं. तशी दोन दिवसापास्नं एक वर्दी कानावर आली आहे: चिमखड्याचा डिसमिस पोलिस फौजदार...आठपंधरा दिवसांत बहुतेक बायको बाहेर पडेल त्याची, वाटतंय. तिला सावत्र आई आहे, दुसरं कोण नाही. कदाचित उद्यापरवासुद्धा काही तरी घडेल वाटतंय.

**दाऊद** अच्छी बात है...

**सखाराम** आता उद्यापास्नं त्या मागावर राहीन.

**दाऊद** बिलकुल. ले चिलीम ले—

(दोघे तसेच.

क्रमशः काळोख. पडदा.)

# अंक दुसरा

## दृश्य पहिले

[सखारामचा बाहेरून ओरडा : ए कार्ट्यांनो, काय आहे रे ? इतक्यांदा सांगितलं, ऐकू येत नाही काय ? चले जाव सगळे तिकडे. इथं काय सिनेमा आहे काय ? का तमाशा ? पाठी लाल करून टाकीन एकेकाच्या, जाव !....बाहेरून दार उघडते. सखाराम घरात येतो. हातात एक फार जुनी न वाटणारी पत्र्याची ट्रंक. मागोमाग थोडा अवकाश घेऊन एक लक्ष्मीच्या तुलनेने तरुण, स्थूलसर पण उफाड्याच्या शरीराची बाई आत येते. ही चंपा.]

**सखाराम** या. बघून घ्या. आता या घरात रहायचं तुम्हांला. काय ? (नजरानजर.) घर माझ्यासारखं आहे. हो, मग तक्रार नाही चालणार. बघून घ्या नीट, पटत असेल तर टाका बोचकं खाली. बोचकं नाही तर ट्रंक. पण हा राजाचा महाल नाही, हे सखाराम बाइंडरचं घर आहे. सखाराम बाइंडर तुमच्या आधीच्या मालकासारखा नाही. तो काय आहे ते समजून घ्यावं लागेल. सब घोडे बारा टक्के मामला इथं खपणार नाही. काय ?

(ती घर न्याहाळताना यावर त्याच्या नजरेत पाहते. तो अवाक्.)

(पुन्हा भान येऊन) आपलं सगळं वेगळं आहे. डोकं गरम. भडकलो तर मारतो. बेदम मारतो. तोंड शिवराळ. तोंडात शिवी नि विडी कायम. परिस्थिती बेताची; पण खायला दोन वेळा नक्की मिळेल. दोन पातळं सुरुवतीला, मग वर्षाला एक. (पाहताना अडखळून) वर्षाला एक. झालंच तर तेसुद्धा भारी नव्हे. घरात शिस्तशीर आणि बिनचूक करावं लागेल सगळं. गलथानपणा घडायला लागला, बाहेरची वाट. नंतर दोष येता कामा नये. कळलं ? आपल्या घरात आपण राजे असतो, बाहेर फाटक्या जोड्याची किंमत का असेना. घर कसं घरासारखं हवं. काय ? कळलं ?

(ती घर न्याहाळतानाच त्याच्या हटकण्याने त्याच्याकडे पाहून कशी तरी होकारार्थी मान हालवते. आणि उगीच हसते थोडी. तो बेभान.)

(पुन्हा सावरून गडबडीने) घर जोड्यासारखं हवं. नाही, घरासारखं हवं.

(त्याच्या ह्या म्हणतानाच्या धांदलीने ती जास्त हसते. तो हसतो. ती हसते. तो हसतो.)

(पुन्हा सावरून) विहीर तिकडे आहे, घरामागं...पायखाना लांब आहे...तिकडे.

(ती उगीच थोडी मुरडते.)

काय झालं ? उन्हाळ्यात विहीर आटते, पाणी नदीवरनं आणावं लागतं. नदी सव्वा मैलावर आहे. पावसाळ्यात विंचू निघतात. घराबाहेर कामाशिवाय गेलेलं खपत नाही. कुणी आलं...

(ती दाराकडे बघते.)

नाही, आलं नाही—पण आलं, वर मान करून बोलणं नाही. अनोळखी असला तर पदर तोंडावर धरून बात करायची. मी नसलो तर घरात नाही घ्यायचं कुणाला...

**चंपा** विंचवाला ?

**सखाराम** आं ? (सावरत करड्या स्वरात) नाही, त्यालासुद्धा नाही. चावतो ना...

**चंपा** भारी.

**सखाराम** मी असेन, भंगड असेन, गांजेकस पण असेन, रंडीबाजसुद्धा—

(ती पाहू लागते हनुवटीवर करंगळी ठेवून.)

नाही, आता नाही, पण दरिद्री असेन, कसा पण असेन. दारू पितो, पण आपली—म्हणजे कदर राहिली पाहिजे घरात—

(दारात दाऊद.)

**दाऊद** (नकळत) या हू !

(सखाराम आणि चंपा गोंधळून बघू लागतात.)

(ओशाळून) माफ करना यार, लेकिन...

**सखाराम** नाही, काही नाही.

**दाऊद** ऐसा कुछ कभी देखा नही था नं...

**सखाराम** ऐसा म्हणजे कैसा ?

**दाऊद** क्या यार खालीपिली शरमाते हो...लेकिन सखाराम...(डोळा मारून बोटाची चिमूट दाखवून कानात) बडा किस्मतवाला है तू...मिला था किसकू और तुम्हारे हातमे आयता आ गया...मैं चला. आऊंगा बादमे.

(चंपाकडे पुन्हा एकदा पाहून घाईने जातो. सखाराम-चंपा एकमेकांकडे बघून उगीचच हसतात. पुन्हा सखाराम घायाळ तिच्या शरीराने.)

**सखाराम** (अर्धवट ताठरपणे) आवडलं का घर ?

**चंपा** आवडायचं काय यात.

**सखाराम** आहे हे असं आहे.

**चंपा** जुनं वाटतं फार.

**सखाराम** (स्वतःवर ताबा मिळवून) पटत नसलं तर बाहेर व्हायचं इथून...

**चंपा** बाहेर आनखी घर आहे ?

**सखाराम** नाही. हे एवढंच घर. आणि हा राजाचा महाल नव्हे, हे सखाराम बाइंडरचं घर आहे.

**चंपा** कोन सखाराम बाइंडर ?

**सखाराम** (जरा गोंधळून) कोण म्हणजे ? मीच !

**चंपा** असं होय. मला वाटलं, आनखी कोन. खरंच.

**सखाराम** (पुन्हा तिच्या शरीराच्या मोहातून निकराने बाजूला होत) करार मान्य

नसेल—म्हणजे असेल—तर चुलीशी जाऊन चहाला लागायचं. चुलीशी दूधबीध आहे. आणि हो, शेवटचं ते राहिलंच. लग्नाच्या बायकोप्रमाणं रहावं लागेल इथं—

**चंपा** भूक लागली फार. काय खायला मिळंल ?

**सखाराम** आत स्वैंपाकघरात काही असेल—

**चंपा** (बसत) मग बघा की.

**सखाराम** (गोंधळतो. पण पुन्हा) या घरात बाईमाणसानं आदब राखून काम केलं पाहिजे. आपली कदर राहिली पाहिजे या घरात.

**चंपा** कालपास्नं पोटात काय नाही, घरनं निघताना रात्री एक पेरू हाताला लागला तो खाल्ला होता तेवढाच.

**सखाराम** (तिच्या शरीरावरून सक्तीने नजर काढीत) इथं राहिल्यावर यानंतर कुणाची भीती बाळगण्याचं कारण नाही. हा सखाराम बाइंडर काळ लागून राहिलाय...

**चंपा** भीती ? मला कुनाची भीती ? नवऱ्याची ? (थुंकते.) तो काय करनार आहे माझं ? घरात आनखी राहाते तर आनखी दाखवलं असतं मुडद्याला. पन मीच कंटाळले मुडद्याबरोबर राहन्याला. उठसूट दारू पिऊन जीव देण्याचाच धाक दाखवतोय ! काय देतोय जीव, जळ्ळं तोंड मेल्याचं. तेवढं काय खायला असलं तर बघा की.

**सखाराम** (जरा अडखळून मग आत जात) हो.

(स्वयंपाकघरात जाऊन शोधू लागतो. चंपा बाहेर मृदंगाशी चाळा करते.)

**चंपा** ढोलकी वाजवता जनू.

**सखाराम** ढोलकी नव्हे, मृदंग वाजवतो मृदंग.

**चंपा** दोन्ही सारखीच दिसतात. आमच्या सोंगाच्या तोंडावानी. फौजदार होता पण चोरसुद्धा त्याच्या तोंडावरं मुतला नसता. सरकारनं डिसमिस केला पिस्तूल चोरीला गेलं म्हणून. चोरीला गेलं ते पन दुसऱ्या दिवशी कळलं मुडद्याला. असा पितोय.

(आत थाळीत काही खाण्याचे काढून घेऊन येणाऱ्या सखारामला धक्का.)

**सखाराम** (बाहेर येत) या घरात बाईमाणसानं शिस्तीनं बोललं पाहिजे. वावगं बोलणं खपणार नाही.

**चंपा** हा. (खाऊ लागते.) आठवन झाली तर डोकीत किडा उठतोय नुसता. मला धंद्याला लावायला निघाला ! माय व्यायली पायजे त्याची, मला तसलं करायला लावायला. (खाणे संपवून बोटे चाटते.) तर काय. मी काय तसली बाई आहे काय ? आता 'च्या' करा चांगला.

**सखाराम** काय ? (सावरत) या घरात तो बाईनं करायचा.

**चंपा** मग बोलवा तिला.

**सखाराम** इथं नोकर नसतात; बाई म्हणजे या घरात आलेलं बाई माणूस.

**चंपा** म्हणजे कोन ? मी ? पण मला तर च्या करता येत नाही.

**सखाराम** करता येत नाही ?

**चंपा** हा. तिकडे माझी सासू होती—नवऱ्याकडे. आनीक माहेरी माझा बाप करायचा च्या न् जेवन. आनीक आई पानतमाखूचं दुकान चालवत होती. चांगला बिझनेस होता आमचा. तर ! दारू पण इकायचो. तिथंच मढं भेटलं की—नवरा माझा. रेड घालायला म्हनून आला न् भलताच रेड घालून गेला. मग लागला यायला सारखा. लगीन कर म्हनाला. मी केलं. मला काय माहीत हे असं बाराबोड्याचं असेल असं. नाही, वाईट नाही बोलनार मी; लक्षात आहे माझ्या. च्याचं बघा तेवढं.

(सखाराम वांध्यात. नजर तिच्या शरीराशी खेळत असते. तेवढ्यात दाऊद डोकावतो.)

**सखाराम** दाऊद, इकडे ये. (त्याला बाजूला नेऊन) चहा करतोस जरा ?

**दाऊद** हां सखाराम, क्यों नही. ऐसे माशुक के लिये तो—माफ करना...

(तो स्वयंपाकघराकडे पळतो. भांडे वगैरे शोधून चहा करू लागतो. लक्ष बाहेर.)

**सखाराम** (आठवण झाल्याप्रमाणे) तुमच्या आधीची इथं होती ती—सातवी—कालच गेली—

**चंपा** कशानं हो ?

**सखाराम** गेली म्हणजे मी पाठवलं. गरज असली की इथं ठेवतो. इथं मग सगळं बायकोप्रमाणं करावं लागतं. दोघांना किंवा एकाला बस्स झालं की पाठवून देतो कुठं जायचं असेल तिकडे. तिकीट मी काढून देतो. वर साडीचोळी. इथं मिळणारी चीजवस्तू पण शिवाय बरोबर नेता येते. (आठवण व्हावी तसा) पण इथल्या पद्धतीनंच इथं रहावं लागेल !

**चंपा** (हाक घालीत) दाऊद—

(दाऊद आतून धावत येतो.)

मेरेकू एक तमाखू पान लेके आना ना तेवढा—

**दाऊद** (पाघळून) आं ?—हा—हा, लेता है, आता है—

(बाहेर धावत सुटतो.)

**सखाराम** ए——

(दाऊद थांबतो अनिच्छेने.)

उल्लूसारखा धावतो कुठं. हे पैसे घे. दोन पानं आण. आणि ते चहाचं काय केलंस ?

**दाऊद** तय्यार हुआ होगा ना—आया—

(पळत जातो चंपाकडे वळून पाहून.)

**चंपा** चांगला आहे.

(सखारामला जरा मत्सर वाटतो. दाऊदशी बोलण्यासाठी तो दारापर्यंत गेलेला; आता तो सहजगत्या म्हणून दार ओढून घेतो. चंपा-सखाराम दोघे एकमेकांशी अकारण हसतात.

३२८२

सखाराम बेभान होऊ लागलेला.)

**सखाराम** (चंपाकडे येत) हो तर. चांगलाच आहे फार.

(आता दोघे जवळ जवळ. सखाराम तिच्या खांद्यावर हात ठेवतो. दार वाजू लागते. दाऊदच्या हाका—''सखारामभैय्या—दरवाजा खोलो !'' सखाराम भान येऊन, जाऊन घाईने दार उघडतो.)

**दाऊद** (आत येत) यार इतनेमे दरवाजा बंद भी किया ?

(चंपाला पान देतो. ती त्याच्याकडे पाहून हसते. दाऊद पळत स्वयंपाकघरात जाऊन चहा ओतू लागतो.)

**चंपा** (तो गेला तिकडे पाहत) चांगला आहे.

**सखाराम** हो. पण या घरात बाईमाणसानं परक्या माणसाशी फार बोललेलं आवडणार नाही, मी म्हणालो सुरुवातीला—ते महत्त्वाचं आहे.

**चंपा** हा. (बॅग उघडू लागते. साडीचोळी बाहेर काढते. एका बाजूला जाऊन कपडे बदलू लागते.)

**सखाराम** (हे पाहताना अस्वस्थ होऊन) तिकडे—दाऊद बाहेर आला की मग तिकडे स्वैंपाकघरात जाऊन ते करा.

**चंपा** पण इथंच रहायचं तर आता लाजायचं कुनाला. (साडी बदलू लागते निवांतपणे. अंगाचा कोणताही भाग दिसू न देता साडी बदलण्याची मराठमोळा पद्धत.)

(दाऊद दोन कप चहा घेऊन येतो. चंपाला पाहून तो जीभ चावून पाहिलेच नाही असे दाखवितो.)

**दाऊद** सखाराम, चाय लाया है...

(सखारामला भान येते. त्यालाही संकोच. दाऊद पुन्हा पुन्हा कपडे बदलणाऱ्या तिच्याकडे पाहत न पाहिल्यासारखे करतो आहे. ती निःसंकोच.)

**सखाराम** दाऊद, यानंतर मीच तुझ्या दुकानी येईन. तिथंच आपण भेटू. काय ? ते बरं पडेल.

**दाऊद** (यातील प्रत्येक वाक्याला, लक्ष कपडे बदलणाऱ्या तिच्यावर ठेवून) हां,वाकई ठीक. अच्छा. (न राहवून) ओहोहो...

**सखाराम** (जास्तच संकोचून) काय झालं ?

**दाऊद** गजब—

(मग तोच, भान ठेवून) सखाराम मै चलता हूँ !—

(थांबून) बादमे आऊंगा—

**सखाराम** नको, मीच येईन.

**दाऊद** हा. आव. (तिला उद्देशून) भा... (पुढचे 'बी' तोंडावाटे निघत नाही.) मै चला. चाय रखा है—

(घाईने निघून जातो.)

**चंपा** (तो गेला तिकडे पाहून) चांगला आहे.

**सखाराम** (एकदम अनावर त्रासून) समजलं ! किती वेळा तेच तेच ? चहा घे तो.

(ती आणि सखाराम चहा घेऊ लागतात.)

**चंपा** (चहा घेत) गोड आहे.

**सखाराम** (तापत) पुन्हा पुन्हा काय तेच—चांगला आहे, फार चांगला आहे, गोड आहे...

**चंपा** च्या गोड नाही होय ?

**सखाराम** (एकदम प्रकाश पडून) चहाबद्दल होय ! मला वाटलं...

**चंपा** (पान तोंडात भरते.) फसकलास आहे. (सखारामला) खा की.

**सखाराम** दिलेलं बरं वाटतं.

**चंपा** (सहजपणे) बरं. (घेऊन त्याच्या तोंडात भरते.) खा. झोप येते फार. चार दिवस चार रात्री झोपू दिलं नाही खापरतोंड्यानं. सारखं जीव देऊ काय, जीव देऊ काय. (जांभई देते.) झोपते आता घंटाभर.

**सखाराम** दिवसा ?

**चंपा** दिवसाच की. जेवन तयार झालं का तेवढं जेवायला उठवा बघा मला. इथं काय खाटबाट, बिछानाबिछाना ?

**सखाराम** काही नाही.

**चंपा** नाही ? म्हणजे कसलं घर आहे हे ?

**सखाराम** आणि जेवण स्वतःलाच करावं लागेल. बाईमाणसांची कामं बाईमाणसानंच केली पाहिजेत. नियम आहे इथला ! नियम म्हणजे नियम ! मान्य नसेल त्यानं बाहेर व्हायचं—

**चंपा** (मोठी जांभई देत) मला बा झोप आली भारीच.

(बाजूचे एक चिरगूट उचलून जमिनीवर अंथरू लागते.)

**सखाराम** इथं नव्हे, आत. कोण आलं तर काय म्हणेल ?

**चंपा** (आत चिरगुटासकट जात) झोपली म्हनेल. झोप काय कुनाच्या बाच्या मालकीची नसते.

(स्वयंपाकघरात जाऊन तिथे चिरगूट अंथरते. त्यावर आडवळते हात उशाशी घेऊन. पाहता पाहता झोपते. सखाराम स्वयंपाकघराच्या दाराशी येऊन हे पाहतो. फेऱ्या घालतो. झोपलेल्या तिला पुन्हा पुन्हा पाहतो. त्याच्या मनात आता वासना पुन्हा पुरती जागी झाली आहे.)

**सखाराम** (बाहेर कावळा ओरडू लागतो तेवढ्यात, त्याला मनोमन हाकलीत) अरे हाइक्.

(कावळा ओरडतच रहातो. सखाराम मनस्वी बेचैन. पुढचे दार लावून घेतो. ती झोपली आहे तिथे येतो. जाकीट काढून फेकतो. खाली बसतो.)

(गरम स्वरात) झोपतेस काय—ऊठ. ए—ऊठ तर—झोपतेस काय—

(बाहेर कावळा जास्तच कालवा करतो.)

(हा व्यत्यय वाटून बसल्या जागेवरून) ए, तुझ्या मायला तुझ्या—

(पुन्हा तिच्यावर नजर. अनावरपणे एकदम तिच्यावर हातच टाकतो. आणि ती मोठ्यांदा विचित्र ओरडून उठून बसते चिरगुटात. सखाराम जरा दूर सरकलेला.)

**चंपा** काय आहे ? काय आहे ? आं ? (पाहून) तू होय. मला वाटलं तो मुडदा; नवरा माझा. काय झालं ? जेवन तयार झालं ? का उठवलं मला ?

(सखाराम चडफडत उभा राहिलेला. उत्तर देत नाही.)

असं होय. आलं ध्येनात. बरं सुचलं की तुला ! बरं झालं जागी झाले. हे बघ, मी नवऱ्याचं घर सोडलं असलं तरी तसली बाई नाही. हां ! माझ्या पतिवर्तेच्या शिलासाठी घर सोडून निघाले. धंद्याला लावायला बघत होता मुडदा ! तू तरी जरा शहान्यावानी वाग. हुंग्या कुत्र्यावानी करू नको. झोप तर पार मोडली माझी, आता जेवायचं तरी लौकर काय तरी बघ म्हणजे झालं, जा.

(मोठी जांभई देते. सखाराम चडफडत घाईने जाकीट शोधून चढवून बाहेर पडतो. ती एकटीच झोपाळलेल्या चेहऱ्याने बसलेली. बाजूच्या चिरगुटावर एक छोटी डबी काढून, तिच्यातला तमाखू मळून ओठात भरते.

काळोख.)

## दृश्य दुसरे

[प्रकाश. दिवस. उन्हे.

सखाराम बाहेरल्या खोलीत बिछान्यात उपडा मुडद्यासारखा अस्ताव्यस्त लोळलेला. दार उघडे. घरात तिसरे कोणी नाही. एक खाकी पोषाखातला इसम दारात येतो. डोक्यावर फौजदाराची वाकडी टोपी. दाढीचे खुंट वाढलेले. चेहरा दारुड्याचा. पण या वेळी होषमध्ये आहे. काखोटीला फुगलेली कळकट शबनम पिशवी.

एकदा आत नजर टाकतो. मग धीट होऊन आत शिरतो. वहाणा काढतो. पिशवी सावकाश उतरवून ठेवतो. उपड्या झोपलेल्या सखारामाभोवती फिरून पाहतो. एक करपट ढेकर देतो. कोपऱ्यात जाऊन निवांत बसतो. असा किंचित्काळ बसून रहातो. मग उठून

स्वयंपाकखोलीकडे जाऊन नजर टाकतो. आत जाऊन तोंडबिंड धुतो. झाकलेली भांडी उघडून पाहतो, पुन्हा येऊन पिशवीतून बाटली काढून एक घोट गिळतो. बाटली पिशवीत ठेवून मुकाट्याने बसून राहतो. आता सखाराम चाळवतो. पुन्हा चाळवतो. जागा होतो आहे.]

**सखाराम** ए... (जरा वेळाने पुन्हा) ए, उन्ह कुठनं येतंय बघ... (कोण बघणार ?) आयला पुन्हा... (चिरगूट ओढून तोंडावर घेऊ पाहतो ते जमत नाही.)

(कोपऱ्यातला इसम हे सर्व उत्सुकतेने पाहतो आहे.)

(पुन्हा) अग ए—कान फुटले का

काय तुझे ? (मग संतापून, मिटल्या डोळ्यांनीच) घरात माणसं आहेत का भिंती ? इतका ओरडतोय, खिडकी लावत नाही म्हणजे...

(उठून बसतो. डोळे उघडवत नाहीत.)

कुठं गेली ? सकाळच्या प्रहरी गेली कुठं ?

(डोळे कसेबसे उघडतो. समोर तो स्थितप्रज्ञ मुद्रेचा उत्सुक खाकी इसम बसलेला.)

(त्याला किलकिले पाहत) कोण ? कोण आहे ते ?

(तो इसम फक्त ओशाळे स्मित केले न केले करतो.)

कोण तू ? आणि सरळ घरात ? ही गेली कुठं ? दार उघडं ? (गडबडीने जागचा उठतो धडपडत.) उन्हं पण भारी चढली. अग ए...पण आधी तू कोण ? सरळ घरात कसा शिरलास ? (उत्तर नाही.) काय काम ? काय घर आहे का धर्मशाळा ? (आता पुरता जागा झालेला.) उभा रहा आधी. तुला कोण हवं ? बोल लौकर...

(तो इसम नाइलाजाने उभा रहात 'कुणी नको' अशा अर्थी मान हालवतो, प्रेमळ स्मित करीत.)

मग काय म्हणून चोरासारखा घरात शिरलास ?

(तो इसम नकारार्थी मान हालवतो.)

पोलिसच्या ताब्यात देतो तुला ! (नीट पाहून) पण तूच पोलिस फौजदारासारखा दिसतोस. होय की. फौजदाराचं इथं काय काम ? हा सखाराम बाइंडर वाटला कोण तुला ? रस्त्यावरचा माणूस ? चले जाव ! बाहेर हो पहिला ! बाहेरून गोष्ट कर. चल ! बाहेर—

(तो इसम हालण्याला अनुत्सुक. पुन्हा खाली बैठक मारू पाहतो.)

बसू नको, उभा रहा.

(तो उभाच रहातो.)

(त्याला नीट पाहून—) तू...

**इसम** (नर्व्हस स्मित करून अर्धवट नमस्कार करीत) नवरा चंपूचा...फौजदार शिंदे म्हणतात मला. डिसमिस आहे.

**सखाराम** (डोके तडकत) तू तो ? आणि इथं कसा ? कुणी सोडला तुला घरात ? आणि चंपू कुठं आहे ? का तूच तिचं काय बरंवाईट...

(तो नकारार्थी दिलगीर मान हालवतो.)

मग ती कुठं गेली ? चंपू कुठं गेली ?

**इसम** (खांदे उडवून) देवाच्यान् माहीत नाही. नव्हतीच, मी आलो तेव्हा. तुम्ही इथं झोपला होता. म्हणून बसलो. बास, इतकंच. (पुन्हा अर्धवट नमस्कार करीत) ओळख झाली, बरं झालं.

**सखाराम** काय काम तुझं इथं ? तिला परत न्यायला आलास ? ती येणार नाही, जा—

**इसम** मी पण न्यायला आलो नाही. इथंच बरी आहे. सुखात असली की बरं. आणखी काय.

**सखाराम** मग कशाला आलास इथं ?

**इसम** म्हणलो कशी आहे पहावं. रहावेचना.

**सखाराम** भारीच जीव तिच्यावर.

**इसम** बायको आहे. घरातून गेली म्हणून काय झालं.

**सखाराम** गेली कुठं कळत नाही. चहा तरी करून ठेवला आहे का नाही—

**इसम** नाही.

**सखाराम** काय नाही ?

**इसम** चहा तयार नाही.

**सखाराम** तुला काय ठाऊक ?

**इसम** चहा नाही.

**सखाराम** (संतापून) तुला कसं ठाऊक ?

**इसम** (जरा भेदरून) तसंच. मला हवा होता. म्हणून पाहिलं—आत.

**सखाराम** लेका घर धुंडाळलंस तू ?

**इसम** भांडं शोधलं चहाचं. बास्...

**सखाराम** चालता हो इथून. बाहेर पड नाही तर गळा घोटतो तुझा !

**इसम** ओरडू नका. उगीच बभ्रा होतो.

**सखाराम** तुझा काय संबंध त्याच्याशी ?

**इसम** चंपीचा नवरा आहे. तिची अब्रू ती माझीच अब्रू.

**सखाराम** तुझा तिचा आता काय संबंध ?

**इसम** संबंध जल्माचे असतात. तिथं ठरतात, वर ! (वर नमस्कार करतो.)

**सखाराम** आता ती इथं माझ्याकडं रहाते.

**इसम** ठाऊक आहे. म्हणून तर आलो, शोधत.

**सखाराम** परत येणार नाही ती !

**इसम** नको येऊ दे. सुखी असली का झालं.

**सखाराम** ती तुला विचारणारसुद्धा नाही—

**इसम** नशीब असतं.

**सखाराम** मग तुला काय हवं ? का आलास इथं ?

**इसम** (दिलगीर स्मित करून) असाच. चंपीशिवाय चैन पडत नाही बघा.

**सखाराम** चूप बैस ! तिनं तुला सोडलं.

**इसम** पण चंपी फार छान आहे. हा एवढा एकेक पुठ्ठा. एवढी एवढी छाती... हे एवढे एवढे...

**सखाराम** थोबाडच फोडतो तुझं थांब ! चालता हो आधी इथून ! स्वतःच्या बायकोबद्दल बोलतोस हे ? डुक्कर कुठला ! (त्याची मानगूट धरून त्याला दारापर्यंत नेऊन सोडतो.) चालता हो इथनं.

**इसम** पिशवी राहिली. (तिंथून परत येऊन बसतो.) मी थांबतो. चंपी भेटेल. फार याद येते तिची—

**सखाराम** (या कोडगेपणावर निरुपाय) तिच्या मायला तोंड पण धुवायला देत नाही ! थांब मी तोंड धुतो आणि तुला सांगतो काय ते—

(स्वयंपाकघराकडे जातो. खिडकीवाटे बाहेर चूळ मारतो. तोंडावर पाणी मारतो. हे करताना चंपाच्या नावाने बडबडत आहे. मग पुन्हा चंपाच्या नवऱ्याच्या दिशेने येतो. तो जवळच्या बाटलीतला आणखी एक घोट घेऊन शांतपणे बसलेला. सखारामला पाहून तो नर्व्हस स्मित करतो. हे पोरक्या मुलासारखे वाटते.) चालता हो आत्ता इथनं.

(तो तसाच बसलेला. आता चांगला टेकून आणि पाय पसरून. सखारामला काय करावे कळत नाही.)

**दाऊद** (बाहेरून हाका) सखाराम—ओ सखाराम— (येऊन पोचतो.) पंछी कहां ?— (फौजदार शिंदेला पाहून गप्प होतो. हा कोण म्हणून सखारामला खुणेने विचारतो.)

**सखाराम** नवरा, चंपूचा.

**दाऊद** (पाहून) देखतेही मैने ऐसाच सोचा यार. तो ये पंछीका पिंजरा ! (त्याला) सलाम वालेकुम.

(चंपाचा नवरा नर्व्हस स्मित करतो.)

**दाऊद** पंछी आया तो पंछीका पिंजरा भी पीछेसे आनेवालाच है. वो अकेला पंछीबिगर कैसा जियेगा, सखाराम ?

**सखाराम** दिसतो गरीब पण महा पाजी आहे, दाऊद. स्वतःच्या बायकोचं वर्णन स्वतःच्या तोंडानं काय घाणेरडं करीत होता—

**दाऊद** अच्छा, क्या बोलता था ?

**सखाराम** जाऊ दे. हाकलला तर जात पण नाही हरामजादा. बसून राह्यलाय.

**दाऊद** जहां उसका पंछी वहां वो. (त्याला) क्यौं जनाब, सच या झूट ?

(चंपाचा नवरा पुन्हा ओशाळे स्मित करतो.)

**सखाराम** जसा काही बायकोवर फार जीव लेकाच्याचा ! (त्याला) चल ऊठ, पळ आधी नजरेसमोरनं ! गांडूळ सालं—

**दाऊद** सखाराम, इस वक्त पंछीके साथ उनका पिंजरा भी तुम्हे संभलना होगा क्या यार ? ऐसा दिखा पडता है. (हळूच) पंछी मारू है तो पिंजरेसे क्यौं परेशान होना दोस्त ? मारो गोली—

(चंपाचा नवरा हे चालू असताना मध्येच बाटलीतला नवा घोट रिचवतो आणि पुन्हा ओशाळे स्मित तोंडावर ठेवून राहतो.)

**सखाराम** (दात-ओठ खात) असं वाटतंय की उभा फाडून काढावा साल्याला...

**दाऊद** छोडो यार. समझनेकी बात है ये. लेकिन पंछी कहां है ?

**चंपा** (बाहेरून) हा बायजा बाय, उद्या पण हाक घाला जाताना बरं का.

(चंपा आत येते. खांद्यावर कपड्यांचे पिळे.)

(सखारामला) उठला का ? नदीवर जाताना हाका घातल्या तर जाग नाही. (नवऱ्याकडे लक्ष जाऊन) कोन ? हे सोंग इथं ? (अंग ताठरून जणू दगड होते. पदर खोचते.) कधी आलं हे ?

**सखाराम** मी उठण्याआत येऊन बसलं होतं.

**चंपा** पण घरात काय म्हणून घेतलं ? हाकलून द्यायचं नव्हे बाहेरल्या बाहेर !

**सखाराम** मला माहीत नाही कधी आला ते. मी जागा झालो तर होता. मग जाईना.

**चंपा** जाईना ? कसा जात नाही बघते मी. (पुढे होऊन नवऱ्याची कॉलर धरून झटक्याने त्याला उभा धरते.) काय रे ए मुडद्या...(एक तोंडात हाणून) काय ? काय आहे तुझं इथं ? बोल. (भराभर त्याला मारू लागते. हाताने, पायांनी.) कुनी धाडलं होतं आमंत्रन तुला ? आं ?

(सखाराम, दाऊद अवाक् होऊन पाहताहेत.

चंपा नवऱ्याला सोडते. दाराजवळची वहाण घेऊन तरातरा येते. पुन्हा नवऱ्याला उचलते. वहाणेने फडाफडा मारू लागते, जीव खाऊन. सखाराम, दाऊद शहारताहेत पाहून. अखेर नवऱ्याला पोत्यासारखा फरफटवीत दाराशी नेऊन फेकून) जा, पुन्हा तोंड दाखवशील तर जिता नाहीस रहात बघ ! माझ्या वाटंला परतून येऊ नकोस, सांगून ठेवते. माझा तुझा संबंध नाही !

**इसम** (धडपडत कसाबसा उठून) जातो. जीवच देऊन टाकतो आता. देतोच जीव—

**चंपा** अरे दे दे. सुटेन मी एकदा. लौकर दे !

(चंपाचा नवरा वळलेला. परत घरात येऊ लागतो; चंपा त्याला पुन्हा धरून फेकते. तो भुईसपाट. तो पुन्हा उठतो, ती पुन्हा त्याला लाथ घालते.)

**चंपा** मर, मर लौकर !

**दाऊद** लेकिन चंपाबाय, वो सच्ची मर जायगा तो...

**चंपा** नाही ना मरत कधीचा. मरेल तर सुटेल, तो आनी मी पन.

(पुढे होऊन त्याच्या तोंडात एक हाणते. त्याच्या ओठावाटे रक्ताची धार वाहू लागते.)

**इसम** (कसाबसा उठून पुन्हा आतच येऊ लागतो.) पिशवी...माझी पिशवी...

(चंपा पुढे होऊ पाहते. तिला दाऊद धरून रोखतो. चंपाचा नवरा भिंतीशी असलेल्या पिशवीकडे धडपडत जातो. तिथेच बसकण मारतो. लोळतो.)

**इसम** जीव देतो...मी जीव देतो... (पिशवीतून कशीबशी बाटली काढून तोंडाला लावतो.)

**चंपा** (पुढे होऊन आणखी एकदोन लाथा घालून) घे...आनखी घे. आनखी घे मुडद्या— (सखाराम तिला मागे ओढतो.)

**सखाराम** (तिला) बाई आहेस का कोण...काय मारलंस त्याला...नवरा आहे...तुला काही काळीज ?

**चंपा** नाही ! मला काळीज नाही. चावून खाल्लं त्यानं कच्चं, कधीच. (स्वतःला सोडवून घेऊन) पदर आला नव्हता तेव्हा माझ्या आईकडनं मला विकत घेऊन लगीन लावलंन यानं माझ्याशी. मला काय पन समजत नव्हतं तेव्हा. माझे हालहाल करायचा रात्र रात्र. मला डागायचा मुडदा, सुया लावायचा, मला घान घान गोष्टी करायला लावायचा. पळाले तर धरून आनून बांधून तिखट भरलं होतंन भलत्या जागी भडव्यानं. काळीज राहिलं कुठं मला ? हा—हा—यानं लचके लचके तोडले त्याचे ! माझं रक्त प्यायला हा. ऊठ रे ए डुकरा, तुझ्या तिखट भरते बघ आता.

(पुढें होऊ पाहते. सखाराम तिला धरतो. ती सोडवून घेऊ बघते. सखारामला बळ जाणवते इतकी ती अनावर.)

**सखाराम** दाऊद, त्याला बाहेर घेऊन जा यार. जल्दी—जल्दी कर—

(दाऊद पुढे होऊन चंपाच्या नवऱ्याला धरून, खेचून कसाबसा बाहेर नेतो. चंपा पाहते आहे. थुंकत नवऱ्याच्या दिशेने 'थूः' करून.)

**चंपा** पुन्हा पाय ठेवच तू इथं, तुला तिखटात लोळवते बघ—हा—(तो नजरेपुढून गेल्यावर जरा वेळाने) घुंगुरटं-गांडूळ. (सखारामला) सोडा हात माझा. काम पडलं आहे आत.

(सखाराम हात सोडतो. चंपा आत जाते सरळ.

सखाराम एकटक पहातो आहे तिला; थोड्याशा भयानेच. ती आत कामाला लागते. दाऊद येतो.)

**दाऊद** (खालच्या पट्टीत) छोड दिया. लेकिन सखाराम, ओहोहो...क्या मारा पंछीने. याद आतेही जान चमक उठता है यार. देख, तू संभलके रहेना. समझा नं ? ये पंछी पहले जैसा नही, ये डिफ्रंट है. हाय हाय...गजब है एकदम...

(सखाराम बधीर उभा.

काळोख.)

## दृश्य तिसरे

[रात्र. स्वयंपाकघरात मंद उजेड येतो. चंपा झोपलेली चिरगुटावर. एक सावली बाहेरल्या खोलीतून स्वयंपाकघरात येते. हा सखाराम. झोपलेल्या चंपाकडे बघत उभा.

पुन्हा बाहेरल्या खोलीत जातो. फेऱ्या घालतो. पुन्हा आत येतो. बेचैन. झोपलेल्या चंपाशी वाकतो. सरळ होतो. तटस्थ. पुन्हा न राहवून तिच्या जवळ बसतो. मनाचा निश्चय होत नाही. ती कूस बदलून झोपते. त्याचा श्वासोच्छ्वास जोरात. तो तिला अनावरपणे हात लावतो. त्यासरशी ती उठून बसते चिरगुटात.]

**चंपा** (डोळे फाडून बघत) काय ? कोन आहे ? तू ! पुन्हा सुचलं होय तुला तेच ? काय म्हनले होते मी ? कळत नाही का ? मी वाईट बाई आहे बिघडले तर...(अस्ताव्यस्त पदर सारखा घेत) मला बिघडवू नको सांगते. मला तसलं काय आवडत नाही, ते बाईपुरुषातलं.

(सखाराम दूर होऊन उभा.)

जा, बाहेर झोप तिकडे.

**सखाराम** करार आहे. इथं ठेवलेल्या बाईला बायकोसारखं सगळं करावं लागतं. त्या बोलीवर ठेवतो इथं. सहा झाल्या. कोण 'नाही' म्हणाली नाही.

**चंपा** त्या असतील तसल्या. मी नाही. मला झोपू दे.

**सखाराम** घरात असून मिळत नाही म्हणजे काय ? मिळालं पाहिजे.

**चंपा** मला नाही जमायचं. बाहेर जा नाही तर मीच झोपत नाही.

(सखाराम किंचित्काळ तिथेच उभा.)

**सखाराम** मर.

(बाहेरच्या खोलीत येतो.

स्वयंपाकघरात चंपा चिरगुटावर बसून.

सखाराम कोनाड्यातून दारूची बाटली काढतो. तोंडाला लावतो.)

मर—मर तू...(आणखी पितो. मग ओरडून घोगऱ्या सुरात) मर एकदाची.

(दार उघडून बाहेर अंधारात निघून जातो.

स्वयंपाकघरात चंपा तटस्थ बसून. मग काही तरी ठरवून उठते. बाहेरल्या खोलीत येते. बाहेर

जाते. सखारामला मनगट धरून आणते आत.)

**चंपा** गप रहा. मी देते तुला सगळं. दारू दे मला.

(सखाराम पहात स्तब्ध उभा.)

मुडद्या मला दारू दे कुठं आहे ती, सांगते तर. कुठं आहे बाटली ?

(तो मग कोनाड्यातली बाटली काढतो.

बाटली हिसकावून घेत.) बस तिथे.

(त्याला बळेच बसवते. बाटली उघडून पिऊ लागते गटागटा. तो निश्चलपणे पहातो आहे.

हे सर्व मंद उजेडात.

काळोख.

लगेच पुन्हा मंद उजेड.)

**चंपा** (तर्र स्वरात) थोड्या टायमानं घे मला मुडद्या...कर तुला हवं ते,कर...

(सखाराम अवाक् बघत बसलेला.

काळोख.)

## दृश्य चौथे

[प्रकाश येतो. भली सकाळ.

दार खडखडते आहे. स्वयंपाकघरात बिछान्यातून चंपाशेजारचा सखाराम धडपडत उठतो. सुस्ती झटकून तसाच बाहेरल्या खोलीत येतो. दार उघडतो.]

**दारातले कुणीतरी** चलतो ना सख्या, उशीर होईल प्रेसवर पोचायला. किती दार वाजवायचं लेका ? इतकी झोप लागली होय ?

**सखाराम** (अजून झोप उडालेली नाही.) आलो दम.

(दार लोटून स्वयंपाकघरात येतो.

गाढ झोपलेल्या चंपाकडे बघतो.

वाकून तिला एक हळुवार स्पर्श करतो, अस्ताव्यस्त पांघरूण सारखे करण्याच्यां निमित्ताने. मोरीशी जाऊन पाणी तोंडावर मारतो. चुळा भरतो. बाहेरल्या खोलीत येताना पुन्हा तिच्याकडे पाहतो. गुणगुणत बाहेर येतो. शर्ट, जाकीट, टोपी चढवतो, आणि वहाणा चढवून घराबाहेर निघून जातो. जाताना दार नीट लोटून घेतो. किंचित्काळ स्वयंपाकघरातली अगदी निपचित झोपलेली चंपा.

काळोख.)

## दृश्य पाचवे

[प्रकाश येतो. दुपार.

चंपा स्वयंपाकघरात चुलीशी जेवते आहे.

सखाराम बाहेरून येतो.

वहाणा काढून खुंटीला जाकीट, टोपी वगैरे लावतो.]

**सखाराम** मी आलोय...

**चंपा** (आतून) येवढ्या लौकर ? प्रेसला सुटीबिटी पडली का काय ?

**सखाराम** (आत जात) नाही. मीच आलो. का सांग ?

**चंपा** मला काय माहिती.

**सखाराम** चैन पडेना.

**चंपा** असं बरं नाही.

**सखाराम** पण खरं आहे. (तिच्या जवळ जात) ए—

**चंपा** लांब हो. मला जेवू दे. अद्याप अंग धुनंसुद्धा झालं नाही माझं. सकाळी उशिरा जाग आली.

**सखाराम** रात्री मजा आली...

(चंपा गप्प. जेवते आहे.)

**चंपा** मला काय पन आठवत नाही.

**सखाराम** च्यल् च्यल्...

**चंपा** खोटं नाही.

**सखाराम** खूप मजा आली...दिवसभर तेच आठवत होतं. म्हटलं जावं घरी...

**चंपा** बस तिकडे बाहेर. मला जेवू दे.

**सखाराम** नाही.

**चंपा** मग ?

**सखाराम** आधी ते.

(मागे धरलेली दारूची बाटली काढून दाखवतो.)

**चंपा** (ती पाहून) मला जेवू दे.

**सखाराम** ऊं हूं. (तिचा हात धरतो तो ती अनपेक्षित जोराने झटकते.) ही गुर्मी !

**चंपा** मला जेवनावर असा त्रास देऊ नको, सांगते.

**सखाराम** या घरात माझाच शब्द चालतो. मी म्हणेन ते झालं पाहिजे !

(चंपा जेवत राहते.)

हुकमाची तामिली लागते आपल्याला. नाहीतर वाईट माणूस आहे मी. बेदम चोपून काढतो. मागंपुढं बघत नाही मग.

**चंपा** मला सांगतोस होय ?

**सखाराम** तू कोण वेगळी. मला हवंय.

**चंपा** जा तिकडे बाहेर. काम आहे मला.

**सखाराम** (हात धरून) चंपा !

**चंपा** (हात न झटकता अनपेक्षित समजुतीच्या स्वरात) ऐक माझं, मला तरास देऊ नकोस.

(सखाराम हात सोडून बाहेरल्या खोलीत जातो. चडफडत फिरतो.)

**सखाराम** (ओरडून) बाहेर व्हावं लागेल घरातनं, मग कळेल. कुत्रीसारखं जगावं लागेल मग. भेटेल त्याच्यासमोर दुकान मांडावं लागेल, दुकान.

(चंपा जेवते आहे, पण आता तीही बेचैन झाली आहे. असा थोडा वेळ जातो. जेवण थांबवून चंपा नुसतीच बसलेली. मग जणू कसल्या तरी भयंकर उद्रेकाने समोरचं ताट आवेशाने जोराने लांब उडवून देते. मोठा आवाज करीत ते ताट लांब जाऊन पडते.

बाहेर सखाराम या आवाजाने थबकलेला.

आवाज थांबतो.

चंपा उठते. मोरीशी हातांवर पाणी घेते. हात पातळाला पुसते. पडलेले ताट उचलून खरकटे भरून मोरीशी ठेवते. त्याला नमस्कार करते. चंपा सखारामसमोर बाहेर येते.)

**चंपा** (सखारामकडे जाऊन) चल. दे दारू इकडे.

(सखाराम क्षणभर तिचे उग्र स्वरूप पाहत राहतो.)

काय म्हनते, दारू दे मला.

(सखाराम मुकाट्याने देतो. ती बाटलीचे बूच दातओठ खाऊन उघडून दारू पिते.) घे, तू पन पी. पी. (बळेच त्याच्या तोंडाला लावते. स्वतः पिते.) तुला मजा देते थांब. मजा देते तुला. (पीत राहते. त्याच्या तोंडाला बाटली लावते. हसत राहते खदखदा.) मजा देते कोन येल त्याला. मजा देते. कुत्र्याला न् मुडद्याला पन.

(बाहेरच्या दारावाटे दाऊद आत येतो आणि भारल्यासारखा जागच्या जागी हे पाहत उभा राहतो.)

कोन ? दाऊद ? ये. तुला हवी मजा ? घे. घे मुडद्या. ये.अरे ये ना मुडद्या, घे मला मुडद्या—

(दाऊद स्तंभित उभा. सखाराम बधीर उभा.

चंपाचा हात सखारामच्या गळ्याभोवती. तर्र हसते आहे. अस्ताव्यस्त. काळोख.)

## दृश्य सहावे

[प्रकाश येतो. बाहेर काळोख पडला आहे. घराबाहेरून खिडकीवाटे दिव्याचा उजेड आत घरंगळला आहे थोडासा. बाकी घरात गडद काळोख.

थोडा वेळ चंपाचे अस्पष्ट कण्हणे, पुटपुट अर्धवट शुद्धीतली.]

**चंपा** कोन आहे ते ? या. मजा घ्या मजा. ए मुडद्या, दूर हो. (दारूतले हसणे. मग कण्हणे.) दारू हवी मला...दारू हवी...दारू हवी... (हसणे, कण्हणे.)

(काळोख.)

## दृश्य सातवे

[प्रकाश येतो. दिवस.

चंपा घरात नाही. दाऊद आणि सखाराम. सखारामच्या मुद्रेवर चालू नव्या आयुष्याची चिन्हे. तो वेगळा वाटतो आहे.]

**दाऊद** लेकिन सखाराम, कामपे नही जानेसे तू कैसा निभाएगा यार ? काम तो करनाही पडता है—घरसंसार है न. गये हप्तेसे कामपे गयाही नही तू.

**सखाराम** जाऊ. मर्जी लागली का जाऊ पुन्हा.

**दाऊद** और नोकरीसे निकालेंगे तो...

**सखाराम** अरे त्यांचे बाप काढतील नोकरीवरून. आपण एकदम तब्बेतीत आहोत दाऊद, बस्स. एक नोकरी गेली तर दुसरी मिळेल. बोजे उचलू हवे तर नाहीतर दगड फोडू. काम तर करायचंच आहे, दाऊद. हा सखाराम बाइंडर कामाला कधी डरला नाही. आपले आपण कष्ट करून वाढलो. हां. बापाला बाप म्हटलं नाही, आईनं तर म्हारड्याचं पोर मानलं. निवडुंगासारखा वाढलो, माळावर. तर काय आता डरतो होय मी ? यानंतर चंपा, बस्स.

**दाऊद** लेकिन लोग क्या बोलते हैं...

**सखाराम** (उसळून) लोक ! लोकांच्या बापाचं काय लागतो हा सखाराम बाइंडर ? भुकेला होतो तेव्हा या लोकांनी येऊन मला भरवलं ? का मिरजेच्या मिशन इस्पितळात तापानं मरत होतो तेव्हा गावातलं कुणी आलं चौकशीला—हा मेला का जिता आहे म्हणून ? नाही दाऊद, लोकांचं आपल्याला सांगू नकोस. लोक स्वतः झक मारतील आणि दुसऱ्यांचं नाक तोकडं त्याची बकवास करत बसतील. गावात आपल्यापेक्षा स्वच्छ कोण नाही. सगळे साले एकजात मळलेले पार. त्यांचं सांगू नको. आपल्यापेक्षा श्रेष्ठ काय त्या एक रांडा. त्या काय बोलतात सांग. त्या मला दारुड्या म्हणतात ? बाईच्या नादानं वाया गेला म्हणतात ? चंपामुळं बिघडलो म्हणतात ? नाही. कारण त्या समजतात. रांडा नि माणसं यांत फार फरक नसतो. फरक फक्त एकच, माणसं खोटी असतात आणि रांडा खऱ्या असतात. बास !

**दाऊद** लेकिन सखाराम, अपनेको अपने तरफ देखना चाहिये ना ? तुम्हारा ये घर कैसा था और कैसा है. सखाराम, याद है तुझे...उसको उतने बहोत दिन भी नही हुए...जब यहां वो पंछी था...लक्ष्मीभाबी. कैसा था तब !

**सखाराम** अरे लक्ष्मी गेली, संपली. लक्ष्मी आपल्याला मेली. आता तिचा काय संबंध ? तो जमाना संपला केव्हाच. आपण नाही त्या आठवणी काढत. आता चंपा, बस्स ! चंपाच्या नखाची सर कुणाला नाही. अरे तुला काय ठाऊक आहे, काय गंमत आहे चंपा म्हणजे ती...

**दाऊद** देखो, जो दिखा पडता है और सुनाई देता है वो मुझे अच्छा नही लगता, इतना मै कह सकता हूं...तू मान या न मान. अच्छा, तो मै चला, धंदेकी टैम है—

**सखाराम** जा, जा...माझी फिकीर नको करूस—

(दाऊद जातो. एकटा सखाराम. किंचित्काल तसाच. मग उठून कोनाड्याकडे जातो. काळोख.)

## दृश्य आठवे

[प्रकाश येतो. दिवस.

बाहेर लांबवर ताशावाजंत्री जोरजोराने वाजते आहे. स्वयंपाकघरात चंपा दारूच्या नशेत तोल सावरण्याचा प्रयत्न करीत काम करते आहे. बाहेर सखाराम येतो.]

**सखाराम** (वहाणा काढून आत खुंटीकडे येत) चंपा.....चंपा.....

(चंपा कशीबशी भेलकांडत समोर येते.)

(तिला पाहत) तू प्यायलीस ? सकाळलाच ? आज दसरा—सणाचा दिवस—आणि—

(चंपा नशेत हसते.)

सणाच्या दिवशी आणि सकाळलाच हे काय आहे काय ? हे बरं नव्हे, चंपा. एवढ्या सकाळला सणाची का प्यायलीस तू ? तुला काय म्हणालो होतो मी प्रेसवर पूजेला जाताना ? अजून आंघोळसुद्धा नाही तुझी आणि प्यायलीस ! सणाच्या दिवशी घरचं बाईमाणूस कसं हवं ? कोण आलं तर काय म्हणेल ? जा, आत जा आधी. चालती हो आत...

(चंपाला कशीबशी ढकलून स्वयंपाकघरात घालवतो.)

नालायक. सण नाही, वार नाही. बाईमाणसाला हे शोभतं ? दुसरीतिसरी असती तर थोबाड फोडलं असतं.

(हे म्हणत बाहेरचे दार लावून घेतो. जाकीट-खमीस काढून खुंटीला लावतो. मृदंग काढतो. त्यावरची भरपूर धूळ झटकतो, तो एका कोपऱ्यात नेऊन ठेवतो. देवाची तसबीर शोधून आणून तिच्यावरचा कचरा झटकीत ती तिथे मांडतो. मग ताम्हन शोधून ते घेऊन बाहेर जाऊन थोडी फुले आणतो ताम्हनातून. स्वयंपाकघरात मोरीत जाऊन हातपाय धुतो. तिथे चंपा काम करताना

झिंगून हेलपाटते आहे. तिचा एकदा फार तोल जातो. सखाराम तिला सावरतो. ती त्याच्या गळ्यात पडते. सखाराम तिला बाजूला करण्याचा प्रयत्न करतो. ती त्याच्यापासून दूर होत नाही. झिंगले हसत राहते.) अग दूर हो तिकडे तशी. हो दूर म्हणतो ना, मला पूजा करायची आहे. दूर होतेस का नाही ? दूर !

(चंपा झिंगले हसतेच आहे.) सालीला शरम नाही. चालती हो आधी घरातनं—चलं...

(हे म्हणताना तो चंपाच्या धुंद शरीराने एकीकडे जास्त जास्त नादावत चाललेला.) दूर होतेस का घालू कमरेत लाथ ?

(चंपा नशेत जास्त जास्तच हसते आहे.) दूर—दूर हो आधी ! कुत्री साली.

(तो चंपाला ढकलतो. ती जाऊन आपटते आणि लोळते.)

**चंपा** (कळवळत) आऽऽऽ...

(सखाराम जाऊन तिला लागले का पहाण्यासाठी तिच्यापाशी वाकतो.)

**सखाराम** बघू कुठे लागलं ? लागलं कुठे तुझ्या ? बोलत नाही. बोल, कुठे लागलं? नाही तर मर.

(सखाराम चंपापाशी तसाच बसलेला.

काळोख.)

## दृश्य नववे

[प्रकाश येतो.

स्वयंपाकघरात मंद उजेड. चंपा आणि सखाराम स्वयंपाकघरात बिछान्यात. बाहेर दार वाजत रहाते.]

**कोणीतरी** कोण आहे का घरात ? सखाराम...ए सखाराम...

(थोड्या वेळाने हे बंद. पुन्हा किंचित्कालाने कोणतरी दार वाजवू लागते.)

**आणखी कोणी** सखारामपंत...अहोऽऽ सखारामपंत...घरात दिसत नाहीत—

**तिसरा कोणी** आत कुणीतरी आहे तर खरं...

**आणखी कोणी** बाई असेल—

**तिसरा कोणी** दोघं असतील—

**कोणीतरी** (हाका) ए सखाराम—आहेस का ?

(पुन्हा दार वाजत राहते.

स्वयंपाकघरात पडल्या पडल्या थोडी चाळवाचाळव. पण कोणी उठत नाही. ओ देत नाही. थोड्या थोड्या अवकाशाने दारावर अशा थापा, हाका, परस्परांतील बोलणे. मग सारेच थंड.

**दाऊद** लेकिन सखाराम, अपनेको अपने तरफ देखना चाहिये ना ? तुम्हारा ये घर कैसा था और कैसा है. सखाराम, याद है तुझे...उसको उतने बहोत दिन भी नही हुए...जब यहां वो पंछी था...लक्ष्मीभाबी. कैसा था तब !

**सखाराम** अरे लक्ष्मी गेली, संपली. लक्ष्मी आपल्याला मेली. आता तिचा काय संबंध ? तो जमाना संपला केव्हाच. आपण नाही त्या आठवणी काढत. आता चंपा, बस्स ! चंपाच्या नखाची सर कुणाला नाही. अरे तुला काय ठाऊक आहे, काय गंमत आहे चंपा म्हणजे ती...

**दाऊद** देखो, जो दिखा पडता है और सुनाई देता है वो मुझे अच्छा नही लगता, इतना मै कह सकता हूं...तू मान या न मान. अच्छा, तो मै चला, धंदेकी टैम है—

**सखाराम** जा, जा...माझी फिकीर नको करूस—

(दाऊद जातो. एकटा सखाराम. किंचित्काल तसाच. मग उठून कोनाड्याकडे जातो. काळोख.)

## दृश्य आठवे

[प्रकाश येतो. दिवस.

बाहेर लांबवर ताशावाजंत्री जोरजोराने वाजते आहे. स्वयंपाकघरात चंपा दारूच्या नशेत तोल सावरण्याचा प्रयत्न करीत काम करते आहे. बाहेर सखाराम येतो.]

**सखाराम** (वहाणा काढून आत खुंटीकडे येत) चंपा.....चंपा.....

(चंपा कशीबशी भेलकांडत समोर येते.)

(तिला पाहत) तू प्यायलीस ? सकाळलाच ? आज दसरा—सणाचा दिवस—आणि—

(चंपा नशेत हसते.)

सणाच्या दिवशी आणि सकाळलाच हे काय आहे काय ? हे बरं नव्हे, चंपा. एवढ्या सकाळला सणाची का प्यायलीस तू ? तुला काय म्हणालो होतो मी प्रेसवर पूजेला जाताना ? अजून आंघोळसुद्धा नाही तुझी आणि प्यायलीस ! सणाच्या दिवशी घरचं बाईमाणूस कसं हवं ? कोण आलं तर काय म्हणेल ? जा, आत जा आधी. चालती हो आत...

(चंपाला कशीबशी ढकलून स्वयंपाकघरात घालवतो.)

नालायक. सण नाही, वार नाही. बाईमाणसाला हे शोभतं ? दुसरीतिसरी असती तर थोबाड फोडलं असतं.

(हे म्हणत बाहेरचे दार लावून घेतो. जाकीट-खमीस काढून खुंटीला लावतो. मृदंग काढतो. त्यावरची भरपूर धूळ झटकतो, तो एका कोपऱ्यात नेऊन ठेवतो. देवाची तसबीर शोधून आणून तिच्यावरचा कचरा झटकीत ती तिथे मांडतो. मग ताम्हन शोधून ते घेऊन बाहेर जाऊन थोडी फुले आणतो ताम्हनातून. स्वयंपाकघरात मोरीत जाऊन हातपाय धुतो. तिथे चंपा काम करताना

झिंगून हेलपाटते आहे. तिचा एकदा फार तोल जातो. सखाराम तिला सावरतो. ती त्याच्या गळ्यात पडते. सखाराम तिला बाजूला करण्याचा प्रयत्न करतो. ती त्याच्यापासून दूर होत नाही. झिंगले हसत राहते.) अग दूर हो तिकडे तशी. हो दूर म्हणतो ना, मला पूजा करायची आहे. दूर होतेस का नाही ? दूर !

(चंपा झिंगले हसतेच आहे.) सालीला शरम नाही. चालती हो आधी घरातनं—चलं...

(हे म्हणताना तो चंपाच्या धुंद शरीराने एकीकडे जास्त जास्त नादावत चाललेला.) दूर होतेस का घालू कमरेत लाथ ?

(चंपा नशेत जास्त जास्तच हसते आहे.) दूर—दूर हो आधी ! कुत्री साली.

(तो चंपाला ढकलतो. ती जाऊन आपटते आणि लोळते.)

**चंपा** (कळवळत) आऽऽऽ...

(सखाराम जाऊन तिला लागले का पहाण्यासाठी तिच्यापाशी वाकतो.)

**सखाराम** बघू कुठे लागलं ? लागलं कुठे तुझ्या ? बोलत नाही. बोल, कुठे लागलं? नाही तर मर.

(सखाराम चंपापाशी तसाच बसलेला.
काळोख.)

## दृश्य नववे

[प्रकाश येतो.
स्वयंपाकघरात मंद उजेड. चंपा आणि सखाराम स्वयंपाकघरात बिछान्यात. बाहेर दार वाजत रहाते.]

**कोणीतरी** कोण आहे का घरात ? सखाराम...ए सखाराम...

(थोड्या वेळाने हे बंद. पुन्हा किंचित्कालाने कोणतरी दार वाजवू लागते.)

**आणखी कोणी** सखारामपंत...अहोऽऽ सखारामपंत...घरात दिसत नाहीत—

**तिसरा कोणी** आत कुणीतरी आहे तर खरं...

**आणखी कोणी** बाई असेल—

**तिसरा कोणी** दोघं असतील—

**कोणीतरी** (हाका) ए सखाराम—आहेस का ?

(पुन्हा दार वाजत राहते.
स्वयंपाकघरात पडल्या पडल्या थोडी चाळवाचाळव. पण कोणी उठत नाही. ओ देत नाही. थोड्या थोड्या अवकाशाने दारावर अशा थापा, हाका, परस्परांतील बोलणे. मग सारेच थंड.

स्वयंपाकघरात सर्व थंड. मधूनच दारूच्या नशेतील सखारामची पुटपुट. बाहेर लांब ताशा-वाजंत्री वाजत असते. घरावर कावळा ओरडत असतो. पुन्हा दारावर थापा, हाका. थापा. आलेले कोणी जाते. पुन्हा सर्व स्तब्ध. काळोख.)

## दृश्य दहावे

[प्रकाश येतो. रात्र.

स्वयंपाकघरात चिमणीचा मंद उजेड. बाहेर लांब कुत्री रडताहेत. रातकिड्यांचे आवाज. दारावर थापा पुनःपुन्हा वाजत राहतात.]

**सखाराम** (नशेच्या स्वरात) ए...ऊठ...

(पुन्हा थापा.)

कोण दार वाजवतंय वाटतं. ऊठ ए...ऊठ म्हणतोय तर. आधी ऊठ. कशी पसरलीय. ते बघ दार वाजतंय...

(पुन्हा थापा. आणखी.)

कोण एवढ्या रात्री...साली उठत नाही. टेर पडलीय.

(कसाबसा उठून बसतो. डोके गच्च धरून राहतो.) आ...डोकं ठणकतंय नुसतं.

(पुन्हा थापा.)

(घोगऱ्या स्वरात्त) अरे हो, ऐकलं—एवढ्या रात्रीचं कोण...

(मग सखाराम उठतो डळमळत जागचा. धडपडत बाहेरल्या खोलीत येतो. पूजेसाठी ठेवलेल्या मृदंगाला टक्करतो. ते सर्व साहित्य उधळते. तिथून दाराकडे जातो.) कोण आहे इतक्या रात्री ?

(दार उघडतो. दारात कोण आहे ते दिसत नाही.)

**सखाराम** कोण आहे ? (डोळे चोळतो. स्तब्ध.) कोण...तू ? स्वप्न का खरं... (पुन्हा डोळे चोळून पाहतो.) तू का इथं ? तू कशी ?

(किंचित्काल तो तसाच. आता त्याच्या एका बगलेने एक आकृती अंग चोरून एका बोचक्यासकट आत शिरते. अवस्था भयाण. हुडहुडल्यासारखे अंग चोरून घेतले आहे. तोंडावर पदर. बोचके खाली ठेवते. ही लक्ष्मी.)

**लक्ष्मी** (सपाट सूर) पुतण्यानं बाहेर काढलं मला. माझ्यावर चोरीचा आळ घातला त्याच्या बायकोनं. पोलिसात देत होते मला. कुठं जाणार मी ? इकडं आले. एवढंच ठिकाण तर मला होतं.

(सखाराम सुन्नपणे पाहतो आहे तिला. त्याला कळत नाही, घडते आहे हे स्वप्न की खरे ?) आता इथंच राहीन. इथं मरेन. कुठंच जाणं नको मला—इथंच जगेन, इथंच मरेन.

(दाराशी सखाराम सुन्न उभा. जरा आत लक्ष्मी हुडहुडल्याप्रमाणे त्याला सामोरी उभी.

स्वयंपाकघरात बिछान्यात चंपा नशेत पुटपुटत कूस बदलते.

लांबवर कुत्री ओरडत आहेत.

सखाराम एकदम भानावर आल्याप्रमाणे जागचा निघतो. लक्ष्मीकडे जातो. तिचा दंड पकडतो आणि तिला नेऊन दाराबाहेर ढकलून दार लावून घेतो एका आवेगाने.

दारावर पुन्हा थाप नाही हे पाहून तो श्वास टाकतो.)

**चंपा** (स्वयंपाकघरात बिछान्यातच याने जरा होष येऊन) कोन आहे ? कोन आलं ?

(शांतता.

घडते आहे त्यावर सखारामचा विश्वासच बसू शकत नाही.

लक्ष्मी आली होती हे खरे की खोटे ? आपण तिला बाहेर टाकले हे खरे की खोटे ?

त्याला नीटसे कळूच शकत नाही. त्यावर विचार करण्याच्या स्थितीतही तो नाही. दारू अद्याप पुरती उतरलेली नाही. इतके खरे की दारावर पुन्हा थाप नाही. कसली चाहूल नाही. डोके धरून सखाराम सुन्न उभा.

मग तो धडपडत स्वयंपाकघराकडे निघतो, आणि जाऊन बिछान्यात आडवळतो. निपचित होतो.

चंपा घडल्या पडल्या नशेत अस्पष्ट बरळते आहे.

लांबवर कुत्री भुंकताहेत थांब-थांबून.

काळोख.)

## दृश्य अकरावे

[पुन्हा रात्रीचा मंद उजेड. बाहेर बऱ्यापैकी पावसाचा एकसारखा आवाज चालू आहे. काळोख.]

# अंक तिसरा

## दृश्य पहिले

[प्रकाश येतो.

सकाळ. घरात उन्हे आली आहेत. चंपा हातात केरसुणी घेतलेली बाहेरच्या खोलीत येते. ती विस्कटलेली, सुस्तावलेली, विमनस्क. दार उघडते.

दारावाटे उन्ह येते आत.

स्वतःच्याच नादात तोंडाने एक ओवी गुणगुणत चंपा केर काढू लागते. ती तिच्या नादात असताना दारात एक आकृती. ही लक्ष्मी. चंपाचे लक्ष नाही.]

**चंपा** (मग लक्ष जाऊन) रोज रोज नाही मिळनार भीक तुला बाई. जा, पुढल्या घरी जा. (तरी लक्ष्मी दारात निश्चल उभी.) मी काय म्हनते तुला ? भैरी आहेस का काय ? इथं भीक मिळनार नाही तुला. जा कशी वाटेनं. नवी दिसतेस !

(लक्ष्मी तशीच उभी.)

बरी धडधाकट दिसतेस की. आणि मग अशी भीक का मागतेस तू ?

(लक्ष्मी स्तब्ध उभी.)

आता जातेस का येऊ ? भिकारी ते भिकारी न् कोडगं बघा किती ! चल, जा आधी—

(चंपा पुढे होते. लक्ष्मी दारात तशीच.)

**लक्ष्मी** (सपाट स्वरात) मी भिकारीण नाही.

**चंपा** आणि मग ? काय राजाची रानी आहेस ?

**लक्ष्मी** या घरात रहात होते मी.

**चंपा** (नवलाने) काय ?

**लक्ष्मी** हो. त्याच केरसुणीने केर काढत होते इथला. तू आहेस तशीच तुझ्या आधी मी इथं रहात होते.

**चंपा** म्हंजे तू...

**लक्ष्मी** लक्ष्मी. एक वर्ष आणि एकवीस दिवस इथं राहिले मी. गतवर्षी श्रावणात इथं आणलं मला. चतुर्थी होती. सहा दिवसांची उपाशी होते मी. चांगलं आठवतंय.

**चंपा** मग आता तू इथं कशी ?

**लक्ष्मी** अमळनेरला पुतण्याकडे होते. तिथं राजाराणीचा संसार. नकोशी झाले. दुसरीकडे जाणार कुठं ? इथं आले. मला दुसरं कुणीच नाही.

**चंपा** नवरा—

**लक्ष्मी** (उसासते.)

**चंपा** (केर काढू लागते) तो घरी नाही—तुला हवा तो—सखाराम. प्रेसवर गेला.

**लक्ष्मी** आहे माहीत. मी पाहिलं जाताना.

**चंपा** पाहिलंस ? मग हाक नाही मारलीस ?

**लक्ष्मी** नाही. उशीर झाला होता ना. त्यात आणखी माझ्यामुळं जास्ती झाला असता.

**चंपा** तू केव्हा आली होतीस ? चांगले दोन घंटे लोटले की तो गेल्याला—

**लक्ष्मी** मी रात्रीपासनं बाहेर तिकडे वळचणीला बसून होते. पाऊस आला ना. पहाटे जरा डोळा लागला, पण प्रेसला निघण्याच्या वेळेला—कशी कुणास ठाऊक—पुन्हा जाग आली होती मला.

**चंपा** तू रात्री आलीस ?

**लक्ष्मी** हो.

**चंपा** आणि मग ?

**लक्ष्मी** बाहेरच होते. पाऊस नसता तर अंगणात झोपणार होते.

**चंपा** पण मग दार वाजवायचं की.

**लक्ष्मी** (जरा थांबून, मग) नाही वाजवलं. म्हटलं कशाला. रात्र पण फार झाली होती ना. झालंच तर झोप अशी किती येणार होती. तुमची उगीच झोपमोड.

**चंपा** मी मेल्यासारखी झोपले होते बघ. दारूची निशा होती.

**लक्ष्मी** (नवलाने) म्हणजे ? तुम्ही दारू घेता ?

**चंपा** हा. का ?

**लक्ष्मी** रात्री पण...घेतली होतीत ?

**चंपा** हा. रोज घेते. तो पन घेतो.

**लक्ष्मी** (जरा विषादाने) काल दसरा. सणाचा दिवस.

**चंपा** मग ?

**लक्ष्मी** (कळवळ्याने) सणावारी, देवाच्या दिवसाला असलं वाईट.

**चंपा** देवधर्म करतीस वाटतं ?

**लक्ष्मी** हो. पूर्वीपासनं. लहानपणापासनं मला ते आवडतं. माझ्या दुर्दैवात मला माझ्या देवाधर्मावरच्या श्रद्धेनंच तारलं. एखादीनं जीव दिला असता. मी जिवंत राहिले. (जरा थांबून उत्सुकतेने) तुम्ही कधी आलात इथं ?

**चंपा** झाले, एकदोन महिने. दोन महिने झाले असतील.

**लक्ष्मी** मी गेल्यावर लगेच आलात ?

**चंपा** तू कधी गेलीस ते मला काय माहीत ?

**लक्ष्मी** भाद्रपदात अष्टमीला गेले. दिवस लक्षात आहे माझ्या. इथला प्रत्येक दिवस लक्षात

आहे माझ्या. घडाघडा म्हणून दाखवीन. मी सांगते. दोन महिने म्हणजे माझ्यापाठून लगेच आला असणार तुम्ही. नक्की.

**चंपा** मग आता पुढं काय बेत तुझा ?

**लक्ष्मी** काय असणार ?

**चंपा** ते खरंच. तुला दुसरं ठिकानच राहिलं नाही. इथंच रहानार म्हन की.

**लक्ष्मी** हो. असं म्हणते.

**चंपा** (जरा थांबून) आत चल. च्या करते.

**लक्ष्मी** नको. कशाला.

(चंपा स्वयंपाकघराकडे जाते. लक्ष्मी एकटीच बाहेर.)

**चंपा** (आत जाताना) मला पन हवा आहे. रात्रीचा फार त्रास देतो सखाराम.

(बाहेर लक्ष्मीची यावर प्रतिक्रिया.)

सकाळी पुन्हा आपनच उठून च्या करायचा म्हनजे नको वाटतं. आंग अन् डोकं कसं ठनकत असतं निसतं.

(लक्ष्मी न राहवून आत सरकते.)

**लक्ष्मी** मी करते हवा तर—चहा—

**चंपा** (लागलीच) नको. दोन दिवसांसाठी आलीस तू. तुला कशाला तकलीफ ?

**लक्ष्मी** (कशीबशी) तकलीफ कसली त्यात...

(अभावितपणे लक्ष्मी कामाला हात लावू लागते. चंपा तिचे हे पाहते आहे.)

हे भांडं—इथंच असतं ना हे अजून ?

**चंपा** हो.

**लक्ष्मी** (इतस्ततः बघते आहे. न राहवून) देव कुठं आहेत ?

**चंपा** देव म्हनतेस ? कुनास ठाऊक.

**लक्ष्मी** कुणास ठाऊक कसं ? तुम्हांला मिळाले नाहीत ? मी इथं दोन लहान तसबिरा ठेवून गेले होते.

**चंपा** असतील.

**लक्ष्मी** (चिंतेच्या स्वरात) कुठं गेल्या कुणास ठाऊक...(न राहवून) हे अजून करतात ना पूजा ?

**चंपा** कोन ? सखाराम ? त्याला एकच पूजा माहीत.

**लक्ष्मी** मी होते तेव्हा नंतर नंतर रोज न चुकता आंघोळ करून देवाला गंधफूल वहायचे. तुम्ही करता की नाही देवपूजा ?

**चंपा** देवाचं काय लागत नाही बघ मी.

**लक्ष्मी** असं कसं. सगळं तोच तर करतो.

**चंपा** माझं काय पन बरं केलं नाही त्यानं. घे. च्या घे. (तिच्यापुढे चहा ठेवते.) काय पहातेस ?

**लक्ष्मी** (चहाच्या पेल्यात एकटक बघत) झालं ? कुणी सांगितलं होतं ग तुला नको तिथं पडायला ? आं ? कुणी सांगितलं होतं ? आणि आता नाकातोंडात चहा जायला लागल्यावर वळवळतेस काय ? अगोचर कुठली. चावट कुठली. (खुदखुद हसत अगदी हळुवारपणे बोट घालून चहात पडलेली मुंगी काढते बाहेर.) एवढंसं पोट आणि सगळा चहा प्यायला निघाली ! थांब, पळू नकोस. तुला कोरडी करते. बघू... (पदराने मुंगीला हळुवारपणे टिपते.) हूंऽ...आता नाई ना पुन्हा पलनाल च्यात ? नाई ना ? जा, पळा. (सोडते तिला.)

(चंपा स्वतः चहा घेणे टाकून, भिकारणीसारख्या अवतारातल्या लक्ष्मीचे निरागस रूप नवलाने, भारल्याप्रमाणे पाहत बसलेली.) मागं मी इथं होते ना, तेव्हा असाच एक मुंगळा होता. गुलाम असा ऐटबाज होता ! मी त्याला म्हणायची राजा. राजासारखा होता म्हणून राजा. खूप लळा लागला होता बघा त्याला माझा. आणखीन एक कावळा होता.

(बाहेर कावळ्याची कावकाव.) (एकदम हुशारून) तो बघा ! तोच असणार !... (वेगाने खिडकीशी जाऊन पाहू लागते बाहेर. घेरी येते. डोळे मिटते. आधार घेते.)

**चंपा** (उठून तिला धरून पुन्हा आणून बसवीत) च्या घे बरं आधी. कावळा काय कुठं पळत नाही. पोटात कधीपास्नं काय नसंल तुझ्या...ये आधी इकडे. (लक्ष्मीला बळेच आणून शेजारी बसवते. दोघी चहा घेऊ लागतात.) घे. हे बटरबिस्कुट घे. (देते.) खा च्याबरोबर. किती दिवस रहाशील इथे ?

**लक्ष्मी** कोण ? मी ? मी आणखी कुठं जाणार ? पुतण्याचं घर तर बंदच झालं. नवऱ्याचं कधीच बंद झालं होतं.

**चंपा** का काढलं नवऱ्यानं बाहेर तुला ?

**लक्ष्मी** मूल नव्हतं.

**चंपा** मग तू गेल्यावर झालं त्याला ?

**लक्ष्मी** काय की. कसं कळणार. तिकडली काहीच बातमी कळली नाही. तुम्ही...तुमचं काय झालं ?

**चंपा** नवरा पावनेआठ. त्यात भारी त्रास द्यायचा. बघितलं बघितलं नि डोकं तडकलं तशी मीच निघाले घरातनं. कुकवाला तरी कशाला हवा नवरा.

**लक्ष्मी** आता कुठं असतो ?

**चंपा** कुनास ठाऊक, जिता आहे का मेला मुडदा.

**लक्ष्मी** (कळवळून) असं बोलू नये !

**चंपा** मग काय बोलू त्या हलकटाबद्दल ?

**लक्ष्मी** कसं झालं तरी नवरा म्हणजे देवा-ब्राह्मणासमक्ष गाठ बांधलेली असते ना आपली त्याच्याशी.

**चंपा** नरकवास काढायला देवब्राह्मन येत नाहीत.

**लक्ष्मी** ते नशिबाचे भोग असतात एकेकाच्या.

**चंपा** म्हनून काय मेल्या मढ्यागत मरेपत्तर सहन करायचं होय ? तुला सांगते, मी केलं सहन. फार झालं तेव्हा लाथ घालून बाहेर पडले घर सोडून. यानं इथं आनलं—तुझ्या सखारामानं.

**लक्ष्मी** (सुस्कारून) माझे कसले. आता ते तुमचे आहेत.

**चंपा** हे बघ, माझी मी. आहेत तर सगळे नाही तर कोन नाही मला. मला आहे ठावकी.

(स्तब्धता.)

**लक्ष्मी** (न राहवून) तुमचं इथं कसं चालतं ?

**चंपा** काय चालायचं. दारू घेतली की कोनाचं पन चालतं. खायला घालतो ते अन्न पुरतं वसूल करतो बघ तुझा सखाराम. मी म्हनून टिकले. काय करनार ? परतून बाहेर पडायचं म्हनजे रोज कुठली कोन चार जनावरं भेटनार, त्यापक्षी हा एकटा परवडला की.

**लक्ष्मी** (उसासते आणि धीर धरून) मग मी इथं राहिले—कायमची—तर तुम्हांला—चालेल ?

**चंपा** (जरा विचार करून) मला बाहेर काढू नकोस म्हनजे झालं. तसं करायला गेलीस तर मात्र मी वाईट बाई आहे. सांगते आधीच.

**लक्ष्मी** असं कसं करीन मी. माझं काही मागणं नाही. आता पूर्वीसारखं झेपणार पण नाही. आता एक घराचं छप्पर डोक्यावर राहिलं की बस्स. म्हणाल तशी राहीन मी. खूप काम पण करीन—

**चंपा** (जरा विचार करून) रहा. तू घर बघ, मी त्याला बघते. दोन्ही मला पन झेपत नाहीत. तू जग आणि मी पण जगते.

**लक्ष्मी** (अत्यंत कृतज्ञतेने) हो. मी—मी सांगेन त्यांना. मी खरंच त्रास देणार नाही. उलट उपयोगीच पडेन कामाला. अशी दिसते ना, पण अजून काम वाटेल तेवढं करू शकते मी. पुन्हा जेवते कमी. वेळेला शिळा भात आणि वाटीभर ताक असलं की मला पुरतं. माझी कसलीच चलबिचल नाही. बरं, उपास पण असतात. अंगावर आणि दांडीवर, अशी दोन पातळं पुरेत मला. तीसुद्धा नवीच हवीत असं नाही—तुमची जुनीसुद्धा चालतील...

(बाहेर सखाराम येतो. वहाणा काढतो. काही तरी कारणाने तो नाराज आहे पहिल्यापासून.)

**सखाराम** (आत चंपाला उद्देशून) मी आलोय.

(आत चंपा लक्ष्मीला खुणावते.

सखाराम खुंटीकडे जाऊन जाकीट-टोपी काढतो.)

(गुरगुरत) मजुरी तेवढीच आणि जादा काम करावं असं मागतात साले. कोण करील ? काय तुम्ही आमचे बाप लागलात का आम्हांला विकत घेतलंत तुम्ही ? दाखवतो म्हणावं तुम्हांला...

(पाय धुण्यासाठी पाणी घेऊन लक्ष्मी जाऊन बाहेरच्या दाराशी उभी. सवयीने सखाराम न पाहता स्वतःच्याच नादात गुरगुरत पाय धुण्यासाठी जातो. लक्ष्मीला पाहून एकदम ताठरतो. लक्ष्मीच्या अंगात क्षणमात्र सीमेचे भय एकवटते. अधोमुख होऊन थरथरते.)

**सखाराम** (हिंस्रपणे) तू ! का आलीस परत ? कुणी घेतलं तुला घरात ?

**लक्ष्मी** (प्रयासाने) पुतण्यानं धरून हाकललं मला. इथं आले. दुसरं कोण नाही. चोरीचा खोटा आळ घेतलानी माझ्यावर.

**सखाराम** पण इथं का आलीस तू ?

**लक्ष्मी** दुसरीकडे कुठं जाणार मी...कोण आहे...

**सखाराम** दुनिया मोकळी होती तुला. मी काय म्हणालो होतो ? तुझा माझा संबंध संपला.

**लक्ष्मी** रोज आठवण यायची. एक दिवस असा नव्हता, इथली आठवण मला झाली नाही.

**सखाराम** मला तुझी आठवण मुळीसुद्धा झाली नाही. इथून गेली ती संपली—मेली. काही संबंध नाही मग. हा कायदा आहे इथला. आज चौदा वर्षं हा चालू आहे. तुला ठाऊक नव्हता तो ? इथं पहिल्यांदा घेऊन आलो तेव्हा तुला सगळं सांगितलं होतं का नाही ? मग ?

**लक्ष्मी** ते घर संपलं, मग कुठं जाणार. दुसरा थारा नव्हता. इथं आले.

**सखाराम** थारा नव्हता तर जीव द्यायचा. माझा आता काय संबंध ? मी काय मरेपर्यंतची जबाबदारी नव्हती घेतली तुझी. मी कोण तुझा ?

**लक्ष्मी** (कशीबशी) देव—

**सखाराम** (कर्कशपणे) काय ? खबरदार पुन्हा तसलं म्हणशील तर, खबरदार ! गळाच घोटीन ! आपला गरजेचा संबंध होता. गरज संपली, संबंध संपला, बास ! इथं काय पुन्हा काम तुझं ? कुणी राहवून घेतली तुला ? बाहेर हो आधी या घरातनं, चालती हो आधी—

(लक्ष्मी कमालीची थरकापते आहे.

आतून चंपा केसांचा बुचडा बांधीत येऊन आतल्या दाराशी हे पाहत उभी. तिच्यावर यातील कशाचा परिणाम नाही.)

**लक्ष्मी** (एकदम हातची पाण्याची बादली आणि तांब्या बाजूला ठेवून सखारामचे पाय धरून) मला बाहेर काढू नका. मला आधार नाही. कोण मला विचारणार. मी कशीही राहीन. सगळी कामं करीन. मला काही नको, फक्त डोईवर छप्पर आणि मरताना तुमची मांडी—

**सखाराम** (तिला दूर उडवून) चल हट ! चालती हो घरातनं आधी, नाही तर डोकंच फोडतो तुझं ! हो बाहेर पहिली. पहिली बाहेर हो—

(लक्ष्मीने सखारामचे पाय आता घट्ट पकडून ठेवलेले. त्याने प्रयत्न करूनही ते सुटत नाहीत. तो तिला शिव्या घालतो आहे.

चंपा हे शांतपणे पहात उभी.

सखाराम लक्ष्मीला दातओठ खाऊन आता बुकलू लागतो. तरीही लोळागोळा लक्ष्मी त्याच्या पायांना घट्ट झटलेली.

मारताना शिव्या घालतो आहे.

चंपा पाहते आहे.)

**चंपा** अरे किती मारशील. प्रान जाईल अशानं तिचा.

**सखाराम** बेहत्तर आहे गेला तर. पण सालीला घरात नाही राहू देणार ! (आणखी मारू लागतो.)

**चंपा** आणि खून पडला तर माझं काय करनार आहेस.

**सखाराम** तुला आहे की तुझा नवरा.

**चंपा** नवरा असलेली कोन इथं येईल.

**सखाराम** (संतापाच्या नव्या झटक्याने जास्त अमानुषपणे लक्ष्मीला मारीत) हूं ! हूं ! कोडगी कुत्री साली. जळू साली...

**चंपा** (येऊन लक्ष्मीला बाजूला करून मध्ये उभी राहत) मला मार.

(तो हात आवरून चडफडत उभा.)

लक्ष्मीला उभी करून तिचे तोंडावरचे हात बळेच बाजूला घेत) बघू—डोळा थोडक्यात बचला म्हन की. पोटात नाही ना लागलं ? पोटाखाली ? चल, आत चल.

**सखाराम** आत नव्हे, बाहेर—

(चंपा लक्ष्मीला आत नेऊ लागते.)

काय म्हणतोय मी. बाहेर काढ आधी तिला.

**चंपा** (लक्ष्मीला) चल, बघू नको उगाच.

(चंपा लक्ष्मीला आत घेऊन जाते.

सखाराम चडफडत उभा. त्याला काय करावे कळत नाही.)

**सखाराम** चंपे, तिला पहिली बाहेर काढ, सांगतोय.

(चंपा लक्ष्मीला आत नेऊन बसवते.)

**चंपा** (लक्ष्मीला) जळत असेल मार लागला तिथं. फार त्रास होतो, बघ. बस इथंच. उठू नको. (बाहेर येते. लक्ष्मीने ठेवलेली पाण्याची बादली आणि तांब्या उचलून सखारामला) चल, पायावर पानी घालते तुझ्या.

(सखाराम संतप्त उभा.)

**सखाराम** आधी ती इथनं बाहेर गेली पाहिजे.

(चंपा स्तब्ध.)

चंपे, तिला इथनं पहिली बाहेर घालव, तुला निक्षून सांगतोय.

**चंपा** पण मी कोन घालवनारी. घर तुझं आहे. तू घालव की हवं तर. काय मी आनली होय तिला इथं ?

**सखाराम** मग तू का मध्ये आलीस आमच्या ?

**चंपा** का आले ? खुनासाठी तू जाशील खडी फोडायला आनिक मला जावं लागंल पोटाची दीड वितीची खळगी भरन्यासाठी दर वेळी नवं गिऱ्हाईक शोधत धंद्याला. रोज दहा जानवरांकडून फाडून घेण्यापेक्षा एक काय करतं ते करू दे. समजलं न्हवं ? चल आता पाय धुन्याला. च्या तयार आहे.

**सखाराम** तिला म्हणावं पहिली घराबाहेर हो. माझा तिचा काय संबंध नाही !

**चंपा** पण तुला तिचा त्रास का होतो ? मला घरात कामाला मानूस होईल. माझ्याच्यानं तुझा त्रास आणि घरातलं काम निभत नाही. ती घर बघेल. पुन्हा काय देनंघेनं नाही. दोन वेळा शिळंपाकं खाईल आनिक माझी जुनेरं नेसेल. तुला काय तकलीफ होनार आहे त्यात ?

**सखाराम** दोन माणसं पोसायची नाहीत मला.

**चंपा** होय ? मग मी जाते.

**सखाराम** नाही, तिला घालव. तिनंच गेलं पाहिजे. नालायक साली. माझ्या मांडीवर डोकं ठेवून मरण्याच्या गोष्टी करते ! (ओरडून) लक्ष्मे, आधी बाहेर चालती हो माझ्या घराच्या. चालती हो आधी. इथं काय काम नाही तुझं.

(आत लक्ष्मी थरकापते.)

**चंपा** तू आता पाय धुवायला येतोस का हे सगळं इथं ठेवून आत जाऊ मी ?

(सखाराम नाखुषीनेच पाय धुण्यासाठी चंपामागून जातो बाहेर. लक्ष्मी आत भिंतीला टेकून थरथरत उभी. बाहेर कावळा ओरडतो. धडपडत लक्ष्मी स्वयंपाकघराच्या खिडकीशी जाऊन बाहेर पाहू लागते उत्सुकतेने.

धुतलेले तोंड, हात पुसत सखाराम आणि मागून चंपा बाहेरच्या खोलीत येतात.

चंपा बादली, तांब्या घेऊन स्वयंपाकघरात येते.

खिडकीबाहेर पाहणाऱ्या लक्ष्मीकडे क्षणभर पाहून हातातली बादली, तांब्या ठेवण्यासाठी मोरीकडे जाते.)

**लक्ष्मी** (बाहेरच पाहत) पुन्हा नाही ओरडला.

**चंपा** कोन ? कावळा का तो ?—तुझा सखाराम ?

**लक्ष्मी** (हे न ऐकल्यासारखी) दुपारच्या वेळेला तो असाच ओरडायचा. तोच असणार तो. नक्की.

(चंपा चहा ओतते आणि घेऊन बाहेर जाते.

सखाराम बैठकीवर बसला आहे.)

**सखाराम** (चंपाच्या हातचा चहा हातात घेऊन) गेली की नाही ती ?

**चंपा** (जरा थांबून) नाही.

**सखाराम** (हातची कपबशी खाली ठेवून) नाही ? का ?

**चंपा** चहा घे.

**सखाराम** तू पण माजालाच आलीस जशी !

**चंपा** मग काय मारनार आहेस मला ?

**सखाराम** वेळ आली तर मारीन. राहीन काय ?

**चंपा** येईल तेव्हा बघू. आधी चहा घे. थंड होईल.

**सखाराम** मी तिला या घरात राहू देणार नाही, काय वाट्टेल ते झालं तरी. हां !

(चंपा चहाचा कप उचलून त्याच्या तोंडाशी धरते. तो कप हाती धरून चहा पिऊ लागतो नाराज अवस्थेतच.)

**सखाराम** एकदा संपलं ते संपलं. पुन्हा तिनं इथं यायचं कामच काय ? मी काय नवरा आहे तिचा ?

(आत लक्ष्मी हळूहळू कामाला लागली आहे. जरा लंगडते आहे.)

**चंपा** दोन दिवस असू दे. मग सांगते तिला जायला. जायला कुठं ठिकान तरी आहे तिला ?

**सखाराम** म्हणून कां मी तिच्या आयुष्याची जिम्मेदारी घेतली ? चंपे, तिला उद्याच जायला सांग. उद्या सकाळला गेली पाहिजे. तोंड दिसता कामा नये मला तिचं पुन्हा. कोडगी साली. मांडीवर मरण्याच्या गोष्टी करते.

(धुमसतो आहे. चहा पिऊन झाल्यावर त्याच्या हातची कपबशी घेऊन ती स्वयंपाकघरात येते. स्वयंपाकघरात काम करणारी लक्ष्मी ती येताच कामापासून दूर होते.)

**लक्ष्मी** (कशीबशी) काय झालं ?

**चंपा** काम कर तू. नाही तरी काय होनार तुझं ? आनखी काय कोन करनार ग तुझं ? पन एक गोष्ट ध्यानात ठेव. रहा, पन तोंडानं बोलायचं नाही.

(बाहेर सखाराम अजून बेचैन. फेऱ्या घालतो. कोनाड्याशी जाऊन दारूची बाटली काढतो. दारू पिऊ लागतो. मग काय वाटते कुणास ठाऊक, मृदंग काढतो. त्यावरची धूळ झटकून टाकतो. मृदंग खाली बैठकीवर मांडतो. गवसणी काढतो.

बसतो. मृदंगावर थाप टाकतो.

आत लक्ष्मी यासरशी एकदम थरारते.

सखाराम मृदंग वाजवू लागतो एका नशेत. मग जीव खाऊन वाजवतो. स्वयंपाकघरात लक्ष्मी आणि चं[illegible]काम करताहेत. मृदंग जोरजोराने वाजतो आहे.

दाऊद येतो. सखा[illegible]े लक्ष नाही.)

**सखाराम** (लक्ष जाऊन तुटकपणे) कोण ? तू. बऱ्याच दिवसांनी फावलं यायला ?

**दाऊद** वैसाच. मुरदंग सुना. लगा, जैसे वह पुराने दिन फिर आ गये, सखाराम.

**सखाराम** कसले पुराणे दिन ?

**दाऊद** जब वो पंछी था—वो—लक्ष्मी.

(सखारामचा मृदंगावरचा हात अडतो यासरशी. लक्ष्मी दाऊदचा आवाज ऐकून मधल्या दाराशी आलेली.)

**लक्ष्मी** (न राहवून) दाऊद भावजी !

**दाऊद** (सानंद) अरे ! सच ? (सखारामला) क्यों सखाराम, एकसे एक दो पंछी हो गये क्या ? या चंपा गयी ?

**सखाराम** (तीक्ष्ण स्वरात) गप्प बैस. नाही तर चालता हो आधी इथनं. बंद एकदम बोलणं !

(मृदंग बडवू लागतो एका त्वेषाने. दाऊद मूढ. दाराशी लक्ष्मी. स्वयंपाकघरात शांतपणे काम करणारी चंपा.)

**चंपा** (लक्ष्मीला) ए, आता काम करनार का तिथंच तशी उभी रहानार तू गौरीसारखी ?

(दचकून लक्ष्मी परत कामाला लागते. मृदंग बडवणारा सखाराम. बाजूला दाऊद. काळोख.)

## दृश्य दुसरे

[स्वयंपाकघरात मंद उजेड. उत्तररात्र.

लांब कोठें तरी कोंबड्याची बांग.

स्वयंपाकघरातल्या चिमणीच्या उजेडात लक्ष्मीची मोठी काळी सावली स्वयंपाकघरात पसरलेली.

हलक्या टाळ्या वाजवून तोंडाने पुटपुटते आहे.

''सीताराम, सीताराम, सीताराम, जय सीताराम.''

होता होता हे वाढू लागते. टाळ्या वाढतात. पुटपुट वाढते.]

**सखाराम** (बाहेरल्या खोलीतल्या काळोखातून केवळ शब्द) अरे काय आहे काय ? बंद एकदम ! अजून रात्र सरली नाही तर...

(लक्ष्मी पुन्हा हलक्या टाळ्या वाजवून 'सीताराम जय सीताराम' पुटपुटत राहते.)

**सखाराम** बंद ! नाही तर जीव घेईन सांगतोय ! साली कटकट...

(लक्ष्मी अजून हलक्या स्वरात टाळ्यांचे केवळ हात हालवीत पुटपुटत रहाते 'सीताराम, सीताराम.')

ती चिमणी मालवून झोपून जा गपगार नाही तर धडगत नाही आता...रक्त ओकायला लावीन, सांगतोय...जीभ हासडून काढीन...

(लक्ष्मीच्या हलक्या टाळ्या आणि पुटपुट यासरशी थांबते. ती अंग चोरून उठते. जाऊन चिमणी फुंकीनं मालवते. सगळा काळोख. खिडकीबाहेर लांबचा कोठला तरी अप्रत्यक्ष उजेड तेवढा उरतो.)

पुन्हा चालूच...चालूच आहे...

(सर्वभर शांतता. रातकिडे. सखाराम बिछान्यात उठून बसलेला.)

(गुरगुर) तिच्या मायला तिच्या...

(आडवळतो. शांतता.

बाहेरल्या खोलीतून झोपल्या चंपाचे नशेतले अस्पष्ट बरळणे आता ऐकू येते. मग तिचे शुद्ध नसल्या अवस्थेतले काही उद्‌गार, आवाज. एक दीर्घ उसासा.

स्वयंपाकघरात काळोखात लक्ष्मी अंग आखडून आखडून झोपते. आणि मग उठून बसते बिछान्यात.)

**लक्ष्मी** (अनावरपणे) सीताराम, सीताराम...(एकदम आवाज चोरून घेते.)

(काळोखात खिडकीबाहेरल्या अप्रत्यक्ष उजेडामुळे, बसल्या जागी झपाटल्यासारखी झुलणारी तिची छायाकृती तेवढी दिसत राहते. पूर्ण काळोख.)

## दृश्य तिसरे

[प्रकाश येतो. दिवस. दुपार. कावळ्याची कावकाव.

घरात कोणी नाही. किंचित्काळ असे.

मग बाहेरच्या दाराची कडी गडबडीने निघते. दार उघडून लक्ष्मी आत येते. खूप धाप लागली आहे. चेहऱ्यावर काही तरी भयंकर घडल्याचा भाव. धडपडत स्वयंपाकघराकडे जाते. पुन्हा येऊन बाहेरल्या दाराची कडी आतून कशबशी लावून घेते आणि स्वयंपाकघरात मांडलेल्या देवाच्या तसबिरीशी येते. तिथे बसते धापा टाकीत. जणू प्राण कुडी फोडून बाहेर पडू बघतो आहे आणि ती तो प्रयासाने सावरते आहे.]

**लक्ष्मी** (धाप घालत देवाच्या तसबिरीला) तुला—तुला माहीत आहे ? आहे माहीत ? भयंकर ! फार भयंकर ! मला तर—घेरी येणार वाटत होती. बाई ग...आई...काय तरी हे ! म्हणायचं काय याला...करू काय मी...काही कळेना बघ...भयंकर !

सीताराम...सीताराम...(पुन्हा धाप घालते.) मी जायलाच नको होतं मागनं. पण मला रहावलं नाही, काय करू ? (तोंडात मारून घेते फडाफड.) का गेले मी. का गेले. सांगू ? मला संशय येत होता गेला आठवडाभर. ही रोज दुपारी जाते कुठं ? त्यांच्यासाठी गेले मी. मिळालेलं सौभाग्य लाभलं नाही; मनानं हेच सौभाग्य मानलं. पती मानून पुजला. इथून गेले तरी मनानं

त्यांचीच पूजा करत होते मी. (पोलक्यातून काढून दोऱ्यातले मंगळसूत्र दाखवीत) हे बघ ! हे बांधलं होतं त्यांच्या नावानं मी. मी त्यांची आहे. लाथा खाईन पण त्यांच्या खाईन. मरेन तर त्यांच्या मांडीवर, भरल्या चुड्यानं मरेन. (गदगदते.) त्यांच्याशी तिचं हे असं वागणं ? त्यांच्यासाठी त्या—शी शी—(घशात आवंढा येतो.) सहन नाही रे होत. पाहताना मरण येईल तर बरं, वाटलं होतं. काय हे पाप ! ही कुठं जाईल ? नक्की नरकात ! तिचं नाही काही, पण यांचं काय ? तिच्या संगतीनं—हेसुद्धा—(शहारते.) आई ग !....सहन नाही होत बघ...घरात...दारू काय पितात दोघं...झालंच तर...दिवस नाही, रात्र नाही...मी असताना नव्हतं इतकं...इतकं होऊ दिलंच नसतं मी...आणि आता...मी आता काय करू...त्यांना माहीतसुद्धा नाही रे तिचं हे...छीः छीः...(शहारते अंगभर.) ओकारी येईल आठवणीनंसुद्धा—(तोंडावर हात घट्ट धरते.)

(बाहेर दारावर थापा.)

(धसकून) आली वाटतं. आता काय करू ? कळत नाही. (घाईघाईने तसबिरीपुढे डोके घासते. बाहेरल्या खोलीत जाऊन दार उघडते. बाजूला होऊन सरळ आत येऊ लागते. चंपाचा नवरा फौजदार शिंदे झुकत झुकत आत येतो. आणखीच ओढलेला, टाकलेला दिसू लागलेला. पायात काही नाही. तोंडावर वण.)

**इसम** चंपा...ए चंपे...

(आत जाणारी पाठमोरी लक्ष्मी जागच्या जागी ताठरते. खिळते.)

चंपे...मी आलोय...मार ना मला...मला मार ना चंपे...मी आज मरायला आलोय चंपे. इथून जिता जाणार नाही. तुझ्या हातानं मरणार आज. बास ! आज हम जायेंगे...

(लक्ष्मी वळून पहाते.)

आं ? चंपा नाहीस तू. तू वेगळीच दिसतेस. मग चंपी कुठं गेली ? कुठे गेली ? चंपा कुठे गेली ? चंपे...(गरगरल्यासारखे डोळे मिटून खाली बसतो.)

**लक्ष्मी** (हे सर्व बघून हबकलेली) कोण तुम्ही ? तुम्ही कोण ?

(गडबडीने आतून पाणी आणून त्याला देते.)

हे घ्या आधी. प्या.

(चंपाचा नवरा ते घटाघटा पितो.)

कोण तुम्ही चंपाचे—

**इसम** चंपीचा नवरा. हां, सख्खा. लग्नाचा.

(लक्ष्मी शहारते.)

कुठे आहे चंपा ? मला ती हवी हो. मला तिचा मार हवा. तिच्या हाताने मरायला आलोय मी. चंपा...मला मार...मार ना मला चंपा...

**लक्ष्मी** घरात नाही. कुठून आला तुम्ही ?

(चंपाचा नवरा नुसताच 'कुणास ठाऊक' असा हात करतो.)

कुठं रहाता ?

**इसम** रस्त्यात गटारात. स्मशानात. (कोरडा रडू लागतो.) कुठेही.

**लक्ष्मी** (न राहवून त्याच्या जवळ जाते.) असं रडू नका बरं. मोठ्या पुरुष माणसानं असं रडणं बरं नाही दिसत. काय झालं ? ताप आहे का ? (त्याच्या अंगाला हात लावून तो लगेच मागे घेते.) नाही. मग भूक लागली का ? थांबा हां. मी काय असलं तर बघते.

(स्वयंपाकघरात जाते. काही तरी एका वाटीत घाईने काढून परत येते.

दरम्यान बाहेर चंपाच्या नवऱ्याने खिशातली बाटली काढून तिचे घोट घेऊन बाटली पुन्हा खिशात ठेवलेली.)

घ्या. हे खा. (त्याच्यापुढे ठेवते.)

(चंपाचा नवरा बसून रहातो.)

थांबा. तोंड खराब झालंय तुमचं, बघू. (एकदम पदर हाती घेते. मग तो सोडून आतून जाऊन पाणी आणि एक फडका आणते.) पुसा यानं, हा घ्या. चुळा भरा.

(चंपाचा नवरा तसाच.)

अयाई, पोटात काहीच नाही तुमच्या. (जिवाचा धडा करून स्वतः त्याचा चेहरा थरथरत्या हाताने पुसते.) काय माणूस आहे ती की कोण. आता खा. नीट बसून चवीनं खा.

(चंपाचा नवरा तसाच बसलेला.)

खाण्याचीसुद्धा शक्ती नाही उरली ? आणा. (स्वतः भरवू लागते.) हं. घ्या. पोटात दोन घास गेले म्हणजे किनई, बरं वाटेल. दारू पिणंसुद्धा वाईट. काय असतं ते ? घाणेरडं—कुजकं नासकं काही तरी. शी.

**इसम** पाणी—

**लक्ष्मी** पाणी—आणते हां. (आत जाते.)

(बाहेरच्या खोलीत चंपाचा नवरा पुन्हा खिशातल्या बाटलीतले दोन मोठे घोट घटघटा घेऊन बाटली खिशात ठेवतो.

लक्ष्मी पाणी घेऊन बाहेरच्या खोलीत येते.)

घ्या. प्या हे. (त्याला पाणी पाजते.) अजून शक्ती येत नाही. काय हे जिवाचं करून घ्यावं. तिला एक काही नाही, पण म्हणून...(चेहरा पाहत) इतकं हे कुठं लागलं ?

**इसम** तिनं...तिनं मारलं.

**लक्ष्मी** कुणी ? चंपानं ?

(चंपाचा नवरा होकारार्थी मान हालवतो.)

(धक्का बसून) इथं आला होता तुम्ही ?

(चंपाचा नवरा होकारार्थी मान हालवतो.)

मारून बाहेर काढलं तुम्हांला ? काय ही बाई की थट्टा ? आणि तुम्ही मार खाल्लात ? पुरुषासारखे पुरुष आणि...

**इसम** नाही...मला आणखी मार हवाय...तिच्या हातनं मरायचंय मला...मला जगायचं नाही...काय आहे जगायला...नोकरी गेली, बायको गेली, घर गेलं...काय आहे आता ? (कोरडा गळा काढून रडू लागतो.) काय उरलंय ?

**लक्ष्मी** चूप बरं. कुणी ऐकेल ना. (नकळता त्याच्या तोंडावर हात धरलेला.)

ती येईल इतक्यात. कुठं गेलीय आहे ठाऊक ? (सांगावे की सांगू नये या विचारात जरा घुटमळते.) पण नको, राहू दे. तुम्हांला आणखी त्रास होईल. तुम्ही इथनं जा. ती यायच्या आत जा नाही तर ती पुन्हा मारील. तिला दयामाया नाही. आणि लाज पण नाही.

(चंपाच्या नवऱ्याला जाण्याची घाई नाही. तो बसलेला.)

जा बरं आता आधी.

(चंपाचा नवरा तसाच.)

ती आली तर गोंधळ घालील. उठा आता.

(चंपाचा नवरा तसाच.)

उठा. चला. (त्याला आधार देऊन उठवू लागते. तो मुद्दाम तिच्यावर भार टाकतो. मग कसाबसा उभा राहतो.) जा. मग पुन्हा या हवे तर. पण ती नसताना या म्हणजे झालं. मी देईन खायला. पण ती नसताना या हं. जा आता. (त्याला जवळजवळ ढकलून घालवते बाहेर. त्याच्या मागून बाहेर जाते—परत येते. दात-ओठ खाऊन) पापी ! कधी बरं होणार नाही तिचं. नवरा सोडते. पुन्हा दुसरा धरला त्याला फसवून तिसऱ्याशी बदकर्म ? शी शी शी. आणि नवऱ्याच्या अंगावर हात टाकणं म्हणजे तर...(आतल्या खोलीतल्या देवाच्या तसबिरीशी तरातरा जाते.) पहातोस ना तू ?...(डोळे मिटून) सीताराम, सीताराम...

(काळोख.)

## दृश्य चौथे

[प्रकाश येतो. संध्याकाळ.

स्वयंपाकघरात चंपा.

लक्ष्मी पाण्याने भरलेले घडे डोक्यावर, काखेत घेऊन घरात येते. कशीबशी काखेतला घडा उतरते. मग डोक्यावरचा घडा उतरून हुश्श करते. हे काम तिला झेपत नाही. प्रकृतीने आणखीच उतरलेली.

चंपा ती आल्याची एकदा दखल घेऊन आपल्या कामात.

एकेक घडा घेऊन लक्ष्मी स्वयंपाकघरात मोरीच्या बांधावर नेऊन रचते. मग दुसऱ्या कामाला लागते.]

(चंपाचा नवरा नुसताच 'कुणास ठाऊक' असा हात करतो.)

कुठं रहाता ?

**इसम** रस्त्यात गटारात. स्मशानात. (कोरडा रडू लागतो.) कुठेही.

**लक्ष्मी** (न राहवून त्याच्या जवळ जाते.) असं रडू नका बरं. मोठ्या पुरुष माणसानं असं रडणं बरं नाही दिसत. काय झालं ? ताप आहे का ? (त्याच्या अंगाला हात लावून तो लगेच मागे घेते.) नाही. मग भूक लागली का ? थांबा हां. मी काय असलं तर बघते.

(स्वयंपाकघरात जाते. काही तरी एका वाटीत घाईने काढून परत येते.

दरम्यान बाहेर चंपाच्या नवऱ्याने खिशातली बाटली काढून तिचे घोट घेऊन बाटली पुन्हा खिशात ठेवलेली.)

घ्या. हे खा. (त्याच्यापुढे ठेवते.)

(चंपाचा नवरा बसून रहातो.)

थांबा. तोंड खराब झालंय तुमचं, बघू. (एकदम पदर हाती घेते. मग तो सोडून आतून जाऊन पाणी आणि एक फडका आणते.) पुसा यानं, हा घ्या. चुळा भरा.

(चंपाचा नवरा तसाच.)

अयाई, पोटात काहीच नाही तुमच्या. (जिवाचा धडा करून स्वतः त्याचा चेहरा थरथरत्या हाताने पुसते.) काय माणूस आहे ती की कोण. आता खा. नीट बसून चवीनं खा.

(चंपाचा नवरा तसाच बसलेला.)

खाण्याचीसुद्धा शक्ती नाही उरली ? आणा. (स्वतः भरवू लागते.) हं. घ्या. पोटात दोन घास गेले म्हणजे किनई, बरं वाटेल. दारू पिणंसुद्धा वाईट. काय असतं ते ? घाणेरडं—कुजकं नासकं काही तरी. शी.

**इसम** पाणी—

**लक्ष्मी** पाणी—आणते हां. (आत जाते.)

(बाहेरच्या खोलीत चंपाचा नवरा पुन्हा खिशातल्या बाटलीतले दोन मोठे घोट घटघटा घेऊन बाटली खिशात ठेवतो.

लक्ष्मी पाणी घेऊन बाहेरच्या खोलीत येते.)

घ्या. प्या हे. (त्याला पाणी पाजते.) अजून शक्ती येत नाही. काय हे जिवाचं करून घ्यावं. तिला एक काही नाही, पण म्हणून... (चेहरा पाहत) इतकं हे कुठं लागलं ?

**इसम** तिनं...तिनं मारलं.

**लक्ष्मी** कुणी ? चंपानं ?

(चंपाचा नवरा होकारार्थी मान हालवतो.)

(धक्का बसून) इथं आला होता तुम्ही ?

(चंपाचा नवरा होकारार्थी मान हालवतो.)

मारून बाहेर काढलं तुम्हांला ? काय ही बाई की थट्टा ? आणि तुम्ही मार खाल्लात ? पुरुषासारखे पुरुष आणि...

**इसम** नाही...मला आणखी मार हवाय...तिच्या हातनं मरायचंय मला...मला जगायचं नाही...काय आहे जगायला...नोकरी गेली, बायको गेली, घर गेलं...काय आहे आता ? (कोरडा गळा काढून रडू लागतो.) काय उरलंय ?

**लक्ष्मी** चूप बरं. कुणी ऐकेल ना. (नकळता त्याच्या तोंडावर हात धरलेला.)

ती येईल इतक्यात. कुठं गेलीय आहे ठाऊक ? (सांगावे की सांगू नये या विचारात जरा घुटमळते.) पण नको, राहू दे. तुम्हांला आणखी त्रास होईल. तुम्ही इथनं जा. ती यायच्या आत जा नाही तर ती पुन्हा मारील. तिला दयामाया नाही. आणि लाज पण नाही.

(चंपाच्या नवऱ्याला जाण्याची घाई नाही. तो बसलेला.)

जा बरं आता आधी.

(चंपाचा नवरा तसाच.)

ती आली तर गोंधळ घालील. उठा आता.

(चंपाचा नवरा तसाच.)

उठा. चला. (त्याला आधार देऊन उठवू लागते. तो मुद्दाम तिच्यावर भार टाकतो. मग कसाबसा उभा राहतो.) जा. मग पुन्हा या हवे तर. पण ती नसताना या म्हणजे झालं. मी देईन खायला. पण ती नसताना या हं. जा आता. (त्याला जवळजवळ ढकलून घालवते बाहेर. त्याच्या मागून बाहेर जाते—परत येते. दात-ओठ खाऊन) पापी ! कधी बरं होणार नाही तिचं. नवरा सोडते. पुन्हा दुसरा धरला त्याला फसवून तिसऱ्याशी बदकर्म ? शी शी शी. आणि नवऱ्याच्या अंगावर हात टाकणं म्हणजे तर...(आतल्या खोलीतल्या देवाच्या तसबिरीशी तरातरा जाते.) पहातोस ना तू ?...(डोळे मिटून) सीताराम, सीताराम...

(काळोख.)

## दृश्य चौथे

[प्रकाश येतो. संध्याकाळ.

स्वयंपाकघरात चंपा.

लक्ष्मी पाण्याने भरलेले घडे डोक्यावर, काखेत घेऊन घरात येते. कशीबशी काखेतला घडा उतरते. मग डोक्यावरचा घडा उतरून हुश्श करते. हे काम तिला झेपत नाही. प्रकृतीने आणखीच उतरलेली.

चंपा ती आल्याची एकदा दखल घेऊन आपल्या कामात.

एकेक घडा घेऊन लक्ष्मी स्वयंपाकघरात मोरीच्या बांधावर नेऊन रचते. मग दुसऱ्या कामाला लागते.]

**चंपा** (लक्ष्मीकडे न बघता, काम करीत) अलीकडे दुपारचं कोन येतं इथं ?

(लक्ष्मी यासरशी एकदम दचकते.)

**लक्ष्मी** कोण ?...

**चंपा** मला काय माहीत कोन. तू घरी असतेस.

**लक्ष्मी** (उत्तर टाळण्यासाठी) कोण बरं...

**चंपा** माझा नवरा किती वेळा आला होता इथं ?

**लक्ष्मी** (गोंधळलेली) नवरा ?...

**चंपा** हे बघ, खोटं बोलनं जमनार नाही तुला. खरं ते सांग मला. लौकर सांग.

**लक्ष्मी** तीनदा.

**चंपा** का घरात घेतलंस त्याला ?

**लक्ष्मी** (कशीबशी) तो—बरं नव्हतं—त्याच्या जिवाला. पुन्हा—मला काय माहीत कोण ते. म्हणजे त्याचा तोच येत होता. हो. बाहेर तरी कसं घालवणार.

**चंपा** मी यायच्या आत बाहेर कसा जायचा तो ?

**लक्ष्मी** तो...त्यांचे तेच...जायचे. हो ना. तेच जायचे...

**चंपा** मला तू सांगितलं का नाहीस, तो येतो म्हनून ?

**लक्ष्मी** मी ? (पार गोंधळलेली.) मला वाटलं...सांगावं की नाही—म्हणजे...

**चंपा** (तिच्यापुढे जाते. कमरेवर हात.) इकडे बघ. माझ्याशी चारसोबीसगिरी करू नको, तुला सांगते.

(लक्ष्मीला यावर काही प्रत्युत्तर करायचे आहे: पण तोंडून निघत नाही.)

धड राहिलीस तर इथं रहाशील. मी ठेवली म्हनून राहिलीस इथं. आहे ना ध्यानात ? पुन्हा त्या भडव्याला घरात पाऊल घालू देऊ नको, सांगते. नाही तर मी आहे आनिक तू आहेस. (चंपा बाहेर निघून जाते.

लक्ष्मी ती गेली त्या बाजूला पाहते. मग देवाच्या तसबिरीकडे येते.)

**लक्ष्मी** (तसबिरीला) सीताराम...सीताराम...पाहिलंस ? पाहिलंस ना ? नवऱ्याला येणं बंद करून टाकलं तिनं. त्याला आधार मिळत होता ना. सुधारला असता मी त्याला. मग तो तिला जड झाला असता. गरीब आहे बिचारा. हिनं त्याला सोडलंन. देवाब्राह्मणांसमक्ष मिळाला त्याला सोडलंन, स्वता. त्याला ती हवीच आहे. म्हणून तर येतो तो. पण तिला तो नको आहे. अडचण होते तिला त्याची. मरेल तर हवा तिला तो. साधी नाही, महा पापी आहे ती. वर मला दरडावीत होती ! काय करणार माझं ? मी पुण्यवान आहे. माझं नाणं खणखणीत आहे. मी नेहमी धर्मानं वागले आहे. माझं काय करील ती ? (आवंढा गिळते.) तिला मुळीच क्षमा करू नकोस, सांगते. फार वाईट आहे ती—

(हे ती बोलत असता क्रमशः काळोख.)

## दृश्य पाचवे

[प्रकाश येतो. रात्र.

स्वयंपाकघरात लक्ष्मी आणि चंपा.

लक्ष्मी देवाच्या तसबिरीपुढे फाटके स्तोत्र वाचत बसलेली. चंपा चुलीशी भाजी मोडीत बसली आहे.

बाहेरल्या खोलीत सखाराम चिलमीचे दम मारीत बसलेला. पलीकडे मृदंग पडला आहे. आणखी पलीकडे बिछाना.]

**सखाराम** चंपा—

**चंपा** (नाखुषीनेच) आली.

(परंतु चंपा आपले काम तसेच पुढे चालू ठेवते. लक्ष्मी तिच्याकडे एकदा पाहून स्तोत्र वाचत राहते.)

**सखाराम** चंपे, काय करतेस ?

**चंपा** भाजी मोडून ठेवते उद्यासाठी.

**सखाराम** ती उद्या मोड. झोपायला चल.

(चंपा भाजी मोडणं चालू ठेवते.

लक्ष्मीला हे सर्व जाणवते पण आता ती पाहणे टाळते.)

**सखाराम** (आवाजात हिंस्रता) चंपे—

(चंपा भाजी मोडणे थांबवून आदळआपट करून हात धुते. ओच्याला हात पुसत बाहेरल्या खोलीत येते.)

ते दार लाव मधलं आणि तो दिवा मालव. चल.

(चंपा मुद्दाम थोडा वेळ घेऊन हे करते. बिछान्याकडे जाते. स्वयंपाकघरात, स्तोत्र वाचण्यात लक्ष्मीचे आता लक्ष नाही. ते बाहेर. सखाराम बिछान्याकडे येतो. चंपा बसलेली.)

चल झोप.

(चंपा बसलेली.)

मी काय म्हणतोय.

(चंपा बसलेली.)

बहिरी झालीस का ?

(ती बसलेली. तो बळेच तिला बिछान्यात आडवी पाडतो. स्वयंपाकघरात लक्ष्मी शहारते.)

(कर्कशपणे) ए, आतला दिवा आधी मालव.

(लक्ष्मी घाईने चिमणी फुंकते. सर्व काळोख.

किंचित्काळ हे असे. विलक्षण स्तब्ध. आणि मग एकदम काही धडपड चालल्याचे आवाज

बाहेरल्या खोलीत येऊ लागतात.)

**चंपा** (हिंस्त्र स्वर) नाही...नाही...मला नको...मला नको आज...

**सखाराम** चंपे...मुकाट्यानं....

**चंपा** नाही, दूर हो आधी...तिकडे हो आधी—जा तिकडे—जा नाहीतर....

**सखाराम** (वेदनेचा एक चीत्कार) आः...तुझ्या मायला तुझ्या...दाखवतो तुला काय ते...

**चंपा** अंगाला हात लावू नको माझ्या सांगते—दूर—होतोस का नाही दूर...दूर !

(ही बाचाबाची वाढते आणि मग चंपाची गुरासारखी किंकाळी. काळोखात चंपा झटक्याने उठून बिछान्यातून बाहेर आलेली दिसते. स्वयंपाकघरात लक्ष्मीची छायाकृती ताठरून असलेली दिसते.

सखारामची छायाकृती बिछान्यातून आता उठते.)

**सखाराम** (चंपाच्या छायाकृतीकडे हिंस्त्रपणे येत) चल—कुणाला गमज्या दाखवतेस तू ग ? रस्त्यावर पडली होतीस, मी अन्नाला लावली तुला—चल आधी—चल—

**चंपा** मी गाव जमवीन तुला सांगते ! मला त्रास होतो फार.

**सखाराम** होऊ दे ! माझी इच्छा चालते या घरात. या घरात मी राजा आहे.

**चंपा** माझ्या जिवाला सहन नाही होत आता.

**सखाराम** तुझा जीव गेला झालनात. तुझ्या जिवाचे चोचले पुरवण्याकरता आणली नाही तुला घरात. चल आधी...चल पहिली—

**चंपा** (झटकून) नाही येनार. पुरुष होतास तंवर घेतला तुला अंगावर. आता नाही घेनार—

**सखाराम** चंपे...

**चंपा** हा, मला नाही सहन होत आता. दारू पिऊन पन सहन नाही होत. जमेना तर पडत जा गुमान. गेले कितीक दिवस तुला काय जमत नाही. तिकडे आत सैंपाकघरात खुट् झालं का थंड पडतोस तू. काय खोटं आहे हे ?

**सखाराम** चंपे—

**चंपा** (उसळून) अरे चंपे काय चंपे—ती आल्यापासून तू मर्द राहिला नाहीस. पुरता पावनेआठ केला तिनं तुला. हा. तिला डरतोस तू—हिंमत नाही तिच्यासमोर मला घ्यायची तुझ्यात...मढं होतं तुझं मढं—किडा होतोस तू—

**सखाराम** तोंड सांभाळ चंपे...वाईट माणूस आहे मी—

**चंपा** जा, कुनाला भीती दाखवतोस ? कुत्रं पन घाबरनार नाही आता तुला—

**सखाराम** तुझ्या मायला तुझ्या...

(तिच्या अंगावर चालून जाताना अंधुक दिसतो.

अंधारातच झटापट.

स्वयंपाकघरात लक्ष्मी ताठरून उभी. बाहेरच्या खोलीत चंपा ओरडू पाहते. तिची मुस्कटदाबी. सखारामची गुरगुर. आदळ-आपट. चंपाचे गुरासारखे कण्हणे, विव्हळणे. सखारामचे शब्द—)

पी—पी—पी आणखी—थोबाड उघड—थुंकतेस, तुझ्या मायला—पी—पितेस का नाही ? पी—चल पी—

(मग झटापट बंद. स्तब्धता. चंपाचा एक दीर्घ उसासा.

सर्व शांत. सखारामची अस्पष्ट गुरगुर.

स्वयंपाकघराच्या बंद दाराशी तळमळत उभी असलेली लक्ष्मीची आकृती.

नंतर पूर्ण काळोख.)

## दृश्य सहावे

[काळोख कमी होतो. बिछान्यातल्या चंपाचे अस्पष्ट बरळणे ऐकू येत असते. बाहेरल्या खोलीत सखाराम उठून उभा राहतो बिछान्यात. मग मधल्या दाराकडे येतो. कडी काढतो. या आवाजासरशी स्वयंपाकघरात लक्ष्मी झटक्याने चिरगुटात उठून उभी राहते. गडबडीने कशीबशी चिमणी लावते.

दारात सखाराम. किंचित्काळ दोघे तशीच. निःस्तब्ध.]

**सखाराम** (दबल्या स्वरात गुरगुरत) बाहेर हो, आधी बाहेर हो तू.

(लक्ष्मी अंगभर थरथरू लागते.)

तुझ्यामुळं पावणेआठ ठरलो मी, भिकारडे. जगात तुला कोण विचारीना म्हणून माझ्या उरावर पुन्हा येऊन बसलीस ? मेलीस का नाही त्यापेक्षा ? मी काय लागत होतो तुझं ? तू न् तुझा देवधर्म खड्ड्यात गेला असतात तर मला काय वाटलं नसतं. देवाच्या बापाचा काही लागत नाही मी. माझा मी आहे. ब्राह्मणाच्या घरात जन्मलेला म्हारड्याचा पोर आहे मी. का इथं पुन्हा आलीस तू ? का इथं राहिलीस ? आत्ताच्या आत्ता तू बाहेर हो ! उचल ती तसबीर. उचल सगळं ते. उचल तुझं सामानाचं बोचकं. नाही तर मी आणून देईन कुठं असशील तिथं, पण आधी नीघ इथून पहिली तू. चले जाव. मी काय म्हणतोय ऐकतेस ना ? काय ?

**लक्ष्मी** (कशीबशी) सकाळी तर...

**सखाराम** नाही, आत्ता, या मिण्टाला. मला माझ्या पद्धतीनंच जगायचं आहे. तू न् तुझा तो देव त्यात काय म्हणून ? काय म्हणून सांग ! उचल म्हणतो ना तसबीर. का घालू लाथ.

(लक्ष्मी गडबडीनं तसबीर उचलून उराशी घट्ट धरते.)

**लक्ष्मी** देवाला का...

**सखाराम** मग माझ्या घरात कशाला तो ? तुला भिकारडं बनवून, तुझ्या पदराखालून माझ्या

घरात शिरला !

**लक्ष्मी** असं बोलू नये...

**सखाराम** जा, मी घाबरत नाही त्याला ! साफ जगलोय मी—माझ्या परिस्थितीत माझ्या अक्कलहुषारीनं आणि मर्जीनं कुणाला न फसवता जगलोय मी. आपण कुणालाच भीत नाही, देवालासुद्धा नाही. आधी इथून चल तू—बाहेर नीघ—

**लक्ष्मी** (दुसरा मार्ग नाही हे कळून थरथरत्या हाताने आपले सामान गोळा करू लागते.) सकाळी...गेले असते....(सखारामचा उग्र पवित्रा पाहून घाबरून) नाही नाही...जाते, आता जाते.

(सर्व गोळा करते. त्याच्या बाजूला येते. एकदम त्याच्या पायांशी वाकू पाहते.)

**सखाराम** (लाथ घालून) बाहेर !

(लक्ष्मी मनस्वी थरथरते आहे.

विलक्षण केविलवाणी वाटते.

अंग चोरून बाहेर खोलीत येते. दाराकडे जाते.

मागोमाग सखाराम.)

(पुन्हा पायांशी वाकू पाहणाऱ्या लक्ष्मीला, मागे होत) नाही ! माझा संबंध नाही. लाथ घालीन पोटात. रक्त ओकशील !

(लक्ष्मी थरथरत्या हाताने दार उघडू लागते. थांबते.)

**लक्ष्मी** (कुठून तरी एक बळ आले आहे. मरण दिसणाऱ्या जनावराचे बळ.) मी जाते...पण एक सांगायचं आहे...

**सखाराम** काही नकोस सांगू—

**लक्ष्मी** माझ्या नव्हे, तुमच्या फायद्याचं...

**सखाराम** ऐकायचं नाही मला.

**लक्ष्मी** मी...मी थांबणार नाही...सांगून लगेच जाईन...तुमच्याच फायद्याचं...

**सखाराम** (जरा वेळ घेऊन) बोल काय आहे...

**लक्ष्मी** (बेहोष चंपाकडे बोट दाखवून) ती—ती—बरी नाही...बरी नाही ती—

**सखाराम** ते मी बघून घेईन...

**लक्ष्मी** तुम्हांला फसवते ती—फसवते ती तुम्हांला—

**सखाराम** तुझ्याकडून ऐकायचं नाही मला ते—नीघ—

**लक्ष्मी** ती—ती त्या मुसलमानाशी—जाते, रोज...

(किंचित्काळ तंग स्तब्धता.)

**सखाराम** काय ? मुसलमानाशी ? कोण मुसलमान ? कुठला मुसलमान ?—

**लक्ष्मी** दाऊद...दाऊदशी...

**सखाराम** (पुढे होऊन तिच्या मुस्कटात भडकावतो.) थोबाड फोडीन !

**लक्ष्मी** मी पाहिलं—या डोळ्यांनी...देवाची शपथ घेईन...

(सखाराम लक्ष्मीवर वाघासारखा तुटून पडतो. तिला मार मार मारतो. लक्ष्मीचा लोळागोळा. चंपाचे बेहोष, अस्पष्ट बरळणे.)

**चंपा** (अस्पष्ट) दूर हो मुडद्या—दूर हो तू—पावनेआठ झालास तू—मला त्रास होतो—

(चंपा वेदनेने कण्हावी तशी कण्हते गुरासारखी.)

**सखाराम** (लक्ष्मीला आणखी एक दणका मारून) हूं !(मग सणकेने तिचा लोळागोळा उठवून बसवीत.) बोल आता पुन्हा ! परतून ते बोल—

**लक्ष्मी** (त्याही स्थितीत) खरं आहे—खरं आहे,—ही जीभ खोटं कधीच बोललेली नाही—तुम्हांला ती फसवते—होय, दाऊदशी ती—दुपारची—तुम्ही प्रेसवर असताना—मी पाहिलंय डोळ्यांनी—या डोळ्यांनी पाहिलंय—

(सखाराम तिला विलक्षण त्वेषाने बाजूला ढकलून दारावाटे बाहेर निघून जातो तीरासारखा. लक्ष्मीचे कण्हणे.

चंपाचे बेहोष पाशवी बरळणे. लांबवर कुत्र्याचे भुंकणे.

काळोख.)

## दृश्य सातवे

[काळाख कमी होतो.

लक्ष्मी भिंतीला टेकून निश्चल बसलेली. पुढे तसबीर मांडलेली लक्ष्मी कण्हते आहे थोडीथोडी. सखाराम दारावाटे बाहेरून येतो. दार लावून घेतो. लक्ष्मीकडे पाहतो. तिला एक लाथ घालतो. ती वेदनेने विव्हळते. सखाराम तडक चंपाच्या बिछान्याशी जातो. उभा राहतो पाहत. झटक्याने खाली बसतो आणि गुरगुरत चंपाच्या गळ्याशी झटतो. तिचे गुदमरले, अस्पष्ट आवाज. नंतर ते मंद. तरीही सखाराम पुन्हा पुन्हा चंपाचा गळा आवळतोच आहे.

मग निश्चेष्ट चंपाकडे पाहत राहतो काही क्षण, गोठल्यासारखा.]

**सखाराम** (शहारत एकदम अस्पष्ट) खून...(स्पष्ट) खून !...(अस्पष्ट) खून !...

(लक्ष्मी बसल्या जागी ताठरते.)

खून....खून.....

(लक्ष्मी आवेगाने खुरडत चंपा आणि सखारामच्या दिशेने येते. पाहत राहते ताठरून पुढ्यातल्या सखारामकडे. बाजूच्या आडव्या चंपाकडे.)

**सखाराम** (घाबरलेला) खून...खून केला मी...खून...खून केला....

**लक्ष्मी** (एकदम एका बळाने) श्शू...ओरडू नका. मुळीच !

(पुन्हा पाहत राहते निश्चेष्ट चंपाकडे.)

नाही तरी पापीच होती ती. नरकात जाईल. तुम्ही नाही जाणार. माझं पुण्य आहे. भरपूर आहे. मी राहीन तुमच्याबरोबर. तुमचं सगळं करीन मी. तुम्ही म्हणाल ते करीन. तुमच्या मांडीवर मरण येणार आहे मला. हूं...तुम्ही घाबरू नका. आपण—आपण हिला—पुरू या. कुठं ? बाहेर नको—बाहेर नको, इथं—घरातच. हूं.निघून गेली म्हणून सांगू. कोण नाही विचारणार. मी सांगेन. स्वता गेली म्हणून. मी ईश्वरसाक्ष सांगेन. त्याला सगळं ठाऊक आहे. मी चांगली आहे ते त्याला ठाऊक आहे. तो माझ्यामागं आहे. तो तुम्हांला पाप लावणार नाही. माझं पुण्य त्याला तुम्हांला द्यायला सांगेन मी. तुमचं सगळं करीन मी—हूं...

(गडबडीने जवळची तसबीर स्वतःच्या कपाळावर टेकते. त्याच्याही कपाळावर टेकते. तो निश्चल. मग तसबीर खाली ठेवून पुन्हा पुन्हा नाक घासते. डोळे मिटून प्रार्थना करते.)

(डोळे उघडून) चला—चला आता. कामाला लागू या. तुम्ही बागेतली कुदळ आणा. मी स्वैंपाकघरातली जागा मोकळी करते. उशीर नका लावू. उजाडलं की संपेल. रात्री सगळीकडे देवाचं राज्य असतं. दिवसा माणसांचं असतं. माणसं पापी असतात. माणसं दुष्ट आणि नीच असतात. हिच्यासारखी. उजाडायच्या आत आपण संपवू सगळं. यानं मला आशीर्वाद दिला आहे. (तसबीरकडे बोट.) चला. उठा ना. वेळ नका लावू. घाबरू नका, मी पुण्यवान आहे. ती मुळी पापीच होती ! मी कुणाला वाईट नाही वागवलं.कीड-मुंगीलासुद्धा नाही. (मंगळसूत्र काढून दाखवून) हे बघा—बघा—तुमच्या नावानं बांधलं हे आजपर्यंत. आधीचं बांधणारानं स्वतःच तोडून टाकलं, मी नाही तोडलं. लग्नाच्या नवऱ्याला तिनं लाथाडलंन, तुमच्याशी खोटी वागली. तिचं कधीच बरं होणार नव्हतं. तुम्ही चांगले आहात. देव तुम्हांला क्षमा करील. मी सांगेन. माझं ऐकतो तो. थांबा, मीच आणते कुदळ. तुम्ही बसा—आले मी...

(खुरडत लंगडत बाहेर काळोखात जाते एका विलक्षण धैर्यानं. कुदळ घेऊन येते. सखारामच्या हाती देते.)

धरा,घ्या—चला,स्वैंपाकघरात चला—

(सखाराम निश्चेष्ट चंपाकडे डोळे फाडून बघतो आहे.

लक्ष्मी उठते. पलीकडचे पांघरूण घेते. चंपाच्या चेहऱ्यापर्यंत पसरते.)

झालं ना ? आता नाही कुलटा दिसणार. आत्मा नरकात पोचलासुद्धा असेल एव्हाना. देवाला निवाडा करायला काय वेळ. (चंपाच्या देहाकडे पाहून तुच्छतेने) पापी !

(त्याला धरून) उठा आधी. आत चला. पहाट व्हायच्या आत पुन्हा पहिल्यासारखं व्हायला हवं सगळं. कुणाला कळणार नाही मग. मी सांगेन सर्वांना निघून गेली म्हणून. हूं...

(सखाराम आता पुतळ्यासारखा उठतो. लक्ष्मी त्याला स्वयंपाकघरात नेते. कुदळ देते.)

हूं. घ्या ही. खणा.

(सखाराम निश्चल उभा.)

खणा. खणा ना—

(सखाराम तसाच. कृश लक्ष्मी कुदळ उचलून आता बळ एकवटून स्वतः खड्डा खणू लागते. एकेक घाव पडू लागतो. लक्ष्मीचा एकेक हुंकार. आणि दारावर अचानक थापा पडू लागतात. सखाराम मनस्वी गडबडलेला. केविलवाणा. लक्ष्मी ताठरून उभी, ऐकत.)

**चंपाचा नवरा** (बाहेरून एकीकडे दार वाजवीत तर्र स्वरात) चंपा—चंपे—चंपा—तू कुठायस—मला मारून टाक ना चंपे. चंपा, दार उघड ना चंपा. मी आलोय, मला मार ना चंपा. मला मार ना. चंपा...चंपे गऽ—

**लक्ष्मी** (गडबडलेल्या सखारामला) तोच...तिचा नवरा. वाजवील आणि जाईल थोड्या वेळानं. तुम्ही स्वस्थ रहा.

(पुन्हा सर्व बळ एकवटून खणू लागते. आता एका वेगाने. तिच्या कुदळीचे एकामागून एक घाव. त्याबरोबर तिचे दबले हुंकार.

बाहेरल्या दारावर थापा. चंपाच्या नवऱ्याच्या क्षीण होत जाणाऱ्या हाका :

"चंपा—चंपे ग...कुठे आहेस चंपेऽऽऽ—मला मारून टाक ना—मी आलोय...दार उघड चंपे...चंपे गऽऽऽ..."

निर्जीव सखाराम लक्ष्मीशेजारी उभा. सत्त्व कोणी शोषून घेऊन चोथा उरावा तसा उरलेला.

बाहेरल्या खोलीत डोक्यापर्यंत पांघरूण घातलेला चंपाचा निश्चल देह दिसतो.

दाराबाहेर चंपाच्या नवऱ्याचे तिच्या नावाने अभद्र भेकणे आता सुरू होते, भेसूर, क्षीण, एकसुरी. ते चालू राहते.

बाकी रात्र. पडदा.)


बालनाट्य

**राजा-राणीला घाम हवा**

'मुलांसाठी तीन नाटिका', १९७२

# राजा-राणीला घाम हवा

**म्होरक्या** (ढोलके बडवून)
ऐका हो ऐका...पैशाला
दोन खारका...आम्ही बंबपूरचे
राहणार...सुप्रसिद्ध गोष्टी
सांगणार...थापा म्हणून शिद्ध
करतील त्यांना दोन टप्पू
मिळतील. आमच्या गोष्टी एकदम
खऱ्या...नाऱ्याच्या शेंडीपासून मारुती
न्हाव्याच्या धोकटीपर्यंत बऱ्या...ऐकून
कान लांब होतील...डोक्यास केंस
फुटतील ...केसांत डोकी पिकतील...
पिकात बैल घुसतील आणि बैलांवर
कावळे बसतील. कावळ्यांनी घेतला
झोका आणि आमची गोष्ट आता
सुरू होणार ऐका !
(ढोलके बडवतो.
आतून राजा आणि राणी येतात नाचत.
दोघांच्या पायांत चाळ. मागून सेवक. तेही नाचतच येतात.) आपण कोण ?



**राजा** (नाचत) आम्ही द्रोण.

**म्होरक्या** दह्याचे द्रोण की तुपाचे द्रोण ?

**राजा** महाराजाधिराज द्रोण.

**म्होरक्या** या कोण ?

**राणी** (नाचत) आम्ही पत्रावळ.

**म्होरक्या** डोहाळेजेवणाची का गावभोजनाची ?

**राणी** महाराणी पत्रावळ या राज्याची.

**म्होरक्या** (ढोलके बडवून)
हे द्रोण आणि या पत्रावळ.
या राज्याची राजे-राणी.
वाड्यात यांच्या पैशाच्या गोणी.
रोज खातात लोणी. आणि गातात गाणी.
यांची मजा...रोजच यांना रजा...
अहो पत्रावळबाई...

**राणी** आम्हांला आहे घाई...दूर व्हा बाई...आम्ही चाललो कामाला.

**म्होरक्या** कामाला ? कसलं काम ?

**राणी** मिळाला तर बघायचा आहे कुठं थोडा घाम.

**म्होरक्या** घाम ? घाम तर अंगावर फुटतो...कष्ट करून तो सुटतो.

**राजा** (किंचाळत) कष्ट ! कोण तो कष्ट करायला सांगून आमचा अपमान करतो आहे दुष्ट ? आम्ही राजे ! महाराजाधिराज द्रोण !

**राणी** (नाचत) आम्ही राणी...महाराणी पत्रावळ.
घाम ! मिळेल का कुठे थोडा घाम ?

**राजा** (नाचत) घाम...घाम...



**सेवक** घाम...घाम...घाम...

(सगळे नाचत आत जातात.)

**म्होरक्या** (ढोलक्यावर थाप मारून) राजे-राणी निघाली घाम शोधायला...घाम शोधायला...घाम शोधायला...

(एक भटजी येतो.)

**भटजी** (नाकात बोलत) का हो, कशासाठी ?



**म्होरक्या** तुम्ही हो कोण ? काय करता ?

**भटजी** आम्ही चकोट भट...चालली आहे खटपट... अशीच आमच्या हिचे कुठे जुळवण्याची !

**म्होरक्या** 'हि'चे ?

**भटजी** हाँ...हाँ...हिचे म्हणजे म्हशीचे !

**म्होरक्या** म्हशीचे काय ?

**भटजी** लग्न !

**म्होरक्या** लग्नाचे काय ?

**भटजी** वऱ्हाड...

**म्होरक्या** वऱ्हाडाचे ?

**भटजी** बिऱ्हाड...

**म्होरक्या** आणि बिऱ्हाडाची ?

**भटजी** बायको. तीच आमची ! बरी आठवण केलीत... तिनेच पिच्छा पुरवला आहे बघा आमचा...आपली मंगळाई वयात आली...लग्नाचे कुठे जुळवा...कुठे आहे काय एखादे स्थळ ?

**म्होरक्या** स्थळ ?

**भटजी** हो ! म्हणजे हुंडासुद्धा देऊ...सहा पडवळ.

**म्होरक्या** नवरा कसा हवा ?

**भटजी** उजवा...

**म्होरक्या** जाडा की बारका ? कापा की बरका ?

**भटजी** आमच्यासारखा...

**म्होरक्या** तुमच्यासारखा ?

**भटजी** तुमच्यासारखा चालेल...कळकट—बळकट—थोडा खुळचट आणि पुळचट...बाकी शिंगे, शेपूट, खूर मोट ओढण्यास उपयोगी.

**म्होरक्या** शिंगे ? शेपटी ? खूर ? आम्ही काय आहोत रेडा ?

**भटजी** भलतेच ! वेडा...पण काय म्हणत होतो...कशाकरता ?

**म्होरक्या** काय कशाकरता ?

**भटजी** घाम.

**म्होरक्या** कुणाचा ?

**भटजी** राजाधिराज द्रोण आणि महाराणी पत्रावळ यांना हवा होता नव्हे काय ? ती काय शोधत गेली...

**म्होरक्या** (ढोलके बडवून सुरावर) शोधत गेली...शोधत गेली...शोधत गेली...

**भटजी** गेली...ती तिकडे लां...ब गेली. दिसेनाशी झाली.

**म्होरक्या** होऊ देत. राजाराणीला घाम हवा ! कशाकरता ?

(राजवैद्य ढोलकीच्या कडकडाटात स्टेजवर येऊन पडतो—उताणा.)

**म्होरक्या** (त्याला) कशाकरता ?

**भटजी** कशा करता ?

(भटजी राजवैद्याला उठवतो—बकोट पकडून.)

**राजवैद्य** सुखकर्ता दुखकर्ता वार्ता विघ्नाची—कुठून आली वार्ता विघ्नाची—आगीची, व्याधीची, रोगाची, राईची, दुखण्याची, खुपण्याची...कुठून आली ? कुठून ? इकडून ? की इकडून ?



**म्होरक्या** आपण वैद्य ?

**राजवैद्य** हां—हां. जपून बोला. आम्ही राजवैद्य !

**म्होरक्या** शुद्ध वैद्य का वद्य वैद्य ? अथर्ववैद्य का ऋग्वैद्य ?

**राजवैद्य** आम्ही राजाचे वैद्य... राजवैद्य !

**म्होरक्या** (ढोलके बडवून) हे राजाचे वैद्य... वैद्यांचे राजे...वैद्यराज...

**राजवैद्य** बघू, 'आ' करा 'आ'—

**म्होरक्या** राजा-राणीला घाम हवा—

('आ' केलेला.)

**राजवैद्य** कोणता दुखतो ? डावा की उजवा ? वरचा की खालचा ? आता जरा पोट पाहू ?

**म्होरक्या** आम्ही निरोगी ! एक शंका विचारण्याजोगी... राजा-राणीला घाम हवा...

**भटजी** हो—हो, राजा-राणीला घाम हवा...ती काय गेली...शोधत गेली, लांब गेली...दिसेनाशी झाली.

**म्होरक्या** घाम हवा पण कशाकरता हवा ?

**भटजी** शिंचा कशाकरता हवा ?

**राजवैद्य** घाम ?

**दोघे** घाम...

**राजवैद्य** हवा ?

**दोघे** हवा.

**राजवैद्य** कशाकरता ?

**दोघे** कशाकरता ?

**राजवैद्य** (दोघांना तालात जवळ बोलावून) असे या—इथे या—इकडे या—तिकडे या—घाम ऊं ?

**दोघे** हो घाम—हो घाम...

**राजवैद्य** (मान लांब—उंच करीत—इकडेतिकडे टेहळणी करीत) तिकडे कोण ? इकडे कोण ? ते काय ? हे काय ? हां...आता कोणी ऐकत नाही ? शपथ घ्या, कुणाला सांगणार नाही !

**दोघे** शपथ—शपथ—शपथ !

**राजवैद्य** राजाराणी वैभवात पण सुख नाही नशिबात. सगळा ऐषआराम पण कशात नाही राम ! ते कोण ? तिकडे कोण ? एकदम आळीमिळी, बोलेल तो माती गिळी ! तर राजाला वाढतात पंचपक्वान्नं; पण झोप येत नाही, अन्न जात नाही...दिवस मिटल्या तोंडांनी, रात्री उघड्या डोळ्यांनी जाताहेत. राजा-राणीला सुख नाही !

**म्होरक्या** (ढोलके बडवून) राजा-राणीला सुख नाही—सुख नाही—सुख नाही—

**राजवैद्य** सुख नाही, बाळाचे मुख नाही ! म्हणून दिली आहे मात्रा...वळसे सतरा...माणसाच्या घामात उगाळून घ्यायचे. आहे रामबाण...अस्सल वाण...गुणवान. पण हवा माणसाचाच घाम...कष्टाचा !

**तिघे** (ढोलकीच्या तालावर नाचत—) घाम करी काम—राजा करी सलाम—माणसाचा घाम—कष्टाचा घाम—राजा-राणीला घाम हवा, घाम हवा, घाम हवा. राजा-राणीला घाम हवा, राजा-राणीला घाम हवा. (असे गात नाचत नाचत ढोलकीच्या तालावर आत जातात. जाताना—) पुंडलीक वरदा हारि विठ्ठल. (शेठिया येतो.)

**शेठिया** आम्ही शेठिया...आमचे नाव जगजेठिया. आमची पेढी...पेढीला सोन्याच्या मेढी...ईशरक्रिपेने आमच्या वाड्याला सात मजले...सातव्यात सोना...सहाव्यात मोती...पाचव्यात पाचू...चौथ्यात चांदी...तिसऱ्यात काळा पैसा...दुसऱ्यात आमची बायडी आणि एकदम तळच्या मजल्यात आम्ही ऱ्हातो.

**भटजी** (घाईने येऊन एकदम) कशा करता ?

**शेठिया** काय, कशाकरता ?

**भटजी** म्हणजे लबाड्या कशा करता ?



**शेठिया** कोण करतो लबाड्या ? आमच्या बापजाद्यांच्या माड्या...आमची दौलत हाय... कोण करतो लबाड्या ? कष्टाचा पैसा हाय.

**भटजी** कष्टाचा ?

**शेठिया** घामाचा !

**भटजी** (उडी मारून) आलोच !

(आत धावत जातो.)

(ढोलक्या झांजांच्या तालावर पुढे भटजी— मागोमाग राजा-राणी. मागून सेवक नाचत येतात.)

**शेठिया** (भटजीला) कोण ?

**राजा-राणी** कपाळावरचा, कष्टाचा ! माणसाचा, खरा, आत्ता, इथे, लगेच...

(थयथय नाचत राहतात.)

कुठे आहे ऽ ऽ ऽ ? कसा आहे ? किती आहे ? (त्याला चौफेर पाहतात. शेठिया गोंधळलेला. तसा वळतो गरगर.)

**शेठिया** अरे पण काय हवा काय ?

**सगळी** घाम !

**शेठिया** घाम ?

**सगळी** माणसाचा घाम !

**शेठिया** माणसाचा घाम ?

**सगळी** कष्टाचा घाम !

**शेठिया** घामाचं काय ?

**सगळी** पैसा—तुम्हीच मघा म्हणाला तैसा...पैसा ठेवा तुम्हांला नि घाम द्या आम्हांला...राजा-राणीला...

**राजा-राणी** (थयथय नाचत) घाम—घाम—घाम...घाम...

**शेठिया** (गडबडलेला) तसला घाम तर नसते आमच्याकडे...घाम तर कधी येतेच नाय आमाला...अरे, काय मागा डागडागिना सोना-चांदीचा—रुपे-मोतीचा...

**राजा-राणी** नको ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

**शेठिया** हिरेमाणकाचा-पाचूरत्नाचा—

**राजा-राणी** नको ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

**राजा-राणी** (एकदम थयथय नाचत) घाम—घाम—घाम—घाम—(शेठिया घाबरून पळून जातो. राजा-राणी, सेवक नाचत आत जातात. फक्त भटजी उरतो. एक शेतकरी दोन बैल हाकीत येतो. ही बैलाच्या झुलींमधली मुलेच.)

**भटजी** (बैलांना) आपण कोण ?

**पहिला बैल** आम्ही गणपतराव.

**भटजी** आपण ?

**दुसरा बैल** आम्ही शिरपतराव.

**भटजी** (शेतकऱ्याला) आपण ?

**शेतकरी** येडपटराव...रामराम...

**भटजी** काय काढले काम ?

**शेतकरी** काम ? कोण करतोय काम ? आमी चालतो बाजारला...माजा बा आजारला...डाक्टरचा भाव वधारला...पैका हवा म्हणून चालतो बाजारला...

**भटजी** बाजारात जाऊन काय करणार ?

**शेतकरी** यातला बैल विकणार...

**भटजी** कोणता ?

**शेतकरी** विकू कोणता पण ! दोन्हीही विकू !

**भटजी** शेत कोण नांगरील ?

**शेतकरी** शेत विकू...



**शेठिया** काय, कशाकरता ?

**भटजी** म्हणजे लबाड्या कशा करता ?

**शेठिया** कोण करतो लबाड्या ? आमच्या बापजाद्यांच्या माड्या...आमची दौलत हाय... कोण करतो लबाड्या ? कष्टाचा पैसा हाय.



**भटजी** कष्टाचा ?

**शेठिया** घामाचा !

**भटजी** (उडी मारून) आलोच !

(आत धावत जातो.)

(ढोलक्या झांजांच्या तालावर पुढे भटजी—मागोमाग राजा-राणी. मागून सेवक नाचत येतात.)

**शेठिया** (भटजीला) कोण ?

**राजा-राणी** कपाळावरचा, कष्टाचा ! माणसाचा, खरा, आत्ता, इथे, लगेच...

(थयथय नाचत राहतात.)

कुठे आहे ऽ ऽ ऽ ? कसा आहे ? किती आहे ? (त्याला चौफेर पाहतात. शेठिया गोंधळलेला. तसा वळतो गरगर.)

**शेठिया** अरे पण काय हवा काय ?

**सगळी** घाम !

**शेठिया** घाम ?

**सगळी** माणसाचा घाम !

**शेठिया** माणसाचा घाम ?

**सगळी** कष्टाचा घाम !

**शेठिया** घामाचं काय ?

**सगळी** पैसा—तुम्हीच मघा म्हणाला तैसा...पैसा ठेवा तुम्हांला नि घाम द्या आम्हांला...राजा-राणीला...

**राजा-राणी** (थयथय नाचत) घाम—घाम—घाम...घाम...

**शेठिया** (गडबडलेला) तसला घाम तर नसते आमच्याकडे...घाम तर कधी येतेच नाय आमाला...अरे, काय मागा डागडागिना सोना-चांदीचा—रुपे-मोतीचा...

**राजा-राणी** नको ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

**शेठिया** हिरेमाणकाचा-पाचूरत्नाचा—

**राजा-राणी** नको ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

**राजा-राणी** (एकदम थयथय नाचत) घाम—घाम—घाम—घाम— (शेठिया घाबरून पळून जातो. राजा-राणी, सेवक नाचत आत जातात. फक्त भटजी उरतो. एक शेतकरी दोन बैल हाकीत येतो. ही बैलाच्या झुलींमधली मुलेच.)

**भटजी** (बैलांना) आपण कोण ?

**पहिला बैल** आम्ही गणपतराव.

**भटजी** आपण ?

**दुसरा बैल** आम्ही शिरपतराव.

**भटजी** (शेतकऱ्याला) आपण ?

**शेतकरी** येडपटराव...रामराम...

**भटजी** काय काढले काम ?

**शेतकरी** काम ? कोण करतोय काम ? आमी चाललो बाजारला...माजा बा आजारला...डाक्टरचा भाव वधारला...पैका हवा म्हणून चाललो बाजारला...

**भटजी** बाजारात जाऊन काय करणार ?

**शेतकरी** यातला बैल विकणार...

**भटजी** कोणता ?

**शेतकरी** विकू कोणता पण ! दोन्हीही विकू !

**भटजी** शेत कोण नांगरील ?

**शेतकरी** शेत विकू...



**भटजी** नांगर काय नांगरील ?

**भटजी** नांगर विकू...

**भटजी** बा काय खाईल ?

**शेतकरी** बा विकू...

**भटजी** आई कोणाबरोबर राहील ?

**शेतकरी** आई विकू...

**भटजी** अरे रांडेच्या ! मग घरात रे कोण ?

**शेतकरी** घर विकू...घर बसून खातं...आय बसून खाते...बाप बसून खातो...

**भटजी** आणि तू ?

**शेतकरी** मी बी बसून खातो...आमी सम्दे बसूनच खातो...

**भटजी** खायला रे कोण देतं ?

**शेतकरी** शेत देतं...

**भटजी** पण शेतात कोण राबतं ?

**शेतकरी** मानसं...आपून लावतो कामाला. ती कामं करतात. आमी बसून खातोय.

**भटजी** या माणसांना घाम येत नसेल नव्हे रे ?

**शेतकरी** तर ! कष्ट करतोय त्याला घाम येतोयच !

**भटजी** मग शिंच्या, आधी सांग...ही माणसं भेटतात तरी कुठं ?

**शेतकरी** शेतात नव्हं ? पर मानसं गेली पळून...शेत जाळून. आमी त्यान्ला पैसे दिले नाहीत म्हनून...नवी मानसं मिळत नाहीत...शेत काही पिकत नाही...बा आजारला...त्यात डॉक्टर वधारला...पैका हवा म्हणून चालली बाजारला...चला गणपतराव...चला शिरपतराव...हो—हो—हो...हाइक्...

(शेतकरी बैलांसह जातो. मागोमाग भटजी जातो डोके खाजवीत. ढोलकीवाला साथीदारांसह घोषणा देत प्रवेश करतो. बरोबर वैद्य व भटजी. तेवढ्यात संपवाला प्रवेश करतो. झिंदाबादच्या घोषणा.)



**राजवैद्य** (पुढे होऊन) आपण कोण ? आम्हांला कळेल काय ?

**कामगार** आम्ही ? आम्ही संपतराव...

**राजवैद्य** आपल्या बापाचे नाव काय ?

**कामगार** संपाजी...

**राजवैद्य** आपले आडनाव काय जी ?

**कामगार** संपवाले...

**म्होरक्या** (ढोलकीवर थाप मारून) भले—भले—भले—भले...हे संपत संपाजी संपवाले...

**राजवैद्य** आपण काय करता ?

**कामगार** संप !

**राजवैद्य** लेता काय ?

**कामगार** संप !

**राजवैद्य** खाता काय ?

**कामगार** संप...

**राजवैद्य** पिता काय ?

**कामगार** संप—संप—आम्ही जगत नाही...आम्ही संपतो...आम्ही चालत जात नाही...संपत जातो...आम्ही श्वास घेत नसतो...संप घेत असतो...संप सोडत असतो...आम्ही (ओरडत) मुर्दाबाद झिंदाबाद संपवाले ! आमच्या रक्तावर आणि घामावर पैसेवाल्यांच्या इमल्या उभ्या राहतात. आमच्याच घामावर आणि रक्तावर त्यांच्या गाड्या धावतात.

**राजा-राणी** घा ऽ ऽ ऽ ऽ म...घा ऽ ऽ ऽ ऽ म...

**म्होरक्या व साथीदार** (ढोलकीवर) राजा-राणीला हो घाम भेटऽला...
राजा-राणीला हो घाम भेटऽला...

**राजा** (हे सर्व होऽ होऽ करून थांबवून कामगाराकडे पाहत) कोण आहे तिकडे... ? याला अटक करा... !

(साथीदार येऊन कामगाराला धरतात.)

**म्होरक्या व साथीदार** राजा-राणीला हो घाम
मिळाला—राजा-राणीला हो घाम भेटला—

**राजा** (अल्लडुर्र नाटकातल्या राक्षसाच्या पद्धतीने हे थांबवून, अंगात आल्यासारखा)
संपवाल्या, मुकाट्यानं घाम दाखव कुठं मिळतो ! घाम दाखव नाही तर मरण्यास सिद्ध हो ! घाम दिल्याशिवाय तुझी धडगत नाही...उगारा रे तलवारी—

(साथीदार तलवारी उगारून उभे.)

**म्होरक्या व साथीदार** (दबल्या स्वरात)
राजा-राणीला हो घाम भेटऽला...
राजा राणीला हो घाम मिळाला.

**राजा** (विकट हसून) कुठं आहे घाम ?



घाम ! घाम !!

**कामगार** (थरथर कापत) द—द—दक्षिणेकडे महाराजा...

**राजा** चला तर दक्षिणेकडे...जर का घाम मिळाला नाही तर तुला फाशी नक्की !

(वरातीप्रमाणे सगळे गोल गोल फिरून एका जागी थांबतात.)

**म्होरक्या** (ढोलकीवर) दक्षिण आली.

**राजा** कुठं आहे घाम ?

**म्होरक्या** (ढोलकीवर) सरोवर आले.

**राजा** हाच घाम काय ?




**राजवैद्य** नाही महाराजा...हे सरोवर. पृथ्वीच्या अंगावर असते ते सरोवर आणि माणसाच्या अंगावर असतो तो घाम, महाराजा...

**राजा** (ओरडत) मग घाम कुठं आहे ?

**कामगार** उ—उ—उत्तरेकडे महाराजा...

**राजा** चला तर मग उत्तरेकडे...

(राजा-राणी–सेवक आत जातात.)

**म्होरक्या** पूर्वा झाली, दक्षिणा झाली, अहो अग्नेया झाली, ईशान्या झाली... (ढोलकीवर) उत्तर आली...

**साथीदार** आली ?

**म्होरक्या** नदी आली...

**साथीदार** आली ?

**म्होरक्या** गावे आली...

**साथीदार** आली ?

**म्होरक्या** काम कोणी करीना...

**साथीदार** करीना...

**म्होरक्या** घाम काही गळेना...



**साथीदार** गळेना ऽ ऽ ऽ ऽ

**म्होरक्या** (ताला-सुरात)

राज्यात कोणी कष्ट करीना हो कोणी काम करीना

शेते पिकेनात । गुरे जगेनात

घरे भरेनात । दारे खुलेनात

कारखाने, दुकाने, मकाने चालेनात.

**म्होरक्या व साथीदार** का चालेनात...का चालेनात ?

(सहा वेगवेगळ्या पेशांचा पोषाख केलेली पात्रे डोळ्यांना झापडे बांधून दोरीवर कसरत करीत चालल्यासारखी येतात.)

**पहिला** हळू ओरडा, जग पाडाल.

**म्होरक्या** जग कुठं पडेल...जग तर विशाल.

**पहिला** समजा खुशाल...जग पायापुरते...जग समोर दिसते तितकेच असते... (समोर दोन्ही हात करून) जग एवढे...दोन हातांत मावेल तेवढे...सांभाळा—पडेल !

**म्होरक्या** सांभाळले...पण अहो भोलेनाथ, शेते का पिकेनात ? गुरे का जगेनात ? कारखाने, दुकाने, मकाने का चालेनात ?

**पहिला** चालतात की...

**म्होरक्या** कुठे चालतात ?

**दुसरा** मग नसतील चालत...

**म्होरक्या** कशावरून चालत नसतील ?

**तिसरा** मग चालत असतील...आम्हांला नाही बातमी, नाही बितमी; नाही वर्दी, नाही सर्दी. आमचे आम्ही. आम्ही आमच्यापुरते. आम्ही चालतो, जग चालते. आमच्यापुढे तर जग सरते, आमच्या मागून जग फिरते—हा, असे मागे राहा...नाही तर जाल पाताळात...

**म्होरक्या** पण इथे तर जमीन आहे...

**पहिला** कशी असेल ? आमच्याखालून जमीन चालते...दोन बाजूने पाताळ उरते...म्हणून आम्हांला जपून चालावे लागते.

**प्रत्येकजण** जपून चालावे लागते...

**म्होरक्या** आणि मग काम कोण करते ?

**सगळे** (प्रत्येकाला मागे विचारतात) कोण करते ? कोण करते ?

**म्होरक्या** घाम कोण गाळते ?

**सगळे** (पुन्हा तसेच मागे उलट विचारतात) कोण गाळते ? कोण गाळते ?

**राजा** (येतो.) शेते कोण नांगरते ? कारखाने को चालवते ? दुकाने, मकाने कोण चालवते ?

**सगळे** (ओळीत उभे—क्रमाने एकेकजण मागे बोट दाखवतो.) मागे विचारा, मागे विचारा...

(राजावर पाळी)

**राजा** (संतापाने) अर मागे काय विचारा ?

**सगळे** (उलट) पुढे विचारा, पुढे विचारा, पुढे विचारा... (पुन्हा राजावर पाळी येते.)

**राजा** (ओरडून) बास ! बास !

**म्होरक्या** बास तर बास ! चौकशी खलास...आधीच उल्हास...त्यात फाल्गुन मास...

('पुंडलीक वरदा हारि विठ्ठल'चा गजर होतो. झापडवाले जातात.)

**राजा** हे कोण ?

**म्होरक्या** आपलीच प्रजा, महाराज द्रोण...

**राजा** (वैतागलेला) या राज्यात काम कोणीच करेनात !

**साथीदार** काम कोणी करेना...

**राजा** म्हणून घाम गळेना...

**म्होरक्या** (तालात) काम कोणी करेना.

घाम काही गळेना.

राजा राजवाड्यात पोहोचला.

राजा शिर धरुनी बैसला.

(काही सेवक सिंहासन आणून ठेवतात. त्यावर राजा-राणी बसतात.)

**म्होरक्या** बाजूला राणी

उदास-वाणी

अंधार—अंधार—

राणीच्या डोळियांतून

पाण्याची संतत धार !

**राजा** फाशीचा खांब रोवा. (सेवक तालामध्ये फाशीचा खांब आणून उभा करतात.)

**म्होरक्या** फाशीचा खांब रोवणार आणि राज्याचा खाबूपणा संपत संपाजीला भोवणार...संपत संपाजी आता फाशी जाणार...तयारी झाली, क्षण आला...

(साथीदार शेवटचे घोळून म्हणतात.

साथीदार कामगाराला फाशीच्या खांबाशी नेऊन उभा करतात.)

**साथीदार** क्षण आला...

(कामगाराच्या गळ्याभोवती दोरी घालण्यात येते. म्होरक्या आणि साथीदार ही लय शब्दांशिवाय नुसतीच अस्पष्ट गुणगुणतात हळुवारपणे.)

**भटजी** (कामगाराला) देवाचे नाव घे हो मुला !

(तो डोळे मिटतो. दोरी ओढण्यासाठी एकजण येऊन उभा काळ्या कपड्यांत.)

**साथीदार** (अस्पष्ट) घेतले...

**म्होरक्या** (हळुवारपणे) घटका भरली हो भरली...

**राजा** (एकदम उठून) थांबा !

(सगळे पाहू लागतात.)

**राजा** थांबा ! त्याला फाशी देऊ नका !

**राजवैद्य** महाराज...



**राजा** त्याला सोडा !

(कामगाराला मोकळे करण्यात येते. तो जाऊन राजाचे पाय धरतो. सेवक खांब उचलू लागतात नेण्यासाठी.)

**राजा** खांब नेऊ नका ! खांब तसाच राहू दे...त्याचे काम अजून संपले नाही...आम्ही फाशी जाणार.

**राणी** (धक्का बसून) महाराज...

**सेवक** (अस्पष्ट) महाराज...

**म्होरक्या** (लयीवर) सर्वांना धक्का बसला...धसका बसला...

**साथीदार** धसका बसला हो धक्का बसला...

**राजा** हे आमच्या प्रजाजनांनो ! आमचा निश्चय बदलणार नाही ! या राज्यामध्ये घाम गळत नाही...कारण कोणी कष्ट करीत नाही...कष्ट करीत नाही म्हणून राज्य रसातळाला चालले...लक्ष्मी भीक मागत आहे...आणिक निसर्गाची संपत्ती जिकडे तिकडे धुळीमध्ये पसरली आहे...तिला कोणी उचलीना...सारे आयतोबा झाले...या राज्याला कसली आशा उरली नाही...आम्ही हे पाहिले...पूर्वेला...पश्चिमेला...दक्षिणेला आणि उत्तरेला पाहिले. आम्ही ठरविले की, ज्या कोणामुळे हा घोर अपराध घडला आहे त्याला फाशीच दिले पाहिजे ! तो घोर गुन्हेगार आहे...तो त्याच्या आईचा पुत्र नाही आणि तो प्रजेचा राजा नाही...असा तो कोण—तो कोण म्हणजे आम्हीच !

**सर्वजण** महाराज...

**राजा** होय ! आमच्या प्रजाजनांनो, आम्हीच ! आम्ही आयतोजी झालो...म्हणून आमची प्रजा आयतोबा झाली...आम्ही कष्ट तुच्छ मानले...प्रजेने तेच केले...आम्ही धडा घालून दिला...प्रजेने तो गिरवला...आम्ही आज फार फार दुःखी आहोत. ही चूक काही केले तरी भरून निघणार नाही...आणि काही झाले तरी आम्ही सुखी होणार नाही...म्हणून आम्ही आज फाशी जात आहोत...आमच्या पश्चात तरी आमची प्रजा कष्ट करून आणि घाम गाळून आपल्या राज्याचे नाव उजळ करील आणि माणसाच्या जन्माला आल्याचे सार्थक करील हीच आमची शेवटची इच्छा.

(फाशीच्या खांबाकडे जातो. राणी त्याच्या पायांवर पडते. राजा गळ्याभोवती दोरखंड अडकवून घेतो. उभा म्होरक्या आणि साथीदार सोडून सगळे गुडघ्यावर बसून वाकलेले. शोकभराने आतून लोकगीताचे सूर ऐकू येतात. शेतकरी बैल घेऊन तालात प्रवेशतो.)

**शेतकरी** आम्ही शेतकरी
आम्ही कामकरी
चला पिकवू या देशाची भाकरी ।
कष्ट करा । काम करा ।
कष्ट करुनी शेतकरी दादा—

शिवार सारं फुलवायचं दादा ।

हो ऽ ऽ चला पिकवू या देशाची भाकरी ।

(म्होरक्या व साथीदार गाणे म्हणत प्रवेशतात. त्यांच्या तालात कामाला लागल्याच्या हालचाली. प्रथम राजा सामील. नंतर हळूहळू सामुदायिक काम करीत असल्याच्या हालचालीत गाण्याची—तालाची—कामाची लय वाढत जाते.

पडदा.)




पटकथा



**सामना**
१९७८

# सामना

[तालुक्याचे गाव. सकाळ.

एस. टी. ची रातराणी गावातल्या स्टँडवर पोचते.

सर्व उतरतात. गाडी रिकामी होते.

कंडक्टरच्या लक्षात येते, एक जण आत राहिला.

आत राहिलेला बसल्या जागी बेहोष. तो चिक्कार प्यायला आहे.

खादीधारी. मळलेला. भकास. डोईवर मळकीच गांधी टोपी. नाकावर ओघळलेला चष्मा.

कंडक्टर त्याला गदगदा हलवून जागे करू बघतो. शिव्या पुटपुटत त्याचे बकोट धरून गाडीतून बाहेर काढतो. रस्त्याकडेला नेऊन सोडतो.

बेहोष इसम चालण्याचा प्रयत्न करतो. जमत नाही. कोसळून मातीत लोळतो. कोसळताना म्हणतो, हे राम.

कोसळतो तिथेच पाय पोटाशी घेऊन घाणीत झोपतो. हात झटकत परत जाणारा कंडक्टर पुटपुटतो, डुक्कर साला...

•

पलिकडे चहाचे हॉटेल. रेकॉर्ड वा रेडिओ चालू. वर्दळ. घाणीत निवांत झोपलेला तो इसम. खादीच्या खमिसातून दारूची बाटली डोकावते आहे. खांद्याची कपड्यांनी फुगलेली पिशवी

जवळच पसरली आहे.

तीच सकाळ.

हिंदुराव धोंडे-पाटलांचा भव्य वाडा. भक्कम दिंडीदरवाजा. त्यावर सुस्वागतम्‌ची पाटी. एक जुने तोरण. चौकात शिकारी कुत्री बांधलेली. सडा-रांगोळी, स्वस्तिक वगैरे. वर लटकवलेल्या पिंजऱ्यातला पोपट या बसा नमस्ते हेच पुन्हा पुन्हा बोलतो आहे. त्याची पिंजऱ्यातली एकसुरी तगमग.

कॅमेरा वाड्यात अंतर्भागातून जाऊ लागतो.

रेडिओवरची सनई—प्रौढ माणसाचे मेहनतीचे आवाज—तेराचौदा वर्षांच्या मुलांचा अभ्यास—असे ऐकू येत शेवटी पूजापाठ. याचा स्वर पुरुषी, भरीव.

कॅमेरा अंतर्भागातून प्रवास करीत असता भिंतीवरील मारल्या जनावरांची कातडी, मुंडकी, रायफली, पूर्वजांच्या तसबिरी, यातच स्त्रीचे एखादे आधुनिक मोठे कॅलेंडर—राष्ट्रीय पुढाऱ्यांची चित्रे, जुनी सुभाषिते.

शेवटी कॅमेरा पूजापाठावर, प्रशस्त देवघरात.

हिंदुराव पाठमोरे पूजा करीत आहेत. अंगावर शाल. देव्हाऱ्यात अनेक देव. त्यांत भवानी. हिंदुरावांचा चेहरा आता दिसतो. भव्य नव्हे पण जरबदार. हिंदुराव साष्टांग दंडवत घालतात. कुटुंबाला हाक घालतात. फार देखणी परंतु चेहऱ्यावर कसलाही भाव नसलेली मध्यमवयीन घरंदाज मराठा स्त्री येते. मागोमाग एक देखणी शहरी वाटणाऱ्या चेहऱ्याची तरुण मुलगी. गळ्यात मंगळसूत्र. ही हिंदुरावांची सून. हिच्यापाशी दोनेक वर्षांचे मूल.

हिंदुराव दोघींना तीर्थ देतात. दोघी देव्हाऱ्यापुढे नमस्कार करतात. मुलाला नमस्कार करायला लावतात.]

**हिंदुराव** कशी हाय पवळी आता?

**बायको** सकाळधरून टुकटुकीत हाय एकदम. घास खाल्लान सकाळी पोटभर. पाड्याला पाजलंन. पाडाबी चांगला हाय तब्बेतीनं.

**हिंदुराव** जगेलशी वाटली न्हवती रात्री. जाम अडली होती. आम्ही म्हणलो, संपला वाटतं रिणानुबंध.

**बायको** सद्दी जोरावर होती पवळीची.

**हिंदुराव** कुलदैवताची क्रिपा हाय आमच्यावर इतकं खरं.

(नमस्कार करतात देव्हाऱ्याकडे भक्तिभावाने.)

**बायको** संध्याकाळला देवीला जायला गाडी हवी होती.

**हिंदुराव** कारभाऱ्याला सांगून ठेवा.

(हिंदुराव नातवाचा एक गालगुच्चा घेऊन देवघरातून निघतात. धाकट्या मुलाच्या—शिवाजीरावाच्या अभ्यासाच्या खोलीशी थबकतात. बायको आणि सून मागच्यामागे स्वयंपाकघराकडे गेलेली.)

**हिंदुराव** काय, बरा चाललाय का नाही अभ्यास?
(शिवाजीराव मानेने होय म्हणतो.)

**हिंदुराव** शाळा काय म्हणते? तेवढं हेडमास्तरना वाड्यावर बोलावलं म्हणून आज सांगा. काम हाय म्हणावं.

(हिंदुराव पुढे निघतात. पुटपुटतात.)

बोलवल्याबिगर येण्याची आदतच नाही या हेडमास्तरला. शहरातून आलाय....

(हिंदुराव दिवाणखान्यात येतात. नोकर खादीची बंडी घेऊन उभा. कारभारी उठून आदबीने उभे राहतात. हिंदुराव बंडी चढवत असता कारभारी कामांची यादी वाचतात.)

**हिंदुराव** (बंडी चढवत एकदोन कामांची भर घालतात.) सर्जेराव कुठं आहेत?

**कारभारी** आत्ताच सकाळची मेहनत संपत असेल. बोलावू?

**हिंदुराव** नको. घरात संध्याकाळला गाडी हवी म्हणत होते. वेवस्था करा.

**कारभारी** पण आपल्याला संध्याकाळी कडोश्याला जायचंय—

**हिंदुराव** चालत जाऊ की, गाव काय असं लांब हाय?

**कारभारी** पण परत येताना रात्र होईल, आडवेळ, त्यात मधली वाट वर्दळीची नाही—

**हिंदुराव** कारभारी, कोण काय करतंय? भित्यामागे बरह्मराक्षस. आम्ही कुणाला भिणार? आतल्या आर्डरप्रमाणे गाडी इथे मागवा. तसंच वाटलं तर फॅक्टरीची जीप हाय आम्हांला, ती घेऊन जाऊ आम्ही.

(सर्जेराव आलेला. मेहनतीचा घाम आणि खमीस अंगाला चिटकून पैलवानी स्नायू उठून दिसताहेत. चेहरा जनावरासारखा. डोळ्यांत तेज. हिंदुरावांच्या पायाला तो शिवतो.)

**सर्जेराव** काय काम आज, दादा?

**हिंदुराव** काही नाही. फॅक्टरीवर असा. आणि उगाच कोणाला दमात घेणं बरं नाही. मुकाट रहात जावा.

(आडोशाला हिंदुरावांची बायको येऊन उभी.)

**बायको** बाळासाहेबाला मुंबईला मनिआर्डर करायची होती. पैसं संपले म्हणून परवा कागद आला होता.

**हिंदुराव** (कारभाऱ्यांना) मनिआर्डर आजच करून टाका मागतात तेवढ्याची. आणि कुपनावर लिहा, मोठ्या कॉलेजाला गेलात म्हणून फुकट वेळ जाळू नका. चांगला अभ्यास करा. एका मुलाचे बाप आहात.

(बायको कारभाऱ्यांना हे लिहू नका असे खुणावते आडोशानेच.)

[हिंदुराव सदरेवर येतात. माणसे तिष्ठत बसलेली. कोणी पांढरपेशे अधिकारी, कोणी गरीब शेतकरी. सर्व उभे राहतात. हिंदुराव बैठकीवर बसतात. गरीब शेतकरी येऊन त्यांच्या पायावर डोकी ठेवण्याची घाई करतात.

हिंदुराव नाखुषीने हे करू देतात. चौकात भुंकणारी शिकारी कुत्री.]

**हिंदुराव** (शेतकऱ्यांना) बास, बास...जा बसा तिकडे. (नोकरांना) अरे त्या कुत्र्याला खायला घाला रे कुणी...स्वतः खाऊन माजलेत सगळे...

(आता हिंदुराव एकेकाचे काम ऐकून घेऊ लागतात. शिक्षणखात्याचे अधिकारी मुंबईहून मुद्दाम हिंदुरावांच्या निमंत्रणावरून आले आहेत ते प्रथम स्वतःची ओळख करून देतात उभे राहून. त्यांच्या डोळ्यांत हिंदुरावांविषयी बारीक तुच्छता.)

**हिंदुराव** रहाण्याची वगैरे वेवस्था इथं मनपसंत झाली ना तुमची? काय तक्रार?

**अधिकारी** नाही, काहीच नाहीं. सर्व व्यवस्था उत्तम आहे.

**हिंदुराव** कमीजास्त असेल तर सांगा. संकोचाचं काम नाही इथं. तुम्ही पाहुणे आहात आमचे.

(अधिकाऱ्याच्या चेहऱ्यावर संतोष.)

**हिंदुराव** बसा बसा. तुमच्याशी बोलतो नंतर, आधी इतर कामं काय आहेत पाहू. काय हिंमतराव? काय काम काढलं?

(ग्रामपंचायत सरपंच हिंमतराव हिंदुरावांकडून ऑर्डर घेण्यासाठी आलेले.

फॅक्टरीचे मॅनेजर नवले आपली एक अडचण घेऊन आलेले.

हिंदुराव त्यांना सल्ला देत असता त्यांच्याकडे आदरातिशयाने पाहणारे गरीब शेतकरी. हिंदुरावांच्या होकार-नकारांना नकळत ते माना हलवताहेत. हिंदुराव त्यांची कामे सुनावणीस घेतात. हे पाहणारे शिक्षणखात्याचे अधिकारी. त्यांच्या डोळ्यांतली हिंदुरावांविषयीची तुच्छता मावळलेली. हिंदुरावांचे रांगडे शहाणपण, आत्मविश्वास यांचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला.)

**हिंदुराव** चला. आपण जरा त्या खोलीत बसून बोलू. मग तुम्ही लागा कामाला.

[दोघे खोलीत येतात. टेबलाशी नाश्त्याची व्यवस्था. सर्व पाश्चिमात्य थाट. पाहुणे या थाटाने अचंबित.]

**हिंदुराव** आमच्या आवडीचं न्हवे हे साहेबी काम. आम्ही अडाणी माणसं. बॉम्बेचे कोण पाहुणे आले की त्यांच्याकरता करावं लागतं. त्यान्ला याचीच सवय असते ना. त्यांची तब्बेत राखली पायजे. (नोकराला) अरे, फळं आण आपल्या बागेतली. (दाखवीत) हे दूध

 आमच्या सहकारी डेअरीचं. घ्या. बॉम्बेसारखं नाही. निरसं हाय.

(पाहुणा आणखीच प्रभावित.)

आम्लेट आणखी घ्या. फार्मवरची अंडी आहेत. अरे, पाहुण्यान्ला आणखी आम्लेट घाला. घ्या, घ्या. इथं काय कमी नाही. हात चोरण्याचं काम नाही.

[दोघे खाणे संपवून बोलत आहेत. हिंदुरावांनी एक पाय वर खुर्चीत घेतलेला. काडीने कान नाहीतर दात कोरताहेत.

अधिकाऱ्यांच्या मुद्रेवर अतीव लीनता. महापुरुषापुढे बसल्यासारखे ते बसलेले.]

**हिंदुराव** यासाठी आम्हांला तुमचं साहाय्य हवं. पोरं मुंबईला शिकण्यासाठी जातात आणि मुंबईच्या जाळ्यामध्ये अडकतात. इथं आम्हांला आमच्या कामासाठी आमची पोरं मिळायची तर त्यांचं सगळं शिक्षण इथं झालं पायजे. पार डिग्रीपर्यंत. हे आम्ही ओळखलंय आणि त्या दृष्टीनं आमचा विचार हाय. तुम्ही रहा, फिरा लागेल तिथं, अंदाज घ्या. विचार करा. काय? तुमची सर्व सोय केली जाईल. आणि आम्हांला रपोट द्या. आज विश्रांती घ्या. उद्या सकाळी गाडी येईल तुम्हांला घ्यायला. आमचं राज्य बघा एकदा. लहान आहे. पन रक्त आणिक घाम घालून उभं केलंय आम्ही स्वकर्तृत्वानं. आळस आणि निराशावाद होता तिथं आज माणूस कष्ट करून पोटभर खातंय. बघा तुम्ही. मग बोलू. नाहीतर तुम्हांला वाटेल, हिंदुराव आपल्याच गमज्या सांगतोय म्हनून. या आता...

(पाहुणा लीनतेने उठू लागतो.)

[उन्हे चढू लागलेली. खादीदारी इसम घाणीत पडल्या पडल्या जरा चाळवतो आहे. डोळ्यावर उन्हे आलेली. चष्मा डोळ्यांना नाही.

एक लूतभरले गावठी कुत्रे त्याच्या कपड्यांची ओढाताण करीत त्याच्या भोवती फिरत आहे. तो मिटल्या डोळ्यांनी पुटपुटतो आहे.

'नको ग कमळे, मला जरा आणखी झोपू दे...नको म्हणतो तर...अग नको ना पोरी...सोड बरं...'

पलिकडल्या चहाच्या दुकानी बसलेले टोळके. त्याची हळूहळू चर्चा. अनेक भानगडी यात येत आहेत.

दुकानात आता सर्जेराव शिरतो.

टोळक्याची कुजबुजती चर्चा बंद. डोळे सर्जेरावाकडे.

डोळ्यांत नफरत, भय.

गल्ल्यावरचा मालक सर्जेरावाला सलाम करतो.

चहा घेण्याचा आग्रह करतो.

सर्जेराव नको म्हणतो.

आपणाकडे नजरा लागल्या आहेत याची त्याला जाणीव आहे.

दुकान आपल्याच मालकीचे असल्यासारखे त्याचे बेअरिंग आहे.

वेटर निरशा दुधाचा ग्लास आणून देतो तो सर्जेराव घेतो.

चर्चा करणाऱ्या टोळक्यात पुन्हा हलक्या स्वरात तुटक बोलणे.

यात सर्जेरावाविषयी मनस्वी नफरत.

सर्जेरावाची नजर पडताच मात्र जो तो लाचार ओशाळे हसतो. कुजबुजीत मारुती कांबळे हे नाव येऊन जाते.

सर्जेरावाचा जनावरासारखा चेहरा, बारीक मंद हिंस्त्र डोळे न्याहाळते.

खादी कपड्यातला दारुडा आता नाइलाजाने घाणीत उठून बसतो. टोपी बाजूला पडलेली. डोळ्यांना चष्मा नाही.

प्रथम त्याला भोवतालचे काही कळत नाही. दिसत नाही.

मग प्रथम तो खमिसाच्या खिशातली बाटली चाचपडत शोधतो. ती गेलेली.

चष्मा शोधून डोळ्यांवर ठेवतो.

मग खांद्याची पिशवी चाचपडतो. ती रिकामी झालेली.

खिसे चाचपतो. ते रिकामे.

त्या खादीधारी दारुड्याच्या मुद्रेवर भूक स्पष्ट लिहिली आहे.

तो भोवतालचे चष्म्यावाटे न्याहाळू लागतो.

चहाचे दुकान दिसते.

तो उठतो. तिकडे निघतो. वाटेत वारंवार खमिसाचे खिसे उलटे करून बघतो आहे. नजरेत नवल.

तो चहाच्या दुकानाशी पोचून बाहेर रेंगाळतो.

माणसे आत-बाहेर येत-जात आहेत. खात-पीत आहेत.

गल्ल्याशी सर्जेराव मालकाशी मधून मधून काही बोलत उभा.

खादीधारी दारुडा हे पाहतो. मुद्रेवर भूक.

तेवढ्यात मागून कोणी तरी त्याला हटकतो. एकजण त्याची घाणीत राहून गेलेली गांधीटोपी

देतो.

खादीधारी दारुडा ती पाहून प्रथम किंचित ताठरतो. मग हसतो भयाणसे. टोपी घेऊन 'आभारी आहे' असे काही पुटपुटत टोपी कशी तरी डोक्यावर ठेवतो.

ठेवताना पुटपुटतो,

'आलीस बाई? शोधत आलीस....'

पुन्हा चहाच्या दुकानात पाहत उभा. येत्या-जात्या एकेकाला धूसर नजरेने पाहतो आहे.

मनाचा धडा करतो. चहाच्या दुकानात शिरतो. एका टेबलाशी जाऊन बसतो.

पलीकडे ते मोघमच रिकामटेकडे कुजबुजते टोळके.

खादीधारी दारुड्याची दखल कोणालाच नाही. हॉटेलचे पोऱ्ये आणि इतर सर्व त्याला वळण घालून मागे-पुढे जात आहेत.

मग एक धावत पोऱ्या पाण्याचा एक डचमळता ग्लास आणून त्याच्यापुढे आदळतो. निघून जातो.

खादीधारी दारुडा अर्ध्या क्षणात ग्लास पटकन् रिकामा करून ठेवून देतो. तेवढ्यात दुसरा पोऱ्या कळकट चहाने भरलेली कपबशी त्याच्या पुढ्यात आदळून जातो.

खादीधारी दारुडा पाण्याप्रमाणे चहा पिऊन संपवतो.

आता त्याला जरा बरे वाटते. चेहऱ्यावर तेज दिसते.

एका धावत्या पोराला तो आता मध्येच अडवतो. बनमस्का ऑर्डर करतो. बनमस्का येताच भरभर संपवतो,

आता त्याला आणखीच हुशार वाटते. तो अस्पष्ट गुणगुणू लागतो.

'वैष्णव जन तो...'

ह्याचे हे चालले असता पाठीमागे ते कुजबुजते टोळके किंवा त्या टोळक्यातल्या कुजबुजीतले अर्धस्पष्ट शब्द यातले काहीतरी सतत राहते.

मारुती कांबळे हे नाव दोनतीनदा येते.

गल्ल्याशी सर्जेराव आता सिग्रेट ओढतो आहे.

खादीधारी गडबडीने जागचा उठतो. गल्ल्यापर्यंत पोचतो तोवर पोऱ्या ओरडतो, एक इसम चाळीस पैसे.

मागे अंगठा दाखवीत खादीधारी दुकानाबाहेर पडू लागतो. यात एक संकोच. गल्ल्यावरचा मालक त्याला हटकतो. त्याची गचांडी पकडतो. हॉटेलचे पोऱ्ये जमतात.]

**मालक** चारसो बीस साला. पैसे बुडवून पळतो. पैशे टाक पहिले.

**खादीधारी** पैसे नाहीत.

**मालक** पैशे टाक नाय तर टांग मोडून ठेवतो.

**पोऱ्या** चाळीस पैशे टाक.

**खादीधारी** पैसे नाहीत.

**पोऱ्या** मारो सालेको.

**मालक** पैशे नाहीत तर माल कसा मागवला? फुकटखाऊ भडवे. पैशे काढ आधी.

**खादीधारी** ईश्वराशपथ पैसे नाहीत. हे पहा.

(खादीधारी खिसे दाखवतो. अंगाला कंप. आता मालक आणि पोऱ्ये त्याला थोडे मारतात. त्याला सडकेवर फेकतात. खादीधारी सडकेच्या धुळीत येऊन लोळतो. ओठावाटे रक्ताचा बारीक ओघळ. रक्त निपटत तो स्वतःशीच त्याचे ते भयाण हसून म्हणतो :

'भली खोड मोडली तुझी. तो जागा आहे.'

खादीधारीचे घडते ते हे सर्व सिग्रेटचे झुरके घेत गल्ल्याजवळून स्वस्थपणे पाहणारा सर्जेराव. खादीधारीला सडकेवर फेकून मालक परत गल्ल्यावर येतो. म्हणतो : 'दारू प्यायला पैशे असतात भडव्यांकडे. मोफतखाऊ साले. बुढ्ढा आहे म्हणून सोडला.')

**सर्जेराव** (अद्याप सडकेवरच्या खादीधारीवर नजर) खादी कपडेमे था. गावातला दिसत न्हाई. बाहेरचा माल वाटतो.

[चहाच्या दुकानापासून लांब निघालेला खादीधारी चालताना जरा खुरडतो आहे. सर्जेराव मालकाचा निरोप न घेताच काही हिशेबाने खादीधारीमागे निघतो. सर्जेराव जाताच चहाच्या दुकानातल्या टोळक्यात सर्जेरावाबद्दल कॉमेंट्स. यात पुन्हा मारुती कांबळे हे नाव. खादीधारी एका बंद दुकानाबाहेरच्या मोडक्या बाकड्यावर येऊन टेकतो. त्याला ढेकर येतो. बाकड्याच्या उरल्या भागावर एक कुत्रे पसरलेले.]

**खादीधारी** (ओठाची हालचाल) पोटोबा झाला, आता विठोबा उरला. नव्हे, शेषशायी भगवान.

(खादीधाऱ्याची नजर कुत्र्यावर. मागे आऊट ऑफ फोकस अंतरावर सर्जेराव पानबिडीच्या एका दुकानाशी येऊन उभा. इकडे पाहतो आहे. तो आता दुसरी सिगरेट शिलगावतो.)

**खादीधारी** (कुत्र्याला उद्देशून ) झाली का राजा? फार झोप वाईट बाबा. त्यात उपवासानंतर पोटात घासभर गेलं तरी वामकुक्षी फार हवी वाटते. माणूस हो म्हणजे कळेल. चल ऊठ. जागा हो. हो जागा आणि जागा करून दे थेरड्याला.

(कुत्र्याला तो हलके हलवून बघतो आहे, त्याने बाक खाली करावे म्हणून. कुत्रे तयार नाही. पार्श्वभागी सर्जेराव अंतर ठेवून वेगळी जागा घेऊन हे बघतो आहे.)

**खादीधारी** (झोपल्या कुत्र्याला) अरे हो लेका, तुम्ही-आम्ही सारखेच. पण काही दोन

पायांची किंमत ठेवशील की नाही? तुला चार नि आम्हांलाच दोन कसे दिले? नजरचूक नव्हे, पुण्याई पूर्वजन्मीची. मनुष्यजन्म, फार मौल्यवान. हो खाली. चल तिकडे. हट्.

(आता खादीधारी कुत्र्याला ढोसून हलवतोच, त्याला अर्धे बाकाखाली घालवतो. नाइलाजाने कुत्रे बाजूला जाऊन पसरते.)

**खादीधारी** (पुटपुटतो) धन्यवाद...

(सुटकेचा उसासा टाकून खांद्याच्या पिशवीत चुंबळ करतो. ती बाकावर एकीकडे ठेवतो. अंग आखडून बाकावर आडवा होतो, व पुटपुटत 'श्रीराम...'

डोळे मिटून घेतो. शब्द (ओठांच्या हालचालीशिवाय) :

'जगाला म्हणावं, आता जा हवं तर खडडयात. आपण राजासारखे झोपणार आता बास्.'

एक माशी त्याच्या चेहऱ्यावर घोंघावते आहे. तो तिला हाकलतो आहे मिटल्या डोळ्यांनीच. सर्जेरावने जरा जवळची जागा घेतलेली. त्याचे लक्ष खादीधाऱ्यावर. क्षणात खादीधारी घोरू लागलेला. माशी चिकटपणे चेहऱ्यावर बसतेच आहे. सर्जेराव अगदी जवळून त्याला नीट पाहत असताना खादीधाऱ्याच्या प्रगल्भ, खंगल्या, मद्यपी, थकल्या चेहऱ्यावर दृश्य संपते.)

[तीच सकाळ. उन्हे चांगलीच चढली आहेत.

फॅक्टरी.

फाटकाशी हिंदुरावांची कार येऊन उभी राहते. गेटमन गडबडीने फाटक खोलून हिंदुरावांना कडक सलाम ठोकतो.

कार आत पोर्चकडे जाते.

हिंदुराव कचेरीत शिरतात. आता अंगावर तलम झब्बा व धोतर.

मॅनेजर आणि त्याचे असिस्टंट्स धावत येतात.

हिंदुरावांसाठी 'मॅनेजिंग डायरेक्टर' अशी पाटी असलेल्या केबिनचे दार उघडले जाते. हिंदुराव केबिनमध्ये न जाता बाहेरच एका टेबलाशी बसून कामाचा रिपोर्ट विचारतात.

रिपोर्ट देण्यात येतो.

तो दिला जात असता हिंदुरावांचे उलट प्रश्न. (यात त्यांना फॅक्टरीची बारीकसारीक माहिती असल्याचे दिसून यावे.) हिंदुराव आता केबिनमध्ये जातात. तिथे सर्जेराव बसलेला.]

**हिंदुराव** (सहजपणे) काय सर्जेराव...

**सर्जेराव** गावात आज सकाळला नवा चेहरा आलाय.

**हिंदुराव** (सहजपणे) कोण हाय...

**सर्जेराव** अद्याप कळत न्हाई. पर खादीच्या कापडात हाय. जवळ पैसा नाही असा बहाणा करतोय. शिकल्याला वाटतो.

**हिंदुराव** काय नावगाव...

**सर्जेराव** कळेल. वर दारूचा वास फर्लांगभर मारतोय. मला डाउट हाय.

**हिंदुराव** कसला ?

**सर्जेराव** साधा वाटत न्हाई. पाठवलेला असेल.

**हिंदुराव** असं?

**सर्जेराव** तर ! तपासाकरता वेष बदलूनच येत्यात की.

(हिंदुरावांच्या मुद्रेवर मुळीच चलबिचल नाही. ते जरा विचार करतात.)

**हिंदुराव** हरकत नाही. चौकशीवर रहा. बेकार हाय म्हणला तर घ्या ठेवून फार्मवर. नजरेत राहील. काम करण्याला तयार नसलं तर बाहेर काढून लावा.

(तेवढ्यात फोन येतो. हिंदुराव तो घेतात. सर्जेरावाला नजरेने बाहेर जाण्याचा इशारा करतात. तो जातो.)

**हिंदुराव** (रिसिव्हरमधये) हॅलो बाळासाहेब. हिंदुराव धोंडे-पाटीलच बोलतोय. रामराम. आज कशी कृपा झाली मुंबईवरनं ? एकदम फोनसा लावला गरिबाला ? सहज ? फार आनंद वाटला. काय हुकूम आहे. अहो आम्ही काय तुम्हांला हुकूम करणार साहेब ? आम्ही अडाणी माणसं. तुम्ही हायक्लास मंडळी. हायकंमाडमध्ये म्हणजे हायक्लासच असणार की. दिल्लीशी तुमचे संबंध साहेब— (बोलताना एक पाय वर खुर्चीत घेतलेला. कान कोरू लागतात आणि बोलतात.) काय, साखरेच्या भावाची काय नवी खबर ? दिल्लीकडली ? आम्ही ? आम्ही काय ठरवणार ? आम्ही साखर तयार करणार. बास. भाव दिल्लीत ठरणार ना ? काय म्हणत होते थोरले साहेब ?...

(हिंदुराव बोलत असताना दृश्य संपते.)

[रात्र.

हिंदुराव स्वतः जीप चालवीत आहेत. रस्ता अतिशय खडबडीत. निर्जन. दोन्ही बाजूला मळे. अचानक वळणावर जीपपुढे कोणी तरी येते. हिंदुराव गडबडीने जीप आवरू बघतात.

जीप कशीबशी थांबते.

रागावलेले हिंदुराव जीपबाहेर उतरतात.

जीपच्या प्रकाशात एक आकृती रस्त्यात लोळलेली. हा खादीधारी.

हिंदुराव जवळ जाऊन तो मेला की जखमी झाला आहे पाहतात.

त्याला विशेष लागलेले नाही पण तो खूपच प्यायला आहे हे त्यांच्या ध्यानी येते.

त्यांना तो कोण ते ओळखत नाही.]

**हिंदुराव** (त्याला बळेच बसता आणि उभा करीत) खादीचे कपडे वापरा आणि दारूत

लोळा. नालायक लेकाचे. नादान, माणसाच्या जातीला लाज आणता लाज तुम्ही. मरत का नाही?

(त्याचा चेहरा त्यांना आता नीट दिसतो. त्याला ते जीपमध्ये मागे भरतात.)

**खादीधारी** (बरळतो आहे.) अहो पण नको उगीच...नको म्हणतो तर...सोडा मला...मला सोडा—पण मी केव्हाच मेलो आहे—काही शिल्लक नाही—खलास—रामाशपथ—म्हणाल त्याची शपथ घेतो हवी तर—खोटं नाही बोलणार...

(हिंदुराव पुढे बसून जीप सुरू करतात.)

**खादीधारी** अच्छा अच्छा—म्हणजे आम्हांला जाळायला घेऊन निघाला तुम्ही—न्या न्या, पण ते आमच्या शेवटच्या इच्छेचं काय—आमचं विल—मृत्युपत्र—आमचा देह डॉक्टर लोकांना त्यांच्या प्रयोगासाठी नि हाडं कुत्र्यांना चघळण्यासाठी मिळावीत—तेवढाच आमचा कुणाला उपयोग...झाला तर...तर आमची सर्व जगाला कळकळीची विनंती...हात जोडून, पाया पडून...आम्हांला उगाच जाळू नका...तुम्हांलाच डॉक्टर आणि कुत्रे लोकांचा वाटा काढून घेतल्याचं पाप लागेल...आमचं काही म्हणणं नाही...आमचं काही एक म्हणणं नाही...

(हिंदुराव जीप चालवीत आहेत. मधूनच खादीधारीकडे पाहत आहेत.)

जीप वाड्यापुढे थांबते. दिंडी उघडते. नोकराला हिंदुराव विचारतात :

'माणसं देवीला जाऊन परतली का?'

नोकर 'हो' म्हणतो.

**हिंदुराव** जीपमध्ये मागल्या सीटवर हाय त्याला आत घे आणिक त्याची झोपण्याची सोय कर. सकाळला बघू काय ते. आणिक रात्री त्याला जाऊ देऊ नको कुठं.

(हिंदुराव आत निघून जातात.

नोकर जीपच्या मागल्या सीटकडे येऊन डोकावतो. आत लोळलेला खादीधारी :

'आलं वाटतं स्मशान? जाळण्याची व्यवस्था ? तीसुद्धा झाली?'

नोकराला खादीधारी दारू प्यायल्याचे जाणवते. त्याच्या मुद्रेवर हे दिसते. तो खादीधारीला बाहेर काढण्यासाठी संरसावून : 'चल रे ए नालायका...')

**खादीधारी** थँक यू, थँक यू...थँक यू फॉर द कॉम्प्लिमेंट...सन्मानाबद्दल हार्दिक आभार...

[भली सकाळ.

अडगळीत झोपलेला खादीधारी. सामुदायिक प्रार्थनेचे स्वर त्याच्या कानात.

नोकर त्याला उठवतो आहे...

'ऊठ ए. मालक बोलावल्यात. चल ऊठ.'

खादीधारी उठतो.

चौकातून कुत्र्यांची भुंक ऐकू येते आहे.

**खादीधारी** (डोळे उघडून कानांनी वेध घेत) इथेही आहेत का आमचे मित्र. जेथे जातो तेथे तू माझा...सांगाती...(उठून बसतो.) वॉर्डर साहेब, इथे चुळा भरण्याची व्यवस्था ? रात्रीची अमृताची चव तोंडात तशीच आहे.

(नोकर त्याला मनाविरुद्ध मोरी दाखवतो आणि पाणी देतो. खादीधारी चुळा भरून तोंडावर बरेच पाणी मारतो. तोंड स्वच्छ पुसतो पंचाने. आता गुंगी पुरती उडाली आहे. आता तो आपण कुठे आहोत त्याचा नजरेने शोध घेऊ लागतो.)

**नोकर** चला लौकर, मालक थांबलेत चहा घेण्याचे.

**खादीधारी** मालक थांबलेत ? कोण मालक ? चहा घेण्याचे...असं असं. रात्रीचे ते...चला लौकर. कुणाचा आपल्यामुळे खोळंबा होणं पाप. चला— (नोकरामागून निघतो. चौकातले भुंकणारे शिकारी कुत्रे पाहत किंचित रेंगाळतो.) चांगले उच्च जातीचे दिसतात...त्यामुळे उग्र जातीचा ज्वलंत अभिमान...छान, छान...(नोकर त्याच्याकडे तऱ्हेवाईक म्हणून पाहतो आहे. नोकरामागून तो आता वाडा पाहत पाहत माडीवर एका दालनापर्यंत येतो.)

**नोकर** जावा आत.

(खादीधारी आत शिरताच समोर वाघाचे मुंडके भिंतीला लावलेले, खाली डायनिंग टेबलपाशी हिंदुराव बसलेले. त्यांच्या पुढ्यात चहाची केट्‌ल, कपबश्या, वगैरे.)

**खादीधारी** (समोर येऊन वाकून) समस्त व्याघ्र मंडळी सुखी असोत. आपण आम्हांला का बोलावलंत ?

**हिंदुराव** (त्याला न्याहाळीत) बसा.

(खादीधारी ते दालन आणि हिंदुरावांना न्याहाळीत लांबची एक जागा शोधून तिथे बसू बघतो.)

**हिंदुराव** तिथे नको. असे इथे या. खुर्चीत बसा. आमच्या समोर.

**खादीधारी** लायकी नाही. आम्ही बाहेर—तिकडे चौकात.

**हिंदुराव** सध्या इथे बसा असे.

**खादीधारी** (बसतो) राजवाडाच म्हणायचा, कोणत्या राजाचा ?

**हिंदुराव** (चहा ओतून, ढवळून त्याच्यापुढे ठेवीत) घ्या, चहा.

**खादीधारी** आपण स्वतः चहा तयार करता ?

(हिंदुराव उत्तर न करता स्वतःसाठी चहा तयार करून घेतात. त्याला न्याहाळतात. तो कपातून चहा गट्‌दिशी घेऊन टाकतो.)

**हिंदुराव** आणखीन हवा?

**खादीधारी** चहाचं एक वाईट. नशा येत नाही. वाया जातो. (हिंदुराव त्याच्याकडे न पाहता त्याच्या कपात नवा चहा ओततात. ढवळतात. त्याच्यापुढे सरकावतात. बिस्किटांची डिश त्याच्याकडे सरकवतात.)

**खादीधारी** बिस्किटंसुद्धा ? आता यानंतर दारू मिळेल असं सांगू नका. मिळणार असली तर जरूर घेऊ. दिली नाहीत तर हिसकावून, चोरून, कशीही पण घेऊ. दारू हे आमचं अन्न आहे. ते आमचं पाणी आहे. तो आमचा श्वास आहे, श्वासोच्छ्वास.

**हिंदुराव** रात्रीचं आठवतं का ?

**खादीधारी** एकूण एक. तुम्ही आम्हांला उचलून इथे आणलंत. किती घेतली तरी शुद्ध कायम. सर्व कळतं. आठवतं. तेच तर फार वाईट आहे.

**हिंदुराव** कुठले तुम्ही ?

**खादीधारी** आम्ही ?

**हिंदुराव** इकडे कसे आला, या भागात ? का आला ?

**खादीधारी** जरा—जरा असे एकदम सरबत्ती उडवू नका. एकेक प्रश्न विचारा. पण उत्तर मिळेलच अशी मात्र खात्री नाही. राग मानू नका, पण आधी आपण कोण ?

**हिंदुराव** हिंदुराव धोंडे-पाटील. या भागातील सगळी प्रगती आमच्या प्रयत्नांमुळे झाली.

**खादीधारी** अच्छा, अच्छा...आनंद झाला आपल्या गर्वानं.

**हिंदुराव** काय म्हणाला ? गर्व नव्हे, खरी वस्तुस्थिती सांगतोय आम्ही तुम्हांला.

**खादीधारी** अर्थात. गर्व हीदेखील वस्तुस्थिती असू शकते. आणि वस्तुस्थिती माहीत नसली की कोणताही दावा गर्व वाटतो. तर आपण उगीच वाईट मानू नका, आपल्या आयुष्याची शरम वाटण्यापेक्षा गर्व वाटणं कितीतरी चागलं. काय काय प्रगती केलीत आपण या भागात ?

**हिंदुराव** या भागाची परिस्थिती एकदम दरिद्री होती. कोण कष्ट करायला तयार नव्हतं. सावकारांच्या टाचा येत. घरंदारं जप्त होत. रोगराय दरसाल धडधाकट माणसं नेत. या भागात दवाखाना न्हवता; मग शाळेची गोष्टच नको. उन्हाळ्याचे तीन महिने विहिरी आटत. पाणी नसे. सात सात मैलांवरून माणसं पाणी आणत. आम्ही म्हणलो, हे का नाही बदलता येणार ? (जाणीव होऊन) आमच्या प्रश्नांन्ला जबाब देण्याऐवजी तुम्ही आम्हालांच विचारू लागला की—काय ते—काय म्हणायचं तुम्हांला ? नाव काय ?

**खादीधारी** काहीही म्हणा. आम्ही ओ देऊ.

**हिंदुराव** खादी वापरता म्हणजे गांधीवादी दिसता.

**खादीधारी** चूक. वापरण्यासारखं दुसरं विकत घेता येत नाही म्हणून आम्ही खादीधारी. पण आम्ही सध्या दारूवादी. बस्स. तेच आमचं तत्त्वज्ञान.

**हिंदुराव** मग नाव-गाव सांगायची इच्छा नाही म्हणा की तुमची.

**खादीधारी** बरोबर. कारण, सांगण्यासाठी आठवावं लागेल आणि आठवू लागलो की

सगळा ताप पहिल्यापासून सुरू होईल. तोच नको आहे. यानंतर साफ नको आहे. तर नावात काय आहे ? आता आमचं गाव. आम्ही कुठले ? स्वातंत्र्यपूर्व काळातले. मुक्काम तो. तूर्त प्रवासात आहो. कुठे पोचणार ? साक्षात काळाकडे.म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळापासून साक्षात काळाकडे—असा आमचा प्रवास चालू आहे.

**हिंदुराव** हुशार दिसताय. थांगपत्ता लागू देत नाही.

**खादीधारी** हरवलाच आहे. लागला तर अवश्य कळवू.

**हिंदुराव** हे पहा, आम्ही तुम्हांला मास्तर म्हणतो.

**खादीधारी** म्हणा. पण कसले मास्तर : बाजारमास्तर नाही, तालीममास्तर नाही, तिकीटमास्तर नाही, गायनमास्तर तर नाहीच. आम्ही मास्तर ऑफ नन्. नन्ना मास्तर.

**हिंदुराव** मास्तर, आता ऱ्हावा इथंच तुम्ही. आमचे पाहुणे म्हणून.

**खादीधारी** इथे म्हणजे वाड्यात ?

**हिंदुराव** हां. काही काम काढू तुमच्याकरता मग थोड्या दिवसांनी. तोवर रहा तब्बेतीमधे.

**खादीधारी** तब्बेतीमध्ये...त्यासाठी दारू हवी. काल रात्री अखेरची प्यायलो ती चोरलेल्या पैशांनी. आता पुन्हा फार तहान लागलीय. शोष पडू लागलाय नरड्याला.

**हिंदुराव** अशी दारू पिऊन मराल, मास्तर.

**खादीधारी** द्या टाळी. तेच तर व्हायला हवं आणि अजून होत नाही.

**हिंदुराव** तुम्हांला मरायचंय?

**खादीधारी** सगळं विसरता येत असेल तर. सगळं विसरणं म्हणजेच मरण असेल तर आम्हांला मरायचं आहे. आम्हांला सशर्त मरायचं आहे.

**हिंदुराव** मास्तर, तुम्ही भ्याड आहा.

**खादीधारी** उशिरा पण बरोबर ओळखलंत. अर्थात आमच्या मानाने लवकर.

**हिंदुराव** मिळालेला माणसाचा जल्म असा फेकून द्यायला तयार व्हायचं ? काय पुन्हा पुन्हा मिळतो तो ? मरण तर केव्हा तरी येणारच. तेव्हा घाबरायचं नाही त्याला. पण चांगले धडधाकट आहा तुम्ही. डोकं पण चांगल्यापैकी दिसतं. वर शिक्षण हाय. पुन्हा वरच्या जातीमधले आहा. अंगावर खादी वापरता. अशा माणसानं कसं जगायचं ?

**खादीधारी** आम्ही लाजतो आहोत आम्हांलाच.

**हिंदुराव** जा आता. वाड्यावर ऱ्हावा सध्या. मग बघू पुढे काय ते.

**खादीधारी** दारूचं काय ? तुमच्या वाड्यावर दारुबंदी असेल तर तिचा निषेध म्हणून पुन्हा रस्त्यावर जाऊन लोळू.

**हिंदुराव** मिळेल तुम्हांला. नोकर करतील वेवस्था.

**खादीधारी** नोकरांना उगाच तसदी कशाला ? आम्हांला पैसे मिळाले तर आम्हीच व्यवस्था करू...वाटेल तितकी.

**हिंदुराव** छी छी, मास्तर. काम न करता पैसे घेतो तो कोण ? तो भिकारी. आधी काम करावं आणिक मग पैसे मागावेत. कसलं काम कराल तुम्ही ?

**खादीधारी** आमच्या कातड्याचे रोज नवे जोडे आम्ही शिवू आणि ते तुमच्या पायात घालू. तुम्ही त्यांनीच आम्हांला मारा आणि आम्ही तो मार खात नाचू. आमचं कातडं संपलं तरी फिकीर नको. हाडं राहतील त्यांच्या काड्या करून तुमचे ढोल आम्ही रात्रंदिवस आमच्या पोटावर बडवू—

**हिंदुराव** मास्तर, ही तुमची वाकडी शहरी भाषा आम्हा वेडगळ माणसान्ला कळत नाही. आम्ही अडाणी. जा तुम्ही. तुमची सर्व काही वेवस्था होईल. हां, पिण्याचीसुद्धा.

(खादीधारी उठून दंडवत घालण्यासाठी वाकतो. हिंदुराव त्याला ते करू देत नाहीत. नोकराला हाक मारून)

**हिंदुराव** यान्ला घेऊन जा आधी.

(नोकर खादीधारीला बाहेर नेतो. सर्जेराव हे पाहत मागे येऊन उभा आहे.)

**सर्जेराव** मानूस भानगडीचा आहे.

**हिंदुराव** असून्दया. पण पोलिसाचा नाही. कामाला येईल वाटतोय.

**सर्जेराव** आहे कुठला पन ?

**हिंदुराव** कळेल हळूहळू. आपल्या नजरेत असला म्हणजे झालं. बुद्धिमान हाय मण दारूपायी कामातून गेला वाटतो.

**सर्जेराव** ही हूल पण असंल. तपासासाठी सोडला असंल.

**हिंदुराव** बघू की. आपण पण कच्च्या गुरूचे न्हवंत. तुम्ही गुमान रहा आणि सांगतो तेवढं ऐकत चला. काय ?

**सर्जेराव** वाड्यावरच ठेवला म्हनून प्रश्न.

**हिंदुराव** हां, ठेवला. तुमचं शहाणपण राखून ठेवा. मेहनतीला जा. आणिक आज त्या नव्या पोलिस इन्स्पेक्टरला गाठा. आपल्या तीन माणसांवर गेल्या महिन्यात चॅप्टर केसी घातल्यात त्यानं, त्याला म्हणावं टिकायचं हाय इथं का करून टाकू बदली.

(फोन आल्याचे नोकर येऊन सांगतो. हिंदुराव फोन घेतात.)

**हिंदुराव** कोण, आमदारसाहेब ? काय आज्ञा हाय ? विनंती कसली साहेब, तुम्ही लोकांचे प्रतिनिधी. उद्या मंत्री होऊन जाल. आम्ही कष्टाळू माणसं. तुम्ही आम्हांला आज्ञा करायची. बैठक झाली नाही ? करू की. डी. एस्. पी. सुद्धा म्हणतात. त्यान्ला खूष राखलंच पायजे. सरकारी मंडळी. कलेक्टरना पण बोलवू. मळ्यावर करू. बरं बरं.

(रिसीव्हर ठेवतात.)

**हिंदुराव** बापाचा माल यांच्या.

[मळ्यावरची गाण्या-नाचण्याची बैठक. आमदार, कलेक्टर, डी. एस्. पी. वगैरे. पिणे जोरात चालू. सर्व उल्लू झालेले. हिंदुराव अत्यंत शुद्धीत, अलिप्त. सर्वांची जातीने सरबराई करीत आहेत. आणखी आणखी पिण्याखाण्याचा आग्रह करताहेत.]

[भली सकाळ. हवेत थंडी.

खादीधारी झोपला आहे. जवळ थोडी दारू शिल्लक असलेली बाटली. पार्श्वभागी अस्पष्ट सामुदायिक प्रार्थनेचा स्वर.

कोणीतरी जागे करते आहे त्याला हलवून.

तो कसाबसा डोळे उघडतो. प्रार्थनेचे स्वर तुटून दूर गेलेले.

त्याला उठवणारे साक्षात हिंदुराव. शाल लपेटलेली.]

**हिंदुराव** मास्तर, झोपला काय ? चला फिरायला जाऊ.

(खादीधारी कसाबसा उठून बसतो. बाजूची बाटली हाती घेतो. हिंदुराव ती त्याच्या हातातून घेऊन बाजूला ठेवतात.)

**खादीधारी** इतक्या अपरात्री ?

**हिंदुराव** रात्र न्हवे, सकाळ हाय सकाळ. हवा मस्त आहे. जरा रपेट करून येऊ. चला. उठा.

(खादीधारी चुळा भरतो. तोंडावर पाणी मारतो. खमीस चढवतो. त्याला गारठा जाणवतो आहे. अंगाला शिरशिरी.

हिंदुराव त्यालाच पाहत उभे आहेत.

खादीधारी टोपी चढवतो. वहाणांकडे येतो. वहाणा चढवतो.

हिंदुरावांबरोबर बाहेर येतो. कापऱ्या अंगानेच थांबून म्हणतो, 'चला तुम्ही. मी आलोच.'

वळतो. हिंदुरावांनी त्याचे मनगट धरलेले.)

**हिंदुराव** दारू पिणार तुम्ही बाटलीतली. आज नाही प्यायची. चला आम्ही तुम्हांला निराळी दारू दाखवतो.

**खादीधारी** निराळी दारू ?

**हिंदुराव** हां निराळी दारू. तिच्या नशेची सर तुमच्या त्या बाटलीतल्या घाणेरड्या पाण्याला नाही.

**खादीधारी** असं म्हणता ?

**हिंदुराव** एकदा प्याला त्याला दुसरी कसली पण दारू म्हणजे सरबत.

**खादीधारी** (संशयाने) अच्छा? चला तर मग...

(दोघे दिंडीबाहेर पडतात. सडकेने चालू लागतात.)

**खादीधारी** (हुडहुडत) मालक, हे काय ? आपण आणि पायी ? गाडी कुठे आहे ?

**हिंदुराव** का ? तुम्हांला काय वाटलं ? पाय नाहीत होय आम्हांला? अद्याप कोस कोस चालतो. गाडी कामासाठी असते. लौकर पोचता येतं, शहरच्या पाव्हण्यावर वजन पडतं म्हणून. एरवी आम्ही आमच्या पायांनी चालतो. मास्तर, पायांनी चालून समजतं ते गाडीनं फिरून दहा जल्मात समजणार नाही. हा सगळा भाग आजपर्यंत आमच्या पायांनी उभा-आडवा विंचरलाय आम्ही कैकदा. त्यामुळं इथं कुठल्या झाडाला किती पान हाय ते आम्ही झोपेतसुद्धा सांगू.

(दोघे झपझप चालताहेत.)

**खादीधारी** हो का. मग सांगा बरं त्या तिथल्या झाडाला किती पानं आहेत आज.

**हिंदुराव** मास्तर.

**खादीधारी** बरोबर. झोपेत सांगणार तुम्ही. असं जागेपणी नाही काही.

**हिंदुराव** (खादीधारीचे हुडहुडणे पाहत अंगावरची शाल त्याच्या अंगावर बळेच घालीत) घ्या. थंडी वाजते तुम्हांला.

**मास्तर** तुम्हांला...

**हिंदुराव** ही थंडी आमच्या राज्यातली हाय मास्तर. आम्हांला नाही बाधणार. शहराच्या तालेवार माणसान्ला सवय नसते नव्हे थंडीवाऱ्याची.

(दोघे चालताहेत. हिंदुराव जरा पुढे पाहतात. खादीधारीने अंगावरची शाल काढून हातात घेतलेली.)

**हिंदुराव** काय मास्तर ? शालशी काढली ? शहराची सगळीच माणसं तालेवार नसतात.

(दोघे बरोबरीने चालत राहतात.
मधे मधे हिंदुराव वाटेवरचा एखादा विशेष प्रकारचा दगड उचलून खादीधारीला त्याच्याविषयी सांगतात.)

**हिंदुराव** बघा मास्तर. वस्तू आहे का नाही? हा दगड हाय आकाशातल्या उल्केपासूनचा. आमच्या भागात असले दगड वाटंल तितके मिळतात.

(एक पक्षी ओरडतो.)

**हिंदुराव** तो बघा—बघितला का ? त्या झाडात तो तिथे भारद्वाज हाय बघा. भारी देखणं पाखरू. या दिवसात तऱ्हेतऱ्हेची पाखरं येतात इथं. बघून पारणं फिटतं नजरेचं.

(दोघे पुढे जातात जोडीने. पक्ष्यांचे अस्पष्ट आवाज.)

[हिंदुराव आणि खादीधारी एका देवळात. घंटा बडवून हिंदुराव देवाचा जयजयकार करतात.]

**हिंदुराव** आम्ही तिगस्ता बांधलं हे देऊळ.

[हिंदुराव आणि खादीधारी एका मळ्याच्या बांधावर.

हिंदुराव आपल्या कर्तृत्वाची कहाणी खादीधारीला अतिशय मनापासून सांगत आहेत. ही त्यांची मूळ जमीन.

खादीधारी ऐकतो आहे. ऐकताना करंगळी दाखवून 'आलो' म्हणून बाजूला जातो. खिशातून बाटली काढून एक घोट घेतो. बाटली खिशात ठेवतो. परत येतो.]

**हिंदुराव** (कर्तृत्वाची कहाणी पुढे चालू.)

**खादीधारी** म्हणजे एक जादूचा महान प्रयोगच केलात म्हणायचा तुम्ही मालक. प्रथम होती, इतकी जमीन. बघता बघता तिची झाली ही इतकी जमीन. मग ही इतकी. आणि मग हीऽऽऽ इतकी. मग या जमिनीतून निघाली मल्टिपरपज बँक, त्यानंतर निघाली पोल्टरी, मग निघाली फॅक्टरी, शेवटी निघाली सहकारी डेअरी नि हायस्कूल नि वाचनालय नि काय काय. वहाव्वा. पण मग त्या वाढलेल्या जमिनीवरचे छोटे शेतकरी कुठे गेले ? भुर्र उडून गेले.

(हिंदुरावांच्या मुद्रेवर रागाचा स्पष्ट भाव.)

**हिंदुराव** त्यान्ला योग्य भाव देऊन जमिनी विकत घेतल्या आपण.

**खादीधारी** अर्थात, योग्य भाव म्हणजे आपल्या मते योग्य वाटेल तो भाव.

**हिंदुराव** (चिडून) मास्तर.

**खादीधारी** (शांतच) रागावलात आपण ?

**हिंदुराव** (स्वतःला आवरत) रागाला आणलं तुम्ही आम्हांला.

**खादीधारी** द्याल ती शिक्षा मान्य आहे. काय करणार. जुनी खोड आहे. स्वतःलासुद्धा सोडलं नाही. नको ते प्रश्न, नको त्या शंका, विचारणारच. (स्वतःला मारून घेत) नतद्रष्ट कुठला.

**हिंदुराव** ऱ्हाऊ द्या मास्तर. आपला हात आपल्याला लागत नसतो. पण तुम्ही कुठले, कोण काय सांगतच नाही तुम्ही आम्हांला. आमच्या पोटात शिरता पण स्वतःच्या ओठाला कुलूप. काय हाय काय प्रकार ? सांगा की.

**खादीधारी** (अवसान घेऊन) मालक, आपण आपकमाईचे थोर तर आम्ही बापकमाईचे थोर. आमची मोठी प्रचंड वडिलार्जित इस्टेट होती. तुमची इस्टेट म्हणजे तिच्यासमोर कस्पटासमान. बद्रीकेदारपासून कन्याकुमारीपर्यंत आणि आसामपासून सिंधपर्यंत आमची इस्टेट पसरली होती. आज ? सगळी गेली. हुशार मंडळींनी आपसात भांडून भांडून, डावपेच, लांड्यालबाड्या करून वाटून घेतली. आम्ही इस्टेटीविना उरलो, मालक, भणंग एकदम. ओसाडगावचे राजे. राजा भिकारी. पण आम्हीदेखील एक दिवशी तुमच्यासारखे बडे जमीनदार होणार आहोत. शेवटी देहाच्या या साडेतीन हात इस्टेटीची चिमूटभर किंमत आम्ही जमिनीतच गुंतवणार. तेवढी जमीन मग आमचीच की. आम्ही तिचे राजे. आता जरा आम्ही तुमची रजा घेऊ का? (करंगळी दाखवतो) मालक, निसर्गाची हाक आम्हांला आली आहे.

(खादीधारी आडोशाला जाऊन खिशातल्या बाटलीतली दारू पुन्हा घाईने ढोसून येतो. हिंदुरावांना हे दिसते आहे.)

**हिंदुराव** मास्तर, कुणाला फसवता ?

**खादीधारी** खरं म्हणजे कुणालाच नाही. प्रयत्न म्हणाल तर स्वतःलाच फसवण्याचा असतो.

**हिंदुराव** दारू वाईट, मास्तर. तिचा एकेक घोट मरण जवळ आणतो माणसाचं. इतके शहाणेसुरते तुम्ही. तुम्हांला आम्ही सांगावं ?

**खादीधारी** यशस्वी माणसांनी आम्हांला काहीही सांगावं, त्याचा तो हक्कच असतो. आणि दारूचा एकेक घोट मरण फारसं जवळ आणत नसावा, मालक. किंवा आमचं मरण एकेक घोटानं जवळ येत येत बेटं आमच्या अंगावरून अशी अल्लद उडी मारून सरळ पलीकडे निघून गेलं असावं.

**हिंदुराव** मरणाची तुम्हांला इतकी का घाई ?

**खादीधारी** मालक, कुणाला सांगणार नाही ? वचन द्या. (वचन घेऊन) मरणाची आम्हांला का घाई. तर ते आमचं एक महान गुपित आहे. आणि तुमच्या सगळ्या यशस्वी हुशारीसकट आणि जबरदस्त महत्त्वाकांक्षेसकट नि सत्तेसकट तुम्ही किती प्रयत्न केलेत तरी तुम्हांला ते नाही कळणार. (मुद्रेवर मिष्किल हसू.)

(हिंदुराव त्रासलेले. मळ्यावरच्या कोणा माणसाला हाकारीत तिकडे निघून जातात. खादीधारी दारूची बाटली तोंडाला लावतो.)

[प्यायलेला खादीधारी गावातून झुकत झुकत चाललेला. सर्जेराव आणि त्याचे साथीदार समोरून येतात किंवा तिठ्यावर उभे दिसतात.]

**खादीधारी** (सर्जेरावला गाठून) नमस्कार.

(सर्जेराव त्याच्या कुर्ऱ्यात नमस्कार करतो.)

**खादीधारी** आपण भारीच उद्धट दिसता. आम्ही आपणाला एक नमस्कार करतो आणि आपण तो आम्हांला चक्क परत करता ? (सर्जेराव गोंधळलेला.)

**खादीधारी** छे छे छे, आपणासारख्यांना हे शोभत नाही. जाऊ द्या. आपणाला वेगळंच विचारण्याचं मनात होतं. उत्तर द्याल ? देणार असलात तरच विचारू. आधी कबूल करा.

**सर्जेराव** (मिशीवर ताव मारीत) काय हाय? देऊ उत्तर. इचार.

**खादीधारी** थँक यू. (त्याच्या तोंडाजवळ तोंड नेऊन) आपल्या सुंदर बिनडोकपणाचं रहस्य काय ?

(सर्जेराव बिथरलेला)

**खादीधारी** हां, आता उत्तर टाळून चालणार नाही. तुम्ही आम्हांला वचन दिलेलं आहात.

**सर्जेराव** (दात, ओठ चावीत) जा ए थेरड्या, म्हातारड्या, गुमान वाटंनं जा आपल्या. दारूडं सालं. एक_ लाफ्याचं न्हाई आणिक बकबक करतंय. चल जा तिकडं न्हाई तर—.

(इतरही अवसान आणतात.)

**खादीधारी** (खट्याळ मुद्रेनं) नका देऊ उत्तर, आम्ही काढू शोधून तुमचं गुपित. आम्ही ते प्रकाशात आणू. आणि आम्हीसुद्धा तुमच्यासारखे बिनडोक होऊन दाखवू...

(खादीधारी झुकत झुकत जातो. हिंदुरावांचा माणूस असल्याने सर्जेरावाला काही करता येत नाही. तो नुसताच रागाने बघतो आहे खादीधारीकडे.)

[हिंदुरावांच्या वाड्याच्या चौकात शिकारी कुत्र्यांशी खेळणारा खादीधारी. नशेतच आहे. कुत्र्यांशी बोलतो आहे. कुत्री त्याचे गालबील चाटताहेत]

**खादीधारी** (कुत्र्यांना) तर, आपली भारतीय संस्कृती. ही जगातली एक उच्च संस्कृती आहे. उच्च म्हणजे फार उच्च. इतकी की कोणालाच नक्की समजलेली नाही. पण न का समजेना. काय ? ते श्रेष्ठच. समजत नाही तर श्रेष्ठ. तर हा भारतीय संस्कृतीचा अभिमान—तो आपल्याला असला पाहिजे. किती अभिमान, तू सांग. जाज्वल्य. जाज्वल्य म्हणजे ? म्हणज़े ज्वलंत. ज्वलंत म्हणजे ? तू—तू सांग. बरोबर. कुणी नाव ठेवलं की असा संताप आला पाहिजे. गुर्रर...आणि तू रे गुलामा, असंस्कृत कुठला. शेपटी काय हलवतोस यावर ?

(वाड्यावरचे नोकर दुरून पाहून करमणूक करून घेताहेत. साहेबराव—हिंदुरावाचा मुलगा—हे पाहतो.)

**साहेबराव** ए म्हाताऱ्या, दूर हो बघू. घाणेरडा माणूस कुठला.

**खादीधारी** हां, धाकटे मालक, हा अपमान होतो आहे, मी माणूस नसून कुत्रा आहे पट्ट्याशपथ. (भुकून दाखवतो)

(नोकर फिदीफिदी हसतात.)

**साहेबराव** तू वेडा आहेस वेडा. दारुड्या कुठला.

(साहेबरावांची आई हे ऐकून आडोशाने :

'साहेबराव, आत या बरं. कोणाच्या पण नादी लागणं बरं नाही. या आत आधी.'

साहेबराव तिकडे जातो.)

**खादीधारी** (कुत्र्यांना) भली जिरली लेकाच्याची. आता त्याची आई त्याला रागवेल. दे टाळी.

(कुत्रे विलक्षण आक्रमकपणे खादीधारीच्या अंगावर येते.
खादीधारी घाबरून हाताआड लपलेला. अंगाला कंप.
नोकरमंडळी फिदीफिदी हसताहेत.)

[वाडा.
नोकराला खादीधारी विनवतो आहे.]

**खादीधारी** आणखी एक बाटली आणून दे. फक्त एक.

**नोकर** मालकाचा हुकूम न्हाई.

(खादीधारी त्याचे पाय धरतो. नोकराला विचित्र वाटते. कसाबसा पाय सोडवून घेतो. जातो. खादीधारी भकास हसतो. लपवलेली बाटली काढून तोंडाला लावतो.)

[वाड्याची सदर. सकाळ. हिंदुरावांच्या भेटीसाठी नेहमीप्रमाणे दरबार भरला आहे. हिंदुराव नाहीत. प्यायलेला खादीधारी सर्वांसमोर येऊन थोडा तमाशा करतो. प्रथम सगळे गोंधळलेले. मग करमणूक करून घेतात.
खादीधारीचे झिंगले गाणे. गाणे संपताच टोपी उलटी धरून प्रत्येकापुढून फिरतो.]

**खादीधारी** गरीत्र भिकारी आहे मायबाप, काय दया करा मायबाप, आंधळा आहे मायबाप. रोगी आहे...

(कोणी नुसतेच ओशाळे हसतात. कोणी अवघडून पैसे टाकतात. कोणी खोःखो हसतात.
हे चालले असता हिंदुराव पोचलेले.
हे पाहतात. त्यांच्या नसा चढतात.)

**हिंदुराव** मास्तर !

(खादीधारी वळतो.
इतर सर्व बावचळून बघत आहेत, काय होणार ?
खादीधारी तसाच पुढे होतो. उलटी टोपी हिंदुरावांपुढे धरतो.)

**खादीधारी** भिकारी आहे मायबाप. काय पाच पैसे, दहा पैसे—देव तुम्हांला उदंड दील—पिर्थवीचं राज्य दील—घरदार सोन्यानं मढवील तुमचं—भीक घाला गरिबाला. महारोगी आहे—

(हिंदुरावांना किंचित्काल काही सुचत नाही.
वातावरण तंग.)

**खादीधारी** तुमची पोल्टरी आणखी हजार कोंबड्यांनी वाढेल—आणखी दोन फॅक्टऱ्यांचे चेअरमन व्हाल तुम्ही—डेअरी तुम्हांला उदंड दील—सरकारकडून मायंदळ कर्ज मिळेल. सरकार, सत्ता मोप वाढेल तुमची.

(हिंदुराव खादीधारीच्या तोंडात भडकावतात.
खादीधारीने गालफड हाताने गच्च धरलेले. चष्मा उडालेला. हिंदुराव पुढल्या क्षणी संयम आणतात. उडालेला चष्मा स्वतः उचलून, पुसून खादीधारीला परत करतात.)



**हिंदुराव** जा तिकडे आत. गुमान रहा. उगाच दहा लोकांत मस्करी करण्याची हौस.

(गालफड धरूनच खादीधारी निघून जातो.

हिंदुराव बैठकीत येऊन बसतात. कामे करू लागतात. पण अस्वस्थ. नातू दुडदुड धावत बैठकीत येतो. त्याला मांडीवर घेऊन कामे करू लागतात. मुद्रा अस्वस्थच.)

[वाडा. दुपार.

हिंदुराव पाटावर, जेवण्याला बसलेले. पान वाढलेले. बायको वारा घालते आहे. हिंदुराव अस्वस्थ.]

**हिंदुराव** (बायकोला) नोकराला हाक मारा जरा. महादू...(नोकर येतो.) मास्तरांना सांग बोलावलंय.

**बायको** कशाला ?

**हिंदुराव** तुम्ही यात पडू नका. दुसरं पान वाढा इथं.

(बायको नाराजपणे घुटमळते.)

**हिंदुराव** (घुटमळणाऱ्या नोकरावर) जातोस का हाणू एक.

(नोकर भेदरून पळतो. हिंदुरावांची बायको तीव्र नाराजीनेच स्वयंपाकघराकडे जाते. वाढलेले ताट घेऊन सून येते. पाट मांडते. जाते.

खादीधारी झुकत झुकत येतो. डोक्यावर वर्तमानपत्राच्या कागदाची विदूषकासारखी उंच टोपी. मुद्रा गंभीर.)

**हिंदुराव** (त्याचे सोंग पहात) हे काय.

**खादीधारी** आपण बोलवलंत.

**हिंदुराव** ते डोकीवरचं शिपतर काढा.

**खादीधारी** हा आमचा राजमुकूट आहे.

**हिंदुराव** (चढणारा पारा आवरत) मास्तर, तुमचं पोरकट वागणं संपणार तरी केव्हा ? काढ ते डोकीवरचं.

**खादीधारी** मुस्कटात आणखी एक माराल तर काढू.

(खादीधारीच्या मुद्रेवर मिष्किल, भकास स्मित.)

**खादीधारी** सकाळी या मुस्कटात मारलीत, आता या मारा. म्हणजे फिटंफाट.

**हिंदुराव** मास्तर, सकाळी दोष तुमचा होता.

**खादीधारी** होताच.

**हिंदुराव** तमाशा केलात तुम्ही. सर्वांसमक्ष भिकाऱ्यासारखे आमच्याशी वागला तुम्ही. वागला का नाही ?

**हिंदुराव** कृपा आमची कसली मास्तर. कृपा त्याची. काय जास्ती-कमी लागलं तर कळवत जा वाड्यावर. सोय केली जाईल.

(खादीधारी वाकून उभा. मुद्रेवर अति लीन भाव.

हिंदुराव पुढे निघतात. बरोबर मंडळी.)

**हिंदुराव** चांगला देशभक्त माणूस पण दारूनं वाया चालला होता.

(सगळे माना हलवून खादीधारीविषयी सहानुभूती दाखवतात. मागे कुठे तरी खादीधारीची आकृती दिसते आहे. खादीधारी पुन्हा कामाला लागतो.

भोवती संभाषणे चालू आहेत :

देवमाणूस. तो आहे म्हणून आपण आहो.

गोरगरीब अन्नाला लागले. कामं मिळू लागली. नाहीतर काय होतं आपल्या या भागात.

क्रांती केली हिंदुरावानं.

आता माणूस आहे तिथे दोष असायचाच.

दोष नाही कोणात, म्हणतो मी...

अरे चंद्रावर पण डाग हायच की.

हा तर माणूस. त्यात कर्तबगार.

ज्याची ताकद मोठी त्याच्या चुका पण मोठ्याच असणार.

रक्त लई गरम असतं अशा माणसाचं. सणक आली की तुकडाच पाडणार.

कसं बोलला.

मारुती कांबळे...(यापुढचे शब्द अस्पष्ट होतात.)

मारुती कांबळ्याला...(पुढचे शब्द अस्पष्ट होतात.)

खादीधारी या उल्लेखासरशी काम सोडून पाहू लागतो. कान टवकारतो. पण कुजबुते झालेले संभाषण त्याला ऐकू येईनासे होते.)

**खादीधारी** (स्वतःशीच) मारुती कांबळे...पुन्हा मारुती कांबळे—कोण हा ? कुठे ऐकलं याचं नाव ? काय संदर्भात ऐकलं ? छे. आठवत नाही. ऐकलं निश्चित. मारुती कांबळे... (विचारमग्न खादीधारी यांत्रिकपणे कामात.)

[संध्याकाळ. माणसे फार्मवरून बाहेर पडत आहेत. गेटशी सर्जेराव उभा राहून माणसे न्याहाळतो आहे.

सर्जेरावाविषयी नजरेनजरेत नफरत आणि भय.

खादीधारी बाहेर पडू लागतो.]

**सर्जेराव** (कुत्सितपणे) काय मास्तर, बरं हाय न्हवं ? (खादीधारी या प्रश्नानेच सर्जेरावाची दखल घेतो. थांबतो.)

**खादीधारी** आपल्या दयेने.

(काही सुचून खादीधारी सर्जेरावाकडे येतो.

अगदी जवळून)

काय हो, मारुती कांबळे कोण ?

(सर्जेरावाच्या मुद्रेवर एकदम मोठा बदल.

दारूने नेहमीच कुंद असलेल्या नजरेने खादीधारी सर्जेरावाकडे एकटक पहातो आहे. चेहऱ्यावर केवळ चौकसपणा.)

**खादीधारी** नाव तर ऐकल्यासारखं वाटतं. पण कधी, कसं, तेच स्मरत नाही...

(सर्जेराव गडबडीने दुसरीकडे जातो.)

**खादीधारी** (तो गेल्याचे पाहत पुटपुटतो) मरेना का, तुला का चौकशी. आता घोटभर घ्यायची. मकाणी जायचं. आडवं व्हायचं. की संपला आणखी एक दिवस. चला.

(खादीधारी चालू लागतो.

त्याच्या दूर जाणाऱ्या आकृतीकडे पाहून सिगरेटचे थोटूक विझवून फेकणारा सर्जेराव. मुद्रेवर बेचैनी.)

[रात्र. झोकांड्या खात 'वैष्णव जन...तो' बरळत खादीधारी त्याच्या मकाणाच्या दाराशी पोचतो.

दाराला कुलूप नाही.

कडी काढण्यासाठी खादीधारी चाचपडत कडी शोधतो. कडी काढल्याची हालचाल करतो. कडी घातलेलीच नाही. दार केवळ लोटलेले.

खादीधारी दार उघडतो.

आत कंदील तेवत असलेला. घर नीटनेटके लावलेले.]

**खादीधारी** (पुटपुटत) अरेच्या...नाही नाही. ही आपली धर्मशाळा नाही.

(खादीधारी परत फिरतो तर दाराशी एक मध्यम वयाकडे झुकलेली, बांधा सैल होऊ घातलेली, मूळची बांधेसूद मराठमोळा बाई येऊन उभी. हनुवटीवर गोंदलेला तीळ.)

**बाई** आतमंदी चला. पाय धुवायला पानी देती.

(खादीधारी अविश्वासाने, आश्चर्याने पाहत राहतो.)

**खादीधारी** पण मी तो नाही. छे; घर चुकलोच.

(खादीधारी पुन्हा दारावाटे बाहेर जाऊ पाहतो.)

**बाई** (अडवीत) असं काय ते. आपलंच घर हाय हे.

**खादीधारी** (पाहण्याचा प्रयत्न करीत) शक्य नाही. शक्यच नाही.

**बाई** मी केरकचरा काढून लावलं हाय घर.

(खादीधारी अस्वस्थ झालेला.)

**खादीधारी** (नशेतच निकराने) कुणाच्या हुकमानं ?

**बाई** (मर्यादेने) कामाला ठेवली हाय मला तुमच्याकडे.

**खादीधारी** कुणी ? आम्हांला काहीच आठवत नाही...

**बाई** वाड्यावरनं धाडली मला.

**खादीधारी** वाड्यावरनं ? कुणाचा वाडा. चांदोबाचा ?

**बाई** धोंडे-पाटलांच्या वाड्यावरनं. तिथेच कामाला हाय मी.

(खादीधारीची नशा काहीशी उतरते. डोके तापू लागते.)

**खादीधारी** त्याचा काय संबंध ? काम करून जगतो आम्ही. आमचे निर्णय ते कसे घेतात ?

**बाई** ते मला काय ठावं न्हाई. मला हुकूम झाला. मी आली. पाटील म्हणाले, एकटा माणूस हाय, व्यसनापाई वाया चालला हाय, काळजी घेणारं कोन न्हाई त्याला. तू सांजची जात जा.

**खादीधारी** (चांगलाच तापलेला) उपकाराचा दिमाख दाखवितात आम्हांला शेठ हिंदुराव. आमची कीव करतात कीव. आमच्या खासगी जगण्यावरसुद्धा आक्रमण करतात. तेसुद्धा त्यांच्या मालकीचं.

जा अशाच तुम्ही परत. आभार कळवा त्यांना आमचे. येऊ नका परत. नमस्कार.

(खादीधारी नमस्कार करतो बाईला. बाई गोंधळलेली.)

**बाई** म्हनता तर परत जाते मी.

(ती वळते. खादीधारीची नजर तिच्यावर आता नीट फिरते. तो दारात. ती त्याच्या पुढ्यात. तो बाजूला झाल्याशिवाय ती बाहेर जाऊ शकत नाही. तिच्यावर कंदिलाचा मंद प्रकाश. तिचा पदर ओघळलेला. त्याचा श्वासोच्छ्वास वाढतो.

ती त्याची जागी झालेली वासना जाणवत अधोमुख.

तो आता खांद्यावर हात ठेवतो. त्याचा हात तिच्या गालावरून, मानेवरून फिरतो.

तो झटक्याने तिला जवळ खेचतो. कवटाळतो.

तसाच तिला पाहतो आहे. त्याचे सर्वांग थरथरते आहे.)

**खादीधारी** (बाईला सोडत पुटपुटतो) रहा तू...रहा.

(बाई दूर झालेली. वळून आतल्या दिशेने लांब जाते.)

**खादीधारी** आमच्या अधःपाताच्या ग्रंथात हेही प्रकरण हवंच...इष्क...आजवरच्या

विरक्तीला वासनेचा हा ताजा कलम फार शोभून दिसेल.
(खादीधारीच्या नजरेत त्वेष.)

[रात्र.
खादीधारी लहान मुलासारखा गाढ झोपलेला. तोंड उघडे.
कण्हतो आहे.
पलिकडे दारूची बाटली. बाई त्याचे पाय चेपते आहे.
तिच्या मुद्रेवर त्याच्याविषयीची कणव.
हलकेच उठून ती त्याच्या अंगावर पांघरूण घालते. कंदील बारीक करते.
बाहेर पडते.दार लोटून घेऊन.
गाढ झोपून कण्हणारे मास्तर.]

[सकाळ.
दारूची बाटली. आवाज. गीताईचे अस्पष्ट सामुदायिक गायन धीरगंभीर स्वरात चाललेले.
मग बिछान्यातला खादीधारी दिसतो. झोपेत चाळवतो आहे. पण डोळे मिटलेले. हळूहळू जाग येते आहे. घरात दुसरे कोणी नाही. डोके झटक्याने झाडून डोळे उघडून खादीधारी उठून बसतो. घराकडे पाहतो. दाराला कडी नाही. ते नुसतेच लोटून घेतलेले. आता खादीधारीच्या डोक्यात रात्रीचे सर्व येते.]

**खादीधारी** (नुसतेच शब्द. ओठांची हालचाल नाही.) कधी झोप लागली कळलंच नाही. ते इष्क वगैरे राहून गेलं. रात्र संपलीच.
(दारूच्या बाटलीकडे लक्ष जाते. ती तोंडाला लावतो.)
आणि हा मारुती कांबळे कोण. शोध काढलाच पाहिजे. फार त्रास देतोय गुलाम. मेंदूला झटून राह्यलाय जसा.
(चुळा भरण्यासाठी झुकत झुकत जातो.)

[दिवस.
पोल्ट्री फार्म.
हिंदुराव व्यवस्थापकाशी बोलत येतात.
एक गडी आदबीने चिठ्ठी देतो.



हिंदुराव बोलता बोलताच चिठ्ठी उघडून वाचतात. बोलणे सोडतात. त्यांच्या मुद्रेवर हसू येते. मग एकदम गंभीर होतात.

चिठ्ठीतील मजकूर :

दोन शंका, जमल्यास उत्तर अपेक्षित : (१) इष्क करण्यासाठी रात्री जागे कसे रहावे ? (२) मारुती कांबळे कोण ? आभार.

नम्र सेवक, मास्तर.

हिंदुरावांची अस्वस्थ नजर बऱ्याच अंतरावर कामात दिसणाऱ्या खादीधारीला न्याहाळते. आता बोलण्यात हिंदुरावांचे लक्ष नाही. ते पेन मागून घेतात.

चिठ्ठीच्या पाठीवर लिहितात : संध्याकाळला वाड्यावर भेटावे. सर्व खुलासा होईल.

चिठ्ठी गड्याकडे परत देतात. तो जातो.

हिंदुरावांचा अस्वस्थ चेहरा. मागे त्यांना काहीशा अचंब्याने पाहणारे व्यवस्थापक. हिंदुराव पुन्हा कामाचे बोलू लागत पुढे निघून जातात. मागोमाग व्यवस्थापक.]

[देऊळ. संध्याकाळ.

घंटा बडवणारे हिंदुराव. कडेवर नातू. त्याच्या हाताने घंटा बडवतात. तो आनंदित. हिंदुरावांची मुद्रा बेचैन, ताठर.

कोणी तरी वाकून नमस्कार करते. हिंदुरावांचे लक्ष नाही.

देवळातून कारमध्ये जाऊन बसतात. कार सुरू...]

[संध्याकाळ. वाडा.

गच्चीवर हिंदुराव फेऱ्या घालीत आहेत. मुद्रा बेचैन आणि तंग. चौकात सर्जेराव शिकारी कुत्र्यांना उगाच छळताना दिसतो. कुत्री त्याच्या अंगावर जातात पण पट्टे बांधलेले.]

**हिंदुराव** सर्जेराव, का उगा छळता कुत्र्यान्ला ? काय काम नसेल तर काढा जा जोरबैठका.

(सर्जेराव अनिच्छेनेच कुत्र्यांचा नाद सोडतो. दिंडीकडे जातो. तो दिंडीदरवाजावाटे बाहेर पडत असता खादीधारी झुकत झुकत येऊन पोचलेला.

सर्जेरावाला तो वाकून नमस्कार करतो. वाड्यात शिरतो. सर्जेराव मिशीवर ताव मारीत बाहेर गेलेला. त्याच्या नजरेत दाट संशय आणि नफरत.

हिंदुराव वरून सर्व पाहत आहेत.

खादीधारी आता कुत्र्यांनाही लवून नमस्कार करतो. तेवढ्यात नोकर चौकात जातो.)

**खादीधारी** (त्यालाही लवून नमस्कार करतो, विचारतो) आहेत ना मालक ?

(नोकर उत्तर देतो. खादीधारी जिन्याकडे अदृश्य.

खादीधारी गच्चीत येतो. धाप लागलेली. खोकल्याची उबळ. पाठमोरे हिंदुराव त्याला दिसतात.

हिंदुराव वळतात.

खादीधारी वाकून नमस्कार करतो.

हिंदुरावांच्या मुद्रेवर काही दिसत नाही.)

**हिंदुराव** (किंचित्काळ नुसतेच पाहून) चिठ्ठी मिळाली तुमची.

**खादीधारी** उत्तराबरहुकूम आलो.

**हिंदुराव** वाड्यावर बोलावण्याचं कारण आलंच असेल लक्षात.

**खादीधारी** हो. प्रश्न खाजगी असल्याने.

**हिंदुराव** हुशार आहात.

**खादीधारी** आपणाहून फार कमी.

**हिंदुराव** आमची हुशारी सरळ—नाकासमोर चालणारी.

**खादीधारी** आमची एका जागी फिरणारी.

**हिंदुराव** पण तुमचं नाक आजकाल फार चालतंय.

**खादीधारी** नाक ? आमचं ? चष्म्याला खुंटी केवळ.

**हिंदुराव** पण ही खुंटी जरा लांब झालीय.

**खादीधारी** असं म्हणायचे आमचे आईवडील आमच्या लहानपणी. म्हणायचे बाणेदारपणाचं लक्षण आहे. फसले बिचारे.

**हिंदुराव** काय घेणार ?

**खादीधारी** कशाबद्दल ?

**हिंदुराव** घरची पद्धत हाय आमच्या. पाहुणा आला की त्याचा पाहुणचार यथायोग्य झालाच पाहिजे. चहा, कॉफी, दूध, काय घेता ?

**खादीधारी** पाणी द्या. तहान फार लागते हल्ली.

**हिंदुराव** (नोकराला बोलावून) पाहुण्यान्ला सरबत आणून दे. (नोकर जातो.)

**खादीधारी** मग चिठ्ठीतल्या प्रश्नांची उत्तरं ? ती महत्त्वाची.

**हिंदुराव** (सावध आणि ताठर होऊन) आधी तुमच्या दुसऱ्या प्रश्नाचा जबाब देतो.

**खादीधारी** चालेल. आपल्या सोयीनं जसं जमेल तसं.

**हिंदुराव** मास्तर, तो प्रश्न तुम्ही विचारला नसता तर बिघडलं नसतं.

**खादीधारी** बिघडलं म्हणूनच विचारला.

**हिंदुराव** काय बिघडलं ?

**खादीधारी** आम्हांला चैन कशी ती पडेना. जित्याची खोड म्हणतात ना. एकदा एक गोष्ट काही कारणाने डोक्यात बसली की बसली. निघायची म्हणून नाही.

**हिंदुराव** मास्तर, त्या गोष्टीचा आणिक तुमचा संबंधच काय ?

**खादीधारी** तसं म्हटलं तर तुमचा आमचा संबंध तरी काय ? पण तो आला.

**हिंदुराव** काही संबंध फार वाढवू नयेत मास्तर.

**खादीधारी** उदाहरणार्थ ?

**हिंदुराव** तुमचा प्रश्न. तुमचा दोन नंबरचा प्रश्न.

**खादीधारी** म्हणजे मारुती कांबळे.

(नोकर सरबत घेऊन येतो.)

**हिंदुराव** (स्वर तापलेला) मास्तर—

(नोकर आल्याने स्वतःला सावरतात. खादीधारी हे पाहतो. नोकर गेलेला.)

निवडुंगाच्या जाळीत उगा पाय घालू नये शहाण्या माणसानं. पस्तावा होतोय.

**खादीधारी** आमच्या कानी सात खडे. आयुष्यभर निवडुंगच तुडवला आम्ही, मालक. आमची गणती तुम्ही म्हणता त्या वर्गात कधी नव्हतीच. आम्ही गाढव—जन्मजात आणि भलेथोरले गाढव. आमच्या पस्ताव्याची चिंताच करू नका. आता सांगून टाका एकदाचं. कोण हा मारुती कांबळे. त्याचं काय झालं. गुलाम आम्हांला भारी सतावून राहिला आहे.

**हिंदुराव** मास्तर, तो होता एकजण. त्याचं तसं काही नाही. म्हणजे काय विशेष.

**खादीधारी** नाही कसं ? मग लोक काय उगाच त्याच्याविषयी इथेतिथे कुजबुजतात ?

**हिंदुराव** (चमकून, उग्र मुद्रेने) लोक ?

**खादीधारी** हो. म्हणजे या भागातलीच माणसं. गेल्या काही दिवसांत इतक्या वेळा मारुती कांबळे नाव कानावर पडलं आमच्या की आम्हांला वाटू लागलं, हा आहे तरी कोण पुरुषावतार ? नाही म्हणजे याला निदान एकदा साक्षात पहायला तरी हवाच.

**हिंदुराव** (त्रासलेले) काय बोलतात लोक ?

**खादीधारी** नेमकं विचारलंत. काय बोलतात ? तेच तर ऐकू येत नाही. नाव मात्र कानावर पडतं. कुणाला वाटेल काही भलंमोठं रहस्य आहे मारुती कांबळे नावाचं.

**हिंदुराव** आमचा काय संबंध त्यात ?

**खादीधारी** काहीच नाही. असला तर निदान आम्हांला ठाऊक नाही.

**हिंदुराव** (संशयाने) मग आम्हांलाच हा प्रश्न तुम्ही विचारला कसा ?

**खादीधारी** (हसत) अहो त्याआधीचा विचारला म्हणून. गावात येऊन-जाऊन आपणच

आमच्या तसे परिचयाचे. आमच्या दृष्टीने विश्वासाचेसुद्धा. म्हणून आपल्याला विचारला. पण मग मारुती कांबळे असतो कुठे ? कुठे भेटतो तो ?

**हिंदुराव** कशाला ?

**खादीधारी** बघा. म्हणजे आपण तर अगदी वेड घेऊन पेडगावला निघालात की. कशाला म्हणजे भेटण्यासारखा असला तर भेटू त्याला एकदा. विचारू की, बाबा तुझं एवढं नाव सर्वांच्या तोंडी होण्याएवढं तू केलंस तरी काय ? का तुझ्याबद्दल एवढा बोलबाला ? तोदेखील साधा नव्हे. तेरी भी चूप मेरी भी चूप पद्धतीचा.

**हिंदुराव** मास्तर, माणसानं सुख हवं असलं तर आपलं काम भलं की आपण भले असं सरळ लायनीत जगावं. खावं, प्यावं, बिनधास्त झोपावं. उगा भलत्या फंदात पडू नये.

**खादीधारी** आपण बत्तीस वर्षं उशिरा भेटलात, मालक. योग्य वेळी भेटून हा सल्ला देतात तर कदाचित उपयोग झालासुद्धा असता.

**हिंदुराव** उशिरा कशानं. आता रहा की लाइनशीर. कसली तकलीफ हाय तुम्हांला मग ? आम्ही आहोत तुमच्यामागं. मास्तर, आमच्या मनात तुमच्याकरता मोठ्या योजना आहेत.

**खादीधारी** असं ?

**हिंदुराव** त्यासाठी तुम्हांला ठेऊन घेतलं की. आता सांगतो तुम्हांला. माणसाची चांगली पारख हाय आम्हांला. तुमची बुद्धिमत्ता, तळमळ, आपल्या देशाबद्दलचा तुमचा अभिमान तेव्हाच ओळखला आम्ही.

**खादीधारी** वा, वा..आमचे सर्व दुर्गुण अचूक हेरलेत मालक तुम्ही.

**हिंदुराव** मास्तर, आमच्या या भागात कष्ट करण्याला लागतील तितके आहेत. इथे वाण हाय बुद्धीची. आणि शिक्षणाची. सगळे अंगठेबाज. तुम्ही आमच्या इथं चांगले लाइनशीर राह्यलात—

**खादीधारी** लाइनशीर म्हणजे साधारणतः कसा ?

**हिंदुराव** कुणाच्या अध्यात मध्यात उगा न पडता, आपलं जे काय काम असंल तिथेच एकाग्रतेने ध्यान देऊन—

**खादीधारी** पण पिऊन की न पिता ? ते महत्त्वाचं आहे. पुन्हा इष्कबाजीचाही प्रश्न येईल.

**हिंदुराव** या वयात हे इष्कबाजीचं काय सुचायला लागलं तुम्हांला ? (गंभीर) तर, तुम्ही आम्हांला आम्ही म्हणतो तशी साथ द्या, आम्ही तुमच्या जिवावर इथं नव्या नव्या योजना काढू. पैशाचा सवाल नाही, सवाल बुद्धीचा हाय इथं. निष्ठेचा हाय. या भागामध्ये आणखी एक हायस्कूल निघायला हवं, कालेज झालं पायजे. एकादी मोठी साहित्यिक संस्था पण हवी. शहरात होतात ती झाडून सगळी संमेलनं आपल्या भागात एकेकदा झाली पायजेत. पाण्यासारखा पैसा खर्च करू आपण. आपल्या इथं एक प्रचंड लायब्री करायची, मास्तर. बाँबेपासूनचे विद्वान या लायब्रीत आले पायजेत, अशी एकेक पुस्तकं या लायब्रीमधी हवीत.

एअर कंडिशन करू ही लायब्री. कुठल्या पण पुस्तकाचं नाव घेतलं—मग ते इंग्रजीतलं का असेना—की ते आपल्या लायब्रीत असणारच. आमच्या मातुश्रींचं नाव द्यायचं या लायब्रीला—

**खादीधारी** वा, वा. ऐकून डोकं गरगरतंय.

**हिंदुराव** सांगण्याचा मतलब इतकाच की आमच्याशी इमानानं रहा. विश्वास पायजे तर बाकी सर्व होतंय. कोण काय म्हणलं तर कान बंद. लोकान्ला काय, तोंडात येईल ते बोलणार. तुम्ही त्याचा विचार करायचा नाही.

**खादीधारी** थँक यू, थँक यू. म्हणजे थोडक्यात मारुती कांबळे कोण ते आम्ही विचारायचं नाही, त्याला भेटायचं नाही. त्याचा विचारसुद्धा करायचा नाही.

**हिंदुराव** तूर्त इतकंच. मग दिवस जातील तसं आणखी पण लक्षात येईल तुमच्या.

**खादीधारी** (उठत) ठीक आहे मालक. तुम्ही दिलेल्या बहुमोल सल्ल्याबद्दल आणि केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आम्ही ऋणी आहोत तुमचे—

**हिंदुराव** बसा. अजून संपलं नाही.

(हिंदुराव खादीधारीच्या अगदी ज़वळ येऊन बसतात. आता त्यांचे रूप बदललेले. खादीधारीच्या खांद्याभोवती हात टाकतात.)

**हिंदुराव** मास्तर, तुमच्या एक नंबरच्या सवालाचं उत्तर बाकी हाय. आता आम्ही ते देतो. कडकडून भूक लागलेली असली म्हणजे झोप येती का ? येती का सांगा.

**खादीधारी** नाही येत.

**हिंदुराव** भूक कसकसली असते ?

**खादीधारी** अन्नाची असते, पैशाची असते, झालंच तर सत्तेची असते—ती भलतीच अनावर असते, सत्तेची भूक—

**हिंदुराव** देहाच्या भुका किती ?

**खादीधारी** दोन.

**हिंदुराव** शाबास मास्तर. यांतली कोणती पण भूक खरी कडकडीत चेतलेली असली का झोप लागेल तर शपथ.

**खादीधारी** म्हणजे आमची इष्काची भूक खरी चेतलेली नसते, असं तुमचं आमच्या प्रश्नाला उत्तर.

**हिंदुराव** कसं बोलला. तुम्हांला आम्ही चणे दिले, घरपोच केले, पण मास्तर ते चावायला तुमचे दात बळकट नाहीत. अती दारूनं झालं हे.

**खादीधारी** असं ? मग आता यावर उपाय ?

**हिंदुराव** आम्ही दाखवतो.

**खादीधारी** छे छे. तुम्हांला कशाला उगीच तसदी ? तुम्ही कामाची माणसं...

**हिंदुराव** कामाच्या माणसाला जास्तीच्या कामाचं ओझं नसतं मास्तर. खपून जातंय. त्यात एकदा आपलं माणूस म्हण्टलं म्हणजे त्याचं काम न करून कसं चालेल ? गुरवारला आमच्याबरोबर बाँबेला चला मास्तर...पहाटेला कारनं निघायचं.

[मुंबई. संध्याकाळ.

कार धावते आहे.

कारमध्ये हिंदुराव, खादीधारी.]

**हिंदुराव** (ड्रायवरला) आपल्या ब्लाकवर घे गाडी.

[हिंदुरावांचा मुंबईतला, करकरणाऱ्या जिन्यांच्या एका अंधाऱ्या बिल्डिंगमधला ब्लॉक. फर्निश्ड. भिंतींवर नग्न चित्रे.]

**हिंदुराव** (खादीधारीला) ती तिकडली खोली तुमची, मास्तर. घ्या, विश्रांती घ्या. मग बघू तुमच्या कामाचं.

(खादीधारी त्या खोलीत प्रवेश करतो. तिथे विलायती दारूच्या दोनतीन रिकाम्या बाटल्या, ग्लासेस. अस्ताव्यस्त बेड. सिगरेटची शिळी थोटके ॲशपॉटमध्ये साठलेली.

खादीधारीला हिंदुरावांच्या या जागेच्या स्वरूपाने विचारात पाडले आहे.

तो शबनम पिशवीतली दारूची बाटली काढून तोंडाला लावतो. बेडवर आडवा होतो.)

[कधी तरी दारावर टकटक. पुन्हा टकटक. हाका :

मास्तर, अहो मास्तर.

खादीधारी दचकून उठतो. काळोख पडलेला. जाऊन दार उघडतो. दारात एक अनोळखी व्यक्ती. हे वेगळ्याच पोशाखातले हिंदुराव. मुद्रा नेहमीसारखी गंभीर.]

**खादीधारी** (गोंधळून) कोण ?

**हिंदुराव** आम्हीच की, हिंदुराव.

**खादीधारी** ओळखलंच नाही.

**हिंदुराव** झाली का विश्रांती ? चला. बाहेर जाऊन येऊ.

(हिंदुराव दिवा लावतात खोलीतला.

खादीधारी कपडे करू लागतो. पुन्हा पुन्हा हिंदुरावांकडे पाहतो आहे.

नाइट क्लबसारखे हॉटेल. धूसर रंगीत प्रकाश.

गोंगाटाचे पाश्चिमात्य पॉप संगीत गात आहेत दोघेतिघे. वाद्यवृंद. तेथला वैशिष्ट्यपूर्ण गिऱ्हाइकांचा वर्ग. स्त्री-पुरुष. सिगरेटचा कोंदलेला धूर.

कोपऱ्यात हिंदुराव आणि खादीधारी. दोघांपुढे विलायती दारूची बाटली. ग्लास. हिंदुराव चिरूट ओढत आहेत. रंगीत प्रकाशात हिंदुराव आणखीनच विचित्र दिसत आहेत.)

एका उंच इमारतीवरचे गच्चीतले आलीशान हॉटेल. मंद संगीत.

हिंदुराव, खादीधारी एका टेबलाशी. हिंदुरावांपुढे बाटली, ग्लास.

आणि जेवणाच्या डिशेस दोघांच्याही पुढ्यात.)

**हिंदुराव** (हातात घेऊन कोंबडीचा तुकडा मोडीत) काय मास्तर, कसं वाटतंय ?

**खादीधारी** परलोकात पोचल्यासारखं.

**हिंदुराव** बघा. तुम्ही व्हिस्कीला तोंड लावलं नाही. आम्ही पाहिलंय.

**खादीधारी** स्वदेशीचं व्रत पूर्वी कधी तरी घेतलं ते सुटत नाही, मालक, जित्याच्या खोडी या.

(खादीधारी खिशातून देशीची बाटली काढून घोट घेतो.)

**हिंदुराव** आमचं आजचं सगळं बघून आश्चर्य वाटत असेल ना तुम्हांला.

**खादीधारी** तेवढं तरी वाटण्याला अवसर मिळाला म्हणजे वाटत आहे. नाही तर मघाच्याच हॉटेलातला तो संगीत नावाचा गोंगाट. वाटू लागलं होतं, उठूच नये तिथून. बरं चाललंय सर्व. कसला विचार म्हणून नाही. छान बधीरपणा आला होता मेंदूला. झपूर्झा गडे झपूर्झा...

**हिंदुराव** हे सगळं आम्ही अधनंमधनं करतो. का करतो ? कारण वासना म्हणजे एक जंगली वाघ हाय मास्तर, फार भयंकर वाघ. माणसं खाणारा वाघ. वाघाच्या तोंडी गेला तो संपला. या वाघावर खऱ्या मर्दानं स्वार व्हायचं असतंय, त्याच्या जबड्यात हात खुपसून बघायचा असतोय. आम्ही हे करतो बाँबेला येऊनः वासनेच्या वाघावर स्वार होऊन आम्ही थोडी सैर करतो. त्याच्या आहारी जात नाही. त्याच्यावर मांड टाकून त्याला हवा तसा फिरवतो. यानं आत्मविश्वास येतो आम्हांला.

(खादीधारी ऐकतो आहे. ऐकताना दारूच्या नशेने डोळे मिटून घेतो आहे किंचित्काळ. पुन्हा उघडतो आहे.

त्याच्या समोरचे अन्न तसेच. अस्पर्शित.

संगीत चालू.)

**हिंदुराव** (दारूने जडावलेला स्वर) कधी सांगितलं नाही आम्ही मास्तर. आता सांगतो. आमच्या घरी आम्ही सुखी नाही. माणसांत राहून आम्ही एकटे असतोय. कामात मन रमवतो पण मास्तर, एकटेपणा कमी होत नाही. म्हणून तुमची संगत आम्ही जोडली. तुम्हीच आमचे मित्र. बाकी आम्हांला मित्र नाही, मास्तर, सगळे हित साधणारे. बस्स, मागणारे. आम्हांला घाबरणारे. तुम्ही आम्हांला घाबरत नाही मास्तर म्हणून तुम्ही आमचे मित्र व्हाल, नाही तर शत्रू तरी व्हाल. आज तुम्ही आमचे कोण आहात ? कुणास ठाऊक. पण आम्ही तुम्हांला मित्र

मानतो मास्तर, मैत्रीला जागलं पाह्यजे तुम्ही आमच्या...

(तेवढ्यात कॅबरे सुरू होतो. हिंदुराव चिरूट ओढत पाहत आहेत.

खादीधारी अधूनमधून डोळे मिटून घेतो. पुन्हा मिटतो. त्याच्या उघड्या डोळ्यांना दिसणारा कॅबरे आणि मिटल्या डोळ्यांपुढे नाचणारे प्रकाशाचे झोत त्याच्या नजरेतून दिसतील तसे आळीपाळीने चित्रित व्हावे.

कॅबरे दिसत नाही तेव्हा मिटल्या डोळ्यांत शिरणाऱ्या नाचत्या प्रकाशझोतात चित्रविचित्र आकृती नाचू लागतात.

निगेटिव्हमध्ये बेचाळीसच्या लढ्याचे प्रसंग आणि साउंड ट्रॅक.

निगेटिव्हमध्ये फाळणी.

निगेटिव्हमध्ये काँग्रेसचे राज्यारोहण.

निगेटिव्हमध्ये महात्माजींचा खून.

हे सर्व कॅबरेच्या शॉट्सच्या अध्येमध्ये नाचत राहते.

एक बिझार सीक्वेन्स. यातच हिंदुरावांच्या मद्याने जडावलेल्या चेहऱ्याचे शॉट्स. खादीधारीचे बधीर, नाचते डोळे. इतस्ततः फिरणारी कॅबरे डान्सर.)

[ रात्र. कार. हिंदुराव, खादीधारी.]

**हिंदुराव** काय मास्तर, कशी होती बाई ? मस्त होती का नाही ?

**खादीधारी** (डोळे मिटून बसलेला) हं.

**हिंदुराव** तुम्ही बघूनच थकलेले दिसताय.

**खादीधारी** हं...

**हिंदुराव** अद्याप रात्र संपली नाही मास्तर, वाघावरची सैर अजून पुष्कळ बाकी हाय. इतक्यात कसे थकताय ? तुमच्या सवालाचं उत्तर हवं नव्हे तुम्हांला ?

(धावती कार.)

**हिंदुराव** (ड्रायवरला) थांबव जरा इथं.

(गाडी थांबते. बाहेर वेश्यांच्या मोहल्ल्यासारखे बकाल वातावरण.)

**हिंदुराव** (दार उघडीत) बसा मास्तर. आम्ही आलोच.

(हिंदुराव कुठे तरी जातात. खादीधारी बाहेरचे आयुष्य बघतो आहे. अर्धमिटल्या डोळ्यांनी. कानावर चित्रविचित्र ध्वनी. यात तबला, पेटी, पैंजण वगैरे. मध्येच डोळे किलकिले केले की समोरचे दृश्य आणखीनच एखाद्या चमत्कारिक स्वप्नासारखे होते.

कोणा तरी बाईचे एकसुरी रडणेही साउंड ट्रॅकवर येते आहे. आवाज कोवळा.

खादीधारी डोळे उघडत, किलकिले करीत विसावला आहे कारच्या सीटच्या पाठीवर.

आणि हिंदुराव बरोबर कोणाला तरी घेऊन येतात.)

**हिंदुराव** (दार उघडून) हां, बस आत, चल.

(एक तरुण मुलगी सेंटने माखलेली, नटलेली, आत खादीशेजारी बसू लागते लगटून.
खादीधारी अंग चोरून घेतो. नाकाशी हात.
मुलीमागोमाग हिंदुराव बसतात तिच्यापलीकडे. कार सुरू होते.)

[दिवस. कार गावाकडे निघाली आहे.
हिंदुराव पुन्हा त्यांच्या नेहमीच्या पोशाखात. शेजारी खादीधारी.]

**हिंदुराव** तुम्ही बुद्धिमान असाल मास्तर. पण मर्द नाही. तुम्ही दारूच प्या. वाघावर स्वार होण्याची हिंमत तुमच्यात नाही.

[गावातल्या एका उत्सवाच्या शॉट्सवर मधे काही काळ गेला आहे असे दाखवणे. या शॉट्समध्ये प्रामुख्याने हिंदुराव. कपाळी अबीरगुलाल. जमल्यास हाती चिपळ्या. इतरांबरोबर भजन म्हणत चालत आहेत.]

[पोल्टरी फार्म.
मॅनेजरच्या केबिनमध्ये खादीधारीला बोलावण्यात येते.
केबिनमधल्या हिंदुरावांच्या मोठ्या छायाचित्राला खादीधारी वाकून वंदन करतो.]

**खादीधारी** (पुटपुटतो वंदन करताना) यशस्वी माणसांना वंदन असो.

**मॅनेजर** या मास्तर, तुम्हांला बढती देण्याचं ठरलं आहे. तुम्हांला कॅशियरचं काम देण्यात आलं आहे.

**खादीधारी** (गोंधळलेला) पण त्यामुळे...

**मॅनेजर** पगार वाढणार ना तुमचा. उद्यापासून कॅशवर बसत चला तुम्ही. मी सूचना दिल्या आहेत तशा.

(खादीधारी विचारात.)

**मॅनेजर** चला तुम्ही.

(खादीधारी उठतो. मॅनेजर दुसऱ्या कामात. कोंबड्यांचा कोलाहल.)

दारूची बाटली तोंडाला लावणारा खादीधारी पुढे निघून जातो.]

[खादीधारीचे घर. रात्र.
पिऊन लुळा पडलेला खादीधारी वळकटीला टेकून.
त्याच्या घरी वाड्यावरून कामाला येणारी बाई त्याला बळेच भरवते आहे.]

**खादीधारी** (बरळतो आहे.) नाही, पुरे म्हणतो तर...आम्ही मानतो इश्क...तर तुम्ही आमच्या आई होता...तुम्ही आमची कमळी होता...हात् तुझी...वाघावर स्वार नाही होता येत. वाघ तुला चाटतो...नाही, आता बस्स...

(खादीधारी लहान मुलासारखा दातखीळ दाबून धरतो गच्च. बाई त्याला आता भरवूच शकत नाही. ती त्याचे तोंड पुसून घेते. वळकटी उघडून त्याला तिच्यावर झोपवते, पांघरूण घालते.)

**खादीधारी** (बरळतो) बढती मिळाली...मालकाची कृपा...आता मारुती कांबळे विसरा...आता पोट...बस्स...पगार...पगारवाढ...

(ती बाई खादीधारीचे पाय चेपते आहे. खादीधारी एकदम ओकतो. बाई उठून ते पुसून घेऊ लागते. लहान मुलासारखे ती खादीधारीला वागवते आहे. बाहेर पाऊस पडतो आहे अविरतपणे.)

[फार्म. मॅनेजरची केबिन. मॅनेजर, त्याचे सहकारी, पोलिस अधिकारी. मुद्रा गंभीर. खादीधारी झुकत झुकत येऊन समोर उभा राहतो. मुद्रा मद्यपी.]

**मॅनेजर** मास्तर, तुमच्यावर आम्ही जबाबदारी टाकली. पण तुम्ही दगा दिला. पैशाचा घोटाळा केला. चारशे अकरा रुपये पन्नास पैशांचं शॉर्टेज आलं आहे कालच्या कॅशमध्ये.

(खादीधारीच्या तोंडाला कोरड.)

**मॅनेजर** या पैशांचं काय झालं ?

(खादीधारीचा हात खिशातल्या बाटलीकडे जाऊ पाहतो आहे वळवळत. तोंडाला फार कोरड.)

**मॅनेजर** कॅशमधून ही रक्कम कोणी काढली ?

**खादीधारी** (टेबलावरच्या पाण्याच्या ग्लासवर नजर. मग) ते पाणी घेऊ का ?

**मॅनेजर** घ्या. पण घडल्या गोष्टीचे परिणाम गंभीर होतील मास्तर.

**खादीधारी** (ग्लास रिकामा करून परत ठेवीत) उपकार झाले.

**मॅनेजर** तुमच्यावर अफरातफरीचा आरोप करता येईल.

(खादीधारी काही म्हणत नाही.)

**मॅनेजर** तुमचं म्हणणं काय आहे घडल्या प्रकाराबद्दल ? (सहकाऱ्याला) लिहून घ्या.

**खादीधारी** (प्रयासांनी) म्हटलंच पाहिजे ? रकमेचा घोटाळा झाला आहे. कसा झाला ते सांगता येत नाही. मी नेहमीप्रमाणे दारूच्या तारेत होतो. मला काही आठवत नाही. पण तो मी केला असं ठरल्यास त्याचं मिळेल ते प्रायश्चित्त मी घेईन. मला ते घेतलंच पाहिजे.

(मॅनेजर-इन्स्पेक्टर एकमेकांकडे अर्थपूर्णपणे पाहतात.)

**इन्स्पेक्टर** इथे सही करा.

(खादीधारी सही करतो. हाताला कंप.)

**मॅनेजर** जा. बाहेर बसा. कामाकडे जाऊ नका.

(खादीधारी केबिनबाहेर येऊन तेथल्या एका रिकाम्या खुर्चीत बसतो. अस्वस्थ. केबिनच्या काचेवर आतल्या व्यक्तींच्या, कसली तरी चर्चा करणाऱ्या छायाकृती नाचतात. सिग्रेट पेटवताहेत.

खादीधारी खूप अस्वस्थ. घाईने खिशातली बाटली काढून घोट घेतो मोठा. आणखी एक घोट घेतो. डोळे मिटून घेतो.)

**खादीधारी** (केवळ शब्द, ओठांच्या हालचालीशिवाय) पुन्हा तुरुंगयात्रा घडणार दिसते. या वेळी कारण वेगळं. अफरातफर. तुला असंच पाहिजे. जग, जग आणखी.

(नवा घोट घेतो.)

[मॅनेजरचे केबिन.

मॅनेजर आणि पोलिस इन्स्पेक्टर एकमेकांच्या हातावर टाळी देत आहेत.]

**मॅनेजर** (लटक्या गंभीरपणे सहकाऱ्याला) आरोपीला आत पाठवा आणि पुढचं काम सांगितल्याप्रमाणे करा.

(सहकाऱ्याला डोळा घालतो.

सहकारी केबिनबाहेर जातो. खादीधारी येतो.

केबिनमध्ये सर्व चेहरे पुन्हा गंभीर.)

**मॅनेजर** मास्तर, तुम्हांला पोलिसच्या हवाली नाइलाजानं करावं लागणार आहे.

(खादीधारी सर्व चेहरे बघतो. भिंतीवरच्या हिंदुरावांच्या फोटोकेडे लक्ष जाते.)

**खादीधारी** आपली मर्जी.

(फोन वाजतो.)

(शेजारच्या केबिनमधून मॅनेजरचा सहकारी फोन करताना.)

**सहकारी** हॅलो...

(मॅनेजरची केबिन.)

**मॅनेजर** हॅलो—नमस्कार साहेब. मीच, मॅनेजर.

(शेजारची केबिन.)

**सहकारी** (हिंदुरावांचा आव आणून) मास्तरांच्या प्रकरणाची चौकशी झाली का ? काय ठरलं ?

(मॅनेजरची केबिन.)

**मॅनेजर** गुन्हा कबूल केला आहे, साहेब.

**सहकारी** (हिंदुरावांच्या तोऱ्यात रिसिव्हरमधून केवळ शब्द) ठीक हाय. मग पुढे काय करता ?

**मॅनेजर** दुसरं काय साहेब. रीतसर प्रकरण पोलिसांकडे सोपविलं पाहिजे. इथं निंबाळकर इन्स्पेक्टर आहेतच. मास्तरना पोलिस कस्टडीत नेतो म्हणतात्.

**सहकारी** (हिंदुरावांच्या तोऱ्यात, केवळ शब्द) पोलिसांच्या हवाली करू नका. माणूस व्यसनी हाय. पण तसा वाईट नाही. आमचा माणूस रक्कम घेऊन एवढ्यात पोचेल. ती जमा करून घेऊन मास्तरला मोकळं करा. केस मागं घ्या.

**मॅनेजर** (लटक्या आश्चर्याने) रक्कम घेऊन येतोय ? एवढ्यात पोचेल ? केस मागे घेऊ ? ठीक, ठीक साहेब, बरं साहेब. हुकुमाप्रमाणे करतो साहेब.

(रिसिव्हर ठेवतानाच केबिनमध्ये सर्जेराव घुसतो.)

**सर्जेराव** (खादीधारीकडे एक तुच्छतेचा कटाक्ष टाकून मॅनेजरपुढे जाऊन नोटा फेकत) हे चारशे तेरा रुपये.

**मॅनेजर** (आदबपूर्वक) थँक यू. बसा, बसा सर्जेरावसाहेब.

**सर्जेराव** (खादीधारीकडे पाहत मिशीवर ताव देत) टाइम न्हाई. (मॅनेजरला डोळा घालून निघून जाऊ लागतो. केबिनच्या दाराशी थांबून) मास्तर, आता तरी काम नीट करा. नस्त्या चौकश्या बंद करा नाहीतर सत्यानाश होईल.

(निघून जातो.)

**मॅनेजर** (नाटकी सहानुभूतीने) बघा मास्तर, हिंदुरावसाहेबांच्या कृपेनं सुटलात नाही तर खडी फोडायला गेला असतात.

**इन्स्पेक्टर** मोठा माणूस हिंदुरावसाहेब.
(खादीधारीचा बधिर चेहरा, क्लोजप.)

(दिवेलागणीची वेळ. अंधारते आहे. गावचा एक भाग, महारवाड्यासारखा.
पाऊस रिपरिपतो आहे किंवा पडून गेला आहे.
खादीधारी झोकांड्या खात येतो.)

**खादीधारी** वाचलो...हिंदुरावसाहेब थोर...सोडा म्हणाले...चारशे तेरा भरले...चारशे तेरा...नाही तर होतं कृष्णमंदिर नशिबी पुन्हा...जर हिंदुराव...चूक...हिंदुरावसाहेब...

(येऊन सडकेकडेच्या कोठच्या तरी अडगळीत कोलमडतो. तिथेच आडवा पडून राहतो राडीत. चष्मा बाजूला उडाला आहे. किती वेळ कुणास ठाऊक.
अचानक त्याला कुजबुजते बोलणे ऐकू येऊ लागते.)

**एक आवाज** बाराच्या भावात गेला मारुती कांबळे.

**दुसरा आवाज** राजकारनाचा बळी ठरला. आळ शाप खोटा होता तेच्यावरचा.

**एक आवाज** आईबाप कुठं गेलं त्याचे कळलं न्हाई...

(खादीधारी पाहण्याचा प्रयत्न करतो आहे. दिसू शकत नाही. डोळ्यांना चष्मा नाही. धूसर आकृतीच काय त्या दिसत आहेत.)

**दुसरा आवाज** कडुश्याला म्हारवाड्यात असतात म्हनं...

**एक आवाज** त्यांचं तरी काय नशीब. एकुलता एक प्वॉर. लढाईवर मर्दुमकी गाजवून आल्याला.

**दुसरा आवाज** एक पाय गेला तरी सोभावानं शेर हुता बगा...भ्या म्हून ठाव नव्हती त्याला.

(खादीधारीचा पाहण्याचा, हातघाईला आल्यासारखा चष्मा शोधण्याचा प्रयत्न चाललेला.)

**एक आवाज** (उसासून) नावनिशी बी ठेवली न्हाई त्याची यानं. चूपचाप न्हायलं गाव.

**दुसरा आवाज** करनारंचं हात वरपत्तर पोचनारं, मग काय.

**एक आवाज** आपल्या लोकान्ला कोण वालीच उरला न्हाई.

(खादीधारीला दिसणाऱ्या दोन आकृती अंधारात निघून जातात. त्यांच्या वहाणांची करकर लांब जाते.
राडीत लोळलेला खादीधारी. चष्म्यासाठी अद्याप हातांनी हातघाईला आल्यासारखा चाचपडतो आहे. मग राडीतच निपचित होतो.)

[एक मोठे डिल्यूज.

खादीधारीच्या स्मरणात ते संभाषण घुमते आहे मोठमोठ्यांदा.
कर्कश होते, लांब जाते, जवळ येते.
परत परत होत राहते या प्रकारे.]

[खादीधारी सकाळी घरी पोचतो.
खादीधारी पोल्टरीवर काम करतो.
खादीधारी आडोशाला दारूची बाटली तोंडाला लावतो.
त्याच्या स्मरणात ते संभाषण घुमतेच आहे.]

[संध्याकाळ. खादीधारी पोल्टरी फार्मवरून झोकांड्या खात बाहेर पडतो. भेटेल त्याला झिंगल्या स्वरात ऐकवतो आहे.
'आहे माहीत ? मारुती कांबळे ? बाराच्या भावात गेला. लष्करात मर्दुमकी केलीन—एक पाय गेला तरी शेरासारखा लढला पठ्ठ्या...आहे माहीत ? असला तर सांगा. त्याचं काय झालं ?
मारुती कांबळे...जवान वीर...त्याचं काय झालं ? येईल सांगता ? नाही. कारण आपल्याला कुणालाच ते ठाऊक नाही. ते गुपित आहे गुपित...'
(ऐकणारे गोंधळतात, दूर जातात, कुजबुजतात.)
खादीधारी त्याच्याच तारेत.
सर्जेराव दिसतो. त्याला खादीधारी झोकांड्या खात गाठतो.]

**खादीधारी** (सर्जेरावाला) तुम्ही सांगा. सांगता ? मारुती कांबळेचं काय झालं ? सांगता ? अरे, काय सांगाल. सांगण्याची हिंमत नाही तुमची. कारण तुम्हांला मुळी ठाऊकच नाही. मारुती कांबळे...सदेह वैकुंठाला गेला. वैकुंठाला...एक पाय रणांगणावर गमावलेला मारुती कांबळे खलास...अंतर्धान पावला.

(सर्जेराव पुरता गडबडलेला. खादीधारीला मनगट धरून भिरकावतो.)

**सर्जेराव** (गुरगुरतो) दारूडं वाट्टेल ते बकतंय.

(जमणाऱ्या माणसांना हाकलतो. निघून जातो. धुळीत लोळणारा खादीधारी.)

[हिंदुरावांचा वाडा. दालन.
हिंदुराव नातवाला पाठीवर बसवून घोडा घोडा करताहेत.]

**सर्जेराव** दादा.

**हिंदुराव** (अनिच्छेने) काय सर्जेराव.

**सर्जेराव** मास्तर पिऊन कांबळ्याच्या नावाची गांवभर बोंब करतोय. ज्याला त्याला हटकून इचारतोय मारुती कांबळ्याबद्दल, झिंगल्याचं सोंग आणून.

**हिंदुराव** मग ?

**सर्जेराव** माझी खात्री हाय, सी. आय. डी. चा हपिसरच हाय तो. हा साधा माणूस नव्हं. चौकशीला आलाय.

**हिंदुराव** तुमची खात्री हाय नव्हं ? फार डोक्शीबाज आहात, जा. आमचा खेळ खराब केलात. चला धाकटे राजे, बसा घोड्यावर.

(नातवाला पाठीवर घेऊन हिंदुराव पुन्हा खेळू लागतात.)

**हिंदुराव** (मध्येच थांबून) नजर मात्र सक्त असून्द्या मास्तरावर.

(खेळ पुढे चालू करतात.)

(पोल्टरी फार्मवर खादीधारी कामात. मुद्रा दारूने बधिरलेली. बाजूला दोन माणसांचे अस्पष्ट संभाषण चालू.)

**एकजण** (ओघात) कडुश्याला पोचायला बघा रात्र झाली का...

(खादीधारी चमकून पाहतो बोलणाराकडे.)

**खादीधारी** (पुटपुटतो) कडुसं...कडुसं...तेच ते नाव. नक्की तेच...

(खादीधारी काम पुढे चालू करण्याचा प्रयत्न करतो पण मग उठतो. त्या बोलणाऱ्या माणसाशी संभाषण काढतो, तमाखू मागण्याच्या मिषाने. मग विचारतो.

'हे कडुसं गाव कुठे आलं हो ?'

बोलणारा त्या गावाची कल्पना देतो.)

**बोलणारा** हे पल्याडच की डोंगराच्या. असंल दोन कोस.

(खादीधारीचा अंतर्मुख मद्यपी चेहरा.)

[दिवस. दुपार.

कडुसे गावच्या महारवाड्यात खादीधारी नशेतच पोचलेला. भेटेल त्याच्याकडे चौकशी करतो आहे.

शब्द ऐकू येत नाही. बॅकग्राऊंड म्युझिक.]

**कोणीतरी** हा, हुती बघा दोघंजनं त्या घरात. म्हतारी हुती. पर ती कालच गेली. आता कुठं

काय ते काय ठावं न्हाई बगा, पर ग्येली येवडं खरं.
(खादीधारी निराश.)

[खादीधारी झुकत झुकत परत निघाला आहे. अंधारात चाललेले. आणि अंधारात त्याला चौघे-पाच जण झडपतात. त्याच्याशी झोंबाझोंबी करतात.

त्याला दोनचार ठोसे मारतात. एकमेकांकडे फेकतात. त्याचे हात पिरगाळतात.]

**सर्जेराव** परतून कांबळ्याच्या प्रकरनात पडलास तर ठार मेलास मास्तरा. तुझं हाड सुदीक न्हाई गावनार कुनाला. कबूल कर, परतून कांबळ्याच्या प्रकरणात पडणार न्हाई—आण घे मास्तरा—नाही तर हात मोडतो बघ तुझा—तुकडाच काढतो.

**तिसरा** पाडा त्याला खालती. नाचतो छाताडावर त्येच्या. बरगड्याच मोडतो—

(वेदनेने कळवळलेला खादीधारी.)

**सर्जेराव** कर कबूल—कबूल कर—

**खादीधारी** (अखेर) कबूल, पुन्हा यात पडणार नाही.

**एकजण** देवाची आण घे.

**खादीधारी** देवाशपथ.

(ते खादीधारीला सोडतात. अंधारात दिसेनासे होतात.)

[रात्र.

लंगडत, खुरडत खादीधारी घरी पोचतो. नशा उतरलेली.

कसाबसा घरात शिरतो आणि देवापुढे येऊन त्वेषाने स्वतःच्या तोंडात मारून घेऊ लागतो.]

**खादीधारी** (तडफडत) कशासाठी जिवाला जपलंस नालायका, कशासाठी ? काय राहिलं आहे आता तुझं ?...कुणाला घाबरतोस, कुणाला ?...

(खादीधारीचा हात. त्याने तो कंदिलाच्या तापल्या काचेवर डागून घेतलेला. खादीधारीचा भयाण हसणारा चेहरा.)

[दिवस. कामावर निघालेला झिंगलेला खादीधारी.

भेटेल त्याला ऐकवतो आहे...

'पुन्हा मारुती कांबळेच्या भानगडीत आपण पडणार नाही. देवाशपथ. फुकट जीव गमावला असता ना काल रात्री. तर. मारल्यांनी ! नशीब जीव घेतल्यांनी नाही. सर्जेरावांची कृपा...धाकटे मालक. पण यानंतर मारुती कांबळे प्रकरणाला कुलूप. तो कप्पाच बंद.'

दोघेतिघे खादीधारीला स्वतंत्रपणे हळूच विचारतात, 'कुठं दत्ताच्या डोंगराच्या कुशीला घडलं व्हय हे ? कुठं गाठलं त्यांनी ? दत्ताच्या डोंगराच्या डाव्या कुशीला का ? कुठं घडला परकार ?'
(खादीधारीची हे ऐकणारी झिंगली मुद्रा, पण सावध नजर.)

[गडद रात्र.
दत्ताच्या डोंगराच्या डाव्या कुशीकडला भाग.
खादीधारी फिरतो आहे वेध घेत भुतासारखा.
रातकिंडे. कोल्हेकुई.
चांदण्यांनी खचलेलं आभाळ.
टिटवी वरून फडफडत जाते.
मग अंधारात लांबवर हालचाल.
खादीधारी डोळे विस्फारून पाहू लागतो.
भास की खरे ?
मग कळते की हालचाल नक्कीच. माणसांचा वावर.
खादीधारी दबा धरतो. खिशातली बाटली काढून घाईने तोंडाला लावून पुन्हा खिशात ठेवतो.
निःस्तब्ध.
लांबवर अंधारात आता काडी शिलगावलेली दिसते. तिच्या उजेडात तीन-चार आकृती.
त्या हलत एका जागी जाऊन स्थिर होतात.
अस्पष्ट कुजबुज. पुन्हा निःस्तब्धता. रातकिडे.
आकृत्या खाली बसतात. वाकतात.
त्या काय करताहेत ते खादीधारीला नीटसे दिसू शकत नाही.
खादीधारी पुढे पुढे सरकू लागतो ते पाहण्यासाठी.
आणि अचानक त्याच्या डोक्यात एक घाव बसतो.
काळोख.]

[पाणी आणि फटके मारून खादीधारीला होषमध्ये आणले जाते आहे.
तो जुनाट कोठीवजा जागेत.
समोर हिंदुराव बसलेले.

खादीधारीच्या नजरेतून हे क्रमाने एस्टॅब्लिश व्हावे.]

**हिंदुराव** काय मास्तर. बरे आहात नव्हं ? असा भेटीचा योग आला. मास्तर, निवडुंगाच्या जाळीत उगा पाय घालू नये माणसानं असं आम्ही त्या दिवशी गच्चीत बजावलं होतं. पण तुम्हांला चैन कुठं ? का आपल्याच हातानी आपल्या पायावर धोंडा पाडून घेता मास्तर ? सुखानं जगणं का इतकं नको झालं तुम्हांला.

(खादीधारी गप्प.)

कांबळ्याच्या आईबापाचा पत्त्या काढीत कडुश्याला गेला तुम्ही. काय गरज पडली होती ? परत येताना झालं त्यानं तरी शहाणं व्हावं माणसानं. पण नाही. परतून काल रात्री डोंगराकडं गेलाच तुम्ही मरायला.

**खादीधारी** चुकलं आमचं. पण डोंगराच्या कुशीकडे ती तीन माणसं अंधारात करीत काय होती ? नीट दिसण्याआत बेशुद्ध झालो.

**हिंदुराव** कांबळ्याचा गाडलेला मुडदा उकरत होती.

**खादीधारी** (हुशारून) तो कशाला ?

**हिंदुराव** तुम्हांला भेटवायला. आणखी कशाला ? तहान लागली हाय नव्हे तुम्हांला त्याची, मास्तर ? म्हणून तर धडपडत अपरात्री माळावर पोचला. आमची माणसं मागावर होती तुमच्या. मास्तर, हे तुम्ही बरं केलं नाही. साफ साफ मत हाय आमचं.

**खादीधारी** बरं करणारे आपण. आम्ही स्खलनशील माणसं. कांबळ्याचं बरं आपणच केलंत.

**हिंदुराव** (तापून) तो विषय नकोय. मास्तर, त्यात तुम्हांला काही माहिती नाही. कांबळ्याचं आणि आमचं काय वाकडं होतं ? काही न्हवतं. आमच्या शत्रूलासुद्धा दूध पाजतो आम्ही. जीवदान देतो. पण कांबळे आमच्या इथल्या कामाशी दुष्मनी करू लागला, मास्तर— (खादीधारी स्तब्ध) —मास्तर, त्यानं आमचं घर जाळलं असतं नाही तर शेत लुटलं असतं तरी आम्ही त्याला एक वेळ सोडून दिला असता. आम्ही घरंदाज आणि उदार आहोत. पण कांबळ्यानं आमच्या इथल्या योजनांना सुरुंग लावायला घेतला. आमच्या विरुद्ध या भागात भलता प्रचार करायला सुरुवात केली. आणि आमच्या योजनांना कोण सुरुंग लावतो म्हणेल तर ते आम्ही सहन करणार नाही. या योजनांनी या भागातल्या जनतेचं भलं होणार. तिचा सर्वांगीण विकास होणार. या भागात, मास्तर, क्रांती होणार. क्रांती करणार इथं आम्ही. असल्या कामाविरुद्ध कांबळे उभा रहातो हे काय बरं होतं ?

मास्तर, आम्ही पूर्वी कसेही असू पण आज-आम्ही ते नाहीत. वाल्मीकीसुद्धा जल्मापासून वाल्मीकी मुनी नव्हता. आज कितीक वर्षं या भागाच्या विकासाकरता दिवसरात्र रक्त आटिवतोय आम्ही. काय जरूर होती आम्हांला ? पण कांबळ्याला याचं काय नव्हतं. हिंदुरावाच्या जुन्या चरित्राचं भांडवल करून इथं वाद माजवू बघत होता कांबळे.

**खादीधारी** म्हणून तुम्ही कांबळेचा खून केलात ?

**हिंदुराव** (किंचित अटकतात पण मग लगेच) होय. त्याआधी आम्ही परोपरीनं विनवलं. चुचकारलं. समजावलं. मास्तर, आम्ही त्याला पंधरा हजार नगद घेऊन इथून जायला सांगत होतो, पंधरा हजार.

**खादीधारी** पंधरा हजार ? आणि तरी त्याने ते घेतले नाहीत ? शाबास मारुती कांबळ्याची.

**हिंदुराव** (तोल गेलेला) आम्ही दिली की त्याला शाबासकी. संपवून टाकल घुंगुरटं.

**खादीधारी** पण तरी त्याचा तपास कुणी करू लागलं की तुम्ही घाबरता.

**हिंदुराव** घाबरत नाही मास्तर, काळजी घेतो. आमच्या राज्यामधी दुही माजायला नकोय आम्हांला. इथं राजकारण आणि कारस्थानं नाही पायजेत. काम एक दिलानं झालं तर ते शंभर टक्के होतं. आमची ती तळमळ आहे.

मास्तर, कांबळ्याचं काय झालं ते समजून धडा घ्याल ? का उगा इथं येऊन, आमच्या आधारानं जगून वर आम्हांला रागाला आणता ?

**खादीधारी** हा आमचा मूळ स्वभाव, मालक. प्रश्न भेटला की त्याचं उत्तर मिळालं पाहिजे ही जुनी सवय. ब्रिटिशांच्या साम्राज्यावरून सूर्य मावळत नाही. तर ते कसं हे शोधण्याच्या ध्यासात तर आम्ही सगळी उमेद भिरकावून दिली. एका प्रश्नाचा दोन तपं पाठलाग केला आणि कळलं की मावळतो, ब्रिटिशांच्या साम्राज्यावरूनदेखील सूर्य मावळतो. प्रत्येक साम्राज्यावर तो उगवतो तेव्हाच तो केव्हा तरी मावळणार हे निश्चित असतं. तीस वर्षांची खोड मालक, जाणार कशी ?

**हिंदुराव** रात्री मरणारच होता तुम्ही. तुमचे आमचे संबंध जगजाहीर म्हणून वाचला.

**खादीधारी** मग आमचा कांबळे करण्याची योजना ठरली की नाही ?

**हिंदुराव** तुम्ही विचारता म्हणून तर सांगतो, मास्तर. योजना पक्की ठरली हाय. पण आधी बोलण्याची इच्छा होती आमची. आमचा सल्ला मानायचा नाहीच असं तुम्ही ठरवलं हाय.

**खादीधारी** छे छे. सल्ला मानण्याचं ठरवलं आहे.

**हिंदुराव** ही अखेरची संधी आम्ही देतो तुम्हांला, मास्तर. हा भाग सोडून चालते व्हा.

**खादीधारी** किती हजार देता ?

**हिंदुराव** हजारांचा सवाल नाही, इथलं आमचं काम टिकलं पायजे हा सवाल आमच्यापुढं हाय. मागाल तेवढे देऊ. पण परतून इकडे फिरकता कामा म्हणून नये.

**खादीधारी** कांबळेला दिले त्याहून जास्त ? त्याचा भाव पंधराचा होता.

**हिंदुराव** तो या भागातला होता. लोकान्ला त्याचं अपील जास्त होतं. तुम्हांला आम्ही पाच हजार देतो.

**खादीधारी** इतके कमी ? तुमचे आमचे प्रेमाचे संबंध लक्षात घेऊन ?

**हिंदुराव** (न रुचून) सहा करा. सात. मग झालं ?

**खादीधारी** (डोळ्यांत पुसट चमक) साडेसात तरी ?

**हिंदुराव** दिले. उद्या सकाळला या भागात नाही पायजेत.

**खादीधारी** ठीक आहे मालक. उद्या सकाळला आम्ही आपल्या राज्याच्या चतुःसीमांत दिसणार नाही. आमचा शब्द. आता मालक, आम्हांला एकदाच सांगा, कांबळेचं नक्की काय केलंत ? त्याला कसा संपवला आपण ?

(हिंदुराव विचारात. खादीधारीकडे पुन्हा पुन्हा पाहत आहेत.)

**हिंदुराव** कुणाकडे बोलणार नाही असं वचन देता ?

(खादीधारी वचन देतो.)

**खादीधारी** ठीक हाय.

(यानंतर हिंदुरावांचा दगडासारखा चेहरा एका सलग शॉटमध्ये पडद्यावर.)

**हिंदुराव** (विलक्षण थंड स्वरात) कांबळे दुसऱ्या कुठल्याच उपायानं ऐकत नाही असं ठरलं. मग आम्ही ठरवलं की त्याचा काटा काढला पायजे. त्रास झाला आम्हांला. पण काय विलाज नव्हता. अनेकांच्या कल्याणाकरता एकाला कधी कधी निपटून टाकावा लागतोय. कांबळे तसा बाकी नेक माणूस होता. मर्द होता. आम्ही ठरवलं का प्रथम त्याच्यावर काही तरी मोठं प्रकरण शेकवलं पाहिजे—त्याशिवाय त्याचं नाहीसं होणं लोकान्ला पटणार नाही. आम्ही शोध घेत राह्यलो. गावात साळुंक्यांची विधवा होती. तिला दिवस गेले आणिक औषध घेऊन पोर पाडताना ती मेली. रात्री ती मेली आणिक आम्हांला बातमी समजली.रातोरात पोलिसला वर्दी दिली. पंचनामा झाला. सुइणीनं स्टेटमेंट दिलं पोलिसाला का मारुती कांबळ्यानं बाईला तिच्याकडं पोचवलं आणि आगाऊ पैसे दिले. आम्ही सुइणीला पैसे चारून तयार केली होती. कांबळ्यावर सकाळला वारंट निघालं. आमचा होरा बरोबर ठरला. कांबळे गावातनं बेपत्ता झाला. कारण या आरोपानं तो पुरता हडबडलाच. साळुंक्यांची विधवा मराठ्याची होती ना. गावानं उभा जाळलाच असता कांबळ्याला याबद्दल. कांबळे पळाला पण आमच्या माणसांची नजर होती त्याच्यावर. दुसऱ्या रात्री त्याचा काटा काढण्यात आला. करवतीने कांबळ्याचे तुकडे करून ते नाहीसे करण्यात आले. गावात बभ्रा झाला—कांबळे साळुंक्याच्या विधवेला मारून पळाला.

**खादीधारी** मग डोंगराच्या कुशीला काय आहे ?

**हिंदुराव** सुइणीचा मुडदा.

**खादीधारी** तो कसा ?

**हिंदुराव** मास्तर, तुम्ही गावात बोंब करू लागलात, कांबळ्याबद्दल लोक बोलायला लागले. सुईण बोलती तर प्रकार सगळा उघडाच पडला असता. म्हणून त्या म्हातारीला त्या रात्री मारून पुरली. तुम्ही डोंगराकडं गेला त्या रात्री.

**खादीधारी** मालक.

**हिंदुराव** झालं तुमचं समाधान ? आता कटा या मुलखातून एकदाचे. पैसे मुलूख सोडताना पोचते होतील तुमाला. हा आमचा शब्द हाय.

**खादीधारी** (उठत) मालक,. आम्ही तुमचा मुलूख सोडून निघालो. हा आमचा शब्द. आम्हांला पैसे नकोत.

[वाडा.

हिंदुराव-सर्जेराव.]

**हिंदुराव** गेला का हद्दीबाहेर ?

**सर्जेराव** व्हय. मी पाह्यला. पक्का गेला.

[जिल्ह्याचे ठिकाण. तिठा. गर्दी, गजबज. गर्दीतून कॅमेरा पुढे जातो.

पाराशी सत्याग्रहाला बसलेला खादीधारी.

बाजूला पाटी—जवान मारुती कांबळे याच्या गंभीर गुन्ह्याची रीतसर चौकशी झालीच पाहिजे. मारुती कांबळेवर खटला भरा. न्यायासाठी याची गरज आहे. यासाठी प्राणांतिक उपोषण. घोळक्या-घोळक्यातली बोलणी.

'कोण रे कोण हा ?'

'जवान मारुती कांबळे कोण ?'

'गुन्हा कसला पण ?'

'कोण मारुती कांबळे ?'

'काय प्रकार काय हाय ?'

गलका.]

[जिल्ह्याच्या कलेक्टरची कचेरी.

जिल्ह्याच्या डी. एस्. पी. ची कचेरी.

कलेक्टर डी. एस्. पी. शी फोनवर बोलताहेत.]

**कलेक्टर** तुम्हांला मिळालं का पत्रक ?

**डी.एस्.पी.** माझ्या समोरच आहे सर.

**कलेक्टर** माणूस खमक्या दिसतो.

**डी.एस्.पी.** प्रश्नच नाही सर. या पत्रकाच्या प्रती मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांना पाठवल्या आहेत

त्यानं असं पत्रकातच म्हणून ठेवलंय.

**कलेक्टर** हूं. मुंबई-पुण्याच्या पेपर्सनाही पाठवल्या आहेत.

**डी.एस्.पी.** कुणी हात लावू नये म्हणून पूर्ण खबरदारी घेतली आहे त्यानं, जिवाला धोका आहे असा ओरडा करून.

**कलेक्टर** मग ?

**डी.एस्.पी.** वेट अँड वॉच, सर. दुसरं काय.

**कलेक्टर** बंदोबस्त नीट ठेवा. हिंदुरावाची माणसं काही करण्याचा प्रयत्न करतील. आता आपल्यावर जबाबदारी आहे. डोळ्यांत तेल घालून रहा.

**डी.एस्.पी.** काळजी नको सर ! हिंदुरावाला मी स्वतःच वॉर्न करतो.—

[मुंबई पुण्याच्या वृत्तपत्रातली मास्तरांच्या पत्रकाची बातमी.]

[उपोषणाला बसलेल्या खादीधारीला प्रश्न विचारले जात आहेत. आता त्याच्या मागे पोलिस उभे दिसतात.]

**प्रश्न** मारुती कांबळ्याचा खून झाला असं तुम्हांला म्हणायचंय का ?

**खादीधारी** माझं म्हणणं इतकंच की त्याच्यावर केल्या जाणाऱ्या भयंकर आरोपाची पोलिस चौकशी व्हायला हवी.

**प्रश्न** पण तो कुठे आहे ?

**खादीधारी** ते शोधण्यात यावं. पोलिसांना ते शक्य आहे.

**प्रश्न** ही चौकशी कशाकरता व्हायला हवी अशी तुमची मागणी आहे ?

**खादीधारी** न्यायाकरता. कांबळे लढाईवर मर्दुमकी गाजवलेला जवान होता. एका विधवा स्त्रीचा मृत्यू घडवल्याचा आरोप त्याच्यावर होता. एका स्त्रीच्या संशयास्पद मृत्यूचा तपास व्हायला हवा. कांबळे दोषी असेल तर त्याला शिक्षा व्हायला हवी. या प्रकरणी केस नोंदवली जाऊन नंतर चौकशी का थांबली ? ती झाली पाहिजे.

[पाराभोवती जमलेल्या गर्दीत सर्जेराव आणि त्याचे गडी. पोलिसांच्या गराड्यातल्या खादीधारीकडे खुनशीपणे पहात आहेत. गर्दीतला गलका.]

१ चौकशी झालीच पायजे.

२ मागणी रास्त हाय. चौकशी झाली पायजे.

३ चौकशी झालीच पायजे...

(गलका.)

[हिंदुरावांच्या राज्यात जागोजाग माणसे जमून चर्चा करीत आहेत. कारखान्याचे आवार, फार्मच्या फाटकाबाहेर वगैरे जागा. हिंदुरावांच्या वाड्याच्या आडोशालादेखील.

शब्द ऐकू येत नाहीत.

पार्श्वसंगीत.

गडबड-गोंधळ जाणवतो.

यात एक-दोन शॉट्समध्ये हिंदुराव नाकासमोर पाहत वावरताना. डोळ्यांत भोवतालच्या वातावरणाची जाणीव.

हिंदुराव कारमधून उतरून नातवाबरोबर देवळात जातात. भोवतालच्या माणसांचे दृष्टिक्षेप. हिंदुरावांना ते जाणवतात.

फार नं थांबता ते परत कारमध्ये येऊन बसतात. कार निघते. बाहेरून कारकडे पाहणाऱ्या नजरा हिंदुरावांना जाणवतात. ते त्रासलेले.]

[रात्र.

पारावर दारूची बाटली तोंडाला लावणारा खादीधारी.

भोवती पोलिसांचा पहारा.

खादीधारी पाराला टेकून निपचित.]

[हिंदुरावांच्या राज्यात जागोजाग पत्रके लावलेली. 'मारुती कांबळेच्या खुनाची चौकशी करा.' सर्जेरावाची माणसे ती फाडत फिरताहेत. वाचणारांना धमक्या देत आहेत.

पारावर राजकीय पक्षांची पाठिंबा देणारी सभा. यात हिंदुरावांच्या मळ्यावरच्या नाचगाण्याच्या वेळी दिसलेला आमदारदेखील. वार्ताहर रिपोर्ट लिहून घेत आहेत. शब्द नीट ऐकू येत नाहीत.

पार्श्वसंगीत.

खादीधारी पाराला टेकून निपचित बसलेला.]

[वाडा.

हिंदुराव-सर्जेराव.

हिंदुराव फेऱ्या घालताहेत वाघासारख्या.]

**सर्जेराव** तरी मी अगुदरपासून म्हनत होतो.

**हिंदुराव** तुम्ही म्हणत होता सी. साय. डी. चा अधिकारी असंल म्हणून. तुमचा शहाणपणा कळला आम्हांला.

(कारभारी येतात.)

**कारभारी** (लांबूनच) कलेक्टरसाहेबांचा फोन आहे. आपण त्यांना तीनदा फोन केला तेव्हा ते नव्हते म्हणून त्यांनी केला आहे. काय काम आहे विचारतात.

**हिंदुराव** चला आलो आम्ही.

(हिंदुराव रिसिव्हर उचलतात. रेंगाळणारे कारभारी.)

**हिंदुराव** काय हाय कारभारी ? घुटमळताय कशाला ?

(कारभारी जातात.)

**हिंदुराव** हलाव साहेब, मी हिंदुराव धोंडे-पाटील बोलतोय. रामराम.

**कलेक्टर** काय हिंदुराव, कशाला फोन केला होतात ?

**हिंदुराव** काही नाही साहेब. सहज.

**कलेक्टर** सहज तीनदा फोन केलात ?

**हिंदुराव** (ओठ चावून) काम होतंच, तसं. (जरा थांबतात.)

**कलेक्टर** काय हुकूम ? बोला.

**हिंदुराव** हुकूम कसला. आम्ही काय आपल्याला हुकूम करणार. साहेब, आपल्याला आमच्या मागे लागलेली कटकट माहितीच असेल.

**कलेक्टर** कटकट ? कसली बुवा ?

**हिंदुराव** (हिंदुराव तोंडाशी येणारे शब्द गिळून) तुमच्या जिल्ह्याच्या ठिकाणीच हाय की ती.

**कलेक्टर** जिल्ह्याच्या...असं असं. मास्तरांचं उपोषण म्हणता ? ती मात्र आहे खरी. काय म्हणता मग ?

**हिंदुराव** सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची भीती हाय त्यामुळं.

**कलेक्टर** लक्षात नाही आलं.

**हिंदुराव** अहो काय दंगल बिंगल घडली तर ?

**कलेक्टर** छे छे. घडेल कशी ? आम्ही बंदोबस्त ठेवलाय चांगला.

**हिंदुराव** पण उगा विषाची परीक्षा कशाला ? आम्ही म्हणतो त्याला उचलून का घेत नाही तुम्ही ? कलम लावून पकडा न् कस्टडीत टाका.

**कलेक्टर** कुणाला ? मास्तरला ? शहाणेच आहात. वर काय सांगायचं ?

**हिंदुराव** काय साहेब. हे आम्ही तुम्हांला काय सांगावं ? तुम्ही सांगाल ते मानणारच की ते. माहीत हाय आम्हांला.

**कलेक्टर** (खाजगी स्वर) कल्पना आहे तुमची. उलट वरून वेगळी दडपणं आहेत आमच्यावर.

**हिंदुराव** कसली ?

**कलेक्टर** साळुंक्याची इन्क्वायरी सुरू करण्याची.

**हिंदुराव** (कपाळावर डवरलेला घाम पुसत) काय मस्करी करता साहेब.

**कलेक्टर** मस्करी नव्हे. हिंदुराव, गोष्टी फार पुढे गेल्या आहेत. कल्पना नाही तुम्हांला. सावध व्हा.

**हिंदुराव** (कोरड पडलेल्या ओठावरून जीभ फिरवीत) असं ?

**कलेक्टर** हो.

**हिंदुराव** मग काही मार्ग सुचवा की साहेब.

**कलेक्टर** आता विचारता ? आता उशीर झाला. तुम्हांला आधीच कळायला हवं होतं महाराज. दीज मेथड्स डोन्ट पे इन द लाँग रन्. एनी वे. अच्छा. मग तुमचं काही खास काम नव्हतं तर. आम्हांला वाटलं काय आहे ?

(रिसिव्हर ठेवला जातो.

हिंदुराव किंचित काळ तसेच रिसिव्हर धरून उभे. मग तो निर्जीवपणे पिनवर ठेवतात. तिथेच उभे. त्यानंतर आमदाराला फोन करतात.)

**आमदार** हॅलो.

**हिंदुराव** मी हिंदुराव धोंडे-पाटील बोलतोय.

**आमदार** काय म्हणता हिंदुराव ? बऱ्याच दिवसांत मळ्यावर पार्टी झाली नाही. चुकल्याचुकल्यासारखं वाटतं. आज गरिबावर का बरं कृपा झाली ?

**हिंदुराव** मास्तरच्या उपोषणासंबंधात.

**आमदार** हो, ते आहे नाही का चालू.

**हिंदुराव** त्यानिमित्त्य पारावर भरलेल्या सभेत तुम्ही भाषणसुद्धा केलंत.

**आमदार** हो हो. बरोबर. त्याचं काय ?

**हिंदुराव** आमच्या विरुद्ध बोलला तुम्ही.

**आमदार** कल्पना आहे तुमची. मी फक्त चौकशीच्या मागणीला पाठिंबा दिला. इतरांनी दिल्यामुळेच माझा नाइलाज झाला. राजकारण आहे ना हे.

**हिंदुराव** होय की. राजकारण आम्हांला पण हाय थोडं ठावकी. आम्ही आमच्या भागातून तुम्हांला निवडून आणलं. पण मग चालू प्रकरणातून आम्ही कसं बाहेर पडावं तेवढं सांगा. आमच्यासाठी तुम्ही काय करता.

**आमदार** करण्याची इच्छा आहे. पण काय करता येईल ते कठीण आहे सांगणं. माझा

सल्ला मानणार असलात तर एक सांगतो. सार्वजनिक कामातून आपखुशीने निवृत्त व्हा. उगाच भानगड नको.

**हिंदुराव** आभारी आहे.

(रिसिव्हर पिनवर ठेवून कसेबसे घाम टिपीत बैठकीकडे येतात. त्यांना अशक्त वाटू लागते. काय करावे, कसे सुटावे कळत नाही. कोंडी झाल्याचे जाणवते. मग पाहता पाहता ते यातून बाहेर येतात.)

**हिंदुराव** कारभारी—कारभारी—

(कारभारी लगबगीने येतात.)

**हिंदुराव** जिल्ह्याच्या ठिकाणी पारावर आमची सभा होणार.

**कारभारी** काय ? पण—

**हिंदुराव** दवंडी पिटवून सगळीकडे जाहीर करा. आम्ही स्वता बोलणार सभेत.

[सभेसाठी जमणाऱ्या गर्दीचे शॉट्स.

सभेच्या पाराशी शामियानावजा व्यासपीठ उभारलेले. लाऊडस्पीकरवर कर्कश्श रेकॉर्ड्स.

हिंदुरावांची सर्जेराव वगैरे माणसे सभेची व्यवस्था पाहत आहेत. पारावर डोके टेकून मलूल पडलेला खादीधारी. बाजूला पोलिस. गर्दी वाढते आहे.

कलेक्टर डी. एस्. पीं. ना फोन करताना. शब्द ऐकू येत नाहीत. दोघांचे चेहरे, हावभाव दिसतात.

सभेत जागोजाग जागा घेऊन उभे असलेले हिंदुरावांच्या माणसांचे जाळे. त्यांच्या एकेकात खुणा.

पोलिसांची गाडी येऊन उभी राहते. पोलिस उतरू लागतात.

जमलेल्या गर्दीतले चेहरे—म्हातारे, तरुण, उग्र, जर्जर, बोलणारे, बघणारे.

सभेच्या जागी मोठी गर्दी जमलेली.

आले—आले—चा ओरडा.

सर्व पाहू लागतात.

हिंदुराव धोंडे-पाटलांची कार येऊन उभी राहते.

घाईघाईने व्हिस्कीचा एक घोट घेऊन बाटली लपवणारे हिंदुराव. कारमधून उतरू लागतात.

पारावर खादीधारीची औपचारिक चौकशी करणारे हिंदुराव. नजरेत खुन्नस. स्वर सौम्य.

व्यासपीठावर हिंदुराव स्थानापन्न होतात. मागे त्यांची बलदंड माणसे रांग धरून उभी.

व्यासपीठाखाली अशीच दुसरी रांग.

गर्दीत पुढे पुढे सरकू पाहाणारे तरुण.

सभेचा लाँग शॉट. अनौन्समेंट : सभा सुरू होत आहे. सर्वांनी शांत बसून घ्या. आपल्या भागातले सर्वांचे लाडके नेते हिंदुराव धोंडेपाटील आता भाषण करणार आहेत. शांत बसून घ्या.

एकजण (शिक्षक वाटणारा) हिंदुरावांच्या कर्तृत्वावर बोलू लागतो. माईकपुढे. 'त्यांच्या थोर कर्तृत्वाची ओळख करून देण्याची खरोखर गरजच नाही. सूर्याला सूर्य म्हणून म्हणावे लागत नाही. महासागराची ओळख हा महासागर अशी करून द्यावी लागत नाही. आपण त्यांना तेव्हाच ओळखतो. तसे हिंदुराव हे या भागातले हिमालय आहेत—'(गर्दीत टाळ्या, ओरडा.)

पुरे करा हो—

बसून घ्या—

हिंदुरावान्ला बोलू द्या—

तुमचं पुरे झालं. बसा—

(बोलणारा पुढे बोलण्याचा प्रयत्न करतो. पण प्रचंड ओरडा, घोषणा)

हिंदुरावान्ला बोलू द्या—

हिंदुरावान्ला बोलू द्या—

बोलणारा खाली बसतो.

**घोषणा** हिंदुराव—

हिंदुराव—

हिंदुराव—

टाळ्या, शिट्ट्या.

हिंदुरावांचा बधीर चेहरा.

लाँग शॉट. हिंदुराव उठतात. टाळ्या, शिट्ट्या वाढलेल्या. हिंदुराव माईकपाशी येऊन उभे.

टाळ्या, शिट्ट्यांचा प्रचंड आवाज आणि हिंदुरावांचे कापते पाय. क्लोजप.

हिंदुरावांच्या कपाळावरचा घाम, क्लोजप. टाळ्या, शिट्ट्या चालूच.

हिंदुराव एक दीर्घ श्वास घेतात. बळ एकटवतात.

हात उंचावून गर्दीला शांत रहाण्याला सुचवतात.

गर्दीचा आवाज दबतो.

हे हिंदुरावांना दिलासा देणारे वाटते.]

**हिंदुराव** माझ्या भावांनो आणि बहिणींनो—आज मी तुमच्यापुढे उभा हाय. कोण म्हणून उभा हाय ? पुढारी म्हणून ? नाही. पुढाऱ्याप्रमाणं गोड गोड आश्वासनं देऊन तुम्हांला फसविण्याची रीत आपली नाही. मी हातानं करून दाखवणारा माणूस हाय. हातानं कोण करून दाखवतो ? कष्टकरी. तुमच्यासारखा माझा बाप कष्टकरी होता आणि मी पण कष्टकरी हाय.

हा आपला भाग भरभराटला पाह्यजे म्हणून मी कष्ट केले. रक्ताचं पाणी करून या माळावर नंदनवन उभारण्याला घेतलं. पण या चांगल्या कामाआड काही नतद्रष्ट आले. काही अस्तनीतले निखारे निघाले. त्यांचं खरं रूप तुमच्यापुढे ठेवण्याकरता आज तुमच्यापुढं मला यावं लागलं. माफ करा, आयाबहिणींनो, दादांनो, तुम्हांला इथं यावं लागलं. पण कीड एका रोपाला लागली तरी त्याचा त्रास उभ्या पिकाला होतो. तसा तुम्हांला त्रास द्यायला लागला. आपल्याला आज कीड मारायची हाय. फार भयंकर रोगाची कीड. बाहेरून आलेल्या रोगाची कीड. ही कीड कुठली ? ही कीड ती तिकडे पारावर बसलेली कीड. मास्तर ! ही कीड आली नाही, आपल्या विकासाची मुळं कुरतडण्याकरता कुणीतरी पाठवली हाय. आपल्या देशाचा, आपल्या लोकांचा विकास झालेला कुणाकुणाला नकोय. आपल्या देशाच्या शत्रूला आपण दरिद्री, अधिक मागासलेलं रहाणंच हवं हाय. ते असले घरभेदे आपले एजंट म्हणून हाताशी धरतात आणिक आपला विकास, आपलं काम, आपली एकी आतून पोखरतात. माझ्या भावांनो, याबद्दल आपण सावध असलं पाह्यजे की नाही ? आपण गाफील राहून चालेल काय ?

(सभेच्या मागून एक आरोळी—मारुती कांबळ्याबद्दल बोला. त्या बाजूलाच थोडा गोंधळ.)

**हिंदुराव** नाही. गाफील राहून चालणार नाही. मारुती कांबळेबद्दलसुद्धा मी बोलणार हाय. त्याआधी उपोषणाचा आव आणणाऱ्या पांढऱ्या कपड्यातल्या या काळ्या मास्तराबद्दल बोलतो. हा नीच माणूस आमच्या आधारानं इथं राह्यला. आम्ही त्याच्या दारूच्या ओकाऱ्या काढल्या, त्याला अन्नाला लावला, त्याला घर थाटून दिलं. आम्ही म्हणालो कसा का असेना, शिकलेला हाय, पुन्हा स्वातंत्र्यलढ्यात होता. सरळ असेल. हा दारूबाज तर पट्टीचा. त्यात बाईबाजीत पण याचा हात धरणारा मिळणार नाही. याला आम्ही कामाला लावला. आणिक यानं तिथं अफरातफर केली. खाल्लं तिथं घाण करून ठेवली. हा खडी फोडायला जाणार होता, आम्ही त्याला वाचवला. पण हा कृतघ्न. यानं आमच्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन इथल्या विकासालाच सुरुंग लावण्याचा भयंकर घाट घातला. शत्रुराष्ट्राचा एजंट बनून आपल्या देशाचा सत्यानाश करण्याला हा पांढऱ्या कपड्यातला घरभेदा तयार झाला.

(सभेच्या मागून आरोळ्या—मारुती कांबळेचं काय ? मारुती कांबळेबद्दल बोला हो— थोडा गोंधळ. तेथल्या श्रोत्यांत हिंदुरावांचे आणि इतर यांत झटापट.)

**हिंदुराव** म्हणून याला अद्दल घडवली पाह्यजे. याची छीः थूः झाली पाह्यजे. याला डांबर फासून याची गाढवावरून धिंड निघाली पाह्यजे—

(सभेतला गोंधळ वाढू लागतो. हिंदुरावांची माणसे विरुद्ध इतर. वेगवेगळ्या भागांतून आरोळ्या : 'मारुती कांबळेचं काय झालं ?'

'मारुती कांबळेच्या खुनाचं काय ?'

'कांबळे कुठं हाय तेवढं सांगा.'

विचारणारे तरुण रापले चेहरे. त्यांच्यावर मार पडतो. तरी आरोळ्या येत राहतात. झटापटी.

सभा अनावर होऊ लागलेली.)

**हिंदुराव** आपल्याला विकास पाह्यजे का सत्यानाश ते ठरवण्याची वेळ आलेली हाय. या हरामखोर माणसाच्या नादाला लागून तुम्ही नरकात जाणार का याला हाकलून लावून इथं स्वर्ग उभा करणार असा सवाल हाय—

(सभेतला गोंधळ खूपच वाढलेला.

आरोळ्या : 'मास्तराला बोलू द्या—'

'तुम्ही खुनी आहात—'

'कांबळेचा पत्त्या सांगा—'

झटापटी कोणी तरी मायक्रोफोन बंद पाडते. कोणी बत्त्या फोडतात. निकराने बोलणारे हिंदुराव. शब्द ऐकू येत नाहीत.

उधळलेल्या सभेचे शॉट्स. प्रचंड गोंधळ.

आरोळ्या : कांबळ्याचा खुनी—

खुनी—खुनी—

तू कांबळेला मारलास—

मारो—)

[लगेचची वेळ. अंधार. स्मशानशांतता.

पारावरच्या निपचित खादीधारीवर दगड पडतात दोनचार. घाण पडते.

कोणी तरी अचकट विचकट बरळत निघून जातात.

पुन्हा स्मशानशांतता.

दिवस. कलेक्टर फोनवर डी. एस्. पी.शी बोलताहेत.]

**कलेक्टर** काय म्हणता ? रातोरात बेपत्ता झाले ?

**डी.एस्.पी.** होय. कुठं गेले काही अद्याप समजलेलं नाही साहेब.

**कलेक्टर** चौकशी चालू ठेवा. एवढा जबरदस्त गडी पण अखेर घाबरला.

**डी.एस्.पी.** चौकशी करतोच. आता कठीण आहे हिंदुरावाचं.

[फॅक्टरीत माणसे जागोजाग जोराची चर्चा करीत आहेत.

फार्मवर तेच.

डेअरीवर तेच.

रस्तोरस्ती तेच.

चावडीवर तेच.

देवळात तेच.

फॅक्टरीबाहेर वादळी निदर्शनेः

धोंडेपाटील मुर्दाबाद.

कारभाराची चौकशी करा.

हिशेब दाखवा.

राजीनामे द्या.

नव्या निवडणुका घ्या.

पोल्टरी फार्मबाहेर गर्दी. चालकांकडे जोरजोराची मागणी :

आमच्या ठेवी परत द्या.

निर्मनुष्य डेअरी.

को-ऑपरेटिव्हच्या एका सभेत आरडा ओरडा, मुठी वळणे, अस्तन्या सारणे, अंगावर जाणे.

गोंधळ.

गर्दीशी तोंडातोंडी करणारा सर्जेराव. त्याच्यावर मार पडतो.

हिंदुरावाच्या वाड्याची आतून बंद दिंडी. आत भुंकणारी कुत्री.

हिंदुरावांची वाड्यातल्या ओसाड सदरेवरची रिकामी बैठक.

पत्रके लागलेली : धोंडेपाटील गटाच्या गैरकाभाराची संपूर्ण चौकशी करा.

कांबळेचा खुनी कोण.

दोनचार पोरे सडकेने मजेत ओरडत खेळताहेत :

धोंडेपाटील मुर्दाबाद.

धोंडेपाटील मुर्दाबाद.

त्यांच्याकडे कौतुकाने पाहणाऱ्या त्यांच्या आया.]

[लगतचाच. पार. आमदार अतिशय क्षीण खादीधारीला भेटण्याला येतो.]

**आमदार** अभिनंदन मास्तर. हिंदुराव पळ्ाले. तुमचा विजय झाला.

**खादीधारी** (कसेबसे डोळे उघडून) काय ? काय झालं ?

(आमदार हर्षभराने पुन्हा तेच म्हणतो.)

**आमदार** हिंदुराव पळाले. त्यांच्या सगळ्या राज्यात अंदाधुंदी माजली आहे. कारखान्यात मोठा संप झाला आहे. डेअरी बंद पडली. पोल्टरी फार्मच्या मॅनेजमेंटमध्ये भांडणं सुरू आहेत.

 हिंदुराव राजवट कोसळली.

**खादीधारी** आणि... ?

**आमदार** आणि काय ? कुणाचा पायपोस सध्या कुणाच्या पायात उरला नाही. खलास हिंदुरावांचं साम्राज्य. कांबळ्यांचं झेंगट झक्क अडकवलंत तुम्ही त्यांच्या गळ्यात. निघतो. फॅक्टरीच्या शेअर होल्डरांची मीटिंग आहे. गाजणार, आमचा गट वरचढ होणार. मीच मॅनेजिंग डायरेक्टर मग ! अच्छा. मुद्दाम तुमचं अभिनंदन करायला आलो—निघतो.

(आमदार गेलेला.

खादीधारीच्या डोक्यात कसला तरी प्रकाश पडू लागलेला.)

**आमदाराचे शब्द** हिंदुराव राजवट कोसळली.

कुणाचा पायपोस कुणाच्या पायात उरला नाही.

हिंदुराव राजवट कोसळली.

कुणाचा पायपोस कुणाच्या पायात उरला नाही.

(खादीधारी असली नसली ताकद एकवटून उठू लागतो.)

[वाड्यात आक्रंदणारा हिंदुरावांचा नातू. इतरांचे ओढले चेहरे.]

[खादीधारी हिंदुरावांच्या वाड्याची बंद दिंडी ठोठावतो आहे. दिंडी उघडत नाही. आत शुकशुकाट.]

**एक जण** (सडकेपलीकडून) गेला हिंदुराव. बाराच्या भावात गेला.

(विचारमग्न खादीधारी.)

[चहाच्या दुकानाच्या गल्ल्याशी खादीधारी पैसे देतो.]

**गल्ल्यावरचा मालक** काय मास्तर, उपास सोडला काय ? तुम्ही कुस्ती जितलीत बाकी.

(खादीधारी उत्तर न देता बाहेर पडतो. चेहरा क्षीण पण विलक्षण शांत. त्यावर कसला तरी निश्चय.)

[तालुक्यात गटागटाने चालेलेल्या चर्चा. ऐकू येणाऱ्या अंतरावर खादीधारी, असे शॉट्स. हिंदुराव कुठे असावेत याविषयाचे तर्क लोक बोलताहेत.]

[आगगाडीत खादीधारी. गाडी बोरीबंदर स्टेशनात शिरते. खादीधारी उतरून निघतो.
हिंदुरावांचा ब्लॉक असलेल्या जुनाट बिल्डिंगमध्ये शिरणारा खादीधारी.
जिने चढून ब्लॉकशी येतो. दाराला कुलूप नाही. आतून कडी. खादीधारी बेल दाबतो.
उत्तर नाही.
पुन्हा बेल दाबतो. उत्तर नाही.
खादीधारी पुन्हा पुन्हा बेल दाबतो. उत्तर नाही.
एका निर्धाराने खादीधारी बेल दाबून राहतो. आता बेल घणघणत राहते. आणि दार उघडते.
दारात गुरगुरते हिंदुराव. मद्यपी. बेफाम. उग्र. डोळ्यांभोवती वर्तुळे.
त्यांच्यासमोर खादीधारी. विलक्षण शांत. चेहऱ्यावर कसला तरी निर्धार.
हिंदुरावांचा चेहरा वेडावाकडा होत जातो. ते जोराने दार लावू जातात. खादीधारीने मध्ये हात घातलेला.
दोघांनी बळ एकवटलेले.
खादीधारी निकराने आत होतो. दार जोराने लागते. लॅच लागते.
खादीधारी पाहतो. हिंदुरावांच्या हाती पिस्तुल.
हिंदुरावांच्या मुद्रेवर सीमेचा संताप. पिस्तुल खादीधारीच्या दिशेने करतात.
हात अस्थिर.
हात आणि पिस्तुल खाली.]

**हिंदुराव** का आला मास्तर ? इथं का आला ?

**खादीधारी** आपण आलात म्हणून.

**हिंदुराव** वापस जा, चालता हो.

**खादीधारी** त्यासाठी आलो नाही.

**हिंदुराव** फुकट गोळी खाऊन मरशील.

**खादीधारी** तशा वेळा येऊन वाया गेल्या. आता आली असली तर ती साधलीच पाहिजे.

**हिंदुराव** मास्तर, उगा शहाणपणा नको करू. मरशील.

(हिंदुरावांचा पिस्तुलाचा हात वर होतो थरथरत.)

**खादीधारी** (वाट पाहून) मारून टाका गोळी. मारा ना.

**हिंदुराव** गमज्या नकोत. मी मारीन.

**खादीधारी** आणखी एक खून आपल्या जमेला होईल. आणखी काय होईल? मी मेलो तर कोण रडणार आहे? मी काही मारुती कांबळे नव्हे.

(हिंदुरावांचे पिस्तुल रोखलेले असतानाच खादीधारी त्यांना धरून सोफाकडे नेऊ लागतो.)

**हिंदुराव** (थांबून) नाही, आपण येणार नाही. तुझं ऐकणं हराम. तू दगा केलास, मास्तर.

**खादीधारी** मी कधीच कुणाला दगा केला नाही. आपण बसा तिथं.

**हिंदुराव** हॅट, खोटार्डा कुठला. हरामी. दिला शब्द पाळत नाही, थूः.

**खादीधारी** (त्यांना बसवलेले. त्यांची चेहऱ्यावर उडालेली थुंकी पुसत.) मी दिलेला प्रत्येक शब्द पाळला मालक.

**हिंदुराव** नाही. सांळुक्याबद्दल बोलणार नाही असा शब्द दिला होतास तू—

**खादीधारी** आपलं स्मरण आपल्याला दगा देतं आहे. मी आपल्या राज्याबाहेर जाईन एवढाच शब्द दिला होता. तो मी पाळला.

**हिंदुराव** आम्ही तुला खुनाची हकिगत सांगितली, तू वचन दिलंस म्हणून.

**खादीधारी** दिलं ते वचन पाळलं आहे. मी लागलीच आपल्या राज्याबाहेर निघालो.

**हिंदुराव** दोस्तीत गळा कापलास आमचा.

**खादीधारी** दोस्ती?

(दोघांचा एकमेकांकडे दृष्टिक्षेप. खादीधारीला हा शोध.)

**खादीधारी** मी समजत होतो, ते उपकारांनी मिंधं करणं होतं.

**हिंदुराव** तू भिकारचोट आहेस. आम्हांला ओळखलं नाहीस. निमकहराम.

(हिंदुरावांच्या डोळ्यांत रागच राग फुललेला.)

**खादीधारी** निमकहराम ही दोस्तीतली शिवी नव्हे, मालक. उपकारातली शिवी.

**हिंदुराव** चालता हो आत्ताच्या आत्ता, नाहीतर मेलास तू. समदं पिस्तुल रिकामं करावं वाटतय तुझ्या खोपडीत.

(हिंदुरावांचे पिस्तुल खादीधारीच्या कपाळावर टेकलेले. खादीधारी शांत. डोळे मिटून घेतलेले.)

**खादीधारी** ओढा चाप.

**हिंदुराव** (किंचित्काल पिस्तुल तसे ठेवून काढून घेत) बरोबर, म्हणजे आणखी एक खून आमच्या माथ्यावर!

**खादीधारी** (डोळे उघडलेले) खून पचवण्याची सवय आहे तुम्हांला. माझी तर चौकशी कुणी करणार नाही. सोपं काम.

**हिंदुराव** हिणवू नकोस.

**खादीधारी** मी वस्तुस्थिती सांगतो आहे. मला संपवून टाका मालक. नाहीतर तुमची आता सुटका नाही.

(खादीधारीचे डोळे चमकताहेत.)

**हिंदुराव** (गुरगुरत) काय करशील?

**खादीधारी** काय करीन? या मास्तराचा इंगा अद्याप तुम्हाला माहीत नाही, मालक. मी जिवंत राहिलो ना तर तुम्हांला परत नेईन.

**हिंदुराव** परत...?

**खादीधारी** हो. परत. तुमच्या राज्यात. त्यासाठी तर तुम्हांला शोधत आलो मी.

**हिंदुराव** आम्ही नाही येणार. परत आलो की पोलीस...खटला...तुरुंग...जन्मठेप...

**खादीधारी** मालक, तुम्ही भ्याड आहात. तुमच्याच शब्दात भिकारचोट.

**हिंदुराव** नाही. आम्ही नाही येणार.

**खादीधारी** न येऊन ते सर्व कसं चुकेल? ते तुमच्यापर्यंत येईल. तुम्हांला गाठेल.

**हिंदुराव** नाही...पिस्तुल आहे आमच्यापाशी.

**खादीधारी** ते तुमच्यापर्यंत आलंय मालक. तुमच्या गुन्ह्याची शिक्षा तुम्ही भोगताच आहा. देशोधडी लागून...घरादाराला पारखे होऊन...असे घुबडासारखे लपून...सुखाच्या घासाला आणि शांत झोपेला पारखे होऊन...हे असे जिवंत पिशाच्च बनून...

**हिंदुराव** जादा बात नको करू...

**खादीधारी** चुकणार नाही त्याच्यापुढे भ्याड का होता? त्याला सामोरे व्हा. चला माझ्याबरोबर परत तुमच्या राज्यात.

**हिंदुराव** तू पोलिसांचा एजंट आहेस.

**खादीधारी** (हसून) आणखी कुणाकुणाचा एजंट आहे ते एकदाच सांगून टाका. मी तुम्हांला सांगतो मी कुणाचा एजंट आहे. मी आहे तुमचाच एजंट. तुम्ही निर्माण केलंत ते टाकून तुम्ही पळालात? तुमच्या मागे त्याची वाताहत झाली आहे. सगळी व्यवस्था आताच कोलमडली आहे. नाही मालक, असे तुम्ही तुमच्याच मुळांपासून पळू शकत नाही. तुमच्या सावलीपासून तुम्ही कुठे पळाल? तुमचं स्थान तिथं आहे. तुमच्या राज्यात. चला, आपण परत जाऊ.

**हिंदुराव** आम्ही येणार नाही.

**खादीधारी** तुम्ही येणार आहात.

**हिंदुराव** नाही, आम्ही येणार नाही.

**खादीधारी** आम्ही तुमच्याकडून परत जाणार नाही.

**हिंदुराव** मर तर..

(हिंदुराव निकराने पिस्तुल रोखतात. पण झाडू शकत नाहीत.)

**खादीधारी** नाहीच. मरण आमच्यावर रुसलं आहे, ते येणार नाही, आम्ही बहुतेक अमर होणार. तुम्हांला आम्ही संधी दिली. तुम्ही साधली नाहीत. आता आमची पाळी.

(खादीधारी उठून हिंदुरावांना धरतो.)

**खादीधारी** निघा. तुमचं पोरकं झालेलं कर्तृत्व तुम्हांला बोलावतं आहे.

(हिंदुराव बेहिशेबी हालचाली करीत आहेत.
खादीधारी सावधपणे पाहातो आहे.
हिंदुराव स्वतःच्या कपाळावर घाईने पिस्तुल रोखून चाप ओढतात.
खादीधारी धक्का मारून नेम चुकवतो. गोळी उडते.)

**खादीधारी** काळ आला पण वेळ आलेली नाही, आपलं मरण आपण निवडत नाही. आपण जगणं निवडू शकतो. आणि तेसुद्धा काही वेळा. मालक, निवड करा. भ्याड जगणं की मर्दासारखं केल्या गोष्टींच्या जबाबदारीला सामोरं जाणं. काय मान्य आहे तुम्हांला ?
(हिंदुराव दारूची बाटली तोंडाला लावू पाहतात ती खादीधारी अडवून आणि सोडवून मूळ जागी ठेवतो.)

**खादीधारी** अनुभवानं सांगतो. दारू हे कोणच्याही प्रश्नाचं उत्तर नव्हे. मला उत्तर द्या. तुमचं तुम्हांला उत्तर द्या. तुम्ही काय पत्करणार?
(हिंदुराव हडबडलेले. घामाने भिजलेले. खादीधारी त्यांच्यापाशी जातो. त्यांच्या खांद्यावर हात ठेवतो. तो झिडकारण्याला हिंदुरावांचा हात वर होतो. पण ते तो झिडकारीत नाहीत. डोळ्यांत अगतिकता आणि चिकार राग, राग.)

[हिंदुरावांच्या राज्यातली माणसे वाड्यासमोर रस्त्यात जमलेली.
तंग मुके चेहरे.
ते चेहरे हारींनी दिसत जातात.
सर्व जण काहीतरी पाहत आहेत.
वाड्याच्या दिंडीवाटे पोलिस सर्जेरावाला बाहेर आणतात त्याला हातकड्या.
उभ्या असलेल्या पोलिस व्हॅनमध्ये बसवतात. जमलेल्या गर्दीतले चेहरे तंग.
आता दिंडीवाटे हिंदुरावांना बाहेर आणतात. हातकड्या.
गर्दीतले चेहरे अधिकच तंग.
हिंदुरावांना व्हॅनपर्यंत नेले जाते. हिंदुराव फूटबोर्डवर पाय ठेवतात.
थबकतात, वळतात. उभ्या गर्दीकडे शोधकपणे पाहतात.
हिंदुराव व खादीधारी यांची नजर एकमेकांला भि डते.
हिंदुरावांच्या मुद्रेवर अनावर रागापासून पुष्कळ काही येऊन जाते.
खादीधारीच्या नजरेत नजर घालून हिंदुराव स्मित करतात.

खरेखुरे दोस्तीचे स्मित.

हिंदुराव वळतात. व्हॅनमधये जाऊन बसतात.

व्हॅन निघून जाते.

पाहणारी गर्दी. यात कोठे खादीधारी.

गर्दी पांगते. तिचा धुमारा.

खादीधारी खमिसाच्या खिशातली बाटली काढून घोट घेतो मोठा आणि बाटली खिशात ठेवून चालू लागतो.

गाव सोडून निघालेला खादीधारी. गळ्यात शबनम बॅग. अस्थिर चाल.]

# वृत्तपत्रीय तथा ललित लेखन



**मरेपर्यंत फाशी**
महाराष्ट्र टाइम्स, दिवाळी १९७५

**दलितांवरील अत्याचाराचे अंतरंग**
लोकप्रभा, ७ मे १९७८

**जयप्रकाश 'नरा'यन**
लोकप्रभा

**पांडुरंग महादेव बापट**
सत्यकथा, जानेवारी १९६८

**तुमानवाला**
वीणा, ऑक्टोबर १९६३

**हा जुलूम बस्स करा**

**डोळे म्हणजे फक्त डोळे**

**त्याची अखेरची इच्छा**

**हात**

**'आ'**

**नाटक**

**'अहम्'**

**भली मोठी गंमत**

**प्रेम**

**रसिक**

**पुरुषोत्तम**

**स्स**
'कोवळी उन्हे', १९७१

**एक भूक दंगल**

**सर्प-शृंगार**

**शोक**

**माकडवाला**

**छोट्या**

**हा-ऊ-ट !**

**पिसे**

**वलय**

**तेरा जून**
'फुगे साबणाचे', १९७४

**४१०० (अधिक काही इकडेतिकडे) खुनी**

**मुके कबूतर**

**एका माथेफिरूचा अंत**
'भिरभिरे', लोकसत्ता, १९७३

**एका खलपुरुषाचा अंत**
'रातराणी', १९७१

# मरेपर्यंत फाशी

उद्या सकाळी आमच्या तुरुंगात दोघा जणांना फाशी होणार आहे. तुमची बघण्याची इच्छा असली तर—

आहेच. मी क्षणही न दवडता उत्साहाने सांगून टाकतो.

हा कसला उत्साह ? ही कसली उतावीळ ? माझ्या नेहरू फेलोशिपच्या कामाच्या विषयाशी फाशीचा संबंध नसतो, असे नव्हे. पण हा उत्साह त्यापोटचा नव्हेच. उतावीळ तर नक्कीच निराळी, इतकी की न दिसावी म्हणून कष्ट पडतात.

कशाबद्दल फाशी देत आहेत ? कोण आहेत हे लोक ? मी हवापाण्याची चौकशी करण्याच्या चेहऱ्याने आणि स्वरात विचारतो.

शेतमजूर. दोघांनी मिळून एक खून केला. त्यांचा दयेचा अर्ज फेटाळला गेला. आता फिकीर अशी आहे, की फाशीचा दोर कुठे आहे तो सकाळपासून मिळत नाही. गेल्या दीड वर्षात फाशीचा प्रसंगच आमच्या तुरुंगात आला नाही ना.

नवा आणावा. माझी (विधायक) सूचना.

ढाक्याहून मागवावा लागेल ! हा दोर स्पेशल असतो.

वा ! दोर सापडत नाही तर उद्या या दोघांना फाशी देण्याचा प्रॉब्लेमच होईल ! —माझा किंचित कल्पनाविलास.

माझे स्नेही—तुरुंगाचे वरिष्ठ अधिकारी—जरा सचिंतच दिसतात.

फाशीचा सोहळा कोऱ्या पहाटेच असतो असे ऐकलेले. माझी चिंता त्या वेळी त्या ठिकाणी कसे पोचावे ही आता असते. वाहन सापडणे मुष्किल. त्याहूनही झोपेतून अशा अवेळी जागे होण्याची शाश्वती नाही.

माझ्याकडेच रात्री राहा. स्नेही सांगतात. माझी चिंता दूर करतानाही त्यांचा चेहरा काहीसा सचिंतच असतो.

जेवायलाच या.

मी लागलीच हो म्हणतो. जेवणाला तसे महत्त्व नसते. फाशी पाहायला मिळणे महत्त्वाचे असते. असा योग विरळाच. एक नव्हे, तर एकदम दोन फाशी.

आधीची मरगळ गेलेली असते. तरतरीत वाटत असते. आजचा दिवस उगीचच महत्त्वाचा वाटतो. कुणाला सहसा गवसत नाही अशी संधी. फाशीचे डबल् बिल्.

ह्यांना खरे म्हणजे उगीचच फाशी झाली आहे. स्नेही अर्थात वरिष्ठ तुरुंगाधिकारी. अजून मुद्रा अस्वस्थ. वास्तविक फाशी न देण्याकडेच न्यायालयांचा अलिकडे कल असतो. त्यात ही माणसे तशी प्रोफेशनल किलर्स नव्हेत. ती गरीब थरातलीही आहेत. पुन्हा एकाचे वय पंचावन्न तर दुसऱ्याचे थोडे जास्त. एरवी तरी तुरुंगात जगून ती किती जगणार ? फाशी माफ होईल असे वाटत होते. पण नाही झाली. स्नेह्यांचा सुस्कारा. या तर मग रात्री. तुमच्या सोयीने या. मी वाट पाहतो.

नक्की येतो. माझे आश्वासन. मी मलाच आश्चर्य वाटावे इतका उत्साहात असतो.

दिवसाची कामे कशीबशी उरकतो. कामातही कसे वेगळे, नवे वाटत असते. फाशीची वर्णने एरवी वाचलेली, ऐकलेली असतात. आता मी अशा एका वर्णनाचा कर्ता होणार असतो. दोन फाशीसोहळ्यांचा प्रत्यक्ष साक्षी. फाशीची प्रथा नष्टप्राय होण्याच्या काळात. म्हणजे भविष्यातदेखील माझ्याकडे सांगण्यासारखा एक 'अनुभव' असणार असतो.

उद्या पहाटे फाशी पाहणार आहे. माझी आधीच एकदोन ठिकाणी जरा जादा गंभीर चेहऱ्याने जाहिरात. दोघांना एका वेळी फाशी देणार आहेत.

जणू मीच हे करणार असल्यासारखी माझी छाती उगीच पुढे.

आत उत्सुकता वाढतेच आहे. पुसट वाटून जाते की अशाने उद्या फाशी पाहताना आनंदाचे भरते वगैरेसुद्धा येईल ! ॲब्सर्ड. फाशी हा तसा फारच भीषण प्रसंग असावा. ती विशिष्ट वेळ, ती जागा, तो विधी. भोवती गडद अंधार. नीरव शांतता. दोन जीविते संपणार.

मी रात्री स्नेही तुरुंगाधिकाऱ्यांच्या घरी पोचतो. तुरुंगावरनंच रिक्षा घराकडे जाते. काळोख्या तटबंद्या. काटेरी तारा. बंदूकधारी पहारेदार. रोगट उजेड ओकणारे दिवे आत कुठे तरी दोन जीव—उद्याची पहाट न फुटो म्हणणारे. काळरात्रीच्या जबड्यात एकेक क्षणाने खेचले जाणारे. अंगावर शहारा.

या. स्नेह्यांचा उद्‌गार. वाटच पाहत होतो. म्हटले, येता की नाही ?

असे कसे ? येणार तर होतोच.

आत दारूची एकपात्री बैठक रंगलेली.

काय घेता ?

काही नको.

काहीतरी घ्या.

बरे, द्या मग व्हिस्कीच.

आम्ही व्हिस्की घेतो. ते आधीपासून ती घेऊ लागलेलेच असतात. आणखी घेतात.

दोर सापडला.

गुड ग्रॅशस. तुमचा प्रॉब्लेम सुटला.

हँगमन कोण असतो ?

तसा तो कुणी वेगळा नसतो. जेलच्या स्टाफपैकीच कुणी असतो. पण या कामाचा त्याला अनुभव असतो. आमच्या जेलमध्ये हँगमन नाही. दुसऱ्या तुरुंगातून बोलावला. तो आज दुपारीच येऊन पोचला आहे.

वा. म्हणजे दोर आहे, हँगमन आहे.

फाशी द्यायचे ते तर आहेतच. आज त्यांनी मुर्गी आणि आइस्क्रिम मागून खाल्ले.

हँगमनला काय मिळते ?

पूर्वी एका फाशीला दहा रुपये. नंतर ते थोडे वाढले.

फारच कमी. फाशी द्यायचे म्हणजे कोणाला तरी मारायचे. तेसुद्धा फार कसबाचे काम. जरा चूक झाली तरी भलता प्रसंग. ट्रायल घेतात का ?

आदल्या दिवशी. फाशीच्या कैद्याच्या वजनाचे पोते बांधून. वजन अगदी नेमके कैद्याचे असावे लागते. ट्रायल झाली.

एकदम दोघे देणार की आधी एक, मग एक ?

एकदम. तशी सोय आहे आमच्याकडे. दोघेही पक्के आहेत. निर्ढावलेले. रास्कल्स.

तुम्हीच तर सकाळी म्हणत होतात की उगीच फाशी होते आहे...

जजमेंट नंतर नीट बघितले. खून फारच भयंकर होता. या कानापासून त्या कानापर्यंत गळा तोडला. शिवाय फाशीच्या आदल्या दिवशी कैद्याची भूक मरते. तो मागतो पण खात नाही. या दोघांनी मुर्गी, आइस्क्रिम चक्क खाल्ले. आय थिंक दे डिझर्व्ह धिस. ते नवा मोठा घोट रिचवतात. अर्थात तसे म्हातारेच आहेत हे खरे. खालच्या कोर्टात शिक्षा होऊन आता तीन वर्षे होऊन गेली.

कोणाचा खून केला ?

शेजारच्या जमिनीच्या मालकाचा. जज्जनेसुद्धा हेअरेरेजिंग म्हटले आहे.

म्हणजे यांची जमीन होती ?

छे छे. शेतमजूर होते. दुसऱ्याच्या जमिनीवर मजुरी करणारे. तसे भाऊ लागतात. मला वाटते चुलत असावेत. कुणी जवळ जवळ दोन वर्षांत भेटायला आलेले नाही. यावरूनसुद्धा कल्पना येते. मस्ट बी रिअली टेरिबल कॅरेक्टर्स. नवा घोट.

पूर्वीच्या फाशी दिलेल्या एकदोघांच्या हृद्य हकिकती. तुलनेने त्यांच्या गुन्ह्यांचे सौम्यपण. त्यांचे केविलवाणेपण, जरा वेगळेच. आणि मोठे काही घोट. वाढती अस्वस्थ मुद्रा.

जेवू या. लौकर झोपायला हवे. रात्री दोनला उठावे लागेल.

जेवताना बरीच स्तब्धता. ताटाच्या बाजूला व्हिस्कीचा ग्लास. पाण्याच्या ग्लासाऐवजी.

अवांतर गोष्टी. पण आत ताण वाढत असलेले. मधूनच चौकश्या. कोठून सुरुवात होते ? पुढे काय होते ? त्यानंतर ? दोर खेचतात की वेगळी काही व्यवस्था ? आणि मग ? लगेच मेला नाही तर ? बॉडीचे काय ? डॉक्टर जेलचाच असावा लागतो की बाहेरचा चालतो ?

स्नेही जेवल्यावर पत्नीकडून एक गोळी मागून घेतात. पाण्याबरोबर ती घोटतात. कसले तरी ट्रँक्विलायझर.

मी जजमेंट मागून घेतो.

माझी झोपण्याची जागा मला दाखवण्यात येते. आम्ही एकाच खोलीत झोपणार असतो. घराच्या एका बाजूची, स्वतंत्र दार आणि खिडकी असलेली खोली.

या खिडकीतून रात्री गार्ड मला हाक मारील. मी सांगून ठेवले आहे. मी तुम्हांला उठवीन. गुड नाइट.

स्नेही मच्छरदाणीत शिरतात.

शांतता.

मी जजमेंट चाळतो. मूळ गुन्ह्याची चर्चा. हेअररेजिंग शब्द अवतरणचिन्हात. प्रथम पाठलाग. मग भोसकणे. अनेकदा भोसकणे. त्याचा पळण्याचा प्रयत्न. पाडून चार हातांनी भोसकणे. त्यानंतर तो ठार मेला. मग त्याचा गळा तोडणे. रक्ताने भरलेले कपडे. पळण्याचा प्रयत्न नाही. तिथेच बाजूला विडी पेटवीत उभे. बाजूने बांधावरून जाणारांकडे काड्यांची पेटी मागत होते. हेअररेजिंग. शिवाय निर्ढावलेपण. पळाले नाहीत. पळण्याचा प्रयत्नदेखील केला नाही.

खून का केला ? नोटोरिअस कॅरेक्टर्स. खून झालेल्याने आपल्याला उपद्रव देतात, अडथळे आणतात, धमक्या देतात, धोका आहे अशा प्रकारच्या कैक तक्रारी आधी पोलिसांकडे नोंदवल्या होत्या.

पण हे तरी वैर कशामुळे ? जजमेंट शोधूनही उत्तर नाही. एक पुसटता उल्लेख. या दोघांच्या जमीनमालकाचे आणि खून झालेल्या जमीनमालकाचे दीर्घ काळापासून बरे नव्हते. मग त्या वैराचा या खुनाशी काही संबंध ? शोध नाही. जरूरही नसावी. खून सप्रमाण आणि निर्विवाद सिद्ध. खुनी ठरले. हेतूला तितकेसे महत्त्व नाही. कायद्याच्या चौकटीचे समाधान. हेअररेजिंग. फाशी हीच किमान शिक्षा. वरच्या न्यायालयात शिक्कामोर्तब. दयेचे सर्व अर्ज नामंजूर, कारण गुन्हा हेअररेजिंग.

जजमेंट बाजूला टाकून मी दिवा मालवतो, मच्छरदाणीत शिरतो. पलीकडच्या भिंतीलगतच्या मच्छरदाणीत चिडीचीप. मध्येच कूस बदलणे.

मीही कूस अधूनमधून बदलीत चिडीचीप पडून राहतो.

जेलच्या आवारात बरेच टोले पडतात. विरतात. झोप नाही. म्हणण्यासारखी बेचैनीही नाही. रहस्यकथेतले मधलेच दुवे लटकते रहावेत तशी बारीक आणि अलिप्त अस्वस्थता. मुळात काय घडले असेल ? कसे घडले असेल ? बाप रे. एकट्याचा भर दुपारी पाठलाग करून गाठून वारंवार भोसकून खून आणि नंतर गळा तोडणे. पाठलाग कसा केला असेल ? कसे भोसकले असेल ? तो ओरडला असणार. बेंबटलाच असणार. ऐकायला कोण ? हेच दोघे राक्षस. रक्तच रक्त मिटल्या डोळ्यांपुढे पसरते—इस्टमनकलर-रक्त. चित्रपटांतून अनेकदा बघितलेले. डोळे उघडले तरी काळोखात रक्ताचे लपके दिसतच रहातात. पुन्हा कूस बदलणे. गळा तोडणे म्हणजे कहरच. आणि पळालेसुद्धा नाहीत.

का पळाले नाहीत ? खून किंवा कसलाही गुन्हा केल्यावर पळणे, शक्य तितके दूर—ही तर नैसर्गिक प्रवृत्ती. यांनी तिथेच शांतपणे विडी शिलगावली. बाजूने येते जाते असता. म्हणजे तर नरपशूच.

नकळत डोळा लागतो. केव्हा तरी स्वप्न पडते. खिडकीतल्या अशक्त चांदण्यात एक सावली येऊन उभी आहे. घोगऱ्या हाका घालते आहे. साब. साब. दो बजे, साब.

डोळे उघडतच असतात. हाका खऱ्या असतात. तरी दचकून मच्छरदाणीत उठून बसतो. पलीकडच्या मच्छरदाणीतला घोरण्याचा मंद आवाज एकदम तुटतो. धसकून उठून बसण्याचा आवाज. स्नेही मच्छरदाणीबाहेर येतात.

आं ? हां. सब तैय्यारी है ?

हां साब.

मॅजिस्ट्रेटसाब आये ?

जीपसे, साब. और डाक्टरसाब भी हाजिर हैं.

अच्छा. तुम जाव. हम आते हैं.

तांब्यानेच घटाघटा पाणी पिणे. टेबललँप लागतो. मग दरवाजा उघडतो. बाहेर पाण्याच्या चुळा. मी मच्छरदाणीबाहेर येऊन उभा असतो.

उठलात का ?

जागच आली. गंमत म्हणजे जरा आधीच आणि आपोआप आली. वाटले, स्वप्न पडते आहे. पण सर्व खरे घडत होते. हाका वगैरे. तुम्हांला झोप कशी लागली ?

लागली तेव्हा चांगली लागली. चला, आटपू या. चहा घेऊन निघू.

हॉलच्या काळोखात मी माझे आणि ते जेलचे खाकी कपडे चढवतात. डायनिंग टेबलवर चहा आणून ठेवलेला असतो. आम्ही चहा घेतो. आता कोणी शब्द बोलत नाही. बोलण्यासारखे

सर्व संपल्यासारखेच वाटत असते.

निघू या ? चलो.

बाहेर अजून निर्जन अंधार असतो. भोवती अंधूक चांदणे असते. वर थोडासा चंद्र असतो. हवेत जरा गारठा असतो. माझ्या पलीकडून चालणारी, खाकी ऑफिसर्स कॅप, खाकी पोषाख घातलेली, हाती चांदीच्या मुठीची छडी वागवणारी व्यक्ती ओळखीची वाटत नाही.

न बोलता आम्ही गेटशी येतो.

खाड्खाड् सलाम होतात. गेटची भलीमोठी'कुलुपे आणि कड्या-कोयंडे खुले होतात.

आम्ही दोघे आत प्रवेश करतो. जेलचे गणवेषधारी वरिष्ठाधिकारी पुढे. मी मागे.

मागे पुन्हा दारे बंद होतात. सर्व कड्याकुलुपे लागतात.

पहारेदारांच्या मुद्रा बधीर किंवा झोपाळलेल्या नजरांत जागरण आणि भययुक्त आकस यांच्यामधले काही.

जेलची कचेरी. तोच दिव्यांचा थेट गेटपासून भेटणारा अपुरा प्रकाश. मध्यभागी टेबललँपच्या झोतात मोठ्या टेबलाशी एक सूटधारी (टायसुद्धा) गृहस्थ मनोमन एकाग्रतेने आणि धीरगंभीर मुद्रेने कसले पारायण करीत बसलेले. भोवती दोघे गणवेषधारी जेलअधिकारी. काही रिकाम्या खुर्च्या, एक थरमॉस, एक चष्मा-घर, काही फायली, वगैरे. जेल-अधिकाऱ्यांच्या मुद्रांवर अर्ध्या झोपेची नाराजी आणि कंटाळा.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माझ्यापुढे प्रवेश करताच बसलेले अधिकारी जरा हुशारून उभे राहतात आणि पुन्हा बसतात. आता आणखी दोन रिकाम्या खुर्च्या भरतात. एकीत मी. दुसरीत वरिष्ठ अधिकारी. पारायण करणाऱ्या सूटधारी, शुचिर्भूत वाटणाऱ्या गृहस्थाचे पारायण जरा खळते. पुन्हा सुरू होते. बाकीचे आम्ही बसून राहतो.

एव्हरीथिंग ओके?

येस सर.

डॉक्टर इज देअर, नो ?

ओ येस सर.

पुन्हा शांतता. 'पोथी'चे पान उलटल्याचा मध्येच आवाज. पोथी न्यायालयाच्या जजमेंटची. खालच्या कोर्टापासून वरच्या कोर्टापर्यंत सर्व जजमेंट्स मॅजिस्ट्रेटने वाचण्याचा हा विधी फाशीच्या सोहळ्यापैकी. चुकीचा माणूस फासावर जाऊ नये किंवा फाशी देण्यात चूक होऊ नये म्हणून या विधीची योजना.

मॅजिस्ट्रेट जजमेंट्सची पोथी धीमेपणाने वाचतात. मध्येच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी एखादा शब्द बोलतात.

वेदर इज रिअली गुड.

व्हेरी नाइस.



ओन्ली लास्ट नाइट आय कुड गेट सांउड स्लीप अँड धिस थिंग वॉज देअर. हॅड टु गेट अप, यु नो.

सेम विथ मी. ड्यूटी.

पुन्हा पारायण. अपरात्रीची विचित्र शांतता. बाहेर पहारेदारांची मध्येच कुजबुज. जजमेंटचे पान उलटण्याचा आवाज. थोडा खोकला. सुपारी कातरणे.

तुरुंगाच्या आतल्या आवाराकडून कसल्याशा ललकाऱ्यांची एक अस्पष्ट मालिका. कसले तरी धातूचे पोकळ आवाज. नक्की कसले ते न कळणारे.

वर एखादा पक्षी. अपराधी स्वरात ओरडावा तसा.

पारायण कधी संपणार ? त्याला वेगही नाही. शुचिर्भूत मॅजिस्ट्रेटना घाई नाही. वरिष्ठ अधिकारी मनगटी घड्याळ राहून राहून बघताहेत. एक दुय्यम अधिकारी मध्येच उठून जातात. पुन्हा येऊन बसतात.

टी, सर ? उरलेले दुसरे.

नो, थँक यू.

फॉर युअर गेस्ट ?

थँक यू. मी नकार देत.

सर्व हळूहळू अस्वस्थ होऊ लागतात—मॅजिस्ट्रेट सोडून. घड्याळे बघितली जाऊ लागतात. वेळ टळून चाललेली असते. 'झीरो अवर' मागे पडत असतो. ताण वाढू लागलेला असतो. मॅजिस्ट्रेट कोणत्या तरी जजमेंटच्या अध्येमध्ये असतात. अजूनही त्यांना घाई नसते.

कैद्यांच्या लास्ट वुइशचे काय झाले ? स्मरण झाल्याप्रमाणे वरिष्ठ अधिकारी.

त्यांना त्यांच्या एका गाववाल्याला भेटायचे होते. तो दुसऱ्या तुरुंगात जन्मठेप भोगतो आहे. आम्ही तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. ते म्हणाले तो धोकेबाज कैदी असल्याने चांगल्या बंदोबस्ताशिवाय त्याला पाठवता येणार नाही आणि त्यांच्याकडे स्पेअर करण्यासाठी गार्ड्स नाहीत, सर.

स्तब्धता.

ओव्हर ? सुटकेच्या स्वरात वरिष्ठ अधिकारी मॅजिस्ट्रेटना.

येस येस. लेट अस...मॅजिस्ट्रेटदेखील उठतात. प्रोसीड नाउ.

सर्व उठतात.

एक विधी संपला.

काळोखा तुरुंग आणि त्याच्या दगडी भिंती पार करीत फाशी कैद्यांच्या कोठड्यांपुढे आमची मिरवणूक पोचते. आता तिच्यात जेल डॉक्टर आणि पहारेदारांची भर पडलेली असते.

पुन्हा खाड्खाड् सलाम.

काळोखात बुडालेल्या फाशी कैद्यांच्या निःशब्द कोठड्या. पॅसेजमध्ये तोच अंधूक रोगट प्रकाश.

कोठड्यांसमोर बंदूकधारी पोलिसांचे एक खडे पथक. जणू त्या दोघांना फायरिंग स्क्वाडसमोर उभे करून गोळ्यांनी टिपण्यात येणार आहे.

कोठड्यांपैकी दोन कोठड्यांपुढे टेबलखुर्च्या मांडलेल्या. आता तिथे पेट्रोमॅक्सचे दोन दिवे घाईने लटकवले जातात. काही कोठड्या उजळतात.

एकीत एकजण पाठमोरा, अंगाचे मुटकुळे करून झोपलेला. उजेडानेही तो हलत नाही. दुसऱ्या एकीतला उठून बसलेला. टेबलखुर्च्यांसमोरच्या दोन कोठड्यांच्या गजामागून चार डोळे आमच्याकडे बघतात. दीन आणि भयाण. त्यांतला एक फुटका. त्याला बुबुळ नाही.

मॅजिस्ट्रेटसाहेब खुर्चीत स्थानापन्न होतात. (त्यांच्या अध्यक्षतेखाली तर यानंतरचा सोहळा नाही ?) एक मोठे रजिस्टर, काही खाकी कागद वगैरे त्यांच्या समोर ठेवले जाते. दोन बाजूला दोन अधिकारी उभे राहतात. कोठड्यांपुढे दोन पहारेदार. बंदूकधारी पथक आता 'हुश्शार'चा पवित्रा घेऊन ताठ उभे असते. बडे अधिकारी मॅजिस्ट्रेटशी काही कुजबुजतात.

निकालो.

एका कोठीचे कुलूप निघते. गजांचे दार उघडले जाते. आतला दोन दीन, अर्धमेल्या डोळ्यांचा मालक बाहेर आणला जातो. त्याला मागे हातकड्या अडकवल्या जातात. केसांच्या जटा. दाढीमिश्या वेड्यावाकड्या वाढलेल्या. बुटका, भरीव बांधा. काळा, बधीर चेहरा. (उगीच बेबंदशाहीतल्या संभीजीची आठवण येते.) त्या विचित्र उजेडात तो भीतिदायक वाटतो.

नाव. गाव. उमर. कुटुंबीय. वगैरे.

आता बॉडी मार्क्स.

पहारेदार भराभरा रजिस्टरमधले बॉडी मार्क्स प्रत्यक्षात 'टॅली' करतात. कुडता वर कर, चड्डी खाली कर, दंड पाहा. आता पाठ. असे वळव. मग तसे. परवानगीची गरज नाही. बोलूनचालून कैद्याचे शरीर. त्यात फाशीचे—म्हणजे संपणारे शरीर. एका खटक्याने लौकरच त्याचा निकाल होणार. धरण्यात, मागेपुढे करण्यात त्या शरीराविषयीचा हा ग्रह व्यक्त होतो. जणू ते शरीर नव्हेच; एक पोते आहे. किंवा प्रेत आहे, प्रेत. आणि डोळ्यांत अजून चांगलीच धुगधुगी असते. ते एकसारखे सर्वांवरून फिरत असतात. भ्यायलेले. बधीर. तरी चौकस. खुणा पटतात. आता निरवानिरव ऊर्फ मृत्युपत्र. मागे राहिलेली चीजवस्तू कुणाकडे जायची. चीजवस्तू म्हणजे या कैद्यापुरते अंगावरचे कपडे आणि थोडी चिल्लर. संपले.

त्याला कोठडीत ढकलण्यात येते. त्या दाराला कुलूप लागत असता शेजारचे दुसरे उघडते. (सर्कसच्या खेळाच्या वेळी जंगली जनावरांच्या पिंजऱ्यांची दारे अशीच उघडतात, बंद होतात.) नवा 'प्राणी' बाहेर येतो. आधीच्याचीच जखडली अवस्था. तशाच जटा. या जरा जास्त पिकलेल्या. अंग कृश. एकच डोळा. दुसऱ्याची फक्त खोबण. निबिड जंगलातून यावा आणि पुन्हा नव्या जंगलात निघाला असावा, तसा तो मनस्वी भ्यायलेला आणि वखवखलेला दिसतो. त्याचे तेच सोपस्कार.

नाव, गाव, कुटुंबीय. बॉडी मार्क्स. सरकारच्या ताब्यातल्या त्याच्या चीजवस्तूची यादी. मृत्युपत्र. पहिल्या कोठडीतला त्याचा जोडीदार हे सर्व गजामागून टकटका पाहत असतो. त्याला हे दुःस्वप्नासारखे दिसत असेल. अपरात्र. अंधार. पेट्रोमॅक्सचा भगभगीत प्रकाश. त्यात काही खाकी माणसे. त्यांच्या पसरल्या सावल्या. ती फारसे न बोलता यांत्रिकपणे एका माणसाचे शरीर उलटेसुलटे करीत पाहतात. एक बिनडोकी काही लिहून घेतो. हूं, हूं करतो. समोर बंदुका सरसावून अनेक खाकी रांगेत निःस्तब्ध उभे. तो तपासला जाणारा माणूस आपला चुलतभाऊ. आता कसा तो मटनासाठी खाटकाच्या दुकानी टांगलेल्या बकऱ्याच्या लाशीसारखा वाटतो. माणसाच्या डोक्याचे बकरे—जिवंतपणी मेलेले.

दुसऱ्याचाही सोपस्कार संपतो. त्याची कोठडीत रवानगी. ते दार बंद.

आता काय उरले ? मनात प्रश्न. वेळ टळून गेली आहेच. फाशीतसुद्धा वक्तशीरपणा नाही. तिकडे अमेरिकेत इलेक्ट्रिक चेअरमध्ये असे नसेल. माहिती नसता वाटते.

क्या ? क्या मांगता है ? चाय ? उसको चाय मंगता है.

चाय.

चाय मंगता है.

चाय.

पहारेदारांमध्ये अचानक कमोशन.

धावपळ. दोघे लांब निघून जातात. दहा आकडे मोजण्याआत एक थर्मास आणण्यात येते. जेलच्या कचेरीतले. शिवाय कपबशी. स्वच्छ, पांढरीशुभ्र. त्या वातावरणात कशीशी वाटणारी. तिच्यात चहा ओतण्यात येतो. एक पहारेदार कैद्याला पाजू लागतो. मागे हात जखडलेला फाशीचा कैदी कपाला तोंड लावतो. पाजणारा पहारेदार, पिणारा कैदी. कैदी तोंड मागे घेतो.

इसको गरम लगता है. दूध लाओ, दूध—

दूध—

दूध—

पुन्हा धावपळ. धावणारा एक पहारेदार बुटाच्या पायांनी चक्क घसरतो. पुन्हा धावत जातो. कोणी थाऱ्यावर नाही.

दूध येते. सरकारी दुधाची हवाबंद बाटली. भडाभडा ती चहाच्या कपात ओतण्यात येते. पहिल्या कैद्याचा पहारेदाराच्या हातून चहा पिण्याचा सोहळा. मग दुसऱ्या कैद्याचा.

लेट अस गो. वरिष्ठ अधिकारी.

आता आम्ही सगळे अंधारातून आणि अशक्त प्रकाशातून फाशीच्या जागेकडे निघतो. वाटेत एका वार्डातले एका कोपऱ्यात एकत्र राहून आम्हांला टकटका न्याहाळणारे कैदी. विलक्षण जागे. निःशब्द तंग.

एका खुज्या दरवाजातून प्रवेश.

फाशीची जागा. (अंगावर काटा उभा.)

आवार. त्यात बाग, हिरवळ. (कैद्यांनी तयार केलेली.) मधोमध चढता उंचवटा. उंचवट्याच्या उंच टोकाशी दुहेरी 'व्यवस्था'. चार खांब. दोन दोरखंड. फळ्याही दोन असणार. दोन दिवे. पहारेदारांच्या दोन जोड्या. जेलचे डॉक्टर. (हे एकच दिसतात.) आणि एकजण. हाच हँगमन. सर्व जणू कशाची तरी वाट पाहत जागणारे. आम्ही येऊन उभे असतो ती वाटच सरळ पुढे जाऊन वर फाशीकडे जाते.

आम्ही पुढे होतो.

कोणी बोलत नाही. विलक्षण शांतता.

फाशी-खांबांजवळच्या दिव्यांभोवती एक पाकोळी भिरभिरत असते.

आम्ही पायथ्याशी जातो. सर्व पुढे वर होतात, नकळत मी मागे, खालीच राहतो.

पायांखाली लक्ष जाते.

कोणी कैद्याने मातीत खापरांनी भरलेली इंग्रजी अक्षरे—

वेलकम. सुस्वागतम्.

बाप रे. कोणाला ? त्या तिकडची वाट चालणाऱ्या जीवाला ? शेवटाकडे निघालेल्या कैद्याचे स्वागत !

वर चालत गेलेल्यांपैकी मॅजिस्ट्रेट पुढे जाऊन त्या अनोळखी वाटणाऱ्या, चारचौघांसारख्या इसमापुढे उभे.

सब आलबेल है ?

सरकार.

ट्रायल ली गयी है ?

हां.

सगळे लग्नाच्या पुरोहितांप्रमाणे आता एका बाजूला पोझिशन्स घेतात.

ब्रिंग द प्रिझनर्स.

हे फाशीचे बोहले. कल्पना विलक्षण थरारून टाकणारी. तिथे नव्या आयुष्याचा आरंभ होत असतो, इथे सगळ्या आयुष्याचा शेवट होतो. मनात येते, कोणी सांगावे, इथेही एखाद्या नव्या अवस्थेचा आरंभ होत असेल.

बहुसंख्य कैदी तसेच मानत इथे पोचतात. इथला तो दोर गळ्याभोवती बसताना त्यातले धीट आणि भित्रे, दोषी आणि निर्दोषी, तरुण आणि वृद्ध, निरक्षर आणि शिक्षित, सगळे मानत असतील की चला, हा जन्म संपला. आता स्वर्ग किंवा नरक. किंवा पुढला जन्म.

की त्यांच्या मनात असेही काही येण्याचेदेखील त्राण राहत नसेल ? फाशीआधीच्या दिवसांत ते धार्मिक, सत्प्रवृत्त, शुचिर्भूत होण्याची पराकाष्ठा करतात हे तर खरेच. मरणाला भेटताना स्वतःच्या अंतरंगाला ते रात्रंदिवस परिश्रमपूर्वक, एका हव्यासाने नवी, आकर्षक रंगरंगोटी करीत असतात, त्यावरची गुन्हेगारीची पुटे खरडून काढण्याचा, किमानपक्षी दिसू न देण्याचा त्यांचा प्रयत्न जारी असतो, तो कशासाठी ? कोणासाठी ?

रामा. रामा. रामा. रामा.

बाहेरच्या अंधारातून खणखणीत आवाज घुमत येतो, हाका घातल्यासारखा.

सर्व नजरा दरवाजावर.

दरवाजावाटे सशस्त्र पहारेदार. मागून एक बिनचेहऱ्याचा देह. चेहऱ्याच्या जागी काळी टोपी. हात मागे जखडलेले. पावले यांत्रिकपणे पडत राहतात. आणि त्या हाका. रामा. रामा.

त्यात मुळीही आर्तता नाही. डावा-उजवा, उजवा-डावा, कवायतीतल्या हुकुमांइतक्या त्या स्वच्छ, भावहीन. रामा. रामा.

मध्येच आवाज जरा फाटतो. पट्टी खाली येऊन पुन्हा वर जाते. फ्रिक्वेन्सी कायम.

त्याला एका खांबाशी नेऊन योग्य जागी उभे केले जाते.

घोष चालूच. पावले थांबली तरी डावा, उजवा म्हणणे चालूच राहावे तसा.

हा दोघांतला कोण असावा ? ओळखू येत नाही. चेहऱ्याशिवाय माणसाला ओळख नाही.
दुसरा आवाज. वेंकटेशस्तोत्र. जवळ येते. मागून काळ्या टोपीतला बिनचेहऱ्याचा दुसरा देह सक्त पहाऱ्यात दरवाजावाटे आत येतो. हात मागे जखडलेले. पाय पुढे चालत आहेत. टोपीवाटे वेंकटेशाचा धावा. डेस्परेट नव्हे, कोऱ्या पहाटेच्या वेळी कोणा म्हाताऱ्या शास्त्र्याने फेऱ्या घालीत जरा घोगऱ्या, पारोशा स्वरात करावा तसा.

पहाट कोरीच. धावा तोच. फक्त फाशीची वाट चालणारा बिनचेहऱ्याचा एक शेतमजूर तो करतो आहे. हेअररेजिंग खुनातला अर्धा वाटेकरी.

दुसराही 'वेलकम'ची अक्षरे ओलांडून (ती वाचण्याला त्या काळ्या टोपीला डोळे नाहीत.) वर पोचतो. दुसऱ्याला, ठरल्या जागी उभा केला जातो.

दोघे एका वेळी काळ्या टोप्यांतून परमेश्वराला हाका घालीत आहेत.

रामा. वेंकटेशा. रामा. वेंकटेशा.

द्वंद्वगीत. 'रामा'च्या तालावर वेंकटेशस्तोत्राचा एक सूर.

बाकी सर्व स्तब्ध उभे.

'बोहल्या'वर दोन 'वर' आपल्याच 'शुभमंगला'ची मंगलाष्टके खणखणीत आवाजात म्हणत आहेत.

'पुरोहित' नुसतेच पाहत उभे. स्वतःला क्षणकाल हरवल्यासारधे.

आता एकाच्या गळ्याभोवती दोरखंडाची गाठ नीट फिट् केली जाते. एकदाच जरा हाक गडबडते. पुन्हा अखंडपणे चालू. रामा. रामा. रामा. रामा. (पट्टी जरा उतरली काय ?) दुसऱ्याचे स्तोत्र चालू.

मग दुसऱ्याच्या गळ्याभोवती दोरखंड बसवले जाते.

स्तोत्र चालूच. (वेग किंचित वाढल्यासारखा वाटतो. की केवळ भास ?)

दोघे जुळे भाऊ वाटतात. तशाच काळ्या टोप्या. तसेच दोरखंड. सारखीच उंची. कपडे तर सारखेच. तोच काळा वर्ण. तसेच आवाज. आणि भोवतालचे खांबांचे डिझाइनदेखील तसेच. तेच भवितव्य.

किंवा अखेर.

आता वरिष्ठ अधिकारी मनगटी घड्याळे पाहत असतात. दुसऱ्या हातात रुमालाची विशिष्ट प्रकारची घडी अधांतरी धरली आहे. (वेळ तर टळून गेली आहे. मग घड्याळ कशाला.) एकदम एक आवाज बंद. वेंकटेशस्तोत्रवाला. चावी संपावी तसा.

आता फक्त रामा-रामा-रामा-रामा-रामा.

जणू या हाकांच्या 'स्पेल'मध्ये सगळे अडकून उभे. सगळे संपून जणू या हाका उरलेल्या. एखादी हाक उगीच आत भिडते.

हाका बंद. साउंड 'ऑफ' व्हावा तशा.

पूर्ण स्तब्धता. दोन बिनचेहऱ्याचे, दोरखंडांना अडकवलेले एकसारखे देह. चलनवलनाची शक्ती संपल्यासारखे. आकाशात पक्ष्यांचा पुसट किलबिलाट. (पहाट होत असावी.)

गो.

रुमालाचा (थरथरता) हात झटक्याने खाली.

एकदोन गाफील क्षण आणि मग खटका.

नेहमीच्या अनेक आवाजांसारखाच खट्‌कन एक आवाज.

ट्रान्सफर सीन. देह नाहीत. ते होते तिथे काहीसुद्धा नाही. फक्त खाली गेलेले दोन दोरखंड. सर्व श्वास रोधलेले.

विश्वास बसत नाही. नजरबंदी. काळ्या पिशव्या घातलेल्या त्या दोन एकसारख्या आकृत्यांचे काय झाले ?

डॉक्टर थोडे पुढे येतात. अजाणता इतरही थोडे—फक्त मॅजिस्ट्रेट सोडून. डॉक्टर खाली डोकावून पाहतात—सप्तपाताळात डोकावावेत तसे.

डेड ?

डेड.

बोथ ?

बोथ.

आणि सुटकेचे काही भलेमोठे सुस्कारे.

संपले एकदाचे—अशा अर्थी. हाती घेतलेले तडीस गेले म्हणूनच ? की सुटलो एकदाचे दोन खुनांतून—अशा अर्थी ?

सगळे पुन्हा त्या लोंबकळत्या दोरखंडांच्या खाली गेलेल्या लोंबकळत्या टोकांकडे न पाहता परत निघतात.

मर्तिकाहून माणसे परततात तसे किंवा त्यापेक्षा मर्तिकाला माणसे निघतात तसे. पाय ओढीत. एकमेकांशी न बोलता. खालमानांनी.

फाशी दरवाजाबाहेर आम्ही येतो. तुरुंग ओलांडत निघतो. पक्ष्यांची किलबिल वाढली आहे. पण अजून उजाडले नाही. अंधार आहेच. वॉर्डात दिवे आहेत. आणि स्तब्धता. एका ठिकाणी बाहेरचे फाटक आणि वॉर्डाचा कोपरा यांतल्या फटीतून गजांशी गोळा होऊन गर्दीगर्दीने बघणारे कैदी दिसतात. आमच्यावर रोखलेल्या अनेक नजरा. घाईने त्या मागे निघून जातात. जेलच्या गेटशी सर्व पोचतो. औपचारिक निरोप घेतले जातात.

सर्व पांगतात.

वरिष्ठ अधिकारी पुन्हा माझे स्नेही झालेले असतात.

चहा घेऊन चला.

आम्ही त्यांच्या घरी पोचतो. चहा घेतो. न्याहारी करतो.

मध्येच अपराधी वाटते. पेट्रोमॅक्सच्या प्रकाशातले ते जिवंतपणी मेल्यासारखे दोन हीनदीन बधीर चेहरे. तो खोबणीतून डोकावणारा फुटका डोळा. रामा-रामा-रामा. वेंकटेशा. चेहऱ्यांच्या जागी काळ्या टोप्या वागवणाऱ्या दोन आकृत्या. तो खटक्याचा मामुली आवाज. आणि ट्रान्सफर सीन.

डेड ?

डेड.

बोथ ?

बोथ.

सुटकेचे सुस्कारे.

व्यवस्थित न्याहारी होते. एव्हाना लख्ख उजाडलेले असते. जणू रात्र नव्हतीच, असे !

# दलितांवरील अत्याचाराचे अंतरंग

तुमचं नाव ?

गोपाळा नथ्थू गवई.

तुमचं ?

बभ्रुवाहन नथ्थू गवई.

गाव सांगा.

धाकली.

कुठल्या जिल्ह्यात आलं ?

अकोला जिल्ह्यात. दोघांचा जन्म तिथेच झाला, धाकली गावात.

तुमचं वय ?

अठ्ठेचाळीस वर्षं.

तुमचं ?

पस्तीस वर्षं.

तुमच्या लहानपणापासून गावात काय परिस्थिती होती ?

चांगली होती.

दलितांना कशा पद्धतीनं वागवण्यात येत होतं ?

चांगलं वागवलं जात होतं.

तपशिलात सांगा. शिवाशिवीचा काही प्रश्न होता का ?

काहीच नाही.

[बभ्रुवाहन गोपाळला] न्हवता कसा ? बाबासाहेबांच्या कारकिर्दीपासून न्हवता, आधी होता.

तुम्हांला जाणवला होता त्याआधी ?

वा, वा.

तुम्हांला ?

बाबासाहेबांच्या आधी गावात पाटील होतं त्यांच्या संगं तेव्हापासून प्रेमात होतो आम्ही. आमच्या बाबाचा आणि त्या पाटलाचा दोस्ताना होता. तेव्हापासून आम्ही त्याच्यासंगं संरळीतच ऱ्हात होतो.

[पुन्हा बभ्रुवाहन गोपाळला] तुम्ही म्हनता ते मले काय पटले न्हाई. शिवाशिवीचा बाट न्हवता का आपल्या गावात बाबासाहेबांच्या अगोदर ?

त्योंच.

तुमच्या लहानपणापासून तुम्ही दलित आहात म्हणून रोजगार मिळण्याच्या दृष्टीने किंवा गावात जगण्याच्या दृष्टीने काही त्रास होता का ?

तसा काही न्हाई.

म्हणजे तुमच्या जगण्यात काही अडचण नव्हती ?

न्हाई.

तुम्हांला कामं मिळत होती.

होय.

तुमची जमीन होती का काही ?

[गोपाळकडे निर्देश करून] ह्याच्याकडे होती चार एकर. माझ्याकडे काही नव्हती.

तुमची चार एकर जमीन अजून आहे ना ?

विकली.

कशामुळं विकली ?

या झमड्यामुळं विकली. धाकलीतून मी गेलो व्हतो पळून.

तुमच्या दृष्टीने हा झगडा सुरू झाला तो तुमच्या मुलीला तुकाराम पाटलांच्या मुलापासून दिवस गेले त्यातूनच सुरू झाला ? तोपर्यंत पाटलाशी तुमचं बरं होतं ?

प्रेम होतं.

प्रेम होतं. मस्त प्रेम होतं वडलासारखी.

वडलासारखी.

हा माणूस—तुकाराम—पाटील कसा आहे ?

चांगला आहे. पैला चांगला आहे.

मग जे घडलं ते सर्व घडलं कसं ?

पाटील चांगला म्हंजे बदमाष आहे. तो बदमाषच आहे पैल्यापासून.

मग त्याला चांगला कसं म्हणालात ?

[गोपाळला] चांगला कसा म्हंता ? तो म्हंजे बदमाषच आहे पैल्यापासून.

बदमाष म्हणजे काय आहे ?

बदमाष म्हंजे रंडीबाज.

रंडीबाज.

जमीनदार आहे. सवाशे एकर जमीन आहे त्याच्याजवळ. आणि पैलेपासून बदमाषीचे धंदे करत आलाय.

रंडीबाजीपलीकडे दुसरं काय करतो ?

दुसरं काय न्हाय. व्यवहाराला चांगला आहे. साऱ्या गोष्टीला चांगला आहे. फक्त बदमाष आहे.

तुमच्या जातीतल्या लोकांशी एरवी तो चांगला वागायचा ?

हो.

त्याच्या रंडीबाजीचा तुमच्या जातीला काही त्रास होता का ?

न्हाई. आधी त्या कोळी जातीच्या लोकानल्हे त्रास होता. आमचंच प्रकरन पैलं आमच्या जातीत हे.

ते सुरू कसं झालं ?

मी गावात ऱ्हात असू. हे भाऊ होते आमचे बाहेरगावी.हे सरकारकडून ठेक्याची छोटीमोठी कामं घेत असत. मी गवंडीकाम करत होतो. म्हनजे दिवारा उठवनं. काय झाले की ह्यांचं कुटुंब गावी ऱ्हात असे. त्यामुळे यांची दुसऱ्या नंबरची मुलगी गिना नावाची—त्या पोरीशी—म्हंजे कामधंद्याच्या निमित्तानं शेतात जायची ती पाटलाच्या—त्यामुळं काय झालं की पाटलाच्या पोरानं—उद्धव नाव आहे त्याचं—त्याने त्या पोरीशी चोरटा वेवहार ठेवून त्यापासून त्या पोरीले दिवस गेले. वय पंचवीस वर्षाचं आहे त्या पोराचं.

हे घडण्याआधी हा पोरगा कसा होता ?

पोरगा म्हणजे...दोघा बापलेकाची ती सवयच होऊन गेली.

मुलीला दिवस जाण्यापूर्वी या मुलाचं तुमचं कितपत बरं होतं ? जाणं-येणं, बोलणं-चालणं किती होतं ?

आमच्या घरी का ? न्हाय, बिलकूल न्हाय. शेतात फक्त. त्याच्या शेतात आमच्या लोकांनी राबायला जायचं आणि त्यामुळे फायदा उचलला त्यानी.

पुढे काय झालं ?

फुडं—म्हंजे दिवस गेल्याचं एक दिवस माहीत झालं आम्हांला. तर मी याच्याकडे गडी पाठवला. म्हंजे हे भाएरगावी होतो कामावर. तर गडी पाठवला आणि बोलावून घेतलं. नंतर त्या पाटलाकडे गेलो आम्ही, गावचे लोकं काही ठळक ठळक घेऊन, न्याय मागायसाठी.

तुम्हांला कळलं कसं ? मुलीनं सांगितलं ?

हो, मुलीनं सांगितलं. म्हंजे त्याआधी डोक्टरी इलाज केला होता. म्हंजे ह्यांनी ह्यांच्या पत्नीला विचारलं की मुलीची प्रकृती चांगली दिसत न्हाई. तर पत्नीनं सांगितलं मुलीला पानथरीची बिमारी आहे. तर ते आमच्या शेजारीच विठ्ठल नावाचे डाक्टर आहेत. आयुर्वेदिक उपचार करा म्हून ह्यांनी सांगितलं. आयुर्वेदिक उपचार करायला लागले तर डॉक्टरनं सांगितलं की मुलीला पानथरीचा रोग तर काही न्हाई आहे, ही गरोदर आहे. त्यामुळं काय झालं की आता कसं काय करायचं बाबा. मग...तर... पाटलाचे इथं आम्ही न्याय मागायले गेलो.

मुलीने पाटलाचं नाव सांगितलं ?

हा.

तर आम्ही विचारलंच. की हे दिवस गेलेत हे कोनाचे आहेत. तर तिने सांगितलं की उद्धवरावाचे आहेत. तर आम्ही दोघे भाऊ पाटलाकडे न्याय मागायसाठी गेलो. म्हनलो की हे मुलगी म्हनते दिवस जे गेलेत हे उद्धवरावाचे आहेत, तर हिला तुम्ही सून म्हनून तुमच्या घरी ठेवा. जरी न्हाई ठेवत असाल तर काही दोन हजार तीन हजार रुपये कोनी नवरदेव कोनी आमच्या जातीतला उभा करून त्याले तुम्ही ते पैशे द्या. कोनी घड्याळ मागत असंल, कोनी रेडिओ मागत असंल, जमीन मागत असंल—जे काही मागत असंल ते द्या आणि हे लग्न लावून द्यावं. तो नामंजूर असे. माझ्या मुलाचा न्हाई म्हने ती. तो पोरगाही म्हने माझं न्हाई. काय झालं—थोडंसंक एक व्हायलं सांगायचं. सांगू का त्ये ?

हो, हो.

तर हे बाहेरगावीच होते.

माला माहीत न्हवतं. पोरगी गरोदर झाली. बाहेर चळवळ मातली. तर त्या पाटलाच्या पोराकडे आमची एक भावजय गेली. हे जे झालं ते तुमचं आहे म्हनते पोरगी—ह्याचा काय विलाज ? तर त्याच्या वडलानासुद्धा म्हाईत न्हवतं ते. पोरानं दुसऱ्या मानसाकडूनच शंभर रुपये उधार घेतले न् माझ्या भावजईकडे दिले—म्हंजे ह्यांच्या पत्नीकडे. अन म्हनला एकाद्या दवाखान्यात नेऊन ही जी गरोदर हाय पोरगी, गर्भ हिचा खसून टाका. वाशिमला—म्हंजे आमच्या अकोला जिल्ह्यातच —एक ख्रिश्चन दवाखाना आहे. त्या दवाखान्यात यांची पत्नी, दुसऱ्या चुलत भावाची बायको आणि यांची मुलगी यान्ला दवाखान्यात पाठवलं. ख्रिश्चन दवाखान्यातल्या बायांनी विचारलं, की बाबा हिला दिवस गेले पन हिला नवरा आहे काय ? ह्यांनी सांगितले पाटलाच्या पोराच्या सांगन्यानुसार की हो. मग नवरा कुठाय ? ते न्हाई आला बा ? यांनी विलाज ते गर्भ पाडायच्यासाठी मागतलं होतं पण त्यांनी गर्भ पाडायच्यासाठी न्हाई पन वाळायच्यासाठी काही गोळ्या वगैरे विलाज केला त्या ख्रिश्चन दवाखान्यात. ते काही सफल

झाले न्हाई. मग वापस आले. वापस आल्यानंतर ह्ये आमचे भाऊ आले. त्यान्ले बोलावून घेतलं गडी पाठवून. नंतर आम्ही पाटलाच्या घरी न्याय मागन्यासाठी गेलो. यानं गडी पाठवला आणि मी इथवर आलो. पाटलानं मला बोलावन्यासाठी सकाळीच गडी पाठवला. पोलिस पाटलाला बोलावलं. का हो म्हने तुमच्या पोरीला असं असं झालं. हे खरं आहे का ? मी म्हनलो मला काही बराबर माहीत न्हाई. गडी पाठवला म्हनून मी आलो. तुम्ही त्या मुलीला विचारा. सरपंच, पोलिस पाटील तिथं बसला. मुलीला बोलावलं. का हो म्हन पोरी, ह्ये बराबर हाय काय ? तिनं सांगितलं, हां, बराबर हाय. मग हे कोनाचं हाय ? तर म्हने उद्धवरावाचं हाय. मी म्हनलो, तुम्ही हिले इथं ठेवून घ्या किंवा काय हिचं करायचं ते करा—तुम्ही. तसं म्हनलो तर त्यानं एकशे सात आमच्यावर केस केली. त्यात आम्हा दोघा भावाला आरोपी केला. जमानत झाली. जमानत दिल्याच्यानंतर काही दिवस गेले त्याच्यावर. ते केस चालूच. आम्ही तारखेवर जात जाव. पुढे पोळाचा महिना आल्यानंतर मुगाच्या शेंगा तोडनं सुरू झाल्या. मुलगी बाळंतीण झाली होती. सातआठ दिवस गेल्यावर त्यायनं मला एका चौकात पकडलं. भीमराव, त्या पाटलाचे गडी आणि हे उद्धवराव होते ते—

भीमराव कोण ?

त्याचे नातेवाईक. त्याचे नोकर असतंय ते भीमराव, बंडू, नामदेव, त्याचे धाबारा जणांनी मला घेरलं. मी दुकानावरून काय घेऊन चालल़ो होतो. तर म्हने काय रे बा, तू अशी गुंडगिरी करशील तर तुझा निकाल लावू. भीमरावानं माझी गच्ची दाबली. मी धडपड कराय लागलो. त्याच्याबद्दल तोंडी रिपोट पोलिस ठाण्यावर मग मी दिला होता. तर मी त्या गावातून आता हे बरं न्हाई वातावरण म्हणून पळून गेलो. काशीच्या भागाकडे गेलो.

तुम्ही एकटेच—बाकी घरची माणसं गावात होती—

गावातच होती.

त्यांना त्रास होईल असं तुम्हांला नाही वाटलं ?

त्यायला तरास न्हवता काही. बाया बाया, काय तरास होनार त्यानला ? मग तिथून मी महिन्याभरानं आलो तर एकाला मी पैशे दिले होते त्यानं झगडा लावला होता त्या केशीत दंम करूनशानी माझी जमानत काढायला लावून मला बंद केलं.

कुठली केस होती म्हणालात ?

ही केस होती अकोल्याची—अशील होता एक त्यानं केली होती माझ्यावर.

कशाबद्दल ?

मी म्हंजे त्यायला साडेचारशे रुपये दिले होते. दोनतीन खेप मागायला गेलो तर दिले नाही. त्याच साली मी माझ्या बहिनीचं लग्न केलं होतं. अंदर आलो होतो, पैशे पाह्यजे होते. पैशे मागतले तर त्यानं केस केली. ते केस मीच जितली म्हणा. माझा आठ हजाराचा दावा त्याच्यावर चालत होता पण मी काही टाकला न्हाई. म्हनलो काय टाकायचाय दावा.

हा कुठल्या जातीचा होता ?

मारवाडी. गोएंका.

त्याचा धंदा काय ?

नोकरी होती त्याची. मी ठेकेदारीचं काम करीत होतो त्याच खात्यात. एकमेकाला देनंघेनं होतच होतं. मी दिले त्याला उसनेउधार. या लोकांनी सांगून सांगून मला त्या केशीत हवलातीमधी बंद केलं. जमानतीवर सुटलो. फुडं या दुसऱ्या केशीत तारखा पडाव्यात. त्याचं काय ह्येच न्हाई. फुडं पोरगी बाळतीण झाली. मग एकदा पोरगी त्या पाटलाले विचारून मुगाच्या शेंगाले शेतात गेली होती. मी गजाननबुवाचे शेगावला जत्रेला गेलो होतो. तिकडेच होतो. वावरात गेली नं झोकाबिका केला तं या पाटलानं मानसं जमा केली. तिनं काय शेंगाबिंगा तोडल्या न्हाई. तिच्याजवळ मुद्दा न्हाई, माल न्हाई. कावं म्हने का म्हून तोडते. यानं लगेच घोडं दामटलं की पोलिस ठान्यावर रिपोट देऊनशानी चौकशी आली. दोन दिसातच मी आलो घरी. का वं म्हणे पोरीनं तुमच्या शेंगा तोंडल्या ? मी म्हने शेंगा तर न्हाईत बाबा. न्हाई न्हाई म्हने तुमच्या पोरीला पकडून नेणार.तर म्हनलो मर्जी आहे बाबा सरकारी लोकांची. त्या पोरीला अरेस्ट करूनशानी नेलं पिंजरला. मी पाठोपाठच आलो. म्हनलो काय या पोरीची जमानत बिमानत काय,तर म्हनले हो बा, जमानत होतील. चीफसाहेब म्हनला उद्या पाहू त्याबध्धल. मग रात्रभर मी तिथेच मुक्काम क्येला. झोपला व्हरांड्यामधी पोलिस ठेसनच्या आणि सकाळी उठूनशानी चीफ साहेबाकडे गेलो. म्हनलो जमानत द्या बाबा पोरीची. तर म्हनले तुमच्याकडे जिमिनबिमीन हाय काय ? तर म्हनलो, हो, हाय. दाखला आनला काय ? तर म्हनलो आनला न्हाई पण मी आनतो दाखला. तिथंच एकाकडनं दाखला घेऊन आलो. तर म्हनले न्हाई बा, आता आमची कागदपत्रं लिहिलीत, आता जमानत न्हाई देत. अकोल्याला आनलं न बंद करून दिलं. तीन हप्ते जमानत न्हाई झाली पोरीची. नंतर पोरीला जमानतीवर सोडवून आन्लं. फुडें हंगामाचा टाइम आला. हंगामाचे टायमाले काय केलं त्या पोरीनं, तिनं आपलं सुडकंमुडकं बांधलं—आमच्या मागं, मी घरी नसता—एक साधू आला होता त्या साधूकडे बसायले गेलो होतो मी जंगलातनी—त्या पोराला घेतलं आपलं न् गेलीन. पाटलाच्या घरात जाऊन बसली. की बाबा आता मी या पोराला कशी जगवू ? अशी पाटलाच्या घरात जाऊन बसली. आम्ही काय तिला सांगितलं नाही की बस जाऊन का काही का काही.

तुमच्या घरची परिस्थिती या वेळी कशी होती ?

आमची परिस्थिती बरी होती.

सादारण होती. धावायचं, खायचं, मजुरी करायची...

म्हणजे त्या मुलाच्या पालनपोषणाची फार अडचण नव्हती ना ?

हो ना. पण त्या पोरीच्या मतानं ग्येली ती. माझे भाऊबंद म्हनत होते, हे काय केलं गा. तर त्या पोरीला ती घरात जाऊन बसल्याच्या नंतर पोलिस ठाण्यात जाऊन त्यानं रिपोट दिला पाटलानं. पोलिस आले. पोलिस आम्हाले बोलले की बाबा तुमी हिला घेऊन जा तुमच्या घरी. मी म्हनलो, मागील दिसा त्या पोरीवर चोरीचा आरोप लावला अन आता जर घेऊन जाऊ माझ्या मनानं तर ही घरात गेलेली हाय पोरगी. मी कसा काय नेऊ बुवा. मग म्हनले आम्ही दुसरी

कारवाई करतो. म्हनलो, तुमच्या मनानं काय करा द्येवा, तुमचं सरकार हाय. वापीस गेला चीफ साहेब अकोल्याला आणि लायरीतने पोलिस भरून धाबारा—दोन लेडीज पोलिस—चीफ साहेब दोन—एक तहशीलदार—असे घेऊनशानी आला धाकलीला. संध्याकाळी सात वाजता बोलावलं. तुमीच काय गोपाळराव तर मी म्हनलो हो साहेब, मीच. काय हो म्हनले परस्थिती कशी झाली तर मी म्हनलो म्या काय सांगतलं न्हाई साहेब. ती जाऊन बसली. तिच्या मनानं बसली. तुमी जेवन केलं काय, तर मी म्हनलो मघाच सोडला भाऊ उपास. बरं म्हने तुमी आता म्हने चहापानी घेऊन या म्हने. मी आपला चहापानी घेऊन आलो. दोन वाजस्तवर बसवलं. दोन वाजता हाताતने हातकड्या टाकल्या माझ्या आणि मुलीला आनले. दोन वाजता घेऊनशानी आमाले अकोल्याला आनलं. रात्रभर कोतवालीत ठेवलं, दुसऱ्या दिवशी कोर्टामधी नेऊन हवालातीमधी बंद करूनशानी टाकलं.

मुलीला हातकड्या घातल्या नव्हत्या—

मुलीला न्हाई घातल्या.

पोलिसांनी पकडेपर्यंत पाटलाकडे मुलीला वागवलं कसं ?

पुलिस पाटलाचे इकडून खाना येत होता तिला. पाटलाकडचा खाना मिळत न्हवता.

हवालातीत बंद केलं मग आमाला घरच्यांना पकडून जमानतीवर सोडून दिलं. आतमधे होतो तीन हप्ते त्या वक्ती. केस चालली. केस चालता चालता केस १०७ आम्ही जितली. केस १५१ ते पन जितली. तहशीलदारानं आम्हांला सोडून दिलं. पन दिवानीतल्या केस चालूच होत्या. मी शेतबीत विकलं आन वाशीम तालुक्यातल्या चिखलीला रहायले गेलो. हा तिथं धाकलीत येकटाच ऱ्हात होता. बरेच दिवस झाले तवा म्या म्हटलं चला बाबा आपलं सामानसुमान हाय ते न्यावं न यालेही सांगावं का तू तिथं ऱ्हाऊ नको. अकोल्याची तारीख करून शेती वस्तरवारी त्या गावामधी गेलो. गावात गेलो बारा वाजता. त्यानंतर दोस्तबिरादारान्ला भेटलो. काय झालं तर म्हनलो दोन केशी जितल्या. मग च्यापानी हे ते झालं. जल्मभूमीच हाय त्या गावची तर च्यापान्याला बोलावलं लोकायनं—आमचे लोकायनं, मराठी लोकायनं—बसाय उठायला गेलो.

मराठे लोकांनी बोलावलं—

हो. मराठी लोकायनी बोलावलं.

गावातल्या बाकीच्या जातीशीही तुमचं चांगलं होतं ?

सर्व्या जातीसंग चांगलं होतं माझं.

घरी बोलावून माणसं म्हणाली काय ?

कसं काय झालं तुझ्या केशीचं. दोन केशी जितल्या म्हनतो असं काय पाटलाले कोनी सांगतलं असेल. मग संध्याकाळच्या पारी हा जवायसाठी बोलवायला आला. चला म्हने भाऊ जेवनाचं झालं म्हने. चला म्हनलं. एकामागे एक अशेच निघलो तर तो—आम रोडवरच त्याचं घर—

तुकाराम पाटलाचं. तर तुकाराम पाटील लांबूनच म्हनला का रं बाबा म्हनं तुझीच पोरगी स्वताची छिनाल आणिक आमची बदनामी कराय लागला ? किती नालायक हाएस ! म्या म्हनलो काय बोलून ऱ्हायला ह्ये काका तुम्ही. आम्ही राजा म्हनलो बोलत ऱ्हाई चालत ऱ्हाई तुमच्यासंगं पन तुमी लयच बोलता. असं मी त्याला बोलू लागलो तर ते दोन-तीन श्या दिल्या तर मी पन त्याला दोन-तीन श्या दिल्याच. असं बोलत ढांगभर अंतरावरच आलो—चौफुलीसारखा चौक हाय त्या चौकावर यानं मान्सं दबून ठेवलीच होती. तो मागून बोलत आला. तो बोलून ऱ्हायला न मी त्याच्यासंगं बोलून ऱ्हायलो. हाना म्हने भोसडीसच्यायले हे माजले भोसडीचे. धावला एक लमाण्याचा पोरगा. अशी काठी जी मारली त्यानं इथं त्या कचाटीतच खाली पडलो मी. काठी डोक्यात मारली—

हा. तसंच याही पोरांनी मारनं सुरू केलं. पाठीवर मारलं. ह्ये ठेचलं पयलायनं. आन चित्त केलं मला पयलमपट्टा.

बाकीचे लोक होते मारणारे, ते मराठेच होते का ?

मराठीच होते. येक बनजारी होता—लमाणी समाजाचा. जे असं चित्त केलं न छात्यावर बसला. आन सातजणानं मला धरलं. कुनी पाय धर, कुनी हात धर. आणि एका जणानं—उद्धवनं—त्याथं आला, त्यानं ब्याटरी दाबली न त्यानं असे काडीने डोळे ठोसले माझे. आन येका हातानं ह्ये त्यानं असा बुबुळ काल्डा. त्याला मी इथं चावलो. मग माझं मारनं झाल्यावर दमही जरा कमी पडला आत मंग धावले याच्यावर.

बभ्रुवाहनवर—

हा. ह्याले पाडलं खाली. तेवढेत त्याची लक्ष्मी आली धावत. ह्याच्या अंगावर पसरली. तिला ओढून काडलं न दोन-तीन थापडा मारल्या, काय गळचप्पा केल्या न तिला बाजूला केलं न ह्याचे छातीवर बसला न ह्याचे पन डोळे असे ठोसले काडीनं.

तुमचे कसे काढले डोळे ?

कुनाचे, माझे ? हे सांगतात तशेच काढले.

ठोसल्याच्या नंतर—येक मोतीराम नावाचा मनुक्ष होता—ते उड्या माराय लागला. आता आमाला होतं थोडं थोडं ध्यान—कोन भोसडीचा आता येनार हाय या ! त्यायचे पन डोळे काल्डल्याशिवाय ऱ्हानार ऱ्हाई. आमचे लोकं—त्यान्ले वाटलं की काय करावं ? म्हून गप्प ऱ्हायले लोकं.

तुमचे लोक तिथे आले होते—

तिथे ऱ्हाई आले आमचे लोक. मोहल्ल्यातच ऱ्हायले.

दोनशे एक मानूस हाय आमचं गावात. मंग आमाला माझ्या भैणीनं न याच्या लक्ष्मीनं घरी आनलं, आनल्याच्या नंतर असं झोपवून दिलं आम्हांला आमच्या घरात. तर तिथं कोनी भेटीला येत—भेटीला येत तर काय सांगन की आमचं नाव नका सांगू भेटीला आले म्हनून. रात्रभर तरास झाला. दुसऱ्या दिशी तरास झाला. तिसऱ्या दिशी दिवस निघाला...आमची सहा

मैलावर एक भैन होती तिला कळलं का ती आली. याले गाडीबैल मागे, त्याले गाडीबैल मागे. कुनी गाडीबैल न देत्या पाटलाच्या धाकानं. मंग इथूनतिथून आमचा पुतन्या म्हून कुणी एक सरपंच व्हता पैले त्याले कसंही बुवा जोराने ह्याने म्हंटलं, जा म्हने, कसा काय हाय त्यो, जुल्मानं धरून गाडीबैल आन त्याचे. त्या वक्ती याची लक्षुमी आणि बायको गेली आणि गाडीबैल तयार करून शेती घेतली तर कुणी जुपून द्यायला तयारी घेतली न्हाई. मंग त्या गाडीत आम्हा दोघा भावान्ला बसवलं आनं भैन धुरीवर बसली आन येक भैन मागं न भावसून मागं असं आमाला पिंजर ठेसनपर्यंत आनलं आणि पिंजर ठेसनमधे आणुनशानी आमी काय ती कैफत बिफत दिली. मंग अकोल्याले आन्लं. एक पोलिस दिला संगं. अकोल्याले आलो. दवाखान्यात भरती झालो.

पिंजर पोलिस स्टेशनवर तुम्ही पोचलात तिथलं जरा सांगा—

[उपस्थित दलित पँथर कार्यकर्ता] गाडीचं सांगा—गाडी कशी मिळिवली—

आमी जमिनीवर पल्डो त्या वेळीस पुलिस पाटील आले होते. माझी पत्नी होती आमच्याजवळ. पुलिस पाटलाला विचारले माझ्या पत्नीनं, यान्ला घराकडे घेऊन जाऊ काय ? मला काय विचारता म्हने, न्या का नका नेऊ, मरू दे म्हने इथे. आता बाईची जात तिथे कशी जागणार एकटी ? त्यामुळे तिने उचलून ती अनिक आमची एक चुलत भैन आमाला घेऊन गेले घरी. रात्रभर ठेवलं आम्हांला तिथेच. सक्काळीच उठल्याबरोबर पुलिस पाटलाच्या घरी माझ्या पत्नीला मी पाठवलं—होश आल्याच्या नंतर की बाबा जा आता तू कैफियत माग त्याला लिहून, आपुन पुलिस स्टेशनमधे जाऊ मग. पत्नी गेली. तिनं विचारलं का आमाला कैफियत लिहून द्या तुम्ही. रिपोट द्या. त म्हने मी रिपोट वगैरे लिहून देत न्हाई. तिकडे कुनाकडूनही घेऊन जा लिहून . कोन लिहून देणार पुलिस पाटलाने न्हाई म्हंटल्यावर ? मग म्हनलो जा गाडीबैल कुणाचे तरी माग. गाडीबैल मागायला गावात आमचा एक किसाराम सावकार आमच्या समाजाचा—आमचा चुलत भाऊच हाय. सावकार हाय—सवाशे एकशे एकर जमीन हाय त्याच्याजवळ. तर त्याच्याकडे पाठवलं. तर तो काही घरी न्हवता. त्याच्या दुसऱ्या नंबरचा मुलगा रामकृष्ण नावाचा होता. त्याला माझ्या पत्नीनं गाडीबैल मागायचा फार आग्रह केला परंतु त्यानं काही गाडीबैल दिले नाही. गाडीबैल काही भेटले नाहीत. किंदखेड धाकलीच्या नजीकच येतं. तिथला एक माणूस आला. ते म्हने काय हो म्हने काय वेवस्था हाय तुमची जायची. आम्ही म्हनलो गाडीबैलच कुनी देऊन न्हाई म्हायलेया पाटलाच्या धाकानं. चला म्हने मी देतो. दारू पिलेल्या अवस्थेत बरं पन ! माझ्या पत्नीला व भैनीला पाठवलं त्याच्या संगत. आमच्या गावात आमचा एक पुतण्या पंचायत समितीमधी निवडून गेलेला आहे. किंदखेडला हा म्हने, त्याची चिठ्ठी आना म्हनजे मी गाडीबैल देतो. वापस आले, चिठ्ठी नेली. तोवर दारूबिरू त्याच्या अंगातली उतरली. मी काय देत न्हाई म्हने गाडीबैल. दोघी वापस आल्या. तिसऱ्या दिशी म्या सांगतलं माझ्या पत्नीला न भैणीला. रामराव गवईचे म्हनलो बैल धरून आण आन, ते छकडं—कुनी आडकाठी येत असेल तर त्याले सरळपने सांग, जा नेतो म्हनून. काय होत असेल ते करून घे. कशासाठी असते म्हनलो सखखे लोकं ? जबरदस्ती धरून

आन्ले गाडीबैल. ते जुपले. जुपून द्यायलासुद्धा कुनाची तयारी नसे. धुरीवर बैल हाकायसाठी कोनीच नसे. म्या पुष्कळ लोकांकडे माझ्या पत्नीला पाठवलं की बाबा पाच रुपये रोज घ्या पन पुलिस स्टेशनपर्यंत गाडी हाकत चला. पन कोनी काय तैयार न्हाई. कारन काय ? तर पाटलानं असं म्हटलं होतं का कोनीसुद्धा ह्येंच्या मदतीस आलं तर त्याचेसुद्धा आम्ही डोळे काढू. माझी भैण जी लहान, तिनं गाडी जुपली, आम्हा दोघे भावान्ला बसवलं त्या गाडीत आणि तीन बाया मिळून पुलिस स्टेशनपर्यंत आम्हांला नेलं. पुलिस स्टेशनच्या गावात एक रुपया देऊन कैफियत लिहून घेतली.

हे सगळं घडंत असताना गोपाळरावांची मुलगीं घरी होती का ?

हे बाहेरगावी होते ना रहायला. त्या दिशी पाहुणे आले होते.

मुलगी कुठे होती ?

मुलगी ह्यांच्या सासुरवाडी होती आईसंगं. सहकुटुंब सहपरिवार बाहेरगावी गेले होते. पुलिस स्टेशनमधी कैफियत दिली. त्या वेळी तिथे आमच्या गावचे आमचे डोळे फोडणारे तुकाराम पाटील, त्यांचे सोबत नामदेवराव सावकार, पुलिस पाटील, असे होते. हे आम्हांला माहीत कसं ? आमचे डोळे फुटले होते. परंतु माझी पत्नी सांगत होती. इन्सपेक्टर आम्हांले पहायलाही नाही आला. असून तिथं. अठ्ठावीस तारखेला साडेदहा वाजता रात्रीचे अकोल्याला एसटीने मेन हास्पिटलमधी आम्हांला आणलं. भरती केलं. तारीख अठ्ठावीस नऊ चौऱ्याहत्तर. सव्वीस नऊ चौऱ्याहत्तरला आमचे डोळे फोडले गेले. चारपाच दिवस गंभीर अवस्थेत आम्ही तिथे ऱ्हायलो. शेवटी यान्ला धनुर्वात झाला. भीती पडली, मरतात काय कुनास म्हाईत. एक दिवस अचानक या लोकाला कोनी तरी सांगितलं—पँथरच्या आमच्या अध्यक्ष महाराजाला आणि उपाध्यक्षाला—उपाध्यक्षसाहेबाला. ते आले, आम्हांला सर्व विचारलं. कैफियत लिहून नेली कसं कसं झालं हे. त्यांनी चळवळ सुरू केली मग.

आरोपींना केव्हा पकडलं ?

हे दोघं पुलिस स्टेशनमध्ये गेले. सबइन्सपेक्टरला विचारले, काय हो म्हने हे कसं काय झालं, आणि आरोपीन्ला अटक का केली न्हाई. त्यानं आश्वासन दिलं, मी या दोनचार दिवसांत त्यांना पकडून अरेस्ट करतो. त्यांनतर चार लोकान्ला पकडलं. डोळे फोडले त्या वेळेस नऊ लोक होते.

ही नऊ माणसं गावातली सराईत गुंडच होती की त्यांनी तुम्हांलाच मारलं ?

तशी गुंड नव्हते, ह्यानं ठेवलेले होते ते. मुद्दाम होऊन आमच्यासाठी त्या पोराच्या मागं फुडं ठेवलेले होते ते—पैलवान म्हनून.

म्हणजे गुंडच होते—

हो हो. एक भाएरचा होता—

गुंड न्हाई तर काय मग ? गुंडच होते.

पाच गुंड होते न बाकी त्याचे नातेवाईक. तर नऊ लोकांनी मारलं न चार लोकान्ला अटक

केली. ह्यांनी निषेधसभा वगैरे घेतली, मोर्चा काढला पिंजर पोलिस स्टेशनवर. तेव्हा उरलेल्या पाच लोकान्ला आठ दिवसांनी अटक झाली. तसंच आमच्या दोघांविरुद्ध पण पाटलाने एक केस नोंदवली होती. आम्ही त्यान्ले त्यांच्या घरात शिरून मारलं या आरोपावरून ! कधी मारलं ? तर आमचे डोळे फोडल्यावर !

तुमचे डोळे फोडल्यावर त्यांच्या घरात शिरून तुम्ही त्यांना मारलं ?

अशी केस आमच्याविरुद्ध नोंदवली होती. ह्या नऊ लोकान्ले सकाळी पकडलं, संध्याकाळला जमानतीवर सोडून दिलं. आणि डोळे फुटण्याआधी माझ्यावर पाटलानं चोरीची केस लावली होती. माझं चार एकर शेत होतं. ते मी विकलं आणि पैशे आले त्याचे घरच्यान्ला कपडे आनले, मुलासाठी शाळेचा ड्रेस आनलं, बायांना लुगडी आनली. सर्व जप्त करून नेली न वर माला कोठडीत घातलं. केस घातली.

आता गावी तुमचं कोण आहे ?

कोनीच न्हाई.

गावातून तुम्ही निघाल्यावर गावातल्या दलितांना काही त्रास आहे का ?

नाही, त्यांचं वैर फक्त आमच्यासंगं होतं.

आमच्या डोळे फोडन्याच्या केसवर साहेब पिंजर पोलिस स्टेशनच्या इन्सपेक्टरनं 'मामुली' लिहिलं होतं.

सव्वीस नऊ चौऱ्याहत्तरला घटना घडली. वीस अकरा चौऱ्याहत्तरला आमची जबानी पोलिस यानी घेतली. दवाखान्यात होतो तर पुलिसच्या कुणी येऊन पाह्यलं पन नाही.

मला असं सांगा की हे जे सर्व झाले यात पाटलाच्या आणि तुमच्या खासगी भांडणाचा भाग किती आणि जातीचा भाग किती ?

जातीमुळेच झालं. शंभर टक्के जातीमुळे झालं.

कुठलीही दुसऱ्या वरच्या जातीतली पन गरीब घरची मुलगी या परिस्थितीत त्याच्या घरात शिरती तर पाटलाने तिला घरात ठेवली असती का ?

नसती.

तुमच्या जातीतल्या त्या जमीनजुमल्यावाल्या सावकाराची मुलगी तुमच्या मुलीच्या जागी असती तर पाटलानं लग्न लावून दिलं असतं का ?

न्हाई.

तुमच्या मुलीचं पुढं काय करणार ?

त्या मुलीला सूनच बनवून घेतलं पाह्यजे पाटलानं असं माझं म्हननं हाय.

आता जरी तिला घेतलं सून करून त्याने तरी इतकं सर्व झाल्यावर तिला तो बरं वागवणार नाहीच—

मग त्याची अर्धी जायदाद द्यावी त्यानं, दोन बायका झाल्या ना त्याला. पहिली लग्नाची न दुसरी

ही प्रेमाची.

हे होईल असं वाटतं का तुम्हांला ?

मुलगा आहे ना तिला. मग जगल कसा तो ? उद्धवराव पाटलाचा हाय तो.

कोर्टानं असं म्हटलं आहे का ?

असं कोर्टानं नाही म्हटलं.

तुमच्या समाजात तिचं लग्न होऊ शकतं का ?

आता ते पुढं पाहू. पण त्याची पोरगी असती—तुकाराम पाटलाची—आणि आमच्यातल्या कुणा पोरानं असं केलं असतं तर ? तर पाटलाला चाललं असतं ? आता हे हाएत, दलित पँथरवाले—यांचे पाय लाभले आम्हांला म्हणून आम्ही इथवर पोचलो. न्हाइंतर कोण्या गलीत आम्हांला मारून टाकलं असतं पत्त्या तरी लागला असता काय ?

# जयप्रकाश 'नरायन'

त्यांना मी प्रथम पाहिले ते १९७५ मध्ये. अहमदाबादला. गुजरातच्या नवनिर्माण आंदोलनाच्या तडाख्याने गुजरातचे तेव्हाचे चिमणभाई पटेल सरकार उलथून पडले होते. आंदोलनातून आलेल्या विद्यार्थी नेतृत्वाने या यशस्वी आंदोलनाचे कर्णधारपद जे. पीं.ना एका प्रचंड सभेत देऊ केले. जे. पीं.नी ते नाकारले. अत्यंत भावनारहित सपाट सुरात ते उत्तरादाखल बोलले होते. आशय असा होता की, चळवळ तुमची आहे. तुम्हीच ती पुढे नेली पाहिजे. तिचे नेते तुम्ही आहात. मी आवश्यक ती मदत मात्र करीन.

तेव्हा वाटले होते की माणूस वेगळा आहे. खमक्याही आहे. ह्याच्या गळ्यात कोणी काही अडकवू शकत नाही. भावनेने हलण्याचे हा नाकारतो. लढ्यासारखी जबाबदारी याला नको आहे.

बेचाळीसच्या लढ्यातले जे.पीं.चे कर्तृत्व एव्हाना इतिहास झाले होते. त्यानंतर ते सर्वोदयात पोचले होते. बेचाळीसची 'ग्लोरी' संपून उपेक्षा आणि टीका यांचे ते धनी बनले होते. या माणसाविषयी माझ्या मनात फारसे काहीच नव्हते. मोठासा आदर नव्हता. असली तर थोडी अढीच असेल. अहमदाबादच्या त्या प्रसंगाने यात म्हणण्यासारखा बदल झाला नाही.

मग बिहारमध्ये केव्हा तरी थोडे ढवळू लागले. त्याचा आकार वाढू लागला. मग त्याची चळवळ झाली. जे. पीं. नी तिचे नेतृत्व स्वीकारले. बिहार आंदोलन गर्जू लागले. जे. पीं. वर पाटण्यात लाठी-हल्ला झाला. मी बिहारमध्ये पोचण्याचे ठरवले. त्याआधी वाराणसीला त्यांच्या सभेत पोचलो. सभा जनसंघाने बोलावल्यासारखी होती. व्यासपीठावर नानाजी

देशमुख होते. व्यासपीठाखाली खुर्च्या टाकून पत्रकारांच्या घोळक्यात चणे खात राजनारायण. रेल्वे कॉलनीत ही सभा होती.

जे. पीं. चे भाषण पुन्हा सपाट सुरातले, भावनारहित, पसरट. आधीच्या आक्रस्ताळी वक्त्यांच्या तुलनेने हे भाषण भेंड्याची भाजी. लोकांच्या भावनांना आवाहन नाही. वस्तुतः त्याआधीच्या देशव्यापी रेल्वे संपानंतर प्रथमच जे. पी. वाराणसीच्या रेल्वे कॉलनीत येत होते. भाषणात ते तसे म्हणालेही. वाराणसीच्या कॉलनीत संपकाळात जे अत्याचार झाले त्यांची यादी त्यांनी म्हटली. पण कशी ? लग्नाच्या किंवा पूजेच्या सामानाची यादी म्हणावी तशी. स्वरात कुठे आवेश नाही, खरी-खोटी वेदना नाही, सांत्वन नाही. ते म्हणाले, तेव्हापासून तुम्हांला भेटायचे राहिले होते तो योग आज येतो आहे. पण मग योग आला आहे तर लोकांच्या त्या आठवणी जाग्या करा की. आंदोलनाचे पुढारी असला मोका सोडत नसतात. लोक पेटून उठतील असे बोलतात.

वाटले, हा माणूस आतून फार शुष्क बनला आहे. शिवाय याला वक्तृत्व नावाचे इंद्रिय नाही. लोकांचे मानसशास्त्र याला कळत नाही. हा काय पुढारीपण करणार ? लोक कसले याच्या मागून येणार ? त्यात जुना समाजवादी आणि नवा सर्वोदयवादी जनसंघीयांच्या वेढ्यात सुखाने बसला आहे. पलीकडे सर्व समाजवाद्यांनी ओवाळून टाकलेला चणेखाऊ, कळकट राजनारायण पत्रकारांच्या घोळक्यात स्वतःची डिंग मारतो आहे.

मला हा माणूस पटत नव्हता. हा कसले एका मोठ्या आंदोलनाचे नेतृत्व करणार ?

आणि एकदम मी गरगरलो.

सपाट, पसरट, शुष्क बोलता बोलता एकदम याने त्याच रद्दी सुरात श्रोतृसमुदायाला एक फटका लगावला. सभेत सर्वभर चलबिचल झाली. तो म्हणाला, आपले हे आंदोलन करप्शनविरुद्ध आहे. सरकारी करप्शनविरुद्ध आपण आहोत. मंत्र्यांच्या करप्शनविरुद्ध आहोत. पण याची सुरुवात आपल्यापासून झाली पाहिजे. रेल्वे ही या देशातली एक प्रचंड यंत्रणा आहे. सर्वसामान्य माणसाला या यंत्रणेतल्या करप्शनचा जितका त्रास होतो तितका दुसऱ्या कुठल्याच यंत्रणेचा होत नसेल. या यंत्रणेत कोण काम करते ? तुम्ही काम करता. करप्शनमध्ये तुम्ही असता, निदानपक्षी ते चाललेले पाहता. करणाराइतकाच बिनविरोधी पाहणाराही दोषी. तर तुम्ही या करप्शनचे काय करायचे ते ठरवा. स्वतःपासून सुरुवात होऊ द्या, मग सरकार.

अद्याप तो क्षण आठवतो आहे. हा तर श्रोत्यांनाच चमकवू लागला ! त्यांचीच शांतपणे हजामत करू लागला. याने श्रोते मनोमन तरी बिनसणार. याने काय फायदा ? छे, याला राजकीय नेतृत्वाचे अबकडदेखील कळत नाही. याचे आंदोलन जन्मांतरी यशस्वी होणे नाही.

हे मनाशी म्हणत असतानाच याच्याविषयी मला आदराने प्रथम पकडले. हा वेगळा आहे. याला श्रोत्यांची खुषामत करण्याची इच्छा नाही. त्यांना त्यांच्याविषयीचे सुनावण्याइतकी बरोबर किंवा चुकीची हिंमत याच्यात आहे. तितका हा अव्यवहारी आहे. याला याची म्हणून काही निष्ठा वाटते. आणि आंदोलनात असूनही हा एका अर्थाने आंदोलनापासून अलिप्त आहे.

त्यानंतर ह्याच रात्री मी त्यांना भेटलो वाराणसीच्या आश्रमात. माझ्याबरोबर अलाहाबादचे विजयदेव साही आणि केशव वर्मा होते. विजयदेव जुने समाजवादी. पक्ष फुटला त्यानंतर ते वैफल्यभावनेने राजकारणातून निघाले.



जे. पीं. ना या वेळी प्रथम मी जवळून न्याहाळले. सोनेरी फ्रेम्सचा चष्मा. तांबूस गोरी त्वचा. मुद्रेवर गांभीर्य आणि एक अधिकार. आमच्यासमोर एका स्थानिक विद्यार्थी शिष्टमंडळाशी ते बोलत होते.

अजूनही नवल वाटते. एका क्षणी मला त्यांच्यात महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा स्पष्ट भास झाला. वस्तुतः दोघांमध्ये किती तरी फरक. आयुष्ये वेगळी. स्वभाव वेगळे. व्यक्तिमत्त्वेही वेगळी. दिशा पार वेगळ्या. मग वसंतराव नाईक इथे कुठे आले ? मलाही कळले नाही. नंतर आठवले की माझेच काही चुकले असले पाहिजे असे मी म्हणे. पण काल टेलिव्हिजनवरच्या शोकप्रदर्शन कार्यक्रमात जे. पीं. ची जुनी छायाचित्रे दाखवली. त्यांतल्या

एका छायाचित्रात ते कोणा साहेबांशी शेकहँड करीत होते. कॅमेरा चेहऱ्याकडे गेला आणि डिट्टो वसंतराव नाईक ! तेच हास्य, तसेच चष्म्यातून पाहणे. पुन्हा तोच स्पष्ट भास !

जे. पीं. नी शिष्टमंडळाची पाठवणी करून आमची दखल घेतली.

आम्ही आमच्याविषयी सांगितले. विजयदेवना जे. पीं. नी ओळखले होते आणि याने विजयदेवांची अवस्था जुन्या प्रियकराने कित्येक वर्षांनंतर ओळख दिलेल्या प्रेयसीसारखी झाली होती. ते नुसते गहिवरून गेले होते.

जे. पीं. कडे मी माझी बिहारमध्ये फिरण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी आपला कार्यक्रम दिला. गयाला जॉइन होण्याला सांगितले. त्यानंतर ते धनबादच्या औद्योगिक पट्ट्याचा दौरा करणार होते. हा दौरा ते आंदोलनात प्रथमच करणार होते. ते म्हणाले, तुम्ही तेवढे दिवस माझ्याबरोबर राहा...नंतर एकटे काही दिवस फिरा म्हणजे कल्पना येईल.

हे वैयक्तिक भेटीतले जे. पी. व्यासपीठावरच्या जे.पीं. पेक्षा पुष्कळ प्रगल्भ आणि अधिकाराची जाणीव असलेले वाटत होते. वागण्यात साधेपणा होता. सर्वोदयी कार्यकर्ते न वाटता ते कोणी अनुभवी ॲडमिनीस्ट्रेटर भासत होते. जुजबी, काहीसे अलिप्त बोलणे. सर्व गोष्टींची कटाक्षाने नोंद ठेवण्याची सवय. कामाचा उरक असावा लागणाऱ्या माणसात असतो तो कामापुरतेपणा. आम्ही त्यांचा निरोप घेतला तेव्हा छाप राहिली ती एका सौम्य, जरबदार आणि मुख्यं म्हणजे आरोग्यसंपन्न व्यक्तिमत्त्वाची. हेही विलक्षण होते. त्यानंतर जे. पीं. ना पुन्हा मी तसे आरोग्यसंपन्न दिसताना कधी पाहिलेच नाही. कित्येकदा तर त्यांचा थकवा आणि शारीरिक अवस्था दयनीय असे. शेवटच्या कालखंडात जसलोक रुग्णालयात एकदा जाऊन भेटलो तेव्हा ते पराकोटीचे थकलेले, आजारलेले, पार पार निस्तेज होते. वाराणसीची ती पहिली भेट आठवली आणि तफावतीने आत चरचरले. काळ आणि परिस्थिती माणसाचे काय करू शकते !

गयाला सोखोदेवरा आश्रमात ठरल्याप्रमाणे मी जाऊन दाखल झालो. तिथे राजकारणी मंडळींची एकच गर्दी उसळली होती. छात्र-युवासंघर्ष-वाहिनीची आपली कल्पना जे. पीं. नी मी गेलो तेव्हा कार्यकर्त्यांपुढे मांडली होती. त्यावर चर्चा सुरू होती. खाजगी भेटीतला ॲडमिनीस्ट्रेटर आता पुन्हा गैरहजर होता. कोणीही उठून बोलत होता. काहीही बोलत होता. कधी दोघे दोघे, तिघे तिघे एका वेळी बोलत होते. जे. पी. सहनशीलपणे सर्व ऐकून घेत होते. मध्येच विचारमग्न होऊन ओठांवर तर्जनी ठेवून बसत होते. मध्येच प्रकट चिंतनासारखे काही म्हणत होते. अधिक समजावून घेण्यासाठी विचारत होते. चर्चेला ओघ नव्हता. वेग तर नव्हताच नव्हता. ती साचत, वाहवत होती. जे. पी. यात स्वस्थ होते. विचार करू शकत होते. पुन्हा तेच. चर्चेचे स्वरूप जाम कंटाळवाणे होते. पण तिच्यात काहीतरी पकडणारे, धरून ठेवणारे होते. जे. पीं. ना आंदोलनातल्या राजकीय पक्ष आणि संघटनाबाहेर स्वतःची अशी एक वेगळी संघटना असावी असे गंभीरपणे वाटत होते. ही संघटना तरुणांची असणार होती. तिला एक गणवेषदेखील जे. पी. देणार होते. तिच्यात येणारा प्रत्येक तरुण स्वतः पारखून घेणार होते. संघटनेचे संचालन स्वतः करणार होते. जे. पीं. ना या प्रकारच्या वेगळ्या संघटनेची गरज तेव्हा

वाटणे अर्थपूर्ण वाटले होते. पुढे ही संघटना ज्या प्रकारे उभी राहिली, आज तिची जी अवस्था आहे ते सर्व जे. पीं. च्या कल्पनेत नसावे. त्यांची संघटना या तुलनेने खूपच मजबूत, भव्य आणि क्रियाशील—डायनॅमिक—असणार होती. तिला एक फार महत्त्वाची भूमिका भविष्यात पार पाडावी लागेल असा जे. पीं. चा हिशोब असावा.

त्या रात्री जेवणाच्या पंगती उठत असता काही तरुणांनी जमलेल्या जेष्ठांविषयी माझ्या कामात टीकाटीपण्णी चालवली होती. कोणी पदच्युत मंत्री होते, कोणी फ्रस्ट्रेटेड राजकारणी होते. कोणी अनुयायी नसलेले नेते होते. कोणी सुरेख संधीसाधू होते. हा सारा 'कुंभमेळा' आपल्या पुनरुद्धाराच्या आशेने, हिशेबाने, महत्त्वाकांक्षेने जे. पीं. भोवती जमला होता. यातून 'नैतिक शक्ती' उभारण्याची स्वप्ने जे. पी. पाहत असलेले दिसत होते.

पुन्हा प्रश्न. इतका अभिनय पदरी असूनही हा माणूस इतका भाबडा ? याला माणसे ओळखता येऊ नयेत ? ओळखता येत असतील तर या गर्दीत हा कुठे ? याला शेवटी साधायचे काय आहे ?

मी कॅमेरे घेऊन गेलो होतो. जे. पी. नाराज होतील का, म्हणून घाबरत होतो, पण झाले उलट. जे. पीं. ना स्वतःचे फोटोच काढवून घेणे आवडत होते. ते केव्हाही खुषीने पोज देत. फोटो निघाल्याची पावती मान हलवून दिल्याशिवाय रहात नसत. पुढे भर सभेत माझ्या सोळा मिली मीटरच्या डबडा कॅमेऱ्याचा घर्रर आवाज सुरू झालेला जे. पीं. ना भाषणाच्या मध्येही बरोबर कळत असे. ते क्षणभर थांबून कॅमेऱ्याकडे पहात आणि 'चालू दे' अशा आविर्भावानिशी भाषणाचे सूत्र पुढे नेत.

जरा निवांत भेटीत जे. पीं. नी माझी वैयक्तिक विचारपूस केली. हा नंतरच्या झंझावाती दौऱ्याचा आरंभ होता. गयामध्ये मुलाखत झाली. जे. पीं. ची उत्तम बडदास्त तिथे होती. मोठा लवाजमा साध्या पोषाखातल्या सरकारी सशस्त्र 'संरक्षकां'सह जे. पीं. समवेत होता. वाड्याचे श्रीमंत यजमान आणि यजमानीणबाई जातीने आणि आदराने जे. पीं. ना हवे नको ते पहात होते. जे. पीं. चा तिथे दीर्घ काळापासून संबंध असावा असे वाटत होते. घरच्या मालकिणीला ते सुनेप्रमाणे वात्सल्याने वागवीत होते. मालकाला मात्र वास्तविक तो वयाने बराच कमी असून आदराने वागवताहेत असे वाटत होते.

वाराणसीच्या भेटीनंतर पुन्हा एकदा त्यांनी विचारल्यावरून, माझे येण्याचे कारण मी स्पष्ट केले. मला आंदोलनाचा अभ्यास करायचा होता. यानंतर मला यासाठी काय काय पहावे लागेल याची चर्चा जे. पी. आणि तिथे असलेले त्यांच्या भोवतालचे दोघेतिघे यांच्यात सुरू झाली. जेथे जेथे आंदोलनातल्या महत्त्वाच्या घटना आणि संघर्ष झाले होते त्या जागा मी सुचवत होतो. दुसरी दोघे माणसे सुचवीत होती. जे. पी. काही वेळ विचारमग्न होते. मग म्हणाले, माझ्या सर्वोदयाच्या काळात ॲग्रोइंडस्ट्रीजचा एक चांगला प्रोजेक्ट इथून जवळच सुरू केला होता, तो पहा, झालेच तर मुसहरीला शेतीचे एक प्रोजेक्ट आम्ही घेतले आहे ते तुम्ही पाहिलेच पाहिजे. प्रत्यक्ष पाहून तुमचे मत काय बनते ते मला हवे आहे.

बिहारचे आंदोलन आणि या गोष्टी यांचा काय संबंध ? माझ्या अभ्यासात या गोष्टींनी कोणती

भर पडणार होती ? माझ्या लक्षात आले नाही. म्हणून मी विशेष उत्साह दाखवला नाही, 'पाहतो' म्हणालो. जे. पीं. नी लागलीच परिवारातल्या एका माणसाला बोलावून घेतले. त्याला माझ्यामागे लावून दिले, यांना हे प्रोजेक्ट्स दाखवा, त्यासाठी अमूकतमूकांना आधी फोन करून कल्पना देऊन ठेवा, आणि यांनी त्या पाहिल्यावर मला रिपोर्ट करा.

पुन्हा मी चक्रावलो. मी आंदोलनाचा अभ्यास करू पहातो आणि हा माणूस मी कुठल्या तरी अप्रसिद्ध सर्वोदयी कामांची पहाणी केली पाहिजे असा कटाक्ष का ठेवतो ? नुसतेच सुचवतो असे नाही तर तशी व्यवस्था करवून वर क्रॉस चेकिंगची खबरदारी घेतो !

पुढे चक्रावण्याची गरज राहिली नाही. मी ती कामे पाहून आल्याचे कळताच मी समोर आल्याबरोबर जे. पीं. चा प्रश्न : कशी वाटली ? आणि मी त्या छोट्या छोट्या विधायक कामांबद्दल कौतुकाचे सविस्तर उद्‌गार काढताच एका मोठ्या आंदोलनाचा हा वयोवृद्ध सेनानी आतून फुलून आला. त्यानंतर बराच वेळ त्या कामांबद्दल आणि सर्वोदयाबद्दल ते रंगून बोलत होते. सोखोदेवरा आश्रमाविषयीही अशीच त्यांना आपुलकी होती.

संपूर्ण दौराभर मग जे. पीं. ची आणि माझी एक विलक्षण शिवाशीवीच प्रवास करताना चालू होती. मोटारीत ते पुढे आणि मी मागल्या सीटवर असे. हाच काय तो दोघांचा मुलाखतीचा वेळ; त्यामुळे मी मनाशी प्रश्न योजून ठेवलेले असत. सर्व प्रश्न अर्थात राजकीय असत. काही आंदोलनातल्या घटना तपासून घेण्यासाठी असत. काही जे. पीं.च्या भूमिका तपासून घेण्यासाठी. मधूनमधून इंदिरा गांधी या विषयावर त्यांना बोलते करण्याचे मुद्दामच मी प्रयत्न करी. त्यांना नको तरी प्रश्न विचारी. सहसा या विषयावर ते काही बोलू इच्छित नसत. मी अगदीच कॉर्नर केले तेव्हा एकदाच ते म्हणाले होते, तू मला या विषयावर का बोलायला लावतोस ? ती पंडितजींची मुलगी. मला मुलीसारखी. तिच्याशी वैर मी कसे करू ? तिने घेतलेली भूमिका गैर आणि हट्टी आहे म्हणून आंदोलन उद्‌भवले आहे. मी तिला पुनःपुन्हा लिहिले, निरोप पाठवले. असंतोषामागची कारणे रास्त आहेत. लोक गांजले आहेत. फार काळ लोकांनी वाट पाहिली. बिहारमध्ये सरकारमागून सरकारे आली पण कोणी हे लोकांचे प्रश्न सोडवले नाहीत. नुसती वचने द्यायची आणि स्वार्थ साधायचा हा रिवाज झाला. डाव्यांनीही हेच केले. लोक आता वाट पाहणार नाहीत. म्हणून या प्रश्नांची दखल घे. परिणामकारक उपाय कर. मी हे तिलाच सुचवत होतो. याचे लेखी पुरावे माझ्यापाशी आहेत ते पाहा. पण तिने मुळी या प्रश्नांचे अस्तित्वच साफ नाकारले. हा मतलबी लोकांचा आपल्याविरुद्ध प्रचार आहे अशी उलट हटवादी भूमिका घेतली. पोलिसी ताकदीने लोकांनाच चेपून काढण्याला सुरुवात केली. मग मी नाइलाजाने या आंदोलनाचे नेतृत्व पत्करले. आजही तिने हे प्रश्न सोडवावेत, आंदोलन मागे घ्यायला मी व्यक्तिशः तयार आहे. मला कसली महत्त्वाकांक्षा आहे ? मी पुन्हा सर्वोदयात निघून जाईन.

हे बोलताना त्यांना त्रास होत होता असे वाटत होते. आवाजात त्वेषाऐवजी क्लेशच होते. पुन्हा ते या विषयावर कधी बोलले नाहीत, एकूण बिहार आंदोलनाविषयीच फार आणि मनापासून बोलण्याला ते त्यांच्या-माझ्या खासगी संभाषणातून तयार नसत. मी त्यांना यावर खोदखोदून

प्रश्न करावेत आणि त्यांनी सर्वोदयातल्या आपल्या दिवसाविषयी माझ्याकडे रंगून बोलत राहवे हा रिवाजच झाला होता. एका प्रचंड चढाईच्या ऐन भरात त्या चढाईतला हा सेनानी जुन्या शांततेच्या, विधायक कामांच्या आठवणींचा भुकेला होता. त्यांचे शरीर युद्धाचे नेतृत्व करीत होते, पण मन शांततेसाठी आसुसत होते. तेव्हा वाटले होते, युद्ध या शांतताप्रेमी जिवावर लादले गेले आहे. हा लढणारा नाही, विध्वंस आणि विनाशाचा उपासक नाही, डावपेचांची बुद्धिबळे याच्यासाठी नाहीत. हा पेरणारा आहे. नवे कोंभ उगवताना पाहून हरखणारा आहे. त्यांना जीव लावून जपणारा, जोपासणारा आहे, लक्ष लोकांच्या नेतृत्वापेक्षा याला आश्रमवासातला एकांतच प्रिय आहे. हा आजच्या त्याच्या भूमिकेत 'मिस-कास्ट' आहे.

हे खरे होते आणि सर्वस्वी खरे नव्हते असे नंतर वेळोवेळी आलटूनपालटून आणि क्वचित एकत्र दौराभर जाणवत राहिले. सर्वोदयी एकांताकडे हा माणूस मनाने मधूनमधून अनावर ओढ घेत असला तरी सभेची गर्दी त्याला आवडते असे दिसले. सभासभांतून जे. पी. भरपूर बोलत. सभा जेवढी मोठी तेवढे जास्त बोलत. ते थंडीचे दिवस. दिवस लौकर मावळे. सूर्य खाली गेला की गारठा वाढे. कित्येकदा लोक गारठू लागून चुळबुळत उठून उभे रहात, जे. पी. सांगत, जरा ऐकून घ्या. मी आता आवरते घेतोच आहे आणि पुन्हा पंधरावीस मिनिटे बोलत राहत. जे. पी. सांगत आता दोनच मिनिटे, एवढे ऐकून घेऊन मग जा. पुन्हा दहा एक मिनिटे भाषण चाले. एवढे खरे की लोक ऐकत. हुडहुडत का होईना, अखेरपर्यंत थांबत. या टाकाऊ वक्त्याच्या शब्दांमागची तळमळ, त्यातला निखळ प्रांजळपणा त्यांना बांधून ठेवी.

परंतु या माणसाचा वेगळेपणा ह्यांना जाणवत असेल काय ? हा 'पुढारी' नव्हता. हा 'उमेदवार' नव्हता. हा 'मंत्री' नव्हता आणि होणार नव्हता. हा कोणाची रदबदली करण्यासाठी आलेला नव्हता. कोणावर घणाघाती हल्ला चढवणारे बोलत नव्हता, वचने देत नव्हता, माझ्यामागून या म्हणत नव्हता. याचा रोख सामान्य जनतेच्या हालकष्टांवर, तिच्या निकडीच्या प्रश्नांवर. याचा 'संदेश' खडखडीत, रोकडा आणि जिकिरीच्या गोष्टी करायला सांगणारा, हा म्हणे, सत्तेवर असलेल्या पार्टीला पाडलेत आणि माझ्या पार्टीला निवडून आणलेत म्हणजे करप्शन संपेल, तुमचे कल्याण होईल असे सांगायला मी नाही आलो, असे सांगणारे ते तुम्हांला फसवतात. माझेही लोक सत्तेवर वरच्या लोकांइतके—नव्हे त्यापेक्षा जास्त—करप्ट होऊ शकतील. इतके कशाला,माझी स्वतःची खात्री मी नाही देऊ देऊ शकणार. मी कधी सत्तेवर असणार नाही. पण असलोच तर माझीही गॅरंटी नाही. या देशात प्रत्यक्ष परमेश्वर सत्तेवर आला तरी त्याचीसुद्धा खात्री नाही. तोसुद्धा करप्ट होईल. का सांगा, कारण तुम्ही लोक गाफील आहात, तुम्ही जागे असून झोपलेले राहता. तुम्ही मत देता, म्हणता, आता हे सरकार काही तरी बरे करील. सरकारवर तुमचा दाब नाही. तुम्हीच निवडलेल्या लोकांवर तुमची नजर नाही, त्यांना तुमचा धाक नाही. मग ते करप्ट होणार नाहीत तर काय होईल ? सत्तेवरच्यांना अंकुश पाहिजे, लगाम पाहिजे. लगामाचे दुसरे टोक तुम्ही हातात पकडून राहिले पाहिजे, लगाम योग्य वेळी खेचला पाहिजे. अंकुश वापरला पाहिजे. तर आमदार, खासदार, मंत्री धड कामे करतील. तर तुमचे काही भले होईल. तर करप्शनला आळा बसेल.

म्हणून सुरुवात तुमच्यापासून होऊ द्या. यानतर कायम जागे रहायचे, आपल्या संघटना बांधून सरकारी मंत्र्यांवर अधिकाऱ्यांवर दाब ठेवायचा. गैर वागले की लगाम खेचायचा. निवडून दिलेल्याला परत बोलावयाचा अधिकार मागून घ्यायला हवा. हे लोक सहजासहजी तुम्हांला तो मिळू देणार नाहीत. त्यासाठी शक्ती कमवावी लागेल. तुम्ही एकत्र आलात की शक्ती तयार होते. तुम्ही एकत्र राहून खडा पहारा ठेवलात की सत्तेवरचे नम्र राहतात. ते कोणी राजेमहाराजे नव्हेत, ते तुमचेच सेवक आहेत, हे लक्षात घ्या. मग आज काय ठरवाल ? (आता फक्त पाचच मिनिटे थांबा. गारठा फार वाढला आहे तरी फार महत्त्वाचे प्रश्न आपण बोलतो आहोत. नीट ऐकून घ्या.) ही आपली चळवळ निवडणुकी झाल्या की संपणारी नाही. एक पक्ष जाऊन दुसरा सत्तेवर आला म्हणजे चळवळीचे काम झाले असे समजायचे नाही. ही चळवळ कधी संपेल ? वर्षाने ? पाच वर्षांनी ? दहा ? पन्नास ? बंधूंनो, नाही. ही तुमची चळवळ आता संपणार नाही. तुमच्या मुलाबाळांच्या हयातीत, नातवंडापतवंडांच्या हयातीत आणि त्यानंतरही ही चालू राहिली पाहिजे. हिला शेवट आता नाही. ही कायम चालली तर काही ठीक राहील. तर तुमच्यानंतरची माणसे दोन वेळा जेवतील, अंगभर कपडा घालतील. म्हणून चळवळ कधी संपणार नाही. हे वाण यानंतर कायम चालवायचे. पुढे-पुढे देत रहायचे. (फाटक्यातुटक्या अपुऱ्या कपड्यांतल्या हजारो श्रोत्यांमध्ये वाढती हालचाल. गारठा आणखीच चावरा. अंधारू लागलेले.) आता दोन मिनिटे. मग सभा संपेल. मी म्हणतो याचा नीट विचार करा. गाफील राहू नका...

असे अजून काही वेळ चालू. जणू बोलणाराला किती बिंबवले तरी पुरे वाटत नाही, घराहून निघताना 'येतो' 'येतो रे' 'संभाळून रहा' 'प्रकृतीला जप' 'निघतो तर' 'पत्र पाठवतो' 'घराकडे पाहा' असे घोळघोळून सांगणाऱ्या, काही केल्या पाय न निघणाऱ्या माणसाची आठवण होई. सभा संपली, गर्दी पांगली की जे. पी. कधी शांत नसत. तृप्त नसत. त्यांची अस्वस्थता, बेचैनी वाढत जाई. ते सारखे अंतर्मुख होऊ पाहत. ओठांवर तर्जनी ठेवून मिनिटे मिनिटे हरवले बसत. त्यांच्या अस्वस्थतेला आणखीही कारणे या विशिष्ट वेळी होत. दौऱ्यात दर मुक्कामी स्थानिक कार्यकर्त्यांची जे. पीं. शी बैठक होई ती या वेळेला, सर्किट हाऊसच्या ज्या खोलीत ही बैठक चाले त्या खोलीची दारे ओढून घेतलेली असत. पण आतली वादावादी, आरोपप्रत्यारोप माझ्या खोलीपर्यंत येत. दोनदा जे. पी. च आले होते. एकदा ते आले; ओठांवर तर्जनी ठेवून बसून राहिले. मुद्रा टेन्स. डोळ्यांत क्वचित दिसणारा राग होता. अशी पाचेक मिनिटे गेली असतील. पुन्हा ते उठले आणि बैठकीकडे निघून गेले. दुसऱ्यांदा ते येऊन अर्धवट स्वतःशीच म्हणाले होते, आम्ही लोकांना आशा दाखवतो आहोत. पण पुढे काय घडणार ?

भेटीसाठी येणाऱ्या सर्वसामान्य माणसांना बैठकीआधी ते काही वेळ देत. माणसे बहुतेक गरीब, अनपढ, भाबडी असत. कोठलीही कामे घेऊन ती येत. या मोठ्या आणि कार्यव्यग्र माणसाला हे काम कसे सांगू असे त्यांच्या मनात येत नसे. एका हक्काने ती येत, हा आपला माणूस म्हणून येत. वाट पाहत बसत. जे. पी. आले की त्यांच्या पायांना स्पर्श करू जात. जे. पी. इतर मोठ्या माणसांसारखे घाईने पाय मागेही घेत नसत किंवा या गोष्टीत आनंदही घेत

नसत. पाय आपले नसल्याप्रमाणे त्यांची मुद्रा अलिप्त होई. घाईने आणि अगत्याने ते पाय धरणाराला उभा करीत. बसायला सांगत. सर्वांचे ऐकून घेत. कितीही वेडे, चुकीचे असले तरी लक्षपूर्वक ऐकत. मग स्पष्टपणे त्याला काय ते सांगत. आपणाकडून होण्यासारखे नाही, अमूकाला भेटलास तर होईल. मी त्याला सांगेन. किंवा, मी सांगितले तर तुझे काम होणार असलेले अडून पडेल. त्यापेक्षा तू (सरकारात वजन असलेल्या) तमक्याला भेट, तो करू शकेल. किंवा तुझेच चुकले आहे. आता कोणी काही करू शकत नाही. हे सांगताना शब्दात उगाच नाटकी कळवळा नसे तसा तुसडेपणा किंवा 'मी तुझ्यापेक्षा शहाणा' भावही नसे, एक अकृत्रिम वडिलकी असे, संवाद असे. परखडपणाने ऐकणारा दुखवत नसे.

सर्वोदयी कामात जसे त्यांचे मन लढ्याच्या गर्दीतही गुंतून पडल्याचे दिसे तसे शिक्षणपद्धतीविषयी ते वेळ आणि माणूस सापडेल तेव्हा विचार आणि चर्चा करताना दौराभर दिसत होते. चालू शिक्षणपद्धतीत मूलभूत बदल केल्याशिवाय काही खरे नाही असे त्यांच्या मनाने घेतले असावे. या क्षेत्रात स्वतंत्रपणे गती नसल्याने होणारी त्यांची अडचणही जाणवे. त्यांना हवे ते त्यांना तज्ज्ञांकडून किंवा त्यांच्या सर्वोदयी सल्लागारांकडून मिळत नसे आणि त्यांच्या कल्पना शिक्षणशास्त्राच्या रूढ चौकटीत बसणाऱ्या नसत. कधी अर्थव्यवस्थेविषयी ते बोलत. इथेही त्यांच्या कल्पनांना शास्त्रशुद्ध बैठक नसल्याचे जाणवे. अशा वेळी एक वाटे की भविष्यकाळाचे विचार त्यांच्या डोक्यात गर्दी करून आहेत. भविष्यकाळाकडे काहीशा उमेदीने पाहत आहेत. त्या हिशेबात तयार राहिले पाहिजे, या देशात जे बदल घडायला हवेत त्यांचे आराखडे आधी तयार असले पाहिजेत असे त्यांना वाटत असावे. अशी घाईच त्यांचे मन त्यांना करीत असावे. जी चूक स्वांतत्र्यलढ्यातल्या नेत्यांनी केली ती पुन्हा होता कामा नये अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली असावी.

कधी ते असे उमेदीने पुढची स्वप्ने पाहत असल्यासारखे बोलत बसत तेव्हा वेगळे वाटत. आणि संध्याकाळच्या वादळी बैठकांनंतर किंवा त्यांच्या अध्येमध्ये दिसत तेव्हा पार निराळे असत. तेव्हाचा त्यांचा चिंतेने, निराशेच्या छायेने झाकोळून गेलेला चेहरा पाहून वाटे की एक न पेलणारी जबाबदारी कोणी या वृद्ध माणसावर उगाच टाकली आहे. जे. पीं. ना एक तिसराही चेहरा होता. त्यांना नवे, माहीत नसलेले असे काही कोणी सांगे तेव्हाचा हा चेहरा. अशा वेळी जे. पी. उत्सुकतेने फुललेले लहान मूल वाटत. त्यांच्या डोळ्यांत अर्भकाची निर्व्याज निरागसता चमकताना दिसे. अशा वेळचे त्यांचे उद्‌गारही या प्रकारचे असत. महाराष्ट्रातल्या परिस्थितीविषयी एकदा बोलणे निघाले. मी माझ्या अभ्यासवृत्तीच्या निमित्ताने जे पाहत होतो ते सांगू लागलो. डॉ. बाबा आढाव महाराष्ट्रात जे 'एक गाव एक पाणवठ्या'चे काम करतात, त्यांना या कामात जे अनुभव येतात ते ऐकताना जे. पीं. चा थकवा पळाला. 'अच्छा ?' असे पुनःपुन्हा म्हणत ते एकाग्रतेने आणि चमकत्या निर्व्याज नजरेने सारे ऐकत होते. महाराष्ट्रातल्या दलित चळवळीचे मानसशास्त्रही त्यांना नवीन होते. त्यानंतर ते रंगात आले. ते म्हणाले, मला महाराष्ट्राविषयी फार कमी माहिती आहे. खरे म्हणजे हा देश असे मी म्हणतो तेव्हा मला स्पष्टपणे काहीच दिसत नाही. देश कळतो त्यापेक्षा बिहार मला जास्त कळतो. आणि

बिहारमध्येही गया जिल्हा उत्तम कळतो. कारण या भागात मी खूप भटकलो आहे. या माझ्या भागातला दगड न् दगड मी पालथा घातला आहे. माणसामाणसाशी संवाद केला आहे.

दौऱ्यानंतर जे. पी. मुंबईला जायचे होते. देशव्यापी पातळीवर आंदोलन नेण्याच्या दृष्टीने काँग्रेस आणि उजवे कम्युनिस्ट वगळून इतर राजकीय पक्षांना एकत्र आणण्याचा प्रयोग त्या वेळी मार्गी लागत होता. पक्षरहित लोकशाहीची कल्पना मांडणारे जे. पी. अनेक मोठ्या राजकीय पक्षांना बरोबर घेऊन लोकशाहीचे रक्षण करण्याला निघणार होते. त्यांच्या आधीच्या उद्‌गारांचा आधार घेऊन मी त्यांना विचारले, हा देश तुम्हांला बिहारपेक्षा कमी कळतो असे म्हणता तर देशव्यापी आंदोलनाची जबाबदारी कशाकरता घेता ? बिहारपुरतेच आंदोलन मर्यादित ठेवून तेवढी उद्दिष्टे का साधून घेत नाही ?

जे. पी. किंचित्काळ प्रश्नाचे उत्तर शोधत असावे तसे स्तब्ध राहिले. नंतर म्हणाले, मला बोलावतात म्हणून मी मुंबई-दिल्लीला जातो. कदाचित जाणारदेखील नाही. पण ते गेले. पाटण्याच्या विमानतळावर त्यांना निरोप देण्यासाठी मी गेलो होतो. जमलेल्या 'शुभ्र आणि 'शाली'न राजकारणी गर्दीतले कोणी कोणी त्यांना सल्ले देत होते, त्यांच्याशी खासगी कुजबुजी करीत होते. चारदोन कळकट सर्वोदयी यात हरवल्यासारखे जे. पीं. भोवती घोटाळत होते. जे. पीं. भोवतालचीही गर्दी मला रुचत नव्हती. तेच धनबादच्या जाहीर सभेत बोलले होते, बिहारच्या सध्याच्या मंत्रीमंडळातली माणसं माझे आशीर्वाद घेऊन मंत्री झाली. सत्तेवर जाताना मला म्हणाले, करप्शन थांबले पाहिजे, लोकांचे प्रश्न सुटले पाहिजेत. जे. पी., तुम्हीच आराखडा तयार करून द्या. आम्ही तो अमलात आणू. आणि बघता बघता तेच करप्ट झाले. लोकांचे प्रश्न विसरून सत्ता भोगत सुटले. मी आश्चर्य करीत राहिलो. मुंबईला नव्या मोठ्या राजकारणी खेळाचे नेतृत्व करण्याला निघालेल्या जे. पीं.ना त्या गर्दीत पाहताना म्हणत होतो, यांना नव्याने आश्चर्य करण्याची वेळ न येवो.

बहुतेक उत्तर भारतीय समाजवादी इंग्रजीविरोधी आहेत. ( यातील काहींना इंग्रजी येत नाही म्हणून ते इंग्रजीला विरोध करतात असा एक खडूस शेरा, एका समाजवाद्याचाच.) जे. पीं.नी या बाबतीत मला आश्चर्याचा धक्का दिला. त्यांची एक दीर्घ मुलाखत मुंबईचे 'ब्लिट्झ' साप्ताहिक छापणार होते. जे. पीं. नी उत्तरे लेखी पाठवून मुद्रिते पाहण्यासाठी मागवली. दौऱ्यातच ती त्यांच्या हाती मिळाली. कार्यक्रमांची चळत लागलेली, फुरसत नाहीच. त्यात तब्बेतही तक्रार करू लागली होती. प्रवास सारखा आणि जिकिरीचा. मुद्रिते 'ब्लिट्झ'कडे परत पाठवण्यासाठी जे. पीं. च्या एका सेक्रेटरीकडे जे. पीं. नी दिली. तेव्हा सहज मी ती पाहिली. मुलाखत इंग्रजीत होती आणि ते ठीकच होते. साप्ताहिक इंग्रजीत निघणारे होते. परंतु मुद्रिते जे. पीं. नी जातीने तपासून दिली होती. त्यात जागोजाग दुरुस्त्या होत्या. जे. पीं. च्या हस्ताक्षरात आणि दुरुस्त्यांतल्या बहुतेक आशयाशी संबंधित नसून इंग्रजीशी संबंधित होत्या. जे. पीं. नी मूळ उत्तरातले काही शब्द खोडून त्या जागी त्याच अर्थाचे उजवे आणि भारदस्त वेचीव शब्द योजले होते. दोनतीन जागी आलंकारिक भाषा जोडली होती. वाङ्‌मयीन आणि दर्जेदार इंग्रजीचा तो तशा घाईतलाही आग्रह चकित करणारा होता. आपल्या इंग्रजीविषयी जे. पीं. ना

 विशेष प्रेम असले पाहिजे.

 दौऱ्याअखेरी त्यांचा निरोप घेतला तेव्हा मनात रुखरूख होती. जे. पीं. ना मी बोललो. मला तुमची एक प्रदीर्घ मुलाखत काही मूलभूत प्रश्नांवर हवी होती. तुमच्या विचारांची तात्त्विक बैठक मला एकदा समजावून घ्यायची होती. पण त्यासाठी तुम्हांला वेळच मिळाला नाही. तुमच्यामागे राजकारण लागलेले. ते किंचित हसत म्हणाले, पुन्हा केव्हा तरी या पाटण्याला. घरी या. मग बोलता येईल.

त्यानंतर त्यांच्या पायांना जी चाके लागली ती आणीबाणी घोषित होऊन त्यांची रवानगी सक्तीच्या एकांतवासात होईपर्यंत. एका विलक्षण चक्रात ते फिरत राहिले आणि त्यांच्या सन्मित्राच्या मुलीने—इंदिरानेच—हे चक्र थांबवले; परंतु तात्पुरते. योगायोगाने आणीबाणी उठवण्याची बुद्धी आणीबाणी बसवणारीला झाली आणि चक्राने नव्याने गती घेतली. दुप्पट वेगाने ते वेडे चक्र जे. पीं. ना घेऊन भरकटत सुटले. आता जे. पी. शरीराने फार थकले होते. वेडे चक्र फिरतच राहिले आणि घायाळ जे. पी. जसलोक रुग्णालयात पुन्हा दाखल झाले. या वेळी त्यांच्या भेटीला गेलो. आता ते फार खिळखिळे झालेले वाटत होते. चेहरा रक्तहीन ओढला होता, डोळे निर्जीव बघत होते. मला पाहून त्यांनी हात जोडले.

त्यांच्या खोलीतली सत्य साईबाबांची तसबीर तेवढी आता नीट आठवते.

# पांडुरंग महादेव बापट

आज—म्हणजे हा मजकूर लिहितो आहे त्या दिवशी—सकाळी एका माणसाला मुद्दाम भेटायला गेलो. कचेरीला येण्याची रोजची गडबड मागे होतीच; पण विचार केला की आज भेट झाली नाही तर कधीच होणार नाही.

वस्तुतः मी इतका दैववादी नव्हे, पण वस्तुस्थिती मान्य करणेच भाग होते. शिवाय कित्येक दिवसांत आमची भेट झाली नव्हती. भेटू भेटू म्हणता दिवस गेले.

आज मी गेलो ती वेळ चांगली सकाळी नऊची होती.

तो शांत आणि गाढ झोपला होता.

एरवी कोऱ्या पहाटे तो उठत आला. चिंतन-मनन-वाचन-लेखन आणि जगाने करून ठेवलेली घाण उपसून हे जग आपल्याकडून होईल तितके स्वच्छ करण्याचे आवडते कार्य काया-वाचा-मने निरलसपणे आणि निर्धाराने करीत आला. हे हातून होईना तेव्हा राष्ट्रासाठी, समाजासाठी, प्राणिमात्रासाठी जे हातून होईल ते तरी करीत राहण्याचा परिपाठ त्याने सोडला नाही. कार्यशील जीवन हातून सुटत गेले आणि जवळ मृत्यू उरला तेव्हा तोही राष्ट्रकार्यार्थ नाही तर समाजहितार्थ राबवावा अशी अत्यंत उत्कट आकांक्षा याने धरली आणि प्राणपणाची खटपट केली. हा मुळी स्वतःचा नव्हताच. हा स्वस्थही नव्हता. हा कायमचा अस्वस्थ. कायमचा इतरांसाठी.

आज मात्र तो जणू स्वतःचा असल्यासारखा हक्काने आणि सुखनैव पहुडला होता. मुद्रेवर शांती होती. हिच्याच प्राप्तीसाठी त्याने सर्व ऐहिक सुखाचा परित्याग करून जीवन पाखडले.

तारुण्यात तरवारीवर हात ठेवून घेतलेले राष्ट्रसेवेचे सतीचे वाण आमरण मनस्वी निष्ठेने वाहिले. स्वार्थाचा लवलेशही संशय याच्याविषयी या संशयी जगात कोणाला घेता आला नाही, इतके स्वच्छ आणिं पारदर्शक जीवन हा जगला.

कृश, जराजर्जर देहावर शुभ्र पांघरूण होते. मस्तकी हयातभर मिरवलेली खादीची राखी टोपी होती. ऋषितुल्य सुरकुतल्या मुद्रेवर मुक्तीचा क्षण होता. तपस्वी कायेवर फुलांचे हार ओघळले होते. जवळपास गोड भक्तिगीते आळवली जात होती.

इतके सुख, इतका आराम या जिवाने कधी मागितला नाही, घेतलाही नाही. हा सदा उभा. जगाची चिंता वाहणारा आणि खस्ता खाणारा.

माझा विश्वासच बसला नाही. ताजा सत्कार आठवला.
दादरच्या बालमोहन विद्यामंदिरातला. याच्याच साहित्याच्या तिसऱ्या खंडाचे प्रकाशन घडत होते आणि हा अलिप्तपणे अंग चोरून अधोमुख बसून होता. व्यासपीठावर 'नजीकच उधळल्या जाणाऱ्या स्तुतिसुमनांपासूनच जणू हा स्वतःला सारखा चोरीत होता. कोमल, सुखद, सुगंधित काही याने खुषीने पत्करले नाही. याची झेप अग्नीसाठी. बेपर्वा अंतः - करणांचे फत्तर फोडण्या-पाझरण्याचाच याचा छंद. काटे झेलण्याचीच याला हौस. दुर्गंधी उचलण्याला हा तत्पर. जे कोणाला नको ते याने घेतले आणि सर्वांना हवे ते मिळावे अशी कृतीने इच्छा व्यक्त केली.

पण याने याच्या आत-आत फुलांचे ताटवे बहरत गेले. दिव्य तेजाने आणि स्वर्गीय गंधांनी याचे अंतरंग नित्य दरवळलेले राहिले. मुक्तीच्या क्षणी अंतरंगात कोंदाटलेले हे सारे तेज, हे गंध चौफेर उधळीत कुडीचा तुरुंग भेदून आत्मा दिक्कालाकडे एखाद्या प्रकाश-लोळासारखा धावला असेल—मी त्या निश्चल, निर्विकार, अचेतन कुडीकडे एकटक न्याहाळून पाहत हेव्याने म्हणालो. त्या अचपळ आत्म्याच्या प्रयाणानंतरची समूर्त निःस्तब्धता जणू समोर निवांतपणे पहुडली आहे असे वाटले. मरतामरताच डोळे कोरडे झाले. क्षणमात्र दिपले. या आत्म्यासाठी रडण्याचा कुणालाही हक्क नाही असे वाटले.

पूर्वी भेटलो की आम्ही वयांची अंतरे पाहता पाहता काटून गप्पांत आणि शांततेत रंगत असू. तो वयोवृद्ध, मी अकालवृद्ध पिढीचा प्रतिनिधी. तो निश्चयी, मी संभ्रमित. तो तत्त्वज्ञानी अध्यात्मवादी स्थितप्रज्ञ, मी भावविवश विकारवश पोटार्थी. मी मनोमन अहंकारी, तो अंतर्बाह्य निरहंकारी निःसंग. त्याला वयपरत्वे विस्मरणाची बाधा झालेली, स्मृतींच्या बाधेने मी अनेकदा व्यथित. जीवनावर असीम प्रेम करून तो मृत्यूसाठी आसुसलेला आणि मृत्यूचा जप करीत मी जीवनात गुंतलेला. आमच्यातली तफावत हाच आमच्या स्नेहाचा दुवा असावा. माझ्या बाजूने त्याच्याविषयी एक शांत आकर्षण होते. परिचयाच्या आरंभीच या आकर्षणाच्या डोहात मी हांहांदेखील म्हणण्याआत बुडालो. पाण्यासारख्या, स्वच्छ पारदर्शक आणि क्षणोक्षणी नवनवे रंग, नवनव्या छटा दाखवणाऱ्या त्या मोहक, स्निग्ध, गहिऱ्या व्यक्तिमत्त्वाने जणू मला आपल्यात सामावून घेतले आहेसे मला वाटले. आणि तरीही मी माझा होतो. हा अनुभव वेगळा होता. सुखद होता. गूढ होता. या गूढाने मला कधीही सोडले नाही. अखेरीनंतरच्या

त्या निरोपाच्या भेटीतही ते गूढ मला सोडीत नव्हते. आता सुख संपले होते. सहवासातल्या विलक्षण शांततेचे पांघरूण कायमचे अंतरले होते. पण गूढ कायम आहे. या गूढाचे मूळ असा त्या व्यक्तिमत्त्वातल्या किती तरी रंगांचा आणि छटांचा खेळ आजही स्मरणात ताजा आहे.

या अद्‌भुत माणसाने आयुष्यातली कर्तृत्वाची, पराक्रमाची, पुरुषार्थाची, त्यागाची, दानाची—तात्पर्य म्हणजे खऱ्या अर्थाने जगण्याची एकही संधी सोडली नाही. जणू अशा एकेका संधीसाठीच हा स्वतःला जगवीत आला. अशा संधीमागे हे उभे जगणे भिरकावीत आला. लाखात एक असे संपन्न आणि कृतार्थ आयुष्य हा जगला, परंतु या आयुष्याचे सुख घेऊनही या सुखाचा अहंकार याने कधी निसटताही घेतला नाही. पुरुषार्थाचे क्षण सर्वस्वाने जगूनही त्या पुरुषार्थाच्या जाणिवेपासून पुढच्या क्षणी जसा मातेपासून गर्भ अलग सुटावा तसा हा अलग सुटत आला. स्नेहातल्या मोजक्याच भेटीगाठींत अनेकदा त्याचे पराक्रम, साहसे, ज्वलज्जहाल भाषणे, त्याला घडलेले दगेफटके आणि त्याने अनुभवलेले छळ, विश्वासघात आणि वियोग यांची त्याच्या एकदोन छापील चरित्रांतली वर्णने मी त्याच्या पुढ्यात एका कुतूहलाने उजळलेली आहेत. हेतू हा की सत्यासत्य पारखावे, काही नवे जाणून घ्यावे. दर वेळी तो एका विरक्तपणे ऐकू लागे. मग अधिकाधिक रस घेत बालिश कुतूहलाने मध्येच विचारी, असे ? मग पुढे काय घडले ? मध्येच चमकत्या अधू डोळ्यांनी उत्स्फूर्त दाद देई, वा ! फार छान ! मजा आहे ! मी विचारावे, सेनापती, असेच घडले ना ? त्याने म्हणावे, असेल. ज्या अर्थी छापले आहे त्या अर्थी खरेही असेल. ती भली माणसे उगीच खोटे कशाला छापतील ? पण गंमत आहे बाकी...श्रीहरीचा खेळ मोठा अजब आहे...मुद्रेवर नवे ज्ञान लाभल्याचे सुख. मी पुन्हा म्हणावे, पण तुम्हांला काय आठवते ? हा सगळा तपशील असाच घडला ना ? सेनापतींनी चष्म्याशी चाळा करीत उत्तर करावे, काही आठवत नाही. आणि घडला असला तरी आता काय त्याचे ? तुम्ही आपले नवे काहीतरी सांगा आम्हांला. ते जुने आता कशाला हवे ? नवे ऐकू द्या.

विस्मृती म्हणावी तर स्वकृत कवितेची पन्नास कडवी हा माणूस म्हणू लागला की, घडाघडा म्हणे. स्मृतीत ती जणू कोरलेली असत. आणि जगलेल्या आयुष्याची कडवी मात्र हा विसरलेला ! स्वतःच्याच जीवनग्रंथाकडे वाचकाच्या तन्मय अलिप्तपणे पाहण्याला सिद्ध. जगून पुन्हा अर्भकाइतका कोरा. आणि तसे म्हणावे तर जीवनानेच उत्तरोत्तर नवी उंची गाठीत गेलेले एक प्रगल्भ, परिपक्व, विशाल मन, वयपरत्वे 'गरीब' झालेल्या आपल्या जर्जर कुडीत साक्षात वागवणारा.

हे गूढ ओसरत नाही. या व्यक्तिमत्त्वाच्या सीमा आणि कप्पे दिसत नाहीत. आणि कुडी मातीत मिसळली म्हणून हे असीम व्यक्तिमत्त्व क्षणार्धात नष्ट झाले हे पटत नाही. वाटते की हे मुक्त झाले. हाडांच्या काचत्या पिंजऱ्याचे एकमेव बंधनही याने टाकले आणि खऱ्या अर्थाने आता हे असीम झाले. आता हे अमूकच स्थळी हाती लागणार नाही पण हवे त्याला सर्वत्र जाणवत राहील. कुठेही, कसेही हे कुणाहीसाठी कितीही असत राहील.

असेच होण्याची आकांक्षा त्याने नाही तरी धरली होती.

# तुमानवाला

वसंत सरवटे हे फार अजब गृहस्थ आहेत.

त्यांचे खोटे नाव वसंत सरवटे.

त्यांचे खरे नाव शंकरराव सरवटे.

त्यांचा प्यून त्यांना सरोटे साहेब म्हणतो. (चिरोटे साहेब या चालीवर.)

त्यांचा साहेब त्यांना मिस्टर सॅर्वटे म्हणतो.

त्यांची 'ही' त्यांना नुसतेच 'अहो' म्हणते.

त्यांचा दूधवाला बिलात त्यांना सरर्वटे मानतो.

वाणी शरोटे सो लिहितो.

पोस्टमन कधी 'सारवट' म्हणून तर कधी 'सारवटे' म्हणून त्यांची पत्रे बंद दारावाटे आत उडवून चालता होतो. (मात्र पोस्त मागायच्या दिवशी 'सरवटे साहेब' असे तो स्वच्छ म्हणण्याची दक्षता घेतो.)

परंतु सरवट्यांनी मात्र आपण कोण ते पक्के ओळखले आहे. ते स्वतःला 'वस' म्हणतात.

'वस' म्हणजे वसंत सरवटे नव्हे—

वस म्हणजे वांध्यातला ससा. म्हणजे वांस.

पण मग हा ससा वांध्यात आहे हे सर्वांना कळेल, तो बुजेल आणि कदाचित पळून जाऊ बघेल, पळाला तर परत येणार नाही, म्हणून सरवट्यांनी त्याला टोपणनावच दिले आहे 'वस'.

लोक समजतात 'वस' म्हणजे वसंत सरवटे; पण सरवटे मुळी खरा वसंत नाहीच. तो आहे शंकर्राव सरवटे—वांध्यातला ससेवाला शंकर्राव सरवटे.

वांध्यात दोन्ही. ससा आणि म्हणून ससेवाला. ससा सरवट्यांतच आहे. तो त्यांच्या डोळ्यांतून पहातो. कानांतून चाहूल घेतो. (सशासारखे सरवटे कान हलवू शकतात.) आणि काळजात लपतो.

हाच त्याचा वांधा आहे.

तो बाहेर पडू शकत नाही. मोकळा मोकळा धावू शकत नाही. त्याला बाहेरचे सारे घाबरवते. बुजवते. तो आपल्यातच कैद होऊन पडला आहे. वांध्यातला ससा.

बाहेरची धावपळ, गडबड, गोंधळ, मोठमोठ्या इमारती, मोठमोठे शब्द, मोठमोठ्या महत्त्वाकांक्षा, मोठमोठे पुढारी, मोठमोठ्या योजना आणि मोठमोठी घड्याळे यांचे त्याला भय आहे. मनस्वी भय आहे.

हे त्याला धडकी भरवते. त्याच्या चिमूटभर काळजाला धडाडता थोडे होते. केव्हा तरी असे नव्हते असे त्याला आठवते. तेव्हा सारे हिरवेगार होते. शांत निवांत होते. पाणी झुळझुळ वहात होते. वारा वेळूंच्या बनातून गाणी गात फिरत होता. छोटे छोटे रंगीबेरंगी पक्षी मुक्तपणे उडत बागडत होते. कधी दव पडत होते. केव्हा उन्ह जाळत होते. कधी वादळे रोंरावत येत होती, जात होती. पण मग उरत होते हिरवेगारच सारे. पुन्हा सारे शांतनिवांत, गातेबागडते राहत होते.

पण त्याला हे आठवते. वांध्यातल्या सशाला. कुणाला न पाहिलेले स्वप्न आठवते तसे आठवते.

आणि मग तो उदास होतो. अंतर्मुख होतो. आपल्यात हरवतो. खोल खोल बुडतो. स्वतःला खूप दुखवून घेतो. कुणास ठाऊक किती वेळ.

आणि त्याला याचा भारी कंटाळा येतो.

कैद संपत नाही. उदास होणं चुकत नाही. स्वप्न परत येत नाही आणि जातही नाही. बाहेर सारे तसेच राहते—राक्षसी. क्रूर. सुंसाट. गुंतागुंतीचे.

कंटाळ्याचाही कंटाळा येतो. भीतीचे हसू होते.

उबलेला भित्रा ससा गोंडेदार शेपटी लयीत हलवू लागतो. कान उभारतो. तोंड चुटचुट चालवतो. त्याचे डोळे उगीच लकाकू लागतात.

त्याला वाटते आपण हत्ती आहोत. आपल्याला वेलांटीदार नक्षीसारखी सोंड आहे.

नाहीतर उंट अष्टावक्र.

किंवा सिंह आयाळवाला.

तो झुलतो, मान मोडून वाकडा वाकडा चालतो, मनातल्या मनात रान दणाणून टाकणारे डरकाळतो. त्याला मजा वाटते. निदान तेवढाच वेळ कमी होतो. ते महत्त्वाचे.

सरवट्यांना हास्यचित्रे अशी 'होतात'.

प्रथम ससा कैद असतो. वास्तवाने तो बुजतो, गांगरतो. तो स्वप्न पाहतो. त्याला विसंगती

जाणवते. मेळ बसत नाही. सुरक्षित वाटत नाही. तो अस्वस्थ, उदास होतो. अंतर्मुख होतो. स्वतःला चिकार दुखवून घेतो. आणि याला कंटाळतो. कंटाळ्यालाही कंटाळतो. सगळ्यांचेच अति झाले म्हणजे हसू होते. मग ससा हास्यास्पद कल्पना करतो, सोंगे पांघरतो. कुणी कुणी 'होतो'.

सरवट्यांचे हास्यचित्रांचे जग हे असे आहे.

त्यात स्वप्न आणि वास्तव यांचा बिनसलेला हिशेब आहे. स्वप्नासाठी झुरणे आहे, वास्तवापासून बुजणे, लपणे आहे. कंटाळा आहे, कंटाळ्याचाही कंटाळा आहे. तो हलका करणारे 'नाटक' आहे, कुणी कुणी 'होणे' आहे. आणि मुख्यतः या सगळ्याच्या तळाशी सशाचे इवलाले जिवंत काळीज आहे.

सरवट्यांचे हास्यचित्र बिनकाळजाचे नाही. ते 'क्रूर' नाही; तुफान विनोदी नाही; 'उदरविदारक' नाही.

कारण त्यात एक स्वप्न गुंतले आहे. एक फार नाजूक, फार हळवे, थरथरते, अस्पष्ट, धूसर स्वप्न गुंतले आहे. क्षणोक्षणी हरवत चाललेले. सरवटे म्हणूनच 'खडा' मारतात. 'जोडा' मारण्याचे त्यांना जमत नाही. जवळ जोडा नसतो म्हणून नव्हे.



खरे म्हणजे तो असतो. संधी मिळेल तिथे ते आपला जोडा काढून ठेवून घोड्याला पाणी दाखवावे तसा पायाला ताजा वारा दाखवतात. जोडा मारण्यापेक्षा काढण्यावर त्यांचा जास्त विश्वास दिसतो. तसेच पायालादेखील फुप्फुस असते यावरदेखील.



सरवटे एक घड्याळ बाळगतात; पण त्यात चुकूनही पाहत नाहीत. चुकून ते पाहतात तेव्हा ते मागे तरी किंवा पुढे तरी असते. सोयीसाठी ते पुढे आहे असेच ते धरून चालतात. आणि क्वचित ते बंद पडलेले असते.

आपले घड्याळ सोडून इतर घड्याळांवर विश्वास ठेवणे हा त्यांना शुद्ध परावलंबीपणा वाटतो. त्यात अस्मिता, आत्मनिष्ठा वगैरे नसावी असा त्यांचा तर्क आहे. आपले ते आपले; मग ते भले बंद का असेना. यामुळे सरवटे वेळेवर पोचायचे तिथे उशिरा पोचतात. म्हणजे ऑफिसात, घरी, कामानिमित्ताने जायचे असते तेव्हा, लग्नमुंजींना, नाटकसिनेमांना आणि तमाशांना.

आणि उशिरा पोचायचे तिथे नेमके लौकर पोचतात. म्हणजे आपत्ती, अडचणी, आजार, मनस्ताप, संपादक, मित्र, सभा परिसंवाद चर्चा वगैरे. चर्चेत ते बसून झोपू शकतात. परिसंवादात तोंड फार न उघडता शेजाऱ्याशी संवाद करू शकतात. सभेत तोंड मिटून जांभई देऊ शकतात. मित्रांमध्ये वेळी दोन दोन सिगरेटी एकदम ओढू शकतात. आणि आपत्ती ते संपादक या कलमांतल्या कशातही सहनशील आणि स्थितप्रज्ञ राहू शकतात.

हे सारे खडतर साधनेने त्यांना अवगत झालेले आहे.

म्हणूनच ते संतापाच्या किंवा वेडाच्या झटक्यांऐवजी चक्क हास्यचित्रे देऊ शकतात. त्यांची काही हास्यचित्रे एक मोठी जांभई वाटतात तर काही 'चुळबुळ' वाटतात. काहींत चोरट्या टारगट पुटपुटीचा अंश असतो तर काहींत दोन सिगरेटी एकदम ओढण्यातला बेगुमान अगोचरपणा असतो.




परंतु सहनशीलपणा हे सर्वसाधारणपणे त्यांच्या साऱ्या कलेचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

हे नसते तर सरवटे बहुधा भूपतसदृश खुनी आणि डाकू बनले असते अशी भीती वाटते. निदान पुढारी तर खरे.

सहनशील माणूस तूर्त फक्त दोनच गोष्टी होऊ शकतो. हास्यचित्रकार आणि मंत्री.

सरवटे पेशाने मंत्री नसले तरी रमेश मंत्र्यांशी त्यांचे फार जमते. ते कदाचित यामुळेच असावे.

सरवट्यांना शत्रू नाहीत असा सर्वसाधारण समज आढळतो.

हा समज खुद्द त्यांच्यातच आढळतो म्हणून तो जरा गंभीरपणे विचारात घेतला पाहिजे.

पण थोड्याशा तपासाअंती असे आढळते की शंकरराव यांना मुबलक शत्रू आहेत. साधे नव्हेत तर फार जबरदस्त शत्रू आहेत. फार धोकेबाज शत्रू आहेत. घरोघर आहेत.

सुमारें पाच ते दहा वर्षांचे कोणतेही पोर सरवट्यांच्या शत्रुपक्षात जमा असते.

कोणत्याही घरात सरवट्यांची जणू वाटत पाहत ते जन्मल्यापासून दबा धरून असते.

सरवटे जोडे दाराशी काढून (पायांना वारा दाखवण्यासाठीच !) घरात शिरले की ते गळणारी चड्डी सावरीत समोर येते. त्याच्या झिपऱ्यांत लपलेल्या लुकलुकत्या डोळ्यांत साक्षात धोका तरळत असतो आणि मागे धरलेल्या हातात एखादी वस्तू—जिचा उपयोग ते सरवटे 'काका'च्या (रुचिपालट म्हणून क्वचित 'मामा'च्या) पारिपत्यासाठी मोठ्या हिकमतीने नंतर करणार असते.

साधारणतः कोणत्याही नवख्या घरी सरवटे, दारावाटे एखादा भयंकर जंगली कुत्रा भुंकत आला, किंवा प्रसंगी महाभयंकर बिबट्या अगर ढाण्या वाघ जरी कानठळ्या फोडणारी गर्जना करून अंगावर आला तरी दाद देत नाहीत. थंडपणे ते तिथे जातील, दोन्ही जोडे काढतील, एखादी आरामखुर्ची, नसल्यास लोड-तक्क्या आणि तोही नसल्यास साधी खुर्ची, स्टूल किंवा पाट, तोही नसल्यास घराच्या मालकाची मांडी गाठतील, 'हुश्श' करून पायांना वारा दाखवीत बसतील, अगडपगड गप्पा करतील, दोनतीन कप चहा किंवा जे देण्यात येईल ते पितील, चार 'सरवटी' विनोद टाकतील, दरम्यान पाय लांब ताणतील, पाठ मागे नेता येईल तेवढी नेऊन टेकतील, टाय सोडून तुमानीच्या कुठल्या तरी खिशात कोंबतील, शर्टाची बटने सोडतील—थोडक्यात, शक्य झाल्यास एक बऱ्यापैकी डुलकीदेखील मारतील, घरात वाघ

असल्यास त्याला हनुवटीखाली खाजवून (हनुवटी आपलीच.) 'काय रे' म्हणतील, कुत्रा असल्यास 'हड्' करतील, हत्ती असला तरी त्याच्या सोंडेचा मोठ्या खेळकरपणे टेलिफोन करून उमाकांत ठोमरे, सुप्रसिद्ध विनोदी लेखक राजाराम हुमणे यांना फोनवरून सांस्कृतिक सल्ला कसा देत असतात त्याचे प्रात्यक्षिक दाखवतील.

ते यापैकी कुणालाही डरत नाहीत.

ते पठाण कवी विंदा करंदीकरांना डरत नाहीत, 'काळा पहाड' प्रकाशक रा. ज. देशमुखांना डरत नाहीत, इतकेच काय, 'दीपलक्ष्मी'चे एवढे भयंकर ग. का. रायकर—त्यांनादेखील ते डरत नाहीत. चिनी आक्रमणाच्या काळात न घाबरलेले ते सरवटे या आडनावाचे बहुधा एकटेच गृहस्थ असावेत. स्वतःच्या साहेबाला आणि बायकोलादेखील ते डरत नाहीत.

थोडक्यात, कळिकाळालाही ते डरण्याची शक्यता एकंदरीने कमीच आहे.

परंतु एखाद्या घरात पोर—तेदेखील चड्डी सावरीत दुडक्या चालीने समोर येणारे—असे लुकलुकत्या डोळ्यांचे पाहिले की सरवट्यांचा जीव ठाव सोडतो. त्यांची नाडी सैरावैरा पळते. छातीचे ठोके चुकतात. पाय खालच्या खाली गळू बघतात. पोट बिघडू लागते. अंग घामाने भिजते. आणि केस—डोक्याच्या मागच्या बाजूचे—पुरभैय्यासारखे ताठ उभे राहतात.

मग सरवटे कित्येकदा दारात बसून पायांतल्या जोड्याऐवजी हातातल्या बॅगचेच बंद सोडू लागतील. कित्येकदा एकच जोडा काढून घरात शिरतील. आणि प्रसंगी आधीच असलेला एखादा जोडा खिशात घालूनदेखील प्रवेश करतील. अशा वेळी ते काहीही करतील. 'सत्यकथे'च्या भागवतांना ते 'वसंत'कर्ते दत्तोपंत काटदरे म्हणून हाक मारतील. अनंत अंतरकरांचा नाकाच्या शेंड्यावरून ओघळू पाहणारा चष्मा वर करण्याऐवजी नाकासकट आणखी खाली ओढतील. 'साधना'च्या यदुनाथभाई थत्त्यांना चारचौघांत 'ड्रिंक्स काढा' म्हणतील.

'गनीम' चड्डी सावरीत जवळपास आहे एवढेच त्यांना अशा वेळी जाणवत असते.



सरवटे आपल्याकडून मग सख्त खबरदारी घेतात.

स्वतःपुरती मनातल्या मनात आणीबाणी जाहीर करतात. मनातल्या मनात समरगीते आणि स्फूर्तिगीतेसुद्धा ओरडतात. त्या पोरावर एक डोळा ठेवून बसतात.

पण होणारे चुकत नाही. सरवट्यांचा पराभव आणि बोऱ्या अटळ असतो. ती एक 'ऐतिहासिक अपरिहार्यता' असते असे म्हणता येईल.

ते पोर सरवट्यांकडे एकटक पाहत राहते, तोंडात बोट घालून ते एकाग्रपणे चघळते, सदऱ्याच्या शेवाने नाकाचा नाममात्र शेंडा निपटते, एका तंगड्याने दुसरे खाजवते, पण जागचे हलत नाही.

सरवटे पुनःपुन्हा मनाशी शंभर आकडे मोजत असतात.

चेहरा उग्र ठेवण्याचे प्रयत्न करतात. मधून मधून मुठी वळून दाखवतात. अखेर ते पोर धीट बनतेच.

मग संभव अनेक. एक : 'शलवते ताता, तुमच्या नातावल चेंदू मालू ?' दोन : 'ओ सरोटे काका, तुमच्या डोक्यावर बघा झुरळ बसलंय.' तीन : 'ए छलवते, तू आमच्या घलातून निघून ज्या.' चार : 'आं, मला काकाच्या पाठीवल घोला कलायचा !' पाच : 'काका काका बोका बोका धरून ठोका.' सहा : 'काका मला शूऽ झाली !' सात : 'बरे आलात भावजी. एवढी आमच्या चिंतूला सरस्वती काढून द्या बरं. मी काढली तर कार्टा म्हणतो आईची सरस्वती भाजीवाली दिसते. आतां तुम्ही तरी दाखवा तुमची काय ती आर्ट आणि मिटवा एकदा कार्ट्याची किटकिट. नतद्रष्ट मेला !...' असे अनेक.

पण सर्वांत भयंकर : 'काका, चुंबन म्हणजे हो काय ?'

यातले काहीही घडले की सरवटे पोटात अर्धे गळाठतात. अनपेक्षितपणे चीनने आक्रमण केलेल्या भारतासारखी त्यांची अवस्था दिङ्मूढ होते. गरम कपडे आणि बुटांअभावी थंड प्रदेशात उंचावर अवघड जागी लढणाऱ्या शूर भारतीय सैन्यासारखी त्यांची परिस्थिती बिकट बनते. शत्रू घेरतो. अनेकदा शत्रूची भावंडे, इष्टमित्र सौंगडी, किंवा मावशी, आत्या, काकी, मामा, मामी आणि प्रसंगी खुद्द तीर्थरूप आणि जन्मदात्री यातले कोणी शत्रूला त्याच्या अनिष्ट कृत्यात मदत करीत असतात. नंतर होणाऱ्या विषम लढाईत सरवट्यांचे पार 'डंकर्क' किंवा 'मणीपूर' न झाले तरच नवल.





परतताना सरवटे मॉस्कोला मार खाऊन परत निघालेल्या नेपोलियनचे तैलचित्र दिसतात—फक्त टोपी कमी; आणि बॅग जास्त !

आणि अर्थात वांध्यातला ससा—

तो असतोच.

कुणाला इन्फीरिऑरिटी कॉम्प्लेक्स असतो. कुणाला मदर किंवा फादर कॉम्प्लेक्स असतो. कुणाला ऑथेल्लो कॉम्प्लेक्स असतो.

सरवट्यांना इन्फीरिअर माणसांत इन्फीरिऑरिटी कॉम्प्लेक्स असतो.

सुपीरिअर माणसांत ते सुपीरिऑरिटी कॉम्प्लेक्सचे बळी असतात. मदर मंडळात ते मदरहून मदर होतात. फादर वर्तुळात अव्वल फादर वाटतात. ऑथेल्लो नाटक पाहून पुढले चारआठ






दिवस ते ऑथेल्लो कॉम्प्लेक्सने चालतात, इतकेच नव्हे तर दाढी करतात आणि झोपतातदेखील. जिथे जे असेल तसे सरवटे होतात. म्हणजे मुद्दाम नव्हे. आपोआप हे घडते. ते राणीच्या बागेत दोन पायांनी चालायला तयार नसतात. गोरिलाचा पिंजरा दाखवला म्हणजेच त्यांची समजूत पटणार. मत्स्यालयात आपल्याला खवले आहेत असे त्यांना वाटू लागते. तोंडावाटे बुडबुडे काढण्याला शिकण्याचेही ते ठरवून टाकतात. आपण ते काढण्याचे कसे आणि का विसरलो तेच त्यांना कळेनासे होते आणि ते विषण्ण होतात. त्या 'मूड'मध्ये मग त्यांना कवी मंगेश पाडगावकर हा एक मोठा रावस मासा वाटतो तर बीटनिक अशोक शहाणे बोंबिल. स्वतःला ते माफक विनयाने 'घोळ' मानतात.

घोळ म्हणजे पायघोळ नव्हे. घोळ ही माशाची जात आहे.

याचा एक फायदा झाला आहे.

दर वेळी स्वतःचेच हास्यचित्र काढून त्यात ते मुबलक व्हरायटी ठेवू शकतात. कधी मोटारने उडवलेला पोस्टमन; तर कधी गाढ ताणून दिलेल्या तरुण माणसाला सावली करीत उभा राहिलेला दीर्घोद्योगी पारशी बावाचा पुतळा; कधी शेजारी-शेजारी बसून लाडूला लाडू या प्रमाणात जेवणारे 'समाहार द्वंद्व' तर कधी हिंदकळून फुले बाहेर उडालेली चित्राची तसबीर; डोळे वटारून गोंदाच्या बाटलीकडे पाहणारी कात्री; पावसाळी पाण्यातून इंदूरकरमागून निघालेली मत्स्यकन्या; 'साहेब, पॉलिस ?' म्हणून विचारणारा मंगळावरचा सा. पॉ.; चंद्रावरचा पहिला मानव; पद्यावली 'रिफर' करून गाणी ओरडणारा व्यासंगी भिकारी; सिंहाच्या जबड्यात डोकावणारा कर्तव्यनिष्ठ कस्टमवाला,—एक ना अनेक—सब कुछ सरवटेच. फक्त दर वेळी कॉम्प्लेक्स वेगळा.



'सरवटे कॉम्प्लेक्स' म्हणून एक नवाच कॉम्प्लेक्स यावरून कालांतराने अस्तित्वात येण्याची धास्ती आहे. 'कॉम्प्लेक्सलेस कॉम्प्लेक्स' किंवा डी-कॉम्प्लेक्स' असे काहीतरी त्याचे वर्णन करण्यात येईल. किंवा 'सेव्हन इन वन ! फॅमिली साइझ.'



अशा तऱ्हेने प्रत्येक प्रतिष्ठित माणसाला एक घड्याळ, किमान एक शत्रू आणि एक कॉम्प्लेक्स ऊर्फ गंड असावा लागतो तसा सरवट्यांना आहे. प्रतिष्ठित माणसाला एक पत्तादेखील असतो. पत्ता म्हणजे प्लेइंग कार्ड नव्हे. पत्ता म्हणजे ॲड्रेस.

हिंदीत ऐडरैस. तामीळमध्ये कुणास ठाऊक काय.

कुणाचा ऐडरैस ऊर्फ पत्ता फारच क्लिष्ट आणि मारुतीच्या शेपटीसारखा असतो.

उदाहरणार्थ : श्रीकृष्ण म्हाळसांकात डफळापूरकर, खोली नं. २३, माळा नं. ३, नळाच्या बाजूला, १७५६ बी गोदीवाला नवी चाळ (जुनी नवी, नवी नवी नव्हे) क्रमांक १३, बारावी लेन, मारुतीच्या देवळाच्या जवळ, जुनी फणसवाडी नवी महंमद सेलर वाडी,...इ. इ.

सरवट्यांचा ऐडरैस : ग—र्दी.

उरणचे ते उरणकर, साताऱ्चे ते सातारकर, पंढरपूरचे पंढरपूरकर, तसे श्रीमंत सरवटे हाडाचे गर्दीकर.

ते एकटे बऱ्यापैकी गर्दी करू शकतात. आणि बऱ्यापैकी गर्दीत एकटे राहू शकतात.

हे भलत्याला जमणार नाही. बहुतेकांचे उलटे होते.

तसेच सरवटे 'काय बुवा या मुंबईत भारीच गर्दी, गर्दी कशी चुकवावी काही कळत नाही' असे म्हणत गर्दी शोधीत जातात. आणि असे होत नाही तेव्हा गर्दी त्यांना शोधीत येते.

नदी शेवटी सागराला मिळते तसे सरवटे शेवटी गर्दीला मिळतात.

हिवाळा, उन्हाळा, पावसाळा—सकाळ दुपार संध्याकाळ—रात्रदेखील—टॅक्सी, लोकल, थिएटर, हॉटेल, सलून—

सरवटे तिथे गर्दी आणि गर्दी तिथे बहुधा शोधून पाहिल्यास सरवटे.

नॅशनल पार्कला म्हणून निघून देवमाशाच्या पोटात गेलेले असावेत तसे ते गर्दीत वाटतात. किंचित घुसमटलेले, बावचळलेले पण निवांतपणावर एकंदरीने खूष असलेले. 'घरापेक्षा इथे बरे वाटते' असे ते म्हणतील. किंवा 'आज ऑफिसच्या कटकटीला भारी विटलो, म्हटले कुठे जावे, म्हणून आलो झाले इथेच' असे सांगतील. गर्दीतल्या गर्दीत ते त्यातल्या त्यात अंग पसरून बसलेले असतील; मांडीवर बॅग असेल—क्वचित आणखी कुणाच्या मांडीवर;



आणि बॅगेवर कागद; एक डोळा बारीक; आणि महाराष्ट्राचा हा 'ससेवाला' हास्यचित्रकार लोकांकडे पाहून स्वतःचीच हास्यचित्रे मनःपूर्वक काढीत बसलेला दिसेल.

सरवट्यांना एक माणूस काढायला सव्वा मिनिट लागते. (टोपी असल्यास पाच सेकंद जास्त.) पण गर्दी ते पाऊण मिनिटांत काढतात—वाटेल तेवढी गर्दी. अगदी नेहरूंच्या व्याख्यानाचीदेखील.

पुढली गर्दी काढताना मागची पळून जात नाही म्हणून हे जमते हे स्पष्ट आहे.

गर्दीला सरवट्यांचे वेड आणि 'गर्दीकर' सरवट्यांना गर्दीचे. तो गोंगाट, गोंधळ, कलकलाट—छट्.

यंत्राचा बॉयलर धडधडत्या राक्षसी यंत्राशेजारी घोरतो तसे सरवटे गर्दीशेजारी. गर्दीत शांततेचा अनुभव घेतात.

बॉयलरला यंत्राशिवाय गत नाही.

सरवट्यांना आणि कुणालाच गर्दीशिवाय सध्या गत नाही.

गर्दी हेच सगळ्या महत्त्वाच्या गोष्टींच्या निर्विवाद अस्तित्वाचे एकमेव गमक बनले आहे.

उदाहरणार्थ : चांगले नाटक, मोठा पुढारी, उत्कृष्ट व्याख्यान, मौलिक ग्रंथ, भयंकर अपघात, गाजलेला खटला, सुंदर स्त्री, शोचनीय मृत्यू आणि उत्तम हास्यचित्रेदेखील.

गर्दी असेल तरच हे सारे खरे. गर्दी जास्त तेवढे जास्त खरे.

स्वतःलाच हास्यास्पद बनवणारा सहनशील हे सरवट्यांच्या कलेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. आतला ससा झुरत असतो, दुखत असतो, घुसमटत असतो, उबत असतो. सोंगे घेऊन 'असणे' सुसह्य करीत असतो. यासाठी तो त्यातल्या त्यात नाना क्लृप्त्या काढतो, गंमती करतो. एका सशाच्या आणि सरवट्यांच्या मर्यादेत सरवटे नित्य ताजी, नवी वाटणारी हास्यचित्रे काढीत असतात. मधून मधून ती शिळी, तीच तीच वाटतात. त्याला सरवट्यांचा इलाज नसतो. त्यांच्या बायकोचाही नसतो. साहेबाचा नसतो. सशाचा नसतो. कुणाचाच नसतो.

प्रतिष्ठित माणसाला 'ऐडरैस' ऊर्फ पत्त्याप्रमाणे आणखीही एक गोष्ट लागते.

ती राहूनच जात होती.

परंपरा किंवा घराणे.

सरवट्यांचे 'घराणे' कुठले ?

हा फारच गंभीर प्रश्न आहे. कुणी म्हणेल सरवट्यांचे घराणे अर्थातच 'सरवटे'. परंतु हे झाले सोपे आणि त्रोटक उत्तर. सोपे आणि त्रोटक हल्ली कुणीही खरे मानीत नाही.

तर सरवट्यांचे घराणे—

भोवती चित्रांचे साहित्य मांडून मध्ये सरवटे मलमली बंडी घालून बसले म्हणजे प्रथमदर्शनी त्यांचे अव्वल घराणे 'किराणा' वाटते. पण सरवटे अशा वेळी 'स्टेशनरी'ही असतात. आणि एक छोटी दाढी चिकटवली तर तात्काळ ते 'कटलरी' दिसू लागतात.

तात्पर्य : त्यांचे घराणे तसे प्रथमदर्शनी ठरवणे उचित ठरणार नाही. त्यांच्यापेक्षा त्यांच्या चित्रातूनच त्यांचा काळजीपूर्वक तपास आणि छडा घ्यावा लागेल.

असा काळजीपूर्वक तपास आणि छडा घेतल्यानंतर त्यांचे घराणे तुमानवाल्याचे असल्याचे निर्विवादपणे दिसून येते.

तुमानवाला कोण ? असा प्रश्न इथे साहजिकच उद्‌भवतो.

मुंबईकरांना एक गांजावाला माहीत आहे. सोनावालाही कुणी होता. पाववाला तर एका गल्लीत अमर झाला आहे. या क्रमाने लकडावाला, चुनावाला, घीवाला, असे अनेक 'वाले' सापडतात. परंतु तुमानवाला मात्र सापडत नाही. म्हणजे अर्थात 'घराणे' बनलेला. कारण एरवी बिनतुमानवालाच दुर्मिळ !

पण सरवट्यांचा मूळ पुरुष तुमानवाला हा तसा लुंगासुंगा, गल्लीबोळवाला तुमानवाला नव्हता. तो स्पेशल तुमानवाला होता. म्हणजे तो स्पेशल आणि त्याची तुमानदेखील स्पेशल होती.

तशी तुमान झाली नाही.

सरवटे उभे राहिले असता या तुमानीची काहीशी कल्पना येते. (आणि तुमानवाला घराण्याचीही—)

ही तुमान कमान आणि विमान, जपान आणि तुफान, अक्षांश आणि रेखांश, उत्तरध्रुव आणि दक्षिणध्रुव, केनेडी आणि ख्रुश्चेव, अध्यात्म आणि अपस्मार अशा सर्वांना एका वेळी सुखाने सामावणारी वाटे.

आणखीही बरेच तिच्यात राहू शकेल असे वाटण्याइतपत तिचे स्वरूप व्यापक, अस्ताव्यस्त आणि सर्वसमावेशक असे.

प्रत्यक्षात वर एक चेंडूसारखे गोल डोके असे. त्या डोक्यावर एक फेल्ट हॅट असे.

या हॅटखाली दोन रोखलेले काचेरे डोळे असत. आणि त्याखाली एक ढेकूणमिशी; बारीकशी थरथरती जिवणी लपवून धरणारी.

या तुमानीला दोन हातही होते. त्यांतल्या एकात एक केविलवाणी काठी असे. सारखी तुमानीत अडकू पाहणारी.

आता, या रोखलेल्या काचेऱ्या डोळ्यांत कुणी नीट डोकावून बघितले असेल (हे कठीणच होते, कारण हसण्याच्या कल्लोळात याचे भानच फारसे कुणाला राहत नसे) तर सरवट्यांच्या घराण्याचा पत्ता त्याला तिथे लागला असता. कारण त्या डोळ्यांत होता एक वांध्यातला ससा.

डोळ्यावाटे पाहणारा, कानांवाटे चाहूल घेणारा, बुजून कंटाळलेला, भित्रा, बुजरा, नाजूक, गहिरा, स्वप्नाळू, कंटाळलेला, भ्यायलेला, स्वतःला दुखवून घेणारा आणि यालाही कंटाळून शेवटी हास्यास्पद सोंगे घेणारा—हा तुमानवाला सरवट्यांचा मूळ पुरुष.

सरवट्यांचे घराणे तुमानवाला घराणे. सरवटे घराणे नव्हे.

कारण कोणताही सरवटे विरंगुळा म्हणून स्वतःला हसत नसतो.

कोणताही सरवटे जागेपणी स्वप्ने पाहत नसतो.

कोणताही सरवटे कालत्रयी न पाहिलेल्या, न ऐकलेल्या सुंदर सुंदर गोष्टींसाठी मनोमन झुरत नसतो.

कोणताही सरवटे जागोजाग जोडे काढून पायांना वारा दाखवीत नसतो.

कोणताही सरवटे बंद पडलेल्या घड्याळात पाहून काळाचे हिशेब करीत नसतो.

कोणताही सरवटे पाच ते दहा वर्षांच्या पोराकडून भुईसपाट होत नसतो.

कोणत्याही सरवट्याला 'सेव्हन इन वन : फॅमिली साइझ' कॉम्प्लेक्सलेस कॉम्प्लेक्स असणे शक्य नाही.

कोणताही सरवटे लोकांकडे पाहून स्वतःचीच हास्यचित्रे काढीत नाही. 'घरापेक्षा गर्दीत बरे वाटते' असे म्हणत नाही. काळजात वांध्यातला दुखरा ससा जपत नाही.

हे एक त्या तुमानवाल्याने केले; मूकपटाच्या पडद्यावर. आणखी अनेकांनी हे नंतर केले; सारे 'तुमानवाले' घराण्याचे.

आणि हा तुमानवाला तेच करतो; निदान त्यातले बरेच; हास्यचित्रांच्या माध्यमातून.



# हा जुलूम बस्स करा !

ठाकुरद्वारच्या आमच्या विठ्ठलराव तिनईकरांच्या 'मूक' आग्रहाने (दंड धरून ते जिन्याकडे ओढूच लागले;) गेल्या बुधवारी संध्याकाळी एक मजेशीर आणि हृदयस्पर्शी दृश्य पहायला मिळाले. आम्ही म्युझियमपासच्या कावसजी जहांगीर हॉलमध्ये शिरतो तर तिथे चारपाचशे पोरे तुफान दंगा करीत होती. परंतु एवढा दंगा चालला होता तरी—विश्वास ठेवा वा न ठेवा—चकार शब्द म्हणून उमटत नव्हता ! एखाद्या मूक चित्रपटासारखे, चाप्लिन- कीटन यांच्या जमान्यात पुन्हा जाऊन दाखल झाल्यासारखे वाटत होते. टप्पू हाणले जात होते, चिमकुटे काढले जात होते, धपाटे दिले जात होते, चेहरे करून दाखवले जात होते, जोरजोराची आणि सामुदायिक बडबड चालली होती, तरी पण चकार शब्द म्हणून नव्हता ! आहे का नाही मजा ?

ही मजा हृदयस्पर्शी एवढ्यासाठी की ही सारी कोवळी कोवळी पोरे मुकी आणि बहिरी होती. मुक्या आणि बहिऱ्या मुलामुलींचीच एक स्पर्धा, शारीरिक व्यंग राहिलेल्यांसाठी साजऱ्या करायच्या सातव्या जागतिक दिनानिमित्त घेण्यात येत होती. मुक्या-बहिऱ्यांसाठी काम करणाऱ्या अखिल भारतीय संघटनेतर्फे ही स्पर्धा झाली. मुंबईतल्या, या क्षेत्रातल्या साऱ्या प्रमुख संस्थांनी तिच्यात भाग घेतला.

या स्पर्धेत मुकी-बहिरी मुले-मुली बोलली. त्यांनी इंग्रजी-मराठी-गुजरातीत गोष्टी सांगितल्या, कविता आणि अभिनयगीते म्हटली, नाटुकली केली, बँड वाजवला आणि नाचदेखील केले. थोडक्यात, मनात आणल्यास पुष्कळ प्रयत्न करून आपणदेखील इतरांप्रमाणे आवाज करू



शकतो हे त्यांनी दाखवून दिले.

अध्यक्ष म्हणून आणलेल्या माजी चित्रपट-तारका (अजून त्या बऱ्या दिसतात; विठ्ठलरावांचे नि आमचे एकमत.) सौ. नर्गिस सुनील दत्त म्हणाल्या की, या मुक्या मुलांना बोलताना पाहून मला स्वतःला नवी उमेद आली, धीर आला. आयुष्यातल्या कितीही मोठ्या आपत्तीवर भगीरथ प्रयत्नांनी विजय संपादता येतो हे मला इथे प्रत्यक्ष दिसले.

हे खरे होते. तिथल्या छोट्या-मोठ्या, तुमच्या-आमच्या मुलांसारख्याच गोजिरवाण्या, व्रात्य, पण मुक्या मुलांमधली एक मुलगी तर स्टेजवर उभी राहून इतके चांगले आणि गोड इंग्रजी बोलली की बोलक्यांनी मुके व्हावे ! शेजारच्या विठ्ठलरावांना मी मुक्याच्या भाषेत (एव्हाना मलाही त्यांतले चार हावभाव आत्मविश्वासाने जमू लागले होते) म्हणालो की, मुकेपण इतके बोलके असू शकत असेल तर परमेश्वराने आज रात्रीच सर्वांना मुके करावे ! विठ्ठलराव सहनशीलपणे म्हणाले, तूर्त तुम्हीच मुके व्हा आणि जरा ऐका...

थट्टा नव्हे, मुक्या माणसांनाच शब्दांचे वजन आणि मोल खरेखुरे कळत असेल. दरिद्री माणसाला एकेका पैशाचे आणि भुकेल्याला एकेका घासाचे मोल नाही का कळत ? तसा एकेका शब्दाच्या उपयोगामागचा हेतू मुक्या माणसांनाच फार चांगला समजत असेल. बोलक्यांना बोलण्यापुढे तेवढे समजावून घ्यायला उसंत कुठे असते ? ते आपले बोलत



दृष्टी फुटली होती. सफरीतला प्रत्येक क्षण मी डोळसच होतो. भोवतालचे सारे मला डोळ्यांव्यतिरिक्त इतर साऱ्या इंद्रियांद्वारे दिसत होते. भोवतालच्या निसर्गाचे विराट स्वरूप, वाटेतले खाचखळगे, धोके, सारे मला दिसत होते. हिमधवल उत्तुंग पर्वतशिखरे कशी दिसतात ते मला विचारा. तशा प्रदेशात रात्र कशी येते, कशी जाते ते मला विचारा. दिवसाचा प्रत्येक प्रहर तिथे कसा दिसतो ते मी सांगतो. मला डोळे नाहीत हे मुळी मला जाणवतच नव्हते. ते जाणवायचे, वाटेतले माझे मार्गदर्शक जागोजाग मला गाठत तेव्हा. कारण ते मी आंधळा आहे असेच गृहीत धरून वागत.''

वार्ताहर कदाचित या जबाबाने चक्करले असतील. परंतु एरिकसेन मनापासून बोलत असला पाहिजे. केवळ डोळे असणे म्हणजे दृष्टी असणे नव्हे. आपल्याला डोळे आहेत; परंतु दृष्टी असेलच असे म्हणता येणार नाही. उलट एरिकसेनसारखे आंधळे दृष्टी बाळगून असतात; म्हणून तर ते आपणा डोळस आंधळ्यांसारखे चार भिंतींच्या निरुंद निवाऱ्यात नाही तर एकाच एका चाकोरीच्या जिण्यात स्वतःला अडकवून घेण्याचे नाकारून नवनवे जग, नवनवे अनुभव, नवनव्या गोष्टी पाहण्याच्या भुकेने देशोधडी आणि रानोमाळ एकेकटे भटकत जातात. कोण आंधळे ? अंधारात माना खुपसून जगणारे की प्रकाश शोधीत जाणारे ?

हेच पाहा ना. माझ्या परिचयाचे कितीतरी जण काही ना काही निमित्ताने बाहेरदेशी जाऊन जग हिंडून येतात. आणि आल्यावर कितीही खोदून खोदून विचारले तरी पुस्तकी, ठरीव, भोंगळ आणि रुक्ष माहितीव्यतिरिक्त त्यांच्या तोंडून काहीही निघत नाही. हे तर इथूनही समजू शकते, मग इतके दूर जाऊन यांनी काय हो पाहिले ? याउलट माझा आणखी एक तरुण मित्र आहे.



गिर्यारोहणाच्या नादापायी जबर अपघात होऊन तो गेली काही वर्षे कमरेखाली पांगळा होऊन एकाच एका खोलीत, एकाच एका पलंगावर दिवसरात्र पडून आहे. त्याला कुशी वळायचे तरी कोणाची तरी मदत लागते. मी त्याला भेटायला गेलो की सुहास्य मुद्रेने तो माझे प्रसन्न स्वागत करतो. आणि इतके काही नवे, वेगळे, प्रत्ययकारी ऐकवतो की, माझे दोनतीन तास कसे गेले कळत नाही ! त्याच्या भोवतालच्या त्या एका खोलीच्या जगातलेच बारीक बारीक पण नवीन आश्चर्यजनक, वेधक, मजेशीर तपशील त्याला समजलेले असतात. खोलीबाहेरच्या विशाल जगातून वर्तमानपत्रे, रेडियो, गप्पा आणि पुस्तके यांद्वारे त्याने कितीतरी गंमतीशीर, अनुभवसंपन्न सफरी केलेल्या असतात. चंद्रताऱ्यांपर्यंतदेखील तो शास्त्रीय लेखांच्या आधारे पोचतो आणि अशी काही नवी, चैतन्यदायी, सुंदर दृष्टी मला तात्पुरती देतो की ते अडीचतीन तास मी पाहतो तसले कधीही पाहिलेले नसते ! त्याला सोडून बाहेर आले म्हणजे कसे आंधळे आंधळे वाटते...

सांगू का ? डोळे म्हणजे दृष्टी नव्हेच. दृष्टी म्हणजे या जगातल्या लहानसहान गोष्टींविषयीची दुर्दम्य तहान...त्या गोष्टींना भिडण्याची ओढ...त्या गोष्टी होण्याची अनिवार आणि आसुसून इच्छा...

नॉर्वेचा एरिकसेन या दृष्टीविषयी बोलत होता, डोळ्यांविषयी नव्हे.



# त्याची अखेरची इच्छा

अठ्ठावीस वर्षे वयाच्या बूनमी च्युबांगला मलायाच्या पोलिसांनी एका भिंतीशी उभे केले आणि बंदुकीची फैर झाडून त्याच्या देहाची चाळण उडवली. काही क्षणांत हे होऊन संपले असेल. नंतर जमिनीवर लोळलेले लक्तरले शरीर केवळ संदर्भानेच बूनमी च्युबांग नामक कोणाचे म्हणायचे. ते फक्त एक प्रेत. प्रेताला नावगाव नसते.

पोलिसांनी बूनमीला मारले हे कोणत्याही न्यायाने योग्यच झाले. त्याच्या नावे चार दरोडे आणि एकंदर सात खून पोलिसांच्या दप्तरी नोंदलेले होते. सात मानवी जीवितांचा बूनमीने नाश केला. सात दिवे मालवले. सात काचपात्रे खळाखळा फोडली. सात फुले कुस्करली. सात घरे उजाड केली. त्या प्रत्येक घरातल्या एकेका शापाने खरे म्हणजे बूनमी खाक व्हायला हवा होता. त्या एकेका शापामागच्या अश्रूंच्या महापुरातच बूनमी बुडून मरायला हवा होता. त्या अश्रूंमागच्या पिळवटल्या काळजाच्या एकेका वेढ्याने गुदमरून तडफडून त्याचा जीव जायला हवा होता. बूनमीला एक वेळ सर्व अपराध क्षम्य ठरले असते, परंतु लाख मोलाचे जितेजागते मानवी जीवित राक्षसी लालसेने कोणी नष्ट करील तर त्याला क्षमा नाही. त्या महान कारागिराने—विधात्याने—जे घडवले ते चैतन्याचे एकेक सुंदर प्रतीक जो मातीमोल करील त्याला क्षमा नाही. अशी एक नव्हे, दोन नव्हे, सात चैतन्यमय मानवी जीविते कसाबाच्या काळजाच्या बूनमी च्युबांगने आपल्या खुनी हातांनी निकालात काढली आणि आठवा तो ठरला. आपल्या रक्तरंजित पराक्रमांनी 'सू' म्हणजे वाघ हे उपनाव प्राप्त करून घेतलेला हा शिकारी स्वतःच शिकार ठरला आणि एका भीषण नाट्याचा अनुरूप शेवट झाला. ज्या वाटेने

जगातले मोठमोठे बलाढ्य शिकारी आणि मानवी रक्ताला चटावलेले नर-व्याघ्र आजवर गेले त्या एकाच वाटेने हाही निघून गेला. दुःखाचेही कारण नाही आणि विशेष हर्ष करावा असेही काही नाही. चिंतन करण्याजोगे मात्र आहे.

या बूनमीचेच घ्या. अठ्ठावीस वर्षांच्या वयात सात खून आणि चार दरोडे घालणारे काळीज कोणत्या धातूचे घडले असेल बरे ? एकेक यशस्वी दरोडा म्हणजे बुद्धिकौशल्याची केवळ कमाल ! केवढी त्याची आखणी, अंमलबजावणी आणि नंतरची निरवानिरव ! एवढीही चूक म्हणजे मृत्यूलाच निमंत्रण ! परंतु बूनमीने असे चार यशस्वी दरोडे घातले आणि तो आझाद राहिला ! अशा कर्तृत्वाच्या माणसाचा मेंदू विधात्याघरच्या कोणत्या रसायनाचा घडत असेल बरे ? आणि असा हा बूनमी मृत्यूला सामोरा कसा गेला असेल ? तर्कच करायचा तर, संधी मिळेल तर अजूनही पुन्हा करून दाखवीन, अजूनही जगून दाखवीन असे म्हणणाऱ्या ताठ मानेने, उद्दाम नजरेने जगावर आणि मानवी कायद्यावर थुंकणाऱ्या मुद्रेने बूनमी एखाद्या व्याघ्रासारखा वधस्थानाप्रत एकेक ठोकरते पाऊल टाकीत गेला असला पाहिजे. होय ना ?

परंतु बरे का, घडले वेगळेच. बातमी सांगते की 'सू' बूनमी च्युबांग याला लुळ्यापांगळ्या रुग्णाइतांना नेतात त्या चाकाच्या खुर्चीतून ढकलत वधस्थानाकडे न्यावा लागला ! दरोडे घालून धावणारे आणि खून करण्यासाठी दबत दबत एखाद्या करकचून ताणलेल्या स्प्रिंगसारखे अल्लद आपल्या 'भक्ष्या'कडे जाणारे त्याचे पाय या वेळी त्याच्या कामी आलेच नाहीत. ते धावूही शकले नाही, साधे चालूदेखील शकले नाहीत. ते गळालेच. त्यांनी 'वाघ' बूनमी च्युबांगची रजाच घेतली ! वज्राच्या काळजाचा अणि डोंगराएवढ्या हिंमतीचा बूनमी मृत्यूला सामोरा जाताना पुरा लोळागोळा झाला. त्याला चालतादेखील येईना, उभेदेखील राहणे जमेना. त्याचे शरीर जिवंतपणीच जणू मेल्यात जमा झाले. असे कसे झाले हो ?

त्याचे रहस्य मृत्यूत आहे. मृत्यूच्या समीप येताच बूनमीहून देखील निधडी छाताडे पिचतात आणि दगडी काळजे लटपटतात. मृत्यूपुढे ताठा, अहंकार, दर्प व्यर्थ असतो. या न उकलणाऱ्या महान गूढाला सामोरे येताच नरराक्षसांनादेखील कापरे भरते, स्थितप्रज्ञ म्हणवणारे तत्त्वज्ञानी धाय धाय रडतात, पराक्रमी पळ काढण्यासाठी धडपडतात. खून एक वेळ सोपा परंतु मृत्यू महाअवघड. त्याला शांतपणे सामोरे जाणाऱ्यापाशी तसेच मोठे आत्मिक बळ असावे लागते. बूनमी तर त्या मानाने साधा गुन्हेगार. त्याचा आत्मा डागळलेला होता, मलिन होता. तडफेने खून दरोडे घालताना हा 'वाघ' आत्म्याच्या मुसक्या बांधीत असला तरी मृत्यूपूर्वीच्या काही क्षणांत ते त्याला साधले नाही. मुसक्या तोडून त्याचा मलिन, जखमी आत्मा उसळून उठला असला पाहिजे. बूनमीला त्याने सत्य सुनावले असले पाहिजे की—सात वेळा तू स्वतःचाच खून केलास, चार वेळा स्वतःवरच दरोडे घातलेस. तू कुणाला बुचाडलेस आणि कुणाला मारलेस ? स्वतःला. पहा माझ्याकडे ! पहा मी कसा कंगाल, घायाळ, आणि रक्ताळलेला आहे ! अरे काय मिळवलेस तू केलेस ते सारे करून ? केवढ्या पापाचा व्यर्थ धनी झालास, मूर्खा ! आणि कशासाठी ?

बूनमीने प्रथमच स्वतःच्या अठ्ठावीस वर्षांच्या वादळी आयुष्याकडे डोळे फाडून पाहिले असेल.

आपल्या गुन्हेगारी जीवनाचा वैय्यर्थ त्याच्यासमोर प्रथम आणि अखेरचा भलाथोरला 'आ' वासून ब्रह्मांडासारखा उभा ठाकला असेल. एक रितेरिते, रक्तात माखलेले शून्य ! आणि आता शेवट ! संपणार सारे ! म्हणूनच चाकांच्या त्या खुर्चीतून उचलून त्याला भिंतीशी वधासाठी रचला तेव्हा त्याची अखेरची इच्छा विचारताच सत्याशी निर्वाणीचे झगडत तो प्रथम म्हणाला, 'माझ्यासारखा बुद्धिमान कोणीच झालेला नाही.' आणि लगेचचे त्याचे अखेरचे वाक्य होते, 'माझे अनुकरण कोणीही करू नये.'

# नाटक

नाटक संसारासारखे असते. एकदा मन रमेनासे झाले की इतर अनेक गोष्टी सुचू लागतात ! काल रात्री एका नाटकात असे झाले आणि मग रंगमंचावरचे नाटक पाहताना एकेक नवे-नवेच काही लक्षात येऊ लागले. त्यातले एक असे की रंगमंचावरचे ते नट—कमीजास्त प्रतिथयश—अस्खलितपणे बोलत होते पण त्यातले एक अक्षरदेखील त्यांचे नव्हते.

तुम्ही म्हणाल, यात नवीन ते काय शोधलेत ? नाटकातले संवाद नाटककारानेच लिहिलेले असतात आणि नट ते बोलतात. त्यात नटाचे स्वतःचे काही नसतेच.

हे मीही तेव्हा स्वतःला म्हटले. पण तरी माझ्या लक्षात आले ते इतके सहजासहजी निघून जाण्यासारखे नव्हते. कल्पना करा, एकेका भूमिकेचा पोखाष अंगावर बारीकसारीक तपशिलासकट वागवीत, त्या भूमिकेच्या अनुषंगाने लहानसहानदेखील लकबी चतुराईने दाखवीत, आपण जणू ती भूमिकाच साक्षात आहोत असा जो तो त्या तिथे त्या प्रखर प्रकाशाच्या जगात वावरतो आहे. हसतो आहे,हसवतो आहे. रागावतो आहे, तडफतो—तळमळतो आहे, विचार करीत असल्यासारखा फेऱ्या घालतो आहे, प्रेम करतो आहे, संसार करतो आहे, बायकोशी सुखदुःखाचे चार शब्द निवांतपणे बसून बोलतो आहे, मुलांवर प्रेम करतो आहे, मित्रांच्या गळ्यात गळे घालतो आहे, जुन्या आठवणींत रमतो आहे, भविष्यकाळाची स्वप्ने रंगवतो आहे आणि अधूनमधून जीवनासकट अनेक विषयांवर सुभाषितवजा मते देतो आहे. पण हे सारे त्याचे नव्हेच. यातले अवाक्षरदेखील त्याचे नव्हे. यातले कोणतेही मत, कोणतेही वाक्य, पूर्वयोजनेबरहुकूम हुकमेहुकूम चोख वठवले जाते

आहे. यातली स्वप्ने आणि हास्ये याची नसावीत हे तरी एक प्रकारे सुसह्य; पण यातली बायको याची नाही आणि मुलेदेखील कुणीतरी परकीच आहेत. मित्र मैत्रीचा केवळ अभिनय करताहेत, अभिनय. हा करतो आहे ते तर सगळे लटके, आणखी कुणी ठरवून दिलेले आणि वठवून घेतलेले आहेच पण याच्यासाठी याच्याभोवतालचे सगळे करताहेत तेदेखील तितकेच लटके आहे. सगळा बनाव ! सक्ती ! पोपटपंची ! साडेतीन तास या गुणी माणसांनी परिश्रमपूर्वक आणि जीव ओतून एकमेकांची आणि सर्वांची केलेली प्रचंड फसवणूक !

हे सगळे मनात आले आणि रंगमंचावर चालू होते ते सगळे नाटकातले मानवी जीवन पाहताना मला मनस्वी गुदरमवू लागले. भोवतालची माझ्यासारखी माणसे त्या नाटकात रंगून हसत होती, रडत होती, पण मी फक्त गुदमरत होतो. मला काही ते नाटक आस्वादता आले नाही. त्या नाटकातल्या एकेकाचा तोरा, लडिवाळपणा, विनय, गहिवर, गर्व आणि कळवळा मला कमालीचा—कमालीचा केविलवाणा आणि घृणास्पद वाटू लागला आणि मी बाहेर निघून आलो.

बाहेर आलो तशी जरा बरे वाटले.

मला वाटते, माझ्यापुरत्या बिनसलेल्या त्या नाटकातदेखील मानवी जीवनाचे एक चित्रच मला काल रात्री दिसले. नाटकातल्या त्या मानवी जीवनात मानवी जीवनातले नाटक मला पाहायला मिळाले, नव्हे, पहाण्यावाचून गत्यंतरच उरले नाही. आपण नाही का, एकेका भूमिकेचा पोषाख बारीकसारीक तपशिलासकट अंगावर आणि मनावर चढवीत ? कधी एकाहून अधिक भूमिका क्षणाच्या अंतराने एखाद्या चतुर आणि कसबी नटासारखे वठवतो.
कारकून—नवरा—बाप—मित्र—लाचार—गर्विष्ठ—प्रेमळ—दुष्ट—तरुण—म्हातारा—पोर—राक्षस—देवमाणूस—क्षुद्रमनस्क—आणखी अनेक. आपणदेखील निरतिशय प्रेम करतो, प्रखर महत्त्वाकांक्षेत जळतो, वात्सल्याने कुणाला तरी उराशी धरतो, गर्विष्ठपणे कुणाला तरी दूर झिडकारतो, स्वप्नात रंगतो, दुःखांनी तडफडतो, विचार करतो, बेत ठरवतो, मते देतो आणि भविष्य करतो. अस्खलितपणे हे सारे करतो आपण. सफाईने करतो. टिच्चून करतो. परिश्रमपूर्वक आणि जीव ओतून ! जणू नाटक आपलेच आहे ! आपले कर्तेकरविते नाटककार ते आपणच !

आणि कधीतरी कळते—चरचरून काळीज कुणी डागावे तसे कळते—की नाटक आपले नाही. काहीच आपले नाही. आपणदेखील आपले नाही, आपले आप्तदेखील आपले नाहीत, काही काहीसुद्धा आपले नाही !

केव्हा विचारा. जेव्हा पडदा पडतो ना, तेव्हा—चांगल्याशा बेतावर, जिद्दी महत्त्वाकांक्षेवर, काळीज तोडून केलेल्या प्रेमावर, नाहीतर छाती फुलवून केलेल्या गर्विष्ठ गुरगुरीवर—त्याहीपेक्षा आपल्या जवळपासच्याच एखाद्या जित्याजागत्या, हसत्या, बोलत्या जीवितावर. जोवर तो पडदा आपल्या हाती नाही तोवर हे नाटक आपले नाहीच. आपण आहोत फक्त पात्रे. चालतीबोलती कळसूत्री बाहुली. सोंगट्या एका मोठ्या पटावरच्या; बडबडणाऱ्या, हसणाऱ्या, रडणाऱ्या, तडफडणाऱ्या सोंगट्या.

जाऊ द्या. मन रमेनासे झाले की अनेक गोष्टी सुचू लागतात म्हटले ना.

# 'आ'

परवाच्या शुक्रवारी संध्याकाळची गोष्ट. शीवहून बसने बोरीबंदरकडे येत होतो. शेजारी एक बारकासा वयस्क पारशी गृहस्थ दादर टी. टी. ला येऊन बसला. माझ्या शेजारी थोडा वेळ बसून तो आदबशीर सुरात मला म्हणाला, "मुला, खिडकीपासची जागा मला मिळेल तर फार बरे होईल. तुझी काही हरकत ?" त्याचे वय आणि आदब यांची गळ पडून मी जागचा उठलो, तो खिडकीकडे सरकला आणि मी त्याच्या शेजारी बसलो. आता लांब कोटाच्या खिशातून त्याने 'पॉकेटबुक' काढले आणि वाचायला सुरुवात केली.

तुम्ही म्हणाल यात काय आहे 'आ' वासण्याजोगे ? ते तर पुढेच आहे.

तो वाचायला लागला, मी माझ्या कसल्या तरी विचारात गुंगलो. थोड्या वेळाने पुस्तकाचे एक पान त्याने फाडून बसच्या खिडकीबाहेर सोडल्यासारखा काहीतरी भास मला झाला. आपल्याच विचारात मी म्हणालो, 'भासच असेल.' पण थोड्याच वेळात चांगले माझ्या डोळ्यांसमोर त्याने दुसरे पान वाचून टरकावले आणि शांतपणे बसबाहेर सोडून दिले !

हे जरा काहीतरीच होते. मी लक्षपूर्वक पहायचे ठरवले. थोड्या वेळाने तिसरे पान पाठपोट वाचून होताच तेही त्या महाभागाने 'टार्'दिशी टरकावून हळुवारपणे बसच्या खिडकीबाहेर सोडले आणि पुढले चौथे पान तो थंडपणे वाचू लागला. मग चौथेही तिसऱ्याच्या वाटेने गेले, पाचवेही गेले, सहाव्वे गेले आणि मी बसल्या जागी चकरून गेलो. हा काय प्रकार होता ? हा वाचून होताच पुस्तकाची पाने का फाडतो आहे ?

प्रथम वाटले, त्याला वेड लागले असेल. पण त्याच्या एकाग्र मुद्रेवरून तसेदेखील दिसत

नव्हते. वेडे पारशी इतके थंड नसतात. मग वाटले, लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी हा विक्षिप्तपणा असेल. पण विक्षिप्तपणा कुणी लोकांची मुळीच दखल न घेता बिनबोभाटपणे करीत नसते.

शेवटी न राहवून मी त्यालाच विचारले, तुम्हांला काही विचारायचे आहे. तुमची काही हरकत ? तो आणखी एक पान टरकावून म्हणाला, विचार, पोरा. काय विचारायचे आहे ?—मी असे पुस्तक का फाडतो. पुष्कळ जण हा प्रश्न मला विचारतात. जगाचा आणि मित्रांचा अनुभव कमी असलेले हे सगळे असतात. खराखुरा अनुभवी माणूस माझ्यासारखेच केल्याशिवाय रहाणार नाही.

मग त्याने खुलासा केला तो असा. वाचनाचा त्याला फार नाद. त्यासाठी प्रत्येक पुस्तक तो विकत घेतो. दुसऱ्याचे पुस्तक कधीही मागत नाही. पुस्तक आणि बायको आपलीच असावी असा त्याचा पूर्वीपासून कटाक्ष. पण जगाची रीत तशी नाही. लोक दुसऱ्यांचीच पुस्तके फार वाचतात. त्याच्या हातात नवे पुस्तक पाहिले की कुणी तरी ते "उद्या सकाळी परत करतो", "दोन दिवसांत देतो" म्हणून नको नको म्हणता न्यायचे आणि सहसा परत करायचे नाही. परत केलेच तर कधी ती पंधरवड्याने नाही तर महिन्या दोन महिन्यांनी ते फाटक्यातुटक्या अवस्थेत त्याच्या हाती यायचे. त्याची वाचून झालेली पुस्तके अशी जायचीच, पण नुकती विकत घेतलेली आणि वाचायची नवीकोरी पुस्तकेदेखील प्रेमाने हिसकावून नेली जायची. कधी अर्धवट वाचलेले पुस्तक त्याला असे हातोहात पारखे व्हायचे; आणि वाचायला परत मिळायचे नाही. थोडक्यात, आपण आपल्या मित्रांसाठीच पुस्तके विकत घेतो असे त्याला वाटायला लागले आणि त्याच्या तत्त्वात हे बसत नव्हते.

म्हणून त्याने एक दिवशी चिडून हा विक्षिप्त वाटणारा उपक्रम चालू केला. पुस्तक विकत घेतले की तात्काळ त्याचे एखादे प्रकरण वाचून तो असे फाडून टाकतो. त्यानंतर वाचून होईल तसतसे एकेक पाने पुस्तकातून जाते. आश्चर्यचकित मला तो चष्म्यावाटे न्याहाळीत म्हणाला, पोरा, हा एवढा एकच उपाय ! कुणी पुस्तक मागितले की त्याला ते खुशाल दाखवायचे. पाने गहाळ असलेली पुस्तके त्यांना फुकटसुद्धा आवडत नाहीत ! याने आपले सबंध पुस्तक खात्रीपूर्वक वाचून होते, दुसऱ्याने मागण्याला किंवा दुसऱ्याला द्यायला नंतर आपल्याकडे पुस्तकच उरत नाही; आणि अशा प्रकारे पुष्कळच मनस्ताप वाचतो, मनाची शांती टिकते. ती फार महत्त्वाची आहे.

पण चांगली चांगली पुस्तके फाटून नष्ट होतात त्याचे काय ? मी जरा नापसंतीनेच विचारले. अवमूल्यनापासून तर इंग्रजी पुस्तकांच्या किंमती दुपटीने वाढल्या आहेत !

तो चष्म्यावाटे त्याच्या वटारल्या वाटणाऱ्या लालसर ओक्याबोक्या डोळ्यांनी मला पुन्हा न्याहाळीत म्हणाला, माझ्या मुला, जगाचा अनुभव तुला कमी आहे ! पोरा, या जगात पुस्तकेच काय पण चांगले चांगले आणखी फार काही डोळ्यांसमोर नष्ट होते. तुला कल्पना नाही, कल्पना नाही ! जिवंत माणसे नष्ट होतात ! प्रेम नष्ट होते ! जिव्हाळा नष्ट होतो ! घर नष्ट

होते ! सुख नष्ट होते ! सगळे नष्ट होते ! म्हणून लक्षात ठेव, लक्षात ठेव, पुस्तक आणि बायको आपलीच असावी !

माझ्या खांद्यावर त्याने थोपटल्यासारखे केले आणि भला मोठा निःश्वास टाकून तो वयस्क पारशी पुन्हा पुस्तकाची पाने फाडून बसच्या खिडकीबाहेर शांतपणे सोडू लागला !

आता सांगा, 'आ' वासायचा नाही तर काय करायचे ?



# हात

या डोकेबाज शास्त्रज्ञांची कमालच कमाल आहे.

रोज यांना नवे काहीतरी सुचते ! आणि तसे नुसते सुचते आपल्यालादेखील, पण हे लोक ते करून दाखवतात.

हे भलतेच !

आता हे वाचा. त्यांनी म्हणे भयंकर विध्वंसक अण्वस्त्रे आणि अंतराळात सोडायची एकाहून एक अद्‌भुत अंतराळयाने बनवण्याचे महत्त्वाचे काम जरा बाजूला ठेवून एक गंमत बनवली आहे– -त्या रशियन शास्त्रज्ञांनी.

बिनमाणसाचा जिवंत हात !

या हाताला माणूस नाही. आणि पुन्हा हा काय काय करू शकतो ! सकाळी उठून हा टूथपेस्टची ट्यूब दाबून ब्रशवर टूथपेस्ट काढून घेऊ शकतो म्हणे. हा टाइप करू शकतो. फोटो काढू शकतो. अचूक हवा तिथे चेंडू फेकू शकतो. इतकेच नव्हे तर हा रेडिओ दुरुस्त करतो आणि मोटारदेखील बिनचूक चालवतो !

आहे का नाही कमाल !

एवढे असून पुन्हा याला माणसाची भानगड नाही. याचा हा स्वतंत्र ! म्हणजे याने ब्रशवर काढून घेतलेली टूथपेस्ट दातांवर घाशीत सुंदरशा रामप्रहरी कुणी आयुष्यात राम पाहिला नाही म्हणून चिरचिर सुरू करणार नाही. हा टाइप करील पण टाइप केलेले एखाद्या केबिनमधल्या असंतुष्ट आणि त्रस्त भुकेजल्या 'समंधा'समोर नेऊन ठेवून लाचारपणे बाजूला ताटकळणार नाही. का

विचारा ! कारण याला माणूसच नाही ! हा फोटो काढतो ना ? पण तो आपण कसा भलताच अक्कलहुषारीने काढला ते कंटाळा येईस्तोवर सांगून हा कधीही कुणाचा दम काढणार नाही, कारण याला मुळी माणूसच नाही. हा चेंडू फेकील, रेडिओ दुरुस्त करील, मोटार चालवील पण मुकाट्याने. अमूक साली अमूक दिवशी त्या अमक्या सामन्यात आपण कसा नेमका चेंडू फेकला त्याच्या वातड आठवणी आठवणी काढून हा कधीही कुणाचा वेळ घेणार नाही. फक्त चेंडू फेकील ! बस्स !

थोडक्यात, या हाताचे फायदे भलतेच मोठे आहेत. उदाहरणार्थ, त्याला एक पोट नाही, पोट ! त्यामुळे तो कधीही लाचार होण्याची शक्यता नाही. तो कुणाही नालायकाला, दुष्टाला, चोराला सलाम करणार नाही—कारण त्याला पोट नाही, त्यामुळे ते भरण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही ! हा बिनमाणसाचा हात नित्य स्वाभिमानीच राहील. या हाताला तोंड नाही हा आणखी फायदा. त्यामुळे हाताने होईल ते तोंडाने घालवण्याचा मुद्दा राहणार नाही. तोंडवाल्या हातांचे हे हमखास घडते. ते बेटे करतील आणि वर त्याबद्दल बोलून सगळी गंमत घालवतील. प्रसंगी न केलेल्याचेही श्रेय उपटू पाहतील. स्वतः करणे टाकून दुसऱ्याच्या करण्यात उणेदुणे काढत



बसतील. आपल्याहून उजवे कोणी करते त्याच्या चहाड्या-चुगल्या करतील. थोडक्यात, काम करतील त्याहून घाण जास्त करतील ! हा हात फक्त काम करील. वहाव्वा ! शास्त्रज्ञ महाराज, तुमच्यादेखील हातांची आणि त्यामागल्या मेंदूची कमाल आहे ! ते बेटे सगळ्या जिवंत हातांची यंत्रे बनवण्याचेच काम करीत नाहीत, यंत्रांचेदेखील जिवंत हात बनवतात !

अशा स्वाभिमानी, अबोल, कार्यरत, बिनचूक आणि 'जिवंत' हातांची जरुरी अलीकडे भासत होतीच. सगळीकडे पहावे तर मरगळलेले हातच फार दिसतात. बिघडलेल्या यंत्रासारखे हे कसे तरी काहीतरी करून एकोणतीस दिवस वेळ निभावत असतात. फक्त एकाच दिवशी त्यांचे काम तत्परतेने घडते. एक तारखेला पगार उचलण्याचे काम ! ते मात्र बिनचूक !

बाकी ते तरी काय करतील, शास्त्रज्ञमहाशय ! त्यांच्यामागची मनेच विटलेली, कंटाळलेली, चिडचिडलेली असतात ना, त्याने असे होते. या खरोखरी जिवंत हातांची मनेच मेलेली आढळतात. आणि या मेल्या मनांचे अवजड लोढणे घेऊन हे हात बिचारे फरफटत, भरकटत, शिणत, लडबडत कसेबसे चालत असतात.

असे असायला नको, पण आहे. म्हणूनच तुमच्या यांत्रिक 'जिवंत' हाताचे कौतुक आहे ! कारण त्याला एक मेलेले मन नाही.

तुमच्या या अद्‌भुत हाताने मोठी गरज भागेल. पण शास्त्रज्ञमहाराज, हा तुमचा हात आमची एक आणखी महत्त्वाची गरज भागवील काय ?



अननुभवी तरुणपणी पोटामागे वणवणताना एकटेपणी, 'घरा'च्या हुरहुरीने मन दाटले असता, त्याने आमच्या पाठीवरून फिरावे. वाढत्या वयात भोवतालच्या गर्दीत एकाकी वाटून जीव गलबलत असता हळूच आमच्या हाती त्याने यावे. केव्हा तरी न राहवून एखाद्या भग्न प्रीतीच्या स्मृतींनी आम्ही अनावरपणे तळमळू तेव्हा त्याने आमचे तेवढे अश्रू पुसावेत. आणि आमच्यातले कोणी अभागी, आमच्याच कृतघ्नतेचे, विस्मरणशीलतेचे, दुष्टाव्याचे, नादानपणाचे, आंधळेपणाचे, स्वार्थाचे बळी होऊन माणसांच्या अरण्यात अखेरच्या श्वासासाठी एकाकी तडफडतील तेव्हा या तुमच्या हाताने त्यांच्या ओठी निरपेक्ष, कृतज्ञ असे मायेचे चार थेंब सोडावेत !

३९९ शास्त्रज्ञमहाराज, आम्हा माणसांना आज अशा हातांची फार फार गरज आहे.

पण त्यासाठी त्या हाताला 'कळ' हवी ती विजेची नव्हे,,एखाद्या वेदनेची. त्यासाठी त्या हाताला हवे एक काळीज, जखमी काळीज.

कबूल करा, एवढे मात्र नाही तुम्हांला जमणार !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२८२
२५६७२
२।८।८८

# ‘अहम्’

दार उघडते आणि ज्याला आपण काही वर्षांमागे वर्मी दुखावलेले होते त्या माणसामोर आपल्या कामासाठी आपण जाऊन उभे राहतो.

किंवा दार उघडते आणि ज्याने आपल्याला काही वर्षांमागे वर्मी दुखावले होते तोच माणूस आपल्यासमोर येऊन उभा राहतो. त्याचे आपल्याकडे काम असते.

एक क्षण आधी याची दोघांनाही कल्पना नसते आणि हे घडते. योगायोगाने पण कधी ना कधी हमखास घडते.

येणारा एक क्षणभर गोंधळत असेल. बसलेल्याच्या मनावर निमिषभर एक कडवट चव येऊन जात असेल.

मग काय घडते ? आलेला एक औपचारिक नमस्कार आणि त्या स्थितीत जमेल तेवढे हास्य करतो. बसलेला त्याचे औपचारिक आणि जरा कोरडेच स्वागत करतो. आलेला मनाशी कदाचित पुटपुटत असेल, ‘सापडलो ! निकाल लागला ! हा इथे असेल अशी आगाऊ कल्पना असती तर आलोच नसतो.’ बसलेला स्वतःशी म्हणत असतो, ‘धाडस पहा ! काम लागले तेव्हा पुन्हा माझ्यासमोर हजर ! पण जुने सगळे विसरलेलो नाही मी. कधीही विसरणार नाही.’ मग तो आलेल्याला काम विचारतो. चहा मागवतो. एकीकडे तो त्याला न्याहाळीत मनाशी नोंद घेत असतो, तब्येत जरा उतरलेलीच आहे. तेव्हाचा तजेला नाही. केस पिकले. थकलेला वाटतो. परिस्थिती तितकीशी बरी नसावी. आलेला जरा अवघडला बसूनच आपल्या कामासंबंधी बोलतो. बोलताना त्याचे मनाशी चालू असते, लक्ष्मीचे तेज कसे चढले

आहे पहा. पुन्हा अधिकार आहे. पण टक्कलसुद्धा पडले. तेव्हा याचे केस कसे रेशमी पिंगट असत. पोरींवर याचे 'इंप' हमखास पडे. आता पोक्त वाटतो. जरा उतरलासुद्धा आहे. काम सांगता सांगताच त्याला एकीकडे मनाशी वाटत असते की काम होण्याची सुतराम शक्यता नाही. तेव्हा घडले त्याचा वचपा काढण्याची हीच त्याला आयती संधी आली आहे ती तो सोडील बरा ? आपण याच्या जागी असतो तर हेच केले असते.

बसलेला हाताची जुडी टेबलावर पुढ्यात घेऊन आलेल्याचे काम वरपांगी एकाग्रपणे आणि अगत्याने ऐकून घेतो. मनाशी विचार करतो, करावे का याचे काम ? तोही एक सूड होईल. पण ते औदार्य होईल. काय म्हणून ते दाखवायचे ? याला काय हक्क आहे ते मागण्याचा ? काम होणार नाही म्हणून बोथटपणे सांगून टाकावे ? जुने सगळे ऐकवावे ? याच्या तेव्हाच्या त्या जंगली वागण्याबद्दलचे आपले निःसंकोच आणि सविस्तर मत याच्या अंगावर सोडावे ! काय करील ? त्याला ऐकून घ्यावेच लागेल ! आयता सापडला आहे. तेव्हा कल्पनाही नसेल बेट्याला की पुढे आपल्याकडेच हात पसरून यावे लागेल !

तेवढ्यात चहाचा ट्रे येतो. बसलेला दोघांचा चहा तयार करतो. तो तयार करता करता त्या जुन्या काळाचा विचार करतो. तेव्हाचे ते तारुण्य, तो बेबंदपणा, ती हिरीरी, ते रस घेऊन प्रत्येक लहानमोठी गोष्ट करणे...भांडणातदेखील रस घेणे...जीव तोडून भांडणे...प्रेम करणे...

आलेला दोन कपांत दूध ओतीत करायची म्हणून चौकशी करतो, त्या वेळचे कोण कोण भेटले होते तुम्हांला अलीकडे ?

मग औपचारिकपणेच पण त्या जुन्या गोष्टी सुरू होतात. चहा घेता घेता जुनी उजळणी चालते. तेवढा तो विषय वगळून—तो अप्रिय, कटू, लागट प्रसंग ! अद्याप दोघांच्याही मनातून न गेलेला. आपला तो हा अजून कविता करतो का ? तो अमूक तमूक कुठे असतो ? तमूक अमूकाचे आता काय चालले आहे ? तेव्हा बाकी त्याच्याविषयी वेगळ्याच अपेक्षा होत्या. त्या मिस् हिचे पुढे कुणाशी लग्न झाले ? मध्यंतरी एकदा बसमध्ये दिसली होती. बरोबर मुले होती. आता भलतीच लठ्ठ झाली आहे...थोडे हसणे...चहाचे घोट...

चहा घेऊन होईस्तोवर अढीची स्प्रिंग पुष्कळच सैल पडलेली असते, संकोचाचे बर्फ बरेच वितळलेले असते. कडवटपणा उरलेला नाही, आणू म्हणता तो आता तसा येणार नाही हेही लक्षात आलेले असते. आणि तरी सगळेच काही मोकळे मोकळे झालेले नसते. कुठे तरी ताण असतोच. आत-आत तो जाणवतच असतो. तोही मोकळा व्हावा असे वाटते, ते सगळे नव्याने उगाळण्यात अर्थ नाही हे पटते. त्या वेळचा गाढवपणा, अविचार, भडकूपणा उमगतो, त्याचे थोडेसे हसूदेखील येऊ बघते. प्रत्येकापुरते हे मनोमन स्वतंत्रपणे पण जोडीने घडत जाते. आणि चहा घेऊन होतो.

का कुणास ठाऊक, पुन्हा स्प्रिंग एकदम ताठ होत करकचते. बर्फ घट्ट होते. शब्द थंड पडतात. मुद्रा गोठतात. दुसरे काही न सुचून आलेला अर्धवट उठतो. बरे, येतो तर. बसलेला—काही न सुचवून—म्हणतो, येता ? अच्छा. आलेला तिरमिरून मनाशी म्हणतो, पुन्हा कामाची आठवण करणार नाही. बसलेला स्वतःला बजावतो, कामाचे जमणार नाही. असे पुष्कळच

रोज येत असतात. याचेच मुद्दाम करण्याचे काय कारण ? काय गरज ?

आलेला निघून जातो. बसलेला बाहेरच्या नव्या वाट पाहणाऱ्याला बोलावतो किंवा पुढ्यातल्या कामात डोके घालतो. दोघांनाही मनोमन एक अस्वस्थता जाणवत राहते. एक अर्थहीनता. एक हास्यास्पदता. एक मोठ्ठा अडथळा.

आयुष्याचा रामरगाडा पुढे चालू राहतो.

माणसामाणसातल्या संबंधांतली ही मजा तुम्ही कधी अनुभवली आहे ? आणि स्वतःतल्या 'अहम्'चा अशा वेळी जाणवणारा मोठ्ठा अडथळा ?

# भली मोठी गंमत

परवा संध्याकाळी एक भली मोठी गंमत झाली. अशी गंमत सहसा या मुंबई शहरात होत नसते. अशी आणि अशा वेळी तर नसतेच होत.

चर्चगेट स्टेशनात संध्याकाळी सहाच्या सुमाराची कल्पना करा. तुफान गर्दी. नोकरीवाल्यांच्या लाटांमागून लाटा स्टेशनाच्या फलाटावर लोटत असतात. जुन्या लाटेचा एक भाग लोकलमध्ये भरतो आणि लोकल स्टेशनातून जाते तोवर दोनतीन नव्या लाटा फलाटावर येऊन पसरलेल्या असतात. चारही फलाट गर्दीने फुलून गेलेले असतात. एकच कोलाहल माजलेला असतो. जणू चर्चगेट स्टेशनाच्या आकाराचा एक भला दांडगा भुंगाच भुणभुणत आहे.

या गर्दीतले चेहरे कसे असतात ? महापुराचा लोंढा येऊन सुंदरशा बागेतली सगळी रोपटी, वाफे धुपून जावे आणि बरड, विस्कटली जमीन उरावी तसे. त्यांना कसली टवटवी नसते, तेज नसते. चैतन्य धुपून गेलेले असते आणि नुसतेच बरड नाकडोळे उरलेले असतात. या डोळ्यांत फक्त एकच एक चिंता असते. लोकलमध्ये जागा मिळण्याची. शरीरे निस्त्राण असतात. मने मलूल असतात. हातातल्या आणि काखेकाखेतल्या थैल्यादेखील कशा, साऱ्या विश्वाचा भार वाहावा लागत असल्यासारख्या भारावलेल्या, जडशीळ वाटतात. लोकल स्टेशनात आली की या जडशीळ थैल्या सावरून निस्त्राण शरीरे जिवाच्या करारांने डब्यांच्या दारांशी जागेसाठी लढाई करतात. मस्तके बधिर आणि मने बेफाम होतात. नजरा आंधळ्या बनतात. भयंकर खेचाखेच उडते. चढणारे आणि उतरणारे एकमेकांना रेटतात. पोरे चेंगरतात, बायका धक्के खातात, म्हाताऱ्याकोताऱ्यांचा दम कोंडतो, अशक्तांना अर्धमेले व्हायला होते. पण सारे

शक्तीचा कण न् कण एकवटून त्या धुमश्चक्रीत आपापले नशीब अजमावतात—घराचे स्टेशन येईतोवर थकले शरीर टेकण्यापुरत्या थोड्या जागेसाठी.

तर हे असे सगळे परवा संध्याकाळी अगदी ऐन जोरात चालले होते; जो तो आणि जी ती आपल्या थकव्यात, चिंतेत, जागेसाठी धडपडीत व्यग्र होती, दूरध्वनिक्षेपकावरून येत्या जात्या गाड्यांच्या घोषणा परलोकातून व्हाव्या तशा चालू होत्या, स्टेशनात बरड माणसांचे लोंढ्यांमागून लोंढे येऊन पडत होते—आणि कुठून कुणास ठाऊक, एक इवलेइवलेसे फुलपाखरू तिथे येऊन उडू लागले. आता, चर्चगेट स्टेशनात फुलपाखराने अशा भलत्या



धांदलीत येण्याला काही कारण नव्हते. तर्कशास्त्रही नव्हते. पण ते आले खरे. आणि आपले चिमुकले पसरट रेशमी पंख मिटत उघडत वेडेवाकडे आपले एका फलाटावरून उडू लागले. ते दूरध्वनिक्षेपकावर धीटपणे बसत होते, पंख्याभोवतालून शिताफीने बागडत होते, विजेच्या वेळापत्रकांना वाकुल्या दाखवीत होते. मध्येच गर्दीच्या अगदी डोक्यावरून आणि क्वचित खांद्यांवरून जात होते. त्याचे पंख काही फार भपकेदार किंवा शोभिवंत नव्हते. ते फिके तलम पिवळे होते. स्टेशनातल्या झाकोळल्या, विटक्या वातावरणात हे पिवळे; उघडझाप करणारे, वरखाली नाचणारे गोजिरवाणे पंख एखाद्या स्वप्नासारखे भासत होते. मध्येच, आलेल्या एका लोकलमध्ये ते गर्दीबरोबर शिरले. वाटले की चेंगरणार— चुरडून निकालात निघणार ! किंचित्काळ आंधळ्या गर्दीच्या त्या रेट्यात त्याचे काहीही दिसले जाणवले नाही. क्षणकाल, वाढलेल्या त्या प्रचंड कोलाहलात त्याचे नाजूक अस्तित्व पार—पार हरवून गेले. मग गर्दी जरा स्थिरावली. कोलाहल उतरला. आणि गंमत म्हणजे एका खिडकीवाटे ते फुलपाखरूही गांगरल्या भेदरल्या गतीने कसेबसे धडपडत बाहेर येऊन गाडीच्या छतावर धाप घालीत स्थिरावले. तिथे बसून जणू ते त्याने अनुभवलेल्या प्रलयाचा स्तिमित विचार करीत होते. त्याचे दुखावले पंख निश्चल होते. आठवणीसरशी थरकापत होते. गाडी सुटली तरी त्याच्या पंखांना गती आली नाही. गाडी चांगली सहाआठ हात दूर गेली तशी झाडाचे पान सुटून तरंगत खाली पडावे तसे ते गाडीपासून सुटले आणि फलाटावरच्या एका म्हाताऱ्याच्या हॅटवर जाऊन बसले. तो पिकला, विटका म्हातारा त्यासरशी जणू टवटवला. म्हणजे बाकी तो तसाच त्याच्या चिंतेतच बुडून राहिला, पण हॅटवरच्या फुलपाखराने जणू त्या विटक्या खोडावर फूल उमलले ! त्या गर्दीतही दोघाचौघांचे लक्ष या दृश्याने वेधून घेतले.

किंचित्काळाने हे पिवळे फूल म्हाताऱ्याला सोडून उडाले आणि त्याने लगतच्या लठ्ठ काळ्याकुट्ट खिरिस्तावणीच्या खांद्याचा आश्रय घेतला. निमिषात ते तिथूनही उडाले आणि आणखी पलीकडच्या चष्मेवाल्या प्रौढ कुमारिकेच्या पर्सवर अल्लद स्थिरावले. ही प्रौढ कुमारिका हे पाहताच कुणाचे प्रेम झटकावे तशी पर्स गडबडीने झटकून बाजूला सरली. प्रेम उडत फडफडत दोन मध्यमवयस्क कारकुनांमधून एका सरदारजीला टाळून गांधीटोपीवाल्या एका वेपाऱ्याच्या अंगावर जाऊन आपटले आणि जणू गडबडीने 'सॉरी' म्हणून दिशा बदलून दोन फलाटांमधील खिंड ओलांडून कुणास ठाऊक कुठे निघून गेले. कारण तेवढ्यात नवी गाडी आली. नवा गोंधळ उसळला. माणूस माणसाला त्यात ओळखत नव्हते तर त्या यःकश्चित फुलपाखराची चौकशी कोण करणार ?

काही का असेना, थोडा वेळ चर्चगेट स्टेशनात त्या वेड्या फुलपाखराने मोठी गंमत केली एवढे खरे ! पाहिली फारशी कुणीच नाही. उसंत कुणाला ?

# प्रेम

क्रिकेट आणि मीनाकुमारी यांची लज्जत काही न्यारीच, असे माझा एक रसिक मित्र म्हणतो. या दोन्ही गोष्टी त्याने लांबून पण तासन् तास, अगदी देहभान विसरून पाहिल्या आहेत. यांचा तो वेडाच आहे. अलीकडे दोहोंतही पूर्वीची गंमत उरली नसल्याचे तो कुरकुरत असतो; पण परवाच्या रविवारी मुंबईतल्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर जमलेल्या चाळीस हजार लोकांचा माझ्या मित्राशी अर्धा मतभेद दिसत होता. पश्चिम विभाग विरुद्ध दक्षिण विभाग यांच्यातल्या रंगलेल्या क्रिकेट सामन्यासाठी या चाळीस हजारांनी स्टेडियमवर अक्षरशः धमाल उडवली होती. मुंगी रिघायला जागा नव्हती. तिकीट ऑफिसपाशी तोबा गर्दी उडाली होती आणि तिथली रांग पार चर्चगेट स्टेशनपर्यंत पोचली होती ! सामना पहाण्यासाठी तासभर आधी जाऊन मी रांगेत उभा राहिलो तेव्हा लौकरात लौकर सुमारे चार एक तासांत मला तिकीट मिळण्याची अस्पष्ट आशा होती. पण तेवढ्यात मला ओळखणारा एक तरुण मुलगा भेटला. आपला गुटगुटीत बांधा डौलाने मिरवीत, कोवळ्या पण आकडेबाज मिश्यांवर ताव मारीत तो माझ्या समोरून चालला होता. मला पाहून त्याने आदरयुक्त किवेने माझी चौकशी केली आणि रांगेतून बाहेर काढून, तिकीट हपिसपुढल्या भयानक अराजकात जाऊन घुसून सुमारे पंधरा मिनिटांत दोन चुरगळलेली चिटोरी त्याने पैदा करून आणली. ही तिकिटे होती. एक दीर्घ श्वास घेऊन गुटगुटीत अंगातली सर्व हाडे मोडीत तो म्हणाला, तिकिटे मिळाल्यावर गर्दीतून बाहेरच पडू देईनात. श्वासदेखील घेता येईना. अखेर सर्वांच्या पोटांना गुदगुल्या करीत वाट काढली. यात एक बाई होतीसे वाटते. पण मी तरी काय करू ? बाहेर तर पडायला हवे होते. पोटांना गुदगुल्या केल्याशिवाय गर्दीतून मुळी बाहेर पडू देत नाहीत !

मग आम्ही नव्या गर्दीत घुसलो. ही गर्दी तिकिटे न मिळाल्याने तसेच मैदानावर घुसणारांची होती. त्या गर्दीबरोबर आम्ही आवाजांच्या आणि माणसांच्या एका प्रचंड कोलाहलात जाऊन पडलो आणि काही क्षण त्यातच खोल खोल बुडतो आहोत असे वाटले. माझ्या तरुण मित्राच्या आधाराने मी कसाबसा तरलो.

मैदानावर खेळ सुरू झाला तशी भोवताली प्रेक्षकांच्या तुफान गर्दीत खाण्याबोलण्याचा आणि ट्रान्झिस्टर्स ऐकण्याचा एक वेगळाच खेळ चालू झाला. दोन्ही खेळ बरोबरच चालू राहिले. खेळ रंगू लागला तशी आमच्या अंगावर वेफर्सच्या पाकिटांचे चुरगळे, केळ्यांच्या साली, सिगरेटची जळकी थोटके असे काही काही येऊन पडू लागले. माझा तरुण गुटगुटीत मित्र हे शिताफीने चुकवीत किंवा अंगावरून झाडीत मैदानावरल्या खेळाचे रसग्रहण करीत होता. मला हे तितकेसे जमत नव्हते. एकदा तर मी चिडून उठलो तेव्हा तरुण मित्र मला बसवीत म्हणाला की हे नेहमीच चालते. एवढ्याने डोके गमावून कसे चालेल ?

भोवताली अनेक माणसे क्रिकेटच्या जुन्या हकीकती आणि या सामन्याचे भूत-वर्तमान-भविष्य एकमेकांना एका वेळी ऐकवीत होती. खेळाडूंबद्दल ते आपले कुणी भाचे-पुतणे असल्यासारखे घरगुती उल्लेख सर्रास चालू होते. मैदानावर खेळणारांसाठी अस्खलित मार्गदर्शनही काही जण ओरडून ओरडून करीत होते. त्यात मधूनच एकदोन भांडणे आणि मारामाऱ्या पेटल्या आणि विझल्या. मागे दोघेजण एकमेकांना रुची घेऊन अश्लील का कसले ते चुटके ऐकवीत होते. एकजण बिगुल वाजवीत होता. तेवढ्यात एक गडी बाद झाला त्याची अनेकांनी वेचीव बीभत्स शब्दांत निर्भत्सना केली. म्हणजे त्यातले दोनचार शब्द त्याने ऐकले असते तर तो नक्कीच बॅट उगारून उठला असता ! माझा मित्र म्हणाला की हे या मंडळीचे त्या खेळाडूवरचे प्रेम आहे. इथे प्रेम हे असेच व्यक्त होत असते. आणि ज्या अर्थी आपण हाणामारीने तिकिटे काढून मॅच बघायला येतो त्या अर्थी चांगले खेळणे हे प्रत्येक खेळाडूवर बंधनकारक धरण्यात येते. जो कसूर करील त्याची, घरच्या गड्याने रजा घ्यावी म्हणजे त्याची होते तसली निर्भत्सना केली जाते. मंद खेळ खपवून घेतला जात नाही. चपला, जोडे मैदानात फेकण्यात येतात. शिव्यांच्या लाखोल्या वाहिल्या जातात. क्वचित मालमत्तेची मोडतोडदेखील होते. तिकिटाचे पैसे कसेही वसूल करून घेणे हा आपला हक्क आहे असे पब्लिक मानते.

मला फार वेळ तिथे बसवले नाही. माझ्या तरुण मित्राचा ओझरता निरोप घेऊन मी स्टेडियमबाहेर आलो तेव्हाच जरा हलके आणि बरे वाटले. मला निरोप देतानाचा त्याचा नवलयुक्त चेहरा मला अजून आठवतो. इतका रंगलेला सामना आयता पाहायला मिळत असता हा माणूस चालता काय होतो ते त्याला कळले नसेल.

आमच्या काळी आम्हीही क्रिकेटपटूंवर निहायत प्रेम केले. आम्ही त्यांना 'हीरो' मानले, देव मानले. आजचे प्रेम वेगळे आहे. घरच्या गड्यासारखी किंवा दारच्या कुत्र्यामांजरासारखी खेळाडूची निर्भत्सना आणि विटबंना करणारे. तिकिटाचे पैसे भल्याबुऱ्या मार्गाने 'वसूल' करणारे. व्यवहारी, जुलमी, उग्र, प्रसंगी अचकट विचकट.

थोडक्यात, राक्षसी प्रेम.

# पुरुषोत्तम

त्याला रबर मॅन ऑफ इंडिया म्हणतात असे कळले. गेल्या शुक्रवारी संध्याकाळी मुंबईच्या पोद्दार कॉलेजच्या सभागारात एका कार्यक्रमात हा रबर मॅन काळा झगा पांघरून रंगमंचावर येऊन उभा राहिला. झगा काळा आणि माणूसही काळा. मग त्याने आपण भारताचे रबर मॅन का आहोत ते आता प्रत्यक्षच पाहा असे जणू आव्हान प्रेक्षागारात फेकून त्याबरोबरच झगाही काढून विंगेत फेकला आणि त्याचा तेल माखलेला तुकतुकीत लवचिक बांधेसूद देह सर्वांसमोर उघडा उभा राहिला. सर्कसमधले कसरतबाज पहेनतात तसली अंगासरशी तंग पांढरी तुमान आणि तिच्यावर झिरमिळ्यांची रेशमी रंगीत आखूड हनुमान-चड्डी. वरच्या अर्ध्या अंगावरचा प्रत्येक स्नायू प्रेक्षागारातून डोळ्यांनी चाचपून घ्यावा इतका रेखीव. स्त्री-प्रेक्षकांच्या तोंडून उत्स्फूर्तपणे 'स् स् स्' 'ए अय्या' असले थक्क उद्गार पटापट उमटले. पण खरे थक्क होण्याजोगे त्यापुढेच होते; एकाएकी त्या रबरपुरुषोत्तमाने हवेत वेडीवाकडी पण हिशेबी उडी घेऊन दोन पाय हवेत फाकवून दणाण्दिशी स्वतःला रंगमंचाच्या भुईवर हापटून घेतले. आवाजावरून वाटले की किमानपक्षी दोनचार फ्रॅक्चर्स नक्कीच. पण काहीही झाले नव्हते. बिलकुल न थांबता तो आता अधिकाधिक अवघडपणे आणि लीलेने स्वतःला पुन्हापुन्हा वेडेवाकडे हापटून घेत राहिला. वर मुद्रेवर एक स्मित; वाहव्वा, मजाच येते आहे थाटाचे. आता पुरुष प्रेक्षकांचीही तोंडे उघडी पडली. तेवढ्यात त्याने भराभरा खाली वाकून, सरपटी झोपून, उभे राहून स्वतःच्या तगड्या शरीराची हरप्रकारची गुंतागुंत करून घेण्याला सुरुवात केली. दोन पायांतून दोन हात बाहेर काढून त्यांनी कान पकडले, दोन्ही पाय हातांमधून डोक्यामागे गळ्यात घेऊन झोके घेतले आणि शीर्षासनदेखील घातले, एक एक पाय गळ्यात घेऊन आपल्याला

पद्मश्री वगैरे मिळाल्यासारखा लोकांना सलाम केला, ताठ उभे राहून प्रत्येक पाय न दुमडता वर करून कपाळावर तडाड्दिशी मारून दाखवला. या अजब माणसाचे हात कुठले आणि पाय कुठले हेही कळू नये असा स्वतःचा गुंता करून तो सहास्य मुद्रेने प्रेक्षकांना वारंवार सलाम करीत होता आणि टाळ्यांचे प्रचंड कडाकडाट झडत होते. हे सगळे असे वेडेवाकडे गुंतून पुन्हा तो रबर-पुरुषोत्तम पूर्ववत दोन हात जागच्या जागी आणून दोन वेगवेगळ्या धडक्या पायांवर डौलदार सहजपणे उभा राही हे आणखीच कौतुक ! कारण शरीराने काय किंवा मनाने काय, गुंतणे एक वेळ सोपे पण मोकळे होणे महाकठीण ! ते खरे कठीण !

हां हां म्हणता त्याने समस्त आबालवृद्ध स्त्रीपुरुष प्रेक्षक जिंकून टाकले. तुमच्या-आमच्या खांद्याखाली सरकणे अशक्य अशा एका लोखंडी'कड्यातून त्याने त्याचे सगळे अंग एका बाजूने सरकवून दुसऱ्या बाजूने बाहेर काढले. ते तरी कसे ? कपाळावर जळती मेणबत्ती ठेवलेले ग्लास अल्लद सांभाळून ! याने तर प्रेक्षकातल्या अगदी संशयी बुद्धिवाद्यांच्यादेखील दांड्या घेतल्या.

तरीही संपले म्हणता ? छट् ! आपला रबरी पुरुषार्थ त्याने अगदी एकशे एक टक्के संशयातीतपणे सिद्ध करण्याचाच चंग बांधला असावा. यानंतर त्याने दोन कडी घेतली, ती दोन पायांतून वर घेतली, आणि त्या दोहोंना एकत्र आणून मध्ये तयार झालेल्या निरुंद फटीतून पुन्हा उलटे मस्तकापासून सगळे तगडे अंग पलीकडे सरकवून दाखवले ! मस्तकावर जळती मेणबत्ती ठेवलेले ग्लास कायम, बरे ! ते तर कायमच !

निवडणुकांना तो उभा असता तर त्या क्षणी उपस्थित तमाम प्रेक्षकांनी त्याला लोकसभेसाठीदेखील निवडून दिला असता यात शंका नाही, इतके प्रेक्षक त्याच्या अचाट कसरतीवर आता खूष होते. सगळे प्रेक्षागृह जणू त्याच्या पायाशी लोळण घेतल्यासारखे वेडेखुळे आणि नम्र होऊन गेले होते.

मग त्याने प्रेक्षकांतल्या सहा तगड्या माणसांना विनंती करून रंगमंचावर बोलावले. पंधरा-वीस वेळा दम कसून छाती तटतटून तट्ट फुगवली. गळ्याचे स्नायू फुगवले. त्याचे ते चौफेर फुलून आलेले भरदार, शक्तिमान उघडे शरीर पाहताना श्वास अडले. मग त्याने गळ्याभोवती एक दोरखंडाचा वेढा दिला आणि त्याचे एकेक टोक तिघातिघांना दोन बाजूंना उभे करून त्यांच्या हाती दिले आणि सांगितले, मी एक टाळी मारली की ओढा ! जीव खाऊन ओढा ! ओढवेल तितके जोराने ओढत रहा ! मात्र मी दुसरी टाळी मारली की थांबा. त्याने एक टाळी मारली. दोरखंड त्याच्या फुगल्या गळ्याभोवती करकचून आवळले गेले. दोन्ही बाजूंनी एका वेळी खेचले जात राहिले. त्याच्या ऐवजी आपलेच नरडे आवळले जात असल्यासारखेच पाहणारांना अगदी कासावीस व्हायला झाले. त्याने दुसरी टाळी मारली. गळफास ढिला झाला. तो सोडवून तो स्मितमुद्रेने म्हणाला, कसली ही तगडी माणसे ? मला काही जाणवलेच नाही.

केवढा शक्तिशाली माणूस ! वर रबराइतका लवचिक आणि चपळ ! वहाव्वा ! हा खरा पुरुषोत्तम ! हा खरा मॅन ! आणि प्रेक्षकांसमोर तसाच डौलाने उभा राहून तो बोलू लागला. तो

म्हणाला की आपल्याला पोटासाठी कष्ट करावे लागतात. आपण गरीब आहोत. या कलेत आणखी प्रगती करण्याची इच्छा आहे पण पैसे नाहीत. परदेशात आपली कला दाखवून भारत देशाचे नाव उंचावण्याची आपली योजना आहे पण त्यासाठी पैसे हवेत. तरी मायबापांनी आणि भावाबहिणींनी जी शक्य असेल ती मदत—चार आण्यांपासून चारशे रुपयांपर्यंत काहीही आनंदाने स्वीकारण्यात येईल—रंगमंचावर कृपया आणून द्यावी. आपण त्यासाठी इथे उभे आहोत. मदत करा !

अरे अरे अरे ! ही तर आम्ही हरघडी, या ना त्या कारणाने, अशी ना तशी करतो ती, आम्हांला करावी लागते ती कसरत ! ही आमची कसरत ! तो रंगमंचावर डौलदारपणे नम्र होऊन उभा असलेला रबर मॅन ऑफ इंडिया त्यासरशी आम्हांला आमच्यासारखा कॉमन मॅन ऑफ इंडिया वाटला आणि सगळा—सगळा मजा गेला ! शक्तीच्या एकेका अजब प्रयोगाने तिथल्या तिथे भराभरा आमच्या लेखी वाढत गेलेला त्याचा आकार आटून एकदम आमच्या सायझीत आला ! रंगमंचाशी नोटा-नाणी धरून रांगा लावलेल्या उत्साही सर्वसामान्य प्रेक्षकांपेक्षाही तो पुरुषोत्तम मग लहान आणि सामान्य वाटत होता.

हो, अगदी पुरुषोत्तम झाले तरी त्यांना अखेर सर्वसामान्य मानवी गरजा आणि अपेक्षादेखील असणारच. पण त्यांचे असे उघडे-वाघडे प्रदर्शन तरी दिसू नये.

अरे शेवटी हीही माणसे याचना करताना दिसू लागली तर ताठ राहिले काय ?

# 'रसिक'

हवेत मस्त गारठा असावा. बाहेर पिठूर चांदणे. दुसऱ्या दिवशी सुट्टी. आणि रात्र जागवायला समोर रसीली मैफल आपल्या एखाद्या आवडत्या गायकाची.

परवा रात्री हे सुखस्वप्न अक्षरशः साकार झाले. जमलेल्या श्रोत्यांतले कुणी तरी म्हणाले, आजचा ना, अगदी मणिकांचन योग आहे ! मला हे पुरेपूर पटले. जमलेल्या भरपूर श्रोत्यांचे चेहरे कसे निश्चिंत, बिनघोर, तुस्त आणि प्रफुल्लित वाटत होते. मुंबईत दिवसाअखेरी माणसे अशी दिसणे एरवी अशक्य. नाट्यगृहात, गाण्याच्या मैफलीत, सभेत, उत्सवात सुंदर सुंदर कपड्यांतले देह बघावे तर मरगळलेले आणि चेहरे ओढलेले. त्या रात्री वाटले की एक कॅमेरा असता तर भोवतालच्या या ओसंडत्या खुषीचे आणि प्रसन्नतेचे फोटो तरी काढून ते घरी लावले असते ! ठेवणीतले गरम उबदार कपडे अंगाअंगावर शोभत होते. उभ्या उभ्या गप्पा आणि हास्यविनोद रंगत होते. मने अगदी हलकीफुलकी आणि टवटवीत भासत होती.

अशा वेळी कार्यक्रम जणू ही मुक्त खुषी आणखी थोडा वेळ अशीच मुक्तपणे व्यक्त होऊ द्यावी या अनावर मोहानेच की काय, थोडासा उशिरा सुरू होतो. तसा उशिराच कार्यक्रम सुरू झाला आणि बघता बघता रंगला. गाणारा हुरहुन्नरी आणि तडफेने गाणारा. ऐकणारे आसुसून स्वरांचा आणि सुरावटीचा तो वर्षाव झेलणारे. मग रंगतीला काय पार ? प्रहर रात्र कधी उलटली, बारा कधी वाजून गेले कुणाला कळलेच नाही. गवईबुवांनी कलावतीतली चीज संपवली तेव्हा साडेबारा वाजून जात होते.

स्वरांची धुंदी पुरती चढलेला तो गायक आता पुरता खुलला होता. सारी रात्रदेखील तो आता

चढत्या रंगतीने गाऊ शकला असता. मैफलीचा पूर्वरंग कुठे आता संपत होता. आणि काय झाले, श्रोत्यांत एकाएकी चुळबुळ सुरू झाली. मनगटी घड्याळे पाहिली जाऊ लागली. चोरट्या खाणाखुणा आणि कुजबुज होऊ लागली. एवढा वेळ संगीताच्या किमयेत विरघळून गेलेले एकेक चेहरे व्यवहारी आणि कसल्या तरी घोरात दिसू लागले. अधलेमधले कुणी कुणी बैठक सोडूनदेखील जाऊ लागले. कुणी अर्धवट उठून पुन्हा बसत होते. कुणी सरकत नजीकच्या दाराजवळची जागा जाऊन व्यापली. गवईमहाराजांनी पुढची चीज सुरू केली पण श्रोते काही आता पहिल्यासारखे त्या वर्षावात स्वतःला हरवून घ्यायला तयार नव्हते. मैफल उघड उघडच विस्कटली होती.

म्हणजे दुसरे तिसरे काही घडले नव्हते, शेवटच्या लोकल गाडीची वेळ होत आली होती ! त्या बैठकीसाठी उपनगरातून आलेल्या श्रोत्यांना याचे स्मरण झाले होते आणि अनेकांचे चित्त होते रेल्वे स्टेशनावर. आणखी अनेकांचे मन गाणे आणि शेवटची लोकल यांत द्विधा झालेले होते. कुणाकुणाला शेवटच्या लोकलने जाण्याची घाई नव्हती; पहाटेच्या पहिल्या लोकलच्या



तयारीनेच ते गाण्याला आले होते. पण तरी शेवटची लोकल त्यांना एरवीच्या सवयीने अस्वस्थ करीतच होती. आणि हे सगळे मिळून उरलेल्या केवळ गानमग्न श्रोत्यांचा चांगलाच रसभंग—अजाणताच—करीत होते. पुढल्या चिजेनंतर सभागृहाचा मागला भाग बराच रिकामा झाला होता. कुणी लोकलमध्ये असावेत, कुणी खाली आवारात चांदण्यात सिग्रेटी ओढीत राजकारणाची कोरडी, गंभीर चर्चा करीत होते, आणि कुणी कॉफीच्या कॅण्टीनशी कॉफी घेत व्यावसायिक, सांसारिक गप्पा करीत कोरड्या जांभया देत होते. मघा मैफलीच्या आरंभी पाहिले ते प्रफुल्ल, प्रसन्न, तुस्त चेहरे ते हेच का ? असा प्रश्न पडत होता. आणखी एका



ठुमरीनंतर सभागृह चांगले निम्मेअधिक ओस झाले.

मीही मग बाहेरच रेंगाळत राहिलो. सभोवती सुंदर चांदणे आणि मनात विस्कटल्या मैफलीचा विषाद होता. सुंदर जमलेल्या मैफली विस्कटाव्यात का, असा प्रश्न आत आत कुणी तरी एकसारखे विचारीत होते. कुणास ठाऊक असा किती वेळ गेला ! दोन-अडीच वाजले असावेत. केव्हा तरी वरच्या सभागृहात चालू असलेले एका जुन्या नाटकातले सुंदर गीत मला बोलावू लागले. ओढल्यासारखा मी वर गेलो. सज्जातून बैठकीच्या अग्रभागाला समांतर जाऊन उभा राहिलो आणि काय सांगू. आतले दृश्य विलक्षण होते.

आत गवई आणि त्याच्या साथीदारांसमोर छोटेसे कडे करून जेमतेम पंधरावीसच श्रोते गर्दीगर्दीने मांड्या ठोकून बसले होते. मांडीवर पुढ्यात, बाजूला पानाच्या चंच्या, टोप्या, हातात धरायच्या आडव्या ठेवलेल्या काठ्या होत्या. आणि मुद्रांवर सीमेची बेहोषी. समोर उमटणाऱ्या

सुरावटीच्या एकेका उन्मेषासरशी, अंगावरून गंगेचा ओघ जावा तसे ते मूठभरच धुंद जीव एका वेळी शहारत होते, गहिवरून येत होते, थरथरत, लवत, स्फुरत, गुदमरत आणि उसळत होते. डोलत होते. डोळे कधी तृप्तीने झाकलेले तर कधी उघडे असून एका बेहोषीने आंधळे झाल्यासारखे. तोंडे अभावितपणे सुपाऱ्या, तमाखू, विडे चघळीत होती पण आस्वाद मात्र घेतला जात होता केवळ सूरब्रह्माचा. समेसमेवर एकसाथ कासावीस दाद उठत होती. स्थळकाळाचे, देहाचेदेखील भान विसरलेल्या त्या मूठभरच संगीत-वेड्यांपुढे तो गवईदेखील तितकाच धुंद, बेबंद, पिसाट होऊन गात होता. वाटले की या अवाढव्य, भगभगीत सभागृहाच्या एका कोपऱ्यात शरीरांनी बसून ही मंडळी सुरांच्या एका अफाट, अद्‌भुत, स्वर्गीय अरण्यात आत्म्यांनी कुठल्या कुठे हरवली आहेत. त्यांच्या लेखी या वेळी दुसरेतिसरे काही शिल्लकच नाही ! ते स्वतःदेखील नाहीत. फक्त सुरांचे ते मंतरलेले रान !

तसे थरारून टाकणारे काही मी क्वचितच पाहिले असेल. स्वतःची,स्वतःसारख्यांची लाज वाटली. वाटले की आम्ही किती झालो तरी लहानच माणसे. शेवटच्या गाड्या, सांसारिक घोर, देशातली आणि कचेरीतली राजकारणे आणि व्यवहार आम्ही कसल्याही मोठ्या आणि उच्च आनंदासाठी पुरता विसरूच शकत नाही. त्याचे भान कुठेतरी सतत राहाते आणि पुन्हा आम्ही नको तेव्हा व्यवहारातच येऊन पडतो. सगळा विरस होतो. स्वतःला कलेच्या ब्रह्मानंदात भिरकावून देणारे, देहभान आणि दिवसरात्र विसरून केवळ कलानंद जगणारे हे खरे रसिक. हे खरे साधक. आणि आम्ही ?



आम्ही प्रपंचाच्या सडकेने धावता धावता वाटेतल्या कलेच्या देवापुढे वहाणा काढून घाईघाईने 'एक नमस्कार करून स्वतःभोवतीच प्रदक्षिणेची गिरकी घेऊन तोंडात चापट्या मारून घेत पुन्हा प्रपंचाची मळलेली वाट पकडणारे मामुली लोक. आमची कलेची भक्ती ही इतकीच.

त्या रसिकांपुढे मी नम्र झालो; वहाणा चढवल्या आणि मनोमन तोंडात चापट्या मारून घेत घरची वाट धरली.



# रहस्य

रहस्ये पुष्कळच असतात पण असे रहस्य आपण तरी यापूर्वी ऐकले नाही !

एका घरी प्रथमच गेल्या रविवारी सकाळी जाण्याचा प्रसंग आला. ते गृहस्थ होते तसे तरुणच. राजकीय क्षेत्रात चांगले नावारूपाला येत असलेले आणि कर्तबगार. कुणीतरी माझे दाराआडून स्वागत केले आणि दिवाणखान्यात बसायला सांगितले. बहुधा ती त्या गृहस्थाची पत्नी असावी पण दाराआड लपलेला चेहरा मला दिसलाच नाही. मी दिवाणखान्यात जाऊन बसलो. मग ते गृहस्थ देवपूजा उरकून बाहेर आले. मी त्यांना माझे काम सांगितले. त्या कामासंबंधातच आम्ही बोलत असताना मध्येच उठून ते गेले आणि पोह्यांनी भरलेल्या दोन बश्या घेऊन बाहेर आले. ते खमंग पोहे खात आम्ही बोलू लागलो तर पुन्हा उठून ते गेले आणि थंडगार पाण्याचे ग्लास घेऊन बाहेर आले. पोहे खात, पाणी पीत आमचे बोलणे रंगले. पोहे संपवून मी बशी खाली ठेवली. पुन्हा मध्येच उठून ते आत गेले आणि आणखी पोहे घेऊन आले. आग्रह करकरून मला त्यांनी आणखी पोहे खायला लावले. मग मध्येच ते उठून आत गेले आणि वाफ ओकणाऱ्या गरम गरम चहाचे कप घेऊन आले. आम्ही चहा घेतला. पुन्हा बोलणे रंगले तो मध्येच 'एक मिनिट' म्हणून ते आत गेले आणि मसाल्याच्या सुपारीची डबी घेऊन बाहेर आले. मी सुपारी खाल्ली. ती चघळीत बोलतच राहिलो. मग मात्र ते लौकर आतबीत गेले नाहीत. आमचे बोलणे संपते तर दाराची घंटी वाजली. आणखी माणसे त्या गृहस्थांकडे भेटायला आली त्यातच नळाचे काही काम करण्यासाठी प्लंबर आला, वर्तमानपत्रांचे बिल नेण्यासाठी पेपरवाला दाराशी आला. बघता बघता मघा निवांत वाटणारे ते घर अंतर्बाह्य गजबजले. ते गृहस्थ दिवाणखान्यातल्या प्रत्येकाशी बोलत होते आणि नेमक्या वेळी

स्वयंपाकघरात जाऊन चहा, पोहे असे काही काही हाती घेऊन लगेच बाहेर येत होते. मला तिथे बसल्या जागी नवल वाटत होते, आत कधी आपली गरज आहे हे यांना कुणी हाकबीक न मारता, 'अहो, ऐकलेत का', 'जरा येता का' असे कुणी न हाकारताच इथे बाहेर कळते तरी कसे काय ? कावळ्याच्या नजरेने मी आतल्या दाराशी एकसारखा पाहत होतो, पण तिकडून कुठल्याही खाणाखुणा घडत नव्हत्या की पायरव नव्हता. तिथे मुळी कुणी येतच नव्हते.

मग मला निघावे लागले. मनाशी अचंबा करीतच मी घरी आलो. आणि दोन दिवसांनी पुन्हा गेलो तर पुन्हा पहिल्या खेपेसारखे घडले. पट्दिशी ते गृहस्थ हाक ऐकावी तसे बोलणे अर्धे सोडून आत जात, परत येत. हाक मात्र कुणाचीही ऐकू येत नसे. नंतर ते गृहस्थ जेवले. आम्ही दोघे एकदमच बाहेर पडलो. जिना उतरून दोघे गडबडीने खाली येतो तर मध्येच ते गृहस्थ थबकले. मला म्हणाले, एक मिनिट थांबा हां, जरा वरून जाऊन आलो. आणि घाईने पुन्हा परत बिऱ्हाडी गेले आणि किंचित्काळात परत आले. म्हणाले, गडबडीत जेवणानंतरचा विडा विसरलो. त्यासाठीच बोलावले.

बोलावले ? कुणी ? मी उत्सुकतेने विचारले.

ते हसत म्हणाले, अहो कुणी म्हणजे ? आमच्या हिने. तिनेच हाक मारलीन.

मी म्हटले, हाक ? ऐकू नाही आली !

ते गृहस्थ मनापासून हसू लागले. मिष्किलपणे म्हणाले, हाक फक्त माझ्यासाठीच होती तर ती तुम्हांला काय म्हणून ऐकू येईल ?

मी म्हणालो, हे बघा, उगाच नसत्या गूढात टाकू नका बुवा आम्हांला. हाक फक्त तुमच्यासाठी असली म्हणून काय झाले ? कुणालाही ती ऐकू येईल. बोलूनचालून हाक ती ! थोडी तरी मोठ्यांदाच मारलेली ! पण मला तर काहीसुद्धा ऐकू आले नाही.

विडा चघळीत ते म्हणाले, पुन्हा याल तेव्हा लक्ष देऊन असा.

मग मात्र पुन्हा काल केवळ एवढ्यासाठीच गेलो. आणि रहस्य सापडले ! काय असेल, सांगा. आतून काम निघालं ना, की एक अगदी तलम आणि हळुवार 'स्' उमटायचा.

बस्स. 'अहो' नाही, 'ऐकलेत का' नाही, नावाने हाका नाहीत, भांड्यांची सूचक आदळआपट नाही की खुद्द बैठकीत येऊन नाक खुपसणे नाही.

आतून फक्त—स्... !

आणि ही एवढीच हाक त्या गृहस्थांना कशी नेमकी आणि अचूक समजायची, बघा. अर्ध्या जिन्यातूनही एवढ्या हाकेने हा गृहस्थ परत वर बिऱ्हाडी धावत गेला होता ना !

आपल्याला हेवा वाटला. नाही, घरी आमचेही तसे काही वाईट नाही, आहे चारचौघांसारखे; पण ही इतकी हळुवार हाक आमच्या भाग्यात नाही ! नुसती हळुवार नव्हे, तर काव्यात्म, खूप खासगी, अगदी रहस्यमय !

स्...

तेव्हापासून घरात कानीकपाळी ओरडतो आहे, हाक माराल ती नुसती...स्स् अशी मारा. पण हाक मारणारी काय करणार, दहादा स्स्स्स्स्स्स्स् केले तरी आपल्या धांदलीत-गडबडीत ते ऐकूच येत नाही !

आम्हांला मारायची हाक कशी उंच आणि ठसठशीतच हवी. अशा अनेक हाका ऐकाव्यात तेव्हा कुठे आम्ही एकदा जागचे हालायचे. आमची हीच सवय. पण वाटते, नव्याने तरुण व्हावे, लग्न करावे, संसार मांडावा आणि केवळ या हलक्या, हळुवार, मजेशीर हाकेची चव घेत, सवय करीत पुन्हा जगावे.

स्स्...

# सर्प-शृंगार

सर्पाचा शृंगार तुम्ही कधी पाहिला आहे ? मी तो पाहिला ! लोक सांगतात तो फार क्वचित पाहायला मिळतो. मला तो पाहायला मिळाला आणि तोदेखील मुंबईतच !

त्याचे वर्णन करण्यापूर्वी, हे जमले कसे ते थोडक्यात सांगतो. मुंबईत पेडर रोडला फिल्म डिव्हिजनच्या कचेऱ्या आहेत. भारत सरकारच्या वतीने माहितीपट आणि आणि वृत्तपट तयार करणाऱ्या येथल्या कलावंतांचे आणि तंत्रज्ञांचे एक चर्चामंडळ आहे. या मंडळापुढे दर आठवड्यातून एकदा एकेका निर्मात्याचे काही माहितीपट दाखवण्यात येतात आणि त्यावर चर्चा घडवली जाते. गेल्या शुक्रवारी संध्याकाळी या मंडळापुढे 'आफ्टर द इक्लिप्स' आणि 'माइल्स टु गो' कर्ते सुखदेव यांचे काही माहितीपट दाखवून त्यावर चर्चा करण्यात आली. स्वतः सुखदेव हजर होते, चर्चेत भाग घेऊन आपल्या चुरचुरीत, चटपटीत, क्वचित बोथट पण मनमोकळ्या हजरजबाबी उत्तरांनी त्यांनी मोठीच मजा आणली. सर्पाच्या शृंगाराचा विषय आज नसता तर सुखदेव यांची काही तितकीच तल्लख उत्तरेदेखील इथे देण्यासारखी होती.

सुखदेव यांचे जे तीन माहितीपट दाखविण्यात आले त्यांतल्या 'वन्य जीवना'वरच्या माहितीपटात हा सर्प-शृंगाराचा विरळा 'सीन' अगदी जवळून पण त्या अजब शृंगारात मुळीही व्यत्यय न आणता चित्रित करण्यात आला होता.

या शृंगारिक दृश्याला सेन्सॉरनी कात्री लावली नसेल तर तो त्या मंडळीचा भलताच समंजसपणा. कारण हा शृंगार मनमोकळा तर आहेच पण शिवाय 'अनैतिक'देखील आहे—दोन नर आणि एक मादी यांचा हा शृंगार. नुसताच प्राथमिक नव्हे तर परिपूर्ण !

माणसांचे नीतिनियम सर्पांना लागू नाहीत. जंगलातले नीतिशास्त्र काही वेगळेच आहे. त्याचे मनुष्य जमातीवर कोणते अनिष्ट परिणाम होतील याचा विचार ती मंडळी करीत नाहीत. कारण विचार आणि मनुष्यजात या दोहोंचे त्या जीवनाला वावडे आहे. सुखदेव जंगलात घुसून कुठे तरी दंडी मारून बसले आणि चुकून त्यांना हा विरळा, मुक्त शृंगार कॅमेऱ्यात पकडता आला.

पिवळ्या-हिरव्या गवतातून मनातल्या दुष्ट विचारांसारखे हे तीन प्रणयी जीव वळवळत येताना प्रथम दिसले. आधीच्या दृश्यांना दिलेले पार्श्वसंगीत यासरशी संपूर्णपणे थांबवण्यात आले आणि पूर्ण निःस्तब्धतेत या तिघांच्या एकसारख्या, प्रवाही, समांतर हालचालींनी छातीत भयाची एक चमक उठली. दोन किंचित हिरवट करडे आणि एक पिवळसर त्वचेचा. तिघांचीही लांबी भरपूर. उपमेत सांगायचे तर वाद्यमेळातल्या तीन वाद्यांच्या सुसंगत सुरावटींसारखे हे तिघे पुढे सरकत होते.

मधूनच तिघेही फडा काढून उंच होत आणि तशी पुढे पुढे जात. परंतु ही फडा उग्र वाटली नाही. तिच्यात प्रतीत होत होती एक धुंदी, मस्ती. पुढे सरकतानाच तिघे एखाद्या नवविवाहित युगुलाप्रमाणे मुद्दाम आणि एका उत्कटपणे एकमेकांच्या अंगाला अंग घास होती, कुरवाळत होती, बिलगत होती, इतक्या हळुवारपणे की त्यांचा विखार जणू त्यांच्या हालचालीत उतरला होता !

मग तिघेही एकदम सुस्तावल्यासारखी झाली.. त्यांची प्रत्येक हालचाल अर्धजागृतावस्थेत व्हावी तशी होऊ लागली. आळीपाळीने दोघे दोघे एकमेकांना आलिंगने देऊ लागली. आणि तिसरा बाजूलाच फडा काढून झुलत राहू लागला. हे आलिंगनदेखील एकेरी नव्हते. एकमेकांच्या शरीराचे सैल रबरी विळखे एकमेकांना पडत होते आणि सुटत होते, पडत होते आणि सुटत होते. प्रत्येक हालचालीत धुंदी शिगोशिग भरली होती. जणू मदनाची नशा त्या सर्वांना चढली होती !

एकसारख्या गुंतणाऱ्या आणि सुटणाऱ्या तीन धुंद सर्पांचे ते दृश्य नजर खिळवून ठेवणारे होते. तीन दीर्घ आठवणी एकमेकीत गुंताव्यात आणि पुन्हा सुट्या व्हाव्यात तितके ते तरल आणि स्निग्ध होते, एकाच वेळी उन्मादक आणि काव्यमय होते. नजर मंतरून टाकणारे होते.

या हालचाली, हे गुंतणे आणि स्वतःला वेगळे काढून घेणे, हे विळखे, हे हळुवार सरसरते स्पर्श एका वाढत्या उत्कटतेने होत गेले आणि शेवटी तिघांनीही एकमेकांना एका वेळी एकच एक घट्ट मिठी घातली. ओहोहो ! तसले तर काही आपण पाहिलेच नाही ! ती मिठी इतकी एकजीव, इतकी गाढ, इतकी राक्षसी की त्या तीन जिवंत सर्पांची एक तिपेडी वेणीच जणू कुणी तरी वळली असे वाटले. त्या ती पेडांचा एकच एक विलक्षण सर्प झाला आणि आपल्या तीन मस्तकांनिशी त्या पिवळ्या हिरव्या गवतात एका वेळी झटके खात, फडफडत, गडाबडा लोळत आणि अनावर आवेगांनी मोहरत राहिला. तीन जाळीदार चमकत्या त्वचा एकमेकांना करकचून चिरडीत, पिळून काढीत, एकमेकांना पिऊन घेत होत्या. शेपट्या ताठरून वळवळत होत्या, हिसके घेत होत्या, झटके देत होत्या.

ते सारे पडद्यावरून गेले तरी नजरेसमोरून अजून हलत नाही. एकाच वेळी भयप्रद आणि मंत्रमुग्ध करणारे ! शहारून टाकणारे !

सुखदेव यांचा तो माहितीपट 'वाइल्ड लाइफ इन इंडिया' कुठे पाहायला मिळाला तर मुद्दाम एवढ्यासाठी पाहा; या विलक्षण सर्प-शृंगारासाठी.

# एक भूकदंगल

असे दृश्य दुर्मिळ ! गेल्याच आठवड्यातला प्रकार. मुंबईतल्या एका भल्या मोठ्या कचेरीचे कँटीन अचानक बंद करण्यात आले. तशी त्या कँटीनची दुरवस्था कित्येक दिवसांपासून चालूच होती म्हणतात. त्या दिवशी त्या कँटीनवर देखरेख ठेवणाऱ्या, कचेरीतल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काही तात्कालिक उपाययोजना केली आणि कँटीनचा सगळा असंतुष्ट नोकरवर्ग काम टाकून एकसाथ बाहेर पडला. या संधीचा फायदा घेऊन ते कँटीनच बंद करण्याचा निर्णय कचेरीच्या वरिष्ठांनीदेखील ताबडतोब घेतला आणि कँटीनमध्ये शिल्लक असलेल्या खाद्यपदार्थांच्या आणि पेय-पदार्थांच्या साठ्याचे करायचे काय असा प्रश्न साहजिकच त्यांच्या समोर उपस्थित झाला. कुणा तरी कल्पक अधिकाऱ्याने बूट काढला की, हा माल रीतसर विकण्याला कँटीनमध्ये नोकरच उरलेले नाहीत. तसाच तर तो शिळा होणार आणि नासणार. तेव्हा तो नासू देण्याऐवजी कचेरीतल्याच नोकरवर्गाला विनामूल्य वाटण्यात यावा. ही सूचना सर्वसंमत झाली आणि तिची वर्दी ताबडतोब त्या मोठाल्या कचेरीच्या चतुःसीमांत उत्साही बातमीदारांमार्फत पोचताच एक विलक्षण प्रकार घडला. कँटीनच्या दिशेने माणसांची अक्षरशः झिम्मड उडाली. त्या धावपळीत प्यून्स होते, कनिष्ठ अधिकारी होते आणि काही वरिष्ठ अधिकारीदेखील होते. पुरुष होते तशा स्त्रियादेखील होत्या. जो तो पिशवी, प्लास्टिकची हँडबॅग, वर्तमानपत्र असे जे मिळाले ते घेऊन धावत सुटला होता. एकमेकांना रेटीत, लकटीत, बाजूला करीत, पोटे, तुमानी आणि पदर सावरीत सगळे 'चलो कँटीन'च्या मोहिमेवर निघाले होते.

पाहता पाहता त्या 'अनाथ' कँटीनमध्ये धमाल उडाली. धक्काबुक्की सुरू झाली. प्रत्येक जण दिसेल ते जास्तीत जास्त ओढून, उचलून, ओरबाडून आणि भरून घेण्यामागे होता. प्यून आणि अधिकारी अहमहमिकेने लूट करीत होते. पुरुष कारकून आणि स्त्रिया कारकून समानतेच्या हक्काने बरण्या पालथ्या घालीत होते, पातेली शोधीत होते, पराती रिकाम्या करीत होते. कुणी लाडू बळकावले तर कोणी खिम्यावर तुटून पडले. एक अधिकारी नुसतेच ब्रिटानियाचा पाव दोन गाल फुगवून भसाभसा फस्त करीत होते. त्यांना तो धड गिळवतदेखील नव्हता पण शर्थ चालू होती. कारण आणखी गोष्टी वाट पाहत होत्या आणि प्रत्येक क्षण मोलाचा होता. जरा कल्पक होते ते आजकाल मौल्यवान असलेल्या तांदूळ-साखरेसाठी कँटीनची मालमत्ता कसोशीने धुंडाळीत होते. कुणी चार चार कप चहा हजम केला तर कुणी दूधच ढोसले. सैन्याने ज़िंकलेल्या उद्ध्वस्त शहरावर मागोमाग बाजारबुणग्यांची धाड पडावी तसे सगळे रोमांचकारक दृश्य होते. एकेक्याचे खिसे फुगले होते, पिशव्या जड झाल्या होत्या, कुणाकुणाच्या हातातोंडाला लहान मुलांच्या लागतात तसे एकेक खाद्यपदार्थाचे अवशेष लागले होते. जमिनीवर सांडल्या उधळल्या खाद्यपदार्थांचा सडा पडला होता. गोंगाट चालला





होता. आणि या माणसांना विनामूल्य माल 'वाटण्या'च्या वल्गना केलेला कँटीनवर देखरेख ठेवणारा कचेरीचा अधिकारीवर्ग कुरुक्षेत्रावरच्या पार्थासारखा हतबुद्ध होऊन हे पाहत बसला होता.

एखाद्याला वाटले असते कुठल्या तरी दुष्काळी प्रदेशातून तर हे वखवखलेले जीव आत्ताच्या एस. टी. ने येऊन पोचले नाहीत ? वस्तुतः हे सगळे रेशनचे का होईना पण अन्न रोज दोन वेळा पोटभर मिळणारे कमजास्त सुस्थितीतले नोकरीवाले होते. यातले बहुसंख्य सकाळीच घरून जेवून आले होते. उरलेल्यांनी कामावर येताना घरच्या अन्नाचे 'डबे' भरून आणलेले होते. मग ही पळापळ आणि वखवख कसली ? का ? कशासाठी ?

त्या चित्तथरारक दृश्याचा एक प्रेक्षक म्हणाला, ही जादू 'विनामूल्य' या एका शब्दाची. या एका शब्दाने सर्वांच्या पोटात आगी पेटल्या आहेत, त्यांच्या गळ्यांना शोष पडले आहेत, त्यांचे मरगळलेले चेहरे कसे फुलून उठले आहेत, हात कसे स्फुरण पावताहेत, पायांना कशी गती आली आहे ! एकेकाच्या शरीरात जणू कसल्या तरी भयंकर चैतन्याचा अनावर संचार झाला आहे, संचार ! चार पायांच्या चपलगती प्राण्यांसारखे हे दोन पायांचे सुस्त प्राणी कसे तेरीमेरीने या अवचित गवसलेल्या अन्नछत्रात बागडताहेत पाहा ! सगळे शिक्षित, प्रौढ, सुस्थितीतले पण पिढीजाद भिकाऱ्यांच्या सराईत सपाट्याने एकेका गोष्टीचा फन्ना उडवताहेत ! वाहव्वा ! और जोरसे ! लगाव बत्ती...

असे आणखी बरेच बडबडत तो उभा होता. मी अस्वस्थपणे समोरचे दृश्य पाहत मनाशी म्हणत होतो, यांना तरी कशाला हसा ? आणि कसे हसा ? 'फुकट मिळते तर सोडा कशाला?' हा खूप ऐकलेला सरावाचा आणि हुकमी परवल कुणाच्या तोंडचा ?

आपल्याच.

एक प्रकारे आपलेच दर्शन आपल्याला घडते आहे ! क्षुल्लक लाभासाठी आपण आपले माणूसपण वाटेल तेव्हा बाजूला नाही ठेवीत ? आपला स्वाभिमान, सुसंस्कृतपणा, प्रतिष्ठा, विवेकीपणा, शिस्त, संयम, झालेच तर सभ्यपणा यांचे मूल्य किती तरी वेळा एकच असते : 'विनामूल्य' !

# शोक

कलेच्या क्षेत्रातली माणसे भावनाशील असतात असे आपण नेहमी ऐकतो. पण अनेकदा व्यवहारीपणा आणि ही भावनाशीलता यांची फार मजेशीर आणि अजब सांगड या मंडळीत पाहायला सापडते आणि कलावंतांच्या कलावंताला—हाडामांसाच्या जिवंत मूर्ती घडवणाऱ्या त्या अदृश्य मूर्तिकाराला—सलाम करावासा वाटतो.

एक उदाहरण सांगतो. आपल्या हिंदी चित्रपटसृष्टीतल्याच एक ज्येष्ठ अभिनेत्री आहेत. कलेच्या क्षेत्रात त्या जेवढ्या बुलंद तेवढ्याच वैयक्तिक आयुष्यात लहरी, स्वयंकेंद्रित, कर्तुमकर्तुम आणि तरी फार भावनाशील, नव्हे, अगदी हळव्या आहेत. त्यांच्या आयुष्यात त्यांनी अनेक जोडीदार केले आणि सोडले. घरात असेतोवर त्या त्या जोडीदारावर निरतिशय प्रेम केले आणि तो घराबाहेर जाताच तेच प्रेम नव्या जोडीदारावर तितक्याच उत्कटतेने केले. कधीमधी सगळ्या आजी-माजी जोडीदारांना एकत्र बोलावून स्वतःच्या हातांनी त्यांना उत्तमोत्तम पक्वान्ने शिजवून वाढणे त्यांना फार आवडते. अशा प्रसंगी त्या मनस्वी आनंदात असतात.

तर या बाईंचा त्या अभिनेत्री नव्हत्या आणि दारिद्र्याशी, उपासमारीशी झगडत होत्या त्या काळातला एक जोडीदार बऱ्याच वर्षांमागे परलोकवासी झाला. तो त्यांच्याहून वयाने दुपटीने वडील आणि शिवाय अत्यंत व्यसनासक्त होता. पण त्याच्यावर या बाईंचा विलक्षण जीव. त्याच्यामुळेच आपली ऊर्जितावस्था आली अशी त्यांची प्रामाणिक श्रद्धा. अनेक रोगांनी त्याच्या शरीराचा अस्थिपंजर झाला तरी या बाईंनी त्याला अंतर दिले नाही. अखेरच्या क्षणापर्यंत तो त्यांच्याकडेच होता. त्याच्यासाठी हजारो रुपये या बाईने डॉक्टरांना वाटले आणि

तो गेला तेव्हा छाती फोडून शोक केला. दरम्यान त्यांचे तीनचार नवे जोडीदार होऊन संपले होते म्हणजे घराबाहेर गेले होते. आजही त्या व्यसनासक्त माणसाच्या आठवणीने ही बाई मध्येच गलबलते. ती कशी त्याचा हा मासला पाहा.

घरी दोनतीन दिग्दर्शक, एकदोन मुन्शी, साहाय्यक दिग्दर्शक, निर्माते, एखादा असाच नादी माणूस असे कुणी कुणी जमलेले असतात. बाई या गर्दीत आपले व्यावसायिक संबंध मोठ्या कटाक्षाने जपत असतात. एकीकडे नोकरचाकरांना भडाभडा हिंदी-उर्दू शिव्या घालून कामे सांगत असतात. त्यातच त्यांच्या लाडक्या कुत्र्याची आणि पोपटाची निगा चोख राखली जाते की नाही इकडे त्यांचे लक्ष असते. यातून सवड काढून त्या कुणाशी तरी टेलिफोनवरून प्रेमकूजन करतात. या कशातही यत्किंचितदेखील आडपडदा नसतो. यातच चित्रपटाच्या एका 'ष्टोरी'ची चर्चा चालू असते.

चहा येतो. बरोबर बिस्किटे. पाहुणे बिस्किटाची चव घेत चहाचा आस्वाद घेऊ लागतात. बाईदेखील यात भाग घेतात आणि मध्येच त्यांचा घास अडतो. डोळे भरतात. जीव तगमगतो. आणि त्या ढसाढसा रडू लागतात. चक्क गळा काढून लहान मुलीसारख्या रडतात. बैठक स्तिमित होते. नवखे चक्करतात. चहाचे कप हातातच राहतात. बाईंचे रडे आवरत नाही. कुणीतरी बाईंना विचारते, काय झाले ? बाई रडतच हातातले बिस्किट दाखवीत सांगतात, माझ्या 'बाबा'ला असली बिस्किटे फार 'प्यारी' होती ! बाबा म्हणजे त्यांचा तो अगदी मूळचा व्यसनासक्त आणि परलोकवासी जोडीदार.

बाई रडतात. बसलेले पाहतात. तेवढ्यात तिथे येऊन घोटाळणाऱ्या एका नोकरावर बाई रडता रडताच महाभयंकर शिव्यांनिशी तोंड टाकतात, त्याची आई माई उद्धरतात, तो आत धावतो आणि त्याला शिवीगाळी करता करताच बाई रडत रडत आपल्या 'बाबा'चे गुणगान तद्रूपतेने करू लागतात. बसलेले ऐकत असतात. त्यांना बिस्किटे खाण्याची चोरी होते. तेवढ्यात एकदम बाई बैठकीतल्या एका उपस्थित निर्मात्याला कंत्राटाच्या पूर्ण रकमेपैकी थकबाकीबद्दल हटकून त्याला शेलकी सुभाषिते ऐकवतात. ती ऐकवीतच 'बाबा'चे आणखी गुण त्या सांगतात. आपण त्याच्यावर केवढे प्रचंड प्रेम केले तेही त्या सांगतात. तेवढ्यात फोन येतो तो घेऊन फोनवरून कुणाला तरी कसली तरी वेळ देतात, परत जागेकडे येताना वाटेतल्या कुत्र्याची प्रेमळ निर्भत्सना चार सणसणीत धपाटे आणि लाथा हाणून करतात आणि जागेवर येताच त्यांना नवा अनावर हुंदका फुटतो. त्या नोकराला स्फुंदतच म्हणतात, बिस्किटे घेऊन बाहेर चल. बाई, बिस्किटे, नोकर आणि उपस्थित सर्व असे मग बाहेर येतात. मग 'बाबा'च्या नावे ती बिस्किटे कावळ्याला घालण्याचा कार्यक्रम सुरू होतो. कावळा काही केल्या येत नाही. बाई 'आ' 'आ' करतात. नोकर 'आ' 'आ' करतात. उपस्थितदेखील 'आ' 'आ'चे गजर आरंभतात. कावळे या गोंगाटाने खाली येण्याऐवजी वरवरच उडत जातात. मग एकदम बाईंचा 'आ' थांबतो आणि त्या घाईने घरात धावतात. गाडी काढून घाईघाईने कुठे तरी निघून जातत—बहुधा त्यांच्यावर लट्टू असलेल्या एखाद्या धनाढ्य शेठकडे. याच्यावर त्या मुळीच लट्टू नसतात. त्या ज्याच्यावर लट्टू असतात तो रिकाम्या खिशांचा, त्यांच्या निम्म्या वयाचा

तरुण मग त्यांच्या घरी येऊन त्यांची वाट पाहत ताटकळतो.

बाहेर अंगणात बिस्किटांचा सडा तसाच पडलेला असतो. केव्हा तरी त्यावरून बाईंची उंची गाडी सफाईने घरघरत येऊन गॅरेजमध्ये जाते.

अशा या कलावंत बाई आणि अशी त्यांची भावनाशील वृत्ती. शंभर टक्के खरी; पण जगावेगळी.

# माकडवाला

माझी छोटी मैत्रीण बऱ्याच दिवसांनी सकाळच्या घाईत मला शोधत घरात घुसली. घाईच्या भरात चांगल्या कोरड्या जमिनीवरून पाय घसरून तिने मला आधी एक लोटांगण घातले आणि उठून फ्रॉक झटकीत ती धपापत म्हणाली,काका काका, ओळखा !

मी म्हणालो, काय ओळखू ?

जरा वेळ प्रयत्न करून ती म्हणाली,यमाडिज-य्यम्मतज !

मी शरणागती दिली. तिला एकदाची बोलती करण्याचा हा एवढाच मार्ग मला समजून चुकलेला होता. ती टाळ्या पिटीत म्हणाली, काल आम्ही एक माकडवाला पाहिला. तो रडत होता !

माकडवाला रडत होता ? कधी कधी ही पोरदेखील आपल्या कल्पनेने घडवलेल्या 'यणकढीलो यापाथा' वगैरे मारते हे मला ठाऊक होते म्हणून मी म्हणालो, हॅट.

ती जरा वरमून पण कळकळीने म्हणाली, खोटे नव्हे, शप्पत काका !

कल्पना करा, माकडवाला म्हणजे काळाकभिन्न, दगडासारखा निब्बर आणि घट्ट, कमावलेल्या चामड्याच्या पोटाचा, लाल डोळ्यांचा आणि बहुधा उग्र मिश्यांचा प्राणी. पाहून दिवसा घाबरावे असा. आणि तो क्राय करतो. म्हणजे रडतो. हा काय चमत्कार ? माझा त्या पोरीबद्दलचा संशय अद्याप पुरता गेलेला नव्हता म्हणून मी म्हणालो,तू कुठे पाहिलास ?

ती म्हणाली,काल आम्ही स्कूलमधून येत होतो ना, तर आपल्या घरासमोरच्या रस्त्यावरच दिसला.



मी विचारले, का रड़त होता तो ?

ती म्हणाली, कारण त्याचा माकड पळाला होता.

माकड नपुंसकलिंगी हे बहुधा कॉन्व्हेटमध्ये हल्ली शिकवत नसावेत. पण ते दुरुस्त करण्याचेही भान मला राहिले नाही एवढा मी त्या 'सिच्युएशन'ने हुशारलो. क्या बात ! माकड पळाले म्हणून माकडवाला रडतो ! अगदी समोरच्या आशूसारखा क्रय करतो !

माझी छोटी मैत्रीण माझी चाळवलेली उत्सुकता हेरून नाट्यपूर्ण आविर्भाव करीत म्हणाली, काका काका, माकडवाल्याभोवती ही गर्दी जमली होती नि त्याचा माकड बसला होता या आपल्याच घरावर चढून ! त्याला लोक बोलावीत पण तो काय यायचा नाही. तो नाक खाजवायचा. नि पोट खाजवायचा. नि एकदा तर गच्चीत खालच्या नाडकर्ण्यांनी वाळत घातलेले सांडगेच चादरीसकट त्याने खाली फेकलेन ! लोक मागे लागले तर तो जास्तच वर चढायचा काका. आणखीन त्याच्या अंगावर पँट आणि कोट पण होता. आमच्या डॅडींसारखा ! त्याने तो अगदी मॅन दिसायचा, म्हंजे शेपटी सोडली तर ! तो काय किती केल्या खाली येत नव्हता. लोक जमले होते नि माकडवाला रडत होता. समोरच्या आशूसारखा, काका ! जमाडी जम्मत, काका !



 मी तिचे कौतुक केले आणि ती पार खूष होऊन टाळ्या पिटीत तिच्या घरी पळत गेली.

पण तिची गडबड, तिचा अनावर उत्साह, आनंद मी समजू शकलो. माकडाने आझाद होणे आणि माकडवाल्याने बसकण घेऊन गळा काढून रडणे ही कल्पनाच विलक्षण आहे. वास्तविक माकडवाल्याने डमरूच्या तालावर माकडाला मनसोक्त नाचवणे आणि पैसे गोळा करायला लावणे आणि माकडाने त्याच्या म्हणण्याप्रमाणे पोटावारी नाचणे ही पद्धत. सगळे माकडवाल्यांचे खेळ असेच चालतात. माकडाच्या गळ्यात पक्की दावण असते. आणि माकडवाल्याच्या हाती लांब काठी असते. माकडांना नाचावेच लागते. केवळ माकडाच्या खेळातच नव्हे, एकूण आयुष्याच्याच खेळात ज्याच्या गळ्यात दृश्यादृश्य दावण तो नाचतो आणि दावण घट्ट पकडून धरणारा नाचवतो. पैसे करतो. तो घालील त्या शिळ्यापाक्या घासावर दावणीला बांधल्या गेलेल्या माकडाला जगावे लागते. भूक शमवावी लागते. हे न करून सांगणार कुणाला ? आणि अशा वेळी मधूनच असे काही पाहिले-ऐकले—त्या छोट्या मैत्रिणीने सांगितले तसले—की एकदम आपल्यातल्या प्रत्येकाला प्रथम होतो तो आनंद. बरी जिरली माकडवाल्याची असेच आपण आधी म्हणून मोकळे होतो. मनोमन टाळ्या पिटतो कारण आयुष्याच्या खेळात अशी ना तशी आपली भूमिका दावणीच्या माकडाची असते. असतेच. अगदी त्या छोट्या पोरटीलासुद्धा माकडाच्या स्वातंत्र्यप्राप्तीत जाणवली ती स्वतःची शिस्तबाज कुटुंबातली कुचंबणा. तिला झाला तो उत्स्फूर्त अनावर आनंद या असल्या जाचातून माकड तरी सुटल्याचा होता. तोच आनंद माझादेखील होता. तोच आनंद रडत्या माकडवाल्याभोवती जमलेल्यांचाही असावा. गुलाम स्वतंत्र झाला होता आणि कर्तुमकर्तुम स्वामी दीनाहून दीन होऊन चक्क रडत होता.

मला एक प्रश्न पडतो. माकडवाला का रडत होता ? माकडे तर दुसरी मिळू शकतात. त्यांना शिकवतादेखील येते. मग तो राकट, बलदंड पुरुष मुलाहून मूल होऊन का रडत असेल ? का हो, त्या विशिष्ट माकडाला छळताना, दारोदार नाचवताना, रोज अन्नावारी फिरवताना, त्याच्यावर स्वतःच्याही नकळत त्याचा जीव तर जडला नसेल ?

चरितार्थाच्या साधनावर जीव ?

काय नियम !

# छोट्या

एक असतो उंदीर. एकदम छोटा. भलता चपळ. घालमेल्या. तसा निरुपद्रवी पण त्याला मुळी कुणी सहसा देवासारखे जरा म्हणून स्वस्थ बसूच देत नाही. सगळे जग, त्यातल्या अवघड धावत्या चालत्या वस्तू कळत नकळत त्याच्या जणू जिवावर उठलेल्या असतात. त्यात एक वस्तू तर त्याच्या मागावर सतत असते. मांजर ! त्यामुळे होते काय, क्षणोक्षणी त्याला इकडून तिकडे, तिकडून इकडे, खालून वर आणि वरतून खाली धावावे लागते. कशाकशात पडायला, धडपडायला, गडगडायला, गटांगळ्या खायला आणि अडकायला होते. इंजिने त्याच्या अंगावरून धो धो जातात, मोटारी त्याला भुईसपाट करून पुढे पळतात, लठ्ठ माणसे त्याच्यावर बसतात, मोठमोठ्या दरडी त्याच्यावर कोसळतात, पूर येतात, एक ना दोन—काही विचारू नका. आणि त्यात ते मिश्या पिंजारलेले, नाक फेंदारलेले आणि गुर्र करून, शेपटी फुलवून त्याचा सदा घास घेऊ पाहणारे नतद्रष्ट मांजर ! वैऱ्यावरसुद्धा येऊ नयेत अशी संकटे या चिमुरड्या, एवढ्या एवढ्याशा, गोजिरवाण्या उंदरावर येतात; तीदेखील एकामागून एक, एकावर एक, एकात एक, एका भोवळ आणणाऱ्या वेगाने. तरीही हा चिमुरडा जीव बरे का, जगतच राहतो. त्याला यातली एकही गोष्ट नष्ट करू शकत नाही, उलट या गोष्टीच नष्ट होतात. त्यांची मोडतोड तरी होतेच होते. त्या दुष्ट मांजराचे नाक धाडदिशी बंद झालेल्या दाराच्या चिमट्यात सापडून हिरवेनिळे किरमिजी होते, त्याची शेपटी स्प्रिंगसारखी मैलभर ताणली जाऊन मांजर बघता बघता धडाडदिशी भिंतीवर नाहीतर झाडावर येऊन आदळते आणि थोडा वेळ त्याच्या मागल्या अर्ध्या भागाचा आकार ठोः करून फोडलेल्या कागदी पिशवीसारखा होतो, त्याची मान फुटक्या मडक्याच्या तोंडात अडकून मांजराऐवजी चार पायांचे फुटके

मडकेच परेशान होऊन हैराण फिरताना आपल्याला दिसते, एक पाय बँडेज करून गळ्यात अडकवून सुजलेल्या एका डोळ्याने मोठे मोठे टपोरे अश्रू ढाळीत ते मांजर रडत बसलेले देखील आपल्याला पाहायला मिळते ! पण उंदीर नष्ट होत नाही. तो जगण्यासाठी अहर्निशपणे जिवाच्या कराराने झुंज देत टिकूनच राहतो. त्याची शेपटी तुटली तर आपल्या डोळ्यासमोर नवी उगवते. मोटारीच्या चाकाखाली सापडून तो भुईसपाट झाला म्हणजे वाटते,अरेरे ! संपला ! पण छट् ! मोटार पुढे जाताच बिलकुल 'टाइम' नसल्यासारखा पूर्ववत होऊन आपला दोस्त पुढे धावू लागतो. मागे मांजर लागलेले असते ना ! जगण्याच्या व्यापापुढे साली मरायलासुद्धा सवड नसते ! धावपळ ! धमाल !

आठवतो हा उंदीर ? त्याला मिकी माउस नाव होते. होता उंदीर पण त्याला डोळे स्वप्ने पाहणाऱ्या एखाद्या कवीचे होते. जगण्याविषयीचे ओतप्रोत प्रेम त्या डोळ्यांत भासे. ते डोळे कधी उदास नसत, हताश नसत, थकले भागले नसत. ते हसरे असत. आपल्या छोट्या शक्तीनिशी, छोटेपणाचाच फायदा उठवीत मोठमोठ्या संकटांवर मात केल्याचा आनंद वारंवार त्यातून थुईथुई नाचे. ते डोळे लहान अर्भकासारखे झोपत, गुप्त पोलिसासारखे संकटाच्या मागावर असत. धावता पळताना त्या चिमटीभर अमर शरीरातला सगळा जीव जणू त्या डोळ्यांत एकवटून येई. उंदराला डोळे असण्यापेक्षा या डोळ्यांनाच जणू एक उंदीर आहे असे वाटे. इतके ते डोळ्यांत भरत आणि बोलत.

आणि ते सदा उभे कान ! उंचीतल्या उंची रेडियोच्या एरियलसारखे तेज ! कितीही लांबचे संकट या कानांत नेमके शिरे. ते सदा फुरफुरणारे नाक कायम मांजराच्या वासावर ! नि ती लांब शेपटी. संकटाची वर्दी मिळताच ती ताठ होऊन जणू स्वतःच विचार करी. गडबडीने पुढचे धोरण ठरवी. तसा तिचा तोरा. आणि वर चिवट ! कितीही ताणा, गाठी मारा, पीळ भरा, ती पुन्हा मोकळी होताच अगदी पूर्वीसारखी. तुटली तरी दगडी पाटीवर पेणसलीने एखादा फराटा ओढावा तशी पट्दिशी वाढायची.

अशा उंदराला रुपेरी पडद्यावर पाहत आम्ही लहानाचे आमच्या नकळत मोठे होत आलो. जगभरची एक पिढीच हा उंदीर पाहत, त्याच्या विलक्षण लीलांना पोटभर हसत, जगण्यावरच्या याच्या अपार प्रेमाचे संस्कार नकळत घेत वाढली. आता कधी इंग्रजी चित्रपटांना जावे तर आरंभीच्या छोट्या छोट्या रंगीत चुटक्यांत वेगळेच काही काही दिसते. पोपट, मांजर, कुत्रा असे कुणी कुणी. हेही हसवते, मजेदार वाटते. कारण याची स्फूर्ती असते त्याच त्या जगण्यावर अपार प्रेम करणाऱ्या मिकी नामक उंदरावरच्या असंख्य छोट्या छोट्या चित्रपटांत. पण किती झाले तरी आमचा मिकी तो मिकीच असे मात्र त्या छोट्या जिवाच्या आम्हा थोराड, जून, असंख्य चहात्यांना वाटतच राहते. या मिकीच्या बाबांनी पाहा ना, आणखी डोनाल्ड नावाचे बदक जन्माला घातले. हिमकन्येसारख्या छान छान परीकथांवरचे अद्‌भुत, स्वर्गीय चित्रपट आम्हांला दिले—वॉल्ट डिस्ने हे मिकीच्या बाबांचे नाव—पण भयानकाहून भयानक अरिष्टांतून हातोहात निसटलेला मिकी आमच्या मनातून काही बाहेर निसटू शकला नाही. तो बेटा तिथेच कैदी आहे !



हे लिहिण्याचे कारण मिकीचे बाबा गेले. ती बातमी वाचली आणि हे लिहायला घेतले. प्राणांतिक अरिष्टात पार चेपला जाऊनदेखील नव्या धडपडीसाठी गडबडीने पूर्ववत होऊन धावत सुटणाऱ्या मिकीच्या बाबांना एका प्राणांतिक संकटाने नेले. त्यांच्या मिकीसारखे त्यांना काही गडबडीने उठून नव्या चित्रपटासाठी धावणे जमले नाही. त्यांची निर्मिती त्यांनी अमर केली पण त्यांना स्वतःला जावेच लागले.

पण त्यांनी आम्हांला मिकी दिला. त्याच्या रूपाने आयुष्यावर, या जगातले जे जे सुंदर, गोजिरवाणे, लोभस, त्यावर अपार प्रेम करायला शिकवले. त्यासाठी झगडायला, धडपडायला शिकवले. त्यांनी हे शिकवले की छोट्या ताकदीच्या जिवांनाही या अवाढव्य जीवनसंग्रामात टिकून राहता येते. त्यांना टिकून राहण्याचा हक्क आहे.

# हा—ऊ—ट !

काल नव्या वर्षाचा पहिला दिवस.

सकाळी पायांवरचे पांघरूण डोक्यावरून आणि डोक्यावरचे पायांवरून करीत सुखातिशयाने लोळत होतो तर खाली भला थोरला ओरडा ऐकला. ओरड्यावरून त्याचे स्वरूप आणि कारण समजले. खाली वाडीतल्या पोरांनी भल्या सकाळीच टेनिसच्या चेंडूने नव्या वर्षाचा पहिला क्रिकेटचा डाव आरंभला होता. एकदम डोक्यात आले की कितीक वर्षांत बॅट हातात धरली नाही. शेवटचे क्रिकेट खेळलो तो तेव्हाच्या इंग्रजी चौथीत म्हणजे आताच्या नववीत असताना. मैदानावर संस्कृतच्या सापत्नेकर सरांच्या फिरायला आलेल्या पत्नीच्या नाकावर आपण चौकाराच्या आवेशाने हाणलेला चेंडू बसून तिला चक्कर आली त्या दिवशी घाईघाईने मैदानातून काढता पाय घेतला तो अखेरचाच. त्यानंतर काही काळ संस्कृतइतकी क्रिकेटची धास्ती बसली. क्रिकेटच्या निमित्ताने नंतर वाढत्या वयात हातात धरला तो ट्रान्झिस्टर कॉमेंट्री ऐकायला. मैदाने गाठली ती सामने फक्त पाहायला. तिथेही कुणी चौकार ठोकला की घाईघाईने आपण आधी सापत्नेकर सरांची पत्नी त्या बाजूला कुठे फिरायला आलेली नाही ना, तेच पाहून घेत असू. एरवी अगदी सोबर्स आणि ग्रिफिथचीदेखील सापत्नेकरांच्या छड्यांपुढे दुसऱ्या दिवशी धडगत उरणार नाही असे मनापासून वाटायचे.

एकदम ठरवले की खाली जाऊन त्या पोरांत क्रिकेट खेळायचे ! बस्स ! चांगल्या पन्नास-शंभर धावा काढायच्या आणि पाचसात बळीबिळी घ्यायचे. म्हणून घाईघाईने सगळे उरकून खाली उतरलो.

मला पुढे निघून जाण्यासाठी खेळत्या पोरांनी खेळ बंद करून निमूट वाट मोकळी करून दिली.

जरा संकोचून मी म्हणालो, काय रे, खेळताय काय ?

मनातल्या मनात 'मग तुमचे काय जाते' असे जणू म्हणत सर्वांनी होकारार्थी माना हालवल्या.

मी दुसरे काही न सुचून म्हणालो, खेळा, खेळा.

तरीही ती अवघडल्यासारखी आपापल्या जागी उभीच राहिली; बहुधा मी कुठे जायचे असेल तिकडे जाण्याची वाट पाहत. मग आठवले की मागे एकदा आपल्या गॅलरीत चेंडू आला होता तेव्हा परत देण्यापूर्वी, वाडीत क्रिकेट खेळता, काचाबिचा फुटल्या तर भरून कोण देईल वगैरे आपणच दम भरला होता.



मनाशी खट्टू झालो. उत्साहाने आपण खेळायला आलो पण आपले स्वागत होण्याचा संभव नव्हताच ही जाणीव खुपली. एकदा वाटले,परत फिरावे. मग वाटले, मग हा खाली कशाला आला असा प्रश्न त्यांच्या मनात येईल आणि ती आपापसात हसतील; तेव्हा सरळ पलीकडे रस्त्याकडे जाऊन एक फेरी मारूनच परत यावे.

पण तरी कशी कोण जाणे, मनात क्रिकेट खेळण्याची उसळलेली इच्छा दबायला तयार नव्हती. मग मी धाडस करून सरळ म्हणालो, मी येऊ का रे खेळायला ?

तशी असे एकेकाचे चेहरे मजेचे झाले म्हणता ! हे मुळी त्यांच्या कल्पनेतच नव्हते. पोरटी पार गडबडली. पण त्यांना ती कल्पना एकंदरीने गंमतीशीर वाटली असावी. ती म्हणाली, या.

आणि मग नाइट-लेंगा वर खोचून मी आमच्या कप्तानाच्या इच्छेबरहुकूम स्क्वेअर लेगला क्षेत्ररक्षण करण्याला उभा राहिलो. इथून चेंडू सारखा पलीकडच्या वाडीत जायचा आणि मग तो आणायला त्रास पडायचा म्हणून माझ्यासारखा उंच रुंद क्षेत्ररक्षक त्यांनी लगेच त्या कंपौंडशी टाकला, आणि याचा फायदाही लगेच झाला. त्यांचा चेंडू बरेचदा अडू लागला. मी अडवला म्हणणे मुष्किल होते. माझ्या हाती तो बेटा नीटसा लागतच नव्हता. पण हाती न लागला तरी अंगावर कुठे कुठे बसून अडत होता. हेही बऱ्यापैकी क्षेत्ररक्षण ठरत असावे. पोरे खूष होती. माझ्या वतीने ती माझ्यापलीकडे गेलेल्या चेंडूसाठी धावत. माझ्या दिशेने आलेला झेल 'काका बाजूला व्हा' म्हणत तीच सशासारखी पळत येऊन झेलत. मग ती जल्लोष करीत. त्यात माझाही जयजयकार चाले. झेल घेतला की जय, अमूकतमूक काकाकी जय वगैरे वगैरे.

एव्हाना दुतर्फाच्या चाळीतील बरीच प्रौढ मंडळी आपापल्या सज्जात येऊन आमचा खेळ बघत उभी राहिली होती. मला गोलंदाजी देण्यात आली. माझ्या वयात द्रुतगतीच्या भानगडीत न पडता किंवा अगदी मध्यम गतीनेदेखील न झेपणारे कष्ट न घेता मंदगतीचेच धोरण मी पत्करले आणि चारपाच षटकांत दोनतीन बळी घेतले. खरे म्हणजे ते कसे गेले ते मलाही नीटसे कळले नाही. खड्यांवरून बहुतेक टेनिसचा चेंडू वेडावाकडा वळत होता. एकदा एका सरपटीला एक 'विकेट' मिळाली. पण पोरे भलतीच खूष होती. त्यांच्या खेळातले माझे पदार्पण त्यांच्या दृष्टीनेदेखील अगदीच वाया गेले नव्हते.

आणि मग माझ्या फलंदाजीची पाळी आली. जुन्या आठवणीने मी अंपायर झालेल्या अर्ध्या तुमानीतल्या बन्या चितळेकडून 'लेग' वगैरे मागून पक्का करून घेतला. 'पिच' वरचे खडेबिडे बॅटने आजूबाजूला सारले. क्षेत्ररक्षणाच्या जागा दर्दी खेळाडूच्या सावध सराईतपणे हेरून घेतानाच सापत्नेकर सरांची पत्नी या बाजूला कुठे चुकून फिरायला आलेली नाही ना, याचीही खात्री करून घेतली. आणि गोलंदाज वामन धोत्रेच्या पहिल्याच मध्यमगती चेंडूवर चौकाराचा एक दणकेबाज टोला हाणला.

'हा—ऊ—ट !' पोरांचा ओरडा झाला. दुतर्फाच्या चाळीमधले काही जून उत्साही आवाजदेखील यात ऐकले. टाळ्यांच्या कडकडाटात मागे पाहिले तर दांडीशी चेंडू बिलगून घाबरल्यासारखा बसला होता.

सांगू का, त्रास नाही झाला. नामुष्की वगैरे तर वाटलीच नाही. उलट हसू आले. आपल्याकडून आपण हाणतो चौकार आणि गेलेली असते दांडी हे काही या वयात नवीन नव्हते. नवीन होते, तसे सगळा संकोच, भारदस्तपणा, आढ्यता, हुच्चेगिरी टाकून त्या पोरांमध्ये सामील होणे, रमणे. त्यांच्यातलेच आहोत असे वाटणे. केवळ आपल्यालाच नव्हे, त्यांनादेखील वाटणे.

तेव्हापासून मी मजेत आहे. नव्या वर्षानि तुम्ही सगळे एकेका वर्षानि मोठे झाला असाल. मी मात्र लहान झालो आहे—असे निदान माझे मला वाटते आहे. आणि नव्या वर्षाच्या आरंभी एवढे सुख मला भरपूर आहे.

# पिसे

एक मुलगी नाचते. तशा विशिष्ट वयात मुली एकंदरीने नाचऱ्याच असतात पण ही मुलगी प्रथम आपल्या चुरचुरीत जिभेने नाचून दाखवते. मग पायांनी नाचू लागते, मग पाहता पाहता तिचे हात, तिचे सुकुमार शरीर आणि तिची सुंदर मुद्रा नाचू लागते. पाहताना आपल्याला कळते की या वेळी हिचे केवळ शरीरच नव्हे तर हिचे पंचप्राण नाचत आहेत. हिच्यातले अवघे चैतन्य नाचते आहे.

पाहताना आपले काळीज आणि आपले रक्त थुईथुई नाचू लागते. ही उद्या डोंगरावर नाहीतर नदीकाठी नाचू लागली ना, तर हिच्याबरोबर डोंगर, राने, नद्या, पाखरे, आभाळ आणि या साऱ्याचा साक्षात निर्माता—तोदेखील बेभान, बेहोष होऊन नाचू लागेल असे हिला नाचताना पाहताना वाटते. लय मुळी हिची सख्खी बहीण वाटते. डौल म्हणजे हिच्या शरीराच्या भिरभिरत्या भिंगरीचेच वेगळे नाव वाटते.

नाचताना मध्येच हिचे नुसते पाय नाचतात आणि मुद्रा ते स्तिमितपणे पाहत राहते. एक हात नाचतो आणि दुसरा टकमक बघत तटस्थ होतो. कधी नुसते डोळे नाचतात आणि सारे शरीर हलक्या लयीत विरघळून नाहीसे व्हावे तसे नाहीसेच होत राहते. पुन्हा समेचा परवल मिळताच अवघे शरीर लयीसकट उफाळून येते आणि समोरच्या प्रेक्षागृहातली टाळ्यांची उत्स्फूर्त, बेभान दाद स्वीकारणारे डोळे त्या क्षणी त्या लयीच्या कल्लोळातून अगदी अलिप्त आणि स्निग्ध, प्रसन्न, कृतकृत्य असतात ! थोडक्यात शरीराच्या अवघ्या अवयवांतून ही विलक्षण मुलगी एकत्र आणि वेगवेगळी नाचू शकते. हिच्यात जणू हिच्याच अनेक नाचऱ्या बहिणी लपलेल्या आहेत. डोळ्यांत दोन, ओठांत वेगळीच एक, हातांत निराळ्या, बोटांच्या

अग्राअग्रात आणखीच वेगळ्या आणि पावलांतल्या तर पार पिश्याच. लयीचे पिसे त्यांना चुटकीसरशी भरते. आणि मग या दोन पिश्या बहिणी जोडीने घुंगूर घुमवीत एकदा का नाचू लागल्या की वाटते त्या आता थांबणारच नाहीत. त्या बेभान, आंधळ्या नाचतच राहणार... कितीही काळ...! पाहून डोळे थकले, गरगरले तरी नाचून हे खुळे पाय मुळी थकतच नाहीत.

या नाचऱ्या मुलीचे नाव रोशनकुमारी. परवा बुधवारी रात्री पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने हिच्या नृत्याचा अप्रतिम कार्यक्रम मुंबईतल्या रवींद्र नाट्यमंदिरात पाहायला मिळाला आणि दोन घटका आयुष्यातले सगळे व्यापताप कसे पार विसरून जायला झाले. जणू बाहेर घोडा सज्जच होता. त्यावर बसून वाड्यावर जायचे होते आणि सुग्रास भोजन करून उंची मद्याची चव चाखीत, दासदासींकडून मर्दन करून घेत नुकत्या पाहिलेल्या स्वर्गीय लावण्याचे धुंद चिंतन-स्मरण करीत छपरी मंचकावर, लुसलुशीत बिछायतीत गाढ सुख-निद्रेच्या आधीन व्हायचे होते. ना व्यवहार, ना व्यापताप,ना काही... असली धुंदी नृत्याचाच एखादा सुंदर कार्यक्रम चढवू शकतो. संगीत वेदना जागी करते. नृत्य तिचा विसर पाडते. लयीच्या एका अशरीरी विश्वात नेते. सुखदुःखाच्या पलीकडे आपण पोचतो. लयीच्या भिंगरीबरोबर बेभान भिरभिरत गरगरत राहतो. अखेर बाहेर येतो तेव्हा कसे खूप शिणल्यासारखे आणि धुंद वाटते. जणू एवढा वेळ नाचत होते ते आपले प्राणच ! आपली ही अवस्था, तर साक्षात लयीशी खेळणाऱ्या, अंगप्रत्यंगातून लय डहुळणाऱ्या कलाकारांची काय असत असेल ! परवाच पाहा ना. रोशनकुमारीला साथ करणारे तिचे वयोवृद्ध अब्बाजान फकीर महंमद पखवाजिये लयीच्या संजीवनीने कसे जवान होऊन तोंडाने लय बोलत, साऱ्या अंगाने ती आपल्या गुणी बेटीवर आणि प्रेक्षकांवर उधळीत, फेकीत होते ! त्यांच्या शेजारचे प्रसिद्ध तबलिये अल्लारखा आपल्या अर्भकासारख्या निर्विकार निरागस चेहऱ्याने रोशनकुमारीला पदलालित्य आणि फकीर महंमदमियांचा जवान उत्साह टिपीत नेमक्या जागी आपल्या जादूच्या बोटांनी लयीचे चमत्कार करून, पुन्हा त्या चमत्कारांनी प्रेक्षकांबरोबरच महिरत बेहोष होत होते.साधे हार्मोनियम आणि व्हायोलिनवर लहेरा धरणारे देखील लयीच्या या बेहोषीत बुडून लहेरा वाजवण्याचे विसरून मध्येच अंगाने दाद देत राहत. रंगमंचावर कुठेही तिळमात्र कृत्रिमता नव्हती, उपचार नव्हता, समोरच्या प्रेक्षकाविषयी उपरेपण नव्हते. जणू प्रेक्षागार धरून तो रंगमंच म्हणजे एक बंदिस्त नृत्यागार होते आणि त्यात नृत्याचा कार्यक्रम वगैरे काही नव्हता चालला, चालला होता केवळ नृत्याचा रोजचा अनौपचारिक हसत खेळत, दाद देत घेत सराव. बस्स ! त्या सरावातदेखील कसूर नव्हती कारण लयीच्या नशेत ती जमावीच कशी ? शरीर-मन बेबंद करूनच लयीला भेटता येते. आणि एकदा तिच्या मिठीत गेले की अध्येमध्ये सुटका नाही. हिशेबी विचारांना तिथे रिघाव नाही. ते एक प्रकारचे पिसेच ! शंभर टक्के पिसे !

पाहून अनुभवले तरी एक धुंद शिणवटा आणणारे. एरवी मागूनही कुठे न मिळू शकणारा हवाहवासा, सुंदर शिणवटा.

व्यवहार जगून येणारा नको नकोसा शिणवटा घालवणारे.

# वलय

हल्ली उशिरा उजाडते. आणि झोप लौकर पुरी होते. लोळावेसे वाटते पण जरा जोर करून अंगावरचे हवेहवेसे पांघरूण दूर सारले ना, तर आपण चक्क उठून बसतो इतकेच नव्हे तर सकाळचे सगळे नित्यनैमित्तिक भराभरा उरकून मोकळेसुद्धा होतो. आता पुढे काय करायचे असा प्रश्न निर्माण होतो. पुन्हा नव्याने झोप येईल असे वाटू लागते. न करमून खिडकीत नाही तर सज्जात यावे तर अद्याप उजाडायचे असते. नजरेत येऊ शकणारे सगळेच कसे गुलाबी सुस्तीत लोळत असते. स्वस्थ राहवत नाही. हा या हवेचा गुण असतो. मग काही नाही, वहाणा चढवाव्यात आणि घराबाहेर पडावे आणि नजीकचे एखादे देऊळ गाठावे.

म्हणजे मीही तसा देवळाबिवळात नित्यनेमाने जाणारा भाविक नव्हे. त्याला मुळात वेळ नसतो. संकट दिसले की देव आठवावा हीच आपली पोटार्थी प्रपंचवाद्यांची रीत आणि परंपरादेखील. पण संकट न दिसताच देव आठवावा असे हे दिवस, अशा त्यांच्या सकाळी.

कोवळा रामप्रहर. हवेत गारठ्याची छान चव असते. सडक जणू आपल्या स्वारीसाठी कुणी मोकळी करून ठेवावी तशी वाटते. उजाडू लागले तरी बेवारशी कुत्रीसुद्धा वळचणी पकडून खुशाल घोरत असतात. सडकेसडकेला एखादी शेकोटी विझता विझता तिची ऊब घेत तिच्या भोवताली बसलेले फूटपायरीवाले धुमी पेटवून बसलेल्या कुणा बैराग्यांसारखे वाटतात. त्यांचे ते शेकणे पाहून थंडी आतून नव्याने जाणवते. शेकोटीचा धूर हवेतल्या हलक्या धुक्यात बेमालूम मिसळून भोवती धुपासारखा पसरलेला असतो. सडकेला ताज्या दवाचा गारवा धरलेला असतो. उगीच वहाणेतून पाय काढून तो टेकवावा तर चंदन घासलेल्या सहाणेवर

नकळत बोट टेकवात्रे ना, तसे काहीतरी गंमतीशीर वाटते. आणि गंमत म्हणजे सडकेवरचे सार्वजनिक दिवे, उजाडले तरी वेड्यांसारखे जागतच असतात. फटफटत्या आकाशावर हे दिवे दिवास्वप्नासारखे भासतात. खरे तरी खोटे. जवळचेच दिसू शकणाऱ्या माणसाच्या डोळ्यांसारखे अधू, वटारलेले, हास्यास्पद, चुकलेमाकले, पोरके.

आता देवळाची वाट धरावी आणि वाटेत एखादी गाय सुस्तपणे उभ्या उभ्या झोपलेली दिसावी हा योगायोग असेल पण या दिवसात बराच खात्रीचा. गाईला माताबिता मानणारे आपण नसलो तरी उगीच एकदा त्या धिप्पाड गरीब जनावराच्या पाठीवरून हात फिरवून पुढे जावे ही याच दिवसात स्फुरणारी छोटीशी चैन. स्पर्शासारखी सर्रदिशी थरारणारा तिचा दडस खरबरीत फरा नाहीतर पुठ्ठा अंगावर या वेळेला अंतर्बाह्य कसा शिरशिरी आणतो ! नकळत जणू आपण साक्षात जीवनालाच स्पर्श करतो आणि थरारतो. पुढे झालो तरी तो स्पर्श आपल्या बरोबर येतच राहतो. आणि तो सुखद थरार.

आता देऊळ गाठावे तर, भूपाळीच्या प्रतीक्षेत कृतकनिद्रेत चुळबुळणाऱ्या घनःशाम सुंदरासारखे ते गुलाबी जाग उपभोगताना आढळते. त्याचा चिरा न् चिरा सुस्तीत भिजलेला वाटतो. वर पाखरे किलबिलत असतात. आत सभामंडपात विजेचा एकच दिवा अजून जळत असतो. गाभाऱ्यात एक निरांजन—काकडआरती करून ठेवलेले असावे—तेवत असते. सभामंडपात कुणी एक बाजाच्या पेटीचा एकच सूर धरून 'सेवे'ला बसलेला असतो. आवारात कोंबडी एकमेकांना पकडीत धावत असतात. पलीकडे बांधलेली एक कालवड अर्ध्या झोपेत चारा चघळीत असते. तिच्या तोंडावाटे लोंबणाऱ्या चाऱ्याच्या काड्या या वेळेला उष्टावळ झालेल्या तान्ह्या बाळाच्या खरकट्या तोंडाचीच आठवण देतात ! दुसऱ्या अंगाला एका दोरीवर कुणाची तरी चिरगुटे लोंबत असतात. पलीकडे देवळाच्या भिंतीलगत एक कुटुंब गाढ झोपलेले असते. त्यातल्या लोळत लांब गेलेल्या तीनचार एकापाठोपाठच्या नागड्याउघड्या पोरांची टपोरी सावळी पोटे खुशाल थंडी पीत असतात. मोठा पुरुष कष्टाचे वेडेवाकडे हातपाय त्यावरच्या पिकल्या केसांसकट ताणून बिनघोर लोळलेला असतो. बाई पलीकडे देवळाच्या भिंतीशी जुनेरातल्या अंगाचे घट्ट मुटकुळे करून हात उशाशी घेऊन पाठमोरी झोपलेली असते. तिथेच एकदोन जुन्यापान्या पेट्या, ट्रंका, भांडी, गाठोडी आणि पोपटाचा एक पिंजरा...आणि सभामंडपात बाजाच्या पेटीवर एकच सूर धरून 'सेवा' बजावणारा तो कुणी एकजण सकाळच्या खरखरत्या, सुस्त, जाड्या, भाविक, आर्त आवाजात अभंग आळवू लागतो, 'आता माझी चिंता तुज नारायणा...'

माहीत असते की देव आजकाल देवळात नाही, निदान देवळातच तो राहिलेला नाही. पण कोंबड्या-कालवडींपासून छोट्यामोठ्या माणसांपर्यंत सर्वा-सर्वांची चिंता वाहणारा एक नारायण त्या वेळी तिथे भासू लागतो. त्याचा अदृश्य, मोठा, हळुवार, प्रेमळ, कठोर हात तिथे आणि सर्वभर फिरतो आहेसे वाटू लागते. त्याच्या संरक्षक छायेत सगळे कसे निर्भर, बिनघोर वाटते आणि आपल्या नकळत आपण गुणगुणू लागतो, तुज नारायणा...माझी चिंता...

केव्हा तरी ती सठीसहामासीची तद्रूप भाविकता संपते, तो रामप्रहरदेखील उलटतो. 'राम'

नसलेल्या अनेक गोष्टींत आणि व्यापांत आपण गुंतत जातो, हरवतो. तरी मनात मधूनच चंदनी उदबत्तीच्या धुराच्या चुकल्यामाकल्या वलयासारखे एक वलय रेंगाळताना जाणवते. पवित्र. शांत. गूढ. अगदी पुसट तरीही न हरवणारे. मजेशीर. त्या रामप्रहराचे वलय.

एकदा अनुभवण्यासारखे.

# तेरा जून

माटुंगा स्टेशनाच्या किंचित उत्तरेकडे आकाशातील कुऱ्हाड घणाघाती वेगाने भल्या सकाळी कोसळली होती आणि मुंबईभर सार्वजनिक टेलिफोन्सपाशी माणसांच्या रांगा लागल्या होत्या. या माणसांचे चेहरे नेहमीचे नव्हते. त्यांच्या डोळ्यांत नेहमीच्या मानवी भावभावना नव्हत्या. त्यांच्या अंगप्रत्यंगात भासत होती भेदरल्या जनावराच्या गात्रागात्रात भरून येते ती अनामिक भीती. त्यातले काही मरून उभे राहिल्यासारखे सुन्न वाटत होते तर काही नुकते जन्मल्यासारखे गोंधळून गेले होते. भोवतालच्या कशाचाच नीटसा अर्थ त्यांना लागत नव्हता आणि सगळे त्यांना नवे, अनोळखी, वेगळे वाटत होते.

एकजण टेलिफोनवर एक नंबर फिरवून कण्हल्यासारखा विचारीत होता, हॅलो, अमूकतमूक आले आहेत का कामावर ? रिसीव्हर धरलेल्या त्याच्या हाताला कंप होता आणि आवाज मनस्वी ओढलेला होता. पलीकडून विचारणा येत असली पाहिजे, कोण हे ? इथे कुठल्या खात्यात कामावर असतात ? आणि ते फोन करणाऱ्याला काही नीटसे सांगता येत नव्हते. तो प्रयत्न करीत होता पण त्याला ते जमत नव्हते. त्याला माहीत होते पण ओठांवटे नीटपणे बाहेर पडू शकत नव्हते. तो वारंवार सांगत होता, मी—त्यांचा भाऊ बोलतोय. आणि पलीकडचा सहनशील आवाज किंवा सहनशील झालेला आवाज—पुन्हा पुन्हा विचारीत असावा, अहो पण ते इथे कुठल्या खात्यात कामावर असतात ते सांगा, इथे कितीतरी माणसे आहेत ! टेलीफोन करणाऱ्यामागचा रांगेतला माणूस एकसारखा सिगरेटचे मोठमोठे झुरके घेत होता आणि टेलीफोन करणाऱ्याकडे डोळे फाडून पाहत होता. अखेर तो जरा रागानेच म्हणाला,

संपवा लौकर. आम्हांलाही फोन करायचे आहेत ! रांगेतली माणसे अस्वस्थ, उतावळी होती. आणि काही केल्या त्या टेलीफोन करणाऱ्याला त्याच्या भावाचे खाते सांगता येत नव्हते. तो सारखा म्हणे, नाही पण तुमच्याच कारखान्यात आहे तो कामाला. मी त्याचा मोठा भाऊ बोलतोय. जरा पाहता का प्लीज ? त्याला फोनवर बोलवा. त्याची आई फार काळजीत आहे बघा.

शेवटी पलीकडच्या सहनशील आवाजाने सहनशीलता सोडली असावी. फोन डिसकनेक्ट झाला असावा. तो नीटसा न बोलू शकणारा माणूस रिसीव्हर कसाबसा पिनवर ठेवून हताशपणे रांगेतून बाजूला झाला. त्याच्यामागचा पुढे झाला. बाजूला झालेल्याला काय करावे ते कळत नव्हते. त्याला त्याच्या भावाचे खातेच आठवत नव्हते ! ठाऊक असून आठवत नव्हते. रोज जिभेवर घोळलेले सारे आज परके झाले होते...त्याच्या काळ्याठिक्कर मुद्रेवर फक्त एक मूढ भाव होता.

रांगेतल्या नंतरच्याने एक नंबर घाईघाईने फिरवला होता. तो एंगेज्ड होता. पुन्हा पुन्हा तो नंबर फिरवीत होता आणि नंबर एंगेज्ड होता. त्याच्यामागचा आता पुढे सरकू पाहत होता. शेवटी निकराने त्या पुढच्याने नंबर पुन्हा एकदा फिरवला आणि तो लागला. नंबर फिरवणाराच्या गोंधळलेल्या मुद्रेवर खुषी उमटली. सिगरेटचा एक प्रदीर्घ झुरका त्याने घेतला आणि छातीभर धूर नाकावाटे सोडला. त्याने नाव सांगितले. त्या नावाचा आवाज पलीकडे फोनवर आला. आणि फोन करणारा धडाधडा सांगू लागला, हॅलो, अण्णा, मी सुखरूप आहे ! मी अगदी व्यवस्थित आहे. मला काही झाले नाही. फार मोठा अपघात आहे. खूप माणसे मेलीत पण मी वाचलो. पुढले डबे चक्काचूर झाले. मला तर प्रथम काहीच कळेना. आणि मग हेच तो अलटून-पालटून ऐकवू लागला...मी वाचलो...फार मोठा अपघात...खूप मेले...मला काही झाले नाही...भलतेच रक्त...गाडीचा चक्काचूर...आणि त्याच्या मागच्याने त्याला बाही खेचून जाणीव दिली, आटपा. मागच्या सर्वांनी याला दुजोरा दिला. मी घरीच जातो, तुम्हांला कळवायला थांबलो असे म्हणून एकदाचा त्या पुढच्याने फोन ठेवला, मागच्यांच्या अंगावर धुराचा एक भपकारा सोडला आणि तरंगल्यासारखा तो चालत निघून गेला. आजच्यापुरता तो भलताच भाग्यवान होता ! तो वाचला होता ! तो जिवंत होता !

त्याच्या मागच्याची बोटे डायलच्या नंबरावर नीट ठरत नव्हती. तो अर्धा नंबर फिरवी आणि 'च्यक' करून तो नंबर बाद करी. असे दोनचारदा झाल्यावर नंबर फिरला, फोन लागला. पलीकडून आवाज आला आणि त्याच्या ओठांवाटे शब्दच उमटत नव्हता. त्याच्या गळ्याची घाटी वरखाली होत होती, ओठ हलत होते. पण शब्द उमटत नव्हते. घशात कसला तरी आवेग दाटून येत होता. पलीकडचा आवाज हॅलो करीत असला पाहिजे. अखेर कसाबसा याने हॅलो केला. अमूकतमूक हवे म्हणून सांगितले. गळणाऱ्या पायांनी तो पुढे काय होते त्याची वाट पाहू लागला. एकेक क्षण त्याला दुःसह्य होत होता. त्याने डोळे झाकून घेतले होते. आणि अखेर पलीकडे ते अमूकतमूक फोनवर आले असावे. कितीदा तरी हा नुसाच विचारीत होता, कोण ? शांता का ? होकार मिळूनही याचा विश्वास बसत नसावा. उत्तर मिळाले की तो 'थँक

यू' असे म्हणून पुन्हा विचारी, शांताच बोलतेय ना ? हॅलो, शांताच ना ? थँक यू. तू सुखरूप आहेस ना ? मी फार काळजीत होतो, शांता, कळल्यावर काय करावे कळेना. आईला तर फेण्टच आली. छोटी रडू लागली. अखेर गाडी पकडून अपघाताकडे गेलो पण तिकडे काहीच कळेना. पोलिसांनी अडवले. म्हणून सारखा फोन करतोय. शांताच ना ? थँक यू. हॅलो, शांता, तू वाचलीस फार बरे झाले ! थँक गॉड शांता, त्या ऑपरेटरला पण माझे थँक्स सांग, त्या भल्या माणसाने तुला फोनवर बोलावून आणले ! बरे आता लौकर घरी ये पण घाई करू नकोस. मी घरी जाऊन सांगतो. अच्छा. शांताच बोलतेस ना तू ? थँक यू...मग ठेवतो तर मी फोन खाली...

फोन ठेवता ठेवता तो तसा पुन्हा पुन्हा शांताला आणि साऱ्या जगाला थँक यू करीत होता आणि त्याच्या मागचा जीव तेवढा उतावळा होत होता.

रांगेच्या शेवटी आता त्या पहिल्या माणसाने पुन्हा नंबर लावला होता आणि सुन्न काळ्याठिक्कर मुद्रेने तो त्याच्या भावाचे खाते आठवण्याचा प्रयत्न बहुधा अजून करीत होता...

# ४१००
# (अधिक काही इकडेतिकडे) खुनी

कलकत्त्यापासून काही मैलांच्या अंतरावर चोवीस परगण्यांचा एक भाग आहे. अनेक छोट्या छोट्या खेड्यांचा हा समूह आहे. बसिरहाट पोलिस ठाण्याच्या अखत्यारीत हा येतो. या भागातल्या एका शेताडीत नुकतेच एका सकाळी एक प्रेत सापडले.

पोलिस आले. पंचनामा झाला. माणूस ओळखण्यात आला. त्याला कोणी वारस नव्हता. त्याचा खून झाल्याचे ठरले. तपास सुरू झाला. खेड्यातून पोलिसतपास कसा आणि काय वेगाने चालतो याची आपणाला कल्पना आहेच. खुनाच्या प्रकरणी एका चौकीदाराला पोलिसांनी पकडले. त्या चौकीदारावर खुनाचा वहीम ठेवण्यात आला.

येथून पुढे घडले ते महत्त्वाचे आहे. शंभर माणसांचा एक घोळका पोलिस ठाण्यावर आला. ही शंभर माणसे अधिकाऱ्यांना भेटून म्हणाली, आम्ही या भागातल्या गावामधली माणसे आहोत. आम्हांला अटक करा.

अधिकारी म्हणाले, कशाबद्दल ? माणसे म्हणाली, आम्ही त्या माणसाचा खून केला. शेताडीत सापडलेल्या प्रेताविषयी ती बोलत होती. अधिकारी म्हणाले, त्याबद्दल चौकीदाराला आम्ही पकडले आहे. शंभर माणसांचा म्होरक्या म्हणाला, आम्हालाही तुम्ही पकडले पाहिजे कारण आम्हीही त्याचा खून केला आहे. अधिकारी म्हणाले, कशावरून ? म्होरक्या बोलला, आम्हीच कबूल करतो आहोत ना. आम्हीही त्या माणसाचे खुनी आहोत आणि चौकीदाराबरोबर आम्हालाही तुम्ही पकडून खुनाच्या खटल्यात गोवले पाहिजे अशी आमची मागणी आहे. म्होरक्याने इतरांना विचारले, काय रे बरोबर ना ? उरलेली नव्याण्णव माणसे

एका स्वरात म्हणाली, होय, बरोबर. आम्ही पण त्या माणसाचा खून केला. आम्हांला पकडल्याशिवाय आम्ही हलणार नाही. आमच्यावर खुनाचा खटला भरला पाहिजे. शंभर माणसे ठाण्यावर ठाण मांडून बसली.

अधिकारी हतबुद्ध झाले. म्होरक्याला बाजूला नेऊन ते म्हणाले, हा काय चावटपणा आहे ? तुम्ही परत जा. खून कोणी केला ते शोधण्याला आम्ही समर्थ आहोत. जे जे दोषी असतील ते सापडतीलच. म्होरक्या नम्रपणे म्हणाला, ती तोशीस साहेब पोलिसांना उगीच कशाला ? पोलिसांना काय कामे नाहीत ? आम्ही स्वतःच शपथपूर्वक 'गुन्ह्यांची' कबुली देतो आहोत. त्या माणसाला आम्ही सर्वांनी मिळून ठार केले.

अधिकारी म्हणाले, शंभर माणसे एका माणसाचा खून कसा करतील ? आम्हांला काय तुम्ही गाढव समजता की काय ? म्होरक्या नम्रतेनेच उत्तरला, नाही नाही साहेब. आम्ही तुमच्याशी या 'गुन्हयांची' तपासात उलट सहकार्य करतो आहोत. आम्ही सर्वांनी त्या हरामजाद्याचा खून केला हे शंभर टक्के सत्य आहे. एकट्या चौकीदाराला जबाबदार धरणे ही फार मोठी चूक होईल. अशी चूक पोलिस करणार नाहीत अशी आमची खात्रीच आहे.

अधिकाऱ्यांनी विचारले, तुम्ही इतक्या लोकांनी ह्या एकट्या माणसाचा खून केला म्हणता तर का केला ? म्होरक्या म्हणाला, त्याचे आमच्याशी वाकडे होते म्हणून. अधिकाऱ्यांनी विचारले, तुम्हा सर्वांशी ? सर्व म्हणाले, होय साहेब. तो तसलाच होता. तो जगण्याच्या लायकीचा नव्हता. शक्य असते तर आमच्यापैकी प्रत्येकाने त्याचा शंभरदा खून केला असता साहेब. पण ते शक्य नव्हते ना. असा भयंकर माणूस. आम्ही कंटाळलो.

अधिकारी म्हणाले, लेखी जबाब द्याल ? सर्व माना डोलवून म्हणाले, देऊ. अधिकारी म्हणाले, फाशी जावे लागेल. सर्व म्हणाले, काय करणार साहेब. गुन्हा केला. शिक्षा भोगलीच पाहिजे. इथे चुकली तरी वर सर्व हिशेब आहेच ना. अधिकारी हाताखालच्यांना म्हणाले, घ्या रे यांचे जाबजबाब. बघू ह्याच लेकाच्यांना नंतरची मजा.

शंभरांचा म्होरक्या म्हणाला, आणखी काही माणसे मागून येत आहेत ती येईपर्यंत थांबू या का साहेब ? काय रे, थांबू या का ? नव्याण्णव म्हणाले, हां, थांबू या की. अधिकारी म्हणाले, आणखी माणसे ? कोण माणसे ? म्होरक्या म्हणाला, त्या हरामजाद्याचे खुनी. आणखी खुनी आहेत ? म्होरक्या लीनतेने म्हणाला, हां साहेब. आणखी निदान चार हजार तरी. अधिकारी ओरडले, काय ? म्होरक्या लीनता न सोडता म्हणाला, वरकड काही इकडेतिकडे निघतील ते निराळे. पण सर्वांना गुन्हा साफ साफ कबूल आहे. सर्व येऊन हजर होणार आहेत. तुम्ही फक्त जबाब तेवढे घ्यायचे आणि खटला भरायचा. बस्स.

अधिकारी हतबुद्ध झाले. शंभर खुनी त्यांच्यासमोर शांतपणे बसून होते. आणखी चार हजार आणि वरकड इकडेतिकडे काही येऊ घातले होते. हे सर्व एका माणसाचे खुनी. अधिकारी डोके जाऊन त्या शंभरांना शेलक्या शिव्या घालत बोलले, पोलिसांना काय बैल समजता काय तुम्ही लोक ? एका माणसाच्या खुनाबद्दल इतके सगळे आरोपी ? हा काय बनाव आहे ? म्होरक्या म्हणाला, बनाव नव्हे, ही वस्तुस्थिती आहे सरकार. तो खून झालेला पाजी माणूस या

सर्व भागाला उपद्रव झाला होता. लोकांनी सांगून पाहिले, धमकावून पाहिले, चोप देऊनसुद्धा पाहिले; एकदा तर अर्धमेला होईतोवर मारला. पण त्याचे आपले वाकडे ते वाकडेच. आता त्याला पूर्ण मारण्याशिवाय काय मार्ग उरला होता सांगा.

अधिकारी जोराने म्हणाले, पोलिसात तक्रार गुदरायची. नव्याण्णव म्हणाले, केली सरकार. वारंवार केली. पण दाद घेतली नाही. म्होरक्या त्यांना दटावीत बोलला, ए, गप्प रहा रे लेकोहो. पोलिसांना काय दुसरी कामे नाहीत ? त्यांना काय फक्त तुमच्या तक्रारीचा तपास लावण्याचेच काम आहे ? पोलिस कसले बिझी असतात आजकाल. काय साहेब ? यांना वाटते की यांच्या तक्रारीची दाद लावण्यासाठी गव्हर्मेंटने पोलिस खाते काढले आहे ! बरोबरीच्या नव्याण्णवांना तोंडातल्या तोंडात शिव्या घातल्यासारख्या केल्या, म्हणाला, हुजूर, बाकी आरोपींना बोलवून घेऊ ? ते येण्याला तयारच आहेत.

अधिकारी बुचकळ्यात पडले. त्यांनी कसेबसे शंभरांना बाबापुता करून तात्पुरते परतवले, पण त्या चौकीदारावर अजून खटला भरला गेलेला नाही. या विलक्षण खुनाचे काय करावे या विचारात पोलिस असावेत. एका माणसाच्या खुनाबद्दल चार हजारांवर आरोपी करून खटला कसा चालणार ? आणि सर्व गावकरी म्हणतात, आम्ही सर्वच खुनी आहोत. चौकीदाराने आणि आम्ही सर्वांनी खून केला. आम्हा सर्वांवर खटला चालला पाहिजे. आमच्या सर्वांच्या जबान्या घ्या.

# मुके कबूतर

एक दिवशी अदृष्टातून यावे तसे ते आमच्या सज्जाच्या कठड्यावर येऊन उभे राहिले. शुभ्र कबूतर. सज्जात उतरून ते आमच्या बेडरूममध्ये गेले. आमच्याकडे त्याने मान जरा कलती करून एकदा पाहिले; त्याच्या काळ्या मण्यासारख्या नि धीट डोळ्यांनी एकटक.

माझ्या मुलाने पुढे होऊन त्याला धरून अल्लद उचलले. त्याचा एक पंख आतल्या सांध्याशी रक्ताळला होता. रक्त ओले होते. त्या अर्थी कोणीतरी गलोलीने त्याला नुसते घायाळ केले असावे. त्याला उडता येत नसावे. म्हणून ते आडोशाला आले. माझ्या मुलाने त्याला गोंजारले. ते अद्याप निश्चिंत नव्हते. मुलाच्या बोटांना प्रतिकाराच्या टोचा मारण्याचे त्याचे प्रयत्न चालू होते. मध्येच हे प्रयत्न वाढत. मग पुन्हा ते शुभ्र कबूतर स्तब्ध होई.

मुलाने त्याला नाव ठेवले. त्याच्या पंखाला हळद लावली. त्याच्याकरता घर केले. त्या रात्री तो त्या शुभ्र कबुतराची आठवण करीतच झोपला. पोपट, लव्ह बर्ड्स, मासे यांच्या जोडीला त्याच्या 'कुटुंबा'त एक नवी भर पडली होती : शुभ्र देखणे कबूतर.

दुसऱ्या दिवशी नवा शोध लागला. ते कबूतर आवाज करीत नव्हते. घुमत नव्हते. गुटर्रघुम गुटर्रघुम हा कबुतराचा ओळखीचा खर्ज त्याच्या गळ्यावाटे येत नव्हता. ते मुके होते. कदाचित पंखाला बसलेल्या दगडाने त्याची गळ्याची नस जाया केली असली तर न नकळे. पण दुसऱ्या दिवशी ते 'बोलले' नाही, तिसऱ्या दिवशी नाही. ते आपले निःशब्द. आपली फुगीर डौलदार पांढरीशुभ्र मान एकदा अशी आणि एकदा तशी करीत ते शक्यतो एका जागी मुकाट्याने उभे असे. आमच्या एका टेबलावरचा बेडलॅंप त्याचा विशेष आवडता. त्याच्या शेडवर एक पाय

उचलून ते तास न् तास राही. रात्री केव्हाही पहा, ते तिथेच. एकदाच टेबल-लँप त्याने पाडला होता आणि टेबल-लँपच्या जागी ते उभे होते; टेबल-लँपवर उभे असे तसेच. तसे उभे असले की ते कसली तरी तपश्चर्या करते आहे असे वाटे. चोचीवाटे चकार आवाज नाही. डोळे आत वळल्यासारखे निश्चल आणि एका लालसर पायावर आपले ते अथक उभे. शुभ्र, मुके कबूतर. मुके तितकेच गोजिरवाणे.

बघता बघता ते आमच्या घराचा भाग झाले. त्याच्या पेटंट जागी ते नसले की कुठेही असे. आवाज नसल्याने कळत नसे. शोधावे लागे. अंधाऱ्या जागी शुभ्र रंगाचा तो फुगीर डौल ध्यानस्थ दिसे. क्वचित ते तपश्चर्या मोडून भ्रमंतीला निघे. आमच्या मधून मान एकदा अशी एकदा तशी कलती करीत संथ पावले टाकीत जाई तेव्हा नकळत फॅशन शोमधले मॉडेल वाटे. कधी ते थोडे उडून पाही. पण त्याच्या आवाजासारखा त्याचा आत्मविश्वासही हरवला असावा. त्याच्या हालचालींत ते कळे. काहीतरी हरवल्यासारखे ते असे. आता त्याचा पंख बरा होता. त्या पंखाला हात लावला तर ते अंग चोरत नसे. पिंजऱ्यातल्या पोपटाला त्याच्या शेजारी ठेवले की ते पोपटाकडे पाहत राही. पोपट आवाज करी, पिंजऱ्यात धडपडून कबुतराशी बोलू पाही. पुनःपुन्हा आणि कर्कश्श बोले. रागाला आल्याप्रमाणे करी. मुके कबूतर पहात राही. त्याला काही बोलायचे असेल का ? की बोलण्याची इच्छाच त्याने हरवली होती ? त्याच्या मानेला किती चाचपले तरी त्याला दुखत नव्हते. मानेला कुठे जखम नव्हती, वण नव्हता. म्हणजे त्याच्या गळ्याला काहीच झाले नव्हते. मग ते का बोलत नव्हते ?

मग एकदा सज्जातून त्याने अचानक हवेत झेप घेतली. 'उडाले', 'उडाले' असा घरात एकच ओरडा झाला. माझा मुलगा गडबडला. ते तिकडे गेले, ते पहा तिकडे बसले असे उद्गार उमटले. कबुतराला पकडून आणण्याची तयारी मुलाने केली. पण पुन्हा फडफड झाली. कबूतर हवेत पंख हलवीत गेले तसे परत सज्जात येऊन पोचले. सुटकेचे श्वास सुटले. कबुतराविषयी कौतुकाचे उद्गार निघाले. शहाणे आहे नाही बिच्चारे ? माझी मुलगी म्हणत होती. कबूतर पहात होते. काही म्हणत नव्हते.त्याला त्याचा आत्मविश्वास परत मिळाला होता ? की ते घाबरले होते ? कसे कळणार ? ते नुसतेच मान मागेपुढे करीत आमच्याकडे पाहत होते ! त्याच्या काळ्याभोर मण्यांच्या डोळ्यात काहीच जाणवत नव्हते. मग पुन्हा ते ध्यानस्थ झाले. हे कबूतर जास्त जास्तच गूढ वाटत होते. माझ्या मुलाने विचारले, कबूतर पुन्हा उडाले तर ? मी म्हटले,परत येईल. मला ऐकल्याचे आठवत होते, कबूतर कुठेही उडाले तरी मूळ जागी परत येते. आमचे मुके कबूतर उडून परतलेच होते. मुलाला निश्चिंत वाटले की नाही माहीत नाही.

आता ते कबूतर घरात चांगलेच रुळले होते. त्याचे वेगळे अस्तित्व जाणवेनासे झाले होते. जागोजाग ते शिटून ठेवी तेवढाच त्याचा त्रास होता. त्याच्या सौंदर्यामुळे नि मुकेपणामुळे या त्रासाचे कोणाला काही वाटत नसे. पोपटावर याबद्दल प्रत्येकाचा राग. पण कबुतरावर प्रेम. 'बिच्चारे' म्हणूनच त्याचे उल्लेख होत. ते घरातले झाले होते पण घरातल्या कोणी अंगझटीला येणे त्याला आवडत नव्हते. ते लांब राही. लांबून माणसांशी ओळख ठेवी. माझ्या मुलाने धरले



तर धरून तरी घेई. एरवी फडफडून लांब होत असे. हे सारे करताना ते पाळी ते मौन उगीच अर्थपूर्ण वाटे, न बोलून ते शहाणे वाटे. घरात घरातल्यासारखे राहून ते कबूतर पुन्हा त्याचे स्वातंत्र्य राखून होते.

परवा मी सकाळी दिल्लीहून आलो. टॅक्सीतून घराशी उतरताना सहज वर पाहिले. तर आमचे शुभ्र मुके कबूतर सज्जाच्या कठड्यावर नेहमीच्या डौलाने बसून मान अशीतशी कलती करीत बाहेरचे जग एकाग्रतेने न्याहाळत होते. वर, खाली, इतस्ततः उत्सुकतेने, अबोल धिटाईने एकटेच पाहत होते. आमचे लोकविलक्षण कबूतर. टॅक्सीचे पैसे देऊन मी वर जातो तर फडफड उमटली. दार उघडून घरात पोचतो तर कबूतर उडाले होते. सज्जावरून उंच उडत कुठे तरी निघून गेले होते. बायको म्हणाली, कबूतर उडाले. तिच्या स्वरात काळजी होती. भीती होती. मी तिच्या काळजीचे निराकरण करीत म्हटले, ते परत येईल. त्याला जखडून थोडेच ठेवायचे आहे ? ते आता उडणारच. पण ते परत येईल. कबूतर कुठेही उडाले तरी मूळ जागी परत येते. तू काळजी करू नकोस.

आज पाच दिवस झाले. आमचे कबूतर परतलेले नाही. एक दिवशी अदृष्टातून यावे तसे आमच्या सज्जाच्या कठड्यावरून आमच्या घरात उतरलेले कबूतर. पुन्हा ते अदृष्टात निघून गेले आहे. शुभ्र कबूतर. मुके, मुके कबूतर. आम्हा सर्वांना मनोमन कळले आहे की ते आता परत येणार नाही. तरी आम्ही कधी कधी त्याची वाट पाहत असतो.

# एका माथेफिरूचा मृत्यु-लेख

एक भयंकर आणि खुनी माथेफिरू वेड्याला आपल्यांतून शुक्रवारी आपण कमी केला. शुक्रवारी सकाळी मुंबईच्या पश्चिम रेल्वेच्या दादर स्टेशनात आपण त्याला ठार मारला. त्याला कसे मारले त्याचे प्रसिद्ध झालेले वर्णन असे आहे : वेडा लोकल गाडीच्या डब्यातील वस्तू ठेवण्याच्या फळीवर चढला होता. प्रथम संतप्त लोकांनी त्याला काही वेळ तेथेच दगडांनी ठेचले. मग कोणी डब्याची दरवाजातली उभी लोखंडी कांब उपटून तिने त्याला मारण्याला सुरुवात केली. तेव्हा वेडा पालथा भुईवर पडला. मग जो तो हाती मिळेल त्या वस्तूने, हत्याराने त्याला मारण्याला सरसावत होता. यानंतर त्याची तंगडी धरून त्याला फरफटत डब्यातून प्लॅटफॉर्मवर आणून टाकले आणि पुन्हा सर्व त्याच्यावर तुटून पडले. प्लॅटफॉर्मवर बांधकामाचे साहित्य पडले होते त्यातल्या कुदळी काहींनी उचलल्या. त्या वेड्याचे डोके ठेचून काढले. एका संतापलेल्याने माती उरकण्याचा टिकाव उचलला आणि तो त्या वेड्याच्या पोटात खुपसून त्याची आतडी त्याने बाहेर खेचली. तरीही लोकांचे समाधान झाले नाही. रेल्वेच्या डब्यांत उभ्याने हातांनी पकडण्यासाठी ज्या लोखंडी दांड्याअसतात त्या खेचून त्या वेड्याच्या निष्प्राण कलेवरावर वार करण्यात येत होते. बातमीत असे म्हटले आहे की पोलिसांनी लोकांना आवरेतोव्र त्या वेड्याचा 'लगदा' झाला होता.

अशा प्रकारे हा खुनी वेडा शुक्रवारी नष्ट केला. त्याला वर वर्णन केलेल्या प्रकारे मारणारे खुनी नव्हते. ते उतारू होते, ते नागरिक होते. त्यांतले बहुसंख्य कुटुंबवत्सल होते. त्यांतले कित्येक एरवी शांततेने जगणारे होते. एका जिवंत माणसाला इतक्या भयंकरपणे ठार मारण्याचे, प्रत्यक्ष

ठार करण्यापूर्वी तासभर त्यांच्या मनाच्या मनातसुद्धा नसेल. त्यांच्या मनात विचार असतील ते घराविषयीचे, आप्तसुहृदांविषयीचे, मुलाबाळांविषयीचे, सध्याच्या महागाईविषयीचे आणि असल्यास सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधिशांच्या नेमणुकीविषयीचे. कारण ती त्याच दिवशी प्रसिद्ध झालेली खळबळजनक बातमी. त्या दिवशी त्या खुनी वेड्याला ठार करण्याच्या रौद्रभीषण सोहळ्यात सहभागी झालेल्या अनेकांना त्यानंतरही 'खून' म्हटले की कापरे भरेल. ब्लेडने निघालेले रक्त बघून ते शहारतील. याच उतारूंनी, नागरिकांनी, कुटुंबवत्सल आणि



शांतताप्रेमी माणसांनी शुक्रवारी अहमहमिकेने एका जिवंत खुनी वेड्याला दातओठ खाऊन ठार करून वर त्याचा 'लगदा' केला, ही वस्तुस्थिती आहे.

हे घडले कारण लोक मर्यादेबाहेर संतापले होते. हाती नागवा चाकू नाचवणाऱ्या त्या माथेफिरूने अकारण दोन खून पाडले व अनेकांना जखमी केले. ज्यांचे त्याने खून पाडले व

ज्यांना भोसकले ते त्याचे शत्रू किंवा मित्र नव्हते. ते त्याचे कोणीच नव्हते. त्यांना तो आणि त्याला ते त्या वेळी प्रथमच पाहत असतील. त्याने चाकू उगारून सपासप एकेकाच्या मांसात भोसकण्याचा सपाटाच लावला. अडवण्याला जात होता त्याला तो भोसकत होता. नजरेला पडत होता त्यावर चाकू चालवत होता. रक्ताने चाकू भरला होता. त्याच्या डोळ्यांत, मुद्रेवर, गात्रागात्रांत खून चढला होता. त्याच्या त्या भयंकर आणि निष्कारण 'नरमेधा'ने (एका वर्तमानपत्राने वापरलेला शब्द.) लोक चिडले. प्रथम ते स्तिमित झाले, कचरले. मग आपल्या संख्याबलाचे भान येताच खवळले. हा एकटा अधम शेकडो माणसांच्या डोळ्यांसमोर अशा प्रकारे स्वैर खुनी हल्ले करतो आहे हे आव्हान त्यांनी अखेर स्वीकारले आणि त्याला ठेचून ठेचून मारले. तो मेला तरी ते त्याला मारतच राहिले. मेंदू आणि आतडी बाहेर आलेल्या देहावर घाव घालतच राहिले. पोलिसांनी आवरले तेव्हाच ते नाइलाजाने थांबले.

प्रथम निष्कारण खुनी हल्ले चढवणारा तो माथेफिरू आणि वेडा होता, तो 'पिसाळला' होता, त्याचा सारासारविवेक इतकेच नव्हे तर आपण करतो आहोत त्या कृतीचे भानही हरपले होते, हे साऱ्या वर्तमानपत्रांनी म्हटले आहे. पिसाळलेल्या कुत्र्याला गोळी घालतात. माणूस पिसाळतो तेव्हा तेच करावे या न्यायाने तो पिसाळलेला माणूस ठार केला हे योग्य ठरू शकेल. परंतु कुत्र्यांना लावण्याचा न्याय माणसांना तसाच्या तसा आपण माणसांनी लागू करायचा काय, हा एक प्रश्न. तो लागू करण्याचे आपण अद्याप रीतसर तरी मान्य केलेले नाही. एरवी वेड्यांची इस्पितळे, तुरुंग, पोलिस, न्यायालये इत्यादींची गरज नव्हती. पिसाळलेल्या कुत्र्यांपेक्षा पिंसाळलेल्या माणसांसाठीचे कायदे आणि अशा माणसांचा दर्जा आपण कागदोपत्री तरी अद्याप वेगळा मानतो. त्याहून महत्त्वाचा प्रश्न या घटनेने आपल्यापुढे ठेवला आहे तो निराळाच आहे.

तो खुनी माथेफिरू उघडच डोके गमावलेला, पिसाळलेला होता. परंतु त्याला मारणारे आपण इतर सर्व त्या वेळी डोके न गमावलेले, सारासारविवेक चांगला शाबूत असलेले, आपण काय करत आहोत याचे भान असलेले वाटतात काय ? आरंभी दिलेला, त्या घटनेचा सर्व अधिकृत तपशील काळजीपूर्वक वाचला, तर याविषयी निखालस खात्री देता येते का ? उदाहरणार्थ, सारासारविवेक शाबूत असलेले, मेंदू आणि आतडी बाहेर पडलेले प्रेत लोखंडी गजांनी बडवीत राहतात काय ? मग आपणही तेव्हा पिसाळलेलेच असू, तर त्याला त्यातला जो न्याय आपण लागू केला तो त्यानंतर आपल्यालाही...

अर्थातच लागू व्हायला नको होता. कारण हा न्याय देणारेच या न्यायाला बळी पडले तर न्याय देण्याला कोण शिल्लक उरणार ?

तेव्हा, एका खुनी, माथेफिरू वेड्याला आपण शुक्रवारी सकाळी मुंबईच्या दादर स्टेशनात न्याय दिला. ईश्वर त्याच्या आत्म्यास सद्‌गती देवो. नव्हे, ती त्याला मिळालीच असणार.

# एका खलपुरुषाचा अंत

सांयकाळ.

अक्षरशः हजारोंच्या गर्दीने वल्लभभाई पटेल स्टेडियम तुडुंब भरलेले असायचे. एखादे भले प्रचंड मधाचे मोहोळ गुणगुणून उठावे तसे स्टेडियम निनादत असायचे. उत्सुकता शिगोशिग भरून ओसंडत असायची. टाळ्या, ओरडा, शिट्या...

किंवा ते भले प्रचंड स्टेडियम इथेतिथे तुरळकच भरून बाकी नुसतेच ओकेबोके पडलेले असायचे. एखाद्या अर्धनिद्रित अजगरासारखे ते कुठे कुठे क्षीण हालचाल करीत असायचे. उजळलेल्या दिव्यांच्या उजेडात त्याचे न भरलेले भाग भयाण वाटायचे.

यातले काहीही असले तरी घंटेचा आवाज होताच तो मधोमध उंच बांधलेल्या चौकोनी रिंगणात दोरखंडामधली फट रुंद करून सफाईने प्रवेश करी. बिनकेसांचे लहान डोके, नक्षीदार सैल रंगीत झबल्यातून उठणारी लोंबती केसाळ छाती, भले गरगरीत पोट, भक्कम बाहू, निमुळते तरी वरचे चारशे पौंडांचे वजन लीलया पेलणारे जरा आखूड विजारीतील घट्ट पाय आणि या साऱ्याचा विचार करून कोणी चिकटवावी तशी हनुवटीशी एक आखूड काळी दाढी. चौकोनी, बेढब वाटणारा एकूण बांधा. मनात एक प्रकारची घृणा जागी करणारे रिंगणातले अनाकर्षक व्यक्तिमत्त्व.

तो रिंगणात येताच प्रेक्षकांतून हमखास कुत्सित आवाज आणि उद्गार निघत. तारस्वरात अपशब्द उठत. कसली कसली टरफले, साली, क्वचित फाटकी वहाण नाही तर जोडादेखील रिंगणाच्या दिशेने फेकला जाई.



तो जणू हा आपला सत्कारच होतो आहे अशा पद्धतीने प्रेक्षकांना उद्देशून एक हात वर करीत रिंगणात थोडा फिरे. मग अंगातले काढून उघडा होई. लांबून आणखीनच बेढब, उतरला, फोपश्या वाटे. मग तुमान कसून घेई. शरीराचे लालबुंद जडसर बोचके रिंगणात वेगवेगळ्या पद्धतींनी हलवून, ताणून आणि आपटून त्याला एक घट्टपणा आणी. दरम्यान 'माइक'वरून घोषणा चाललेली असे, लाल बत्तीके बाजू है दुनियाका सबसे बडा मशहूर पहिलवान...और हरे बत्तीके बाजू...

त्यानंतर रिंगणात पंचे शिरे. दोन्ही पहिलवानांना कुस्तीचे नियम समजवण्याचा ठरीव विधी उरकला जाई, जवळ काही गुप्त शस्त्र वा वस्तू त्यांनी लपवून तर आणलेली नाही, त्यांची नखे वाढलेली तर नाहीत, याची औपचारिक तपासणी पंचातर्फे होई आणि कुस्तीतल्या दोघा प्रतिस्पर्ध्यांची हातमिळवणी आणि सलामी झडे.

हे चालू असतानाही हा सतत चिडचिडलेला, तिरसट वाटे. पंच आणि प्रेक्षकांविषयीची त्याची नफरत क्षणोक्षणी व्यक्त होई. प्रतिस्पर्ध्याशी त्याचे वागणे आरंभापासून दर्पाचे आणि मनस्वी तुच्छतेचे असे. हावभावांनी तो त्याला एकसारखा धमकावीत असे. त्याच्या अंगावर चालून गेल्यासारखे करी. याचे हे वागणे आणि याचे उतरल्या पपयासारखे वाटणारे शरीर यांनी प्रेक्षकाला याच्याविषयी तिरस्कार न वाटता तरच नवल होते. तुलनेने याच्याविरुद्ध खेळणारे पहेलवान याच्यासमोर कसेही असले तरी उमदे, सरळ आणि बांधेसूद वाटत. ते लोकप्रिय होत. हा मात्र कायम त्या रिंगणातला खलपुरुष असे. अनेक उमद्या पहिलवानांना हा लोळवी

आणि प्रेक्षक याच्यावर तेवढा अधिक राग करीत. याचा डाव सदा रडीचा. खेळ अनेक नियमबाह्य सवयींनी भरलेला. पुन्हा वर याचा कागांवखोरपणा. अनेक पहिलवानांना असल्या खेळाने रिंगणात जाया करीत, रिंगणाबाहेर फेकीत किंवा गुणांवर हरवीत हा कुस्त्यांच्या चढत्या मोसमात अखेर एखाद्या अतिशय लोकप्रिय जेत्या पहिलवानांशी कुस्ती लढण्याची शीग गाठायचा. स्टेडियमवर तुफान गर्दी लोटायची. टॅक्सी ड्रायव्हर्स, हॉटेलातले नोकर, वेश्या, मजूर, हमाल, झुंडींनी स्टेडियमवर धावायचे, उत्सुकतेने पांढरपेशे तर चूषखातर भारी तिकिटात उच्चवर्गीय यायचे. मुंगी फिरकण्याला जागा राहत नसे. स्टेडियम गच्च भरे. तिकिटे न मिळाल्याने बाहेर दंगे होत. कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवला जाई. मंत्री येत. पुढारी येत. फिल्मी स्टार्स येत.

आणि होणाऱ्या कुस्तीत हा आपल्या नियमबाह्य खेळाची कमाल दाखवून पहिल्या फेऱ्या जिंकून घेई. लोकप्रिय 'हिरो' हरत असे. वर्मी मार खात असे. प्रेक्षकांचा पारा फेरीगणिक चढू लागायचा. ओरडा वाढू लागायचा. आणि बघता बघता पारडे उलटे फिरत असे. 'हिरो' वरचढ होऊ लागे. हा मार खाऊ लागे, उचलला जाई, हापटला जाई, तंगडी-तोड डावाचा तात्पुरता बळी झालेला दिसे, याच्या पाठीपोटावर प्रतिस्पर्धी नाचे. वेदनेने हा चित्कार करी तसे प्रेक्षक हर्षभरित होत. बेढब जाड्या देहाची वळकटी होऊन प्रतिस्पर्ध्याच्या अडकवलेल्या पेचात हा 'नो, नो' डरकाळत धडपडे, तडफडे, रिंगणाच्या भुईवर मुठी आपटून वेदना हलक्या करी तेव्हा प्रेक्षक गुदगुल्या होऊन किंचाळत, मारो, मारो सालेको. छोडो मत ! हा पेचातून सुटला की उभे स्टेडियम एका आवाजात हळहळे. हा गुंतला की एकच थरार साऱ्या स्टेडियममधून जणू धावत जाई. हा विनयभंग करून नियमभंगाच्या खोट्या तक्रारी पंचाकडे करी, वाद घाली, पंचावर धावून जाई तेव्हा साऱ्या स्टेडियममध्ये हजारो मुठी उगारल्या जात. चाकूदेखील बाहेर पडत. हा प्रेक्षकांना उद्देशून रिंगणात थुंकत असे, हातवारे करी तेव्हा साऱ्या स्टेडियममधल्या तमाम प्रेक्षकाला जणू ते त्याच्या पुरुषार्थाला आव्हान वाटे. आणि अखेर त्या लोकप्रिय पहेलवानाहातून हा हरला की रावण, नरकासुरादि मानवतेच्या उभ्या इतिहासातील दुष्ट खलपुरुषांचे पारिपत्य झाल्याच्या खुषीत स्टेडियमवरचे हजारो प्रेक्षक दहा दहा मिनिटे तारस्वरात एकच जल्लोष करीत तो पार वरळीच्या लोटस सिनेमापर्यंत ऐकू जात असे. सडकेने जाणारे म्हणत,साला किंगकाँग हारा होगा.

जय आपलाच आहे असे या जल्लोषात रिंगण न सोडता वारंवार जाहीर करणाऱ्या आणि पंचाला, प्रतिस्पर्ध्याला, प्रेक्षकांना, साऱ्या जगाला शिव्याशाप देणाऱ्या याच्यात जणू जो तो आपले पराजय पाही. आपल्या अवहेलना ज्याला त्याला इथे समूर्त दिसत, आणि या पराजयावर, अवहेलनेवर जो तो एकदा थुंकून घेई. एक गलिच्छ शिवी देऊन घेई. अखेर हा रिंगण सोडून नाइलाजाने प्रेक्षकांमधल्या वाटेने जाई तेव्हा निर्भत्सनेचा गजर होई. चौफेर छीः थूः घडे. याच्यावर केळ्यांच्या साली, फाटक्या वहाणा येऊन पडत. वेश्या याला फिदीफिदी हसत. हरला तरी दर्पाचे पोकळ फूत्कार टाकीत हा पॅव्हिलियनमध्ये अदृश्य होई आणि दुनियेतल्या तमाम खलपुरुषांचा बुद्दू, असंस्कृत, किळसवाणा प्रतिनिधी किंगकाँग अंतर्धान

होई. पॅव्हिलियनमध्ये शिरे तो एक गंभीरप्रकृती प्रौढ इसम. आता जवळून तो बुद्धिमान दिसे. त्याच्या अंगप्रत्यंगात रग आणि ताकद जाणवे. त्याचे डोळे विलक्षण सावध आणि चलाख वाटत. त्याच्या भव्य भाळावर, जिवणीत विचारी आणि सुसंस्कृत वळण भासत असे. कुस्तीचा पोषाख उतरल्यावर त्याने जणू एक आभास उतरवला असे वाटे. वेगळ्या शर्ट-पँट असल्या पोषाखात तो निराळाच होई. उगीच कमी जाड, कमी बेढब वाटू लागे. तो मोठाड देहाचा संवेदनाक्षम आणि सभ्य माणूस भासत असे, अंतर्बाह्य सभ्य, सौम्य. आकार आणि कांती सोडल्यास चारचौघांशी नाते सांगणारा. चारचौघांप्रमाणेच एक बरेवाईट आयुष्य जगणारा, जगू मागणारा. हसणारा, अंतर्मुख होणारा, तुमचे-आमचेच अन्न तुमच्याआमच्याइतकेच खाणारा, (प्रसिद्धी मात्र सात कोंबड्या, चोवीस अंडी इ.) मधुमेहासारख्या विकाराने पोखरला जाणारा आणि तरी पोटाचा धंदा म्हणून कर्तुमकर्तुम मदोन्मत्त म्हणून आठवड्यातून दोनचारदा रिंगणात मनसोक्त तमाशा करणारा.

कुस्ती हे त्याचे नाटक असे. या नाटकात तो भूमिका करी. हे नाटक तुफान रंगले तरच त्याला बरी प्राप्ती असे. रंगतीसाठी एक कॉमिक, एक व्हिलन फ्रीस्टाइल कुस्त्यांच्या रंगमंचावरही लागतात. हा एका वेळी दोन्ही होई. आपली भूमिका त्याने विचारपूर्वक, परिश्रमपूर्वक बसवली होती. त्यात त्याची कधीही कसूर नसे. या भूमिकेचे एक वेगळे व्यक्तिमत्त्व त्याने कल्पिले होते, आपल्या व्यक्तिमत्त्वासाठी एखाद्या चपखल पोषाखाप्रमाणे हे व्यक्तिमत्त्व त्याने बेतले होते. हे दुसरे व्यक्तिमत्त्व पहेनून तो रिंगणाकडे चालत जाई तेव्हा वेगळा होई. मग परतेपर्यंत हे ढळत नसे की सुटत नसे. त्याला बिलगून राही. प्रेक्षकांना हेच खरे वाटे कारण त्यांना हेच हवे असे—शिव्याशाप आणि जोडे वाहण्यासाठी एक समूर्त, किळसवाणा दुष्टावा, हलकटपणा, रडीचा डाव.

सर्कसमधल्या विदूषकाची अशीच दोन व्यक्तिमत्त्वे असतात. एक अनाकर्षक, रुक्ष, गद्य, खरे. दुसरे तुफान हास्यकारक आणि सर्वांना हवेसे वाटणारे. नटाला दोन व्यक्तिमत्त्वे असतात. नेत्यांना असतात. सर्कसऐवजी फ्रीस्टाइल कुस्तीचे रिंगण पत्करणाऱ्यांनाही ती असतात. एक लोकप्रिय, दुसरे खरे. हा कुस्तीच्या रिंगणात विदूषक होऊन आपल्या बेढब उघड्या बांध्याचे प्रदर्शन करी. नट होऊन एक असंस्कृत आणि दुष्ट भूमिका वठवी, नेत्याप्रमाणे लोकरंजन आणि लोकक्षोभ या दोन तारांवर लीलया वावरत राही; कलावंतालाही अभ्यसनीय वाटेल असा अस्सलाचा यशस्वी थरारक भास, नकली वेदना, नकली क्रोध, नकलीच हिंसा यातून निर्माण करून गर्दीला घटका-घटका, दिवस-दिवस, महिने न् महिने झुलवत ठेवू शके. तिच्याशी यातून त्याने द्वेषाचे, तिरस्काराचे घट्ट, दाट, अतूट असे नातेच बांधले होते आणि या नात्याच्या जोरावर फ्रीस्टाइल कुस्त्यांच्या मैदानावर तो पैसा देणारा एक धंदा यशस्वीपणे करीत होता. त्याला नावाने आणि प्रत्यक्ष ओळखत नाही असे कोणी या महानगरात नव्हते. अक्षरशः घरोघर त्याचे नाव होते.

फ्रीस्टाइल कुस्त्यांचा बहर संपला आणि किंगकाँग, दारा सिनेमात घुसले. किंगकाँग तिथे रमला नाही. रिंगणात एका अंतरावरून अतिशय खरी वाटणारी त्याची बुद्दू, बेढब, महाकाय

क्रूरकर्म्याची हातखंडा भूमिका कॅमेऱ्यापुढे तेवढी टिकली नाही. उलट दाराचा बांधेसूद तगडा देह आणि उमदा रांगडा चेहरा कॅमेऱ्याला तेव्हाच पटला.

किंगकाँग ही मुंबईपुरती एक दंतकथा उरली. ओक्याबोक्या वल्लभभाई पटेल स्टेडियमकडून जाताना ही न चुकता स्मरत असे. ते फ्रीस्टाइल कुस्त्या नामक रंगतदार, दणकेबाज, क्षणोक्षणी श्वास अडविणाऱ्या नाटकांचे दिवस...ती किंचाळती, हेलावती, मुठी वळवळून रिंगणाकडे धावत किंगकाँगचे रक्त मागती प्रेक्षकांची गर्दी...ते रिंगणातले चीत्कार, हुंकार...दहा दहा रुपयांची तिकिटे काढून पुढे मोक्याच्या जागा अडवून बसणारे ते हमाल, हॉटेल-पोऱ्ये, टॅक्सीवाले...त्यांच्या तोंडच्या दारूचा आणि मारो, खतम करोचा अति उग्र दर्प...आणि रिंगणात लढतीच्या फेऱ्यांच्या अध्येमध्ये, रिंगणाकडेस, दोरखंडावर रेलून दुखावलेला हातपाय एकीकडे सीधा करीत, जमलेल्या गर्दीचा नजरेने अंदाज घेत सुखावणारा किंगकाँग नावाचा हंगेरी देशाचा, देशोधडी लागून कुस्त्या खेळत फिरणारा, धंदेवाईक नरराक्षक—हंगेरीत केव्हातरी एका पत्नीचा पती, मुलाचा पिता असलेला. दोहोंचीही राजकीय उठावात कत्तल झाली.

नुकतीच एक छोटी बातमी वृत्तपत्रात मागील पानावर प्रसिद्ध झाली. सिंगापूरनजीक एका भयंकर मोटार अपघातात किंगकाँग ठार झाला. त्याच्या हाडाचा चक्काचूर होऊन गेला. याच बातमीत वयही होते. जेमतेम पन्नास, आणि खरे नाव : एमिल झाया.




पत्रलेखन

ह्या विभागात पुढील व्यक्तींना श्री. विजय तेंडुलकरांनी वेळोवेळी लिहिलेली पत्रे खालील अनुक्रमाने छापली आहेत :

सौ. निर्मला तेंडुलकर

सुषमा तेंडुलकर

तनुजा तेंडुलकर (मोहिते)

बंट्या ऊर्फ आदित्य राजेंद्र तेंडुलकर

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

श्री. पु. भागवत

म. द. हातकणंगलेकर

महानगरपालिका आयुक्त स. शं. तिनईकर

प्रकाश होळकर

# पत्रलेखन

*प्रिय निर्मल,*

*तुझा निरोप घेऊन काल सकाळी निघालो आणि वेळेवर मुंबईत पोचलो. लाँड्रीतले कपडे ४ शिवाय मिळणार नव्हते म्हणून दुपारी ३.२० च्या गाडीऐवजी संध्याकाळी ५.२० ची गाडी घ्यावी लागली. दरम्यान अर्गजा आणायला वेळ होता, आठवणही होती, पण जवळ पैसे पुरेसे नव्हते. तुला १० रु. आणि बाबूला १ रु. दिल्यावर माझ्याजवळ ८ रु.च उरले होते. ते जाण्या-येण्याच्या प्रवासखर्चासाठी ठेवणे आवश्यक होते. ऑफिसातून जास्त मिळू शकले नाहीत. तू कदाचित बाबू ताईकडून घरी गेल्यावर त्याला विचारलं असशील आणि त्याने काही न आणल्याचं पाहून निराश झाली असशील. पण तू आपल्या इथे येणार त्या दिवसाच्या तयारीत अर्गजाची एक बाटलीही असेल याबद्दल खात्री देतो. माझ्या जाण्याबद्दल बाबूला फोन करण्याचा प्रयत्न केला पण फोन बराच वेळपर्यंत 'एंगेज्ड' मिळत होता. ताईंकडे मात्र निरोप ठेवला होता.*

*इथं आल्या क्षणापासून सगळी आपल्या उलीची आणि तुझी चौकशी चालली आहे. पुन्हा पुन्हा त्याच त्याच गोष्टी सांगून मीही अद्याप दमलो नाही किंवा कंटाळलो नाही. सांगायला बरं वाटतं. मध्यंतरी घरी एकटाच असताना तासन्‌तास जे स्वतःच स्वतःलाच सांगत राहावं लागे, ते निदान दुसऱ्या कुणाशी सांगत असल्याचा वेगळेपणा आता आहे.*

दादा, विमल, शाली, नाना, प्रकाश, तू, उली हे विषय इथे वारंवार निघत असल्यामुळे, पूर्वी वाटे तसा एकटेपणा आता वाटत नाही. तुझ्यापासून फार लांब कुठे आलो आहे असं वाटत नाही.

इथे थंडी खूप आहे. ढेकूण थोडेसे आहेतच. आईची तब्येत विशेष सुधारत नाही; काम करीतच असते. भाऊ, छोटूच्या प्रिलीमिनऱ्या आटोपल्या आहेत. भाई शनिवारी इथे येऊन काल सकाळच्या गाडीने गेला. संतोषला डांग्याखोकला झाला होता. ताई नऊमाहीचे पेपर्स तपासते आहे.

आजच्या हिशेबानं, शुक्रवारी सकाळच्या गाडीने मुंबईला येईन. इथे मुंबईसारखी संयुक्त महाराष्ट्राची गडबड नाही. सगळं शांत आहे.

तू रात्री चांगली झोपतेस का ? मी चुकलो असेन तर मला शिक्षा करीत चल, पण तू स्वतःला त्रास करून घेता कामा नये. मी चुकतच नाही असा माझा दावा कधीच नव्हता. फक्त, जास्तीत जास्त विचारपूर्वक कुठलीही गोष्ट करीत असल्यामुळे चुका होण्याचा संभव कमी; आणि एखादी चूक झाली तर ती समजून घेऊन सुधारण्यालाही माझी 'ना' नसते.

तू चारचौघात वावरतेस तेव्हा काही मैत्रिणी परिचयात येतात तसे काही मित्रही येत असतील. मी त्याबद्दल कधी उत्सुकता बाळगली नाही, भय बाळगलं नाही. तसाच मी चारचौघात वावरतो तेव्हा पुरुष तशा स्त्रियाही परिचयात येणार. त्या मी टाळू म्हटल्यानंही टाळता येणार नाहीत. मात्र कधीही तुला माझ्या एखाद्या परिचयाबद्दल उत्सुकता वाटली, भय वाटलं, तर स्वतःला त्रास करून न घेता काय ते विचार. तूही हवी तर त्या मुलीची, बाईची ओळख करून घे. तिची मैत्रीण हो. या मार्गानं तुला स्वतःच्या शंका जास्त चांगल्या तऱ्हेने फेडून घेता येतील, भय नाहीसं होईल. तुझ्यापासून मी माझा एखादा मित्र अपरिचित ठेवला नाही तशी एखादी मैत्रीण झालीच, तर तीही माझ्याइतकीच तुझी मैत्रीण व्हावी अशी इच्छा राहील. गुप्तता मला मनापासून आवडत नाही. तुझ्या-माझ्यात तरी ती नको, तशी भीतीही नको. बाहेरच्या संकटांना, अडचणींना तोंड देताना आपण एकत्र राहायचं आणि आपणच आपापसांत एकमेकांना संकटं वाटू लागलो, तर एकमेकांबद्दल भय बाळगून राहू लागलो, तर कसं चालेल ? तुझ्यामाझ्यात प्रेमाव्यतिरिक्त, मैत्रीव्यतिरिक्त दुसरंतिसरं काहीही असता कामा नये—येता कामा नये. सर्वांत माझ्या आयुष्यात तू महत्त्वाची. आधी मला तू हवीस. माझ्यावर सर्वांत मोठा हक्क तुझा—आणि मग इतरांचा. यात कधीही फरक होणार नाही, मी तो होऊ देणार नाही.

माझ्या मनात तुझं स्थान सर्वांत श्रेष्ठ आहे, राहील. तुझ्या शेजारी त्यात आपली 'उली' आहे. माझ्या मनासारखं आपलं घरकूल तयार झालं आहे.

उली लबाड, 'आई' म्हणते; पण बाबाला अजून ओळखतही नाही ! एकदा तिची माझी दोस्ती जमली की माझ्यासारखा आनंदी मीच. तीही मजेत असायला हवी.

तुझं पत्र उद्याकडे येईलच. मी शनिवारी तिकडे येईन. मजेत रहा.

तुझा
विजय.

रात्री १२
३० ऑक्टोबर १९८५
न्यूयॉर्क.

प्रिय निर्मल,

आधीची दोन पत्रं मिळाली असतील असं गृहीत धरतो. एक विमानातून आणि दुसरं हॉटेलातून लिहिलं. बंट्यालाही एक पाठवलं होतं.

घरातून निघून आज आठ दिवस संपले. एकदा फोन केला तो फार पहाटे झाला. उद्या सकाळी प्रयत्न करणार आहे; जमला तर तुझ्याशी बोलेन. पण तिथली आणि इथली वेळ यांत जमीन-अस्मानाचा फरक; त्यात हॉटेलच्या खोलीतून मुंबईचा फोन मिळणं कठीण. आणि तिथल्या सोयीनं इथून फोन करण्याची वेळ संध्याकाळची; ती नेमकी इंग्रजी 'घाशीराम'च्या तालमींची वेळ. त्यामुळं मी खोलीत नसतो. तालमीच्या हॉलवर फोन आहे पण तालमीचा गोंगाट कायम चालू. ऐकू येण्याची मारामार. मात्र फोन करावा आणि तुझ्याशी, बंट्याशी, प्रियाशी बोलावं असं सारखं वाटत असतं.

इथले दिवस फार संथपणे जात आहेत. गेला रविवार, सोमवार मोमिनकडे काढला. बरोबर सतीश आळेकर आहे. माझ्याच हॉटेलवर उतरला आहे. ३ तारखेला तो इथेच अमेरिकेत सान्फ्रान्सिस्कोला भावाकडे जाईल. १० तारखेला परत येऊन त्याच रात्री मुंबईकडे जाईल. तो जातो तर भास्कर चंदावरकर येत आहे. घाशीरामला तो संगीत देणार आहे. माझ्या हॉटेलवरच तो असेल.

पण हॉटेलचा कंटाळा येऊ लागला आहे. फार एकटं वाटतं. त्यामुळे तीन तारखेनंतर मी हॉटेलवरून हलेन अशी शक्यता आहे. एक तर मोमिनकडे किंवा अमोल पालेकरची मेहुणी 'घाशीराम'मध्ये आहे तिचं घर तालमींच्या जागेजवळच आहे तिच्याकडे राहायला जाईन—पण नक्की नाही. मी फोनने किंवा सतीश आळेकरबरोबर काय ते कळवतो.

इथे आतापर्यंत हवा चांगली आहे. पण हिवाळा सुरूच झाला आहे. तो यानंतर वाढेल. गरम कपडे तू दिलेच आहेस ते माझी सोबत करतील. खोलीवर रात्री फारच शांत असतं. त्यामुळे झोप खूप लागते. पण घरातल्या गडबडीची सवय झालेलं मन या शांततेनं बेचैन होतं. तुमचे सगळ्यांचे आवाज मनाने ऐकतो आणि जरा हलकं वाटतं.

नाटक बरं बसत आहे. नीग्रो, चिनी, जपानी, रशियन, मोरोक्कोचा, भारताचा, असे 'ब्राह्मण' एकत्र आले आहेत. नाडीची धोतरं, उपरणी नेसून गाणी गातात. पूरक गाण्यांची तोंडं मराठीच आहेत. ('बावन्नखणी', 'राधे कृष्ण हरी' इ.) येत्या आठवड्यात पगड्या येतील. पुण्याहून मागवल्या आहेत. त्या घालून मंडळी फारच गोड दिसतील. ललितागौरी चकणी अमेरिकन आहे. नाना जपानी तर घाशीराम मोरोक्कोचा 'इश्माएल' म्हणून मुसलमान.

प्रयोगाला तुम्ही सगळे हवे होतात असं वाटतं. तुम्हांला मजा वाटली असती. १३ नोव्हेंबरला 'प्रीमीयर' आहे. १५ ला मी अमेरिका सोडणार. वाटेत इंग्लंड करून परतणार. १८ ला इंग्लंडहून मी निघेन असा अंदाज आहे. पक्कं झालं की कळवीनच.

तुमच्या पत्राची रोज वाटत पाहतो. अजून आलं नाही.

खरेदी थोडी थोडी करू लागलो आहे.

तिकडची खबर कुणास ठाऊक काय असेल. पत्रात तुम्ही सगळी कळवणार नाही. पण तसं वाटलं तर मला बोलावून घ्या. घरापेक्षा नाटक मोठं नाही.

तुझी प्रकृती कशी आहे ? कामाला बाया येतात का ? डोक्याला ताप करून घेऊ नकोस प्रियाचं, सुषमाचं, राजूचं कसं चाललं आहे ? तुम्हा सर्वांची वारंवार आठवण होते.

माझा फोन लागला नाही आणि महत्त्वाचा निरोप द्यायचा असला तर मोमिनकडे फोन करून कळवा. तो मला कळवील. जरूर वाटली तर मग मी तुम्हांला फोन करीन. पत्र पाठव. लौकर पाठव कारण ते इथे पोचायला वेळ लागतो. तूच लिही. तब्बेतीला जप.

तुझा
विजय

आज पहाटे (तिकडल्या संध्याकाळी) राजाचा फोन आला होता. फाइल मिळाली ना ?

२५ ऑक्टोबर, सकाळी ९
न्यूयॉर्क

घरच्या सर्वांना,

माझं विमानातून लिहिलेलं पत्र मिळालं असेल. प्रवास कंटाळवाणा झाला. मुळात

४६७ विमान उशिरा सुटलं. त्यात फ्रॅंकफर्टला एका विमानातून दुसऱ्या विमानात आम्हांला भरलं. न्यूयॉर्कला विमान उशिरा पोचलं. थोडक्यात पॅन अॅम ही कंपनी इंडियन एअरलाइन्सनं खरेदी केली आहे.

इथलं हॉटेल बरं आहे. रूम सर्व्हिसचे लाड नाहीत. खालीच एका कोरियन जोडप्याचं रेस्टोरां आहे तिथं आपल्या अन्नाच्या जवळपासचं अन्न मिळतं. प्रत्येक डिशमध्ये भात असतो. (पार्सेकर, नोट !) आम्ही (आळेकर+मी) तिथं जेवतो. आळेकर माझ्याच हॉटेलात राहतो आहे. इंग्रजी घाशीराम (घॅशीरॅम) च्या तालमींच्या जागेपासून हे हॉटेल सोयीचं आहे. सकाळचा ब्रेकफास्ट पलीकडच्या रस्त्यावरच्या एका कॉफी हाऊसमध्ये. मोमिनचं ऑफिस 'वॉकिंग डिस्टन्स'वर आहे—म्हणजे सुमारे दोन मैल—पण आम्ही एवढं तूर्त रोज चालतो. न्यूयॉर्क चालायला बरं शहर आहे. उन्ह पडलं की अर्ध्या चड्ड्या चढवून इथली मंडळी हमरस्त्यातून धावूही लागतात. (अर्धी चड्डी निर्मलाबाईंनी मलाही बरोबर दिली आहे पण उन्ह मनासारखं पडत नाही.)

या शनिवारी मोमिनकडे वीक एंड साजरा करणार आहे. सोमवारी संध्याकाळी परतेन.

तालमी रोज संध्याकाळी चालतात. (तिकडली सकाळ.) नाटकात अमेरिकन, आफ्रिकन, रशियन, चिनी, जपानी, मोरोक्कन आणि सिंहली मंडळी आहेत. अमोलची एक मेहुणीही नाचते. (ती 'गुलॅवी' आहे.) दोनतीन गाण्यांची तोंडं आणि चाली मुळातल्या आहेत त्यांत 'बावन्नखणी अहो बावन्नखणी' हा कोरस आहे. (पुढे तो इंग्रजीत म्हटला जातो.) यात इथला नीग्रो ब्राह्मण 'मथुरा-अवतरली' (मॅथ्थ्युरॅ अॅवॅतॅरॅलीऽऽऽऽ) म्हणून जो भुभुःकार गळा लांब करून आणि डोळे बारीक करूनं करतो तो ऐकताना मी धन्य होतो. किंबहुना तेवढं ऐकण्याच्या उत्सुकतेनेच मी रोज तालमीला पोचतो. नॅनॅ सुमार वाटतो पण घॅशीरॅम मोरोक्कोचा—तो चांगला नट आहे. मुळात आपले मॅनरिझम्स घेतानाच या मंडळीला फार त्रास पडतो. अभिनय पुढेच राहिला. तालमी शिस्तबद्ध चालतात. थोडक्या वेळात जास्त तालीम कशी करावी हे यांच्याकडून शिकावं.

परतताना लंडनला मी थांबणार आहे. तिकीटही बदलून मिळालं आहे. १८ च्या लंडनहून मुंबईला निघणाऱ्या पॅन अॅमच्या 98 फ्लाइटवर मी वेट लिस्टवर आहे. ही फ्लाइट सकाळी ८।। ला लंडनहून निघते. फ्रांकफर्टला बदलावी लागते. मग म्हणे ती 60 होते. मुंबईला रात्री (बोंबला !) अडीच या रम्य वेळी पोचते. ही कन्फर्म होते की नाही ते योग्य वेळी कळवीन.

रविवारपासून अमेरिकन घड्याळं एक तास मागं जाणार आहेत.

माझी तब्बेत चांगली आहे. काढे घेत नाही. तक्रार कसलीही नाही. फक्त घरची आठवण मधूनमधून जोरदार होते. (ते बरंच आहे.)

सर्वांनी एकमेकांना जपा. पत्र लिहा. काही घडलं तर निःसंकोचपणे मला परत बोलवा. घरापेक्षा महत्त्वाचं काही नाही.

*तुमचा*
*विजय*

*बंट्याला पापेच पापे.*

*शुक्रवार.*
*सकाळ*

*ताई,*
*तू दिलेले सर्व कपडे सकाळी उठून अंगावर घातले आणि भरून आले. आपली जुनी दोस्ती आठवली. कपडे छान झाले. त्यातलेच दोन घालून जात आहे. माझ्या साठाव्यानिमित्त आज रात्री तुझ्याबरोबर एकदा निवांत बोलायचे मनात आहे. पुन्हा इतक्या विस्ताराने मी बोलणार नाही. म्हणजे माझे बोलणे तुझ्यावर सक्तीने 'लादणार' नाही. तुला वाटेल तेव्हा तर मी असेनच. रात्री कुसुम कुलकर्णींकडे ८ ला आहे. तिथून आल्यावर आपण तू म्हणशील तिकडे दोघेच बसू. उशीर झाला तरी चालेल.*

*तुझा*
*बाबा*

*२७ ऑक्टोबर' ८६*
*मुंबई*

*प्रिय तनू,*
*खरं तर कालच हे पत्र लिहून ठेवायचं म्हणजे या वेळी पार्सेकरकडे पोस्टात टाकायला देता आलं असतं. पण कालचा दिवस गडबडीचा गेला. त्यामुळे कदाचित हे पत्र तुला थोडं उशिरा मिळेल. (प्रिया तिकडे फोनशी फोनोग्राम करते आहे.)*

*तुझा उद्या वाढदिवस. तू घरापासून लांब असल्याने आपल्या घरी तो मनानेच साजरा होणार. शुभेच्छा वगैरे औपचारिक. त्या तर तुला आहेतच. पण अगदी अनौपचारिकपणे आणि तुझ्या-माझ्यापुरतं म्हणायचं तर, खूप शहाणी हो. समजूतदार हो. आणि स्वतः सुखी होताना इतरांच्या सुखदुःखांचं भान ठेव. हे सगळं तुझ्याकडे नाही असं नाही; पण ते सतत वाढतं राहू दे.*

हे कठीण आहे. यासाठी धडपडत रहावं लागतं. एकीकडे आत्मविश्वास कमवावा लागतो आणि त्याचबरोबर आत्मविश्लेषणही करावं लागतं. आपल्या कमतरता नजरेत ठेवाव्या लागतात. इतरांचं ऐकून घ्यावं लागतं; मानावंही लागतं. त्याचबरोबर कुणी म्हणतं म्हणून ते मानणं हेही चुकतं. स्वतःचा विचार करता यावा लागतो. मुख्यतः उतावीळ होऊन चालत नाही. विचार ही 'इन्स्टंट' गोष्ट नाही. शांतपणा हवा. स्थिरता हवी.

म्हणजे आजीबाई व्हायचं असं नाही आणि तुझ्या वयाला ते होणं जमणारही नाही. (आजीबाईच्या वयालाही ते कुणाकुणाला जमत नाही.) मी वर लिहिलं त्या दिशेने प्रयत्न मात्र जाणीवपूर्वक करायला हवेत. शहाणं आणि समजूतदार होण्यासाठी आपल्याला माहीत नसलेलं थोडं थोडं समजून घ्यावं; मग ते काहीही असू दे. संतुष्ट असू नये. आनंदी असणं आणि संतुष्ट असणं यात फरक आहे. आनंद हा खुल्या मनाचा असावा. आणि खुलं मन आत्मसंतुष्ट असत नाही. असंतोष म्हणजे कायम रागीट चेहऱ्यानं किंवा चिडचिडत फिरणं नव्हे. असंतोष म्हणजे आपल्या आणि इतरांच्या कमतरतांची जाणीव. आपल्या कमतरता भरून काढण्याची धडपड; निदान प्रामाणिक इच्छा. तू अशी झालीस तर मला आवडेल. याहून अधिक होता येईल ते होच.

हा उपदेश नव्हे, उपदेश करण्याचा अधिकार मला नाही. ही केवळ इच्छा आहे. जमेल तितकी आणि तशी मनात ठेव.

सीरिअल प्रकरणी अजून पुढे काही झालेलं नाही. 'डीजी' उद्या सकाळी भेटतो आहे तेव्हा कदाचित काही कळेल.

जास्त लिहायचं आहे पण पत्र पोस्टात पडायला उशीर होईल म्हणून थांबतो.

राजीव आणि तिकडल्या सर्वांना विचारलंय सांग.

पुन्हा एकदा मनापासून आणि भरपूर सदिच्छा.

तुझा
बाबा.

स्वीडन, ऑक्टोबर' ८५

प्रिय बंट्या,

तुझी आठवण होत नाही असा एकही दिवस जात नाही. कधी कधी मला एकदम वाटतं

की माझ्या डोळ्यांतून जो बघतो तो तूच, मी नव्हे. मोठं गमतीचं आहे असं वाटणं. पण घराची ओढ लागलेल्या माझ्या मनाला तितकंच बरं वाटतं. इतक्या दूर अंतरावरूनही मी कल्पना करतो की दिवसादिवसानं तू मोठा होत आहेस. तुला मी पुन्हा पाहीन तेव्हा तू कसा दिसशील ? तुला ज्या गोष्टी नेहमी बोलाव्याशा वाटायच्या आणि ज्या तुला शब्दातून बोलून दाखवता येत नव्हत्या त्या सगळ्या तू बोलायला लागला असशील का ? तुझ्या डोळ्यांतला तो उत्सुकतेचा आणि किंचित घुसमटल्याचाही भाव मी नेहमीच निरखीत आलो आहे. आता तो भाव तिथं नसेल ह्याची मला खात्री वाटते. जे तुला वाटतं ते तू आता बोलायला लागला असशीलच. आणि आता यापुढं हे वाढतचं राहणार. आपलं म्हणणं यापुढं तू खूप ठासून सांगणार. तू एक संपूर्ण माणूस—एक पुरुष होणार. तू कशा प्रकारचा पुरुष होशील ह्याचा मी अचंबा करून राह्यलोय.इतर माणसांचो कदर करणारा पुरुष तू होशील अशी मला आशा वाटते. मी तरी तसं होण्याचा प्रयत्न केला, अजूनही करतो आहे. दुसऱ्याची कदर करता येणं ही ह्या जगातली म्हटलं तर सगळ्यात सोपी, म्हटलं तर सगळ्यात अवघड गोष्ट आहे. बहुधा स्वार्थ कुणालाच सुटत नाही. आपला स्वार्थ साधणं हे तसं अगदी नैसर्गिक आहे, नव्हे ती निसर्गाचीच योजना आहे. पण जो पुरुष स्वार्थ आणि परार्थ ह्यांचा समतोल साधतो तोच खरा माणूस. नुसताच एक पुरुष नाही तर त्याबरोबर एक चांगला माणूसही तू व्हावास हीच माझी मनीषा आहे.

(मूळ इंग्रजी पत्राचा हा मराठी अनुवाद. ते पत्र खाली दिले आहे.)

*Dear Bantya,*

*There is not a day when I do not remember you. While looking at things suddenly I become conscious that it is you who is looking through my eyes and not me. It is a funny feeling but it soothes my home sick mind. I keep imagining from this distance how you must be growing day by day. What you will look like when I see you next. Will you be talking a lot and saying things which you always wanted to say and were not able to say through words ? I always watched that expression of eagerness and slight suffocation in your eyes. Now I am sure it will not be there. You can say what you feel now. It will be more so hereafter. You will assert yourself much more. You will be a full fledged human being—a Man. I wonder what kind of man you will be. I hope you become a man who is considerate to other human beings. I tried to be one and am still trying. Being considerate to others is the easiest and the most difficult*

*thing in the world. One just cannot forget one's own interests most of the time. Also to look after one's own interests is natural. Nature demands it. The balance between the two is what makes a man a human being. I wish you become a human being too in addition to becoming a man.*

२३/११/६४
मुंबई.

आचार्य अत्रे ह्यांसी,

सादर नमस्कार वि. वि.

गेले काही दिवस माझ्या कचेरीच्या प्रसिद्धीविषयक कामानिमित्ताने अनेकदा मी शिवशक्तीत आलो आणि 'मराठा'तील माझ्या जुन्या सहकाऱ्यांनी मला खूप सहकार्य दिले. मी माझ्या कुटुंबात आलो आहे असेच दरवेळी मला वाटत होते.

आपल्यापासून मी कामानिमित्ताने दुरावलो तरी आपल्याविषयीची आणि आपल्या वास्तूविषयीची ओढ यत्किंचितही कमी झालेली नाही. लांबूनही मी ती जपत आहे, जपत राहीन.

हे सर्व असे व्यक्त करण्यासाठी निमित्त मात्र काही नाही. निमित्त असले तर एवढेच की आपली एकदम आठवण झाली आणि वाटले की लिहावे.

तब्बेतीची काळजी घ्यावी आणि अजून खूप नाटके लिहावीत ही विनंती.

आपला
तेंडुलकर

शनिवार, ५६
मुंबई.

प्रिय श्री. श्रीकृष्णपंत भागवत,

स. न.

'मौज'मधल्या नुकत्याच छापून आलेल्या श्री. माधव मनोहरांच्या एका भाषणाच्या

रिपोर्टसंबंधात हे व्यक्तिगत पत्र आहे. हा खुलासा केवळ तुमच्यासाठी आहे आणि तो तसाच ठेवावा.

खरं तर श्री. मनोहर म्हणतात ते नाटक मी अद्याप वाचलेले नाही. 'श्रीमंत'चं बीज माझ्या डोक्यात आले ते प्रत्यक्षातले एकदोन प्रकार पाहून. ते सरळ सरळ 'श्रीमंत'मधल्यासारखे नव्हते; तरीही प्रथम मुलगी गर्भार राहणं आणि मग नाइलाजानं तिच्या प्रियकराशी—तो स्वैराचारी, दरिद्री, श्रीमंतीचा द्वेष्टा असूनही—तिचं लग्न लावून देणं अपरिहार्य व्हावं किंवा घाईनं दुसऱ्या एखाद्या माणसाशी तिचं लग्न लावून देण्यात यावं, अशा प्रकारचे ते होते. पत्र खाजगीच असल्याने हवे तर प्रकारही स्पष्ट करतो. पहिला प्रकार ×××च्या ××× मिल्सच्या ×××च्या मुलीबाबत घडला होता आणि दुसरा ×××च्या भागात ×××नावाचं एक धनाढ्य कुटुंब राहतं, त्यांच्यातला आहे. या गोष्टींचं काही चमत्कारिक मिश्रण होऊन माझ्या डोक्यात 'श्रीमंत' अवतरलं, लिहिलं गेलं.

त्यातले दोष मलाही काही दिसतातच. ते नाटक सर्वांगसुंदर असल्याचा माझा दावा कधीच नव्हता. माझ्या कुठल्याच लेखनाबाबत माझा तसला दावा नाही. परंतु त्यावर उचलेगिरीचा आरोप यावा हे मात्र संतापजनक आणि वाईट आहे. आजवर मी जे लिहिलं आहे ते सारं माझं स्वतःचं आहे. प्रत्यक्षातले बळकट आधार त्याला राहत आले आहेत. किंबहुना मी इंग्रजी वाङ्मय फार वाचत नाही अशाही तक्रारी माझ्याबाबत माझ्या हितचिंतकांकडून होतात; त्यातही माझ्या लेखनाच्या स्वतंत्रतेसाठी मी इंग्रजी पुस्तकं फार वाचणार नाही असंच (कदाचित हे चुकीचंही असेल) उत्तर देत आलो आहे.

'श्रीमंत'च्या कथावस्तूत आणि श्री. मनोहर म्हणतात त्या नाटकात साम्यस्थळे असतीलही. परंतु म्हणून, फारशी विचारपूस न करता त्यांच्यासारख्याने आपण काही फार महान वाङ्मयीन करीत असल्याच्या अभिनिवेशात नाटकावर आरोप करावा हे माझ्या दृष्टीने अत्यंत चमत्कारिक आहे. त्यांना सेन्सेशन मिळतं. (तुम्हांलाही ते मौजपुरतं मिळालं आहे.) पण माझ्या लेखक म्हणून उभ्या राहत असलेल्या 'करीयर'मध्ये केवढा व्यत्यय येतो, माझं केवढं नुकसान होतं, याची माधवरावांना कल्पना नसावी. निदान तुम्हांला ती असायला हवी होती. छापून आला तो मजकूर 'मौज'मध्ये (मला वस्तुस्थिती विचारल्याशिवाय तरी) यायला नको होता.

अर्थात आता हा आरोप मला पचवला पाहिजे. त्याला जाहीर उत्तरं देऊन दिसऱ्या कोणाला कोंबडी झुंजवल्याचं समाधान मिळावं असं मला वाटत नाही. तो मी मुकाट्यानं सहन करणार आहे. वस्तुस्थिती तुम्हांला प्रामाणिकपणे कळवली आहे. तुमच्यापाशी अप्रामाणिकपणा मला करायचा नाही. निदान तुम्हांला तरी वस्तुस्थिती समजलेली असावी म्हणून हे सारं लिहिलं; याचा विचार वाटल्यास करा, वाटल्यास न करा.

लेखक म्हणून मी नाहीसा होऊन कोणाला काही मिळणार असल्यास माझी हरकत नाही.

तुमचा,
विजय तेंडुलकर.

सोमवार '५६

प्रिय श्री. श्रीकृष्ण भागवत,

स. न.

'श्रीमंत'च्या संबंधात श्री. माधव मनोहरांचे एक पत्र आपल्याकडे 'मौज'साठी आल्याचे रामभाऊ पटवर्धनांनी सांगितले.

सदर पत्र आणि माझे त्याला उत्तर एकदम प्रसिद्ध करण्याचा आपला बेतही त्यांनी ऐकवला.

मी अर्थातच माधवरावांचे पत्र वाचलेले नाही. ते काही असले तरी मी त्याला उत्तर देणार नाही. हे मी रामभाऊंपाशी स्पष्ट केले आहे. श्री. मनोहरांचे पत्र प्रसिद्ध करावे की न करावे हा अर्थात तुमच्या 'डिसक्रिशन'चा प्रश्न असेही मी म्हणालो.

हे डिसक्रिशन तुम्ही कसे वापरता हे स्वस्थ बसून पाहण्याची माझी इच्छा होती; परंतु माझे मन तुम्हांला या बाबतीत हक्काने ऐकवता येईल आणि तसे ते ऐकवले पाहिजे असे वाटू लागले म्हणून हे पत्र. इतःपर डिसक्रिशन अखेर तुमचेच.

मुळात माधवरावांच्या व्याख्यानाचा तो त्रोटक रिपोर्ट तुम्ही प्रसिद्ध करावयास नको होता असे अजूनही मला वाटते. माधवरावांच्या आरोपाची त्यांनी वा आणखी कुणी केलेली विस्तृत, मुद्देसूद आणि साधार चिकित्साच तुम्ही प्रसिद्ध करायला हवी होती. ते योग्य ठरले असते. परंतु घाईने—मी म्हणेन, अविचारानेसुद्धा—तुम्ही तो व्याख्यानाचा संक्षिप्त, अतिसंक्षिप्त रिपोर्ट 'मौज'मध्ये प्रसिद्ध केलात. 'आरोप गंभीर असून त्याची चिकित्सा झाली पाहिजे' अशी संपादकीय पुस्ती जोडून दीर्घ काळपर्यंत स्वस्थ बसलात. दरम्यान 'मौज'च्या पत्रव्यवहारात 'लंकेची पार्वती'च्या निमित्ताने माझ्या नाटकाचे अप्रत्यक्ष रीत्या 'भाषांतर' म्हणून उल्लेख करणारी (टोपणनावाच्या पत्रलेखकांनी केलेली !) विधानेही प्रसिद्ध होऊ दिलीत. त्यानंतर तुमची माझी भेट झाली तेव्हा 'काही चांगल्या साहित्यिकां'चे हवाले देऊन त्यांच्या मते माधवरावांचा आरोप खरा असल्याचे तुम्ही मला मुद्दाम ऐकवलेत. तुम्ही स्वतः त्यानतर खरी परिस्थिती पडताळून पाहिलीत. तुमचे मत तुम्ही मी तुम्हांला फोन केला असता मला ऐकवलेत ते'माधवराव म्हणतात त्यात अर्थ नाही, वाङ्मयचौर्य वाटत नाही' असे होते.

आणि ते तुम्ही आजतागायत प्रसिद्ध केलेले नाही. निदान मला तरी असे मानण्यावाचून गत्यंतर नाही की ते तुम्ही प्रसिद्ध करण्याचे टाळले आहे.

दरम्यान थिएटर युनिट बुलेटिनमधल्या 'श्रीमंत'बद्दलच्या (श्री. ××× यांनी के. जी. पी. या सहीखाली केलेल्या—हे अर्थात तुमच्या कचेरीत कुणाला ना कुणाला माहीत असावे.) 'भाषांतराच्या स्वच्छ उल्लेखा'बद्दल तुमच्या कचेरीत, के. जी. पी. बद्दल दाट अज्ञान पांघरून, एक बनावट पत्र तयार करण्यात आले आणि ते छापण्यात आले. माझ्यावरच्या आरोपाबद्दलचे चिकित्सान्ती बनलेले तुमचे मत प्रसिद्ध करण्याची तुमची इच्छा नाही हे मला या पत्राने कळले आणि मग दुसरा मार्ग न उरून मी माझा खुलासा तुमच्याकडे प्रसिद्धीसाठी पाठवला. तो तुम्ही माझ्या संमतीवाचून कापून प्रसिद्ध केला. निर्दोष मुद्रणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या 'मौज'मध्ये माझ्या पत्रापुरता एक केविलवाणा मुद्रणदोष राहिला. (याला अर्थात मीही फार महत्त्व देत नाही !)

आता माधवरावांचे नवीन पत्र तुमच्या हाती आहे. मी त्याला उत्तर देण्याचे नाकारले आहे.

माझ्याविषयीची तुमची आत्मीयता माहीत असूनही, काही वाङ्मयीन कारणाकरता ते पत्र तुम्ही प्रसिद्ध कराल अशी भीती वाटते. माझ्यापेक्षा मराठी वाङ्मय मोठे हे मला मान्य आहे. परंतु तसेच, माधवराव काय म्हणतात यापेक्षा यापेक्षा तुमचे स्वतःचे संपादकीय मत महत्त्वाचे, हेही तितकेच खरे. माधवराव बेजबाबदार विधाने करतात हे इतर अनेकांसारखे तुम्हीही मला ऐकवलेले आहे. त्यांच्या वाङ्मयचौर्याच्या आरोपात तथ्य नाही हेही तुम्ही ऐकवले आहे. या स्थितीत, माधवरावांचा बेजबाबदारपणा वाङ्मयीन कारणांसाठी तरी यानंतरही चालू द्यावा काय, हा खरा तुमच्या डिसक्रिशनचा प्रश्न !

आरोपाबद्दलचे तुमचे मत—कुठल्याही कारणांनी—वाटल्यांस नका छापू. (त्याला आता फार उशीरही झाला आहे. शिवाय तुमच्या तोंडी मतातली बरीच निःसंदिग्धता लेखी मतात राहणार नाही आणि नवीन घोळ होईल, ही एक नवीन धास्ती.) परंतु माझ्या खुलाशाने 'मौज'पुरते संपलेले हे प्रकरण पुन्हा उकरूनही काढू नका ही विनंती. माधवरावांचे किंवा कुणाचेच 'श्रीमंत' प्रकरणी काहीही यानंतर तुम्ही न छापावे अशी माझी नम्र इच्छा आहे. तुमची माझ्याविषयीची आत्मीयता खरी असेल तर माझ्या या इच्छेलाही काही किंमत आहे.

ही इच्छा केवळ लहर नव्हे. 'श्रीमंत' प्रकरणी गेल्या काही काळात माझी अपरिमित हानी झाली आहे. ते नाटक लिहायला नको होते या एकमेव निष्कर्षाला मी आलो आहे, इतका त्रास मला झाला आहे. यातला ३/४ त्रास माधवराव आणि तुमचे संपादकीय धोरण यामुळे झाला असे म्हटले तर ते तुम्हांला लागेल; परंतु ते खरे आहे. पिरँदेलो आणि 'श्रीमंत'देखील न वाचलेले लोक दोन्ही नाटकांत पॅरेच्या पॅरे तेच असल्याचे माझ्या प्रत्यक्ष दणकावून सांगतात ! माझी 'चार दिवस' एकांकिका परकी

असल्याचा संशय लोक घेतात !—सामान्य लोक नव्हेत, ×. ×. ××च ! काहीही सिद्ध होण्याची, पडताळून पाहण्याची गरज कुणाला वाटत नाही.—'मौज'मध्ये आले होते ना, आणखी काय सिद्ध व्हायचे ? आहेच तेंडुलकर चोर ! त्याला कुठली स्वतंत्र प्रतिभा ?

अजूनही कदाचित तुम्हांला माझ्या परिस्थितीची कल्पना येणार नाही. त्यासाठी माझ्या अवस्थेत तुम्ही असायला हवे होतात, असे क्षणभर म्हणेन. पकडण्यापेक्षा चोर ठरणे अवघड असते—सहन करायला, पचवायला, सगळ्यांचे उद्गार, नजरा, आविर्भाव, सारे आपल्याविरुद्ध असताना आपलेच आपल्याला पटवायचे असते की मी चोर नाही ! मी चोर नाही ! आणि एक क्षण असा येऊन जातो की जेव्हा वाटते, आहे—मी चोरच आहे ! हे सारे काय खोटे बोलतात ? सगळे भले लोक आहेत—मीच चोर असलो पाहिजे. हा क्षण म्हणजे मरण असते. भयंकर यातना होतात, ओढगस्त होते. मी यातून गेलो आहे—बराचसा बचावलो आहे. पुन्हा असे काही झाले की मला त्यालाही तोंड देणे प्राप्त आहे; कारण हा माझ्या आयुष्याचा प्रश्न आहे. लिहीतच आयुष्य जायचे हे ठरले आहे. माझ्याविषयी आपुलकी सांगणारांनी तरी माझ्याशी असे वैर धरू नये एवढीच इच्छा. निंदा वा स्तुती कुणीही कुणाची करावी, खवचट अनुल्लेखाने कुणीही कुणाला हिणवावे; त्यात कुणाचेच काही फारसे बिघडत नाही. त्यात नुकसान नाही. परंतु एखाद्याला आयुष्यातून उठवणारी हूल उठविण्यापूर्वी आणि ती पसरविण्यापूर्वी मात्र जबाबदार संस्थांनी, पत्रांनी, माणसांनी, त्या माणसाच्या संभाव्य हानीचा तीनदा विचार करावा. वाङ्मयीन कल्याण, राजकीय शुद्धता, या सर्वांपेक्षा माणुसकी महत्त्वाची आणि तीच माणसे विसरतात !
मी पोळलो आहे म्हणून ही सूचना.

—विजय तेंडुलकर.

ता.क. : जास्तकमीबद्दल राग नसावा. जरा मनमोकळे लिहिले आहे.
तें.

शनिवार, २०

प्रिय श्री. पु.
सप्रेम नमस्कार. तुमचे पत्र मिळाले. तुमची प्रकृती चांगली का राहिली पाहिजे त्याचे कारण तुमच्या पत्रातच आहे. अनपेक्षितपणे पण अगदी साहजिकपणे जो जिव्हाळा तुम्ही आम्हांला देता तो आम्हांला हवा. त्याचा 'फिल' फार उमेद देणारा असतो. मला तसे काही खरोखरी झालेले नाही. डॉक्टरने मध्यंतरी प्रकृती तपासली. इंजेक्शने

दिली. तो म्हणतो तुमच्या मनासारखे तुम्हांला लिहायला मिळाले म्हणजेच तुम्ही सुधाराल. म्हणजे त्याच्या मते माझे दुखणे 'साहित्यिक' आहे ! पण लिहिण्याचाही उत्साह मला नाही. म्हणजे तसे मनात काहीतरी चालूच असते. पण त्यापुढे त्याचे सोपस्कार करण्यात मन नसते. ते भरकटत असते.

मनाला काही त्रास होतात पण ते मलाच होतात असे थोडेच आहे ? माझ्या बाबतीत मला एवढेच वारंवार वाटले की माझे मन तसे लेचेपेचे आहे, कमताकद आहे, प्रत्यक्षाची प्रखरता त्याला कधी कधी पेलत नाही आणि गाभाच दुखावतो. याचा मला राग येतो. एवढे कमताकद मन मला का मिळाले ? या मनाने मी हा असा लुळापांगळा आणि वर पुन्हा पुन्हा जखमी होत किती जगणार ? जगण्याचा शब्दशः अर्थ मला अभिप्रेत नसतो, जगणे म्हणजेच प्रत्यक्षाला भोगणे : या अर्थी जगण्याला मी असमर्थ ठरतो आहे असे मला दिसते. उरलेल्या जगण्यात मला स्वारस्य नाही.

मला त्रास असलाच तर हा. त्याला मग पुष्कळच फाटे फुटतात. सगळी घडी विस्कटते. तोल जातात. स्वतःवर राग काढला जातो. त्यात नोकरीची एक चौकट सगळी हालचाल बांधून बसलेली आहे. त्याने माझी आर्थिक गरजही पुरतेपणी भागत नाही. इत्यादी, इत्यादी.

खरे सांगू का ? माझा मुख्य त्रास मीच आहे. एवढे खरे की तुमच्या कोठून तरी येणाऱ्या हळुवार शब्दाने फार बरे वाटते. भोवतालचा सगळा चक्रव्यूह क्षणमात्र दिसेनासा होतो. त्यासाठी तुम्ही हवेत. तुम्ही चांगले रहा. विमलाबाईंना हे सारे तुम्ही सांगू शकणार नाही आणि तसे ते नाहीही. त्यांना म्हणावे, तेंडुलकरला गेल्या ७ तारखेला ४० वे लागले ! अशोक काय म्हणतो ?

तुमचा
विजय तेंडुलकर.

प्रिय श्री. पु.

सप्रेम नमस्कार.

गेली किती तरी वर्षे तुम्ही माझ्या आयुष्यात असे ना तसे असत आलात, आधार ठरलात, स्नेह दिलात.

पण परवा फार जवळ आलात.

तरीही तुमच्याकडे मी मनातले सगळे कधीही बोलू शकणार नाही याचे फार वाईट वाटते.

ती माझी सवयच, फार मागे, गेली आहे. फार जवळच्या माणसांकडे मला कधीही

खरे बोलता येत नाही !

तेंडुलकर.
९ जानेवारी ६६.

मुंबई ५७.

प्रिय श्री. पु.,

सप्रेम नमस्कार. तुमचे पत्र मिळाले. तशी पत्रे बरीच आली. पण तुमचे वेगळे होते. मलाही एकेकदा सगळे आठवते. त्यात तुम्ही असता. गुणांचे ठाऊक नाही. पण माझे भाग्य बऱ्यापैकी आहे. न मागता सर्व वाट्याला येते. जे कुणाच्या वाट्याला सहसा येणार नाही असे येते. एक दुसऱ्यासारखे नसते. सर्व नवे.

मी थीसिस लिहिणार नाही. भटकणार आहे. जिथे रमावेसे वाटेल तिथे रमणार आहे. व्हायोलन्स हा विषय आहे. पण त्याचाही फार मुलाहिजा मी ठेवणार नाही. शेवटी माझ्याजवळचे मटीरिअल एकत्र करून कमिटीला देणार. त्याला ते 'जर्नल' म्हणणार. दोन वर्षे मी खूप पाहीन एवढीच महत्त्वाकांक्षा आहे. लिहिणे या अवधीत महत्त्वाचे नसेल.

तुम्ही येण्याचे कबूल केले आहे. डिसेंबर अखेरपर्यंत कामावर आहे. म्हणजेच मुंबईत आहे. नंतर फारसा मुंबईत नसेन.

औपचारिक दिसेल म्हणून न म्हणण्याचा प्रयत्न करीत होतो. पण माझ्यात जर काही बरे असेल तर त्यासाठी तुम्हीही काही केले आहे. निरपेक्षपणे. त्याचे मला यत्किंचितही ओझे न होऊ देता. मी मोकळेपणे त्याचा गैरफायदा घेतला. आता आठवले तर जरा लाज वाटते. पण अपराधी नाही वाटत.

तुमचा
तें.

सप्रेम नमस्कार.

पत्र मिळाले. अमेरिकेचे पाडगावकर म्हणाले ते खरे आहे. भटकणे मला आवडते. म्हणून मी आनंदात आहे.

क्रिएटिव्हली एलकुंचवारला असली संधी मिळायला हवी तर फायदा होईल. त्याच्या

वयाला माझ्याकडे पुष्कळ भूक होती. पचवण्याची ताकद होती.

आजकाल आयुष्यात मनस्वी रस आहे पण तो सुग्रास अन्नाचे पाश्चात्त्य नियतकालिकातले सुंदर रंगीत फोटो पाहत बसण्याच्या नादाइतका. ते खाण्याची इच्छा होत नाही. पाहावेत, उलटावेत.

आज मला कलेत तांत्रिक इंटरेस्ट वाटेनासा झाला आहे. आयुष्य पाहत आयुष्य काढावे इतकेच वाटते. लिहिण्याची आस नाही. इण्टेन्स फीलिंग्जदेखील बाहेर फुटण्यापेक्षा कोंडून घेणे पत्करतात. माझा मीच त्यांचा वाचक-प्रेक्षक बनू बघतो.

विषाद नाही. लाजही नाही. खरे तर फारसे काहीच नाही. आपल्याला एक दृष्टी आली आहे एवढेच जाणवते. पाहावे एवढेच वाटते.

असेन तिथे ते मात्र भरपूर करणार आहे.

तुमचा
तेंडुलकर.
२१.१२.७१

२० जाने. ८४
मुंबई

प्रिय श्री. पु.,

सप्रेम नमस्कार. ग्रंथाली तुमच्यावर एक पुस्तक काढणार आहे. मला त्यांची प्रश्नावली आली आहे. ती वाचू लागलो आणि खूप आठवणी आल्या. फार चांगल्या आठवणी. पुन्हा तो काळ परत बोलवावा अशा आठवणी. परिणामी प्रश्नांना उत्तरे लिहिता येईनात. काय लिहायचे ? आधुनिक मराठी वाङ्मयाच्या संदर्भात तुमचे कार्य ? तुमच्या शक्ती आणि मर्यादा ? आमच्या घडणीत तुमचे स्थान ? तुमचा संप्रदाय ? सगळेच बाष्कळ वाटू लागले. लक्षात (पुन्हा एकवार) आले की तुम्ही माझ्या बाहेर नाहीत, आत आहात. स्वतःविषयी असले काही लिहिणे जितके मुष्किल तितके तुमच्याविषयी लिहिणे मुष्किल. काही न लिहिणेच सोपे. तरी पण मनात गर्दी उडालेली, ती आवरेना. म्हणून तुम्हांला हे पत्र. माझ्या मनात या वेळी जे भरून आले आहे त्यातले किती तुम्हांला आठवेल, माहीत नाही. पण असे वाटते की या वेळी मला फक्त तुमच्याशीच संवाद करता येईल; तोही शब्दांपलीकडला.

भेटणे तर आता फारच दुष्कर होऊन गेले. अनिच्छेने का होईना, ते पत्करलेही आहे. एकूणच तक्रारी मंद होऊ लागल्या; त्यांत हीही. संवाद बव्हंशी स्वतःशीच. ही अवस्था

केव्हा तरी येतच असावी. तशी ती वाईटही नाही. आपल्या माणसांच्या आपल्याविषयीच्या अपेक्षा बहुतेक सगळ्या वाया जाण्यासाठीच असाव्यात. पुढे पुढे आपली त्याविषयीची लाजसुद्धा बोथट होत जाते. असतात माणसाला मर्यादा, सो व्हॉट ? पण तरी साली क्वचित खंत पकडते. कधी तरी हरवून जाते.

तुम्ही कुठे तरी आहात हे भान मात्र हरवत नाही. त्याचा उपयोग होतो. म्हणून तुम्ही, आम्ही आहोत तोवर तरी रहा.

जास्त काय ?

अशीच केव्हातरी आचवलांची तल्लफ येते.

तुमचा,
तें.

११ जुलाय '८६
मुंबई

प्रिय श्री. पु.,

सप्रेम नमस्कार. काल सकाळी अमेरिकेहून परतलो. 'घाशीराम'चे एकूण १६ खेळ वेगवेगळ्या शहरांतून झाले. मी सर्व खेळांना नव्हतो पण मी स्वतः पाहिले/ऐकले आणि इतरांनी सांगितले ते जमेस धरता अमेरिकन (म्हणजे तिथले भारतीय वगळून) प्रेक्षकांनी नाटक बऱ्याच प्रमाणावर आणि चांगले पाहिले.

नंतरची 'ओव्हेशन्स' नेहमीच जोरदार असत पण ती कदाचित अमेरिकन प्रेक्षकाची सवय मानली तरी नाटक चालू असता ते नाटकात गुंतलेले असत आणि नंतर जे बोलत ते नाटकाचा विषय आणि घाट या हिशेबात बऱ्याच समजुतीने बोलत. भाषेची अडचण कुठेही आली नाही. मला वाटते त्या नाटकाचा विषय भाषा ओलांडून प्रेक्षकांपर्यंत पोचतो आणि संगीत-नृत्यापुरते बोलायचे तर 'ऱ्हिदम' आणि 'झेस्ट' या दोन गोष्टी वैश्विक असाव्यात. त्यात कुठल्याही देशातला माणूस फार सहज आणि खुषीने अडकतो. बारकावे हरवतात पण ते मराठीपुरते बोलायचे तर येथेही कित्येकदा हरवतात. हा भाषेचा किंवा संस्कृतीचाच प्रश्न नसावा.

नेहरू अभ्यासवृत्तीचे माझे काम जुने झाले असे आता मला वाटते. त्यानंतर पुष्कळ नवीन आणि गुंतागुंतीचे घडते आहे आणि त्याच्याशी माझी जवळीक राहू शकत नाही. तरीही आपण बोलू. भेटावे असे तर मला वाटतेच. आता इथेच असणार. तुम्ही कधी कसे ते सांगा.

विमलाबाईंना सप्रेम नमस्कार.

तुमचा
तें.

२७ ऑगस्ट '८५
मुंबई

प्रिय श्री. हातकणंगलेकर,

सप्रेम नमस्कार. आज श्री. म. वा. धोंड यांचा फोन आला होता. श्री. दां. ची सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक एकत्र करून जया दडकर यांच्याकडे सुपूर्द करावीत असे त्यांना वाटते. मी पंडितरावांना आजच पत्र लिहून याविषयी सुचवीत आहे. तुम्ही किंवा मी ती प्रथम एकदा लिहून पाहून घ्यावीत असे मी म्हटले आहे. तुम्ही त्यांच्याशी बोला. तुमच्या परवानगीवाचून त्यातले काहीही टाकले किंवा दिले जाऊ नये, असे मला वाटते.

पानवलकरांनी येथे मृत्युपत्र करून ठेवले आहे. त्यांचे डॉ. डोंगरे यांच्या हाती ते आहे. चासकर वकील आणि डॉ. डोंगरे यांच्या उपस्थितीत सारे तयार करण्यात आले. डॉ. डोंगरे यांना ते पंडितरावांकडे देण्याची इच्छा आहे असे फोन करून मला त्यांनी कळवले. मुंबईतच हे होऊ शकेल. हेही मी पंडितरावांना लिहीत आहे.

महाराष्ट्र टाइम्सच्या गेल्या कला-पुरवणीत 'चित्र-चक्कर' नावाच्या सदरात पानवलकरांसंबंधात त्यांचे नाव न घेता (शीर्षक होते 'अर्धसत्य') काही आचरट मजकूर आला. माझे डोके गेल्याने मी तडकून संपादकांना एक पत्र लिहिले आणि माझ्या भावना व्यक्त केल्या. ते पत्र अद्याप तर त्यांनी छापले नाही.

अविनाश सप्रे यांचा लेख असलेला 'केसरी' काल रात्री हाती पडला.

अजून कामात हात लागत नाही.

तुमचा
तेंडुलकर

९ एप्रिल ८७
मुंबई

प्रिय श्री. हातकणंगलेकर,

सप्रेम नमस्कार. पानवलकरांवरच्या पुस्तकाच्या प्रती गेल्या आठवड्यात पोचल्या. पुस्तक चांगले काढले आहे. चांगले झालेही आहे. माझी उणीव मुळीच जाणवली नाही. विशेषतः दडकर यांची कामगिरी महत्त्वाची आहे. तुमचा जुन्या सांगलीवरचा लेखही संदर्भ म्हणून चांगला झाला आहे. पानवलकरांच्या कविता प्रथमच वाचायला मिळाल्या. कागद अधिक बरा असता तर पुस्तकाचे 'तेज' वाढले असते. पण आधीच किंमत वाढली आहे ती आणखी वाढली असती. तूर्त इतकेच. घरच्यांना नमस्कार.

तुमचा
तें.

७ जून '८८
मुंबई

प्रिय श्री. तिनईकर,

सप्रेम नमस्कार. तुमची माझी तशी भेट नाही. तरीही हा व्यक्तिगत पत्राचा आगंतुकपणा मी का करीत आहे ? मला माहीत नाही. एवढे खरे की न राहवून हे लिहीत आहे. तुमच्या व्यापात हे वाचण्याला तुम्हांला वेळ मिळेल अशी आशा आहे.

न भेटता एखाद्या माणसाविषयी आदर वाटू लागतो. मला आदर वाटण्याला रूढार्थाने 'मोठा' माणूस लागत नाही. तो मुळात 'माणूस' असणे मला अगत्याचे वाटते. तसेच काही चांगल्या गोष्टींचा आग्रह त्याने धरावा असाही माझा (मनातल्या मनात) आग्रह असतो. मतभेद या माझ्या आदरात अडचण होत नाहीत. न भेटता तुमच्याविषयी असा एक आदर माझ्या मनात आहे. बहुधा त्यामुळेच पत्राचे हे धाडस मी करीत असेन.

माझे तुमच्याकडे काम आहे. ते एका अर्थाने व्यक्तिगत आहे. तरीही ते तसे माझ्याबद्दल किंवा माझ्यापुरते नाही. ते केले तर तुम्हीच कराल. परंतु न केलेत तर मला आश्चर्य वाटणार नाही. ते तुम्ही का केले नाही हेही, तुम्ही न सांगता, मी समजून घेईन. त्यामुळे पत्र वाचल्यावर मला काही कळवण्याची जबाबदारी तुमच्यावर नाही.

मुंबईतल्या काही कामांशी माझा काही निमित्ताने संबंध येत असतो. महात्मा गांधी रोडवर क्रॉस मैदानाच्या बाजूला (म्हणजे फेरीवाल्यांच्या 'झोन'ला लागूनच) जी

दोनशे कुटुंबे आहेत आणि गेली अनेक वर्षे ती तिथे राहत आहेत. अनेकवार त्यांना काढून लावण्याचे प्रयत्न होऊनही ती तिथे तग धरून आहेत. फेरीवाल्यांच्या 'झोन'च्या दृष्टीने ती जागा आता महापालिकेला हवी असल्याने या कुटुंबांना तेथून घालवणं आता अपरिहार्य झाल्याचे दिसते.

या संबंधातले तुमचे म्हणणे माझ्या कानावर आहे. ते Vagrants आहेत, कारण दीर्घ काळ तिथे राहत असल्याचे पुरावे त्यांच्याकडे नाहीत.

पुरावे नाहीत हे खरेही आहे. परंतु ते तिथे वर्षानुवर्षे राहत आले आहेत हेही खरे आहे. आणि ते कोणी सडेफटिंग नाहीत, ती कुटुंबे आहेत आणि आपापली संस्कृती आणि इज्जत जपण्याचा उरीपोटी प्रयत्न करणारी कुटुंबे आहेत. त्यांच्या मुलांसाठी तिथे एक शाळाही चालवली जाते. आजच्या व्यवस्थेत परिस्थिती माणसांना उघड्यावर आणून टाकते तसे त्यांना परिस्थितीने आणून टाकले आहे.

तरीही पुराव्याअभावी ही कुटुंबे Vagrants ठरणार हे दिसते आहे. त्या जागी त्यांना यानंतर राहू दिले जाणार नाही हेही दिसते आहे.

माझी आपल्याला एक व्यक्तिगत विनंती आहे. त्यांची तुमच्या अखत्यारात कुठे तरी पर्यायी व्यवस्था करा. ती हलण्याला तयार आहेत. गैरसोयीच्या जागीदेखील ती हक्काने डोके टेकण्याला जागा मिळाली तर कष्ट करून जगतील. परंतु त्यांना चारी वाटा हुसकून लावले जाऊ नये.

माणसे माझ्या पाहण्यातली असल्याने, कोणताही अधिकार नसता, हे व्यक्तिगत संकट मी आपल्याला घालीत आहे.

अधिकाराविना हे करीत असल्याने याचे दडपण आपल्यावर येणार नाही अशी खात्री आहे.

आरंभी म्हटल्याप्रमाणे न राहवून हे केले आहे.

याबद्दलची Counter arguments मला माहीत आहेत. हा Vagrants चा प्रश्नही प्रचंड आहे. आपणासारख्यांना कामाच्या सोयीने त्याकडे एका कठोरपणे पाहणे भाग असते.

परंतू तरीही आपल्यातल्या 'माणसा'शी संवाद साधावा असे मनाने घेतले.

उत्तराचा प्रश्नच नाही. आपल्या कामात त्यासाठी वेळ देण्याचे कारण नाही. कधी तरी व्यक्तिगत स्वरूपात भेट व्हावी असे वाटते पण ती व्यावसायिक ताणात नको. मला तशी घाई नाही. निवांतपणे भेटू.

तसदीबद्दल माफ करा.

तुमचा
विजय तेंडुलकर.

४८३ १५ ऑगस्ट '८६

मुंबई

प्रिय प्रकाश,

सप्रेम नमस्कार. तुझे पत्र आणि तुझ्या कविता मिळाल्या. कवितांचे नाते वेगळे असते. त्यात कोणाचे कोणावर ऋण असत नाही, कोणी कोणासाठी काही करत नाही. माणसांपलीकडचे हे नाते आहे.

तुझ्या कविता मला आवडल्या यात मी काय केले ? तुझ्या नव्या कवितांत काही शब्द मला अडले, ते असे : केघवा. (म्हणजे पक्षी का ? सुमती असे काही म्हणाली.) 'गंगथडी'ला बोली भाषेत वेगळा अर्थ दिसतो. तो कोणता ? 'चांधिली'ची वेल कोणती ? तिचे वैशिष्ट्य काय ? 'मोघडाच्या गोल्ह्या' म्हणजे ? पाऊस 'पहाळ्या' म्हणजे पागोळ्या तर नव्हेत ?

'चघळ-चापळ्या'मध्ये तुला काय अभिप्रेत आहे ?

कविता पाठवतानाच माझ्यासारख्या शहरी माणसासाठी तू अशा शब्दांचे अर्थ लिहीत जा.

कवीला असे सांगणे खरे नाही पण हे सांगणारे माझ्या भोवतीही कुणी नाही. म्हणून तुला त्रास देतो.

तुझ्या कवितांतली मनःस्थिती मला कळते. तपशिलात कधी तरी बोलू.

तुझा

विजय तेंडुलकर


छायाचित्रण

चेहरे

महाराष्ट्र टाइम्स, दिवाळी १९७६

# चेहरे

नक्की कोणत्या दिवशी मी कॅमेऱ्याच्या लेन्समधून प्रथम पलीकडे डोकावलो ते ठाऊक नाही, पण कॅमेऱ्याने मला एक नवीच दृष्टी दिली असे वाटते.

तसा एरवीही चेहरे अभ्यासण्याचा छंद मला होता. कुठले तरी दोन वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या ठिकाणी भेटलेले, एकमेकांशी अगदी असंबंधित चेहरे मला संबंधित दिसत आणि मग त्या दोनांत खरेच काही नाते आहे का ते शोधण्याचा यत्न मी जमेल तसा करी. बहुधा तसे काही नाते नसे; पण कधी तरी ते असल्याचे कळले की शोध लावल्याचा आनंद होई. पतिपत्नींच्या चेहऱ्यात मला केव्हा तरी एक साम्य भासू लागले आणि मग कितीतरी दिवस या एकाच शोधात मी होतो. म्हणजे ठळकच नव्हे. पण ही दोन माणसे एकमेकांसाठी जन्माला आली असे वाटण्याइतके कसले तरी साम्य. हेही अनेकदा नसे, पण कधी तरी इतके जाणवे की दोघे सख्खी बहीण-भाऊ वाटावीत ! निदान एका कुटुंबातली तर खरी. हेही अशास्त्रीय होते. पण माझा वेळ यात काही काळ बरा गेला. प्रत्येक कुटुंबात किमान एक माणूस चेहऱ्याने इतर सर्वांपासून पार निराळेच असते हा असाच आणखी एक शोध. हे निराळेपण इतके असते की कोकिळेच्या घरट्यात कावळ्याने आपले अंडे अल्लद ठेवल्याची जाणीव आठवावी. ज्या प्रकारच्या कंपनीत माणसे दीर्घ काळ नोकरी करतात, त्या प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि चेहरादेखील घडत जातो हा असाच जरा वेगळा शोध. म्हणजे पारशी कंपनी असेल तर तिच्यातला हपिसर पारशासारखा दिसू लागतो किंवा जपानी कंपनी असेल तर तिच्यातल्या अधिकाऱ्याचा चेहरादेखील (तो कोकणस्थ असला तरी) जपानी वळणावर जातो. प्रत्यक्ष पाहताना चेहरा माणसाबरोबर दिसत असतो. यात त्या माणसाचे चालणे, बोलणे

आणि त्याचे ज्ञात चरित्र येते. कॅमेऱ्यातून फक्त चेहरा दिसू शकतो. एक चेहरा, बाकी काही नाही. बाकी सर्व गळून उरलेला चेहरा. कधी मुखवटेवजा, कधी विलक्षण अस्सल. कॅमेऱ्यात आणखी एक सोय होते. मुखवट्याआडचा चेहरा टिपता येतो. कधी मुद्दाम न टिपताही तो गवसतो. तो गवसला हे नंतर लक्षात येते.

छायाचित्रांच्या अमेरिकन प्रदर्शनातले एक चित्र आठवते. तो ग्रूप-फ़ोटो होता. फार वर्षांमागे अज्ञात छायाचित्रकाराने काढलेला. तिकाटण्यावरचा बोजड कॅमेरा. काळा कपडा पांघरून फोटो काढायचा. इकडे पहा—कुणी हसू नका—स्टेडी प्लीज—वन-टू-थ्री म्हटले की बटन दाबून फोटो निघणार...या विशिष्ट फोटोत सुमारे पन्नासेक माणसे, एका घरापुढे उभी केलेली आणि बसवलेली. आधी जमिनीवर बसलेली. मागे खुर्च्यांवर बसलेली. त्यामागे जमिनीवर उभी असलेली. त्यामागे उंचवट्यावर उभी राहून पुढल्या उभ्या माणसांवरून डोकावणारी. यात पुरुष, स्त्रिया, तरणे, म्हातारे, सर्व. फोटोसाठी सर्व बसवण्यात आणि उभी करण्यात आली. मग फोटो निघणार म्हणून सर्वांनी कॅमेऱ्यावर नजर लावून पोज घेतली. त्यानंतर कॅमेरा सज्ज करण्यात वेळ चालला तशी सर्व तंग झाले. पोज टाकण्याची, आळोखेपिळोखे देण्याची किंवा शिंकण्याखोकण्याची सोय नाही. सर्व ताठ आणि तंग. आणि फोटोग्राफर म्हणाला, 'थ्री' निघाला एकदाचा फोटो—असे म्हणून सर्व खुशालले. कुणी मोठा सुस्कारा टाकला, कुणी आत घेतलेले पोट बाहेर काढून पुढे काढलेली छाती मागे घेतली, कुणी तपकिरीची डबी बाहेर काढली तर कोण रगावलेली मान ताणीत घाम पुसू लागली—आणि चावट छायाचित्रकाराने आधी नुसतीच हूल दाखवून खरा फोटो हा इथे घेतला. फोटोनंतरचा फोटो. हा एक फोटो पाहत मी त्या प्रदर्शनात किमान अर्धा तास उभा होतो. मुळीच फोटोकॉन्शस नसलेल्या पन्नासेक चित्रविचित्र माणसांचा एक अत्यंत अनौपचारिक आणि अस्सल फोटो.

मी माझ्या फोटोग्राफीचे पहिलेवहिले प्रयोग केले ते माझ्या मुलांवर. होता होता त्यांना याची इतकी सवय झाली की मी कॅमेरा उचलला की माझा दोन वर्षांचा मुलगादेखील सहजपणे पोज देऊ लागला. यातले काही फोटो मुळाबरहुकूम निघत नसत. त्यात मूळचे माणूस काही वेगळेच वाटे. कधी जास्त देखणे, कधी अगदीच अनाकर्षक. कधी वयाच्या मानाने पोक्त तर केव्हा बारीक माणूस जाडे वाटे. हे फोटो न्याहाळण्यात माझा खूप वेळ जाई. आपल्या चांगल्या ओळखीचे माणूस आपण काढलेल्या फोटोत काहीसे किंवा अगदीच वेगळे, अनोळखी होते याचे अप्रूप वाटत राही. समोरच्याच माणसाचा फोटो काढला असताना तो मुळाहून निराळा येतो कसा हे कोडे पडे. लेन्समधून पाहतानाही, ते माणूस असे फोटोत दिसते तसे दिसले नव्हते, असे आठवत राही. मग फोटोत आले ते कसे आणि काय ? असा प्रश्न सतावीत असे.

हे झाले बॉक्स कॅमेरेवजा कॅमेऱ्याचे दिवस. मग इलेक्ट्रॉनिक कॅमेरा हाती आला. यात एक्स्पोज केलेल्या पहिल्या रोलचे फोटो आले आणि त्यातले बारकावे पाहून मी थरारलो. पोर्ट्रेटमध्ये चेहऱ्यावरचे मुरूम आणि कातडीचे टेक्श्चरदेखील स्पष्टपणे आले होते. फोटोतला चेहरा सुंदर दिसत नव्हता पण त्याला एक खरेपण आणि जिवंतपण वाटत होते. वाटत होते की तो आत्ता हलेल ! फोटो मीच घेतले होते पण कॅमेऱ्याची किमया मला थक्क करीत होती.

फोटोग्राफीच्या आहारी मी इथून पुढे आणखीच गेलो. त्यातल्या तांत्रिक वा कलात्मक आव्हानामुळे नव्हे, तर पदोपदी मला लागणाऱ्या शोधांपायी आणि मिळणाऱ्या आश्चर्याच्या लहानमोठ्या झटक्यांपायी. वस्तुतः हे माध्यम रोखठोक. हा विषय आणि हा त्याचा फोटो असा सरळसोट मामला. तरी मध्यंतरीच्या एका क्षणात काहीतरी आगळे घडलेले असे आणि ते कसे, काय, याचा उलगडा होत नसे. कॅमेरा हे माझ्या हाती तोवर शंभर टक्के भरवशाचे साधन नव्हते आणि यानेच फोटोग्राफीच्या नादात मी आणखी आणखी वाहून जात होतो. या माध्यमातल्या अनपेक्षिताचा मी आशिक झालो होतो.

मी काढलेल्या फोटोंचे डेव्हलपिंग, प्रिंटिंग कधी मी स्वतः केले नाही. प्रथम ते दुकानी होई. नंतर एका फोटोग्राफर मित्राने हा मक्ता घेतला. यात एकाच फोटोच्या वेगवेगळ्या प्रतींत केवळ गडद-फिकेपणाचे फरक झाले की तो एकच फोटो एकेका प्रतीत कसा निरनिराळा मूड व्यक्त करतो त्याचे वस्तुपाठ न ठरवता मिळत राहिले. फोटो छोटा असला की त्याचा भाव (मूड) वेगळा आणि तोच मोठा केला की केवढा तरी वेगळा असेही लक्षात आले. विशेषतः चेहऱ्यांच्या बाबतींत हे जाणवे. छोट्या फोटो[illegible] एकूण चेहरा बोले. मोठ्या फोटोत प्रकर्षाने डोळे बोलू लागत आणि चेहऱ्याचा मतलब या नव्या आशयाने कधी कधी पार बदलून जाई. तसेच छोटा फोटो मोठा करताना त्याला नव्याने चौकट टाकून त्याचा आवश्यक तेवढा भागच वेगळा काढून मोठा करण्याच्या सोयीने मूळ फोटो आमूलाग्र नवा होऊ शकतो हे लक्षात आले. उदाहरणार्थ, गर्दीतला माणूस. गर्दीत तो एक प्रकारचा दिसतो. गर्दीचा फोटो करताना गर्दी गाळून केवळ एवढा माणूसच मोठा केला तर तो पार निराळा, स्वतंत्र आणि महत्त्वाचा होतो. किंवा एका माणसाचा चेहरा. यातला केवळ डोळाच मोठा (एन्लार्ज) केला तर एकूण माणसाच्या चेहऱ्यापासून स्वतंत्रच असा एक फोटो तयार होतो—एका जिवंत आणि स्वतंत्र डोळ्याचा फोटो. हा डोळा हेच त्या फोटोपुरते एक स्वयंपूर्ण जग बनते. स्वतःचा एक अर्थ बोलणारे.

अपुऱ्या प्रकाशात फ्लॅश-लाइट मी कधीमधी वापरत होतो आणि फोटोंना एक अनैसर्गिक, कृत्रिम रूप येत होते. कधी चेहऱ्याचे सर्व तपशील प्रखर प्रकाशाने फाटलेले. किंवा फोटोत जागोजाग सावल्या दाटलेल्या. कायम ज्यात रात्रच असते असे फोटो. सर्व चेहरे रात्रीतले, डोळे निर्जीवपणे वटारलेले किंवा गप्‌कन झाकलेले नाहीतर झाकू घातलेले. चेहरे ताणलेले. अंधारात कृत्रिमपणे उजळलेल्या आकृत्या आणि तपशील. याचा मात्र मला फार लौकर कंटाळा आला आणि फ्लॅशविनाच मग मी फोटो घेत राहिलो. चेहऱ्याचे मूळ गुणधर्म टिपायचे असले तर सूर्यप्रकाशासारखी दुसरी सोय नाही असे माझ्यापुरते ठरले.

तरी पण फोटो हे आपल्या डोळ्यांना नेहमी दिसणाऱ्या प्रत्यक्षाचे शंभर टक्के बरहुकूम चित्र नव्हे, तसे ते असूही शकत नाही, हेही माझ्या ध्यानी आता वारंवार आले होते. आपल्या डोळ्यांना दिसते त्यापलीकडे प्रत्यक्षाला एक परिमाण असते, ते तसे फारसे अदृश्यही नसते. परंतु आपण नेहमीच्या पाहण्यात त्याची दखल घेत नाही आणि फोटोत एक चौकट भोवती पडताच ते उमटून येते, असे—माझ्यापुरतेच—मी ठरवले.

येथवर ब्लॅक अँड व्हाइट फोटोग्राफीतच माझी छांदिष्ट धडपड चालू होती. यात प्रामुख्याने एकच विषय होता आणि तो म्हणजे चेहरे. निसर्गाच्या वाटेला मी गेलो नाही असे नव्हे; परंतु तिथे रमलो मात्र नाही. कॅमेऱ्याला वेगवेगळ्या प्रकारच्या लेन्सेस मिळतात. थोडक्या अंतरावरून अधिक व्यापक दृश्य टिपण्यासाठी वाइड अँगल लेन्स, लांबून जवळच्या अंतराने एखादा विषय पकडण्यासाठी टेली लेन्स, वेगवेगळ्या अंतरांसाठी वेगवेगळ्या ताकदीच्या टेली लेन्स वापरणे टाळण्यासाठी एकच एक झूम लेन्स, फार सूक्ष्म विषय टिपण्यासाठी मायक्रो लेन्स, सरळ साधा विषय चमत्कारिक आणि अद्‌भुत बनवण्यासाठी फिश आय लेन्स, अशा प्रकारच्या लेन्सेस छायाचित्रण-कलेतले व्यावसायिक वापरतात. सुरुवातीला माझ्या हाती यातले काही लागले नाही. पुढे लागले तेव्हा वापरून पाहिल्यावर केवळ नावीन्यापलीकडे माझ्यापुरता याचा उपयोग मला वाटला नाही. या उपकरणांमुळे सुटसुटीत फोटोग्राफी उगीच बोजड आणि गुंतागुंतीची होते असे मला वाटले. यामागेही एकच कारण असावे. फोटोग्राफीतल्या माझ्या आवडीच्या विषयासाठी या कशाचा विशेष उपयोग नव्हता. कॅमेऱ्याच्या नेहमीच्याच लेन्समधून चेहरे अभ्यासण्यात आणि त्यातला ज्ञात-अज्ञात आशय टिपण्यात अद्याप खूप गंमत येत होती. नेहमीच्या लेन्सच्या मर्यादा मला तितक्याशा जाचत नव्हत्या. क्वचित उघड्यावर फोटोग्राफी करताना जाचत, तेव्हा टेली किंवा झूम लेन्सचे काहीसे अवजड लोढणे कॅमेऱ्याला लावून फोटोग्राफी करण्याचा जाच इतका वाटे की त्यापेक्षा नेहमीची लेन्स सर्व मर्यादांसकट बरी, अशा निष्कर्षाला मी येई.

आणि एकदा रंगीत फिल्मचा एक रोल माझ्या हाती पडला. भीत भीत मी तो घरच्या माणसांवरच एक्स्पोज केला. फोटो हाती आले तेव्हा एक वेगळाच अनुभव मिळाला. प्रत्यक्ष वास्तवाशी या रंगांचा संबंध नाममात्र होता. त्यांचेच एक वेगळे वास्तव असावे तसे चेहरे, कपडे, पार्श्वभूमी यांचे आपापसात काही हिशेब जाणवत होते; जे बरेवाईट, स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण होते. हे रंगीत फोटो घेताना रंगांचा वेगळा विचार मी नीटसा केलेला नव्हता, ब्लॅक अँड व्हाइट फोटो घेतल्याप्रमाणेच हे फोटो मी घेतले होते. पण रंगांनी मूळच्या चेहऱ्यांवर फोटोत केलेले संस्कार ब्लॅक अँड व्हाइट फोटोपेक्षा पुष्कळ निराळे होते. आता त्वचेला, डोळ्यांना रंग आला होता आणि अर्थात मुळाबरहुकूम नव्हता. उपलब्ध प्रकाशाच्या प्रमाणात तो बदलला होता, त्यात क्वचित एक जादा निळेपण किंवा पिवळेपण होते. पार्श्वभूमी आता रंगीत बनल्याने मुख्य आकृतीशी तिचे नातेच पूर्ण बदलले होते. कुठे कुठे ती मुख्य आकृतीपासून लक्ष ओरबाडून घेत होती, तिच्यातला एखादा अत्यंत क्षुल्लक तपशीलदेखील केवळ वेगळ्या रंगाने अनपेक्षितपणे फार महत्त्वाचा ठरून फोटोचा सारा तोल बिघडवीत होता. हे सगळे रंगीत फोटोग्राफीत मला रस उरू नये, पुन्हा मी ब्लॅक अँड व्हाइट फोटोग्राफीकडे एकवटावे असेच होते. पण या पहिल्यावहिल्या रंगीत फोटोंत दोन फोटो जरा वेगळे होते. एकात पिंजऱ्यातले लव्ह बर्ड्स होते. त्यांचे वेगवेगळे रंग आणि रंगच्छटा फोटोत बदलून पण जास्त मोहकपणे आल्या होत्या. दुसरा फोटो माझ्या मुलीचा होता. सकाळी जरा लवकर समुद्र-किनाऱ्यावर घेतलेल्या या फोटोत कोवळ्या सोनेरी उन्हातले त्वचेचे पोत (टेक्श्चर)

विलक्षण तलमपणे उमटले होते; इतके की पारदर्शक आणि फारच खरे, जिवंत वाटावे. रंगांविषयी माझी उत्सुकता या दोन फोटोंनी चाळवली. रंगीत फोटोग्राफी ब्लॅक अँड व्हाइट फोटोग्राफीच्या जोडीला मी इथून पुढे चालू ठेवण्याचे ठरवले. पण ती मला मुळीच परवडणारी नव्हती. शिवाय मुंबईसारख्या शहरात, रोजच्या धावपळीत रंगीत फोटोग्राफीला नवे नवे विषय तरी कुठून मिळणार ? म्हणून माझा यातला वेग फारच मंद होता. एखादे वेळी कुठे विषय दिसे तेव्हा कॅमेरा जवळ नसे. मग मनानेच फोटो काढायचा. कधी हट्टाने कॅमेरा खांद्याला लटकवून मी बस-लोकलच्या गर्दीतून दिवसचे दिवस माझी कामे उरकीत फिरे, पण विषयच गवसत नसे. नुसताच कॅमेरा जपण्यात दिवस जात, कारण एकदा कॅमेरा गेला तर नवा घेणे सोपे नव्हते.

नेहरू अभ्यासवृत्ती मिळाली आणि भरपूर प्रवासाची संधी चालून आली. फोटोग्राफीच्या महागड्या साहित्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटला. मी माझे प्रॉजेक्ट मुख्यतः कॅमेरा आणि टेपरेकॉर्डरच्या मदतीनेच करण्याचा निर्णय घेतला. मी टिपणे किंवा डायरी ठेवणार नव्हतो, पण जे पाहीन त्याचे दृश्य रेकॉर्ड आणि ऐकेन त्याचे श्राव्य रेकॉर्ड ठेवणार होतो. इथेच कागदावर छापण्याच्या रंगीत फोटोंऐवजी स्लाइड्सचे माध्यम माझ्या हाती आले. एक स्वयंचलित स्लाइड प्रॉजेक्टर वापरण्याला मिळाला. घेतलेले फोटो याने लागेल तितके मोठे करून पाहता येत होते. त्यात स्लाइड्स साठवण्याला जागाही कमी लागते. पुन्हा कागदावरच्या रंगीत फोटोपेक्षा नितळ पांढऱ्या पृष्ठभागावरच्या स्लाइड्च्या लाइफ किंवा लार्जर दॅन लाइफ साइझमधल्या प्रतिकृतीत रंगांना एक वेगळेच रूप प्राप्त होते, बारीकसारीक तपशील विलक्षण जिवंत होऊन उठतात असे समजले. कागदावर भासत नव्हते ते पांढऱ्या भिंतीवर भासू लागले. स्लाइडवर घेतलेला फोटो हा चैतन्याच्या अखंडित प्रवाहातला एक निसटता, जिवंत समूर्त क्षण असू शकतो; तो आपण निर्जीव न बनवता फोटोच्या किमयेने केवळ स्थिर केलेला असतो. आणि तो केव्हाही, कितीही वेळा स्थिर परंतु जिवंत भासणाऱ्या स्वरूपात आपण पाहू शकतो.

इथेच एक वेगळे माध्यम मी हाताळले. 'सुपर एट' (आठ मिलिमीटर आकारातल्या) चलच्चित्रपटाचे माध्यम. हेही रंगीत होते. स्थिर नव्हे तर हलते होते. हाताळताना स्थिर-चित्रणाहून आपण अधिक ताकदीचे माध्यम हाताळत आहो असे वाटले, (हे जास्त महागही होते.) परंतु थोडक्याच काळात याची ताकद आणि याच्या मर्यादा लक्षात आल्या. यात अगणित क्षणांची सलग मालिका आयती हाती लागत होती आणि यातला कोणताही एक क्षण स्थिर करून पाहण्याची सोय मात्र नव्हती. हलतेपण हीच या माध्यमाची मर्यादाही होती. स्लाइडमधल्या, सचेतन आणि प्रवाहीदेखील भासणाऱ्या विलक्षण स्थिर क्षणाच्या तुलनेने या सतत चालणाऱ्या फिल्मवरचे अनेक सलग क्षण परिणामाच्या दृष्टीने कमी होते. त्यांना त्यांची एक गंमत असली तरी स्थिरचित्राची खोली (डेप्थ) या चलच्चित्रात मला मिळेना; आणि ही दोन्ही माध्यमे वापरताना माझा भर मात्र स्लाइडवरच्या स्थिरचित्रावरच राहिला. मी संग्रहित केलेल्या चेहऱ्यांपैकी स्लाइडवरचे चेहरे माझ्याशी चलच्चित्रावरच्या चेहऱ्यांपेक्षा खूप अधिक

बोलतात. हे चेहरे जसे माझे आप्त बनले आहेत (यातले काही या लेखात दिले आहेत;) तसे चलच्चित्रातले चेहरे बनलेले नाहीत. ते ओळखीचे पण परके आहेत. मला त्यांच्याविषयी काही समजण्याआत ते माझ्यापुढून निघून जातात. पुनःपुन्हा पाहूनही ते माझ्यात रुजू शकत नाहीत. चलच्चित्राच्या माध्यमात हे जमणारच नाही असे मुळीच नव्हे; परंतु त्यासाठी पुष्कळ फिल्म खर्ची टाकावी लागेल. याचा अर्थ बराच मोठा खर्च. त्यापेक्षा एक स्लाइड माझ्या खिशाला परवडते.

आता या लेखासोबत छापलेल्या रंगीत छायाचित्रांबद्दल. यातला एकेक चेहरा नीट पाहिला तर एकेक आयुष्य बोलतो आहे. चेहऱ्याबरोबर त्याच्या आजूबाजूचे काही तपशीलही बोलणारे आहेत. फक्त आपण डोळ्यांनी ऐकले पाहिजे. आपणच बोलू लागलो की समोरचे चेहरे मुके होतात. तसे हेही होतील.

प्रथम यातला एकेक चेहरा जे बोलतो आहे ते लक्षपूर्वक ऐकून मग यानंतरचा भाग वाचलेला बरा. कारण यानंतर या चेहऱ्यांविषयीचा मला माहीत असलेला तपशील मी सांगणार आहे आणि त्यात कदाचित मी अनवधानाने चुकेन; पण हे चेहरे स्वतःविषयी बोलताना चुकूच शकणार नाहीत. त्यांच्याविषयी त्यांना पुरते बोलू दिल्यानंतर माझी मर्यादा ओळखून थोडेसे मी बोलायचे. या चेहऱ्यांपेक्षा मी शहाणा नाही आणि महत्त्वाचाही नाही.

आता यांपैकी पहिला चेहरा.

*माझ्या अभ्यासवृत्तीच्या निमित्ताने मी खेडी खूप पाहिली. देशाच्या वेगवेगळ्या भागांतली पाहिली. या खेड्यांमधून छोट्या शेतकऱ्यांचा एक वेगळा वर्गच मला जाणवला. हा छोटा शेतकरी दोन-चार एकरांच्या बहुधा मध्यम वा कनिष्ठ प्रतीच्या आणि कधी कधी सरळ निकृष्ट जमिनीत आपले कष्ट ओतओतून अर्धपोटी राहण्याइतपत पीक काढतो. यात त्याला तो स्वतः, बायको, किमान सहासात मुले आणि कधी म्हातारे निकामी आईबाप किंवा यांतले कोणी तरी एक, इतक्यांचा चरितार्थ निभवावा लागतो. शेतीसाठी बैल असला तर त्याच्यावरचा खर्च न निघण्याइतकी जुजबी आणि कम-कस जमीन असते. म्हणजे बैलालाही पोसावेच लागते. एखादी म्हैस किंवा गाय असते आणि ती वैरणीला काळ असते पण नाममात्रच दूध देते. म्हणजे तिचेही पोषण हा करतो. दूध न दिले तरी हा तिला टाकणार नाही. जशी म्हातारी आई याला मोठे ओझे होत नाही तशी खुडकली गाय किंवा म्हैसही हा कोणत्या तरी कर्तव्यबुद्धीने दावणीला ठेवून पोसत राहतो. एका अर्थाने आपल्यातले काढून तिला देत राहतो. आपण जनावरासारखे राबून गाईला किंवा म्हशीला माणसासारखे हा खाऊ घालतो असे म्हटले तर चुकणार नाही. यामुळेच याच्या जनावरांच्या अंगावर थोडे मांस दिसेल आणि याची हाडे मोजता येतील. हा उन्हातान्हात करपलेला असेल आणि याचे जनावर सावलीला चरत असेल. आणि या विषम वागणुकीबद्दल हा चुकूनही कुरकुरणार नाही.*

*हा अर्थात निरक्षर असतो. कर्जबाजारीही थोडाफार असतो. गावातल्या आढ्यातेढ्यात*

पडण्याला याला उसंतच नसते. ते याने केले तर राबेल कोण ? आणि यामुळेच बहुधा, याची दखल कोणी घेत नाही. याची गाऱ्हाणी याच्याप्रमाणेच छोटी. ती दूर झाली तर हा रईस होणार नाही तसा, ती तशीच चालू राहिली तर हा नष्टही होणार नाही. हा चालूच राहणार, आणि फक्त चालू राहणार. धावणार नाही किंवा लोळणार नाही. यामुळेसुद्धा असेल, याची गाऱ्हाणी कधी न सरणारी. कोणी जरा शहरी, थोडा प्रतिष्ठित दिसला की हा त्याला प्रथम आणि आवर्जून ऐकवील ती गाऱ्हाणी. मग त्या शहरी प्रतिष्ठिताने कितीही सांगितले की मी तो नव्हे तरी वारंवार लाचारीने, लागल्यास हात जोडून, जरूर पडल्यास पाय धरून हा गाऱ्हाणी ऐकवून त्याबद्दल काही करण्याला विनवील. आधी कुणाकुणाला त्याबद्दल ऐकवले त्याची यादीही वाचेल. याच्या लाचारीने, क्वचित बुद्दू वाटणाऱ्या कोडगेपणाने हा फार अडाणी वाटेल; पण तसा तो असत नाही. त्याला तसे बरेच समजते. कदाचित तुमच्या-माझ्यापेक्षा जास्त समजते. गाऱ्हाणी वाचली तरी ती दूर होतीलच असे नाही, किंबहुना बहुधा दूर होणारच नाहीत, हे याला चांगले समजलेले असते. तुम्ही निरोप घेतल्यावर ज्या सहजपणे तो पुन्हा कष्टांकडे वळेल त्यात हे स्पष्ट होईल. तुमच्याशी लाचारीने वागताना खोबणीच्या अंधाऱ्या गुहेतून डोकावणाऱ्या त्याच्या शहाण्या आणि सावध डोळ्यांत हे स्पष्ट असेल. न का काही होईना, ऐकवत राहायचे, हे त्याचे व्रत नव्हे, धोरण. त्यात काय खर्च होते ? जे खर्च होते ते त्याच्याकडे नेहमीच असते. सर्व दगडांना नमस्कार करणारे हे हिंदू मन. हिशेब असा की एक ना एक दगड पावेल. आणि न पावला तर आपले आहे ते चालूच आहे. एकेक नमस्कार करण्यात काय खर्च होते ?



या विशिष्ट 'चेहऱ्या'ने पहिल्या वेळी रणरणीत उन्हातून मी सडकेने चाललो असता आपण होऊन शेतातून पुढे येऊन मला हटकले आणि मी कुणी सरकारी माणूस असावा अशा पद्धतीने जमिनीची चार-सहा गाऱ्हाणी अत्यंत आदबपूर्वक माझ्या कानी घातली. मी औपचारिक सहानुभूती दाखवू लागताच त्याने पुन्हा तीच गाऱ्हाणी घोळून ऐकवून काही करण्याची फार नम्र प्रार्थना केली. मी सरकारी माणूस नव्हे असे मी यावर संकोचून म्हटले त्यावर त्याचा विश्वास न बसावा तसा तो पुन्हा पहिल्यापासून

गाऱ्हाण्यांचे निवेदन करूलागला. मी निग्रहाने त्याचा निरोप घेतला. पुन्हा दुसऱ्या वेळी तो दिसताच डोक्यावरची उन्ही कापडी हॅट मी गडबडीने काढून घेतली. या हॅटमुळे तो मला सरकारी अधिकारी समजला असावा असा मध्यंतरी मी बांधलेला अंदाज. पण हॅटशिवायच्या मला त्याने आता पहिल्याच लाचारीने जुनीच गाऱ्हाणी ऐकवली. मी पुन्हा सांगितले की मी सरकारी अधिकारी नव्हे. माझी खरी ओळखही त्याला कळेल इतपत मी मुद्दाम दिली. पण तरी त्याने गाऱ्हाण्यांचे दळण नव्याने आरंभले. मी नको म्हणता तो मी भेटलो की गाऱ्हाणीच ऐकवतो. ती दूर होत नाहीत हे कळूनही हे तो करतो आणि ती दूर होत नाहीत याबद्दल त्याला राग नाही; आणि लोभही नाही. खरे तर काहीच नाही. मी त्याच्या हिंदू मनालेखी आणखी एक दगड असलो पाहिजे. पावलो तर आनंद आहे; नाही तर तो नमस्कार करून गाऱ्हाणी गाण्याला एव्हाना सरावलाच आहे.

वाराणसी घाटावरचा अष्टावक्र भिकारी सर्व मिळून (बसल्या स्थितीतच, कारण त्याला उभे राहताच येत नव्हते) सुमारे दीड फूट उंचीचा होता. त्याला उभे राहता येत नव्हते असे म्हटले, पण त्याला धड बसताही येत नव्हते. सुकल्या पायांच्या वाकड्यातिकड्या काठ्यांना डबड्यांचे वगैरे टेकू देऊन तो कसाबसा बसला होता. त्याला असे बसण्याचे क्लेषही होत असावेत. पण सवयीने त्याने ते बसण्याच्या अवस्थेचा अपरिहार्य भाग मानले असले पाहिजेत. त्याला उभे राहता येत नव्हते; बसण्याचेही हठयोगी आसन झालेले, आणि अंग ताणून आडवे होण्यातही त्याच्या जन्मजात कुबडाचा मोठाच अडथळा होता. जेमतेम एका कुशी अंग आखडून पडून राहण्याची चैन त्याला जमत असली तर असली; पण तरी तो जगत होता. भीक मागून जगू मागत होता. त्याच्या हनुवटीच्या वाळल्या चामडीवर काही पिकले केस आणि खुंट दिसतात. त्यात त्याच्या वयाची नोंद सापडते. तो जगत आला, जगत होता, जगण्याची उमेद बाळगून होता. रोज न चुकता वाराणसी घाटावरच्या भिकाऱ्यांच्या पंक्तीत एक ठरीव जागा तो सकाळी लवकर खुरडत पोचून अडवीत होता. या जागेवर त्याने आपला हक्क अबाधित ठेवला होता. इतर आक्रस्ताळ्या, अक्राळविक्राळ भिकाऱ्यांच्या कोलाहलात तो (त्याला आवाजही नव्हता. तो मुका होता.) आपल्या दीड फुटाच्या कुडीची गाठाळ वाकडीतिकडी मांड कशीबशी रोवून एका डोळ्याने (कारण त्याला एक डोळाही नव्हता आणि शिवाय तो बहिराही असावा) आणि एका हाताच्या हातवाऱ्यांनी संभाव्य दात्यांचे लक्ष वेधून घेण्याची शिकस्त करीत होता. निराश होत नव्हता, वैफल्यग्रस्त होऊन आयुष्याचा शेवट करण्याचे त्याला सुचत नव्हते. त्याच्या एका उघड्या आणि हलत्या डोळ्यात जगण्याची दुर्दम्य इच्छा आणि फार मोठे वस्तुनिष्ठ शहाणपण एकवटलेले होते. ही स्लाइड भिंतीवर मोठ्या आकारात 'प्रॉजेक्ट' करून हा डोळा मी पाहत राहतो. कधी कधी या डोळ्यातल्या डोहाच्या तळाकडे मी एका ध्यासाने निघतो आणि मी रुतणार या भयाने घाबरून आणि गडबडीने परत येतो. हा डोळा हे मला

एक आव्हान वाटते.

वाराणसी घाटावरचा एकाक्ष भिकारी आणि खेड्यामधला शेतकरी यांच्या चित्रांशिवाय दोन छायाचित्रे आहेत. दोन्ही छायाचित्रे एकाच तरुण माणसाची आहेत हे लक्षात येईल. हा माणूस आता नाही. त्याला फाशी दिला. ज्याला कायद्यात क्षमा नाही असा खून करणाराला फाशी होते. यातल्या कोणाची फाशी नंतर माफ होऊन जन्मठेपही होते. पण याची फाशी माफ झाली नाही. माफीसाठी फाशीआधीच्या दिवसापर्यंत त्याने धडपड केली आणि रात्रभर जागे राहून माफीची वाट पाहिली. शेवटी तो फाशी गेला. शेवटपर्यंत फाशी न जाण्याची शर्थ करूनही फाशीआधी पाच मिनिटे त्याने सर्व उपस्थितांचा रीतसर निरोप घेतला. अधिकाऱ्यांचे आभार मानले. आणि मग तो फाशीसाठी निघाला. चार भयंकर खून केलेला तो, सुसंस्कृतासारखा फाशी गेला.

ही छायाचित्रे फाशीआधी अनेक महिन्यांपूर्वीची आहेत. यातले कपडे तुरुंगाचे नाहीत कारण आपला फोटो कैद्याच्या वेषात निघू नये अशी त्याची इच्छा होती आणि तुरुंगाधिकाऱ्यांनाही तसे वाटले. फोटो घेताना त्याच्या हाती त्याचा चष्मा होता. नेहमी तो चष्मा लावूनच असे. हे फोटो घेताना मात्र त्याने चष्मा लावण्याचे टाळले. अनेकदा





सुचवूनही त्याने चष्मा चढवला नाही. 'फोटोत डोळ्यांवर ग्लेअर येईल' असे तो खुलाशादाखल म्हणाला, पण कारण निराळे असू शकेल. आणि त्याचे त्यालाचे ते तेव्हा ठाऊक असणार.

त्याला त्याच्या एकुलत्या एका मुलीचा एक अलीकडचा फोटो फार हवा होता. या मुलीची आणि त्याची भेट नव्हती. मी त्याला तो काढून आणून वचनही छायाचित्रे घेण्याच्या आदल्या भेटीत दिले. हेतू एवढाच होता की त्याने मला सर्व सहकार्य द्यावे. नंतर फाशीआधी अठ्ठेचाळीस तास झालेल्या भेटीत त्याने मला स्मरण दिले. तुम्ही मला तो फोटो देतो म्हणाला होतात पण मला ठाऊक होते, तुमच्याने ते होणार नाही. तसेच झाले ! त्याला पुन्हा नवे वचन देण्याची इच्छा होती पण ते पुरे करण्याच्या प्रयत्नलाही आता अवकाश नव्हता. मी फक्त मख्ख हसलो, झाले.

त्याच भेटीत संभाषणाच्या मध्याला समाजातल्या वाढत्या हिंसाचारांची चिकित्सा करता करता एकदम थांबून त्याने माझ्या आईच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त केला होता. माझ्या आईच्या निधनाची खबर त्याला कोणी दिली, माहीत नाही. तिचे निधन होऊन तसे दिवसही बरेच झालेले होते. पण त्याने स्मरणपूर्वक आणि अगत्याने रीत पाळली आणि मला चकित केले.

त्याने केलेले चार खून खालच्या-वरच्या सर्व कोर्टांत सिद्ध झाले होते. तुरुंगाधिकाऱ्यांना त्याच्या गुन्ह्यांबद्दल बालंबाल खात्री होती. खुनांची चौकशी केलेल्या अधिकाऱ्यांचाही त्याच्या अपराधीपणावर ठाम विश्वास होता. फक्त तो स्वतः, आपण निरपराध असल्याचे त्याच्या-माझ्या पहिल्या भेटीपासून मला कायम सांगत होता. फाशीआधी त्याने मॅजिस्ट्रेटची भेट मागितली आणि अखेरचे हेच सांगितले, की आपण पूर्ण निरपराध आहोत. शेजारी शेजारी छापलेल्या त्याच्या दोन छायाचित्रांतल्या दुसऱ्या छायाचित्रात तो मला निरपराध असल्यासारखा वाटतो. अनेकदा तो असा वाटे, कारण त्याचे वागणे-बोलणे तुरुंगात माझ्याशी मृदू आणि आर्जवी असे. फार तर ते कडवट होई. परंतु त्यात खुन्नस जाणवत नसे. छायाचित्रे घेतानाही तो फार समजूतदार



आणि सहकार्यशील होता. छायाचित्रे घेतेवेळी कोणी विचारले असते तर मी म्हणालो असतो, तो खुनी वाटत तर नाही. पण नंतर स्लाइड्स पाहताना या दोन छायाचित्रांतले मोठे समोर भिंतीवर स्थिर होताच मी—आणि बरोबरचे इतर—हादरलो. उत्स्फूर्तपणे सर्व म्हणाले, डोळे—डोळे वेगळे आहेत ! या छायाचित्रातले माझ्या फाशी गेलेल्या या मित्राचे डोळे मला नेहमीच मनस्वी अस्वस्थ करतात. छायाचित्रे घेताना मला हे कसे जाणवले नाहीत ? त्यापूर्वी माझ्या कसे लक्षात आले नाहीत ? तो तर एक पोज घेऊन आपला फोटो चांगला यावा म्हणून चारचौघांसारखा बसला होता. त्याच्याही नकळत त्याचे डोळे त्याचे आत-आतले रहस्य बोलले ? वरपांगी मृदू, सुसंस्कृत असलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या तळाशी एकेकदा केवढे वेगळेच काहीतरी दडलेले असते ! ही स्लाइड भिंतीवर मोठ्या आकारात दिसू लागली की ते डोळे मला आजही झपाटू बघतात. स्लाइडमधून ते नव्याने विलक्षण जिवंत होऊन कोणाला तरी भयाने गर्भगळित करू बघतात.

बिहारमध्ये मुझफ्फरपूर परिसरात मुशहरी म्हणून एक छोटा टापू आहे. इथे पूर्वी एक नक्षलवादी आंदोलन झाले होते. पश्चिम बंगालमधील नक्षलवादी नेत्यांशी दळणवळण प्रस्थापित झाले होते. जमीनदारांचे खून पडले होते. नक्षलवादी गरम रक्ताचे शेतमजूर कुटुंबामधले तरुण होते. राजकीय दृष्ट्या थोड्याफार जागृत मनाला आत्यंतिक दारिद्र्याचे चटके बसत राहिले की त्याचे बहुधा होते ते या तरुण मुलांचे झाले. पुढे या मुलांना जमीनदारांनीच एकमेकांविरुद्ध वापरले. जमीनदार राहिले, नक्षलवादी कोणी मारले गेले, कोणी गजांआड झाले, कुणी नुसतेच बेपत्ता झाले. कुणी म्हणत, मारण्यात आले, कुणी म्हणत, भूमिगत होऊन बाहेर पळाले. नंतर जयप्रकाशजींनी त्या भागात जाऊन या आंदोलनात उद्ध्वस्त झालेल्या सर्व कुटुंबांची—यात नक्षलवाद्यांची कुटुंबे होती आणि जमीनदारांचीही होती—विचारपूस केली, सर्वांसाठी आपल्या सर्वोदयी दृष्टिकोनातून जे करता आले ते कळकळीने केले. मी त्या भागात फिरलो तेव्हा यातील एका छायाचित्रांतली समूर्त वाताहत एका जुनाट



वाड्यात भेटली. ही नक्षलवाद्यांनी ठार केलेल्या एका जमीनदाराची विधवा. हा जमीनदार कमरेखाली आजाराने लुळा झालेला होता. पानाच्या तळाशी दिलेल्या छायाचित्रातल्या खाटेवर तो एका रात्री वाड्याच्या व्हरांड्यात झोपला असता आठ नक्षलवादी मुलांनी मिळून त्याला चाकू-सुऱ्यांनी खतम केला. मागे लग्न झालेली एक मुलगी आणि ही विधवा उरली. लग्न झालेली मुलगी तिच्या सासरी. या विधवेला शेती, व्यवहार, कसले ज्ञान नाही. नवरा असताना ती कायम गोषात आणि चुलीशी. आता नवऱ्यामागोमाग जमीनदारी गेली, अन्नान्न दशा आली. फक्त वाडा उरला. त्यात एक भरड धोतरासारखे धडोते शरीराच्या काठीला गुंडाळून जगणारी भुतासारखी ही विधवा. आपले लुळेपांगळे, निराधार, अंधारे, अर्थहीन आयुष्य इतक्या भेदकपणे बोलणारा असा चेहरा क्वचित भेटतो. या चेहऱ्याचे छायाचित्र घेतले आणि तरी काहीतरी राहिले असे वाटले. म्हणून मग त्या रित्या खाटेसकट त्या रित्या खाटेसारख्याच स्त्रीचे एक दुसरे छायाचित्र घेतले. ही दोन मिळून चित्र पुरे होते असे मला वाटते.



त्यानंतरचे चित्र नक्षलवाद्याच्या आईचे. हिचा तो एकुलता एक मुलगा. लहानपणापासून इतर मुलांहून जरा गंभीर पण फार सद्‌वर्तनी. शिक्षणात हुषार. घरच्या परिस्थितीने शिक्षण मध्येच तुटले तरी एका हव्यासाने वाचत, विचार करीत राहिला. त्याला गुरूही भेटला. हा मध्यम शेतकरी. राजकारणात जनसंघीय मानला जाणारा. हा या ज्ञानाच्या भुकेल्या मुलाला स्वतःजवळची पुस्तके देऊ लागला. त्याला राजकीय धडे देऊ लागला. पुढे तो मुलगा बघता बघता नक्षलवादी बनला. गुरू पोलिसांचा खबरी बनल्याच्या संशयावरून शिष्याने एका रात्री गावठी रायफलीने त्याला टिपला. तोदेखील रात्री ओटीवरच्या खाटल्यावर झोपला असतानाच. त्या वेळी समोरच्या घरात भजन चालू होते.

पुढे आणखी खून पडत गेले. नक्षलवादी मुले सर्व वेळ जंगलात असत. रात्री-अपरात्री लपतछपत गावात येत. येत ती एखादा 'वर्ग-शत्रू' नष्ट करण्यासाठीच. त्या टापूला पोलिसांचा वेढा पडला होता. नक्षलवादी मुलांच्या घरातून ते वेळीअवेळी घुसू लागले, काही पकडून नेली. छायाचित्रातल्या आईचा मुलगा आता कायम जंगलातच असे. कित्येक महिन्यांत तो तिला दिसला नव्हता. पोलिसांचा त्रास खूप होत होता, पण आपल्या मुलाच्या चांगुलपणाबद्दल या बाईची फार खात्री होती. आणि एकदा बाजाराला जाऊन ती परत घराकडे आली तो घरात कुणाची तरी चाहूल होती. कोण म्हणून सावधपणे पाहते तर तिचा मुलगा एका जोडीदाराबरोबर चूल पेटवून स्वयंपाक करीत बसला होता. सांगताना ती मला म्हणाली, मुलाला आधी खूप रागावले, का आलास घराकडे ? पोलिस धरतील ना. आधी परत जा आलास तिकडे, असाच्या असा नीघ. मुलगा म्हणाला, खूप दिवसांत आम्ही जेवलो नव्हतो, एकदा घरी येऊन काहीतरी खाऊंन जाऊ म्हणून आलो, आई. मी चुलीशी बसले. घाईने कसेबसे काहीतरी शिजवून खाऊ घातले. ते कसे तरी खाऊन ते दोघे माझ्या पाया पडले आणि निघून गेले. मी मुळी त्यांना सारखी जाण्याची घाईच करीत होते ना. तेच माझ्या मुलाचे माझे शेवटचे दर्शन. नंतर तो मला दिसलाच नाही. डोके नसलेले एक प्रेत पोलिसांना पुढे चळवळ संपल्यावर गावाबाहेर सापडले, ते त्याचे होते म्हणतात. मला बोलावले नाही. कळले तेव्हा खेटे घातले—मी, त्याच्या वडलांनी—पण प्रेत दाखवले नाही. मग फोटो दाखवतो म्हणाले, तो पण दाखवला नाही. प्रेत जाळून टाकले असे म्हणतात.

हे सगळे सांगतानाचा तिचा चेहरा छायाचित्रात आहे. जमीनदाराच्या विधवेचा सपाट एकसुरी आवाज—मधूनच पिचू बघणारा. पाणी न गाळता कायम झरणारे डोळे. अंगाला एक भरड मळके पांढरे धडोते कसे तरी गुंडाळून पदर घेतलेला. पण जमीनदाराच्या विधवेचे दयनीय केविलवाणेपण, अर्थहीनपण, निराधारपण इथे नाही. जमीनदाराची विधवा सर्व संपून मागे राहिलेला नुसताच भास वाटतो तसे हिचे नाही. उलट तिची शोक-कहाणी सांगताना मधूनमधून तिच्या डोळ्यांत चेतना येत होती, ते मधूनच अभिमानाने चमकत होते. जमीनदाराच्या विधवेमागोमाग हा चेहरा पाहणे



मला अर्थपूर्ण वाटते.

पानाच्या तळाशी आहे तो. अर्भकासारखा हसणारा, अधू डोळ्यांचा खेडवळ माणूस या बाईचा नवरा, त्या नक्षलवादी मुलाचा बाप. बायको तिच्या एकुलत्या एका मुलाच्या अखेरीविषयी सांगत असता हा चेहरा छायाचित्रात दिसतो असाच, बाजूला बसून हसत होता. नंतर मुलाविषयी त्याला विचारता तो गंभीरपणे बोलला तेव्हाही तो अगदी असाच हसत होता. त्याच्यावर दुसरा भावच नव्हता. मग लक्षात आले की हे हसणे मुद्दाम नव्हतेच. ते त्या चेहऱ्याचा कायमचा भाग झाले होते. एक खडतर आयुष्य जगूनही हे हसणे गेले नव्हते आणि ते तसे हसणेही राहिले नव्हते. एकुलत्या एका पोराच्या धकाधकीच्या अल्पायुष्याचा आणि त्याच्या भयाण शेवटाचा जबर आघातदेखील हे निरागस हसू पुसू शकला नव्हता.





*या चार छायाचित्रांबरोबर वेगळी तीन छायाचित्रे आहेत. एकातला चिमुकला चेहरा एका दलित वस्तीत माझ्या भोवती होता. इतर काळ्या-सावळ्या, हडस-भडस चेहऱ्यांच्या गर्दीत तो कसा उठून दिसला. गोरा गोरा, देखणा, प्रसन्न. वंस्तुतः उच्च जातीतच साजणारा, पण नीट पाहिले तर ॲनेमिक. पोटात कधी सकस पोटभर अन्न न गेल्याने, काहीही खावे लागल्याने दात आणि डोळे दुखणाईत होत चाललेले. त्वचा वयाच्या मानाने चरबरीत झालेली. केसांना तेलाचा कधी स्पर्श नसावा. त्यामुळे त्यांच्या जटा होऊ लागलेल्या. छायाचित्र घेतले तेव्हा एक चांगला चेहरा मी टिपत होतो. नंतर या चेहऱ्याकडे घरी लक्षपूर्वक पाहू लागल्यावर इतर गोष्टी लक्षात आल्या. दलित वस्त्यांतून नंतर असे चेहरे मी अनेक पाहिले. छोटे, चिमुरडे, उच्च जाती-वर्ण वागवणारे, सोनेरी भुरभुरत्या जटांचे, पोपडे धरणाऱ्या आणि वाहणाऱ्या गहिऱ्या डोळ्यांचे, चाफेकळीसारख्या शेंबुडल्या नाकाचे, कॅल्शमच्या कमरतेने किडू लागलेल्या इवल्या इवल्या मूळच्या सुंदर शुभ्र दांतांनी प्रसन्न हसणारे, नाहीतर छोट्या वयातच फार पोक्त झालेले. छायाचित्रातला हा चेहरा या असंख्य चेहऱ्यांपैकी एक.*



**वयस्क चेहरा** मांग जातीचा. एका मांग वस्तीतल्या घोळक्यात बसून तो त्या वस्तीतल्या दोघांच्या खुनांची कहाणी शांतपणे ऐकत होता. ही कहाणी त्याला चांगली परिचित होती. ते मारले गेलेले दोघेही तो चांगले ओळखत होता. कहाणी आम्हांला सांगितली जाताना तो ती मुकाट्याने बसून ऐकत होता. मी इतरांची छायाचित्रे घेत असताना याचे घेतले. याच्या चेहऱ्यावरचा शांत सोशिकपणा मला महत्त्वाचा वाटला. कारण तो प्रातिनिधिक आहे. त्या प्रत्यक्ष दोन खुनांनी क्रुद्ध होण्याचे त्राण या माणसात नव्हते आणि त्या खुनांचे वर्णन ऐकतानाही तो हा असा फूल पडलेल्या डोळ्यांनी समोर पाहत शांत बसलेला होता. हे खून गावच्या उच्च जातीच्या अनेकांनी मिळून काठ्याकुऱ्हाडींनी केलेले होते. ज्यांचे खून केले ते मांग कष्टाचे काम करून जगणारे सरळमार्गी होते. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत त्यांनी उच्च जातीपैकीच एका गटाच्या उमेदवारासाठी काम केले होते, तो निवडून आला आणि दुसऱ्या गटाने या मांगांचे बळी घेतले, वर दरवड्याची खोटी केस त्यांच्याविरुद्ध उभी केली. पोलिसांनी मांग वस्तीतल्या दरवड्याच्या जिवंत वहिमींना धरले आणि खुनाच्या वहिमींना मोकाट ठेवले. खुनाची व्यवस्थित चौकशीही झालेली नव्हती. खुनाच्या दुसऱ्या दिवशी शोकग्रस्त मांग वस्ती पुन्हा पोटाच्या कामाला लागली. त्यात खून झालेल्या मांगांच्या घरची बाया-माणसेसुद्धा होती. शोक करीत बसायचे तर खायचे काय ? पोरांना काय खाऊ घालायचे ? सारे ऐकत हा मांग असा स्वस्थ बसला होता. सारे ऐकल्यावरही त्याने एखादा अनुदार उद्गार काढला नाही. त्याने मुळी उद्गारच काढला नाही. केव्हा तरी तो उठून गेला.



*उरलेला चेहरा खेड्यांतलाच पण तुलनेने फार आक्रमक आणि कृतिशील. हा उच्च जातीचा, खेड्याच्या तुलनेने सधन आणि मोठ्यापैकी शेतकरी, मागे एकदा गांवचा सरपंच. आता जवळ जवळ एकांडा शिलेदार. आपले हितसंबंध आपल्या धमकेवर जागरूकपणे जपणारा आणि वाढवणारा, केवळ घराण्याच्या इभ्रतीसाठी चालू सरपंचाशी कोर्टात अनेक वर्षांपासून लढणारा. या दीर्घ लढतीबद्दल मोठ्या अभिमानाने बोलणारा. (चालू सरपंच कनिष्ठ पेशाचा आणि जातीचा पण प्रयत्नांनी वर आलेला.) बोलण्यात नेमकेपणा, व्यवहारीपणा आणि जरूर तिथे स्पष्टपणा. आपली बाजू नेण्याची हातोटी. स्वरात आदब आणि आक्रमक दर्प यांचे विलक्षण मिश्रण. आपल्या हितसंबंधाला कोणी शिवते म्हटले की स्वर वरपांगी नेहमीचा, आणि शब्दांना डावपेचाचा आणि अतिशय हिशेबी युक्तिवादाचा उभारला फडा. पड खाण्याचा धर्म नाही. हा सदा ताठच. छायाचित्र घेताना तो मुद्दाम व्यवस्थित तयार होऊन छायाचित्रासाठी बसला. छायाचित्र नंतर भिंतीवर पाहताना तो शिकारी ससाण्यासारखा वाटतो.*

ही काही छायाचित्रे; आणखी बरीच आहेत. वाढतही आहेत. यातून एक चेहऱ्यांचे म्युझिअम तयार होते आहे. त्या निमित्ताने अनेक प्रकारची आयुष्ये एका अर्थाने संग्रहित होत आहेत. कधीही बघत बसले तर नवे काही तरी मिळते. जुने उजळून निघते. विचाराला चालना मिळते. विषय एकच : या देशातला माणूस. इतका अफाट आणि अद्‌भुत विषय दुसरा कुठला आहे ?



# मुलाखत व आत्मनिवेदन

संवाद तेंडुलकरांशी

अप्रकाशित

**माझे लेखन कशासाठी ?**

अप्रकाशित

# संवाद तेंडुलकरांशी

## शिरीष पै, प्रिया तेंडुलकर

■ तेंडुलकर, तुमच्या षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त ह्या ग्रंथाच्या प्रकाशकाने तुमच्या निवडक साहित्याचा संग्रह प्रकाशित करावयाचं ठरविलं, त्यातूनच ह्या ग्रंथाची योजना तयार करण्यात आली. तुमची नाटकं, पटकथा, एकांकिका, कथा, वृत्तपत्रीय लेखन आणि इतर स्फुट लेखन ह्यातून तुमच्या उत्कृष्ट साहित्याची निवड करावयाची आणि तीही मर्यादित पानांतच बसवायची हे काम फार अवघड होते. तेंडुलकर, तुम्ही प्रत्येक ओळ विचारपूर्वक आणि मनस्वीपणे लिहिली आहे. तुमचं उत्कृष्ट साहित्य म्हणून केलेली ही निवड सर्वमान्य होईलच अशी खात्री नाही. तरी पण तुमच्या लेखणीची ताकद किती मोठी आहे आणि तुमच्या प्रतिभेची झेप किती उंच आहे ह्याचं दर्शन हा ग्रंथ घडवील अशी आशा आम्ही मनाशी बाळगून आहोत.

तेंडुलकर, सुमारे चाळीस वर्षांपूर्वी तुम्ही गंभीरपणे लेखनाला सुरुवात केलीत आणि अखंडितपणे आजपर्यंत साहित्यनिर्मिती करीत राहिला आहात. गेल्या चाळीस वर्षांत तुमच्या लिखाणाला साचेबंदपणा वा शिळेपणा आलेला नाही. एखादा जिवंत झरा अखंडपणे झुळझुळत रहावा तसं तुम्ही सातत्यानं नवनव्या विषयांवर विविध प्रकारचं लेखन करीत राहिला आहात. आज वयाला साठ वर्षं पुरी होत असतानाही तुमची गणना आजच्या तरुण लेखकांतच करावीशी वाटते. तुमचं बहुतांशी लिखाण हे प्रस्थापित कल्पनांना आणि संकेतांना मुळात हादरे देणारं ठरलं. तुमचं समग्र लेखन हे तुमच्या जीवनातून, तुमच्या जीवनाच्या धकाधकीतून आणि संघर्षातून अपरिहार्यपणे बाहेर फेकलं गेलं आहे. त्यामुळे

**त्याच्यात एक विलक्षण गतिमानता, आवेग, सच्चेपणा आणि उत्कटता उतरली आहे. ह्या दृष्टीनं प्रथम तुमच्याशी बोलावंसं वाटतं ते तुमच्या 'सखाराम बाइंडर' ह्या नाटकाबद्दल—ज्याचा अंतर्भाव ह्या ग्रंथामध्ये करण्यात आला आहे. 'सखाराम बाइंडर' हे नाटक लिहिताना तुमच्या मनात नेमके कोणते हेतू होते ? हे नाटक तुम्हांला कसं सुचलं ?**

□ 'सखाराम बाइंडर' हे नाटक त्यातील 'सखाराम बाइंडर' ह्या व्यक्तिरेखेपासून निर्माण झालं. सखारामचं स्वतःचं असं एक जगणं होतं, जगण्याचा एक प्रकार होता. त्याचं स्वतःचं जगण्याचं तत्त्वज्ञान त्यानं बनवलं होतं. या सगळ्यानं माझ्या मनात घर केलं. माझ्या डोक्यातून ते जाईना. अनेकांना मी ते सांगत गेलो. सांगतानाच ते अधिकाधिक जिवंत होत गेलं. त्यात भर पडत गेली. अर्थात माझ्या मनात होतं ते 'कॅरॅक्टर'. त्याला नाटकाचं रूप नव्हतं. एकदा केव्हा तरी डॉक्टर लागूंबरोबर बोलत बसलो असताना मी असाच त्याच्याविषयी बोलायला लागलो—आणि त्या संध्याकाळी बोलतानाच लक्षात आलं की हा विषय माझ्या मनाशी आता 'पिकला' आहे. आणि त्या रात्री मी हे नाटक लिहायला सुरुवात केली. पहिला प्रवेश लिहिला त्यात लक्ष्मी होती. पुढचं नाटक डोक्यात नव्हतं. चंपाही नव्हती. पहिला प्रवेश लिहिल्यानंतर त्या रात्री थांबलो. कथानक माहीत नव्हतं पण पुढं लिहिता येईल असा विश्वास मनात होता. दुसऱ्या दिवसापासून मी त्या नाटकात शिरलो. एकदा असं झालं की प्रत्यक्षात नाटक पुरं व्हायला फार दिवस लागत नाहीत. नाटकाचं जे 'स्ट्रक्चर' पहिल्या लेखनात उभं राहत गेलं ते तसंच कायम राहिलं. लिहिताना मी नेमका कुठं जातोय हे जाणतेपणी मनाशी नव्हतं. मी नाटकात बुडालो होतो. झपाटला जाऊन मी एक शोध घेत गेलो. सखारामच्या, त्याच्या जगातल्या माणसांच्या जगण्याचा शोध मी घेत गेलो. या माणसांचे घडते, बदलते संबंध, त्यातले ताण, त्यातले बारकावे वेचत गेलो. यातून नाटक 'घडत' गेलं आणि त्याचा एक शेवटही 'घडला'. या पहिल्या लेखनानंतर त्यात संपादना (editing) व्यतिरिक्त काही बदल झाले नाहीत. संपादन नाटक अधिक घट्ट (compact) करण्यासाठी झालं.

■ **तेंडुलकर, तुमच्या सखाराम बाइंडर ह्या नाटकानं रंगभूमीविषयीच्या अनेक सांकेतिक कल्पनांना प्रचंड धक्के दिले. मराठी रंगभूमीच्या इतिहासात 'सखाराम बाइंडर' ह्या नाटकाची नोंद मराठी रंगभूमीवरील नाट्यमूल्यांची उलथापालथ करणारे नाटक अशीच करावी लागेल. मराठी रंगभूमीच्या पावित्र्य-विडंबनापासून तो साहित्यातील अश्लीलतेपर्यंत अनेक प्रक्षोभक वाद ह्या नाटकानं निर्माण केले. वृत्तपत्रांतून ह्या नाटकाविषयी खूपच चर्चा झाली. त्या वेळी एका मुखलातीत मराठी रंगभूमीवरील पावित्र्यविडंबनाच्या संदर्भात तुम्हांला विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना तुम्ही म्हटलं होतंत की रंगभूमीची अप्रतिष्ठा होईल किंवा तिचं पावित्र्य बिघडेल म्हणून माणसाचं हे जिणं नाटकाबाहेर ठेवण्यास मी तयार नाही. रंगभूमीपेक्षा माणसं आणि त्यांचं आयुष्य केव्हाही महत्त्वाचं आहे. आजचं—या घटकेचं खरंखुरं जगणं त्यातील उघडेवाघडेपणासकट सच्चेपणानं आणि अर्थपूर्णपणे मी दाखवलं. जीवनाच्या विविधांगी, सच्च्या चित्रणानं कोणतीही रंगभूमी संपन्न होते, अपवित्र नव्हे ! तर आता असं सांगा की मानवी जीवनातील पावित्र्याविषयी, मांगल्याविषयी ज्या कल्पना**

**समाजात रूढ आहेत त्यांना मुळातून हादरा देण्याच्या हेतूने तुम्ही 'सखाराम बाइंडर' लिहिलंत का ?**

☐ लिहिताना माझ्या मनात असा विचार जाणतेपणी तरी नव्हता—कधीच नसतो. व्यक्तिरेखा किंवा घटना हेच माझ्या दृष्टीनं लिहिताना महत्त्वाचं असतं. त्या व्यक्तिरेखेत किंवा त्या घटनेत माझं मन गुंततं. कारणं त्या वेळी माझी मलाही सांगता येणार नाहीत. ते सगळं माझ्या मनाशी घोळत राहतं. कधी त्याचं नाटक होतं, कधी काहीच होत नाही. कधीकधी माझ्या हातातून काही नाटकं लिहिता लिहिता सुटून गेली. मी ती अर्धवट टाकून दिली. काही पूर्ण करून टाकून दिली.

'सखाराम बाइंडर'बद्दल सांगायचं तर सखारामच्या जगण्यातला खरेपणा, त्याच्या जगण्याची स्वच्छ पद्धत मला नाटकातून दाखवायची होती. त्याच्या जगण्यात लपवाछपवी नव्हती. 'खरी' माणसं समाजात फार थोडी दिसतात. आपण सारेच थोडेफार बेगडी, मुखवटे वागवणारे, खोटे असतो. भित्रे असतो. सखारामच्या जगण्यातला रोकडेपणा, निर्भयपणा, त्याचं जगण्याचं वेगळं तत्त्वज्ञान ह्याविषयी मला कदाचित यामुळेच आकर्षण वाटलं. माझ्यासारख्यांहून हा अनघड माणूस कुठंतरी वेगळा होता. मला तो मोठाही वाटला असावा. त्याचं चित्र रंगवताना रूढ संकेतांना हादरा बसणं अपरिहार्य होतं. परंतु तो द्यावा हा त्या नाटकाचा उद्देश नव्हता.

■ **नाहीतरी तुम्ही म्हणताच की परिघाबाहेरची स्वत:च्या पलीकडे जगणारी माणसं मला मनापासून आवडतात. तुम्हांला जी त्यांची ओढ आहे ती माणसं म्हणून आहे. म्हणूनच सखारामला तुम्ही नाटकाचा नायक बनवलात. 'सखाराम बाइंडर' रंगभूमीवर आला आणि सर्वत्र एकच गदारोळ उठला, तो का !**

☐ खरं तर 'सखाराम बाइंडर' रंगभूमीवर येण्याआधीच तो उठू लागला होता. नाट्यक्षेत्रातील धंदेवाइकांमध्ये नाटक रंगभूमीवर येण्याआधीच त्याची उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. 'शिवाजी मंदिर' नाट्यगृहात पहिल्या प्रयोगाला हे नाटक उधळण्याचा प्रयत्न करण्यात आला. नाटकात चंपा स्टेजवर लुगडं बदलते ह्या घटनेचीच चर्चा प्रथम व्यवसायात आणि नंतर बाहेर सुरू झाली.

चंपाच्या वर्गातील बायकांना पांढरपेशा वर्गातील बायकांसारखी 'प्रायव्हसी' मिळत नाही. तुमच्यासमोर कपडे बदलतानाच त्या त्यांची 'प्रायव्हसी'ही सांभाळतात. अंग दिसू देत नाहीत. पण चंपा स्टेजवर लुगडं सोडते असा प्रचार सुरू झाला. माझा असा अनुभव आहे की असे गदारोळ प्रेक्षकांतून क्वचितच सुरू होतात. कोणाचे ना कोणाचे हितसंबंध हे या गदारोळांचं मूळ असतं. परंतु तो सारा इतिहास या नाटकाचे दिग्दर्शक कमलाकर सारंग यांच्या 'बाइंडरचे दिवस'या पुस्तकात तपशिलवार आला आहे. त्यात मी जाण्याचं कारण नाही.

एवढं मात्र खरं की, नाटकाची भाषा काय असावी, नाटकाचे विषय कोणते असावेत, कुठल्या प्रकारचं जीवन नाटकातून रंगवलं जावं ह्याविषयीचे मराठी रंगभूमीवरचे संकेत 'गिधाडे' आणि 'सखाराम बाइंडर' या दोन नाटकांनी तोडले. केवळ यामुळे जे प्रेक्षक रागावले त्यांचा राग समजण्यासारखा होता. सखारामसारखी माणसं जाणता-अजाणता समाजाची घडी मोडू

जातात त्याची शिक्षा त्यांना भोगावीच लागते; तशी त्याच्यावरच्या नाटकालाही 'शिक्षा' मिळाली असं वाटल्यास म्हणावं.

■ **'सखाराम'मधल्या 'व्हायोलन्स'विषयीदेखील बरंच बोललं आणि लिहिलं गेलं...**

□ 'ऑथेल्लो'मध्ये ऑथेल्लो 'व्हायोलंट' होतो हे आपण जर पत्करू शकतो तर सखारामसारखा माणूस 'व्हायोलंट' का होतो हे समजून घेण्याची इच्छा आपण का दाखवत नाही ? त्याचा 'व्हायोलन्स' त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग आहे. त्याचं पूर्वायुष्य हे त्याचं एक कारण असू शकेल. सखारामला सहानुभूती मिळावी किंवा त्याला क्षमा केली जावी अशी माझी मुळीच अपेक्षा नव्हती. सखाराम उभा करताना एक 'सिंपथॅटिक कॅरेक्टर' घडवण्याचा माझा प्रयत्न नव्हता. लक्ष्मीचं 'कॅरॅक्टर'ही प्रथम 'सिंपथॅटिक' वाटलं तरी पुढं ते तसं राहत नाही. नाटकातल्या व्यक्तिरेखांना न्याय देण्याचा, क्षमा करण्याचा आपल्याला काय अधिकार असतो ? आपण जमल्यास त्यांना जास्तीत जास्त समजून घ्यायचं असतं. कोणाच्या सहानुभूतीची अपेक्षा न करता त्यांच्या त्यांच्या बळावर ती माणसं जगण्याची धडपड करीतच असतात.

एक समग्र माणूस म्हणून सखारामसारख्या माणसाकडे बघितलं पाहिजे. त्याचे सुटे सुटे भाग घेऊन त्याचं मूल्यमापन करता कामा नये. सखारामचं समर्थन करण्याचा प्रयत्न मी नाटकात केलेला नाही आणि आताही करणार नाही. तरी पण सखारामच्या 'व्हायोलन्स'च्या जोडीला त्याच्या इतर काही वैशिष्ट्यांचा विचार आपण करायला हवा. जी स्त्री निराधार आहे तिलाच तो घरी आणतो. तिला तो पूर्ण समज देतो की आपल्या दोघांमधला हा एक करार आहे. हा करार तिला सुरक्षितता देतो. तिच्या किमान गरजा भागवतो. पण सखाराम तिला हेही सांगतो की आपल्या दोघांपैकी कुणाही एकाला ज्या दिवशी वाटेल की हा करार आता बस्स झाला त्या दिवशी तो संपुष्टात येईल. सोडतानाही तो त्या स्त्रीला साडीचोळी देऊन तिच्या नातेवाइकांकडे नेऊन सोडतो. ती मरणाची आजारी झाली तर इस्पितळात अखेरपर्यंत तिची सोबत आणि नंतर तिचं क्रियाकर्मदेखील करतो. अर्थात तो कुणी उदारमतवादी नाही. तो एक सामान्य माणूस आहे. त्याची समजही सामान्य आहे. तो 'व्हायोलंट' आहे. पण तो स्त्रीला फसवीत नाही हे मान्य केलं पाहिजे. ज्या पद्धतीनं काही नवरे बायकांना रस्त्यावर सोडतात तसं त्यानं कुणा स्त्रीला सोडलेलं नाही, ह्याचाही विचार व्हायला हवा. अशा अंतर्विरोधांनीच सखारामसारखी माणसं घडतात आणि म्हणून ती समजून घेण्याला सोपी नसतात. कदाचित यामुळेच, अशा व्यक्तिरेखा हे माझ्यासारख्याला आव्हान वाटतं.

■ **तेंडुलकर, नाट्यतंत्राच्या क्षेत्रात तुम्ही कधी नवीन प्रयोग केलेत—उदाहरणार्थ, 'घाशीराम कोतवाल' किंवा 'अशी पाखरे येती' ह्यांसारखी नाटकं. तर कधी पारंपारिक पद्धतीनं तुम्ही तुमच्या नाटकांना दिवाणखान्यापुरतं मर्यादित ठेवलंत. नाटक ह्या 'फॉर्म'ची कधी मोडतोड केलीत तर कधी तुम्ही तुमच्या नाट्यलेखनात गतानुगतिकतेचीच कास धरलीत, असं का ?**

□ मी 'फॉर्म'ची मोडतोड करतो किंवा वेगळा 'फॉर्म' शोधतो तो आशयाच्या अनुषंगानं.

आधी घाट (फॉर्म) आणि मग आशय असं मला जमत नाही. सर्व प्रकारचे घाट—पारंपरिक आणि नवे—ही आशय मांडण्याची साधनं आहेत, अशी माझी धारणा आहे. आणि आशय मांडणाराला कोणताही घाट वर्ज्य असण्याचं कारण नाही. पारंपरिक घाट हा आजही आणि उद्यादेखील काही प्रकारच्या आशयाला उपयुक्त आहे आणि राहील असं मला वाटतं.

■ **'घाशीराम कोतवाल'सारख्या नाटकातून तुम्ही नाट्यतंत्राचा नवा प्रयोग केल्याचा उल्लेख आताच आला. त्या निमित्तानं आणखी एक नवा विचार सुचतो. ह्या नाटकाच्या बाबतीत नवा प्रयोग करताना पारंपरिक संगीत मराठी नाटकाच्या क्षेत्रात तुम्ही एक प्रकारची क्रांती घडवून आणलीत, नाही का ? आजवरच्या संगीत नाटकांतून नायक-नायिका स्वतंत्रपणे गात होते, तर ह्या तुमच्या नाटकातून सामूहिक गाणं आलं. ह्यामुळे आजवरचं संगीत नाटक पुढं गेलं की त्याच्या विकासाला मर्यादा पडल्या ? हे नाटक लिहिताना तुमच्या डोळ्यांसमोर पाश्चात्य रंगभूमीवरील 'ऑपेरा' किंवा संगीतक होतं का ?**

□ संगीत नाटक लिहावं किंवा नाटकात संगीताचा अधिक बरा किंवा वेगळा वापर करावा अशा विचारानं 'घाशीराम कोतवाल' मी लिहिलं नाही. आधी आशयानं मनात घर केलं आणि नंतर त्या आशयाला योग्य त्या 'फॉर्म'चा शोध सुरू झाला. मुळात आशय समकालीन होता. त्याचं कालातीत स्वरूप व्यक्त व्हावं म्हणून एक ऐतिहासिक दंतकथा त्यात आली. परंतु तो इतिहास असणार नव्हता. ऐतिहासिक नाटक मनाशी नव्हतं. म्हणून पौराणिक दंतकथा हा ज्या लोकनाट्याचा विषय असतो, ते लोकनाट्याचे वेगवेगळे प्रकार शोधावे लागले. 'घाशीराम'चं संगीत अंग हे अभिजात संगीत मराठी नाटकाऐवजी लोकनाट्याला जवळचं आहे, त्याचं हे कारण. तोवर पाहिलेल्या देशी-विदेशी संगीत नाटकांचा भाग 'घाशीराम'चा 'फॉर्म' घडण्यात नक्कीच होता. संगीत नाटकाची माझी समज आधी पाहिलेल्या या प्रकारच्या नाटकांनीच घडवली होती. प्रत्यक्षपणेदेखील आपल्या महाराष्ट्रातल्या पारंपरिक लोकनाट्यांचेच वेगवेगळे घटक घेऊन हा 'फॉर्म' घडला आहे. त्या अर्थाने त्यात 'स्वतंत्र' किंवा नवं काही नाही. नवं आहे ते हे सर्व एकजीव होऊन तयार झालेलं 'घाशीराम कोतवाल' हे रसायन.

आता, 'घाशीराम'मुळे मराठी संगीत नाटक पुढे गेलं की त्याच्या विकासाला मर्यादा पडल्या हे जाणत्यांनी ठरवावं. 'घाशीराम'च्या 'फॉर्म'ला मात्र मर्यादा आहेत आणि त्यामुळेच त्या 'फॉर्म'मध्ये मी दुसरं नाटक लिहिलेलं नाही.

मी इतकंच म्हणेन की पारंपरिक मराठी संगीत नाटकाहून वेगळ्या आणि नव्या अशा संगीत नाटकाच्या काही शक्यता 'घाशीराम'ने सुचवल्या.

■ **जवळजवळ गेली तीस वर्षं तुम्ही नाट्यलेखन करीत आहात. नाट्यलेखनाचा तुमचा हा दीर्घ प्रवास यश आणि अपयश ह्या दोन्हींचेही आघात तुम्हांला देत गेला. ते सगळे आघात पचवून आज आंतरराष्ट्रीय कीर्तीचे एक श्रेष्ठ, प्रयोगशील, कठोर वास्तववादी भारतीय नाटककार ह्या पदवीपर्यंत तुम्ही आला आहात. खरोखर तेंडुलकर, एक नाटककार ह्या नात्यानं तुम्ही केलेली ही अडीच तपांची साधना आश्चर्यानं थक्क करून सोडणारी आहे. किती विविध विषय तुम्ही हाताळलेत, किती विविध व्यक्तिरेखा तुम्ही उभ्या केल्यात,**

**नाट्यलेखनाचे किती विविध प्रयोग तुम्ही केलेत. ह्या तुमच्या नाट्यसेवेकडे फिरून वळून बघताना तुम्हांला काय वाटतं ?**

☐ नाटक कुठल्या ना कुठल्या कारणानं माझ्याभोवती बालपणापासून सतत वावरत राहिलं. पुढे कुणी ना कुणी मला त्यात ओढत, ढकलत गेलं म्हणून मी नाटक लिहू लागलो. त्या त्या वेळी मला जमली तशी मी ती लिहिली. जाणीवपूर्वक असं मी काही केलं नाही. प्रयोग तर नाहीतच. तितका वेळ नव्हता. प्रयोगांसाठी प्रयोग मला भावतही नाहीत. नाटक लिहीत असताना मी त्यात पूर्ण गुरफटलेला असतो. नाटक लिहून हातावेगळं केल्यानंतर नाटकात आणि माझ्यात अंतर पडत जातं. आज सांगायचं झालं तर मी इतकंच म्हणेन की सखाराम बाइंडर, घाशीराम कोतवाल, शांतता ! कोर्ट चालू आहे आणि कन्यादान ही माझ्या दृष्टीनं मला विशेष महत्त्वाची नाटकं वाटतात. परंतु त्यांतही त्रुटी आहेत आणि मला त्यांची जाणीव आहे.

■ **'सामना' चित्रपटाची पटकथा आणि संवाद लिहून तुम्ही चित्रपटसृष्टीत पदार्पण केलंत आणि तिथंही तुमचं वेगळेपण प्रस्थापित केलंत. तुम्ही लिहिलेल्या सर्वच पटकथा धंद्याच्या यशस्वितेचा आधी विचार करून निर्माण केलेल्या बहुतांश चित्रपटांहून पूर्णतया वेगळ्या, आपली तेंडुलकरी वैशिष्ट्यं व्यक्त करणाऱ्याच आहेत. परंतु 'सामना'ची पटकथा-संवाद वाचत असताना असं सारखं जाणवतं की चित्रपटाच्या तंत्रानं लिहिलेलं हे तेंडुलकरांचं नाटकच आहे...**

☐ 'सामना' चित्रपट निर्माण करताना त्याच्यामागे एक गणित होतं. निर्मात्याने गुंतवलेलं भांडवल त्याला परत मिळावं अशा अपेक्षेने हे गणित मी बांधलेलं होतं. मराठी प्रेक्षकाला चित्रपट आवडायला काय काय लागतं ? चांगली कथा. चांगले संवाद. चांगलं संगीत. चांगला अभिनय. हे सगळं लक्षात ठेवूनच 'सामना'ची संकल्पना मी केली आणि नंतर कथा रचली. शिवाय निर्मितीचं 'बजेट' लहान. दिग्दर्शकाचा पहिलाच चित्रपट. यामुळेही चित्रपटाचं स्वरूप ठरलं. माझे संवाद आणि नटांच्या अभिनयाची जुगलबंदी हीच त्याची बलस्थानं असणार होती. पण चित्रपट म्हणजे केवळच दृश्य माध्यम असं मानायचंही कारण नाही. चित्रपटात दृश्य भागाला अधिक महत्त्व की संवादांना, हे चित्रपटाचा विषय ठरवतो. चित्रपटात जिथं दृश्य भागाला प्राधान्य असतं तिथं तो भाग तसा असायला हवा. पण हे सर्व चित्रपटाचा विषय ठरवील. 'ट्वेल्व्ह अँग्री मेन' किंवा 'न्युरेंबर्ग ट्रायल'सारखे अनेक उत्कृष्ट पाश्चात्य चित्रपट संवादप्रधानच आहेत. नाटक म्हणजे अमुकच, चित्रपट म्हणजे अमुकच असा हट्ट करायचं कारण नाही.

■ **'सामना' हा चित्रपट तोपर्यंतच्या साचेबंद मराठी चित्रपटांहून संपूर्णतया वेगळा होता. त्यातली 'गांधीवादी' मास्तरांची व्यक्तिरेखा तर धूसरच—नवनाट्यामधली—वाटते. पण असं असूनही 'सामना' चित्रपट लोकप्रिय झाला, एवढंच नव्हे तर त्याने 'धंदा' केला, हे आश्चर्यकारक नाही का ?**

☐ चांगल्या मराठी चित्रपटाला ज्या मूलभूत गोष्टींची—'इन्ग्रीडियंट्स'ची—गरज असते त्या 'सामना'त होत्या. ह्या चित्रपटाच्या वेगळ्या विषयामुळे तो लोकप्रिय झाला का हे

मात्र मला सांगता येणार नाही. जो डोळस प्रेक्षक होता त्याला ह्या चित्रपटाचं वेगळेपण जाणवलं. समाजविज्ञान, अर्थशास्त्र, सहकारी बँका ह्या विषयाच्या तज्ज्ञांना ह्या चित्रपटाची खोली आणि आशय महत्त्वाचा वाटला—जसा मी लिहिलेल्या 'मंथन'ह्या हिंदी चित्रपटाचा वाटला. सर्वसामान्य प्रेक्षकाला 'सामना'हा चित्रपट भावला असेल तर तो त्यातल्या लोकप्रियतेच्या घटकांमुळे. चित्रपट लोकप्रिय होतो तो कथा, संवाद, अभिनय, संगीत यांमुळेच. त्यातलं आशयाचं वेगळेपण, शैलीचं वेगळेपण फक्त जाणत्यांना कळतं.

'सामना'मधला गांधीवादी धूसर तर खराच. तो अज्ञातातून येतो आणि हिंदुराव पाटील या मध्यवर्ती व्यक्तिरेखेच्या आयुष्यात एक महत्त्वाची भूमिका बजावून अज्ञातात लुप्त होतो. पण तसा प्रत्यक्षाचा आधार त्याला नाही असंही नाही. स्वातंत्र्यलढ्यात कितीक लढले आणि पुढे त्यांचं काय झालं त्याची खबर कुणाला नाही. 'सामना'तलं हे एका अर्थी 'ॲब्स्ट्रॅक्ट एलिमेंट' लोकांनी यामुळेच सहजी स्वीकारलं. ठोस, ठाशीव पद्धतीच्या मराठी चित्रपटसृष्टीत हे घडून आलं खरं.

लोकांना—निदान काही लोकांना—स्वीकारणं जड गेलं असाही त्या चित्रपटातला एक महत्त्वाचा प्रसंग सांगतो. हिंदुराव पाटील आपण केलेल्या खुनांची कैफियत मास्तरांकडे एका प्रसंगी देतो. अनेकजण म्हणाले, हिंदुराव इतका तयार गडी; तो मास्तरकडे हे सर्व बोलेल हे तर्काला पटत नाही. सोयीसाठी हे लेखकानं घडवलं आहे. तरबेज खुनी असा वेडेपणा करणं शक्य नाही.

आता, सर्व तरबेज खुनी आपल्या एखाद्या गुन्ह्याचा पुरावा केव्हा तरी मागे सोडतात म्हणूनच ते सापडतात. त्यातही खुनी माणसाला आपलं कृत्य कोणाकडे तरी बोलण्याची गरज वाटत असते. अशी कैफियत देण्याला 'बिन-धोक' माणूस तो जाणता-अजाणता शोधत असतो. हिंदुरावाच्या दृष्टीने मास्तर हा असा 'बिन-धोक' असतो. स्वतःशी बोलावं तसा हिंदुराव आपल्या गतायुष्याबद्दल मास्तरकडे बोलतो. यातून पुढे एखादा पेच उद्भवेल असं त्या वेळी त्याच्या कल्पनेतही नसतं.

आता, हे कळण्यासाठी गुन्हेगार आणि खुनी माणसांच्या मनोव्यापारांची कल्पना हवी. त्यांच्या जगाचा अनुभव हवा.

■ **असं म्हटलं जातं की चित्रपट हा अखेरी दिग्दर्शकाचा असतो, लेखकाचा नसतो. पण 'सामना'ची पटकथा-संवाद वाचताना मात्र तो चित्रपट लेखकाचा—म्हणजे तुमचाच आहे असं जाणवतं. असं क्वचित घडतं, नाही का ?**

□ 'सामना'च्या बाबतीत खरंच असं घडलं की मी जे लिहिलं तेच दिग्दर्शकानं किरकोळ अपवाद वगळता पडद्यावर आणलं. हा चित्रपट त्या अर्थाने लेखकाचा आहे. नाटक आणि चित्रपट ह्या दोन्हीत इथं फरक आहे. नाटकाचा दिग्दर्शक नाटककाराच्या नाट्यसंहितेच्या बाहेर—ती पुरेशी बांधीव असेल तर—सहसा जात नाही. चित्रपटाचं तसं नाही. दिग्दर्शकाचं म्हणणं असू शकतं आणि ते तो पटकथेबाहेर जाऊन खरं करतो. चित्रपटाचा खरा लेखक दिग्दर्शकच आहे असं हल्ली मानलं जातं. चांगला पटकथाकार चित्रपटाला पायाभूत अशी

पटकथा देत असतो. पण निर्णायक अधिकार शेवटी दिग्दर्शकाचा राहतो. चित्रपट तारतो किंवा मारतो तो, तो. व्यापारी चित्रपटांच्या बाबतीत तर निर्णायक अधिकार निर्मात्याच्या हातात असतात. माझ्या पटकथेवर माझी 'मालकी' असत नाही. मालकी मला पटकथाकार नेमणारांची. नाटक हे जसं 'माझं' असतं तसा चित्रपट माझा नसतो. 'सामना' आणि 'सिंहासन' हे चित्रपट ह्याला अपवाद आहेत. बाकीच्या मी लिहिलेल्या चित्रपटांबाबत मी असं म्हणेन की त्यांच्यामागे मी नसतो तर ते झाले तसे झाले नसते—तरीही ते चित्रपट जसे आहेत तसे माझे नाहीत. पायाभूत पटकथेमुळे त्यांना बळ मिळालं आहे इतकंच.

■ **नाटकाच्या किंवा पटकथेच्या संहितेत दिग्दर्शनाच्या अनेक सूचना तुमच्याच असतात. तरीही तुमच्या कलाकृतीच्या यशाचं श्रेय मात्र दिग्दर्शकाकडे जातं. अशा वेळी कलाकृतीच्या यशाचं नेमकं तुमचं श्रेय कोणतं हे टीकाकारांना समजावून सांगताना तुम्ही स्वतः नेहमीच मागे राहता, ते का ?**

□ लेखकाच्या एका अवस्थेत या गोष्टी फार महत्त्वाच्या असतात. आज माझ्या दृष्टीनं मला जे करायचं ते घडणं आणि म्हणायचं ते परिणामकारक रित्या म्हटलं जाणं फार अगत्याचं आहे. श्रेयाच्या वाटणीचा त्रास होत नाहीच असं नाही, पण फार होत नाही.

■ **तेंडुलकर, चित्रपटाच्या रूपानं समाजातल्या सर्व थरांपर्यंत जीवनसत्य पोचवण्याचं एक प्रभावी माध्यम तुमच्या हाती आलं. 'अर्धसत्य'सारख्या चित्रपटातून तुम्ही हे कार्य यशस्वीपणे पारही पाडलंत. पण त्यानंतर मात्र पुन्हा तुम्ही केवळ प्रायोगिक चित्रपटांच्या—'आर्टफिल्म'च्या— वर्तुळातच अडकून राहिलात. समग्र समाजाच्या पचनी सत्य पडावं ह्यासाठी काही वेगळे, व्यावसायिक स्वरूपाचे प्रयत्न तुम्ही का करीत नाही ? एका फार मोठ्या कार्यापासून तुम्ही स्वतःला असे वंचित का करता ?**

□ व्यावसायिक स्वरूप आणि व्यापारी स्वरूप ही चित्रपटमाध्यमापुरती एकच आहेत. व्यवसाय म्हणजे एक विशिष्ट दर्जा अशी व्याख्या चित्रपट-माध्यमामध्ये राहिलेली नाही. कारण मूलतः चित्रपट हा मोठ्या भांडवलाचा धंदा आहे. मोठं भांडवल आलं की मोठ्या नफ्याची अपेक्षा अपरिहार्यपणे येते. ह्यामध्ये व्यापारीकरण अपरिहार्यपणे होतं. मी लिहिलेले चित्रपट हे त्यांच्या पूर्ण स्वरूपात, दर्जाचा विचार करता निश्चितपणे व्यावसायिक होते, पण व्यापारी नव्हते. कोणत्याही विचाराचं किंवा सामाजिक सत्याचं व्यावसायिकीकरण मला मान्य आहे पण व्यापारीकरण माझ्या पिंडात बसत नाही. 'अर्धसत्य'सारखा चित्रपट व्यापारी दृष्ट्या यशस्वी झाला असला तरी व्यापारी चित्रपट म्हणून त्याची संकल्पना किंवा निर्मिती झालेली नाही. त्याचं व्यापारी यश हा अपघात होता. आणि त्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे त्या चित्रपटातील शेवटचा, रामा शेट्टी ह्या व्यक्तिरेखेच्या वधाचा प्रसंग होता. दुष्टांचा वध आणि सज्जनांचा विजय व्यापारी यशाचा आपल्या समाजापुरता तरी एक महत्त्वाचा घटक राहत आला आहे. हा शेवट दिग्दर्शकानं कल्पिलेला शेवट आहे, तो माझा नव्हे. रामा शेट्टी हा माझ्या लेखी केवळ खलपुरुष नव्हे आणि इन्स्पेक्टर वेलणकर हा सुष्टांचा प्रतिनिधी नव्हे. हे दोघेही 'व्यवस्थे'च्या (एस्टॅब्लिशमेंट) हातची खेळणी आहेत. एका रामा शेट्टीच्या वधानं काहीही

साध्य होत नाही असं मला वाटतं; कारण 'व्यवस्था' तरीही तिच्या जागी सुरक्षित आणि भक्कम स्वरूपात उभी आहे. ती नवे रामा शेट्टी केव्हाही तयार करू शकते. नव्हे, तसे ते प्रत्यही निर्माण होतच आहेत. ह्या अर्थानं त्या चित्रपटाचा आजचा शेवट मला नाट्यपूर्ण परंतु फसवा वाटतो. परंतु दिग्दर्शकाची धारणा वेगळी होती. म्हणजे ती व्यापारी होती असं मुळीच नव्हे. तरीही ह्या चित्रपटाच्या व्यापारी यशात ह्या अखेरच्या प्रसंगाचा वाटा मोठा आहे असं वाटतं. वेगळ्या शब्दांत, 'अर्धसत्य'च्या व्यापारी यशाचं श्रेय हे माझं नव्हे. मला असं वाटतं की माझ्या ह्या प्रकारच्या वैचारिक निष्ठांमुळे व्यापारी जगाला मी अनुपयुक्त किंवा गैरसोयीचा वाटत असावा. जीवन हे गुंतागुंतीचं (कॉम्प्लेक्स) आहे, खोल आहे. आणि ते व्यापारी हेतूने सोपं किंवा ढोबळ करून मांडणं माझ्या प्रवृत्तीत बसत नाही.

■ **सुमारे ४८-४९ साली तुम्ही कथालेखनाला सुरुवात केलीत. त्या वेळी आपण पुढं नाटककार होणार आहोत ह्याची तुम्हांला कल्पनाही नसेल कदाचित. पण तुमच्या त्या वेळच्या कथा वाचताना नाट्यलेखनाची बीजं तुमच्या कथांमध्ये ठासून भरलेली होती हे आजही जाणवतं. तुमच्या प्रत्येक कथेच्या गाभ्यात नाट्याचा आत्मा धगधगत असलेला जाणवतो. किंबहुना कोणत्याही घटनेच्या मुळाशी एक संघर्षप्रधान नाटक जन्म घेत आहे ह्याचं भान तुम्ही कधी विसरत नाही. तुमची कथा वाचताना प्रथम मनाचा वेध घेतात त्या तिच्यातल्या जिवंत, चैतन्ययुक्त व्यक्तिरेखा. त्यांच्यासह येते ती त्यांची जगण्याची धडपड. त्या धडपडीतच सारं नाट्य घडत असतं. त्या नाट्याच्या प्रवाहात तुम्ही स्वतः असे काही पकडले जाता की वाचणाऱ्याला तुम्ही त्या प्रवाहात ओढत नेता. तुमच्या कथेची बांधणी उत्कृष्ट केलेली असते असं म्हटलं तर तुम्हांला ते रुचणार नाही. पण कथा बांधत असताना तुम्ही नेमकं तेच राखता, सारी फोलपटं क्रूरपणे छाटीत जाता. नेमकं, मोजकं, अचूक तेच स्वतःचा समर्थ आकार घेऊन समोर उभं राहतं. शिल्पकार बांधेसूद देखणी मूर्ती घडवतो तशी तुमची कथा, किंबहुना तुमचं सारं लेखन घडतं.**

**शैलीचा मोह तुम्हांला फारसा कधी पडला नाही. आवेगानं सत्यापर्यंत पोचणं हीच तुमची लेखनशैली आहे. म्हणूनच भाषेचा साधेपणा तुमच्या लिखाणाच्या रक्तातच आहे. डोळसपणे जीवनानुभव घेतल्यामुळे येणारा वैचारिक समंजसपणा फार पूर्वीपासून तुमच्या लिखाणात, विशेषतः तुमच्या कथांत आहे. पुढं पुढं प्रकर्षानं प्रगट झालेला तुमचा सत्याचा आग्रह—तोही तुमच्या कथांत आहे. सत्याला तुम्ही नेहमीच धैर्यानं सामोरे गेलात. मग ते सत्य कितीही कटू, कितीही अप्रिय असलं तरी तुम्ही नेहमीच सत्याचा आग्रह धरलात. सत्याला दुसरा पर्याय कधी शोधला नाहीत. तुम्ही सत्यशोधक आहात ह्यातच तुमच्या लिखाणाचं खरं सामर्थ्य आहे आणि ह्या तुमच्या सामर्थ्याची तुम्हांला रास्त जाणीव आहे. जे काही तुम्ही लिहिता त्याचं पूर्ण आकलन तुम्हांला झालेलं असतं, त्याचा पूर्ण विचार तुम्ही केलेला असतो. त्या विचाराचं स्पंदन तुमच्या लिखाणातून जाणवतं. तुमच्या कथा ह्याला अपवाद नाहीत. तुमच्या प्रत्येक कथेमागे एक जीवनविचार आहे. तुमची प्रत्येक कथा म्हणजे एक जिवंत नाटकच. कथालेखनानेच तुम्ही तुमच्या साहित्यनिर्मितीला आरंभ केलात. जीवनानुभवाच्या**

**अभिव्यक्तीसाठी कथा हेच माध्यम तुम्ही प्रथम का स्वीकारलंत ?**

☐ कथा लिहायला सरळ असते म्हणून मी प्रथम ह्या माध्यमाकडे वळलो असणार. 'आमच्यावर प्रेम कोण करणार'ही माझी पहिली कथा ४८ किंवा ४९ साली प्रसिद्ध झाली. त्या वेळी दैनिक 'नवभारत' नावाच्या मराठी दैनिकामध्ये मी उपसंपादकाची नोकरी करीत होतो. लेखनाच्या आरंभीच्या काळात लेखक आपल्यातूनच लिहीत असतो. माझ्या जगण्यातूनच माझ्या कथा निर्माण झाल्या. माझ्या सुरुवातीच्या एकांकिका आणि नाटकांतही माझं जगणं बरंच आहे. कथा लिहिताना कारागिरीचा भाग माझ्या डोक्याशी नव्हता. प्रसिद्धीची हमी नसताना लेखक आरंभीच्या काळात का लिहीत असतो ? त्याला स्वतःविषयी बोलावसं वाटतं म्हणून तो लिहीत असेल. कधी कधी यातलं काही लेखन प्रसिद्ध होतं, कुणीतरी त्याविषयी बरं बोलतं ह्याचा आनंद होतो म्हणूनही त्याला लिहावंसं वाटत असेल. पैसे मिळतात म्हणूनही तो लिहीत असेल. माझ्या कथालेखनाच्या बाबतीत अर्थार्जन हा महत्त्वाचा भाग होता. अर्थात कथालेखनावर मला काही फार पैसे मिळत नसत. कथेला पंधरावीस रुपये मिळत. परंतु त्यांना महत्त्व असे. कधी कधी तर आधी पैसे घेऊन मग मी गोष्टी लिहिल्या. कथालेखन हे तेव्हा माझ्या बाबतीत जगण्याचं एक साधन होतं. नाटकाच्या 'रॉयल्टी'वर जगण्याचा विचार मात्र मी कधीच केला नाही. पण माझ्या कथांवर त्या काळात मी जगलो. कलात्मक आनंद घेणं हे माझ्या कथालेखनाचं उद्दिष्ट असू शकत नव्हतं. एकेकदा तर अनिच्छेने आणि सक्तीने मी कथा लिहीत होतो. अशाच प्रकारे लिहिलेली माझी 'बेडूक' ही एक कथा. ती लिहिताना माझं मन त्यात नव्हतं. स्वस्थताही नव्हती. एका यांत्रिकपणे, कंटाळून, हप्त्याहप्त्यांत मी ती लिहीत गेलो. संपादकाने हस्तलिखिताचं अखेरचं पान हरवलं ते पुन्हा लिहून द्यावं लागलं. ती छापून आली तेव्हा तिच्यात असंख्य मुद्रणदोष होते. छापलेल्या स्वरूपात मी ती वाचलीही नाही. नंतर ती कथा मी विसरूनही गेलो. पण पुढं कॉंटिनेंटल प्रकाशनाच्या वतीनं अरविंद गोखल्यांनी त्या वर्षातल्या उत्कृष्ट कथांचा संग्रह प्रसिद्ध केला त्यात तिचा अंतर्भाव त्यांनी केला. मला आश्चर्याचा धक्का बसला. वयाच्या चाळिशीपर्यंतचं माझं सारं लेखन हे असंच होत होतं. त्यातूनच जे काही चांगलं निर्माण झालं ते झालं. कित्येकदा तर मी लोकलच्या तिसऱ्या वर्गातून प्रवास करताना लिहीत असे. तर कधी पुण्यामुंबईच्या प्रवासात. आजूबाजूचे प्रवासी बघत बसत की हा माणूस एवढं काय लिहितो आहे ? चित्रकार कै. दीनानाथ दलाल यांच्या 'दीपावली' वार्षिकाचं संपादन करीत असताना त्यांनी माझ्याकडे गोष्ट मागितली. मला आठवतं की गोष्ट लिहिण्याला मी बोरिवली उपनगरात घरी सुरुवात केली. लेखन ऐन भरात असताना कामाला निघण्याची वेळ झाली. मी बोरिवलीला लोकलमध्ये चढलो आणि नेहमीप्रमाणे तिसऱ्या वर्गाच्या डब्यात कोपऱ्यातली एक जागा पकडून लिहायला बसलो. लिहिणं थांबलं होतं तिथून पुढे सुरुवात केली. पुढची गोष्ट डोक्यात होती. भराभरा लिहीत होतो. गाडी फास्ट होती. वेगाने धावत होती. आजूबाजूची माणसं बघत होती. तेवढ्यात काय झालं कुणास ठाऊक; कागदांवरचा हात उचलला गेला. खिडकीतून येणाऱ्या वाऱ्याच्या झोतात लिहिलेली सगळी पानं बाहेर उडून गेली; लिहीत होतो तेवढं सोडून. भोवतालचे हळहळले. त्यांच्या दृष्टीने मोठी मेहनत वाया गेली होती. मग नंतर रात्री पुन्हा बैठक मारून

मी ती गोष्ट नव्याने लिहिली. तीच माझी 'मित्रा' ही गोष्ट. आता जसा मनात आणलं तर निवांतपणे बसून मी लिहू शकतो तसं त्या काळात शक्यच नव्हतं.

पण एक फायदा झाला. त्यामुळेच त्या काळात माझ्या हातून लिहिणं घडलं. लिहिण्याची सक्ती होती म्हणून मी लिहीत राहिलो. मी हुकमेहुकूम लिहीत होतो. 'हंस' मासिकासाठी मी आधी पैसे घेऊन लिहीत असे. तसंच नंतर केव्हातरी 'किर्लोस्कर'साठी लिहीत होतो. दिवाळी अंकांसाठी लिहिणं ह्याच पद्धतीचं होतं. म्हणजे ह्या साऱ्यात आनंद नव्हता असं नाही. एकेकदा अशातही तो मिळे. पण आनंदासाठी हे लेखन मी केलं नाही.

■ **आश्चर्य आहे ! असं असून तुमच्या बहुतेक कथांचं लेखन निर्दोष आहे. 'अखेरचे दिवस'सारखी तुमची कथा तर एक परिपूर्ण कथा मानता येईल. तुमच्या प्रत्येक कथेची बांधणी पक्की आहे. मूळ आशयाशी प्रत्येक कथेत इमान राखलेलं आहे. कारण तेंडुलकर, नकळत का होईना पण तुमची साहित्याशी जाज्वल्य निष्ठा होती आणि ती सातत्यानं होती. त्या काळात कदाचित त्याची तुम्हांला जाणीव नसेल. पण ती साहित्यनिष्ठा तुमच्या रक्तात होती. जीवनाकडे, अनुभवांकडे आणि लेखनाकडे तुम्ही नेहमीच गंभीरपणे पाहत होतात. कुठचीही गोष्ट तुम्ही मौज म्हणून घेऊच शकत नाही. तुम्ही तुमच्या वेगवेगळ्या वेळी दिलेल्या मुलाखतींतले काही उद्गार ह्या वेळी स्मरतात—'महत्त्वाच्या काळात उघड्यावर आणि धकाधकीचे जगावे लागले त्यामुळे विचाराला वेगळा वेळ नव्हता. पण महापुरात जिवासाठी धडपडतानाच पोहणं शिकावं तसा विचार घडत गेला.' 'अत्यंत वैयक्तिक गरज म्हणून माझं लेखन जन्माला आलं. मी जीवनाच्या अर्थाशी कायम झटापटी करणारा एक माणूस आहे. जे काल कळलं असं वाटलं ते आज वाटत नाही. अर्थ उलगडत जातो आहे. मी लिहितो ते मला जाणवलेलं एक वास्तव. त्यात त्या वास्तवाचा एक अविभाज्य भाग म्हणून मी आहे.' कथालेखनाचा हा तुमचा धडपडण्याचा काळ पुढं नाट्यलेखनाच्या कालखंडात आपोआप विलीन झाला तो तुमच्या अनुभवांच्या अभिव्यक्तीला कथेचं माध्यम अपुरं पडलं म्हणून का ?**

□ माध्यमाची मर्यादा मला कधीच जाणवली नाही. पण मी पुढं पुढंच वाहत गेलो. नाटकाच्या बाबतीतही मला कसलीही मर्यादा कधी जाणवली नाही. जगातला कुठलाही विषय हा नाटकाचा विषय होऊ शकतो असं मी मानतो. तो मांडण्याची हातोटी आणि वकूब नाटककाराकडे हवा. कोणत्याही माध्यमात एकदा तंत्राचा भाग मुरला म्हणजे माध्यम त्रास देत नाही. मग आव्हान राहतं ते विषयाचं. आणि त्या माध्यमापासून आपण दूर जातो ते, माध्यम अपुरं पडतं म्हणून नक्कीच नव्हे. कथेच्या माध्यमाची ताकदही मोठी आहे.

■ **तेंडुलकर, तुमचा प्रत्येक चित्रपट आणि प्रत्येक नाटक हीसुद्धा एक उत्तम प्रकारे बांधलेली कथा असते. तुमच्या पूर्वीच्या कथा आजही वाचताना त्यातली श्रेष्ठ साहित्यमूल्यं जाणवतात. पण अचानक कथालेखन थांबवून तुम्ही स्वतःलाच आज एक उपेक्षित कथाकार करून टाकलंत ते का ?**

□ एका नैसर्गिकपणे आणि अपरिहार्यपणे मी कथालेखनाला सुरुवात केली, तसाच कथालेखनापासून दूर गेलो. माणसाच्या वाढीत आणि विकासात त्याच्या सवयी बदलतात.

तसं कदाचित लिहिण्याबाबत घडत असावं. कुणी सांगावं, पुढं केव्हातरी आधीच्याच नैसर्गिकपणे आणि अपरिहार्यपणे मी परत कथा लिहू लागेन. किंवा लेखक म्हणून थांबेन. ह्यातलं काहीही शक्य आहे आणि मला ते स्वीकार्य आहे. रूढार्थानं आपण जिला महत्त्वाकांक्षा म्हणतो तिचा माझ्यातला अभाव अशा वेळी कामी येतो. वाट्याला येईल ते फार खळखळ न करता पत्करलं जातं. रोजचा दिवस नवा असला म्हणजे झालं.

**■ ज्या काळात तुम्ही कथा लिहीत होतात त्याच काळात तुम्ही एकांकिकाही लिहायला लागलात. तुमचं एकांकिकालेखन ही पुढच्या नाट्यलेखनाची जाणीवपूर्वक पूर्वतयारी होती का ? एकांकिका लिहीत असताना ह्या वाङ्मयप्रकाराचा तुम्ही काही वेगळा विचार केला होतात का ?**

■ माझी 'सत्यकथे'त प्रसिद्ध झालेली पहिली एकांकिका 'ओळख' ही मुळात एकांकिका नव्हतीच. मुळात गोष्ट म्हणून ती लिहायला मी बसलो. पण कथा लिहिताना सारखे संवादच येऊ लागले. अर्ध्यावर थांबून विचार केला, हिला एकांकिका का म्हणू नये ? तशीच 'स्त्री'मध्ये प्रसिद्ध झालेली माझी 'काळोख' ही एकांकिका. जवळपास एकाच काळात ह्या दोन्ही एकांकिका मी लिहिल्या आणि दोन्ही एकांकिकांच्या बाबतीत गोष्ट लिहिता लिहिता एकांकिकेचा 'फॉर्म' हाताशी आला. तशी ह्या वाङ्मयप्रकाराशी माझी आधीची ओळख होती. माझ्या वडिलांनी पूर्वी एकांकिका लिहिल्या होत्या. उत्कृष्ट इंग्रजी एकांकिकांचे संग्रहही मी वाचले होते. कै. अनंत काणेकर, शामराव ओक इत्यादिकांच्या मराठी एकांकिका वाचल्या होत्या. पण आपल्याला एकांकिका लिहायची आहे असं म्हणून मी एकांकिका लिहिली नाही. तसा प्रयत्न जाणीवपूर्वक केला नाही. ती लिहिली गेली. त्या काळात एकांकिकांचे फारसे प्रयोग होत नसत. पण पुढे भारतीय विद्या भवनात दामू केंकरे, वसंत माने, आनंद पै, बबन प्रभू, नंदकुमार रावते, अरविंद देशपांडे, विजया मेहता ह्या मंडळीने एकांकिकांचे प्रयोग रंगभूमीवर करायला सुरुवात केली. त्यांचे ते प्रयोग जाणीवपूर्वक केलेले होते. माझ्या बाबतीत एकांकिका हा रंगभूमीवर करण्याचा एक प्रकार आहे ही तांत्रिक समज इथून पुढे आली. नाटकाशी माझा संबंध आला तो त्याहीपुढे. 'चार दिवस' किंवा 'ओळख' ह्या एकांकिका लिहिताना मला रंगमंचाचा प्रत्यक्ष अनुभव नव्हता. पण हा कालखंड संपल्यावर लिहिलेल्या 'बळी', 'मादी', 'भेकड', 'अजगर आणि गंधर्व' इत्यादि एकांकिका मात्र रंगभूमीवरच्या अनुभवानंतर लिहिलेल्या आहेत. ह्या एकांकिकांमधल्या प्रत्येक शब्दाचा वापर, कंसातल्या निवेदनांचाही वापर, एका जाणतेपणानं केलेला आहे. त्या संवादात सांगितलेल्या कथा नाहीत तर खरोखरीच्या एकांकिका आहेत. मात्र नाटक आणि एकांकिका हे नाट्याचे दोन अगदी स्वतंत्र 'फॉर्म्स' आहेत. ही दोन वेगळी माध्यमं आहेत. क्रिकेटची 'वन डे मॅच' आणि 'टेस्ट मॅच' ह्यांमधे जितका फरक आहे तितका फरक ह्या दोन माध्यमांत आहे. कथांप्रमाणे एकांकिका माध्यमापासूनही आज मी लांब आलो आहे.

ज्या काळात मराठी रंगभूमीवर एकांकिकांचे प्रयोग प्रायोगिक स्वरूपात सुरू झाले तो काळ महत्त्वाचा ठरला. ज्यांनी हे प्रयोग केले ती तरुण मंडळी अननुभवी आणि उत्साही होती.

काहीतरी वेगळं करून दाखवण्याची जिद्द त्यांच्यात होती. नेपथ्य, प्रकाशयोजना, नटांची 'काँपोझिशन्स' ह्याबाबत त्यांना काही नवीन प्रयोग करायचे होते. एकांकिकेचं माध्यम यासाठी फार सोयीचं ठरलं. ह्या एकांकिका पारंपारिक मराठी नाटकांहून वेगळ्या होत्या. नवकथेच्या त्या अधिक जवळ जात होत्या. त्या काळात या एकांकिकांचे प्रयोग करणारी मंडळीच पुढं नाटकाकडे पोचली आणि रंगभूमीवर त्यांनी नवीन प्रयोग केले. आशयाच्या दृष्टीनं त्या काळातल्या फारच थोड्या एकांकिका महत्त्वाच्या होत्या. पण प्रयोगशीलतेच्या बाबतीत मराठी रंगभूमी मागे पडली होती ती ह्या एकांकिकांमुळे हलू लागली.

**■ तेंडुलकर, तुमचा मूळ पिंड साहित्यिकाचा. चरितार्थासाठी तुम्ही वृत्तपत्र-व्यवसाय स्वीकारला. पण तुमच्या लेखणीचा ललित गुण तुम्ही ह्या धकाधकीच्या व्यवसायात कधीच हरवू दिला नाहीत हे खरोखरी भूषणावह मानावं लागेल. वेगवेगळ्या काळात तुम्ही वेगवेगळ्या दैनिकांतून, साप्ताहिकांतून आणि मासिकांतून कधी संपादनाचं काम केलंत, कधी नियमित सदरं चालवलीत. दैनिक 'नवभारत', 'वसुधा', 'दीपावली', 'किर्लोस्कर' ही मासिकं, 'नवयुग' साप्ताहिक, दैनिक 'मराठा', 'लोकसत्ता' आणि 'महाराष्ट्र टाइम्स', 'मनोहर' साप्ताहिक, 'माणूस' हे पाक्षिक—अशी किती नियतकालिकांची नावं सांगावीत. वृत्तपत्र-व्यवसाय तुमच्या एकंदरीत लेखनाला पूरक ठरला की मारक ?**

■ वृत्तपत्रव्यवसायानं मला एक फार मोठी गोष्ट शिकवली आणि ती म्हणजे वाचकांसाठी लिहायचं. नाट्यलेखनातही आपल्याला प्रेक्षकांसाठी लिहायचं आहे हे दडपण माझ्यावर कधीच आलं नव्हतं. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मी 'कोवळी उन्हं'हे सदर लिहू लागलो तेव्हा दररोज एक स्तंभ लिहायचा, तो दैनिकाच्या विविध प्रकारच्या वाचकांना वाचायला लावायचा हे आव्हान होतं. रोजच्या रोज स्तंभलेखन मी पूर्वी कधी केलं नव्हतं. त्यात वर्तमानपत्राचा वाचक सर्वदूर पसरलेला, भिन्न भिन्न प्रकारचा असतो. नजरेत नसलेला असतो. इतक्या सगळ्यांना माझं सदर रोज वाचायला लावायचं म्हणजे एखाद्या नाटक कंपनीनं एकाच गावात रोज त्याच नाटकाचा प्रयोग नव्याने उठून करण्यासारखं वाटत होतं. यातून सुटकाही नव्हती. अंगावर आलेल्या प्रसंगातून पळण्याची सवय नव्हती. मी लिहीत सुटलो. काही काळ प्रयास झाले, मनावर ताणही होता. नुसतंच विषयाचं नावीन्य आणून उपयोगाचं नव्हतं. शैलीचं नावीन्यही मला आणावं लागलं. रोजच्या ललित स्फुटाचा आरंभ, त्याचा शेवट या सगळ्याचा विचार रोज नव्याने करावा लागला. भाषा लवचिक ठेवावी लागली. थोडक्यात, त्याच प्रेक्षकांपुढे रोज नवं सोंग वठवणारा नट असतो तसा मी झालो. स्वतःतून काही काढून त्यावर लिहिणं हा सवयीचा प्रकार इथं उपयोगाचा नव्हता. रोज नवनवीन गोष्टी बघणं मी सुरूकेलं. त्यासाठी भटकू लागलो. एवढ्याच एका विचारात राहू लागलो. आशयात नावीन्याचा अभाव असे तेव्हा इतर क्लृप्त्या वापरू लागलो. वाचकाला झुलवीत ठेवणं महत्त्वाचं होतं. त्यातून सुटका नव्हती. रोज उठून अशा प्रकारे वेगवेगळी सोंगं घेताना मी मला माहीतही नव्हतो तसा मला दिसलो. 'कोवळी उन्हं' हे सदर लोकप्रिय झालं; पण ते लोकप्रिय करीत असताना मोबदलाही भारी द्यावा लागला. माझं 'मौलिक' लेखन पूर्णपणे थांबलं. केवळ स्तंभलेखक

म्हणून ते संपूर्ण वर्ष मी जगलो. सुरुवातीला कष्ट पडले, पुढं वळण पडत गेलं. माझा मूळ पिंड आत्मकेंद्रित. पण ह्या सदरामुळे मी माझ्या बाहेर पडलो. लेखक म्हणून आणि माणूस म्हणून माझं क्षितिज रुंदावण्याला या सदराने मदत झाली.

■ **त्या काळात—गरजेपोटीच—तुमच्याकडून आणखीही लेखन घडलं...**

□ होय. 'वसुधा' मासिकात संपादकाचं पगारी काम करीत असता नाटक-चित्रपटांची समीक्षणं लिही. समीक्षणाला नाटक नसे तेव्हा नाट्यविषयक टिपणं लिही. पुढे पुढे अमेरिकन पुस्तकांची भाषांतर या मासिकात दर महा क्रमशः प्रसिद्ध होऊ लागली. हे भाषांतर निवडण्याचा अधिकार मला नसे. येईल ते पुस्तक भाषांतराला घ्यावं लागे. एकेकदा पुस्तक वाचण्याला वेळ नसे. प्रथम वाचतानाच भाषांतर करावं लागे. कधी लक्षात येई की एकदोनदा नीट वाचून भाषांतर करण्याइतकं पुस्तक चांगलं आहे.पण वेळ कुठे असे ? मग हळहळ वाटे. कधी पुस्तक एकदा वाचण्याच्याही लायकीचं नसे. पुढे, जगण्यासाठीच, स्वतंत्रपणेही अमेरिकन पुस्तकांची भाषांतरं मी केली. यात 'स्ट्रीट-कार नेम्ड डिझायर' (वासनाचक्र) हे टेनेस्सी विल्यमसचं आणि 'हेस्टी हार्ट' (लोभ नसावा ही विनंती) —नाटककराचं नाव आता आठवत नाही—ही दोन नाटकं होती. भाषांतर—अर्थात चांगलं भाषांतर—हे स्वतंत्र लेखनापेक्षा किती अवघड आहे हे 'स्ट्रीट-कार' ने दाखवून दिलं. वर्षभर खपूनही शेवटी जे भाषांतर प्रसिद्ध झालं त्यानं माझं समाधान नव्हतं. उत्तम संवाद शब्दशः भाषांतरात पकडता येत नाही आणि मूळ संवादातली लय भाषांतरित संवादात उतरवताना जीव जातो. संवाद म्हणजे एकेक वाक्य नव्हे. अनेक वाक्यं, काही निःशब्द जागा आणि या सर्वांतून धावणारी अर्थाची आणि नादाची सुरेख लय यांचा उत्स्फूर्त आणि एकजीव मेळ म्हणजे चांगला संवाद. शब्दशः भाषांतरात बाकी सर्व हरवतं आणि ते पकडू जावं तर शब्द हरवतात.

वर्तमानपत्रातल्या नोकऱ्यात कधी अग्रलेख लिहिले, कधी मृत्यूलेख आणि अडल्या पडल्याला राशी-भविष्यदेखील.

मोहन राकेश यांचं 'आधे अधुरे' आणि गिरीश कर्नाड यांचं 'तुघलक' ही दोन नाटकं मराठीत आणली परंतू ती स्वेच्छेने, कोणत्याही सक्तीविना, दोस्तीखातर.

■ **याशिवाय 'वसुधा'च्या संपादन-काळात काही लेखक घडवलेत. श्री. दा. पानवलकर त्यांतले एक...हमीद दलवाईही होते...आणखी अनेक...**

□ दुसऱ्यातला लेखक खुलवणं हा स्वतः लेखन करण्याइतका समाधान देणारा उद्योग आहे याचा शोध 'वसुधा' मुळे लागला. आजही त्यात मी उत्तम रमतो. आपण झाड लावणं आनंदाचंच; पण दुसऱ्याने लावलेल्या रोपट्याला पाणी घालून त्याची निगा करणं आणि ते वाढताना पाहणं हेही तितकंच आनंदाचं असतं. शिवाय दुसऱ्याच्या लेखनाचा आत्मीयतेने विचार करताना आपल्या लेखनाचा विचार नकळत होत राहतो, हें आहेच.

■ **तुमचं हे भाष्य ऐकताना एक ग्रह बळावला. तुम्ही आधी तत्त्वचिंतक आणि मग लेखक आहात. तुमच्या स्वतःच्या समग्र लेखनातून हेच जाणवतं.**

☐ कुणास ठाऊक.

■ **पुन्हा तुमच्या लेखनाकडे वळायचं तर, झालं आजचा समाज, त्या समाजातील माणसं आणि त्यांचा जीवनसंघर्ष ह्यांविषयी तुम्हांला नेमकं काय सांगायचं आहे ? जीवनसंघर्षात माणसाला यश कधी मिळणारच नाही, तो नित्य पराभूतच राहणार असं तुम्हांला वाटतं का ? तुमचं लेखन निराशावादाकडे झुकणारं आहे का ?**

☐ आजची आपली परिस्थिती अभूतपूर्व गुंतागुंतीची आहे. सर्व संदर्भ बदलले आहेत. जुनी मूल्यव्यवस्था कालबाह्य झाली आहे. प्रस्थापित विचारप्रणाली आणि त्यांची परिभाषा आजच्या समस्यांच्या हिशेबात निकामी ठरली आहे. या जागी नवं आणि उपयोगाचं काही शोधण्याचे प्रयत्न असले तरी अद्याप तसं काही रुजत नाही. माणूस संभ्रान्त आणि त्याने निर्माण केलेल्या यंत्रणा कुचकामी झाल्या आहेत. त्या रक्षण करण्याऐवजी भक्षक झाल्या आहेत. मानवी मनाचं झपाट्यानं अ-मानुषीकरण घडतं आहे. या परिस्थितीविषयी निर्भेळ आशावादीपणाने कसं लिहायचं ? माणूस म्हणून हे सर्व मला जाणवतं आहे आणि विसरता येत नाही. लिहिण्यात हे प्रतिबिंबित होणं अपरिहार्य आहे.

यात रूढार्थानं आशावाद नसला तरी भविष्यकाळाविषयी 'कन्सर्न' आहे. माणसाविषयी 'कन्सर्न' आहे. लढणाऱ्या माणसांविषयी आदर आणि आत्मीयता आहे. त्यांच्या पराभवाचं दुःख आहे. आजच्या लढाया हरण्यासाठीच आहेत असं मी म्हणतो त्यात उद्याच्या विजयाचीही अपेक्षा आहे. परंतू आज तो 'उद्या' मला दिसू शकत नाही. तो केव्हा, कसा उजाडेल ते माहीत नाही.

आता यालाच कोणी निराशावाद म्हणणार असतील तर माझं काही म्हणणं नाही. पण भोवतालच्या वास्तवाकडे डोळेझाक करून 'रोमँटिक' स्वप्नं पाहण्याच्या आणि दाखवण्याच्या अवस्थेत मी आज नाही. विजयाच्या खोट्या कहाण्या रंगवण्यात मला रस नाही. मी पराभूतांचं तत्त्वज्ञान मांडतो—पराभूततेचं नाही. अनेक महापुरुषांचे विजय हेही पराभवच होते.

■ **पराभूतांचं—पराभूततेचं नव्हे—तुमचं तत्त्वज्ञान सर्वसामान्य प्रेक्षकांना आणि वाचकांना समजलंय की नाही हे तसं सांगता येणं कठीण आहे. तुमच्या काही नाटकांना, तुमच्या 'अर्धसत्य'सारख्या चित्रपटांना प्रेक्षकांचा जो प्रतिसाद मिळत गेला आहे त्यावरून त्यांना तुमची काही नाटकं, तुमचे काही चित्रपट मानवतात असं दिसतं. पण ते त्यांना समजले आहेत—विशेषतः त्यामागची तुमची वैचारिक भूमिका—की नाहीत, हा प्रश्नच आहे. तुमच्या नाटकांचे काही टीकाकारदेखील सतत म्हणतात की तुम्ही तुमच्या नाटकांतून समस्यांची उत्तरं समाधानकारक रीतीने दिली पाहिजेत, त्यावर तोडगे सुचवले पाहिजेत. ह्यापुढे जाऊन कोणी असंही म्हणतात की तुम्ही केवळ सनसनाटीसाठी लिहिता. कोणी 'ट्रॅजेडी' आणि 'कॉमेडी' या पारंपरिक वर्गवारीत तुमची नाटकं बसवण्याचे प्रयत्न करून ती निकृष्ट असल्याचा हवाला देतात. त्यांच्या समजांचं निराकरण होईल अशी स्पष्ट उत्तरं तुम्ही त्यांना एकदाची का देत नाही ? की तुमच्या साहित्यकृतींचं मूल्यमापन करण्यासाठी ते वापरीत असलेल्या जुन्या फुटपट्ट्या फेकून देऊन नव्या फुटपट्ट्या त्यांनी हाती धरायला हव्यात**

असं तुम्हांला वाटतं ?

☐ आधी प्रेक्षकाविषयी पाहू.

ज्या माध्यमांमध्ये मी आहे—म्हणजे नाटक आणि चित्रपट—ती माध्यमं प्रेक्षकाशिवाय असू शकत नाहीत. हा प्रेक्षक मी निवडू शकत नाही. ज्याला माझ्या नाटकाला आणि चित्रपटाला यावंसं वाटतं तो माझा प्रेक्षक असतो. ह्यातल्या प्रत्येक प्रेक्षकाचं एक आयुष्य असतं, दृष्टी असते आणि कुवत असते.

माझ्या नाटकांना आणि चित्रपटांना दोन पातळ्या असतात. एक गोष्टीची पातळी—ज्याला आपण प्लॉट म्हणतो—आणि दुसरी विषयाची. गोष्टीच्या पातळीवर माझं नाटक सर्वसामान्य प्रेक्षकाला समजून घेणं, स्वीकारणं किंवा नाकारणं सोपं असतं. आणि सर्वसामान्य प्रेक्षकाची अपेक्षाही बहुधा तेवढीच असते. नाटक 'रंगलं' की तो खूष असतो. चित्रपटात तो रंगला की त्याची फारशी तक्रार नसते. त्याच्या त्याच्या आयुष्यातून, दृष्टीतून, कुवतीनुसार तो त्यातून एक बोधदेखील काढतो. हा बोध मला अभिप्रेत असलेला असेलच असं नाही. सर्वसामान्य प्रेक्षक मुख्यतः दाद देतो ती नाटकाच्या किंवा चित्रपटाच्या ह्या प्रकारच्या परिणामकारकतेला—म्हणजे मुख्यतः गोष्टीला आणि तिच्या रचनेला. नाटक-चित्रपटात त्याला गोंधळवून टाकणारं किंवा धक्का देणारं त्याला पहावं लागतं तेव्हा तो नाखूष होतो किंवा प्रसंगी रागावतो. उदाहरणार्थ, गिधाडे, सखाराम बाइंडर या नाटकांनी रागावलेले प्रेक्षक होते. त्यांची तक्रार आशयाबद्दल नव्हती, भाषेबद्दल होती. आता ही नाटकं होतात तेव्हा ही तक्रार असत नाही.

टीकाकारांपुरतं बोलायचं झालं तर मुळातच तो स्वतःला असामान्य प्रेक्षक समजून नाटक किंवा चित्रपट पाहतो आणि अनेकदा सामान्य प्रेक्षकासारखीच त्याची कुवत आणि अनुभवाची मर्यादा असते. जे नाटक किंवा जो चित्रपट तो पाहणार त्याविषयी त्यानं हुषारीनं काही पूर्वकल्पना केलेल्या असतात. म्हणजे एक प्रकारे ते नाटक किंवा तो चित्रपट कसा असला पाहिजे ह्याविषयीचे त्याचे तयार ग्रह असतात. त्यातील विषयासंबंधीचीदेखील त्याची एक तयार भूमिका असते आणि समीक्षक असल्याने ती आग्रही असते. समीक्षकाच्या अधिकाराने तो स्वतःला प्रत्येक विषयाचा तज्ज्ञ समजतो. अशा अधिकारानं आणि अशा दृष्टीतून नाटक किंवा चित्रपट पाहताना मुळात त्या नाटकाला किंवा त्या चित्रपटाला काय सांगायचं आहे ते ध्यानी घेण्याची त्याची बहुधा तयारी नसते. त्या विषयासंबंधीचा त्याला मान्य नसलेला दृष्टिकोन नाटकापुरता किंवा चित्रपटापुरतादेखील तो पत्करणार नाही. आणि सर्वसामान्य प्रेक्षकाप्रमाणे केवळ कथानकाने आणि त्याच्या परिणामाने (इम्पॅक्ट) त्याचं समाधान होणार नाही. प्रत्येक सृजनशील कलावंताची, लेखकाची स्वतःची म्हणून एक प्रकृती असते, स्वतःचा म्हणून अनुभव असतो, आणि हा अनुभव व्यक्त करण्याची त्याची स्वतःची पद्धती असते. हे ध्यानी न घेता जेव्हा समीक्षणं केली जातात तेव्हा ती प्रशंसापर वा टीकात्मक, कशीही असली तरी कलाकृतीवर अन्याय करणारी असतात. अशा प्रकारची एकूणच समीक्षा लेखकाने कशी घ्यावी, तिला उत्तर द्यावं किंवा नाही आणि ते कसं द्यावं असे प्रश्न निर्माण होतात. मी

माझ्यापुरते ते सोडवले आहेत. सत्याचा अपलाप जेव्हा होत आहे असं दिसतं तेव्हा आणि तेवढ्यापुरताच मी माझ्या भूमिकेचा खुलासा करीत आलो आहे. एरवी समीक्षकांना उत्तरे देण्याची गरज मला वाटत नाही. कलाकृती हेच कोणत्याही टीकेला असल्यास उत्तर असू शकतं असा माझा विश्वास आहे.

■ **पूर्वीच्या मानानं आता तुमचं लेखन मंदावलंय. ते का ? त्या काळात आर्थिक निकड होती म्हणून तुम्ही लिहीत गेलात ? आणि आता ती कमी झाली म्हणून लिहायचे कमी झालात ? तुमच्या लेखनामागची नेमकी प्रेरणा आम्ही कोणती मानायची ?**

□ आर्थिक निकड हे माझ्या लेखनाचं महत्त्वाचं कारण होतं हे तर खरंच आहे. परंतु आयुष्याच्या एका अवस्थेत लेखक काय किंवा कलाकार काय, घेतलेला अनुभव उत्स्फूर्तपणे आणि एका आवेगाने लेखनाच्या रूपानं बाहेर फेकत असतो. ही अवस्था पुढं टिकत नाही. आणि घेतलेला अनुभव 'इंटर्नलाइझ' करण्याकडे—पचवण्याकडे—वृत्ती वळते. त्याचबरोबर घेतलेला अनुभव हा केवळ व्यक्तिगत अनुभव न राहता व्यापक जगण्याशी असलेलं त्याचं नातं वाढत्या प्रमाणात जाणवू लागतं. असं प्रत्येक लेखकाचं होत असेल असं नाही. परंतू माझ्यापुरतं आज असं होत आहे. आणि मग अनुभवाची परिणती ही कित्येकदा लेखनात न होता चिंतनात होते. अशा प्रकारच्या चिंतनामध्ये लिहिण्याचा आवेग हा अनेकदा हरवतो हे एक, आणि दुसरं असं की लिहिण्यानं साधतं काय ? असा काहीसा अ-कलात्मक प्रश्न एकेकदा मनाला पडतो. घेतलेला अनुभव आणि त्यावरचं चिंतन हे स्वतःपुरतं राहतं. त्याचबरोबर अनुभवाची लेखनात झालेली परिणती कित्येकदा अपुरी वाटते. ह्यातच, आपण जे म्हणू पाहतो ते अधिक चांगल्या प्रकारे कुणीतरी म्हटलेलं वाचलं, ऐकलं किंवा पाहिलं म्हणजे आपल्याला लिहिण्याची गरज त्या प्रमाणात वाटेनाशी होते. माझ्या आजच्या अवस्थेत महत्त्व, म्हटलं जाण्याला असतं. ते मीच म्हणायला हवं असं नाही.

■ **तुम्ही निर्माण केलेली पात्रं त्यांचं जीवन स्वतंत्रपणे जणी जगतात आणि तुम्ही तटस्थपणे दूर उभे राहून ते पाहत राहता असं कधी कधी वाटतं. ही तटस्थपणाची तुमची भूमिका साहित्यात आहे तशीच जीवनातही आहे का ? तुमच्यासारखे जाणकार लेखक जर हीच भूमिका धारण करतील तर सामान्य माणसाला उद्या आपण का जगावं हेच कळेनासं होईल असं नाही का तुम्हांला वाटत ?**

□ माझ्या काळात माणसाचं जगणं, त्याचं भवितव्य—म्हणजेच त्याची नियती—ही त्याच्या हाती फारशी राहिली आहे असं मला दिसत नाही. अनेक दृश्य आणि अदृश्य शक्तिशाली प्रवाह माणसाला अनेक दिशांनी खेचण्याचे किंवा रेटण्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अट्टाहास अखंडितपणे करीत आहेत असं दृश्य मला दिसतं. मी किंवा कुणीही निर्माण करण्याला प्रवृत्त होतो तो जगण्यातल्या त्याच्या गुंतवणुकीतून. त्या अर्थी तो तटस्थ असत नाही. कशाचं तरी दुःख, कशावरचा तरी राग, कसला तरी आनंद निर्मिती घडवतो. ही तटस्थपणाची लक्षणं नव्हेत. परंतु माझ्या बाबतीत एकदा एखादी घटना किंवा एखादी व्यक्तिरेखा किंवा अनेक व्यक्तिरेखा कागदावर उतरू लागल्या की क्रमशः मी एका अर्थानं

तटस्थ होत जात असावा. म्हणजेच त्यांना त्यांचं असं एक अस्तित्व आणि जगण्याचं तर्कशास्त्र आहे असं मी मानतो आणि त्या तर्कशास्त्राने त्यांना शक्यतो जगू देतो. एकीकडे लिहीत असताना त्याच वेळी त्यांचाही प्रवास मी एक अंतर ठेवून आणि उत्सुकतेने पाहत असतो. ती नेतात तिथं मी जातो. आणि मग जे घडतं त्याचा एका अर्थानं मी प्रेक्षक असतो. परंतु खऱ्या अर्थानं तटस्थ नव्हे. जे घडलं त्याचं सुखदुःख कोणत्याही प्रेक्षकासारखंच मलादेखील असतं. मात्र दुःख होतं म्हणून त्यांच्या जगण्याच्या प्रक्रियेत मी आग्रहानं हस्तक्षेप करीत नाही. असं जरी असलं तरी त्यांचं जगण्याचं तर्कशास्त्र शोधणारा आणि कदाचित नियंत्रित करणारा मी असतोच. हे नियंत्रण अजाणता असेल; परंतु ते नसेल असं म्हणता येत नाही. एवढं खरं की लिहिण्याच्या 'प्रवासा'त माझे मलाच अनपेक्षित प्रदेश भेटत असतात. आणि असंही घडतं की एखादी घटना कागदावर उतरवण्याच्या अखेरी मला तिचा नवाच बोध झालेला असतो. प्रत्येक निर्मितीच्या वेळी ही प्रक्रिया संमिश्र आणि वेगवेगळी असते. परंतू प्रश्नात अभिप्रेत असलेल्या अर्थानं मी तटस्थ असत नाही.

ह्यात प्रश्नाच्या उरलेल्या भागाचं उत्तरही स्पष्ट आहे. मी आयुष्यात तटस्थ नाही. परंतु, माझ्या काळाचा, माझ्या आयुष्याचा अनुभव मला असं सांगतो की एकेका घटनेच्या किंवा व्यक्तिसमूहाच्या तर्कशास्त्रापुढं आपण व्यक्ती म्हणून बहुधा अगतिक किंवा निष्प्रभ, म्हणजेच केवळ प्रेक्षक असतो. मानवी संस्कृतीचा माझा अभ्यास मला हेच सांगतो की घटनांची आणि व्यक्तिसमूहांची स्वतःची अशी स्वतंत्र वळणं होती, ती नियंत्रित करण्याचे किंवा बदलण्याचे व्यक्तींचे आणि सत्तांचे सर्व शक्तिशाली प्रयत्न कमी अधिक प्रमाणात असफल ठरले. मानवी संस्कृतीचा इतिहास, कदाचित त्यामुळेच असेल, कमालीचा नागमोडी आणि गुंतागुंतीचा दिसतो.

नव्या दिवसाविषयीची उत्सुकता हीच माझ्या जगण्यामधील प्रेरणाशक्ती राहिली—आजही आहे. ह्या अर्थानं मी आशावादी असलो पाहिजे. कारण जीवनाची अप्रतिहतता आणि माणसातली अदम्य जिद्द ह्या दोन्हींचं चित्रण मी माझ्या लेखनातून सातत्यानं केलं आहे. मात्र त्यातून स्वप्नरंजनात्मक निष्कर्ष मी कधीही काढलेले नाहीत.

तरीही आजच्या दुःसह्य आणि दिशाहीन परिस्थितीमध्ये स्वप्नरंजन हेदेखील माणसाची गरज असू शकतं, हे वास्तव मी नाकारीत नाही. माझी ती प्रकृती नाही, एवढंच.

■ **तेंडुलकर, चाळीस वर्षांपूर्वी तुम्ही साहित्यसेवेला सुरुवात केलीत. कालांतराने विशुद्ध साहित्यनिर्मितीपुरतं स्वतःला मर्यादित न ठेवता तुम्ही साहित्यातून समाजसेवेकडे वळलात. गेल्या काही वर्षांतली तुमची साहित्यनिर्मिती निश्चितपणे जागृत सामाजिक जाणीवेतून घडलेली दिसते. हे परिवर्तन तुमच्यामध्ये नेमकं कधी, कशामुळे घडलं ? साहित्य आणि समाजसेवा—तशीच जागृत सामाजिक जाणीव ह्यांचा परस्परसंबंध तुम्ही कुठपर्यंत मानता ?**

□ माझ्या अगदी लहानपणाच्या आठवणी चरखा आणि खादीच्या आहेत. घरी माझा मोठा भाऊ रघुनाथ त्या वेळी कॉलेजात होता तो गांधीजींच्या चळवळीत उतरला होता. गांधीजींच्या चळवळींनी भारलेलाच तो काळ होता. पुढे माझ्या शाळकरी वयात पुण्यात मी काही काळ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघात गणवेष घालून कवायत केली. त्यानंतर बेचाळीसच्या स्वातंत्र्यलढ्यात मीही शाळेवर बहिष्कार टाकून बुलेटिन्स वाटत होतो. त्यापाठोपाठ लाल निशाण गटाच्या (तेव्हाची नवजीवन संघटना) अभ्यास मंडळांना मी भक्तिभावाने जाऊ लागलो. पुढे कम्युनिस्ट पक्षाच्या सभांना जात असे आणि त्यांचं वाङ्मय तितक्याच भक्तीने वाचत असे. परंतु खऱ्या अर्थाने सामाजिक जाणीव मला आली ती पत्रव्यवसायामुळे. आपल्या पलीकडे केवढं जग पसरलं आहे आणि त्यात काय घडतं आहे हे सातत्याने कळत गेलं. तरीही या जगाची 'सेकंड हँड' जाणीवच वृत्तपत्रांच्या कचेरीत बसून होत होती. यातून 'फर्स्ट हँड' सर्व पाहण्याची उत्सुकता बळावली आणि नेहरू अभ्यासवृत्ती मिळवून मी देश भटकत सुटलो. राजकीय चळवळींपासून सामाजिक पिळवणुकीपर्यंत कितीतरी, जवळून पाहिलं. याने माझं पुस्तकी ज्ञान आणि वर्तमानपत्री अज्ञान दूर झालं. वैचारिक दृष्ट्या मी जो आहे तो या सगळ्यांमुळे आहे असं मला वाटतं.

ज्याला तुम्ही समाज-सेवा म्हणता ती समाज-सेवा मुळीच नाही. ज्या गोष्टी केल्या नाहीत तर माझ्या मनाला टोचणी लागते त्या गोष्टी मी करतो आणि त्या समाजासाठी नव्हे, माझ्यासाठी करतो. ती असली तर माझीच सेवा असते. त्यात समाजावर कोणतेही उपकार नाहीत. त्याने समाजाचं भलं होईल ही अपेक्षाही नसते. झालं तर बरंच.

माझ्या लेखनातून जी सामाजिक जाणीव व्यक्त होते ती यामुळेच, एका साहजिकपणे आणि अपरिहार्यपणे व्यक्त होते. ती सामाजिक असली तरी व्यक्तिगत आहे.

साहित्यावर सामाजिक जाणीव बंधनकारक नाही. परंतू साहित्य आणि साहित्यिक समाजापासून अलगही असू शकत नाही. एका अर्थाने समाजापासून लेखकाला जे मिळतं ते तो दुसऱ्या अर्थाने समाजाला परत करतो. यात समाज हा फार महत्त्वाचा आणि अपरिहार्य घटक आहे आणि याची जाणीव कोणत्याही सुजाण साहित्यिकाला असते. समाज हा स्वतःइतकाच आणि स्वतःबरोबरच त्याच्या चिंतनाचा विषय असतो.

जिला वैयक्तिक गरजेची अपरिहार्यता नाही ती सामाजिक जाणीव उपरी राहते आणि लेखनात प्रचारकी किंवा कंठाळी होते.

# माझे लेखन कशासाठी ?

अगदी कळू लागले तेव्हापासून मी लिहितो आहे. बालपणी काढत असे त्या गिरगट्यांची अक्षरं झाली, त्या अक्षरांचे चुकतमाकत शब्द बनू लागले, त्या शब्दांना सराईतपण आलं; शाळेतले निबंध कौतुकाने वर्गात वाचून दाखवले जाऊ लागले; मासिकात पहिली कविता छापून आली; दिवाळी अंकात पहिली गोष्ट प्रसिद्ध झाली; रेडियोवर पहिलं नभोनाट्य ध्वनिक्षेपित झालं; रंगभूमीवर पहिलं नाटक आलं—आणि मग नाटकं, गोष्टी, एकांकिका, लेख एकामागून एक लिहिली जात राहिली. वर्तमानपत्रांत एक सदर मी रोज लिहिलं. रोज उठून मी नवा विषय शोधून त्यावर कॉलमभर लिहीत असे.

या काळात हा प्रश्नच कधी आला नाही की हे सगळं कशासाठी ? माझं लेखन कशासाठी ? लिहिण्याच्या हातघाईत स्वतःला प्रश्न विचारण्याला फुरसत होती कुठे ? एखादा ज्वर चढल्यावर डोक्यात कित्येक गोष्टींचा चित्रविचित्र कोलाहल माजावा तसा मी लिहीत राहिलो. जगत राहिलो आणि लिहीत राहिलो. जगणं आणि लिहिणं यातल्या सीमारेषाच उरल्या नव्हत्या. श्वास घेणं, पाहणं, बोलणं, तसं लिहिणं अंगधर्म बनलं होतं.

पण मध्यंतरी कलकत्त्याला कमलादेवी चट्टोपाध्याय ॲवॉर्ड घेण्यासाठी गेलो आणि तिथे सांगण्यात आलं की तुमच्या लेखनामागची भूमिका सांगणारं थोडं बोला. श्रोतृसमुदाय संमिश्र असल्याने इंग्रजीत बोलावं लागणार होतं. तयारीला वेळ नव्हता, विचाराला तर नव्हताच. मी एकटाच बसलो. मन जरा एकाग्र केलं. प्रश्न विचारला, तू का लिहितोस ?

तर इंग्रजीत द्यावं लागणार असल्यानं आणि माझं इंग्रजी बेताचं असल्यानं फार घोळ घालून

चालणार नव्हता. मी विचारलेल्या प्रश्नाला माझ्याकडून उत्तर मिळालं, दुसरं काही करता येत नाही म्हणून लिहितो. दुसरं काही म्हणजे काय काय ? मी माझ्याशीच उत्तरलो, मला हर्षभराने उचंबळून गाता येत नाही. मला धुंद होऊन एखादं वाद्य वाजवता येत नाही. मला रंगाच्या सपकाऱ्यांनी फलकावर काळजातली वादळं भिरकावता येत नाहीत, मला शरीराचा अणुरेणू न सामावणारा राग कृतीत उतरवणारी राकट, बलदंड मनगटं लाभलेली नाहीत...मी मनमोकळा हसू किंवा रडूसुद्धा शकत नाही...

यादी वाढत चालली. मी स्वतःला रोखलं. विचारलं, हे सारं किंवा यातलं काही करता आलं असतं तर तू लिहिलं नसतंस का ? उत्तर मिळालं, बहुधा नसतं लिहिलं. मनातल्या वादळांना, हर्षखेदांना, रागाला आणि शोकाला, धुंदीला आणि बेचैनीला दुसरी वाट नाही म्हणून, हे सारं फार काळ आत न सामावणारं बाहेर टाकण्यासाठी मी लिहीत आलो. हेच सारं लेखन बनलं. यानंच वेगवेगळे आकार घेतले आणि ते एकांकिका झालं, गोष्ट झालं, नाटक झालं किंवा रोज लिहिण्याचं वर्तमानपत्री ललित स्फुट लेखन झालं. पण सारं अखेर हेच होतं.. माझं जगणं आणि त्या जगण्यातलं बरंवाईट भोगणं.

मी हेच त्या वेळी व्यासपीठावर उभा राहून म्हणालो.

आता आठवतं; पंधरा-सोळाव्या वर्षी शिक्षण मध्येच तुटलं, शाळेचं जग परकं झालं, मित्र उरले नाहीत, घरच्या माणसांपुढे बोलायचा बंद झालो आणि मनोमन मी एकटा एकटा पडलो. म्हणून मी एका ध्यासाने लिहीत असे. काहीही, काही तरी लिहीत असे. त्याचं पुढे काय याचा विचार न करता लिहीत असे. मनाच्या एकाकीपणात लिहिण्याची सोबत मी गाठली होती. लिहिणं ही माझी ही गरज होती. लिहिणं हे माझं बोलणं होतं, माझं संभाषण होतं.

ते वय गेलं, ती त्या वयातली कोंडलेली, कुचंबलेली अवस्था संपली, आयुष्य धारेला लागलं. त्याचा वेग खूप वाढला. पण लिहिणं चालू राहिलं. का चालू राहिलं ? मला वाटतं, तरीही माझं एकाकीपण संपलं नाही, लिहिण्याच्या सोबतीची, लेखी हितगुजाची, कागदावरच्या बडबडीची गरज संपली नाही. भोवतालच्या आयुष्याच्या गोंधळ-गोंगाटात आणि गर्दीतही मी एकटाच होतो. मला मित्र होते, सुहृद होते, हितचिंतक होते, चहाते जमत होते, तरी मी मनाच्या मनात एकटाच होतो. इच्छेने, अनिच्छेने मी अधिक बोलका होत होतो, क्वचित भाषणं करीत होतो, पण ह्या बोलण्याने माझी खरी गरज भागत नव्हती. माझं मन खऱ्या अर्थानं हलकं होत होतं, मोकळं होत होतं ते लेखनात. आतआतले सारे सल, सगळी सुखं प्रकट होत ती लेखनाच्या बोलण्यात; बोलण्याच्या बोलण्यात नव्हे.

आता मी लिहीत होतो ते प्रसिद्धीच्या प्रकाशात येत होतं, त्याला मागणी निर्माण झाली होती, त्या लेखनाचे मला पैसे मिळत होते आणि माझ्या त्या अवस्थेतल्या जगण्याला त्या मोजक्या पैशांचाही फार मोठा उपयोग होता. किंबहुना ते पैसे हे लिहिण्याला आमीष ठरत होतं. पैशासाठी रात्ररात्र मान मोडून मी लिहीत होतो. पण लिहीत होतो ते बहुतेक सगळं माझ्या जगण्याशी, जगणं भोगण्याशी संबंधित होतं. माझ्या मनाची लिहिण्यातून बोलकं होण्याची गरज आणि हौस आटत नव्हती. जगण्याशी माझ्यातल्या लेखकाचं मोठं इमान होतं असं नाही;

पण जगण्याशी बेइमान होणं माझ्यातल्या लेखकाला जमत नव्हतं, हेच खरं. पैशासाठी आणि पोटासाठी मी माझाच उपसा करीत होतो; कसला विचार न करता, एका नैसर्गिकपणाने.

आज लिहिण्याला आणि आयुष्याला लौकिक यशाचा स्पर्श झाला आहे. पोटासाठी सातत्याने लिहिण्याची गरज उरलेली नाही. वारंवार भाषणं, चर्चा कराव्या लागतात. भाषण संपल्यावर त्याचं उत्स्फूर्त कौतुक करीत अनेकदा कोणी येतात. पण मी अतिशय असमाधानी, अतृप्त, अशांत असतो. भाषण मला अशांत करतं, बेचैन करतं. लेखन शांत करतं. लेखन छातीभर निःश्वास टाकल्याचं सुख देतं. लेखन जगण्यातल्या साऱ्या कळा, वेदना, समस्या तात्पुरत्या हळुवारपणे उतरवून घेतं आणि मला एखादा खूप निर्भर, स्वच्छंद क्षण देतं. असे क्षण देणाऱ्या लेखनासाठी मी कृतज्ञतेने भरतो. वाटतं की हे लेखनही जर माझ्यापाशी नसतं तर माझ्या दुःखांना, हालांना पारावार राहिला नसता. लेखनाविना जगण्याच्या कल्पनेनेच मी घाबरा होतो.

पण या माझ्या लेखनावर मी कधी कधी फार फार रागावतोदेखील. रागाने पिसा होऊन मनोमन त्याला भरपूर शिव्या देतो, त्यावर थुंकतो. का ? कारण माणूस म्हणून जे मला जगणं आवडणार नाही, जे भोगणं मानवणार नाही, जे पाहवणार नाही, साहवणार नाही ते हे लेखन माझ्या वाट्याला आणतं. मी कृतघ्न असेन, मीं पापी असेन, पण कृतघ्न आणि पापी माणसांनी चौकात उभं राहून न्यायाधीशाची भूमिका धारण करून माझ्यावर खटला चालवणं आणि मला गुन्हेगार ठरवणं मला मुळीच मान्य नाही. दिवसाढवळ्या सर्व प्रकारची पापं एक प्रकारच्या वातड चातुर्याने संभावित वा भीरुपणाने करणाऱ्यांनी मला पापी ठरवावं याची मला आकान्ताने चीड येते, घृणा येते. मी पापी असेनच, गुन्हेगार असेनच, तर त्याची योग्य ती शहानिशा निदान स्वच्छ माणसांनी करावी आणि वाटल्यास मला शिक्षा द्यावी अस मला वाटतं. मला वाटतं की हा कोणाही आरोपीचा हक्क आहे. पण माझं लेखन एकेकदा जणू मला चौकात, चव्हाट्यावर असहाय्य उभं करतं. पापांनी बरबटलेले माझ्यावर पापी पापी म्हणून थुंकतात. असत्याच्या व्यापारात आकंठ बुडालेले मला सत्य सुनावू पाहतात. नीतीशी नाते नसलेले नीतिपाठ देऊ लागतात, निर्मितीत अयशस्वी झालेले निर्मितीचे धडे देऊ बघतात. हातोहात बनवाबनवी करताना ज्यांना मी रोज पाहतो तेच प्रामाणिकपणा शिकवतात. आणि लेखक म्हणून रस्त्यावर येऊन बसलेलं माझं एक व्यक्तिमत्त्व या सर्वांचं खेळणं बनतं. अशा वेळी या निष्ठुर लेखनाविषयी माझ्या मनात पराकोटीचा राग उसळतो. वाटतं की यानं माझा बाजार केला आहे. याच्यामुळे हे सारं मला सोसावं लागतं आहे. याची संगत दूर झुगारून देण्यासाठी गात्र न् गात्र ताठरतं—

आणि पुढल्या क्षणी कळतं की हे शक्य नाही. शक्यच नाही. श्वासोच्छ्वास दूर झुगारता येत नाही, काळजाच्या धडधडीपासून जिवंतपणी अलग होता येत नाही, तसा या लेखनापासून मी वेगळा होऊच शकत नाही. मी आणि ते एक आहोत. सयामी जुळ्यासारखी ही जन्माची आणि मरेपर्यंतची गाठ आहे. ही एकाच दिवशी तुटणार...कायमची.



# परिशिष्टे

परिचय
साहित्य संदर्भ सूची

# विजय तेंडुलकर : परिचय

**पूर्ण नाव** विजय धोंडोपंत तेंडुलकर

**पत्ता** २०८, बद्रीधाम, संत जनाबाई रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७

**जन्मस्थळ** मुंबई

**जन्मतारीख** ६ जानेवारी १९२८

**शिक्षण** मॅट्रिकपर्यंत

**व्यवसाय** १९४७ पर्यंत विविध छापखान्यांतून मुद्रित तपासनीस, १९७२ सालापर्यंत वृत्तपत्रकार, १९७९ ते १९८१ पर्यंत 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस' ह्या संस्थेत व्हिजिटिंग प्रोफेसर. गेली चाळीस वर्षे लेखनव्यवसाय.

**संपादकीय कारकीर्द** १. साप्ताहिक 'अनिल' : कार्यकारी संपादक. २. दै. 'नवभारत', 'मराठा', 'लोकसत्ता' : उपसंपादक. ३. मासिक 'वसुधा' : कार्यकारी संपादक. ४. दिवाळी 'दीपावली' व 'जाहीरनामा' : संपादक.

**बहुमान** अखिल भारतीय नाट्यक्षेत्रातील कामगिरीबद्दल संगीत नाटक अकादमीकडून पारितोषिक (१९७१), 'मंथन' चित्रपटाच्या लेखनाबद्दल भारत सरकारचे पारितोषिक (१९७७), 'आक्रोश' चित्रपटाच्या पटकथा-संवादाबद्दल फिल्मफेअरची दोन पारितोषिके (१९८०), 'अर्धसत्य' चित्रपटाच्या लेखनाबद्दल फिल्मफेअर पारितोषिक (१९८३), 'शांतता, कोर्ट चालू आहे' ह्या नाटकाच्या लेखनाबद्दल त्या वर्षातील भारतीय नाट्यकृतींतील

सर्वोत्कृष्ट नाटक म्हणून कमलादेवी चट्टोपाध्याय पारितोषिक (१९७०), १९५५ ते १९७३ ह्या काळातील विविध साहित्यकृतींना महाराष्ट्र राज्य सरकारची पारितोषिके, 'देशातील वाढते हिंसाचार' ह्या विषयाच्या अभ्यासासाठी १९७३-७४ साली नेहरू शिष्यवृत्ती, भारत सरकारकडून 'पद्मभूषण' ह्या पदवीने गौरव (१९८४), आकाशवाणी आणि दूरदर्शनवर 'प्रोड्युसर एमेरिटस' अशी नेमणूक (१९८६).

**विशेष कार्य** १. आविष्कार ह्या प्रायोगिक नाट्यसंस्थेचे अध्यक्ष. २. मुंबईच्या लोकशाही हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष. ३. दिल्लीच्या 'श्रीराम सेंटर ऑफ आर्ट अँड कल्चर' ह्या संस्थेच्या कार्यकारी समितीचे सभासद. ४. दिल्लीच्या भारतीय समाजविज्ञान संस्थेच्या कार्यकारी समितीचे सभासद. ५. राष्ट्रीय एकात्मता समितीचे सभासद. ६. साहित्य अकादमीचे माजी सभासद. ७. संगीत नाटक अकादमीचे माजी सभासद. ८. दिल्लीच्या 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'चे माजी उपाध्यक्ष.

# विजय तेंडुलकर : साहित्य-संदर्भ-सूची

*सूची शक्यतो अद्ययावत करण्याचा प्रयत्न केला आहे.*

*विजय तेंडुलकरांच्या स्वतःच्या साहित्याचा क्रम प्रसिद्धीच्या वर्षानुसार लावला आहे. त्यांच्यावरील साहित्य हे लेखकांच्या आद्याक्षरांवरून लावले आहे. परीक्षणांवरील शीर्षके न घेता फक्त मासिकाचे नाव, वर्ष आणि पृष्ठक्रमांक घेतले आहेत.*

## समग्र वाङ्मय

### नाटक

गृहस्थ* :

श्रीमंत : १९५५

माणूस नावाचे बेट : १९५८

मधल्या भिंती : १९५८

चिमणीचं घर होतं मेणाचं : १९६०

मी जिंकलो! मी हरलो ! : १९६३

कावळ्यांची शाळा : १९६४

सरी ग सरी : १९६४

*'गृहस्थ'चे पुनर्लेखन : 'कावळ्यांची शाळा'

एक हट्टी मुलगी : १९६७

शांतता ! कोर्ट चालू आहे : १९६८

अशी पाखरे येती : १९७०

गिधाडे : १९७१

सखाराम बाइंडर : १९७२

घरटे अमुचे छान : १९७३

घाशीराम कोतवाल : १९७३

दंबद्वीपचा मुकाबला : १९७४

भल्याकाका : १९७४

बेबी : १९७५

भाऊ मुरारराव : १९७५

पाहिजे जातीचे : १९७६

कमला : १९८२

मित्राची गोष्ट : १९८२

कन्यादान : १९८३

विठ्ठला : १९८५

झाला अनंत हनुमंत : अप्रकाशित

फूटपायरीचा सम्राट : अप्रकाशित

चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी : अप्रकाशित

## एकांकिका

थीफ् ! पोलीस ! :

रात्र आणि इतर एकांकिका : १९५७

चित्रगुप्त, अहो चित्रगुप्त : १९५८

अजगर आणि गंधर्व : १९६६

भेकड आणि इतर एकांकिका : १९६९

एकेकाचा आजार :

अंधेरनगरी :

## कथासंग्रह

काचपात्रे : १९५८

द्वंद्व : १९६१

गाणे : १९६६

फुलपाखरू : १९७०

## ललित लेख

कोवळी उन्हे : १९७१

रातराणी : १९७१

फुगे साबणाचे : १९७४

## संपादन - संयोजन

दिवाकरांच्या नाट्यछटा [रसग्रहण] : आवृत्ती ४ थी : १९५९

ललितकलादर्श हीरक महोत्सव स्मरणिका : १९६७-६८ : १९६८

समाजवेध : १९८७

## चरित्र

शुभं करोति [उषाकिरण] : माणूस : दिवाळी अंक : १९६८ : पृ. ५६

## संकलित वाङ्मय :

मेषपात्रे : १९६१

## बालवाङ्मय : नाटक

इथे बाळे मिळतात : १९६०

पाटलाच्या पोरीचं लगीन : १९६५

चिमणा बांधतो बंगला : १९६६

चांभारचौकशीचे नाटक : १९७०

मुलांसाठी तीन नाटिका : १९७२

# भाषांतरित वाङ्मय

## नाटक

लिंकन यांचे अखेरचे दिवस : मूळ लेखक : व्हॅन डोरेन मार्क : १९६४

वासनाचक्र : मूळ लेखक : टेनेसी विल्यम्स : १९६६

तुघलक : मूळ लेखक : गिरीश कर्नाड : १९७१

आधे अधुरे : मूळ लेखक : मोहन राकेश : १९७१

लोभ नसावा ही विनंती ! : मूळ लेखक : जॉन मार्क पॅट्रिक : आवृत्ती २ री : १९७२

## कादंबरी

कथा एका व्यथेची : मूळ लेखक : हेन्री जेम्स :

नवे घर : नवे आयुष्य : मूळ लेखक : ग्रेस जॉडर्न :

प्रेमपत्रे : मूळ लेखक : जेम्स :

आगे बढो : मूळ लेखक : जी. ली लॅथम : १९५८

गेले ते दिवस : १९५८

देवाची माणसे : १९५९

आम्ही हरणार नाही : मूळ लेखक : लॉरा इंगाल्स वाइल्डर : १९६३

रानफूल : मूळ लेखक : शिले एल्. आरोरा : १९६३

चित्याच्या मागावर : मूळ लेखक : वाल्टर वॅन टिलबर्ग क्लॉर्क : १९६७

## कथासंग्रह

पाच पाहुण्या :

## विनोदी कथा

कारभारीण : मूळ लेखक : डॉरोथी व्हॅन डारैन :

## चरित्र

दयेची देवता : मूळ लेखक : हेलन डोअर बॉयल्स्टन :

तो आमच्यासाठी लढला [रुझवेल्ट] : मूळ लेखक : कॅ. ओ. पिअर : १९६२

## माहिती

अमेरिकेची तोंडओळख : १९६५

## वृत्तपत्रीय ललित लेखन

कोवळी उन्हे : महाराष्ट्र टाइम्स : १९६७

रातराणी : माणूस :

व्यक्ती आणि प्रकृती : नवयुग : १९६१-६२

बीटनिक : मराठा : १९६२-६३

भिरभिरे : लोकसत्ता : १९७३

कुठेतरी : मनोहर : १९७५

# तेंडुलकरांचे काही असंग्रहित लेख

## नाटक

रंगभूमी : आता आणि तेव्हा : परचुरे मासिक : मार्च १९६२ : पृ. १४२

नव्या मराठी नाटकांसाठी नवी दिशा : मनोहर : जून १९६२ : पृ. ६३

परंपरा आणि प्रयोग : वसुधा : सप्टेंबर १९६२ : पृ. ५७

प्रयोगाच्या गणिताला सहस्र प्रणाम : शब्दरंजन, मुंबई : दिवाळी १९६२ : पृ. १७७

नवनाट्य-प्रेक्षक : मनोहर : ऑक्टोबर १९६३ : पृ. १२

नवनाट्य, न-नाट्य, सामान्य प्रेक्षक वगैरे : मनोहर : दिवाळी १९६३ : पृ. १३

न-नाट्य : वसुधा : एप्रिल १९६४ : पृ. ५५

एकपात्री प्रयोगाविषयी काही विचार : सत्यकथा : ऑगस्ट १९६४ : पृ. ८२

शांतता ! टीकाकार चालू आहे : मराठा : ४ ऑगस्ट १९६८ : पृ. ३

माझे पहिले नाटक 'गृहस्थ' : नाट्यभूमी : नोव्हेंबर १९६८ : पृ.•२

'शांतता ! तेंडुलकर चालू आहेत'च्या निमित्ताने : [ शांतता ! तेंडुलकर चालू आहेत' या श्री. प्रकाश गुप्ते यांच्या लेखाला दिलेले उत्तर] नाट्यभूमी : जानेवारी १९६९ : पृ. १७

'श्रीमंत' व 'शांतता ! कोर्ट चालू आहे'—एक स्पष्टीकरण : सोबत : १५ जून १९६९ : पृ. १२

नाटकाचा जन्म ['शांतता ! कोर्ट चालू आहे' या नाटकाच्या लेखंनाबद्दल] : किर्लोस्कर : जून १९७० : पृ. ४१

मी, माझे लेखन, माझी नाटके : केसरी : दिवाळी १९७१ : पृ. १४७

नाटक : ललित : दिवाळी १९७२ : पृ. १०९

मला मराठी रंगभूमी अशी हवी : मनोरा : मे १९७४ : पृ. ४१

काळी रंगभूमी : वैशाली : दिवाळी १९७५ : पृ. ५

हिंसाचार व माझे नाटक : व्याख्यान : स. प. महाविद्यालय, पुणे : ३ सप्टेंबर १९७६

मनोगत : विजय तेंडुलकरांचे ['घाशीराम'च्या निमित्ताने] पुष्कळा : दिवाळी १९८० : पृ. ७५

मी आणि माझी नाटके : शब्दांकन : रा. अ. कुंभोजकर : साहित्यसूची : जुलै १९८३ : पृ. १७

## आत्मकथन

रूळ सोडलेले आयुष्य : ललित : मार्च १९७० : पृ. २५

माझं नाट्यशिक्षण : स्पंदन : दिवाळी १९८२ : पृ. ११०

## चरित्रात्मक

हे अजब पाय [ललितकुमार मुखर्जी] : नवनीत : मे १९६२ : पृ. ३४
चष्मेवाला [पु. ल. देशपांडे] : बहुश्रुत : दिवाळी १९६२ : पृ. ७
जयप्रकाश 'नरा'यन : लोकप्रभा
तुमानवाला [वसंत सरवटे] : वीणा : ऑक्टोबर १९६३ : पृ. १४१
पांडुरंग महादेव बापट : सत्यकथा : जानेवारी १९६८ : पृ. ११
वसंतराव नाईक : लोकप्रभा

## मुलाखत

दलितांवरील अत्याचाराचे अंतरंग : गोपाळा नथ्थू गवई : लोकप्रभा : ७ मे १९७८ : पृ. ४
"दिशा निश्चित असल्याचा इसारा मला मिळाला आहे" : बाबा आमटे : लोकप्रभा : २१ मे ७८ : पृ. ३

## परीक्षण

चक्र : नंदा : सप्टेंबर १९६३ : पृ. ५३
मंगळसूत्र : वीणा : जून १९६३ : पृ. ४८

## इतर

चेहरे : महाराष्ट्र टाइम्स : दिवाळी १९७६ : पृ. २८
मरेपर्यंत फाशी : महाराष्ट्र टाइम्स : दिवाळी १९७५ : पृ. २०
[आवड : स्वतःविषयी] : मनपसंत : १९ मार्च १९७८ : पृ. ४

# विजय तेंडुलकरविषयक वाङ्मय

## ग्रंथ

धोंगडे, रमेश : तेंडुलकरांचे नाटक व पाठ्यप्रयोग : १९७९
बर्वे, चंद्रशेखर : तेंडुलकरांची नाटके : १९८५
सारंग, कमलाकर : बाइंडरचे दिवस : १९८४

## ग्रंथातर्गत समीक्षा

कुलकर्णी, गो. म. : विजय तेंडुलकर : मराठी विश्वकोश, खंड ७ वा : पृ. ४४७
जोशी, प्र. न. : मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास : नाटक, नाटिका, एकांकिका : पृ. २९५
परांजपे, कल्पना : मराठी सामाजिक नाटक आणि स्त्रीसमस्या : मातृत्व शास्त्रपूत की मनःपूत [निषिद्ध मातृत्वाची समस्या] श्रीमंत आणि शांतता ! कोर्ट चालू आहे : पृ. ४१०; ४१९

## साहित्यविषयक लेख

श्री. विजय तेंडुलकर आणि मराठी रंगभूमी : रुद्रवाणी : १ जुलै १९७३ : पृ. २४

आदित्य : मराठी नाटकाचा (अ.भा.) ''विजय'' : दीपावली : मार्च १९७० : पृ. ६०

कदम, नीळकंठ : विजय तेंडुलकर : बालनाट्य : आलोचना : जानेवारी १९८० : पृ. १४

कुलकर्णी, अरविंद वामन : विजय तेंडुलकर : एक विद्रोही नाटककार : महाराष्ट्र साहित्य पत्रिका : जून १९८० : पृ. २५

कुलकर्णी, गो. म. : नाटककार विजय तेंडुलकर : एक जिंकणे-हरणे : सत्यकथा : डिसेंबर १९७१ : पृ. ३

कुलकर्णी, द. भि. : तेंडुलकरांची तीन नाटके [शांतता', 'गिधाडे' व 'सखाराम बाइंडर'] : समाज प्रबोधन पत्रिका : नोव्हेंबर-डिसेंबर १९७२ : पृ. ३२

केळकर, भालबा : यंदाचे यशस्वी नाटककार : श्री. विजय तेंडुलकर : स्वराज्य : १३ फेब्रुवारी १९७१ : पृ. २

गोखले, म. वि. : ललित लेखक विजय तेंडुलकर : विशाखा : एप्रिल १९८७ : पृ. ११

दळवी, जयवंत : विजय तेंडुलकर ! आमचा नाटककार : लोकसत्ता : २५ जानेवारी १९७० : पृ. ६

देशपांडे, अरविंद : विजय तेंडुलकर यांची नाटके : तरुण भारत, नागपूर : १५ फेब्रुवारी १९७० : पृ. ८

देशपांडे, वि. भा. : आरंभापासून प्रयोगशील राहिलेले नाटककार विजय तेंडुलकर : विशाखा : एप्रिल १९८७ : पृ. ६

पोंक्षे, चंद्रकांत : तेंडुलकरांचा 'विजय'—एका प्रतिभासंपन्न नाटककाराची भयानक शोकांतिका : नाट्यदर्पण : जानेवारी १९७६ : पृ. १३

फुटाणे, रामदास : मी, तेंडुलकर आणि 'सामना' : गंधर्व : दिवाळी १९८५ : पृ. २४

भागवत, दुर्गा : मुलाखत : सुभाष भेंडे : सकाळ, पुणे : १४ सप्टेंबर १९७५ : पृ. ३

भोसले, द. ता. : 'गिधाडे' आणि 'सखाराम बाइंडर' : काही विचार : नवभारत : जानेवारी १९७३ : पृ. ९०

माधव मनोहर : मराठी नाटक थिटे का ? : नाटक : मुंबई : एप्रिल १९६० : पृ. १५

लाटे, दीनानाथ : 'गृहस्थ' ते 'गिधाडे' या श्री. विजय तेंडुलकरांच्या नाट्यप्रवासातील गंमती-जमती : नाट्यभूमी : ऑगस्ट १९७० : पृ. ५

लुकतुके, उल्हास : आभार ! रंगाच्या एवढ्या तुकड्यासाठी [विजय तेंडुलकरांची रंगभूमीला देणगी] : केसरी : २९ मार्च १९७० : पृ. ९

वासडीकर, लता : विजय तेंडुलकरांच्या एकांकिका : प्रतिष्ठान : जुलै-ऑगस्ट १९६५ : पृ.२०

शिंदे, फ. मुं. : विजय तेंडुलकरांची शोकात्म नाटके : एक कौटुंबिक दृष्टिकोन : रसरंग : दिवाळी १९७१ : पृ. ९५

## चरित्रविषयक लेख

किर्लोस्कर : फेब्रुवारी १९७३ : पृ. ७३

तेंडुलकर : मुलाखत : नवशक्ती : २ एप्रिल १९७२ : पृ. ५

विजय तेंडुलकरांशी मनमोकळ्या गप्पा : ललित : मे १९७६ : पृ. १२
अत्रे, प्रभाकर : श्री. विजय तेंडुकलर : अमृत : एप्रिल १९७० : पृ. १५८
कावळे, रोहित : तेंडुलकरांची जीवनदृष्टी : तात्पर्य : ऑगस्ट १९८४ : पृ. १६
गडकरी, माधव : तेंडुलकर या नावाचे एक गलबत : गोमंतक : २ एप्रिल १९७२ : पृ. १
जिज्ञासू : मनोहर : दिवाळी १९६३ : पृ. १०३ .
जोशी, श्रीधर : विजय तेंडुलकर म्हणतात—साहित्यिकाने आपल्या जीवनाशी आणि अनुभूतींशी प्रामाणिक रहावे : प्रियंवदा : जानेवारी १९७४ : पृ. १६
तापस, विजय : विजय तेंडुलकर : महाराष्ट्र टाइम्स : १८ मार्च १९८४ : पृ. ३
तेंडुलकर, मीना : माझे तेंडुलकर : किर्लोस्कर : दिवाळी १९८३ : पृ. ६२
तेंडुलकर, मीना : 'वाचक हो ! नमस्कार' : स्त्री : एप्रिल १९७१ : पृ. २०
देशपांडे, वामन : श्री. विजय तेंडुलकर : मला भावलेले : अमृत : जानेवारी १९७४ : पृ. ६१
नार्वेकर, शशिकांत : नवशक्ती : २ एप्रिल १९७२ : पृ. ५
नेरूरकर, प्र. श्री. : विजय नावाचे तेंडुलकर : रविवार मराठा : १ फेब्रुवारी १९७० : पृ. ३
नेरुरकर, प्र. श्री. : शब्दांतून सापडलेले व न सापडलेले विजय तेंडुलकर : उत्तम : दिवाळी १९७० : पृ. १५०
पाध्ये, भाऊ : विजय तेंडुलकरांची विजयश्री : नवशक्ती : ८ फेब्रुवारी १९७० : पृ. ३
पिंगे, रवींद्र : तेंडुलकर : एक भला माणूस : निषाद : दिवाळी १९७२ : पृ. १०
पेंडसे, संदीप : विजय तेंडुलकर : तात्पर्य : दिवाळी १९७८ : पृ. ७३
पेंडसे, संदीप : विजय तेंडुलकर : फलक्रम : नोव्हेंबर-डिसेंबर १९७५ : पृ. २४
पेंडसे-नाईक, वसुंधरा : जगण्याची जाण सतत वाढविणारे विजय तेंडुलकर : लोकप्रभा : ८ एप्रिल १९८४ : पृ. १६
बर्वे, चंद्रशेखर : जीवनाचा तळ शोधणारा माणूस : केसरी : ८ जानेवारी १९७८ : पृ. ७
मराठे, राजा : विजय तेंडुलकर : चेतना : दिवाळी १९८० : पृ. १२
मराठे, ह. मो. : एक हट्टी नाटककार : किर्लोस्कर : जून १९७१ : पृ. ४७
मराठे, ह. मो. : किर्लोस्कर : फेब्रुवारी १९७३ : पृ. १८
मेंढापूरकर, सुभाष : प्रीतम : दिवाळी १९७२ : पृ. ११४
मोरे, विजय : नाटककार नाटकापासून दूर : मराठा : २३ मार्च १९६९ : पृ. ५
रुद्राक्ष, दिलीप : विजय तेंडुलकर अमेरिकेकडे : राजश्री : एप्रिल १९७२ : पृ. ३७
रुद्राक्ष, दिलीप : रुद्रवाणी : १ जुलै १९७३ : पृ. २८

# ग्रंथ-परीक्षण

## नाटक

**अशी पाखरे येती :**

आलोचना : एप्रिल १९७१ : पृ. १४

परांजपे, प्र. ना. : सत्यकथा : फेब्रुवारी १९७२ : पृ. ७४

पाटणकर, रा. भा. : सत्यकथा : सप्टेंबर १९७१ : पृ. ५०

सावंत, रोहिणी : सत्यकथा : जानेवारी १९७१ : पृ. ७१

**एक हट्टी मुलगी :**

एक साहित्यप्रेमी : गोमंतक : ८ ऑक्टोबर १९६७ : पृ. ७

काळसेकर, सतीश : मराठा : १० सप्टेंबर १९६७ : पृ. ४

डांगे, चंद्रकुमार : महाराष्ट्र साहित्य पत्रिका : ए-मे-जून १९६७ : पृ. ६८

धुळे, प्रकाश : साहित्य सहकार : जून १९६८ : पृ. २९

रा. द. प. : विवेक : ४ जून १९६७ : पृ. ८

वैष्णव : नवनीत : जुलै १९६७ : पृ. ७४

**कन्यादान :**

कन्यादान आणि पुरुष : एक तुलना : रंजन : जून १९८३ : पृ. ७

धोंगडे, रमेश : 'कन्यादान'—अपयशांच्या मालिकेत एक भर : नाट्यदर्पण : ऑक्टोबर १९८३ : पृ. ५

भवाळकर, तारा : तेंडुलकरांचे 'कन्यादान' : तात्पर्य : मे-जून १९८४ : पृ. १९

वैद्य, प्रभाकर : कन्यादान : अमृत : ऑगस्ट १९८३ : पृ. ४७

**कमला :**

कुलकर्णी, वि. म. महाराष्ट्र साहित्य पत्रिका : ऑक्टो-नोव्हें-डिसेंबर १९८२ : पृ. ४६

**कावळ्यांची शाळा :**

कथासागर : जानेवारी १९६४ : पृ. ४४

कारळे, राजा : कावळ्यांची शाळा : मनोहर : फेब्रुवारी १९६४ : पृ. ५७

**गिधाडे :**

मुंबई सकाळ : ३१ ऑक्टोबर १९७१ : पृ. ९

कुंडले, म. बा. : हे कसले पुरोगामित्व ? : तरुण भारत, नागपूर : ३० जुलै १९७२ : पृ. ९

डहाके, वसंत आबाजी : क्रौर्यनाट्य व गिधाडे : सत्यकथा : सप्टेंबर १९७५ : पृ. १२

देशपांडे, गो. पु. : गिधाडे आणि अश्वत्थामा : सत्यकथा : जून १९७२ : पृ. २१

नाडकर्णी, ज्ञानेश्वर : गिधाडे : तीन प्रतिक्रिया : नाट्यभूमी : जुलै १९७० : पृ. ३५

पाध्ये, प्रभाकर : केसरी : ५ डिसेंबर १९७५

**घरटे आपुले छान :**

गोमंतक : ३० डिसेंबर १९७३ : पृ. ५

**घाशीराम कोतवाल :**

आलोचना : मे १९७३ : पृ. २३

कुलकर्णी, वा. ल. : सत्यकथा : जानेवारी १९७४ :पृ. ९

घोंगे, हरिहर : युगवाणी : फेब्रु.-मार्च १९७३ : पृ. ७०८

देशपांडे, गो. पु. : सत्यकथा : एप्रिल १९७४ : पृ. ५०

देशपांडे मीना : 'घाशीराम कोतवाल'च्या निमित्ताने मुलाखत : नाट्यदर्पण : जुलै १९७६ : पृ. ३२

धोंगडे, आश्विनी र. : घाशीराम कोतवाल नाटकातील कोरसचे स्वरूप : महाराष्ट्र साहित्य पत्रिका : मार्च १९७६ : पृ. ८८

नातू, म. गं. : 'घाशीराम कोतवाल', विजय तेंडुलकरांचा आणखी एक विक्रम : प्रतिष्ठान : फेब्रुवारी १९७४ : पृ. ३०

पाध्ये, प्रभाकर : केसरी : २५ मार्च १९७३ : पृ. २

मंगरुळकर, अरविंद : केसरी : १८ मार्च १९७३ : पृ. ४

मेदककर, प्रकाश : प्रतिष्ठान : नोव्हेंबर १९७३ : पृ. ३०

वाळिंबे, रा. शं. : अध्यक्षीय भाषण : म. वा. परिषद, बडोदे

हर्डीकर, अ. र. : मधुकंस : एप्रिल १९७३ : पृ. १०

**दंबद्वीपचा मुकाबला :**

घोंगे, हरिहर : युगवाणी : डिसेंबर-जानेवारी १९७४ : पृ. ७९३

**बेबी :**

आबूज, एकनाथ : मराठवाडा : २ ऑक्टोबर १९७६ : पृ. ७

जोशी, अ. म. : मुंबई सकाळ : १६ मे १९७६ : पृ. ५

विद्वांस, र. गं. : केसरी : २३ जानेवारी १९७७ : पृ. ४

**मित्राची गोष्ट :**

कुलकर्णी, वि. म. : महाराष्ट्र साहित्य पत्रिका : ऑक्टो-नोव्हें-डिसेंबर १९८२ : पृ. ४६

**मी जिंकलो ! मी हरलो ! :**

गजेंद्रगडकर, सुरेश : माणूस : जानेवारी १९६४ : पृ. ५८

गुण्ये, शरच्चंद्र : पैंजण : डिसेंबर १९६३ : पृ. ५४

जोग, आनंद : साहित्यसहकार : जानेवारी १९६५ : पृ. ३४

जोग, आनंद : युगवाणी : ऑगस्ट १९६५ : पृ. १५०

परांजपे, प्र. ना. : वसुधा : ऑगस्ट १९६४ : पृ. ५६

पेठे, मधुकर : साहित्यसहकार : जानेवारी १९६५ : पृ. ३३

माधव मनोहर : वीणा : डिसेंबर १९६३ : पृ. ३६

माधव मनोहर : कथासागर : डिसेंबर १९६३ : पृ. ४५

माधव मनोहर : पैंजण : डिसेंबर १९६३ : पृ. ५४

शास्त्री, रा. म. : माणूस : जानेवारी १९६४ : पृ. ५८

श्रीरंग : रसरंग : दिवाळी १९६३ : पृ. २५

क्ष : सत्यकथा : मार्च १९७२ : पृ. ७२

**शांतता ! कोर्ट चालू आहे :**

आलोचना : नोव्हेंबर १९६८ : पृ. ३

आलोचना : जानेवारी १९६९

ग्रामविकास : एप्रिल १९६९ : पृ. २०

प्रतिष्ठान : मार्च-एप्रिल १९६९ : पृ. ३०

बागेश्री : दिवाळी १९७० : पृ. ११०

माणूस : ३१ जानेवारी १९७० : पृ. ४१

कुलकर्णी, वा. ल. : प्रतिष्ठान (नाट्यविशेषांक) : एप्रिल १९७१ : पृ. १३३

गुप्ते, प्रकाश : शांतता ! तेंडुलकर चालू आहेत : नाट्यभूमी : डिसेंबर १९६८ : पृ. १९

चौघुले, वि. शं. : साहित्यसहकार : मार्च १९६९ : पृ. ४८

जोग, ल. ग. : सोबत : १० नोव्हेंबर १९६८ : पृ. ६

दुबे, सत्यदेव : मराठा : २९ डिसेंबर १९६८ : पृ. ८

देशपांडे, गो. पु. : सत्यकथा : फेब्रुवारी १९७२ : पृ. २२

धोंगडे, रमेश : महाराष्ट्र साहित्य पत्रिका : जा-फे-मार्च १९७२ : पृ. ६५

परांजपे, प्र. ना. : मराठा : २८ जुलै १९६८ : पृ. ५

परांजपे, प्र. ना. : सोबत : १० ऑगस्ट १९६९ : पृ. १०

पाध्ये, प्रभाकर : केसरी : ५ डिसेंबर १९७१ : पृ. २

मुंबई सकाळ : २८ एप्रिल १९७४ : पृ. ५

कोरान्ने, मधुरा : गोमंतक : ७ जुलै १९७४ : पृ. ४

**रातराणी :**

जोशी, सुधा : महाराष्ट्र टाइम्स : १८ मार्च १९७३ : पृ. ९

## अनुवादित नाटक : परीक्षण

**तघलक : गिरीश कर्नाड :**

आलोचना : सप्टेंबर १९७२ : पृ. ४४

कानडे, माणिक : ओज : १५ ऑगस्ट १९७२ : पृ. १३

ठेंगडी, ना. बा. : तरुण भारत, नागपूर : ११ जून १९७२ : पृ. ९

वाळिंबे, सुरेश : गोमंतक : २५ जून १९७२ : पृ. ९

**वासनाचक्र : टेनेसी विल्यम्स :**

नेरूरकर, प्रदीप : मराठा : ३ डिसेंबर १९६७ : पृ. ६

## तेंडुलकर, वाङ्मयसूची :

जोशी, विद्या : रुचि : दिवाळी १९८० :

विशाखा : एप्रिल १९८७ :

## तेंडुलकरांच्या नाटक आणि एकांकिका यांची दुसऱ्या भाषांत अनुवादित झालेली पुस्तके :

**नाटक :**

१) श्रीमंत : हिंदी

२) माणूस नावाचे बेट : हिंदी

३) मी जिंकलो ! मी हरलो ! : हिंदी

४) एक हट्टी मुलगी : हिंदी

५) शांतता ! कोर्ट चालू आहे : सर्व भारतीय भाषांत

६) अशी पाखरे येती : हिंदी, गुजराती, कन्नड, तेलगू, इंग्रजी

७) गिधाडे : कन्नड, तेलगू, तामीळ

८) सखाराम बाइंडर : हिंदी, इंग्रजी, गुजराती, बंगाली, कानडी, फ्रेंच

९) घाशीराम कोतवाल : हिंदी, इंग्रजी

१०) दंबद्वीपचा मुकाबला : इंग्रजी

११) बेबी : हिंदी, गुजराती, इंग्रजी

१२) भाऊ मुरारराव : हिंदी

१३) कमला : हिंदी, गुजराती, बंगाली, इंग्रजी

१४) मित्राची गोष्ट : हिंदी

१५) कन्यादान : हिंदी, बंगाली

१६) चिरंजीव सौभाग्य कांक्षिणी : हिंदी, इंग्रजी

## एकांकिका

१) थीफ् ! पोलीस ! : हिंदी

२) रात्र आणि इतर एकांकिका : हिंदी

३) चित्रगुप्त, अहो चित्रगुप्त : हिंदी

४) अजगर आणि गंधर्व : हिंदी

५) भेकड आणि इतर एकांकिका : हिंदी

६) एकेकाचा आजार : हिंदी

७) अंधेरनगरी : हिंदी

**बालवाङ्मय : नाटक :**

इथे बाळे मिळतात : हिंदी

पाटलाच्या पोरीचं लगीन : हिंदी

चिमणा बांधतो बंगला : हिंदी

चांभार चौकशीचे नाटक : हिंदी

राजाराणीला घाम हवा : हिंदी

बाबा हरवले आहेत : हिंदी

बॉबीची गोष्ट : हिंदी, इंग्रजी

## विजय तेंडुलकरांचे पटकथा आणि संवाद असलेले चित्रपट

**मराठी :**

शांतता ! कोर्ट चालू आहे : १९७२

सामना : १९७५

घाशीराम कोतवाल : १९७६

सिंहासन : १९७९

आक्रित : १९८१

उंबरठा : १९८१

चिमणराव : १९८१

२२ जून १८९७ (संवाद) : १९८०

**हिंदी :**

प्रार्थना : १९७०

शांतता ! कोर्ट चालू आहे : १९७२

निशांत : १९७५

मंथन : १९७७

आक्रोश : १९८०

गहराई : १९८१

अर्धसत्य : १९८३

कमला : १९८४

मुसाफिर : १९८५

आघात : १९८६

ईमान (कथा) : १९७५

## दूरदर्शन मालिका

स्वयंसिद्धा : १९८७

REFBK-0025712

निबंध